श्री. ज. स. करंदीकर

यांचे

# निवडक लेख व निबंध

खंड पहिला

प्रकाशक

आत्माराम गवजी भट, एम्. कॉम्.,

संयोजक, ज. स. करंदीकर-सन्मान-निधि,

केसरी कार्यालय, पुणे २.

शक १८७२; सन १९५०

मूल्य ६ रुपये

श्री. ज. स. करंदीकर

यांचे

# निवडक लेख व निबंध

प्रकाशक

आत्माराम रावजी भट, एम्. कॉम्.,

संयोजक, ज. स. करंदीकर-सन्मान-निधि,

केसरी कार्यालय, पुणें २.

शके १८७१; सन १९५०

मूल्य ६ रुपये

मुद्रक :
आ. रा. भट, एम्. कॉम्.,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# अनुक्रमणिका

## प्रस्तावना


१ सविनय निवेदन ... ... ... ... ५
२ केसरीचे दक्ष आणि साक्षेपी संपादक ... ... ... ७
३ लेखांची निवड करण्यांतील धोरण ... ... ... १५


## महायुद्ध व परराष्ट्रीय राजकारण


१ जर्मन गरुडाचे तोडलेले पंख पुनश्च फुटले ... ... १
२ जर्मन गरुडाची भरारी ... ... ... ... ७
३ महायुद्धाचा वणवा पेटला ... ... ... १०
४ इटालीनें आगींत तेल ओतलें ... ... ... १३
५ फ्रान्सच्या शरणागतीची मीमांसा ... ... ... १९
६ रशियांतील रणसंग्रामाचा आढावा ... ... ... २४
७ जपानी चढाईचा परिणाम ... ... ... ३०
८ सिंगापूर पडलें; आतां तरी कर्तव्य-मार्गाला लागा ... ... ३६
९ ब्रह्मदेश गेला, आसाम तरी नीट सांभाळा ! ... ... ४१
१० महायुद्धाचा रंग पालटला ... ... ... ४६
११ यांत कोणाचें काय साधलें ? ... ... ... ५२
१२ दोस्तांचा पहिला खरा विजय ... ... ... ५८
१३ जय निश्चित, काळ अनिश्चित ... ... ... ६२
१४ युरोपांतलें नवें जिब्राॅल्टर ... ... ... ६७
१५ पराजयाला हिंवाळा आड ... ... ... ७२
१६ काळ्या समुद्रांतलें काळकूट ... ... ... ७८
१७ महायुद्धाचें अखेरचें पर्व ... ... ... ... ८५
१८ रत्नांच्या वांटणीची वाट काय ? ... ... ... ९१
१९ इंग्लंड व रशिया यांची तेढ ... ... ... ९७


## देशांतील राजकीय घडामोडी


१ प्रांतिक स्वराज्याचा पहिला हप्ता ... ... ... १०२
२ करायला गेला एक, झालें भलतेंच ... ... ... १०९
३ कलकत्त्याच्या काँग्रेसची अपूर्णता ... ... ... ११४
४ घरीं कामधेनू पुढें ताक मागे ... ... ... १२२
५ मोर्लेसाहेबांच्या आठवणी ... ... ... १२९
६ प्रायश्चित्ताच्या वेळींच नवें पाप ... ... ... १३८

| | | |
|---|---|---|
| ७ | संजय-शिष्टाई | १४४ |
| ८ | मुंबईच्या दंग्यापासून बोध घ्या | १५० |
| ९ | शंखान् दध्मुः पृथक् पृथक् | १५६ |
| १० | अमृतसरच्या वाटेंतला टप्पा | १६१ |
| ११ | बार्डोलीचा नमुनेदार सत्याग्रह | १६९ |
| १२ | एक बार्डोली मिटली, पण इतरांची वाट काय ? | १७५ |
| १३ | सत्याग्रहाच्या युद्धाचा रणदुंदुभि वाजूं लागला | १८१ |
| १४ | बेजबाबदार नोकरशाही व दुबळें लोकमत | १८६ |
| १५ | कराचीच्या गोळीबाराची मीमांसा | १९१ |
| १६ | सव्याज वचपा काढून घेतला | १९४ |
| १७ | राबविणार कीं राबविले जाणार | २०० |


## आर्थिक व्यवहार


| | | |
|---|---|---|
| १ | केली कोंडी पण झाला कोंडमारा | २०६ |
| २ | कालवे का रेल्वे ? | २१२ |
| ३ | करांचा पूर्वेतिहास | २१७ |
| ४ | कर वाढवावयाचेच तर हे वाढवा | २२३ |
| ५ | नोटांचा सुकाळ आणि महर्घता | २३० |
| ६ | महाराष्ट्रीय व्यापारी परिषद | २३४ |
| ७ | हेले गेले पण घाण गेली नाही | २४० |
| ८ | गोऱ्यांचे लाड; सव्वा कोटीची धाड | २४६ |
| ९ | संरक्षण द्या पण हमी घ्या | २५१ |
| १० | हिंदी चलनाचा सोन्याशीं घटस्फोट | २५६ |


## संपादकीय धोरण


| | | |
|---|---|---|
| १ | केसरी पत्राचें ध्येय, धोरण व ब्रीद | २६८ |
| २ | अक्षय्य टिकणाऱ्या कलाकुसरीचे कारागीर बना | २७८ |
| ३ | अ. भा. मराठी पत्रकार परिषद, मुंबई | २८४ |
| ४ | केसरी पत्राचें धोरण | २९१ |

# सविनय निवेदन

केसरी-मराठा संस्थेचे विद्यमान विश्वस्त व 'केसरी'चे माजी संपादक श्री. जनार्दन सखाराम ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर यांचे चहाते व विद्यार्थी यांच्यावतीनें तात्यासाहेबांच्या (१) महायुद्ध व परराष्ट्रीय राजकारण, (२) देशांतील राजकीय घडामोडी, (३) आर्थिक व्यवहार व (४) संपादकीय धोरण या विषयांवरील केसरींतलि निवडक लेख व निबंध पुस्तकरूपानें वाचकांना सादर करतांना मला आनंद होत आहे. श्री. तात्यासाहेबांच्या इतिहासविषयक, सांस्कृतिक, ज्योतिषविषयक व इतर निवडक लेखहि असेंच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. त्याची किंमत पृष्ठसंख्येच्या मानानें ठेवण्यांत येईल.

हे निवडक लेख नि निबंध यांचें प्रसिद्धीकरण हा, तात्यासाहेबांचे चहाते व विद्यार्थी यांच्यातर्फे त्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवशीं त्यांचा सन्मान करण्याची जी योजना आंखली आहे त्याचा एक भाग आहे.

१९४६ च्या जुलैअखेर श्री. तात्यासाहेब करंदीकर हे 'केसरी'च्या संपादकीय कार्यांतून निवृत्त झाले. त्या वेळीं केसरी संस्थेतर्फे त्यांचा सत्कार झाला. त्या समारंभाचीं निमंत्रणें इतरांबरोबर तात्यांचे समर्थ विद्यालयांतील दोन शिष्य श्री. शंकर प्रभाकर ओगले ( म्हैसूर ग्लास अँड एनामल वर्क्स लि. ) व नारायण गोविंद नाईक ( श्रीराम सिल्क मिल्स लि. ), तसेच श्री. गोपाळ दत्तात्रय आपटे, ऑडिटर व श्री. रामकृष्ण गोविंद कुलकर्णी ( सदर्न निटिंग वर्क्स लि. ), यांना गेलीं होतीं. पुढें कांहीं कामानिमित्त आम्ही एकत्र आलों असतां केसरी मराठा संस्थेतर्फे झालेल्या समारंभासंबंधीं बोलणें निघालें व तात्यांचे विद्यार्थी नि चहाते यांच्यातर्फे त्यांचा सन्मान योग्य समय साधून करावा असा विचार निघाला. सात-आठ महिन्यांपूर्वी पुनः आम्ही एकत्र आलों असतां तात्यांचें हें पंचाहत्तरावें वर्ष पूर्ण होत असल्यानें त्यांच्या शहात्तराव्या वाढदिवशीं त्यांचा सन्मान करावा असें आम्हीं योजिलें. सदर सन्मानाची जी त्रिविध योजना क्रमशः तयार झाली ती अशी :—

(१) श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनीं आपल्या आयुष्याला प्रारंभ केला तो प्रथमतः मुधोळ हायस्कुलांत शिक्षक म्हणून. त्यानंतर त्यांनीं कै. गुरुवर्य अण्णासाहेब विजापूरकरांच्या आद्य समर्थ विद्यालयाला वाहून घेतलें. तें विद्यालय सरकारच्या दडपशाहीमुळें बंद झाल्यानंतर त्यांनीं पुण्यास येऊन विद्यालयांतील विद्यार्थ्यांचें शिक्षण पुरें करून दिलें. त्यानंतर ते केसरी-मराठा संस्थेंत आले व केसरीद्वारां त्यांनीं लोकशिक्षणाचेंच कार्य केलें. या दृष्टीनें त्यांच्या या शिक्षणविषयक कार्याला योग्य असा त्यांचा गौरव करण्याकरितां त्यांच्या नांवें पुणें विद्यापीठांत शिष्यवृत्ति वा पारितोषिक ठेवावें.

(२) श्री. तात्यासाहेब १९१२ मध्यें केसरी-मराठा संस्थेंत दाखल झाले व

त्यांनीं विविध क्षेत्रांत सार्वजनिक कार्य केलें. सबब केसरी-मराठा संस्थेला त्यांचें तैलचित्र अर्पण करावें.

(३) केसरीची प्रतिष्ठा ज्यांच्यामुळें वृत्तपत्र जगतांत वाढली अशा आगरकर, टिळक, केळकर व खाडिलकर या थोर संपादकांच्या मालिकेंत बसणारे श्री. तात्यासाहेब करंदीकर हे आहेत. 'गीतातत्त्वमंजरी' व 'हिंदुराष्ट्रवाद' हे त्यांचे उत्कृष्ट ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. भावी पिढ्यांना या ग्रंथांमुळें त्यांचा ग्रंथ-लेखनाचा परिचय केव्हांहि होऊं शकेल; परंतु तात्यासाहेबांची अष्टपैलू लेखणी जी चालली ती केसरीच्या स्तंभांत. गेल्या सदतीस-अडतीस वर्षांत त्यांनीं परराष्ट्रीय राजकारण, भारतीय राजकारण, अर्थशास्त्र, इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान, ज्योतिष वगैरे अनेक विषयांवर विद्वत्तापूर्ण अग्रलेख वा इतर निबंध लिहिले. करंदीकरांच्या या संपादकीय लेखांचा परिचय अभ्यासकांना व्हावयाचा तर त्यांचे विविध विषयांवरील निवडक लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणें आवश्यक; म्हणून तसे प्रसिद्ध करावे.

ही त्रिविध योजना साकार करण्याचें काम श्री. ओगले, नाईक, आपटे व कुलकर्णी यांनीं मजवर सोंपविली.

जी योजना आंखली तिला ईशकृपेनें अल्पावधींत मूर्तस्वरूप आलें आहे. सदर योजना अशी :—

(१) पुणें विद्यापीठाची इंटर-कॉमर्सची परीक्षा निदान दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण होऊन अर्थशास्त्र या विषयांत सर्वांत अधिक गुण मिळविणाऱ्या व त्याच विद्यापीठाच्या बी. कॉम्. परीक्षेचा अभ्यास चालू ठेवणाऱ्या विद्यार्थ्यास दोन वर्षेपर्यंत प्रतिमासीं रु. २५ ची शिष्यवृत्ति एक वर्षाआड देण्यांत यावयाची आहे. शिष्यवृत्तीच्या विषयाची निवड आमच्या विनंतीनुसार श्री. तात्यासाहेबांनीं केली आहे.

(२) सुप्रसिद्ध चित्रकार श्री. ज. द. गोंधळेकर यांच्याकडून श्री. तात्यासाहेबांचें तैलचित्र करवून घेतलें आहे.

(३) पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याकरितां विविध विषयांवरील लेखांची निवड करून देण्यास व त्या लेखांची पार्श्वभूमि दर्शविणाऱ्या टीपा लिहिण्याची विनंति श्री. तात्यासाहेबांना केली, ती त्यांनीं मान्य केली. या व यानंतर प्रसिद्ध होणाऱ्या लेखसंग्रहांतील लेखांची निवड श्री. तात्यासाहेबांनीं केलेली आहे. त्यांनीं लेखांची निवड कोणत्या दृष्टीनें केली याचेंहि विवेचन त्यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत आलें आहे. केसरीचे विद्यमान संपादक श्री. ग. वि. केतकर यांनीं 'केसरीचे दक्ष आणि साक्षेपी संपादक' या प्रास्ताविक लेखांत श्री. करंदीकरांच्या संपादकीय कार्याचा धांवता आढावा घेतला आहे. वर निर्देश केलेली त्रिविध सन्मान-योजना फलद्रूप होण्यास ज्यांनीं ज्यांनीं साहाय्य केलें त्या सर्वांचा मी आभारी आहें.

केसरी-मराठा कचेरी,<br>पुणें २.

आत्माराम रावजी भट,<br>संयोजक.

# केसरीचे दक्ष आणि साक्षेपी संपादक

## श्री. करंदीकर यांचें संपन्न लिखाण

श्री. तात्यासाहेब करंदीकर हे केसरी संस्थेंत दि. १२ मार्च १९१२ ला प्रविष्ट झाले. तीन वर्षांनीं म्हणजे एप्रिल १९१५ मध्यें उपसंपादक म्हणून त्यांची कायम नेमणूक झाली. मुख्य संपादक म्हणून त्यांची नेमणूक १९३१ च्या जानेवारींत झाली. एक वर्षानें म्हणजे १९३२ च्या जानेवारींत त्यांना कायदेभंगाच्या चळवळींत दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. १९३३ च्या ऑक्टोबरमध्यें ते सुटून आल्यावर पुनः केसरी त्यांच्या नांवावर झाला तो १९४६ च्या ऑगस्टपर्यंत होता. दोन्ही खंड मिळून १४ वर्षें केसरीचे ते मुख्य संपादक होते. तथापि श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं ट्रस्टीशिप सोडल्यावर श्री. करंदीकर हे पूर्ण मुखत्यार झाले. तेव्हांपासून युद्ध-कालांत वृत्तपत्रांचा आकार व किंमत यांवर नियंत्रण येईपर्यंत १९३७ ते १९४६ जुलै-अखेर केसरीचा खप १५ हजारांपासून ३० हजारांपर्यंत गेला. खपांत झपाट्यानें झालेली ही वाढ श्री. करंदीकरांच्या कुशल संपादकत्वाचा प्रत्यक्ष पुरावाच होय.

सप्टेंबर १९१० मध्यें ते समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पुरा करण्यासाठीं पुण्यास आले. तेव्हांपासून आजवर म्हणजे ४० वर्षें केसरीशीं त्यांचा संबंध आला. त्यांच्या निवडक लेखांचा हा संग्रह त्यांच्या वयाला ७५ वर्षें पुरीं झाल्याच्या निमित्तानें लोकांपुढें येत आहे. यावरूनच टिळक, केळकर, खाडिलकर यांच्याप्रमाणेंच करंदीकरांनींहि वाङ्मयांत ग्रंथरूपानें जतन करून ठेवण्यासारखें लेखन केसरींतून केलें ही गोष्ट स्पष्ट होत आहे. लोकमान्य टिळकांच्या केसरींतील लेखसंग्रहाच्या प्रसिद्धीपूर्वी आर्यभूषण छापखान्यामार्फत केसरींतील निवडक निबंध दोन भागांत प्रसिद्ध झाले होते. यांत आगरकर, चिपळूणकर, वासुदेवराव केळकर, तात्यासाहेब केळकर, देवधर आणि टिळक यांचे लेख असले पाहिजेत अशी कल्पना आहे. नेमके कोणते कोणाचे हें समजण्यास आज साधन नाहीं. एवढें मात्र खरें कीं, १८८१ पासून १९४६ पर्यंत केसरीच्या थोर संपादकांच्या लिखाणांतून आलेले महत्त्वाचे लेख पुस्तकरूपानें छापण्याची परंपरा अव्याहत चालली असें म्हणावें लागेल. हिंदुस्थानांतील वृत्तपत्रांच्या संबंधांत तरी अशा प्रकारचें उदाहरण असामान्य असें म्हटलें पाहिजे. एका वृत्तपत्राला लागोपाठ मौलिक लिखाण लिहिणाऱ्या इतक्या संपादकांची सांखळी किंवा परंपरा अखंडितपणें लाभावी ही गोष्ट केसरी पत्राच्या इतर अनेक वैशिष्ट्यांत भरच टाकणारी आहे.

### केसरीच्या संपादनाचें मर्म

१९४१ मध्यें केसरीचीं साठ वर्षें पुरीं झालीं, त्या वेळीं श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनी केसरींत जो विस्तृत अग्रलेख लिहिला त्यामध्यें केसरीची परंपरा आणि तदनुसार कर्तव्यबुद्धीनें काम करणारा संपादक यांचा दृष्टिकोन अनेकांगांनीं

समजून दिला आहे. केसरी पत्राच्या स्वरूपासंबंधानें आणि केसरी संस्थेच्या कामासंबंधानें अनेकांकडून आपापल्या कल्पनांवर आधारलेल्या सूचना येत असतात. तसेंच या संस्थेमध्यें कोणी दाखल झाला किंवा कोणी निघाला, अथवा संपादकीय नांवांत बदल झाला म्हणजे आपापल्या समजुतीप्रमाणें या सूचनांचा बरावाईट अर्थ बसवीत असतात. या सर्वांना व्यक्तिशः उत्तरें देण्याऐवजीं केसरी संस्था आणि केसरीचें संपादकत्व यांसंबंधीं यथार्थ कल्पना समग्र मांडली म्हणजे आपो-आप ज्याचें त्याला उत्तर सांपडेल, अशा बुद्धीनें हा अग्रलेख लिहिलेला आहे.

हा अग्रलेख म्हणजे श्री. करंदीकरांचें एकप्रकारचें संपादकीय आत्म-निवेदनच आहे. कारण त्यांत वर्णन केलेली कामाची दृष्टि आणि भावना ही सर्वांत अधिक यथार्थपणें आणि उत्कटपणें श्री. करंदीकर यांच्या संपादकीय कामांत दिसून येते. ते मुख्य संपादक म्हणून झाले असतां त्यांनीं एक वर्षभर टिळकांचें मोठें छायाचित्र सारखें अग्रलेखावर घातलें होतें. तसेंच मुखपृष्ठावर केसरी या नांवाच्या खालीं प्रथम संस्थापक टिळकांचें नांव आणि त्याखालीं लगेच विद्यमान संपादकाचें नांव छापण्याची योजना ही देखील करंदीकर यांनीं प्रथमच चालू केली. केसरीला टिळकांच्या वेळचें गंभीर उच्च पातळीचें आणि राष्ट्र-कार्यप्रेरक स्वरूप असलें पाहिजे आणि वाचकांच्या क्षणिक आवडी-निवडीच्या अनुसार केसरीचें तारतम्य बदलूं नये, स्थिर राहावें याविषयीं श्री. करंदीकर हें सर्वांत अधिक दक्ष होते व असतात. केसरीच्या टिळकांनीं ठरलेल्या राष्ट्रीय स्थायीभावामध्यें अवांतर संपादकवर्गाच्या प्रकृतिधर्मानुसार क्वचित् फेरबदल झालेला असेल तर तो अपवादात्मक मानून मूळ टिळकांनीं घालून दिलेलें स्वरूप श्री. करंदीकर यांनीं सतत डोळ्यापुढें ठेवलेलें असे.

## लो. टिळकांची छाप

जी गोष्ट केसरीच्या एकंदर स्वरूपाची तीच श्री. करंदीकर यांच्या लेखनपद्धतीला लागूं करतां येईल. म्हणजे केसरीच्या राष्ट्रीय उपयुक्ततेकडे दृष्टि ठेवणाऱ्या स्वरूपाप्रमाणें त्यांतील भाषा आणि लेखनपद्धति हीं अनुरूप अशींच असलीं पाहिजे, याच दृष्टीनें श्री. करंदीकर यांची भाषा व लेखनपद्धति आपोआप निश्चित झाली आहे. त्यांच्या भाषेंत आणि प्रतिपादन-शैलींत लोकमान्य टिळकांच्या शैलीचें सर्वांत अधिक अनुकरण दृष्टीस पडतें. विशेषतः १९१५ ते १९२० पर्यंत त्यांचे लेख टिळकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळें शैलीमध्यें अधिक टिळक-सदृश झाले आहेत. या दृष्टीनें टिळकांच्या छापेंत किंवा आपल्या छापेंत स्वत्व जवळ जवळ विलीन करणारे संपादक श्री. काकासाहेब खाडिलकर आणि श्री. करंदीकर हे सर्वांत अग्रगण्य आणि समांतर असे दिसतात. श्री. खाडिलकर यांच्या काळांत त्यांचें आणि टिळकांचें लिखाण वेगळें निवडून काढणें इतरांना फार कठीण जाई, आणि

खाडिलकरांचा लेख असतांना तो टिळकांचा असावा अशी पुष्कळांची समजूत होत असे. परवापरवापर्यंत केसरींतील अग्रलेख कोणाचे याची नोंद ठेवली जात नव्हती. यामुळें कोणते लेख कोणाचे हा निश्चय इतरांना अनुमानानेंच करावा लागे. श्री. करंदीकर यांच्या या लेखसंग्रहाच्या पहिल्या भागांत पृष्ठ १०९ वर आलेला ‘ करायला गेला एक, झालें भलतेंच ’ हा २६ जून १९१७ चा लेख टिळकांचा आहे कीं काय असा क्षणभर भ्रम पडतो. त्यांत आणखी असें दिसतें कीं, इतर लेखक टिळकांचा उल्लेख करतांना ‘ लो. टिळक ’ असा उल्लेख करीत. तसा उल्लेख याच लेखसंग्रहांत पृष्ठ १२९ ते १३४ पर्यंत आलेल्या ‘ मोर्लेसाहेबांच्या आठवणी ’ या लेखांत पृष्ठ १३४ वर शेवटून दुसऱ्या ओळींत आला आहे. हा लेख १९१९ मधील म्हणजे टिळकांच्या हयातींतीलच आहे. उलट, आम्ही म्हणतों त्या १९१७ मधील लेखामध्यें पृष्ठ ११० वर टिळकांचा एकेरी उल्लेख आहे, त्यामुळें अधिकच संशय वाटतो. कांहीं वाक्यें आणि विशेषतः शेवटचा छेदक हा टिळकांनीं लिहिला आहे कीं काय असा संदेह उत्पन्न होण्यासारखा उतरला आहे. त्यांतील दोनच वाक्यें आम्ही पुढें देतों :—

“ लॉर्ड पेंटलंड यांच्या या अविचारी कृत्यानें स्वराज्य प्राप्त करून घेण्याबद्दलच्या आस्थेची, कळकळीची आणि निश्चयाची जी लाट आज हिंदुस्थानभर पसरलेली आहे तीच दृढतर व चिरस्थायी करून स्वराज्याचे हक्क मिळेपर्यंत तीं तशीच कायम ठेवणें हें या वेळेचें आपलें कर्तव्य होय आणि तें मोठ्या उत्साहानें, नेटानें आणि धैर्यानें कोणत्याहि प्रकारचा मतभेद न ठेवतां केवळ मातृभूमीच्या उद्धाराकडे लक्ष देऊन सर्वांनीं पार पाडावें अशी त्यांस आमची प्रार्थना आहे. ”

या वेळीं टिळक हे विद्यमान असून त्यांच्या होमरूलच्या चळवळीला भरती आलेली होती. श्री. तात्यासाहेब करंदीकर हे केसरींत येऊन दोनच वर्षें झालेलीं होतीं. यामुळें या वेळीं श्री. करंदीकर यांच्या लेखणींतून उतरलेल्या लेखांमध्यें टिळकांच्या विचारसरणीशीं अधिकांत अधिक तादात्म्य दिसून आलें हें स्वाभाविक होय. अशा प्रकारें वरील शंकेचा परिहार सांगतां येईल. एरवीं, या संग्रहांतील लेखांची निवड स्वतः करंदीकर यांनींच करून दिलेली असल्यामुळें आणि ती काळजीपूर्वक केली असल्यामुळें त्यांच्या आठवणींत चूक झालेली असेल हें संभवनीय नाहीं.

## राष्ट्रीय जीवनाशीं तादात्म्य

राष्ट्रांतील राजकीय घडामोडींमध्यें टिळक स्वतः प्रामुख्यानें भाग घेत होते. ती सर्वमान्यता १९२० नंतर केळकरांच्या वांट्यास आली नाहीं. तरीहि देशाच्या राजकीय घडामोडींत ते प्रामुख्यानें भाग घेणारे होते. केळकरांच्या नंतर हीहि स्थिति राहिलेली नाहीं. तरी पण राष्ट्रीय जीवनामध्यें तादात्म्य ठेवून केसरीनें लिहिलें पाहिजे ही जबाबदारी मात्र कमी झालेली नाहीं. उदाहरणार्थ,

१९२८ च्या बार्डोलीच्या सत्याग्रहांत आणि १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहांत केसरीचें पुढारीपण नव्हतें. होमरूलच्या चळवळींत किंवा स्वराज्य-पक्षाच्या चळवळींत जसें अनुक्रमें टिळक आणि केळकर यांचें पुढारीपण होतें तसें १९२८ व १९३० या सालांत नसतांनाहि बार्डोलीच्या सत्याग्रहावरील किंवा मिठाच्या सत्याग्रहावरील जे करंदीकरांचे अग्रलेख या लेखसंग्रहांत आलेले आहेत त्यांमध्यें राष्ट्रीय जीवनाशीं तादात्म्य ठेवूनच करंदीकरांची लेखणी चाललेली दिसून येईल. टिळक व खाडिलकर यांच्याप्रमाणेंच करंदीकरांच्या लिखाणांत सडेतोडपणा आहे. टिळकांप्रमाणेंच महाभारताचीं किंवा इतर संस्कृत वचनें देण्याची प्रवृत्ति करंदीकरांची आहे. टिळक-खाडिलकर हे अग्रलेखांचे मथळे समर्पक, सुटसुटीत किंवा सुश्लिष्ट करण्यासाठीं विशेष काळजी घेत नसत. स्वाभाविकपणें तशी रचना कधीं कधीं येई ही गोष्ट निराळी. करंदीकर यांच्या मथळ्यांत ही काळजी अधिक दिसून येते. सर्व लेखाचें स्वरूप थोडक्या शब्दांत समर्पकपणानें ग्रथित व्हावें असा प्रयत्न करंदीकर यांच्या मथळ्यांत अधिक दिसतो. लिहिण्याच्या सडेतोडपणांत खाडिलकरांप्रमाणेंच करंदीकरांनींहि टिळकांचा आदर्श पुढें ठेवलेला आहे. विषय समजून देण्याची हातोटी हा करंदीकरांचा विशेष आहे. महायुद्धामधील मोक्याचे प्रसंग, त्यांतील स्वारस्य ध्यानांत येईल अशा पद्धतीनें, ज्या अग्रलेखांतून करंदीकर यांनीं मांडले आहेत ते अग्रलेख अतिशय नमुनेदार आहेत. १९४० ते १९४४ पर्यंतच्या काळांत या अग्रलेखांमुळें वाचक लढाईंतील मोक्याचा प्रसंग आला असतां या वेळीं केसरीचा अग्रलेख पाहिजे अशी अपेक्षा करीत आणि ती अपेक्षा नेमकी आणि संपूर्णपणें तृप्त करणारे अग्रलेख एकामागून एक या चार वर्षांत श्री. करंदीकर यांनीं लिहिले आहेत.

किंबहुना करंदीकर यांच्या संपादकीय कौशल्याची आणि कर्तृत्वाची शीग या चार वर्षांतील लिखाणांत पाहावयास सांपडते. एका बाजूला दैनिकांतून त्रोटकपणें आणि तुटकपणें येणाऱ्या महायुद्धाच्या वार्ता, अनेक ठिकाणांतून एकत्र संकलित करून करंदीकरांच्या मार्गदर्शकत्वानें काम करणाऱ्या दुय्यम संपादकांकडून केसरींत दिल्या जात असत. तुटक वार्तांनीं भांबावून गेलेल्या वाचकांना त्यांतील निष्कर्ष लेखरूपानें केसरींत सतत दिला गेला. लोकांना तो वाचल्याविना त्या वेळीं समाधान वाटत नसे. रणक्षेत्रावर चाललेल्या घडामोडींचें संगतवार सूत्र जुळविणाऱ्या या पार्श्वभूमीवर युद्धाला कलाटणी देण्यासारख्या घटना घडण्याच्या प्रसंगीं जे अग्रलेख करंदीकर लिहीत त्यांवर जिज्ञासू वाचकांच्या उड्या पडत. केसरी उघडल्याबरोबर प्रथम युद्धवार्ता वाचणें आणि नंतर अग्रलेख यासंबंधींच आहे कीं काय हें पाहणें, असा या काळांत हजारों वाचकांचा क्रम झालेला होता. गांवोगांवीं कित्येक मित्रमंडळींच्या कंपूमध्यें केसरींतील युद्धवार्तेचें नित्य सामुदायिक वाचन त्या वेळीं केलें जात असे. महायुद्ध आणि त्यांतील घडामोडी

हा लोकांच्या नित्य चर्चेतील विषय होता. वर्तमानपत्रवाचनाची गोडीहि या कालांत किती तरी पटीनें वाढली. युद्धासंबंधाच्या चर्चेत अनेक ठिकाणीं वाद अपुरे ठेवले जात. अशाकरितां कीं, "पुढचा केसरी येतो तो पाहूं आणि त्यांत त्याचा निर्णय समजेल." आणि या अपेक्षेनें पुढील अंक उघडला व वाचला जात असे आणि तत्पूर्वी असलेल्या अनेक शंकांचा खुलासा त्यांत होऊन जाई.

## वादविवाद-कौशल्य

लिखाणांतील बोचकपणा हा टिळकांपेक्षाहि खाडिलकर यांच्या लेखांत थोडा अधिक असे आणि त्याची झाक श्री. करंदीकर यांच्या लिखाणांतहि दिसून येते. सरकारवर समोरासमोरून हल्ला करण्याचे प्रसंग करंदीकरांच्या कारकीर्दींत अनेक आले. त्यामध्यें हिंदुमुसलमानांच्या दंग्यासंबंधांत बंदोबस्त ठेवण्याच्या बाबतींत सरकारनें हेतुपूर्वक दुर्लक्ष केलें असतां "सरकारी संगिनी कशाकरितां?" हा एक लेख श्री. करंदीकर यांनीं लिहिला होता. तसेंच आर्थिकदृष्ट्या हिंदुस्थानची दुरवस्था असतांना सरकारी फडणविसांनीं लबाडीनें आणि हातचलाखीनें हिंदुस्थानची सुस्थिति आहे असें भासविण्याचा यत्न केला असतां "भरभराटलेला हिंदुस्थान!" या मथळ्याचा श्री. करंदीकर यांनीं एक लेख लिहिलेला होता. हे दोन्ही लेख चिरस्मरणीय आहेत. असत्याची किंवा लबाडीची चीड ही श्री. करंदीकर यांच्या प्रभावी लिखाणाला प्रेरक होते. १९४२ च्या चळवळीच्या वेळीं पुण्यांत अप्पाबळवंत चौकामध्यें जो निष्कारण गोळीबार झाला त्यावर श्री. करंदीकर यांनीं लिहिलेला लेख असाच सडेतोड आहे. सरकारचा रोष ओढवेल कीं काय अशी आशंका वाटण्यासारखा विशेषतः वरील शेवटचा प्रसंग होता. यतींद्रदास यांना प्रायोपवेशनानें तुरुंगांत मृत्यु आला आणि त्या योगें सर्व देश खळबळून गेला त्या वेळींहि श्री. करंदीकर यांनीं लिहिलेला अग्रलेख असाच तडाखून लिहिलेला होता. वादविवादामध्यें प्रतिपक्षाला सपशेल लोळवणारा समर्पक तडाखा देण्याच्या बाबतींतहि करंदीकर यांचा हातखंडा आहे. लोहगांवच्या सोल्जरांच्या गोळीबारावरील खटल्यांत, त्यांना सोडून देणाऱ्या निकालावर "काळ्यागोऱ्यांतिल न्याय" म्हणून लिहिलेलें स्फुट, कोर्टाच्या बेअदबीच्या कायद्याखालीं आक्षेपार्ह ठरलें होतें आणि त्याबद्दल केसरीला पांच हजार रुपये दंड झाला. या वेळीं श्री. केळकर हे मुख्य संपादक होते आणि त्यांनीं स्वतःच हा खटला लढवून कोर्टाच्या बेअदबीच्या कायद्याचे वाभाडे काढल्याचें प्रसिद्ध आहे. पण ज्या स्फुटावरून हें प्रकरण उत्पन्न झालें तें स्फुट श्री. तात्यासाहेब करंदीकर यांचें होतें हें कोणास विशेष माहीत नाहीं; पण ही गोष्ट आतां प्रकट करण्यास हरकत नाहीं.

अनेक फाटे फुटलेल्या एखाद्या वितंडवादाला एक-दोन स्फुटांतच उत्तर देऊन तडाख्यानें निकालांत काढण्याच्या बाबतींत श्री. करंदीकर यांचें कौशल्य

अनेक वेळां दिसून आलें आहे. स्वतःवर वैयक्तिक टीका झाली असतांना तात्यासाहेब केळकर हे त्या योगें कधीं कधीं अस्वस्थ होत. उलट काकासाहेब खाडिलकर हे असल्या वैयक्तिक टीका वाचण्याचेहि श्रम घेत नसत. पण श्री. तात्यासाहेब करंदीकर हे आपल्या वाचनांतून कोणतीच बारीक गोष्ट जाऊं देत नाहींत. असें असतांहि असल्या वैयक्तिक वादांतून मूळ गोष्टीला गैरलागू अशा ज्या गोष्टी उगाळल्या जातात त्याला उत्तर देण्याच्या भानगडींत करंदीकर पडत नाहींत. त्यांतील सार्वजनिक महत्त्वाचा आणि वादाच्या मूळ मुद्द्याला धरून असणारा तेवढाच अंश घेऊन त्याला समर्पक उत्तर देऊन टाकतात. त्यानंतर पुनः कोणी त्यांना अवांतर वादांत ओढण्याचा कितीहि यत्न केला तरी त्यांची स्थितप्रज्ञता ढळत नाहीं. लेखी वादाप्रमाणेंच शाब्दिक वादासंबंधींहि म्हणतां येईल. त्यांच्याकडे कोणी बोलण्यास गेला असतां मुख्य कामाच्या गोष्टीबद्दल त्यांनीं थोडक्यांत निकाली उत्तर दिल्यानंतर मागाहून उगाच कोणी विपर्यस्त, गैरलागू किंवा वितंडवादाच्या गोष्टी काढल्या तर कांहींच न ऐकल्यासारखें करून किंबहुना, त्या माणसाची उपस्थितीहि असून नसल्यासारखी करून शांतपणें ते आपल्या चालू असलेल्या लेखनाचा किंवा वाचनाचा क्रमप्राप्त उद्योग करूं लागतात. आपलेआपण कंटाळून तो मनुष्य विराम न पावल्यास पुनः एकदां आपल्या पहिल्या निकाली उत्तराचा उच्चार करून श्री. करंदीकर आपल्या कामास लागतात. यामुळें त्यांचा वायफळ वेळ जात नाहीं. तसेंच चालू असलेल्या वाचन-लेखनांतील त्यांची एकाग्रताहि ढळत नाहीं. पुष्कळ माणसें त्यांची ही अखंड कार्यमग्नता आणि मितभाषणी प्रवृत्ति यांमुळेंच त्यांच्यापुढें वायफळ गोष्टी बोलण्यास धजत नाहींत. शारीरिक किंवा मानसिक कंटाळा किंवा थकवा हा त्यांना माहीतच नाहीं. यामुळें त्यांच्या संपादकीय कामांत स्थिरता आणि आत्मविश्वास या दोन्ही गोष्टी दिसून येतात. ज्यांना हा थकवा येतो त्यांच्या मनांत त्याची भीति राहते, आणि मग तो थकवा येण्याच्या आंत हातीं घेतलेलें काम संपविण्याची एकप्रकारें घाई त्यांना होते. सर्व विषय वाचून, संपवून नंतर लिहावयास उत्साह उरेल किंवा नाहीं अशी शंका अनेकांना येते. यामुळें अर्धवट वाचूनच लिहावयास सुरुवात करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत होते. पण श्री. करंदीकर यांच्या संपादकीय कामांत अशा प्रकारची अस्थिरता कधींच दिसून येत नाहीं. यामुळें त्यांचा आत्मविश्वास कधींच ढळत नाहीं.

### बहुविध व साक्षेपी संपादकत्व

प्रांतिक किंवा मध्यवर्ति सरकारच्या अंदाजपत्रकांचीं मुख्य आंकड्यांचीं आणि तपशिलाचीं अशीं दोन पुस्तकें येतात. नव्यानें विधिमंडळांत गेलेल्या सभासदांना हें आंकड्यांचें गौडबंगाल उलगडण्याला वर्ष-दोन वर्षांचा काल नि अनुभव लागतो. पण अनेक वर्षें या अंदाजपत्रकी आंकड्यांच्या जंजाळाचा ठाव घेण्याची संवय श्री. करंदीकर

[stamp] ...वाचनालय, सातारा.



यांस असल्यामुळें १०।१२ तास आधीं हीं पुस्तकें हातीं आल्याबरोबर त्यांतील नेमकीं स्थानें कोणतीं पाहावयाचीं तीं पाहून त्यांचा त्या वेळांत लेख तयार होई. कित्येक लेखकांना स्वतः लिहिलेल्या लेखांचीं मुद्रितें पाहिल्यावर इतरांच्या लेखांचीं मुद्रितें तपासणें हें काम कंटाळवाणें वाटतें. ज्याचीं त्यानें मुद्रितें पाहिलीं आहेत असें कळल्यावर तीं बारकाईनें वाचण्याचें काम इतर संपादक स्वाभाविकपणेंच टाळतात. साधारणपणें वरवर अवलोकन करून काम भागण्यासारखेंहि असतें. पण श्री. करंदीकर यांचें मुद्रितांचें वाचन हें आनूलाग्र वाचन असेंच नेहमीं असतें, मग तो लेख स्वतःचा असो वा दुसऱ्याचा असो. कर्तव्य म्हणजे यथासांग कर्तव्य; त्यांत मुख्य आणि गौण असा भेद ते करीत नाहींत. स्वतः लिहिण्याइतकेंच इतरांचें लिहिलेलें तपासून दुरुस्त करणें किंवा इतरांच्या लेखांचीं मुद्रितें दुरुस्त करणें हें काम किचकट आहे. दुसऱ्यांचें लिखाण म्हणून आपपरभाव आणि तदनुसार त्यावर श्रम करण्याचें तारतम्य उत्पन्न होणें स्वाभाविक असतें. पण श्री. करंदीकर यांची आत्मीयता ही ते संपादक होते त्या काळांत केसरीच्या एकूणएक स्तंभांशीं (अर्थातच जाहिराती वगळून) निगडित झालेली असे. जसें इतरांच्या लिखाणाचें तसेंच केसरीच्या स्तंभांत आलेल्या विषयांच्या बाबतींतहि म्हणतां येईल. कोणचा विषय का होईना, तो केसरीच्या स्तंभांमध्यें आला म्हणजे त्यांत सारखेंच लक्ष श्री. करंदीकर हे घालीत. हुंडणावळीच्या प्रश्नावरील किंवा शिरगणतीच्या आंकड्यांवरील लेखांचें वाचन संपून क्रिकेटचा सामना किंवा परप्रांतांतील बातमीपत्रें यांचा विषय आला तरी त्यांच्याकडे तितकेंच ते लक्ष देत. संपादकाच्या कामांतून निवृत्त झाल्यावरहि प्रसंगविशेषीं ते तसें लक्ष देतात. क्रिकेटच्या खेळांतील जयापजय असोत किंवा निवडणुकीचे जयापजय असोत, दोहोंच्या निकालांकडे सारख्याच उत्कटतेनें त्यांचें लक्ष असें. सर्वांना ठळकपणें दिसणाऱ्या त्यांच्या गंभीरपणावरून क्रिकेटच्या खेळांतील पक्षोपक्षांच्या चुका किंवा विक्रम यांच्या बाबतींत त्यांना कुतूहल असेल असें सहसा वाटत नाहीं. हें त्यांचें कुतूहल प्रत्यक्ष पाहून कित्येकांनीं त्यावर विनोद चालविला आहे. पण कोणी आश्चर्य करो वा असंभव मानो, आपण विसदृश असें कांहींच केलेलें नाहीं याविषयीं ते निश्चिंत राहात.

केसरीच्या अनुषंगानें उत्पन्न होणाऱ्या सभा-संस्थांच्या चर्चांमधून श्री. करंदीकर हे उदासीन राहात नाहींत. लहानसहान ठरावांच्या शब्दयोजनेकडेहि त्यांचें लक्ष असतें. ते ठराव ठाकठीक करण्यास व दुरुस्त्या सुचविण्यास कंटाळा करीत नाहींत. अमुक गोष्ट करावयाची किंवा करावयाची नाहीं असें एकदां ठरल्यानंतर किंवा एखाद्या गोष्टीचा बरावाईट निकाल होऊन गेल्यानंतर 'सिद्धस्य गतिश्चिन्तनीया' असें समजून ते पुढील क्रम शांतपणें अनुसरतात. 'झाल्या गोष्टींबद्दल शोक करूं नये', इत्यादि दंडक तोंडानें सांगणें सोपें आहे, पण आचरणांत आणणें फार कठीण आहे. झालेल्या अनिष्ट गोष्टीनें उत्पन्न होणाऱ्या

मनाच्या व्यग्रतेमुळें अनेकांच्या पुढील कामांत आणि श्रमांत व्यत्यय येतो, तो करंदीकरांच्या कामांत कधींच येत नाहीं. वृत्तपत्राचें काम हें नुसतें बौद्धिक काम नाहीं. तें सुव्यवस्थित होण्यासाठीं कांहीं स्वयंसिद्ध व कांहीं कमावलेली अशी मनाची बैठक असावी लागते, तशी ती श्री. करंदीकर यांची पुष्कळ अंशीं स्वभावतःच झालेली आहे. मनुष्यजीवनांतील सर्व कामांप्रमाणें वृत्तपत्राच्या कामांतहि कांहीं साधतें आणि कांहीं फसतें. कितीहि साधार आणि सप्रमाण बाजू मांडली तरी लोकांचा आळस व प्रतिपक्षाचा वितंडवाद व हट्टाग्रह यांच्या योगानें न्याय्य फलप्राप्ति होत नाहीं. उदाहरणार्थ, पंचांगांचा वाद, शिवजन्मतिथीचा वाद, शिवाजी-रामदास यांच्या भेटीसंबंधाचा वाद, किंवा कर्मयोग-संन्यासाचा गीतेवरील वाद घ्या. अशा अनेक वादांत कर्तव्यबुद्धीनें श्री. करंदीकर यांनीं लेखणी चालविली आहे. अशा वेळीं "Though vanquished he argued still" या गोल्डस्मिथच्या वचनाप्रमाणें कित्येक वेळा विरोधकांचा हट्टाग्रह प्रत्ययास आलेला आहे. या बाबतींत श्री. करंदीकर हे आपलें कर्तव्य केल्यानंतर विरुद्ध पक्षाच्या आडमुठेपणाबद्दल खंत करीत बसत नाहींत.

## संपादकीय कर्मयोग

श्री. तात्यासाहेब करंदीकर यांच्या सर्वच आयुष्यक्रमाचा कालक्रमानुसार आढावा, म्हणजे चरित्र, सांगणें हें येथें प्रस्तुत नाहीं. त्यांच्या ठळक संपादकीय लेखांचा हा संग्रह वाचतांना त्या लेखांच्या मागें असलेली व्यक्ति ठळकपणें लोकांच्या मनःचक्षूंपुढें यावी यासाठीं श्री. करंदीकरांच्या कर्मयोगी आयुष्यांतील लेखन-कर्मयोगाचें जें स्वरूप त्यांच्या सहवासांत काम करण्याची संधि मिळालेल्या लोकांना दिसतें तें थोडक्यांत मांडण्याचा प्रयत्न या प्रास्ताविक निवेदनांत केला आहे. सात्त्विक कर्त्याची कर्मयोगशास्त्रांत जीं लक्षणें दिलीं आहेत तीं विविध प्रकारच्या स्वकर्मानुसार आचरल्या जाणाऱ्या कर्मयोगामध्यें तत्त्वतः सारखींच असतात —

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥

हीं लक्षणें संपादकीय कर्तव्याच्या संबंधांत श्री. करंदीकर यांनीं कशीं सार्थ केलीं आहेत तें वरील त्रोटक दिग्दर्शनावरून समजून येईल. ही पार्श्वभूमि मनांत ठेवून या लेखसंग्रहांतील लेखांचें वाचन करणाऱ्याला त्यांतील स्वारस्य ध्यानांत येण्यास साहाय्य होईल अशी आशा आहे.

पुणें,
दि. २५ जानेवारी १९५०

ग. वि. केतकर
सं. केसरी व मराठा

# लेखाची निवड करण्यातील धोरण

## प्रकाशनाची पार्श्वभूमि

केसरी वृत्तपत्रांतून गेल्या तीस-चाळीस वर्षांत मीं जे लेख लिहिले त्यांतील कांहीं निवडक लेख पुस्तकरूपानें एकत्र छापून प्रसिद्ध करावे, अशी सूचना अनेक मित्रांनीं व यापूर्वी अनेक वेळां केली असतां मीं त्याकडे लक्ष दिलें नाहीं. प्रसंगानुरोधानें लिहिलेला एखादा लेख, त्या वेळच्या वाचकांस आवडला असला तरी, भिन्न परिस्थितींत आणि रुचिपालट झालेल्या वाचकांस पुनश्च वाचावासा वाटेल का नाहीं, याचें उत्तर अनिश्चितच असतें. या संबंधांतला आजवरचा अनेकांचा अनुभवहि फारसा प्रोत्साहजनक नाहीं. अशा परिस्थितींत स्वतःवर नसती जबाबदारी घेऊन, वाचकमित्रांनाहि एक प्रकारें अप्रत्यक्ष भीड घालणें उचित नव्हे, असें वाटत असल्यानें आजवर या प्रसिद्धीकरणाचा विचार मीं अंगाबाहेर टाकला होता. परंतु केसरी छापखान्याचे व्यवस्थापक श्रीयुत आत्माराम रावजी भट यांनीं कांहीं सद्धेतु मनांत धरून हे लेख प्रसिद्ध करण्याची सर्व जबाबदारी स्वतःवर घेतली आणि माझे कित्येक लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावे अशी बऱ्याच वाचकांची तीव्र इच्छा आहे याविषयीं त्यांनीं स्वतःला खात्री पटल्याचें आग्रहानें सांगितलें. अशा रीतीनें माझ्यावर अथवा केसरी संस्थेवर कोणतीहि जबाबदारी न पडतां जर हें कार्य तडीस जात असेल आणि त्याचा सदुपयोग होणार असेल, तर लेखांची निवड करणें आणि त्यांना व्यवस्थित रूप देऊन त्यांचीं मुद्रितें तपासणें, एवढे परिश्रम घेण्याला नकार देण्याचा दोष विनाकरण अंगावर कोण घेईल ? यामुळें साहजिकपणेंच मीं या कार्याला रुकार दिला आणि केसरी-मराठा संस्थेचे विश्वस्त श्री. अण्णासाहेब भोपटकर आणि श्री. गजाननराव केतकर या उभयतांनीं केसरींतील माझे लेख पुस्तकरूपानें पुनर्मुद्रित करण्याला बिनशर्त परवानगी दिली.

अशा रीतीनें या प्रकाशनाची पार्श्वभूमि तयार झाल्यावर लेखांची निवड करण्याचें जोखमीचें काम मजवर येऊन पडलें. ही जोखीम दोन प्रकारची होती. अनेक लेखकांच्या लेखसमूहांतून आपला लेख नेमका निवडून काढणें हें काम कांहीं वाटतें तितकें सोपें नाहीं. तीस-चाळीस वर्षांपूर्वी लिहिलेला लेख, इतर कोणत्याहि लेखी पुराव्याच्या अभावीं निवडून काढतांना अनेक वेळां गफलत होते. विशिष्ट विषयावरील स्वतंत्र लेख शोधून काढणें फारसें कठीण नाहीं. पण नामनिर्दिष्ट न केलेले अग्रलेख चाळून पाहूं लागल्यावर मनाचा गोंधळ होऊं लागतो. केसरीच्या संपादकीय लेखांतला जो प्रशंसनीय गुण म्हणून नांवाजला जातो, तो गुणच या निवडीच्या कार्यांत मोठी अडचण उत्पन्न करण्यास कारणीभूत होतो. केसरींतील अग्रलेखांचा लेखक कोणीहि असला तरी त्या लेखाच्या तोंडवळ्यांत बराच सारखवटपणा असतो. असा हा समान तोंडवळा एरवीं एक प्रकारें कौतुकास्पद असला तरी लेखांची निवड करतांना तो भ्रांतिकृत चमत्कार निर्माण करण्याला कारणीभूत होतो.

जुळ्या मुलांचा तोंडवळा अगदीं हुबेहूब एकसारखा असल्यावर आईकडूनहि क्वचित् प्रसंगीं सोम्यानें केलेल्या खोडीचें प्रायश्चित्त गोम्याला दिलें जातें. इतरांची चूकभूल होईल, पण प्रत्यक्ष आईची चूकभूल कशी होईल, असें वाटण्याचा संभव आहे; परंतु तसा प्रकार घडल्याचा दाखला सर्वप्रसिद्ध आहे. कै. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या लेखांची निवड करून त्यांचें प्रकाशन केलें, त्यांत श्री. ग. वि. केतकर यांचे कित्येक लेख तात्यासाहेबांनीं स्वतःचे समजून प्रसिद्ध करून टाकले! त्याच लेखसंग्रहांत माझाहि एक लेख समाविष्ट झालेला आहे ही गोष्ट आजपर्यंत जाहीर रीतीनें मीं प्रकट केली नव्हती; पण अशी चूकभूल होऊं शकते, याचा पुरावा म्हणून येथें त्याचा उल्लेख करीत आहें. '**सोन्यासारखी संधि गमावली**' हा दि. १२ डिसेंबर १९१६ च्या केसरींतला माझा अग्रलेख केळकरांच्या लेखसंग्रहांत समाविष्ट झाला आहे.

## एका शंकेचें निरसन

हा इतका तपशीलवार ऊहापोह करण्याचें कारण असें कीं, माझा दुसरा एक अग्रलेख असाच केसरींतील निवडक लेख खंड ३ यांत छापला गेला असून, तो लेख टिळकांचा असावा अशी शंका प्रस्तावना-लेखक श्री. ग. वि. केतकर यांनीं प्रदर्शित केली आहे. प्रस्तुतच्या लेखसंग्रहांतील पृ. १०९ वर छापलेला '**करायला गेला एक, झालें भलतेंच**' हा तो लेख होय. बेझंटबाईंवर स्थानबद्धतेचा हुकूम बजावल्यावर दि. २६ जून १९१७ च्या केसरींतला हा अग्रलेख आहे. या अग्रलेखाची भाषा व त्यांतील विचारसरणी टिळकांची दिसते, असें श्री. केतकर म्हणतात. पण या संबंधांत माझी स्मरणशक्ति मला फसवीत नसेल तर, तो लेख माझ्या हातचा आहे, असें मी दाखवून देऊं शकतों. बेझंटबाईंवर स्थानबद्धतेचा हुकूम फर्मावल्याची वार्ता कळतांच स्वतः लो. टिळकांनीं 'बेझंटबाईंवर हल्ला' या मथळ्याखालीं दि. १९ जूनच्या केसरींत अग्रलेख लिहिला. त्याच वेळीं श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं मद्रासला बेझंटबाईंना भेटण्यास जावें असें ठरलें. मुंबईहून श्री. हॉर्निमन व पंढरीनाथ काशीनाथ तेलंग आणि पुण्याहून श्री. तात्यासाहेब केळकर अशी मंडळी मद्रासला गेली. श्री. केळकर मद्रासला गेलेले, लो. टिळकांनीं याच विषयावर मागील केसरींत एक लेख लिहिलेला आणि प. वा. दादाभाई नौरोजी यांच्या निधनानिमित्त लेख लिहिण्याचें काम लो. टिळकांना त्याच दिवशीं करावयाचें होतें, अशा बनावामुळें दि. २६ जून १९१७ चा लेख लिहिण्याची जोखीम मजवर पडली व मीं तो लेख लिहिला. श्री. केतकर आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात कीं, त्या लेखांतील कांहीं वाक्यांची रचना व विचारसरणी टिळकांची दिसते. त्यांचें हें अनुमान अगदीं खरें आहे. पण त्याचा खुलासा असा कीं, दि. १९ च्या केसरींत टिळकांनीं जो पहिला लेख या विषयावर

…पुर वाचनालय, सातारा.



लिहिला, त्याच धोरणानें हा लेख मीं लिहिला असल्यानें टिळकांच्या लेखांतील विचारसरणी तर या लेखांत कायम राखलीच, पण त्याशिवाय कांहीं मुद्द्यांचीं वाक्येंहि टिळकांच्या लेखांतूनच उद्धृत केलीं. अर्थातच दि. १९ जूनचा टिळकांचा लेख वाचून पाहिल्यावर या सादृश्याचा उलगडा होतो. दि. १९ चा व दि. २६ चा हे दोन्ही लेख टिळकांच्याच हातचे आहेत असें मानल्यास टिळकांनीं आपल्या दुसऱ्या लेखांत पहिल्या लेखाचीच पुनरावृत्ति केली असें म्हणावें लागेल. परंतु या सादृश्यावरूनच दुसरा लेख टिळकांच्या लेखाचें अनुकरण करून दुसऱ्या कोणीं लिहिला आहे, स्वतः टिळकांनीं नव्हे, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. इतक्या कसोशीनें लेखांची निवड केली असून देखील, हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर जर कोणी त्यांतला एखादा लेख माझा नव्हे असें दाखवून देऊं शकला तर ती चुकी हेतुपुरस्सर झाली नाहीं, एवढें सांगून 'क्षमस्व' म्हणणें एवढा एकच त्यावर प्रायश्चित्ताचा उपाय आहे व तसें प्रायश्चित्त घेण्यास मी केव्हांहि तयार आहें.

### लेखांची सूत्रबद्धता

लेखांची निवड करतांना सकृद्दर्शनीं उभ्या राहणाऱ्या मुख्य अडचणींचा हा विचार झाला. त्यानंतरचा प्रश्न असा कीं, या ग्रंथांत घेतले हेच लेख कां निवडले, दुसरे कांहीं लेख याहून सरस होते, ते कां निवडले नाहींत? या संबंधांत 'भिन्नरुचिर्हि लोकः' हें एक उत्तर आहेच; पण त्याशिवाय दुसरें कारण असें कीं, लेखांची निवड करतांना कांहीं एक विशिष्ट धोरण स्वीकारणें अपरिहार्य होतें. १९१२ पासून १९४९ अखेरच्या ३८ वर्षांत शेंकडों लेख मजकडून लिहिले गेले. त्यांतून निवड करून छापावयाच्या लेखांची पृष्ठसंख्या ३२० च मर्यादित झालेली. अशा परिस्थितींत कोणता लेख घ्यावा, कोणता ठेवावा हें ठरवितांना लेखांत विषयांची विविधता राहून त्या त्या विषयाची थोडी तरी परिपूर्णता कशी साधेल इकडे लक्ष द्यावें लागलें. युरोपांतील महायुद्धासंबंधांतले कांहीं लेख देणें आवश्यकच होतें. या विषयावरचे १९ लेख या ग्रंथांत आले आहेत व त्यांनींच १०१ पृष्ठें व्यापलीं. आतां समजा कीं, यांतले १० च लेख घेतले असते व बाकीच्या ९ लेखांच्या जागीं दुसऱ्या एखाद्या विषयावरील लेख समाविष्ट केले असते, तर लेखांची विविधता वाढली असती, पण त्याबरोबरच हें युद्धविषयक राजकारण अपुरेंच राहिलें असतें. ज्या वाचकांनीं महायुद्धाच्या वेळचे लेख वाचले आहेत व ज्यांना त्या युद्धाचा आगापिच्छा नजरेसमोर आहे, त्यांचें तेवढ्या १० लेखांनीं, किंबहुना ५ लेखांनीं देखील समाधान होईल. परंतु या लेखांना ग्रंथनिविष्ट करतांना, ज्यांनीं महायुद्धाचे लेख त्या त्या वेळीं वाचले नाहींत, अशा नव्या वाचकांचीहि सोय लक्षांत घेणें आवश्यक होतें. त्यांच्यापुढें जर एकदम '**महायुद्धाचा रंग पालटला**' किंवा '**काळ्या समुद्रांतील काळकूट**' असा लेख एकदम ठेवला तर त्याचा त्यांना काय बोध होणार! याकरितां असे

नवे वाचक दृष्टीसमोर ठेवून सामान्यतः त्या त्या विषयाचे धागेदोरे संगतवार जुळे-तील अशीच लेखांची निवड करावी लागली.

महायुद्धाला आद्यस्थान

अशा रीतीनें एकेका विषयाची विहंगम दृष्टीनें तरी पूर्णता व्हावी, या हेतूनें लेखांचा क्रम ठरवितांनाहि तेंच धोरण नजरेसमोर राखलें आहे. गेल्या पंचवीस वर्षांत घडलेली सर्वांत मोठी क्रान्ति कोणती असेल तर युरोपांतलें अलीकडे नुक-तेंच संपलेलें महायुद्ध होय. यास्तव स्वाभाविकपणेंच या महायुद्धविषयक लेखांना प्राधान्य देण्यांत आलें असून त्या विभागांत १९२५ ते १९४६ पर्यंतच्या २१ वर्षांतले १९ लेख घेतले आहेत. त्या परराष्ट्रीय राजकारणाच्या बरोबरच इकडे स्वराज्य संपादनाचा लढा चालू होता. त्या लढ्यांतले धागेदोरे उकलण्याकरितां १९१२ पासून १९३७ पर्यंतच्या २५ वर्षांतले १७ लेख निवडले आहेत. राज-कारणाच्या बरोबरीनेंच अलीकडे अर्थकारणालाहि महत्त्व आलें आहे. याकरितां तिसरा विभाग अर्थशास्त्रविषयक लेखांनीं सजविला आहे. केसरींतील इतर कोण-त्याहि विषयांपेक्षां अर्थशास्त्र विषयावरील माझे लेख सर्वांत अधिक भरतील. तथापि तो विषय वाचकांना रुक्ष व कंटाळवाणा वाटणारा असल्यानें या विषया-वरचे १० च लेख यांत घेतले आहेत. १९१३ पासून १९३१ पर्यंतच्या १८ वर्षां-तील लेखांतूनच ही निवड करण्यांत आली आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या तीन विभागांनींच २६४ पृष्ठें व्यापल्यामुळें ऐतिहासिक, साहित्तिक, धार्मिक व सांस्कृतिक, ग्रंथपरीक्षणात्मक, मृत्युलेखविषयक असा लेखांचा मोठा संकीर्ण विभाग हाताळावयाचा तसाच राहिला. त्यांतील कोण-ताहि एक विषय सुरु केला असता तरी तो या ग्रंथाच्या ठराविक पृष्ठसंख्येच्या मर्यादेंत बसूं शकला नसता. यास्तव नाइलाजानें ते सर्व विषय तूर्त स्थगित करून संपादकीय धोरणासंबंधाचे ४ लेख या ग्रंथांत घेतले आहेत. अशा प्रकारें या ग्रंथांत १ महायुद्ध व परराष्ट्रीय राजकारण, २ देशांतील राजकीय घडामोडी, ३ आर्थिक व्यवहार आणि ४ संपादकीय ध्येय धोरण हे चार प्रमुख विभाग समाविष्ट झाले असून, हा लेखसंग्रह जर वाचकांना आवडला आणि उपयुक्त ठरला तर लेखसंग्रहाचा दुसरा खंड प्रसिद्ध करण्याचा विचार ठरवितां येईल; आणि त्यांत ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक वगैरे लेख समाविष्ट होतील.

या लेखसंग्रहांत कोणत्या विषयावरील किती लेख आले आहेत याचें येथ-वर हें सामान्य दिग्दर्शन झालें. आतां त्या लेखांची प्रकरणवार संगति कशी लावतां येते आणि त्यांतील प्रत्येक लेखांतून कोणता बोध घ्यावयाचा आणि त्या त्या विभागाचा एकंदर निष्कर्ष काय, यासंबंधानें वाचकांना थोडीशी कल्पना यावी आणि ते लेख वाचण्याची उत्सुकता त्यांच्यांत जागृत व्हावी, यास्तव त्या लेखांचे एक प्रकारचें अनुबंध चतुष्टय थोडक्यांत सांगण्याचा विचार आहे.

## दुसऱ्या महायुद्धाचें बीजारोपण

पहिल्या जर्मन महायुद्धांत जर्मनीची आर्थिकदृष्ट्या पूर्णपणें खच्ची करण्यांत आली. अशा रीतीनें दुर्बळ बनविला गेलेला जर्मनी आपल्या मनांत दंश धरून त्या अपमानाचा सूड उगविण्याच्या संधीची वाटच पाहात होता. दोस्त राष्ट्रांत परस्परांविषयीं चुरस नांदत असल्यानें जर्मनीला आपलें सामर्थ्य वाढवून युद्धार्थ सुसज्ज होण्याची संधि मिळत गेली. आणि १९२५ च्या मे महिन्यांत पहिल्या महायुद्धांतला रणगाजी जो हिंडेनबुर्ग त्याची अध्यक्षपदावर निवड करून जर्मनीनें आपल्या पुनरुत्थानाचें प्रत्यंतर युरोपच्या नजरेस आणून दिलें. याकरितां प्रस्तुत लेखसंग्रहांतील 'महायुद्ध व परराष्ट्रीय राजकारण' या विभागाचा प्रारंभ

**१ जर्मन गरुडाचे तोडलेले पंख पुनश्च फुटले** या लेखापासून करण्यांत आला आहे, कारण दुसऱ्या महायुद्धाचें बीजारोपण त्या वेळीं झालें.

अशा प्रकारें हें बीजारोपण झालें तरी त्या बीजांतून अंकुर बाहेर पडण्याला पुष्कळच अवधि लागला. जर्मन गरुडाला पंख फुटले तरी त्याची भरारी जर्मनीच्या सीमेबाहेर लवकर जाऊं शकली नाहीं. आपलें सामर्थ्य वृद्धिंगत करण्यांत आणि महायुद्धासाठीं सुसज्ज होण्यांत बारा वर्षें घालविल्यावर हिटलरच्या कर्तृत्वशाली कारकीर्दींत जर्मन गरुडाला आपल्या प्रांताबाहेर आक्रमण करण्याचें अवसान आलें आणि जर्मनीनें ऑस्ट्रिया देशावर स्वारी करून तो देश आपल्या पंखाखालीं घेतला, ही महत्त्वाची घटना दर्शविण्याकरितां

**२ जर्मन गरुडाची भरारी** हा दुसरा लेख निवडला आहे. महायुद्धाची ही अशी प्रस्तावना झाल्यावर प्रत्यक्ष महायुद्धाला सुरुवात झाल्याचें वृत्त जाहीर करणारा

**३ महायुद्धाचा वणवा पेटला** हा तिसरा लेख स्वाभाविक क्रमानेंच पुढें आला. त्यानंतर सहा वर्षें सतत चाललेल्या या घनघोर महायुद्धांत अनेक घडामोडी झाल्या. त्या सगळ्यांचा परामर्श घेणें शक्य नसल्यानें, ज्या ज्या वेळीं महायुद्धाचा रंग पालटत चालला अथवा त्या युद्धाला वेगळी कलाटणी मिळाली, ते ते क्रान्तिकारक प्रसंग निवडून काढून त्या प्रसंगीं लिहिलेले अग्रलेख कालानुक्रमानें एकापुढें एक देण्यांत आले आहेत. त्या प्रत्येक लेखाचा पूर्वापार संबंध सांगण्याची आवश्यकता नाहीं. तथापि कोणत्या लेखांत कोणत्या प्रसंगाचें सविस्तर वर्णन आलें आहे हें लेखाच्या केवळ मथळ्यावरून वाचकांच्या चटकन लक्षांत येणार नाहीं. म्हणून त्या त्या लेखांत कोणत्या घडामोडींचा ऊहापोह केला आहे, हें यापुढें थोडक्यांत दिग्दर्शित करण्यांत येत आहे.

**४ इटालीनें आगींत तेल ओतलें** या चवथ्या लेखांत इटाली देश जर्म-

नीच्या बाजूनें युद्धांत सामील झाल्यानें महायुद्धाचा वणवा युरोप खंडाच्या बाहेर कसा भडकला याचा तपशील वर्णिला आहे.

५ **फ्रान्सच्या शरणागतीची मीमांसा** या पांचव्या लेखांत फ्रान्स देश शस्त्र खालीं ठेवून जर्मनीला सर्वतोंपरी शरण गेला त्याचें कारण काय, फ्रेंच राष्ट्र असें दुबळें कशानें झालें, त्या राष्ट्राची अशी दुर्बलावस्था होण्याला फ्रेंच लोकांच्या विचार-सरणींतले आणि राहणींतले कोणते दोष कारणीभूत झाले याची मीमांसा केली आहे.

६ **रशियांतील रणसंग्रामाचा आढावा** या सहाव्या लेखांत जर्मनीनें रशियाविरुद्ध युद्ध पुकारून त्या देशावर जी चढाई केली, त्या चढाईंत तीन महि-न्यांत केवढा विक्रम केला त्याचें वर्णन आलें असून, त्यापुढें लढाईला कसें नवें वळण लागेल याचें दिग्दर्शन केलें आहे.

७ **जपानी चढाईचा परिणाम** महायुद्धाला अगदीं निराळें वळण लाव-ण्याला जपानची युद्धघोषणाच कारणीभूत झाली. जपान देश युद्धांत सामील झाल्यानें हिंदुस्थानचा महायुद्धांत साक्षात् संबंध आला. अर्थातच जपानच्या चढाई-मुळें जर्मन महायुद्धावर कोणते परिणाम घडणार, या विचारापेक्षां हिंदुस्थानांतील राजकारणावर त्याचे परिणाम काय काय होतील याची भवति न भवति या लेखांत केली आहे.

८ **सिंगापूर पडलें, आतां तरी कर्तव्यमार्गाला लागा** या आठव्या लेखांत जपानच्या चढाईचा धोका कसा आहे, त्याचें तर दिग्दर्शन आहेच पण जपानच्या मुसंडीला तोंड द्यावयाचें असेल तर हिंदुस्थान देश संतुष्ट राखण्या-करितां या देशाला स्वराज्याचे हक्क देणें आवश्यक असून, ब्रिटिश सरकारनें तें कर्तव्य बजावण्याच्या मार्गाला लागावें असा इशारा या लेखांत दिला आहे.

९ **ब्रह्मदेश गेला आतां आसाम तरी सांभाळा** हा नववा लेख मागील लेखाच्या अनुषंगानेंच पुढें आला. सिंगापूर पडल्यावर ब्रह्मदेश वाचणें दुर्घट आहे हें दिसतच होतें व तेंच अखेर प्रत्ययास आलें; परंतु ब्रिटिश सरकारचें धोरण सुधारलें नाहीं. हिंदुस्थानला स्वराज्य देऊन युद्धार्थ सुसज्ज करण्याची दूरदृष्टि ब्रिटिश मुत्सद्द्यांना अद्यापि पटली नाहीं, हें पाहून यापुढें आसाम प्रांतावर संकट येणार, तो प्रांत तरी सांभाळा, अशी धोक्याची सूचना या लेखांत दिली आहे.

१० **महायुद्धाचा रंग पालटला** — महायुद्ध सुरू होऊन तीन वर्षें होऊन गेलीं. दरम्यानच्या काळांत दोस्त राष्ट्रांना कांहीं जय मिळाले नव्हते असें नाहीं. स्टॅलिनग्राड हस्तगत करण्याच्या भरीला पडून जर्मन सैन्यावर शरणागतीचाहि प्रसंग आला होता. इकडे जपानचाहि आरमारी युद्धांत पराजय होतच होता. आफ्रिकन किनाऱ्यावरहि एकदां जर्मन सैन्याला मोठी माघार घ्यावी लागली

होती, तरी पण दोस्तांच्या त्या जयानें महायुद्धाचा रंग निश्चितपणें पालटला असें म्हणतां येण्याजोगें नव्हतें. परंतु अमेरिकेचें ८ लक्ष सैन्य बिनहरकत आफ्रिकन किनाऱ्यावर रोमेलच्या पिछाडीला उतरलें आणि इजिप्तच्या बाजूनें ब्रिटिशांनीं चढाई करून रोमेलचा सपशेल पराभव करून टोब्रुक व बेंगाझी इत्यादि दुर्घट ठाणींहि हस्तगत केलीं व गट्टी राष्ट्रांच्या सैन्याला आफ्रिकन किनाऱ्यावर थारा नाहींसा झाला. त्या वेळीं महायुद्धाचें पारडें निश्चितपणें फिरलें असा अभिप्राय केसरीनें या लेखांत दिला आणि तो अभिप्राय यथार्थ ठरला. या वेळेपासून गट्टी राष्ट्रांना एकसारखी पिछेहाटच करावी लागली. म्हणूनच या लेखाला '**महायुद्धाचा रंग पालटला**' असा सार्थ मथळा देण्यांत आला होता.

**११ यांत कोणाचें काय साधलें?** या लेखांत टुलोन बंदरांतल्या फ्रेंच आरमारी दलानें जी वीरोचित जलसमाधि घेतली तिचें रोमहर्षक वर्णन आहे. दोस्त राष्ट्रांना फ्रेंचांचें आरमार हस्तगत करून घेऊन त्याचा जर्मनीविरुद्ध उपयोग करावयाचा होता. व्हिशी सरकारनें आपलें आरमार आपण होऊन दोस्तांच्या हवालीं केलें असतें तर शरणागतीची अट मोडल्याबद्दल जर्मनीकडून व्हिशी सरकारवर ठपका आला असता व संकट ओढवलें असतें. फ्रेंच राष्ट्र पूर्वीं आपलेंच दोस्त होतें, हें लक्षांत घेऊन ब्रिटिशांनीं फ्रेंच सरकारला अशा पेंचांत पाडावयाला नको होतें. परंतु विजय मिळूं लागल्यानें दोस्त राष्ट्रांची दृष्टि फिरली आणि त्यांनीं फ्रेंच आरमार हस्तगत करण्याचा हट्ट धरला. त्या पेंचप्रसंगांतून सुटण्यासाठीं फ्रेंच आरमारानें हारीकेरी पत्करली. अर्थातच यांत दोस्तांचा हेतु साधला नाहीं आणि फ्रेंचांनाहि आपलें आरमार वाचवितां आलें नाहीं; म्हणूनच केसरीनें 'यांत कोणाचें काय साधलें?' असा प्रश्न केला आहे. व्यवहारतः त्यांत उभयतांचेंहि नुकसानच झालें; पण तत्त्वतः दोस्त राष्ट्रें तत्त्वच्युत ठरलीं आणि फ्रेंच आरमारी दलानें वीरोचित जोहार पत्करून अजरामर कीर्ति मिळविली.

**१२ दोस्तांचा पहिला खरा विजय** – मागील १० व्या लेखांत महायुद्धाचा रंग पालटल्याचें भाकित केलें होतें; त्यानंतर तो रंग पालटल्याचें प्रत्यक्ष दृश्यफल सिसिली बेटाच्या विजयानें दोस्तांच्या पदरांत पडलें. सिसिली बेट हातचें गेल्यानें इटालीवर चढाई करण्याचा मार्ग मोकळा झाला आणि इटालीवर चढाई म्हणजे जर्मनीवर घाव घालण्याचा रस्ता मोकळा करणेंच होय. लष्करीदृष्ट्या सिसिलीच्या विजयाचें हें महत्त्व ओळखूनच केसरीनें या विजयाला '**दोस्तांचा पहिला खरा विजय**' असें संबोधिलें आहे.

**१३ जय निश्चित काळ अनिश्चित** – महायुद्धाचा रंग पालटला आणि सिसिली बेट काबीज करून इटालींतहि दोस्तांची चढाई यशस्वी होत चालली, तेव्हां दोस्त राष्ट्रें अखेरी मारणार हें निश्चित झालें असें ठाम विधान करून हा

जय हातांत पडण्यास किती काळ लागेल तेवढीच गोष्ट अनिश्चित आहे असें केसरीनें म्हटलें आहे.

**१४ युरोपांतलें नवें जिब्राल्टर** – महायुद्धाचा रंग पालटला आणि दोस्तांना पहिला मोठा विजय प्राप्त झाला, तरी पण इटालींतून आल्प्स पर्वत ओलांडून जर्मनीवर चढाई करणें दुर्घट होतें. त्याकरितां दोस्त राष्ट्रांना फ्रान्सच्या किनाऱ्यावर सैन्य उतरविणें भाग होतें. फ्रान्सच्या किनाऱ्याच्या बंदोबस्ताकरितां जर्मनीनें पश्चिम किनाऱ्यावर शेरबुर्गचा जंजिरा किल्ला अत्यंत बळकट करून ठेवला होता. त्या जंजिऱ्यावर अमेरिकन सैन्यानें निकराचा मारा करून व पराक्रमाची शर्थ करून अखेरीस तो किल्ला काबीज केला. ब्रिटिशांचें भूमध्य समुद्रांतलें जिब्राल्टर हें ठाणें जसें अत्यंत बळकट असून भूमध्य समुद्राच्या रक्षणास तें ब्रिटिशांना उपयोगी पडतें त्याप्रमाणें फ्रेंच किनाऱ्याच्या भावी बंदोबस्तास दोस्तांना शेरबुर्गचें ठाणें उपयोगी पडेल असें जाणून त्या ठाण्याला ‘ नवें जिब्राल्टर ’ असें केसरीनें म्हटलें आहे.

**१५ पराजयाला हिंवाळा आड** – मागील १३ व्या लेखांत जें भाकित केलें होतें तें खरें होत चाललेलें पाहून, दि. १४ नोव्हेंबरला लिहिलेल्या या लेखांत, केसरीनें आपलें भविष्य अधिक स्पष्ट करण्याचा या लेखांत प्रयत्न केला आहे. दोस्तांची प्रत्यक्ष जर्मनीवर चढाई सुरू होण्याला आतां दुसरी कोणती आडकाठी राहिली नसून हिंवाळ्यांतील बर्फाचीच तेवढी अडचण दूर व्हावयाला पाहिजे. उन्हाळा सुरू झाला, बर्फ पार वितळून गेलें कीं, जर्मनीवर चालून जाण्याचा रस्ता मोकळा होईल आणि १९४५ च्या उन्हाळ्यांत युद्धाचा शेवटःहोईल हें केसरीचें भविष्य पुढें अक्षरशः खरें ठरलें.

**१६ काळ्या समुद्रांतलें काळकूट** – मागील लेखांत ‘ पराजयाला हिंवाळा आड ’ म्हटलें होतें. तो हिंवाळा संपत येऊन मार्च महिना जवळ आला. त्या वेळीं दोस्त राष्ट्रांचे तिघे श्रेष्ठी काळ्या समुद्रांतील याल्टा बंदरांत एकत्र जमले आणि त्यांनीं जर्मनी व जपान यांच्या संपूर्ण नायनाटाची कांहीं योजना मुक्रर केली. त्या योजनेलाच या लेखांत काळकूट म्हटलें आहे; कारण ती योजना म्हणजे नाझी जर्मनीचा संपूर्ण निःपातच होय. ही योजना गुप्त असल्यानें काळाच्या पोटांतून बाहेर येईपर्यंत तिचा थांग लागणार नाहीं, या अर्थानेंहि तें काळकूटच आहे. अशा रीतीनें गट्टी राष्ट्रांची गठडी वळण्याची ही योजना अखेरचीच ठरली. कारण यानंतर तीन महिन्यांच्या आंतच महायुद्धाचें अखेरचें पर्व सुरू झालें.

**१७ महायुद्धाचें अखेरचें पर्व** यांत मुसोलिनीचा जो शोचनीय अंत झाला त्यांत इटालियनांनीं जो मनाचा हलकट कृतघ्नपणा दाखविला त्याचा निषेध आहे आणि हिटलरचा शेवट काय झाला याविषयीं कित्येक जण बुचकळ्यांत पडले

होते, त्यांच्या कल्पना निराधार असून हिटलर हा बर्लिनमधून युद्ध करीत करीतच मृत्युमुखीं पडला, असें निश्चित मत या लेखांत दिलें आहे. हेंच मत अखेरीस सप्रमाण खरें ठरलें.

**१८ रत्नांच्या वांटणीची वाट काय** या शेवटच्या पर्वांत महायुद्धांतील विजयानें कोणाकोणाला काय लाभ होईल याविषयीं तर्क केला असून अखेरीस हिंदुस्थानच्या वांटणीला शंखच येईल अशी भीति व्यक्त केली आहे.

अशा प्रकारें महायुद्धाच्या बीजारोपणापासून तों विजयी राष्ट्रांच्या लुटीच्या वांटणीपर्यंतची हकीकत १८ लेखांत देऊन हें महायुद्धाचें पर्व संपविलें आहे. त्यानंतर

**१९ इंग्लंड व रशिया यांची तेढ** – या समारोपाच्या लेखांत युद्धसमाप्तिनंतर इंग्लंड व रशिया यांच्यांत तेढ कशी सुरू झाली याची मीमांसा करून भावी कलहाचें सूत उवाच करून ठेवलें आहे. अशा रीतीनें या लेखसंग्रहांतला पहिला विभाग संपला.

## देशांतील राजकीय घडामोडी

या विभागांत जे लेख समाविष्ट केले आहेत ते स्वदेशांतील घडामोडींचेच असल्यानें वाचकांना ते अगदींच अपरिचित असें नाहींत. यास्तव त्यांचा खुलासा करावयास नको. प्रत्येक लेखाच्या शिरोभागीं त्या त्या लेखांतील मथितार्थ दिला असल्यानें लेखाचा मागील संदर्भ समजणें सुलभ होईल.

या विभागांतील पहिला लेख '**प्रांतिक स्वराज्याचा पहिला हप्ता**' हा आहे. त्या वेळीं अधिकार-विभागणी व विकेंद्रीकरण सुरू झालें, आणि ब्रिटिश सरकार आपल्या हातची सत्ता अंशाअंशानें सोडूं लागलें. हा स्वराज्याचा पहिला हप्ता किती क्षुल्लक आहे तें या लेखांत दर्शविलें आहे. त्यानंतर पांच वर्षांच्या अवधींत स्वराज्याची एकमुखी मागणी बळावली आणि होमरूलची चळवळ जोरांत आली. तेव्हां ती दडपून टाकण्याकरितां बेझंटबाईंना स्थानबद्ध करण्यांत आलें. या दडपशाहीमुळें होमरूलची चळवळ दबण्याऐवजीं जोरानें उसळी मारून कशी वर आली याचें वर्णन '**करावयाला गेला एक, आणि झालें भलतेंच**' या दुसऱ्या लेखांत आलें आहे.

बेझंटबाईच्या स्थानबद्धतेचें पर्यवसान बेझंटबाई कॉंग्रेसच्या अध्यक्ष होण्यांत झालें. म्हणून तिसऱ्या लेखांत '**कलकत्त्याच्या कॉंग्रेसची अपूर्तता**' वर्णिली आहे. दरम्यानच्या काळांत युरोपांतलें पहिलें महायुद्ध जोरांत आलें होतें व ब्रिटिश सरकारला रिक्रूटभरतीची चणचण भासूं लागली होती. हिंदुस्थानला स्वराज्याचे हक्क देऊं केल्यास लष्करभरती वाटेल तितकी होण्याजोगती असून ब्रिटिश सरकारला वसाहतींकडे भिक्षा मागण्याचे डोहाळे आठवले आहेत, असें दर्शविण्यास्तव '**घरीं कामधेनु पुढें ताक मागें**' हा चवथा लेख येथें दिला आहे.

महायुद्ध समाप्त झाल्यामुळें ग्रेटब्रिटनची नजर फिरली आणि स्वराज्याचे हक्क वाढविण्याऐवजीं ते संकोचित करून दडपशाहीनें चळवळ दडपण्याचा उपद्याप सुरू झाला. त्या वेळीं ब्रिटिश मुत्सद्दयांना दडपशाही गर्हणीय वाटत असली, तरी स्थानिक अधिकाऱ्यांच्या कारवाईपुढें वरिष्ठांचें तत्त्वज्ञान कसें लंगडें पडतें हें दाखविण्याकरितां 'मोर्ले साहेबांच्या आठवणी' हा पांचवा लेख दिला आहे.

मध्यंतरीं जालियनवाला बागेंतील कत्तलीचें घोर प्रकरण झालें. त्याची ब्रिटिश मुत्सद्दयांना शरम वाटून 'झालें गेलें तें विसरून जा' असा साळसूदपणाचा उपदेश करण्यासाठीं बादशहांचे काका हिंदुस्थानांत आले. त्यांची 'संजय शिष्टाई' कशी निष्फळ झाली हें सातव्या लेखांत वर्णिलें आहे. पण हे काकासाहेब विलायतेला परत जाण्याला निघण्यापूर्वींच मद्रास इलाख्यांत पुनश्च दडपेगिरीला प्रारंभ झाला, त्या दडपशाहीला उद्देशून 'प्रायश्चित्ताच्या वेळींच नवें पाप' असा लेख लिहिला आहे.

मुंबईच्या दंग्यापासून बोध घ्या हा आठवा लेख असहकारितेच्या पुढाऱ्यांना व जनतेला उद्देशून लिहिला आहे. त्या लेखांत जनतेला आत्मसंरक्षणार्थ आणि अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठीं स्वयंसेवकांची संघटना करण्याची सूचना केली आहे. त्यानंतर स्वराज्यपक्षाचे सभासद असेंब्लींत जाऊन तेथें त्यांनीं स्वराज्याची मागणी ठराव रूपानें मंजूर करून घेतल्यानंतर, सरकारनें मुडिमन कमिटी नेमली. त्या कमिटींत एकमत न झाल्यानें बहुसंख्य व अल्पसंख्य सभासदांचे वेगवेगळे रिपोर्ट झाले, पण दोहोंतूनहि स्वराज्याच्या वाढीच्या दृष्टीनें विशेष लभ्यांश कांहीं झाला नाहीं, हें दर्शविण्याकरितां लिहिलेला 'शंखान् दध्मुः पृथक् पृथक्' हा नववा लेख यांत घेतला आहे.

स्वराज्यपक्षांतच त्यानंतर फूट झाली. एका पक्षाचें मत मंत्रिमंडळें स्वीकारावींत व सरकारी कमिट्यांवर काम करण्याचें पत्करावें असें होतें. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें कीं, कौन्सिलें मोडण्याकरितां आपण आंत शिरलों तेव्हां तेथें मंत्रिमंडळें बनविणें उचित नाहीं. या मतभेदांतून समेट करण्याकरितां साबरमतीला वर्किंग कमिटीची सभा भरली आणि तींत तडजोड म्हणून असें ठरलें कीं, ज्या प्रांतांतील कौन्सिलरांना मंत्रिमंडळें बनवून आपल्या हातीं पूर्ण सत्ता येते असें वाटेल, त्या प्रांतांतून मंत्रिमंडळें बनविण्यास हरकत नाहीं. ही तडजोड म्हणजे 'अमृतसरच्या काँग्रेसच्या ठरावाचाच फेर स्वीकार' होय असें दर्शविण्याकरितां त्या लेखाला 'अमृतसरच्या वाटेंतला एक टप्पा' असा मथळा दिला आहे.

यानंतर १९२८ सालीं 'बार्डोलीचा नमुनेदार सत्याग्रह' झाला. तो सत्याग्रह यशस्वी कसा झाला आणि सत्याग्रह करावयाचाच झाला तर तो केव्हां व कसा करावा म्हणजे विजय मिळतो, याची चिकित्सा या ११ व्या लेखांत केली

नगर वाचनालय सातारा
दा नं.........
ह नं.........

आहे. बार्डोलीचा सत्याग्रह यशस्वी झाला म्हणून तेथील शेतसाऱ्याची चुकीची वाढ कमी करण्यांत आली, पण अशाच चुका इतर अनेक ठिकाणीं झाल्या आहेत त्यांची वाट काय असा खोचक प्रश्न सरकारला विचारण्याकरितां '**एक बार्डोली मिटली पण इतरांची वाट काय**' हा १२ वा लेख यांत घेतला आहे.

फुटकळ सत्याग्रहानें स्वराज्य साध्य होत नाहीं असें पाहून गांधीजींनीं मिठाचा सुप्रसिद्ध सत्याग्रह जाहीर केला आणि देशभर चळवळ करण्याला आवाहन केलें, तेव्हां त्या आवाहनाला अनुरूप असा '**सत्याग्रहाच्या युद्धाचा रणदुंदुभि वाजूं लागला**' असा मथळा दिलेला हा १३ वा लेख यांत समाविष्ट केला आहे.

ही सत्याग्रहाची चळवळ देशभर जोरानें फोफावली. तींत क्वचित् ठिकाणीं गुंडांनीं अत्याचारहि केले. असा एक भीषण अत्याचार सोलापुरास घडला. तें निमित्त पुढें करून सर्वत्र दहशत बसविण्याकरितां सोलापूरच्या खटल्यांतील चौघा आरोपींना देहान्त शिक्षा सुनावून फांसावर टांगण्यांत आलें. या आरोपींचे जीव बचावण्याकरितां अर्ज, विनंत्या, शिष्टाई इत्यादि सर्व उपाय केलेले अगदीं व्यर्थ ठरले; त्यावरून अद्यापि नोकरशाही वठणीवर येत नाहीं, तिला वठणीवर आणण्याकरितां '**बेजबाबदार नोकरशाही व दुबळें लोकमत**' हा चौदावा लेख लिहिलेला आहे.

'**कराचीच्या गोळीबाराची मीमांसा**' हा लेख अगदीं निराळ्या स्वरूपाचा आहे. स्वराज्याच्या चळवळीच्या टप्प्यांतला हा टप्पा नव्हे. या लेखांत कराचीच्या अधिकाऱ्यांनीं आडदांड मुसलमानांवर केलेल्या गोळीबाराचें समर्थन केलेलें आहे. हा लेख या संग्रहांत घेण्याचा हेतु एवढाच कीं, स्वराज्य असो वा परराज्य असो, आपल्या मुलुखांत शांतता राखावयाची असेल आणि बेफाम अत्याचारी गुंडांपासून निरुपद्रवी जनतेचें संरक्षण करावयाचें असेल तर असे कडक उपाय योजावे लागतात.

निजामानें वऱ्हाडांत आपले हक्क कसे प्रस्थापित करून घेतले व मागील अपमानाचें कसें उट्टें काढून घेतलें तें दर्शविण्याकरितां '**सव्याज वचपा काढून घेतला**' हा १६ वा लेख दिला आहे. वाटाघाटी करून आपलें स्थान बळकट करण्यांत निजाम किती धूर्त आहे, व त्याच्याशीं वाटाघाटी करावयाच्या तर किती जपून कराव्या लागतात तें या लेखावरून दिसून येईल. लॉर्ड कर्झन यांनीं १९०२ सालचा करार करून घेऊन सध्यांच्या निजामाच्या वडिलांना चांगलेंच चकविलें. त्यानंतर १९२६ सालीं लॉर्ड रीडींग यांनीं सध्यांच्या निजामाची टुरटूर, बिलकूल भीडभाड न धरतां सपशेल झिडकारून, बंद पाडली. तरी पण सर सॅम्युएल होअर-सारखे बोटचेपे भारतमंत्री अधिकारारूढ असल्याची संधि साधून निजामानें आपला कावा साधला आणि वऱ्हाडांत यथेच्छ हातपाय पसरण्याची मुभा मिळविली.

या प्रकरणांतला शेवटचा १७ वा लेख '**राबविणार का राबविले जाणार**' हा असून तो लेख १९३७च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या वेळीं लिहि-

नगर वाचनालय सातारा
संग्रहालयीकृत

लेला आहे. स्वराज्याच्या चळवळींतला हा शेवटचा टप्पा होय. या निवडणुकी जिंकून बहुमत मिळविल्यास प्रांतिक सत्ता पूर्णपणें हातांत येणार होती. बारा वर्षांपूर्वी मंत्रिमंडळें बनवावीं का नाहीं हा जो वाद निघाला होता, त्याचा योग्य निर्णय त्या वेळीं केला गेला नाहीं म्हणून चळवळीची निष्कारण कुचंबणा झाली. या वेळींहि तीच चूक केल्यास, नोकरशाहीवर मात करण्याची संधि जाऊन उलट नोकरशाहीकडून तुमच्यावर मात केली जाईल व तुम्हांस नोकरशाहीच्या जोखडाखालीं राबावें लागेल, असा अगाऊ इशारा या लेखानें दिला आहे.

## आर्थिक व्यवहार

येथून पुढें 'आर्थिक व्यवहार' हें तिसरें प्रकरण सुरू झालें. पूर्वींच्या दोन प्रकरणांत जशी एकसूत्रता आहे, आणि क्रमाक्रमानें एकेक टप्पा गांठलेला आहे, तसा क्रम या लेखांत असणें शक्य नाहीं. ज्या ज्या वेळीं महत्त्वाचा आर्थिक प्रश्न उद्भवला त्या त्या वेळीं त्यावर केसरीनें आपलें मत प्रदर्शित केलें आहे. त्यांतले कांहीं लेख तीसपस्तीस वर्षांपूर्वींचे असले तरी आजमितीलाहि त्यांपासून कांहीं बोध घेण्यासारखा असल्यानें त्या लेखांचें पुनर्मुद्रण या लेखसंग्रहांत केलें आहे.

पहिला लेख सर चुनीलाल सरैय्या यांचा कोंडमारा कसा झाला त्याच्या स्पष्टीकरणार्थ लिहिलेला आहे. त्या लेखावरून त्या वेळीं सरकार ब्रिटिश कंपन्यांच्या रक्षणासाठीं हिंदी कंपन्यांची कशी अडवणूक करीत असे व त्या वेळीं स्वदेशी बँक चालविणें किती अवघड होतें तें दिसून येईल. पहिल्या स्वदेशी बँकेसाठीं सरैय्या यांचा बळी पडला तरी तो धंदा आतां सुप्रतिष्ठित झाला याचें श्रेय सर चुनीलाल सरैया यांच्या धाडसासच आहे.

कालवे का रेल्वे या दुसऱ्या लेखांत हिंदुस्थानच्या हितासाठीं कालव्यांची वाढ करणें आवश्यक असतां ब्रिटिश कंपन्या आणि गोरे बडे अधिकारी यांच्या फायद्यासाठीं सरकार रेल्वेकडेच अमूप पैसा कसा खर्च करतें, हें दाखविलें आहे. करांचा पूर्वेतिहास हा तिसरा लेख ऐतिहासिक माहितीचा आहे. पूर्वीं या देशांत कोणते कर, केव्हां, कोणत्या उद्देशानें बसविले, त्या करांत जे फेरबदल वारंवार झाले ते सगळे ब्रिटिश व्यापाऱ्यांच्याच हिताकडे नजर देऊन कसे झाले याचें विवरण, अप्रसिद्ध जुनी माहिती देऊन, या लेखांत केलेलें आहे.

कर वाढवावयाचे तर हे वाढवा या चवथ्या लेखांत अर्थशास्त्रांचीं मूलतत्त्वें आणि लोकहित या दोहोंचा मेळ घालून कोणते कर वाढवावेत व कोणते वाढवूं नयेत याविषयीं ज्या सूचना केल्या आहेत त्या आजच्या सरकारलाहि उपयुक्त वाटण्यासारख्या आहेत.

चलन बेसुमार वाढलें कीं महागाई वाढावयाचीच, असा अर्थशास्त्रांतला सिद्धान्तच आहे व त्या सिद्धान्ताचा अनुभव पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस कसा आला याचें विवेचन नोटांचा सुकाळ आणि महर्घता या ५ व्या लेखांत केलें आहे.

महाराष्ट्रीय व्यापारी परिषद या सहाव्या लेखाचें महत्त्व निराळें वर्णावयास नको. आजकाल महाराष्ट्रांत व्यापारांत व कारखानदारींत जी थोडीफार हालचाल दिसून येत आहे तिला मूळ चालना देण्याचें श्रेय या व्यापारी परिषदेलाच दिलें पाहिजे. मुंबईस ही परिषद भरविण्याचें ठरवून डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशननें एका महत्कार्याची मुहूर्तमेढ रोविली, तेव्हां अखिल महाराष्ट्राचें लक्ष व्यापार व कारखानदारी यांकडे वेधण्यासाठीं हा लेख लिहिला गेला आणि त्या लेखांत त्या वेळीं ज्या कित्येक विधायक सूचना केल्या होत्या त्या यथाकाल अमलांत येऊन महाराष्ट्राचें पाऊल व्यापारी क्षेत्रांत पुढें पडत चाललें हें पाहून संतोष वाटून या लेखाला या संग्रहांत स्थान देण्यांत आलें आहे.

हेले गेले पण घाण गेली नाहीं हा सातवा लेख १९२३ मधील अंदाजपत्रकावरील टीकात्मक आहे. पहिल्या महायुद्धानंतर अंदाजपत्रकाची जी दुरवस्था झाली होती ती दूर करण्याकरितां सर बेसिल ब्लॅकेट यांची नेमणूक फडणीसीच्या कामावर झाली. पण पहिल्या वर्षींच त्यांना अंदाजपत्रकांतले सर्व दोष दूर करतां आले नाहींत. तथापि पुढें पांच वर्षांत ब्लॅकेटसाहेबांनीं बजेट ताळ्यावर आणलें आणि रिझर्व्ह बँकेचाहि पाया घालण्याचा उपक्रम केला. तत्पूर्वीची दुरवस्था लक्षांत यावी म्हणून हा लेख यांत घेतला आहे.

गोऱ्यांचे लाड सव्वा कोटीची धाड या आठव्या लेखांत मावळत्या नोकरशाहीचे लाड पुरविण्यासाठीं 'ली' कमिशन नेमून त्याच्या शिफारसीमुळें हिंदी खजिन्यावर केवढा बोजा लादला गेला त्याची चर्चा केली आहे. काटकसर करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली असतां बड्या पगारदारांना नव्या सवलती देऊन गोरगरिबांवर कर वाढविण्यांत आले याचा या लेखांत निषेध आहे.

संरक्षण द्या पण हमी घ्या हा नववा लेख सद्यःकालींहि मार्गदर्शक होण्याजोगा आहे. परदेशाहून आयात होणाऱ्या कापडावरची आयात जकात वाढवावी व देशी गिरणीवाल्यांचें संरक्षण करावें अशी कापडगिरण्यांच्या चालकांची मागणी होती. संरक्षण देऊन देशी उद्योगधंदे तगवावे हें उचित आहे. पण या संरक्षणाचा दुरुपयोग होणार नाहीं, आम्ही कारखाने सुधारूं आणि स्वस्त कापडाचा भरपूर पुरवठा करूं, अशी हमी गिरणीवाल्यांकडून घ्या आणि मगच संरक्षण द्या, असा केसरीनें इशारा दिला. सरकारनें हें धोरण सांभाळलें नाहीं आणि गिरण्यांचा कारभारहि सुधारला नाहीं. त्यामुळें त्यानंतर २४ वर्षांनीं पुनश्च तोच प्रश्न पुढें येत आहे, याचा खेद वाटतो. चोवीस वर्षांपूर्वी हा प्रश्न कापडगिरण्यांपुरताच होता. आजमितीला साखरेच्या गिरण्याहि संरक्षण कायम ठेवण्याची मागणी करीत आहेत, पण साखर स्वस्त व भरपूर पुरविण्याची हमी देत नाहींत; उलट साखरेचा भाव वाढवून देण्याची मागणी करीत आहेत! या वेळीं सरकारनें गिरणीवाल्यांना

जर संरक्षण द्यावयाचें तर त्यांच्याकडून स्वस्त भावाची व भरपूर पुरवठ्याची आधीं हमी घ्यावी, मगच संरक्षण द्यावें, असा इशारा देण्यासाठीं, पूर्वीच्या लेखाचा हा दाखला पुढें केला आहे. हेतु हा कीं, त्या वेळीं त्याकडे जसें दुर्लक्ष झालें तसें दुर्लक्ष यांवेळीं होऊं नये.


**हिंदी चलनाचा सोन्याशीं घटस्फोट** हा शेवटचा लेख सद्यःस्थितीवरहि प्रकाश पाडणारा आहे. १९३१ सालीं इंग्लंडांतल्या पौंडाचा भाव घसरला आणि त्याबरोबरच भारत-मंत्र्यांनीं अरेरावीनें रुपयाचा भाव सोन्यांत ठरला होता तो रद्द करून रुपयाचा संबंध पौंडाशीं जोडला. त्यामुळें पौंडाबरोबरच रुपयाचें अवमूलन होऊन अमेरिकन डॉलर भावांत चढला आणि हिंदुस्थानला अमेरिकन माल महाग पडूं लागला. त्या वेळीं ही आपत्ति पारतंत्र्यामुळें आली. आतां अलीकडे विलायतेंत पौंडावर तोंच प्रसंग आला असून, हिंदुस्थान सरकारनें पौंडाप्रमाणेंच येथल्या रुपयाचें अवमूलन केलें. यामुळें अमेरिकेंतून माल आणविणाऱ्यांची कुचंबणा होत आहे. अशा परिस्थितींत रुपयाचा संबंध अस्थिर अशा पौंडाशीं न जोडतां रुपयाचा भाव सोन्यांत निश्चित करावा, असें या लेखाच्या उत्तरार्धांत प्रतिपादन केलें आहे. हा प्रश्न बराच भानगडीचा आहे, तरी पण त्याची भवति न भवति करण्यास हा मागील लेख उपयोगी पडेल.

तीन महत्त्वाच्या विभागांतील लेखांचें धोरण काय व त्यांची निवड कां केली त्यासंबंधाचें हें स्पष्टीकरण पुढील लेख वाचतांना मार्गदर्शक होईल. या तीन प्रकरणांतच ग्रंथाची ठरलेली पृष्ठसंख्या भरत आल्यानें ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, परीक्षणात्मक, संकीर्ण इत्यादि लेख दुसऱ्या खंडाकरितां राखून ठेवावे लागले. मात्र केसरी पत्राचें धोरण काय, लो. टिळकांची केसरी चालविण्यांत दृष्टि कोणती होती आणि सामान्यतः वृत्तपत्रकारानें कोणतें ध्येय व धोरण आपल्या नजरेसमोर ठेवावें, यासंबंधाचें स्वतःचें मत प्रतिपादन करणारे जे दोन-तीन लेख प्रसंगानुरोधानें लिहिले होते ते शेवटीं देऊन हा ग्रंथ पूर्ण करण्यांत आला आहे.

यांतील लेख जर वाचकांना वाचनीय व संग्रहणीय वाटले तर लेखसंग्रहाचा दुसरा खंड प्रसिद्ध करण्याचा विचार ठरवितां येईल.

पुणें,
माघ शु. १० शके १८७१
दि. २८ जानेवारी १९५०

ज. स. करंदीकर



श्री. ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA
206

# महायुद्ध व परराष्ट्रीय राजकारण

## जर्मन गरुडाचे तोडलेले पंख पुनश्च फुटले १

[ पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जर्मनींतून कायसरशाहीचें उच्चाटन करून तेथें लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापण्यांत आली. व्हर्साइलच्या तहानें ही जी नवी घटना घडवून आणली ती पांच वर्षें कशीबशी चालल्यावर जर्मन राष्ट्रांत नव्या जोमाचें पाणी खेळूं लागलें आणि जर्मनीचें पुनरुत्थापन करण्याला हिंडेंबुर्गसारखा खंबीर रणपंडित अध्यक्षपदीं स्थापला जावा असें जर्मनींतील राष्ट्रीय पक्षाला वाटून त्या पक्षानें हिंडेंबुर्ग यांची उमेदवारी जाहीर केली. अध्यक्षपदासाठीं हिंडेंबुर्गचें नांव जाहीर होतांच दोस्त राष्ट्रांनीं जर्मनांना धमकी देण्यासहि कमी केलें नाहीं. तथापि हिंडेंबुर्गच्या नांवांतील जादू आणि राष्ट्रीय पक्षाची दृढनिष्ठा यांच्या जोरावर हिंडेंबुर्ग हे निवडणुकींत यशस्वी होऊन अध्यक्षपदारूढ झाले, ही अद्भुत घटना कशी घडून आली व तिचा जर्मनीवर व इतर राष्ट्रांवर कोणता परिणाम घडेल याची मीमांसा पुढील लेखांत केलेली आढळेल. ]

युरोपांतील राजकीय वातावरणांत गेल्या आठवड्यांत एकाएकीं मोठें वादळ उद्भवून खळबळ उडून गेली आहे. जर्मनीच्या अध्यक्षपदाकरितां जर्मन भीष्माचार्य

(केसरी, दि. ५ मे १९२५)

हिंडेंबुर्ग हे उमेदवार म्हणून पुढें आले व त्यांस सर्वांत अधिक म्हणजे १ कोटि ४६ लक्ष ३९ हजार मतें पडून निर्विवाद बहुमतानें ते निवडून आले. मार्चमध्यें जेव्हां पहिली निवडणूक झाली त्या वेळीं राष्ट्रीय पक्षातर्फे लुडेंडॉर्फच उमेदवार उभे होते, परंतु त्यांच्या हातून ही निवडणूक निभत नाहीं असें दिसतांच जर्मन राष्ट्रीय पक्षानें हिंडेंबुर्ग यांस पुढें आणलें आणि डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार डॉ. मार्क्स यांच्याहून सुमारें दहा लक्ष मतें अधिक पडून जनरल हिंडेंबुर्ग हे जर्मन लोकसत्ताक राष्ट्राच्या अध्यक्षपदावर आरूढ झाले.

## जर्मनीचा उद्धारकर्ता

हिंडेंबुर्ग हे केवळ शिपाईगडी. महायुद्धापूर्वी कधींहि त्यांनीं राजकारणांत भाग घेतला नव्हता. आणि युद्धसमाप्तीनंतर तर सर्वच व्याप टाकून ते हॅनोव्हर प्रांतांत आपल्या घरीं हरि हरि म्हणत बसले होते. त्यांचें वयोमानहि ऐंशीचें घर जवळ जवळ गांठीत आलें आहे. इतक्या वृद्धापकाळांत भानगडीच्या राजकारणांत एखाद्या पक्षाचा पुढाकार घेऊन अध्यक्षपदासाठीं उमेदवारी करण्याचें एरवीं कोणीहि मनांत आणलें नसतें. परंतु जर्मन राष्ट्राची इभ्रत राखावयाची असेल तर तुम्हांसच अध्यक्ष झालें पाहिजे अशी राष्ट्रीय पक्षानें त्यांस गळ घातल्यामुळें केवळ राष्ट्रकार्यासाठीं म्हणून लोकाग्रहास्तव ते उमेदवार होऊन पुढें आले. उमेदवार होतांनाच त्यांनीं असें बजावलें होतें कीं, मी स्वतः या सामन्यांतील यशप्राप्तीसाठीं कांहींएक खटाटोप करणार नाहीं. तथापि 'हिंडेंबुर्ग' या नांवांतच इतकी जादू भरली आहे कीं, त्यांचें नांव ऐकूं येतांच सर्व जर्मनींतील मतदारसंघ स्वयंस्फूर्तीनें त्यांस पाठिंबा देण्यास पुढें सरसावला. आणि श्रद्धाळू शेतकरी वर्ग व विशेषतः स्त्री-मतदार यांनीं आपलीं मतें भावनेनें व आत्मस्फूर्तीनें हिंडेंबुर्ग यांसच दिल्यानें ते यशस्वी झाले.

जनरल हिंडेंबुर्ग हे राजसत्तावादी आहेत. माजी कायसरविषयींची त्यांची निष्ठा अद्यापि अढळ आहे. जर्मन राष्ट्राची गेलेली इभ्रत परत मिळवून देऊन त्यास पुनः वैभवशिखरावर आरूढविण्याला एकतंत्री राजसत्ताच प्रस्थापित झाली पाहिजे असें त्यांचें स्वतःचें मत आहे. तथापि ते परिस्थिति जाणतात. आजमितीला जर्मनींत लोकसत्ता प्रस्थापित झाली असल्यानें ती झुगारून देऊन पुनः कायसरशाहीची प्राणप्रतिष्ठा करणें श्रेयस्कर नाहीं, व निदान तूर्त तरी तें शक्य नाहीं हें जाणूनच सध्यांची लोकसत्ताक पद्धति आपण एकनिष्ठेनें चालवूं असें त्यांनीं जाहीर केलें आहे. तथापि अध्यक्षपदाच्या उमेदवारासाठीं आपलें नांव प्रसिद्ध करतांना त्याबरोबरच आपलें राजकीय धोरण म्हणून जर्मन राष्ट्राला जो संदेश त्यांनीं कळविला त्यांत 'जर्मनीची नष्ट झालेली इभ्रत मी परत मिळवीन, आणि जर्मनी कांहीं यावच्चंद्रदिवाकरौ गुलामगिरींत राहणार नाहीं' अशी दोन साभिप्राय व स्फूर्तिजनक वाक्यें त्यांनीं

गोंविलीं. आणि त्या वाक्यांनींच जर्मन राष्ट्राचें अंतःकरण हलून जाऊन जर्मनीच्या सांप्रतच्या विपन्नावस्थेंत जर कोणी उद्धारकर्ता असेल तर तो हिंडेंबुर्गच होय अशा भावनेनें मतदारांनीं त्यांस आपलीं मतें दिलीं व हिंडेंबुर्ग अध्यक्ष-स्थानावर अधिष्ठित झाले.

### गरुडाला डिवचण्याचा खेळ

डॉ. मार्क्स अगर डॉ. जॉरिस यांच्यासारखे नव्या मनूंतले मुत्सद्दी बाजूस सारून जर्मनीनें अध्यक्षपदाची माळ हिंडेंबुर्गसारख्या केवळ तलवारबहाद्दराच्या गळ्यांत कां घातली याची मीमांसा करणें फारसें कठीण नाहीं. महायुद्धाच्या समाप्तीपासून जर्मन राष्ट्राला कायमचें खच्ची करण्याचा फ्रेंचांचा डाव सुरू झाला आणि त्यास इंग्लंड व इटाली यांनीं कधीं गर्भित संमति तर कधीं मूक संमति दिली. जर्मन राष्ट्राची शक्ति कमी करण्याकरितां या दोस्त राष्ट्रांनीं आस्ट्रियाला जर्मनीपासून अगदीं अलग केला, रशिया व जर्मनी यांच्या दरम्यान पोलंडची भिंत उभारली, एका बाजूचा सायलेशियाचा व दुसऱ्या बाजूचा ऱ्हाइन-लँडचा लचका तोडण्यांत येऊन जर्मनीची खनिज संपत्ति संपुष्टांत आणली, जर्मनीच्या बहुतेक सर्व आरमाराला जलसमाधि दिली, वैमानिक दलाची अशीच वाताहत केली, जर्मनींत एक लक्षाहून अधिक खडें सैन्य असूं नये अशी अट घालून शिवाय जर्मन राष्ट्रांत हत्यारें किती असावींत, हत्यारांचे कारखाने किती चालावेत, कवाईत किती इसमांना शिकवावी इतक्या बारीकसारीक गोष्टींतहि दोस्तांनीं जर्मनीचे हातपाय बांधून टाकले आणि एवढ्यानेंहि त्यांच्या खुनशी मनाचें समाधान न होऊन त्यांनी त्याच्या पाठीवर निखर्वावधि रुपयांच्या कर्जाचें ओझें लादलें. आणि या अटी जर्मनीकडून तंतोतंत पाळल्या जात नाहींत, असा बहाणा करून फ्रान्सनें रूहर प्रांतहि व्यापिला.

लष्कर व आरमार हे दोनहि पंख तोडले गेल्यामुळें लोळागोळा बनलेला आणि कर्जाच्या असह्य बोजाखालीं पाठ वाकून जमिनीस खिळलेला हा आपला प्रति-पक्षी आतां पुनः डोकें वर काढणार नाहीं अशी फ्रान्सची समजूत होती. पण शत्रूची एवढी विपन्नावस्था पाहूनहि फ्रान्सच्या मनाचें पूर्ण समाधान झालें नाहीं. जर्मनीने आपल्या जवळचीं हत्यारें दडवून ठेवलीं आहेत असा कांगावा करून या गोष्टीची शहानिशा करण्याकरितां फ्रान्सनें एक कमिशन जर्मनींत धाडलें; आणि त्या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध न करतां चोरून हत्यारें बाळगल्याचा गुन्हा जर्मनीवर शाबीत होतो असें ठरवून कोलोन टापूंतून आपलें सैन्य परत नेण्याची दोस्त राष्ट्रांनीं टाळा-टाळी चालविली. जर्मन गरुडाला डिवचण्याचा फ्रान्सचा खेळ युद्धसमाप्तीपासूनच चालू असल्यानें जर्मनांचा संताप आंतल्या आंत धुमसत होता. तथापि दुर्बलांचा संताप हा दरिद्र्याच्या मनोरथांप्रमाणेंच 'उत्पद्यन्ते विलीयन्ते' अशा कोटींत

समाविष्ट होत असल्यानें सर्व अपमान निमूटपणें सहन करून जर्मनीनें प्रथमतः आपलें सर्व लक्ष बलसंवर्धनाकडे लाविलें.

व्यापार हें आधुनिक राष्ट्रांचें जीवन आहे यास्तव जर्मनीनें प्रथम आपल्या व्यापाराची घडी ठाकठीक बसविली, रशियाशीं संधान बांधून आपलें भांडवल, तज्ज्ञ आणि यंत्रसामुग्री त्या देशांत नेऊन तेथें कारखाने उभारले. परराष्ट्रांतलें आपलें जुनें गिऱ्हाईक परत आपल्याकडे वळवून घेण्याकरितां त्यास शक्य तितक्या सवलती देऊं केल्या. लढाऊ जहाजें व विमानें बांधण्याची बंदी असल्यामुळें व्यापारी जहाजें व विमानें अशा कुशलतेनें बांधलीं कीं वाटेल त्या वेळीं त्यांचें रूपांतर करतां यावें. आपल्यावरचा जुन्या कर्जाचा बोजा हलका करण्याकरितां कागदी मार्क्सची किंमत बेसुमार उतरवून दिवाळें काढलें, आणि जुन्या कर्जातून मुक्त होऊन अमेरिकेच्या नव्या कर्जाच्या जोरावर नवें कागदी चलन सुरू करून साखसुरत पुनः व्यापार चालू केला.

अशा विविध युक्त्या प्रयुक्त्यांनीं जर्मनीनें गेल्या पांच वर्षांत आपलें अंतस्थ बळ वृद्धिंगत केलें, त्याचबरोबर परराष्ट्रांची दोस्ती संपादन करण्याचाहि डाव चालूच होता. एका बाजूला फ्रान्स व बेल्जम आणि दुसऱ्या बाजूला पोलंड व झेकोस्लोव्हाकिया एवढींच राष्ट्रें अशीं आहेत कीं, त्यांचें जर्मनाशीं सख्य होणें हें सर्पाचें मुंगसाशीं सख्य होण्याइतकेंच दुरापास्त आहे. पण इतर राष्ट्रांशीं तसें उपजत वैर नसल्यामुळें रशिया, अमेरिका, जपान, इटाली इत्यादि महायुद्धकालीन शत्रुराष्ट्रें, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान हीं त्या वेळचीं स्नेही राष्ट्रें आणि हॉलंड, स्पेन, स्वीडन वगैरे तटस्थ राष्ट्रें या सर्वांच्या पुढें जर्मनीनें दोस्त राष्ट्रांकडून आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा पाढा वाचून त्यांची मैत्री नसली तरी आस्ते आस्ते सहानुभूति संपादन केली. अशा रीतीनें एकीकडून अंतस्थ शक्तीची वाढ झाली आणि दुसरीकडे परिस्थितीचें वातावरणहि अनुकूल बनलें; त्याबरोबर जर्मन गरुडाचे छाटलेले पंख पुनः फुटूं लागले आणि त्या पंखांत आतां पूर्ववत् शक्ति आल्याचें चिन्ह दिसूं लागतांच त्यानें आपले पंख फडफडावण्यास सुरुवातहि केली आहे.

### गरुडानें पंख हलवितांच गडबड उडाली

अध्यक्षपदासाठीं हिंडेंबुर्गसारखा राजसत्तावादी आणि कायसरचा पक्का अभिमानी असा महारथी पुढें करून जर्मन गरुडानें आपले नवे पंख हलवितांच युरोपखंडांतील राजकीय वातावरणांत मोठीच खळबळ उडून गेली. ब्रिटिश सिंह डोळे उघडून आश्चर्यानें वर पाहूं लागला, फ्रेंच चित्ता रागानें आपली शेपटी आपटूं लागला. या व्याघ्रसिंहांच्या बळावर पूर्वी जर्मन गरुडाला सतावणारीं पोलंड प्रभृति क्षुद्र जनावरें भीतीनें हंबरडा फोडून मदतीची याचना करूं लागलीं आणि इतर सर्व प्राणी हा नवा प्रकार काय आहे याचा उमज न पडल्यानें आश्चर्यचकित होऊन

राहिले. अशा या स्तंभित वृत्तींतून इंग्लंडच प्रथम भानावर आलें आणि इंग्लंडांतील मेघनाद पत्रानें आपलें नेहमींचें अस्त्र बाहेर काढून हिंडेंबुर्गची निवडणूक कराल तर याद राखून असा अशी धमकी दिली ! फ्रेंच पत्रांनींहि पुनः तलवार म्यानांतून बाहेर काढावी लागेल असें म्हणून धाकदपटशा दिला. पण जर्मनीनें कोणाच्याहि रागलोभाची पर्वा न करतां हिंडेंबुर्गचीच निवडणूक करून आपला निश्चय तडीस नेला.

हिंडेंबुर्गच्या नांवांत किती जादू भरली आहे याचें प्रत्यंतर निवडणुकीच्या सामन्यांत तर दिसून आलेंच; कारण पूर्वीची कांहीएक तयारी नसतां आणि मत-याचना करण्यासाठीं कोठेंहि व्याख्यानाचा दौरा न काढतां केवळ नांव जाहीर करून, बसल्या ठिकाणांहून न हालतांच, हिंडेंबुर्गला दीड कोटि मतें मिळालीं. ही स्वदेशांतली गोष्ट झाली. पण परराष्ट्रांतहि या जादूची मोहिनी कांहीं कमी प्रभाव-शाली झाली आहे असें नाहीं. निवडणुकीपूर्वी जर्मनीला धमकी देणारा इंग्लंडांतील 'मेघनाद' आतां तिसऱ्या सप्तकांतला आपला सूर उतरवून हिंडेंबुर्ग अध्यक्ष झाला म्हणून काय झालें, जोंपर्यंत जर्मनीनें व्हर्सेलीसच्या तहाच्या अटी मोडल्या नाहींत तोंपर्यंत आपणांस तिकडे पाहाण्याचें कारणच नाहीं, असे सौम्य उद्गार काढूं लागला आहे. हिंडेंबुर्ग हा कायसरचा एकनिष्ठ भक्त असला तरी 'रिपब्लिक' राज्यपद्धतीच चालू ठेवण्याची त्यानें शपथ घेतली आहे, तेव्हां कायसरशाही सुरु होण्याची धास्ती निरर्थक आहे, असें म्हणून कित्येक पत्रें आपलें समाधान करून घेत आहेत. फ्रान्स-मधील खळबळ मात्र इतक्या लवकर व सहजासहजीं शांत होणें शक्य नाहीं. तथापि यापुढें पूर्वीसारखी जर्मनीची कुचेष्टा व अवहेलना करून चालणार नाहीं; आणि जर्मनीनें जर तहाच्या अटींचा भंग केला असेल तर त्याचें माप पुराव्यानिशीं त्याच्या पदरीं घातलें पाहिजे असाच फ्रेंच पत्रांतून सूर निघत आहे.

खुद्द जर्मनींत देखील आजच कायसरला किंवा कायसरपुत्राला परत आणण्याविषयीं फारसा कोणी उत्सुक आहे असें नाही; किंबहुना लोकसत्ताक पद्धति झुगारून देऊं नये व जुनी राजवट पुनरुज्जीवित करूं नये, असाच लोकमताचा वारा जर्मनींत वाहत आहे. अर्थातच जर्मनींत राज्यक्रान्ति होण्याचा संभव दिसत नाहीं. परंतु राष्ट्राची इभ्रत व उन्नति हीं राज्यपद्धतीच्या नाटकी देखाव्यावर नव्हे तर जनतेच्या अंतःकरणांतील वृत्तीवर अवलंबून असतात. जुनें राजशाहीचें युग जाऊन नवें लोकशाहीचें युग सुरू झाल्यानें अनेक राष्ट्रांत अलीकडे राज्यक्रान्त्या झाल्या आहेत. परंतु राष्ट्रांतील लोकांचा स्वभाव जोंपर्यंत बदलला नाहीं तोंपर्यंत राजाच्या नांवानें कारभार चालला काय अगर अध्यक्षाच्या नांवानें तो चालला काय फल-श्रुति सारखीच.

याच दृष्टीनें जर्मन राष्ट्राच्या हालचालीकडे पाहिल्यास हिंडेंबुर्गच्या निवड-णुकीचें रहस्य वाचकांच्या लक्षांत येईल. महायुद्धाच्या परिसमाप्तीच्या वेळीं दोस्त

राष्ट्रांनीं कायसरच्या कारकीर्दींतील लष्करशाहीची नालस्ती करकरून जर्मनांचीं मनें इतकीं विटविलीं होतीं कीं, जर करितां त्या वेळीं कायसर चुकूनमाकून जर्मनींत परत आला असता तर अमेरिकेंतल्या नीग्रोप्रमाणें त्याजवर 'लिंचिंग'चा प्रयोग झाला असता ! परंतु दोस्त राष्ट्रांची ही शिकवण स्वार्थसाधूपणाची आहे व तिच्या नादीं लागल्यास जर्मनीचा निःपात होईल, असें जर्मन मुत्सद्द्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं जनतेचीं बिथरलेलीं मनें ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला; आणि फ्रान्स प्रभृति राष्ट्रांनीं जर्मनीच्या दुबळेपणाचा गैरवाजवी फायदा घेऊन रूहर प्रांत बळकावल्याचें दृष्टीस पडतांच जर्मनीच्या डोक्यांत खरा प्रकाश पडला आणि त्या वेळेपासून कायसरशाहीला अनुकूल असा वारा वाहूं लागला. जर्मन युवराजाला आपल्या इस्टेटीच्या गांवीं परत येण्याला परवानगी मिळाली हें या मतपरिवर्तनाचेंच स्पष्ट चिन्ह होय. त्यानंतर फ्रान्सनें जेव्हां रूहर प्रांत बळकावला त्या वेळीं त्यांस सशस्त्र प्रतिकार करतां येत नसल्यानें जर्मन राष्ट्रानें निःशस्त्र प्रतिकाराचें -- असहकारितेचें -- आधुनिक शस्त्र परजून पाहिलें. पण तेंहि बोथट व निष्फळ ठरल्यानें जर्मनींनें पुनः पूर्ववत् आपली संघटना करण्यास प्रारंभ केला. हिंडेंबुर्गचा विजय हा ही संघटना पूर्ण झाल्याचा पुरावाच होय.

### डिवचण्याचे चाळे बंद पडतील

महायुद्धामुळें विस्कटलेली घडी जर्मनीनें आतां पुनश्च बसविली आहे. जर्मनींतील शाळा-कॉलेजें पूर्ववत् चालू झालीं आहेत. जर्मन कारखाने मालाची पैदास पहिल्यापेक्षां अधिक करूं लागले असून, परदेशांतून त्या मालाचा उठावहि समाधानकारक होत आहे. मार्कसच्या नव्या चलनांचा भाव स्थिरावला आहे. आणि डॉस कमिटीनें ठरविलेले नुकसानभरपाईचे हप्ते न चुकतां भरण्याची ऐपत जर्मनीच्या अंगीं आली आहे. एवंच जर्मनींतील अंतर्गत स्थिति बरीच सुधारल्यानें आतां परराष्ट्रांकडून होणाऱ्या उपमर्दाचा व जुलमाचा प्रतिकार करण्यास जर्मनी पुढें सरसावला आहे. सेनापति हिंडेंबुर्गला अध्यक्ष निवडल्यानें जर्मनी कांहीं प्रत्यक्ष युद्ध पुकारणार आहे अशांतला भाग नाहीं. परंतु गेलीं पांच-सहा वर्षें दोस्त राष्ट्रें म्हणतील ती पूर्वदिशा असा जो प्रकार होता तो दूर होऊन 'अरे तर कारे' असें प्रत्युत्तर देण्यास जर्मनी समर्थ झाल्यामुळें आतां त्याला कोणी 'अरे तुरे' करणार नाहीं. जर्मनीनें युद्धसामुग्री दडवून ठेवली आहे असा त्याजवर आळ घालून दोस्तांनीं जर्मनीचा मुलूख सोडून जाण्याचें आतांपर्यंत नाकारलें. पण आतां त्यांस पुरावा तरी द्यावा लागेल, नाहीं तर कोलोन वगैरे टापू सोडून तरी द्यावा लागेल. तसेंच आतांपर्यंत 'मऊ सांपडलें म्हणून कोपरानें खणण्याचा' जो प्रकार फ्रान्सनें चालविला होता त्यास आळा बसेल आणि व्हर्सेलीसचा तह पाळण्याची जबाबदारी जशी जर्मनीवर आहे तशीच दुसऱ्या बाजूनें फ्रान्सवरहि कांहीं जबाब-

[stamp] ...वाचनालय, सातारा.



दारी आहे, याचा आतांपर्यंत दोस्त राष्ट्रांना जो विसर पडल्यासारखा दिसत होता त्याची त्यांना हिंडेंबुर्गकडून जाणीव करून दिली जाईल. सारांश, जर्मन गरुडाचे तोडलेले पंख पुनः फुटल्यानें आतां त्यास निष्कारण डिवचण्याचे चाळे बंद पडतील आणि जर्मनीचा राष्ट्रसंघांत समावेश होऊन त्यांत एकतर्फी न्यायसनसुबा न होतां यापुढें दुसरी बाजू ऐकून घेणें त्यास भाग पडेल. १९१८ सालीं निरुपाय होऊन हत्यार खालीं ठेवल्यावेळेपासून जर्मनीची जी दुर्दशा उडाली होती तींतून अवघ्या सहा वर्षांत जर्मनीनें पुनः डोकें वर काढलें, यापासून समान स्थितींतील राष्ट्रांनीं चांगलाच बोध घेण्याजोगा आहे.

---

# जर्मन गरुडाची भरारी २

[ १९२५ च्या मे महिन्यांत मार्शल हिंडेंबुर्ग हा जर्मन राष्ट्राचा अध्यक्ष निवडला गेला त्या वेळीं 'जर्मन गरुडाचे तोडलेले पंख पुनश्च फुटले' अशा शब्दांनीं जर्मनीच्या पुनरुत्थानाचें अभिनंदन करण्यांत आलें होतें. त्यानंतर दहा वर्षांनीं १९३५ च्या जानेवारींत सारप्रांत जर्मनीला परत मिळाला आणि जर्मनीच्या हृदयांतलें अपमानशल्य निघून 'जर्मन गरुड' धष्टपुष्ट होऊं लागला. त्यानंतर अवघ्या तीन वर्षांत जर्मनीनें व्हर्साइलच्या तहांतील ८० वें कलम झुगारून देऊन जबरदस्तीनें ऑस्ट्रियाचें राज्य आपल्या राज्यास जोडलें. जर्मन गरुडानें ही जी व्हिएन्नापर्यंत भरारी मारली तिचें वर्णन या लेखांत केलेलें आहे. ]

### इंग्लंडचा जर्मनीला प्रसन्न ठेवण्याचा यत्न

युरोपांत रोम, बर्लिन व मॉस्को हीं तीन राजकीय घडामोडींचीं मुख्य केंद्रें असून त्यांजकडें नजर लावून आपला नित्याचा व्यवहार पाहावा अशी युरोपांतील इतर लहानमोठ्या राष्ट्रांची दिनचर्या ठरली आहे. रशियापासून इटाली व जर्मनी यांना स्वतःचा बचाव करावयाचा आहे व जमल्यास रशियांतील समाजसत्ताक राज्यव्यवस्था रसातळास न्यावयाची आहे. आणि इंग्लंडपासून त्या दोन्ही राष्ट्रांना शक्य तितके फायदे घ्यावयाचे आहेत. उलटपक्षीं इंग्लंडला इटाली, जर्मनी व रशिया यांचा असंतोष घालवून त्यांना प्रसन्न ठेवावयाचें आहे. इंग्लंडच्या पक्षांत युरोपांतील महत्त्वाचा व खऱ्या विश्वासाचा देश फ्रान्स हा एकटाच आहे. पण

(केसरी, दि. १५ मार्च १९३८)

फ्रान्स आंतून इतका खिळखिळा व पोखरलेला आहे कीं त्याचीं मंत्रिमंडळें पत्त्याच्या घराप्रमाणें वाऱ्याच्या झुळकेसरशीं कोलमडून पडतात. गेल्या आठवड्यांत एम्. शॉटेम्स यांचें मंत्रिमंडळ सोशालिस्ट व कम्यूनिस्ट यांच्या विरोधापुढें असेंच कोलमडलें. अशा देशावर सर्वस्वी अवलंबून राहून इटाली व जर्मनी यांचें आपणां-बरोबर वितुष्ट वाढूं देणें इंग्लंडला धोक्याचें वाटत असल्यामुळें इंग्लंड हा इटाली व जर्मनी यांना प्रसन्न करून घेण्याच्या उद्योगास लागला आहे.

रोममध्यें दि. ८ रोजीं ब्रिटिश वकील लॉर्ड पर्थ व इटालियन परराष्ट्रमंत्री कौंट सियानो यांनीं एकत्र बसून एक तासपर्यंत मसलत केली. मसलतींत ॲबिसी-नियावरील इटालीच्या साम्राज्यास इंग्लंडनें मान्यता देण्याचा विषय निघाला. इटाली आपल्या ॲबिसीनियावरील साम्राज्यास युरोपांतील एकएका राष्ट्राची संमति मिळवीत चाललाच आहे. त्यानें अलीकडे धरलेलें सावज पोलंड हें होय. इटालीनें पोलंडची मान्यता आपल्या साम्राज्यास मिळविली असून रशियाविरुद्ध त्यास आपल्या पक्षांत सामील करून घेण्यासाठीं त्याजबरोबर त्याचे करारमदार सुरू आहेत. त्यानंतर बेल्जमनेंहि इटालीच्या साम्राज्याला संमति दिली आहे.

एक ब्रिटिश वकील रोममध्यें इटालियन परराष्ट्रमंत्र्याबरोबर खलबत करीत असतां बर्लिनमधील दुसरा ब्रिटिश वकील जर्मन मुत्सद्द्यांशीं वाटाघाटींत गुंतला होता. जर्मनी व इंग्लंड यांचें आज जर कशाविषयीं घासत असेल तर तें वसाहती-विषयीं होय. इंग्लंडनें आफ्रिकेंतील वसाहत जर्मनीपासून घेतली त्या वेळीं जी जगाची वांटणी दोस्त राष्ट्रांनीं आपसांत केली ती वांटणीहि आफ्रिकेंतील जर्मन वसाहत जर्मनीस परत देतांना बदलावी लागेल असें इंग्लंडतर्फे जर्मनीला सांगण्यांत आलें. परंतु ही सबब यापुढें न चालतां इंग्लंडला जर्मन वसाहत सोडावी लागेल असा डाव जर्मनीचा सर्वाधिकारी हर हिटलर मांडीत चालला आहे. हर हिटलर यांनीं गेल्या दोन-तीन दिवसांत ऑस्ट्रियांत जी गडबड उडवून दिली ती इतकी विस्मयकारक आहे कीं, तिजमुळें सारें जग चकित झालें आहे. ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर डॉ. शूस्निग हा थोड्या दिवसांपूर्वी जर्मनींत जाऊन हिटलरला भेटला होता. त्या भेटींत हिटलरनें शूस्निग यास ऑस्ट्रियाच्या मंत्रिमंडळांत व राज्यकारभारांत कांहीं नाझी पक्षीयांना घ्यावयास लावलें. त्याच वेळीं ऑस्ट्रियांत हळूहळू नाझीपक्षीयांची एकमुखी सत्ता स्थापन होण्याचीं चिन्हें दिसलीं. परंतु शूस्निग यास हा बनाव घडून यावयास नको होता. तरी पण हिट-लरला उघडपणें विरोध करण्याची शूस्निग याच्या अंगीं ताकद नव्हती म्हणून त्यानें ऑस्ट्रियांतील सर्व प्रौढांचें मत घेऊन या भानगडीचा निकाल लावण्याचें योजलें. मात्र त्याबरोबर मताधिकार फक्त चोवीस वर्षांवरच्या लोकांना असल्याचें जाहीर केलें.

## ऑस्ट्रियाला निर्वाणीचे खलिते

नाझी मताचे लोक साधारणपणें तरुण आहेत. त्यांच्यापैकीं कांहीं चोवीस वर्षांच्याहि आंत आहेत. त्यामुळें नाझी पक्षीयांत असंतोष माजला व मतदानाचा निकाल अखेर समाजसत्तावाद्यांना अनुकूल होईल असें वाटूं लागलें. डॉ. शूस्निग यास मनांतून नाझी अमलाऐवजीं समाजसत्ताक अंमलच हवा असा हिटलर यास दाट संशय आला. इकडे नाझीपक्षीयांचे ऑस्ट्रियांत दंगे सुरू होऊन पोलिसांनीं शेंकडों नाझींना अटकहि केली. हिटलरला आतां ऑस्ट्रियास भिवबून सोडण्यास मनगटाचा जोर एवढाच उपाय उरला. त्यानें आपला तोफखाना व सैन्य ऑस्ट्रियाच्या हद्दीवर आणून उभें केलें. त्या सैन्याच्या बळावर हिटलरनें ऑस्ट्रियाला दोन निर्वाणीचे खलिते पाठविले. पहिल्या खलित्यांत गेल्या रविवारीं व्हावयाची मतनोंदणी रहित करण्यांत यावी व डॉ. शूस्निग यानें राजिनामा द्यावा अशी मागणी होती. त्याप्रमाणें मतनोंदणी रहित झाली. पण शूस्निग यानें राजिनामा दिला नाहीं. म्हणून दुसरा निर्वाणीचा खलिता हिटलराकडून धडकला. त्यांत शूस्निग यास राजिनाम्यास फक्त दीड तासाचा अवधि देण्यांत आला. तेव्हां नाइलाजानें तो राजिनामा देऊन मोकळा झाला. त्याच्या जागीं चॅन्सेलर या नात्यानें हिटलरच्या सांगण्याप्रमाणें डॉ. सिसइनक्वार्ट याची नेमणूक झाली. शूस्निग याच्या पाठोपाठ ऑस्ट्रियाचा अध्यक्ष मिक्लास याचा राजिनामा आला. डॉ. सिसइनक्वार्ट हा हिटलरचा कट्टा पुरस्कर्ता आहे. त्यानें आपलें नवें मंत्रिमंडळ बनवून ऑस्ट्रियांत शांतता ठेवण्यासाठीं फौज पाठविण्यास हिटलर यास तारेनें कळविलें !

हिटलरला तार पोंचतांच दि. १० रोजीं रात्रीं १० वाजतां जर्मन सैन्य सरहद्द ओलांडून ऑस्ट्रियांत शिरलें. आतांपर्यंत दोन लक्ष जर्मन सैन्य व्हिएन्नाच्या आसपास जमलें आहे. त्यांत पायदळ, रिसाला व तोफखाना आहे. हर हिटलर ऑस्ट्रियाच्या हद्दींत लिंझ येथें विमानानें गेला असून जर्मन विमानें ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना याजवर घिरट्या घालीत आहेत. ऑस्ट्रियावर नाझी अंमल बसला व ऑस्ट्रियाचा ताबा जर्मन फौजेनें घेतला. याचा अर्थ असा कीं, ऑस्ट्रिया व जर्मनी यांची सांगड पक्की झाली. हिटलरला घडावयास पाहिजे होतें तें त्यानें अशा डावपेंचांनीं घडवून आणिलें. ऑस्ट्रियास जर्मनीनें आज अशी मगरमिठी मारली; उद्या झेकोस्लोव्हाकियासहि काबूंत आणल्याशिवाय तो राहणार नाहीं. कालच्यापेक्षां आज जर्मनीचें सामर्थ्य कितीतरी वाढलें आहे व आजच्यापेक्षां तें उद्यां आणखी किती तरी वाढणार आहे. पण झेकोस्लोव्हाकियाच्या वाटेस तो इतक्यांतच ज़ाईल असें वाटत नाहीं.

# महायुद्धाचा वणवा पेटला ३

[ म्युनिचच्या शरणागतीच्या स्वरूपाच्या करारानें १९३८ मध्यें जें युद्ध टळलें असें वाटलें होतें तें युद्ध अखेरीस भडकलेंच. १९३८ मध्यें सुडेटन प्रकरणांत इंग्लडनें हार खाऊन युद्ध टाळलें. १९३९ मध्यें पोलंडच्या मुलुखांतून पूर्व-प्रशियाला जोडणारा रस्ता आपणांस मिळावा अशी जर्मनीनें मागणी केली. परंतु या वेळीं इंग्लंडनें हार खाण्याचें नाकारलें आणि पोलंडच्या निमित्तानें महायुद्धाचा वणवा पेटला. युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी उभय राष्ट्रांत कोणत्या मुद्द्यांवर वाटाघाटी झाल्या आणि अखेरीस तडजोड फिसकटून इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्धाचा पुकारा कसा केला याचें सविस्तर वर्णन या लेखांत आहे.]

नाहीं, होय करतां करतां अखेरीस महायुद्धाचा वणवा पेटलाच. मागील अंकीं दर्शविल्याप्रमाणें दि. ३१ पर्यंत उत्तरें-प्रत्युत्तरें चालू होतीं आणि त्यांतून तडजोडीचा कांहीं तरी मार्ग निघणें अगदींच अशक्य नव्हतें. परंतु आधीं युद्धाची जय्यत तयारी आणि मग आयत्या वेळीं वाटाघाटीसाठीं धावपळ, असा प्रकार झाल्यानें तडजोडीची इच्छा कितपत खरी आहे, याची शंका वाटू लागून शाब्दिक उत्तरें-प्रत्युत्तरें बंद पडलीं आणि बॉंबगोळ्यांचीं उत्तरें-प्रत्युत्तरें सुरू झालीं !

तडजोड कोणत्या मुद्द्यावर व कोणत्या प्रकारानें होऊं शकेल याचें दिग्दर्शन गेल्या अंकाच्या अग्रलेखांत आम्हीं केलेंच होतें; आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, जर्मनीनें पोलंडला सुचविलेल्या ज्या अटी आतां प्रसिद्ध झाल्या आहेत त्या जवळ जवळ त्यासारख्याच आहेत. त्यांत फरक एवढाच आहे कीं, कॉरिडॉरचा प्रश्न मतमोजणीनें सोडवून घेण्यास जर्मनी तयार होता आणि ती मतमोजणी बारा महिन्यांनंतर व्हावी अशी जर्मनीची सूचना होती. जें राष्ट्र मतमोजणी मानावयाला व त्याकरितां एक वर्ष थांबण्याला तयार होतें त्याला मतमोजणीच्या निर्णयाविषयीं खात्री वाटत असावी असें मानून चालावयास हरकत नाहीं.

मतमोजणी आपल्याविरुद्ध गेली तर पूर्व-प्रशियाला जोडणारा नुसता रस्ता तरी मिळावा आणि त्या रस्त्याची रुंदी सुमारें पाऊण मैल असावी असेंहि जर्मनीचें मागणें होतें आणि मतमोजणी जर्मनीला अनुकूल झाल्यास पोलंडला तेवढ्याच रुंदीचा रस्ता गिडनिया बंदरापर्यंत देण्याला जर्मनी तयार होता. असें असतां ही तडजोड नाकारण्यांत आली याचें कारण एवढेंच दिसतें कीं, डॅंझिगवर

( केसरी, दि. ५ सप्टेंबर १९३९ )

आपला हक्क एकमतानें प्रस्थापित झाला आहे असें जर्मनी गृहीत धरून चालला होता आणि गिडनिया बंदर पोलंडला मोकळें सोडलें म्हणजे त्यांचे उभयतांचे समान हक्क प्रस्थापित झाले; मग इतर भागाबद्दलची मतमोजणी कोणालाहि अनुकूल वा प्रतिकूल होवो, अशी जर्मनीची भूमिका होती.

### इज्जतीचा प्रश्न आडवा आला

या वाटाघाटी गेल्या वर्षापासून चालू होत्या व त्यांना निश्चित स्वरूप गेल्या मार्च महिन्यांत आलें. परंतु पोलंडनें त्यास एकसारखा नकारच दिला. इंग्लंड व फ्रान्स या दोन प्रबळ राष्ट्रांचा पोलंडला पाठिंबा असल्यामुळें आणि इंग्लंडचे रशियाशीं तह घडवून आणण्याचे प्रयत्न त्या वेळेपासून चालूच असल्यामुळें पोलंडला अशी खात्री वाटत होती कीं, जर्मनीला डँझिग विभागच काय, पण एक तसूभरहि जागा न देतां झिडकारतां येईल आणि याच कल्पनेनें यापूर्वी पोलंडनें या संबंधांत बेफिकिरी दाखविली. परंतु जर्मनीनें इंग्लंडवर मात करुन रशियाशीं तहनामा केला आणि त्यामुळें पोलंडचा मोठा आधार तुटला. परिस्थिति अशा रीतीनें प्रतिकूल झाल्यावर पोलंडनें जर्मनीच्या पूर्वीच्या अटी स्वीकारण्याची तत्परता दर्शविली असती तर युद्धाची आपत्ति टळली असती. परंतु येथेंच इज्जतीचा प्रश्न आडवा आला. पोलंडनें या अटी मान्य केल्या असत्या तर त्याचा इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांच्या वचनावर विश्वास नाहीं असा त्याचा अर्थ झाला असता. इंग्लंडनें पोलंडला त्या अटी कबूल करण्याचा सल्ला दिला असता तर इंग्लंडनें विश्वासघात केला असें सगळ्या जगानें म्हटलें असतें आणि जर्मनीनें आपला आग्रह सोडला असता तर जर्मन राष्ट्राची नाचक्की झाली असती. अशा परिस्थितींत प्रत्येक राष्ट्राला हा आपल्या इज्जतीचा प्रश्न आहे असें वाटूं लागून माघार घेण्यास कोणीच तयार होईना आणि जो वाद तोंडाच्या शब्दानें मिटूं शकला असता तो वाद तोफा व बॉंबगोळे यांच्या गर्जनेनें तोडण्याचा अट्टाहास आतां सुरु झाला आहे.

### दिरंगाईचा प्रकार जर्मनीनें नाकारला

वाटाघाटीचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले असून देखील प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात करण्यापूर्वी एकदां अखेरची धावपळ होतेच; त्याप्रमाणें दिनांक २८, २९ व ३० ऑगस्ट असे तीन दिवस तारायंत्रद्वारें ही धावपळ चालूच होती व त्यामुळेंच इंग्लंडांतहि एक प्रकारचें अविश्वासाचें वातावरण निर्माण झालें होतें. या अखेरच्या प्रयत्नांत जर्मनीनें असा आग्रह धरला कीं, दि. ३० च्या संध्याकाळपर्यंत पोलंडचा वकील बर्लिनला येऊन दाखल व्हावा आणि त्याला तहनामा करण्याला अधिकारपत्र दिलेलें असावें. ही अट घालण्यांत जर्मनीचा हेतु उघडच असा होता कीं, एकदां वाटाघाट सुरू झाली म्हणजे पुनश्च त्यांत इतरांनीं 'बीच में मेरा चांदभाई'

म्हणून त्या वाटाघाटीला फांटे फोडूं नयेत. जो काय सोक्षमोक्ष व्हावयाचा असेल तो तेथल्या तेथें त्या बैठकींत व्हावा. परंतु पूर्वी ऑस्ट्रियाशीं व नंतर झेकोस्लोव्हाकियाशीं जर्मनीनें कसे करारमदार करून घेतले याची आठवण पोलंडला ताजी असल्यानें पोलंडला ही अट अमान्य झाली. इंग्लंडनें जर्मनीला कळविलें कीं, राष्ट्राराष्ट्रांत नेहमीं जशीं वकिलामार्फत बोलणींचालणीं होतात तसेंच हेंहि बोलणें चालावें. बर्लिनमध्यें पोलंडचा वकील आहे तो जर्मनीच्या अटी ऐकून घेईल व त्या आपल्या सरकारला कळवील; त्यावर पोलंड आपल्या मित्रराष्ट्रांचा सल्ला घेऊन आपलें उत्तर जर्मनीकडे पाठवील; त्यावर जर्मनीचें प्रत्युत्तर आल्यास त्याचीहि अशीच चिकित्सा होईल. असला हा दिरंगाईचा प्रकार जर्मनीनें नाकारला; कारण, गेल्या मार्च महिन्यांत असल्या वाटाघाटी होऊन त्यांतून काय निष्पन्न होतें तें कळून चुकलेंच होतें. तशीच चालढकल यापुढें चालू देण्यास जर्मनी तयार नव्हता आणि पोलंडहि निश्चितपणें पूर्वीपेक्षां आपण एवढ्या अधिक अटी मान्य करतों असें सांगण्याला तयार नव्हता. त्यामुळें दि. ३० ऑगस्टच्या संध्याकाळपर्यंत पोलंडचा अधिकृत असा वकील येऊन दाखल न झाल्यानें जर्मनीनें दि. ३१ पासून युद्धाच्या दृष्टीनें हालचाल सुरू केली आणि दि. १ ला डँझिग आपल्या राज्यांत सामील केल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करून युद्धाचा श्रीगणेशाय नमः केला.

इंग्लंड आणि फ्रान्स यांचें पोलंडला पूर्ण पाठबळ असल्यानें हेर हिटलर हा अखेरचा फांसा टाकण्याला कचरेल अशी इंग्लंडची समजूत होती असें दिसतें. त्याकरितांच इंग्लंडनें आपला स्वतःचा निश्चय कांहींच जाहीर न करतां दि. ५ पर्यंत पार्लमेंटची बैठक तहकूब केली होती. परंतु हेर हिटलरनें पोलंडमध्यें घुसण्याचें धाष्टर्य केलें आणि बॉंब फेकणारीं विमानें वार्सावर घिरट्याहि घालूं लागलीं, तेव्हां मग इंग्लंडनें आणखी खलिता पाठविला कीं, जर्मनीनें पोलंडमध्यें घुसलेलें सैन्य परत बोलवावें आणि वाटाघाटीला तयार व्हावें ! युद्धासाठीं सैन्याची जमवाजमव होण्यापूर्वीच्या शांत वातावरणांत देखील तडजोडीच्या ज्या अटी फेटाळल्या गेल्या त्या अटी, उभय पक्षांचीं विमानदळें एकमेकांवर आगीचा वर्षाव करूं लागल्यानंतर मान्य केल्या जातील असें मानणें हें कल्पनाशक्तीला कल्पनातीत ताण देणेंच होय. अशा अटी अशा वेळीं सुचविणारांच्या मनाला त्याचा फोलपणा कळलेला असतोच; परंतु जनलज्जेसाठीं असले देखावे चालू असतात.

### समस्यापूर्ति करावी लागेल

असो; युद्धाला प्रारंभ झाल्यानंतरचा हा तडजोडीचा प्रयत्न निष्फळ ठरल्यावर इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्धाचा पुकार केला आणि फ्रान्सनेंहि त्याचीच साथ केली. अशा रीतीनें पोलिश-जर्मन युद्धाला व्यापक स्वरूप प्राप्त झालें. अद्यापि इटाली या युद्धांत पडला नसल्यानें युद्धाला जगड्व्याळ स्वरूप प्राप्त

झालें नाहीं; तथापि युद्धाची व्याप्ति वाढल्याशिवाय राहणार नाहीं. यापुढें या युद्धाचा रागरंग कसा काय बनत जातो त्याची चर्चा पुढील अंकापासून क्रमशः येईलच. पण यांत वाचकांना एक इषारा देऊन ठेवणें जरूर आहे. तो हाच कीं, युद्ध सुरू झाल्यानें आतां यापुढें ज्या परदेशाच्या बातम्या इकडे येतील त्या सेन्सॉरकडून पास होतील तेव्हांच मिळावयाच्या. याकरितां युद्ध-वार्ता वाचतांना शब्द सोडलेल्या धड्याप्रमाणें त्या चाचपडतच वाचाव्या लागतील आणि स्वतःच्या तर्कानेंच कित्येक ठिकाणीं समस्यापूर्ति करावी लागेल.

### प्रतियोगी सहकारितेचें उत्तर

असो; आतां महायुद्धाला सुरुवात झाल्यामुळें सरकारालाहि एक सूचना करणें प्राप्त आहे. या महायुद्धांत हिंदुस्थाननें आपणास सर्वतोपरी साहाय्य करावें अशी इंग्लंडची अपेक्षा असणारच व व्हाइसरॉयांनीं आपल्या संदेशद्वारा ती जाहीरहि केली आहे. पण सरकार स्वतःचें कर्तव्य तेवढें विसरतें आणि जनतेकडून मात्र कर्तव्यपूर्तीची अपेक्षा करतें हें उचित नव्हे. सरकारनें सर्व हिंदी पुढाऱ्यांस विश्वासांत घेऊन त्यांच्या आकांक्षा समजून घ्याव्या आणि ज्या रास्त व राष्ट्रीय स्वरूपाच्या आकांक्षा असतील त्या पूर्ण कराव्या. पूर्वीच्या महायुद्धाच्या वेळीं राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं सहकारितेकरिता पुढें केलेला हात सरकारनें झिडकारून राष्ट्राचा अपमान केला आणि युद्ध संपतांच रौलेट ॲक्ट पास करून आणि जालियनवाला बागेंत कत्तल करून आपल्या कृतघ्नतेचें व आसुरी वृत्तीचें प्रदर्शन केलें. त्यामुळें त्या वेळेपासून सरकारविषयीं प्रजेच्या मनांत साशंक वृत्ति नांदत आहे. ती दूर करावयाची असल्यास पूर्वीच्या अधिकाऱ्यांनीं केलेल्या चुकांचें परिमार्जन हल्लींच्या अधिकाऱ्यांनीं आधीं केलें पाहिजे. तशी सहकारितेची वृत्ति सध्याचे व्हाइसरॉय कृतीनें दर्शवितील आणि राष्ट्राच्या आकांक्षा पूर्ण करतील तर जनतेची साशंक वृत्ति दूर होऊन हिंदी राष्ट्राकडूनहि त्यास प्रतियोगी सहकारितेचें उत्तर मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

---

## इटालीनें आगींत तेल ओतलें ४

[ महायुद्धाला प्रारंभ होऊन नऊ महिनें होईपर्यंत इटाली तटस्थ होता. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं देखील प्रारंभीं इटाली तटस्थ होता, पण मागाहून तो दोस्त राष्ट्रांना मिळाला. दुसऱ्या महायुद्धांत इटाली दोस्तांच्या बाजूला मिळणें अशक्य होतें. तरी पण तो जर्मनीला न मिळतां तटस्थ राहू शकला असता.

( केसरी, दि. १४ जून १९४० )

इटाली जर तटस्थ राहिला असतां तर महायुद्धाची आग युरोपच्या बाहेर पसरली नसती. परंतु जर्मनीला फ्रान्स देशांत जो अपूर्व विजय मिळाला त्यानें इटालीच्या तोंडाला पाणी सुटून आणि जर्मनीच्या रणकौशल्यानें भाळून जाऊन इटालीनें महायुद्धांत जर्मनीच्या बाजूनें उडी घेतली. यामुळें महायुद्धाच्या आगींत तेल ओतल्याप्रमाणें होऊन ती आग आतां आफ्रिकेंत व आशिया खंडांतहि पसरेल हें ओळखून त्यासंबंधाचें विवेचन या लेखांत केलेलें आहे. ]

## इटालीची जर्मनीशीं गट्टी जमली

महायुद्धाचा वणवा पेटून नऊ महिने झाले. एवढ्या काळांत ही आग पसरविण्याची कामगिरी रशिया व जर्मनी या दोन देशांकडून होत आली आणि पोलंड, फिनलंड, नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड व बेल्जम इतक्या देशांच्या आहुत्या त्या आगींत आतांपर्यंत पडल्या असून फ्रान्सवरहि मोठी आणीबाणीची वेळ आली आहे. अशा ऐनप्रसंगीं इटालीनें फ्रान्स व इंग्लंड यांच्याविरुद्ध युद्ध जाहीर करून महायुद्धाच्या आगींत तेल ओतण्याचें आसुरी कृत्य केलें आणि ही आग नुसत्या युरोप खंडांतच नव्हे तर आफ्रिका व आशिया खंडांतहि पसरविण्याचा मार्ग मोकळा करून दिला.

पूर्वीच्या महायुद्धाच्या प्रसंगीं इटाली हा ऑस्ट्रो-जर्मन गट्टींतून फुटून दोस्त राष्ट्रांना मिळाला होता. परंतु युद्धसमाप्तीनंतर जर्मनीच्या व ऑस्ट्रियाच्या साम्राज्याची जी विल्हेवाट लावण्यांत आली-तींत इटालीला कांहींच लाभ झाला नाहीं. हें शल्य त्याच्या मनांत टोंचत असल्यामुळें इटाली हा दोस्तांच्या गटांतून फुटून विमनस्क तटस्थ असा वागूं लागला. त्यानंतर इटालीवर कम्यूनिझमचें अरिष्ट कोसळत असल्याचें पाहून मुसोलिनीनें सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली; आणि इटालींत फॅसिस्ट पद्धतीचा अंमल सुरू झाला. तिकडे जर्मनींतहि अशाच अनेक अंतस्थ भानगडीनंतर कम्यूनिझमचें संकट टाळण्यासाठीं आणि राष्ट्रीयत्वाचें दृढीकरण करून जर्मन राष्ट्राला बलसंपन्न करण्यासाठीं नाझीझमचा पुरस्कर्ता हिटलर हा पुढें आला व सर्व सत्ता त्यानें बळकावली. त्या वेळेपासून 'समानशीले व्यसनेषु सख्यं' या न्यायानें हिटलर व मुसोलिनी यांची दोस्ती जमली आणि जर्मनी व इटाली हे दोनहि देश एकमेकांच्या तंत्रानें वागूं लागले.

इतका स्नेह जुळला तरी जर्मनी महायुद्धांत उडी घेईल तर इटालीहि त्याच्या पाठोपाठ त्या खाईंत उडी टाकील असा कोणासच भरंवसा वाटत नव्हता. एक तर इटालियन लोकांची चंचल व बेभरंवशाची वृत्ति सर्वश्रुत आहेच. पण त्याशिवाय मुख्य कारण हें होतें कीं, महायुद्धांत आपण सामील झालों तर आपल्या ताब्यांतील मुलखावर दोस्त राष्ट्रांकडून चोहोंबाजूंनीं चढाई होण्यासारखी आहे

याची पूर्ण जाणीव इटालीला होती. जर्मनीनें पोलंडपासून हॉलंडपर्यंतच्या अनेक देशांवर झडप घातली तरी दोस्त राष्ट्रांना प्रत्यक्ष जर्मनीवर चाल करून जाण्याला मोकळा रस्ता मिळण्यासारखा नव्हता आणि इटाली तटस्थ राहिल्यानें जर्मनीच्या भोंवतालची कोंडी पूर्ण होऊं शकत नव्हती, हा एक प्रकारें जर्मनीला मोठा फायदाच होता. यामुळें इटालीला युद्धांत ओढण्याचा दुराग्रह जर्मनी धरणार नाहीं असें वाटत होतें. त्याचप्रमाणें नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड या देशांवर जर्मनीनें झडप घातली तरी दोस्तांच्या प्रत्यक्ष हल्ल्यापासून जर्मनी सुरक्षितच राहिला असल्यामुळें ती सुरक्षितता सोडून दोस्तांना प्रत्यक्ष अंगावर घेण्याचें धाडस जर्मनी करणार नाहीं, अर्थातच बेल्जमवर जर्मनी स्वारी करणार नाहीं, असाहि तर्क होता. पण जर्मनीनें बेल्जमवर स्वारी करून दोस्तांशीं उघड्या रणांगणांत झुंज सुरू करण्याचें धाडस तर केलेंच. पण आतां इटालीलाहि युद्धांत ओढून आपली बाजू दोस्त राष्ट्रांच्या माऱ्याला मोकळी करून देण्याचा धाडसी अतिरेकहि केला असें सकृद्दर्शनीं दिसतें. हें खरें असल्यास अशा रीतीनें महायुद्धाचा डोंबाळा अधिकाधिक पेटविण्याला जर्मनी कां प्रवृत्त झाला हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

### साहसे श्रीः प्रतिवसति

ज्याचा आपल्या राष्ट्राच्या पराक्रमी शक्तीवर पूर्ण भरवंसा नाहीं व ज्याच्या अंगांत खुमखुमी नाहीं, त्याला केवळ बचावाचें धोरण इष्ट वाटतें; एवढेंच नव्हे तर, श्रेयस्करहि असतें. परंतु जर्मनीचा आत्मविश्वास दांडगा आणि त्यापेक्षां त्याच्या रगेलपणाचा अतिरेक झालेला. यामुळें नुसता बचाव करीत बसून लढाईचा डाव कुचंबत ठेवणें जर्मनीला पटलें नसावें. शिवाय असा डाव कुचंबत ठेवल्यास दोस्त राष्ट्रांना तेवढें सगळें जग उलाढाली करण्यास मोकळें सांपडणार आणि जर्मनी तेवढा पिंजऱ्यांत अडकल्याप्रमाणें होऊन राहणार, याचा नैतिक परिणाम जर्मन राष्ट्रावर अनिष्ट होईल आणि अखेरीस अशा कुचंबणेला कंटाळून नामुष्की पत्करूनहि तह करावा लागेल अशी जर्मनीला धास्ती वाटली असावी. एकीकडे कुचंबणा व तिचे आनुषंगिक अनिष्ट परिणाम आणि दुसरीकडे धाडस केलें व तें अंगलट आलें तर समूळ नाश होण्याची शक्यता या दोहोंतून कोणतें संकट पत्करावें याचा काथ्याकूट होऊन जर्मनीनें बचावाचा पण कुचंबणेचा मार्ग त्याज्य ठरवून चढाईचा व साहसाचा खडतर मार्ग उघड्या डोळ्यांनीं पत्करला. बेल्जममध्यें घुसून बेल्जम, इंग्लंड, फ्रान्स अशा तीन लढवय्या राष्ट्रांच्या अपरंपार सैन्याला उघड आव्हान देणें हें अत्यंत साहसाचें आणि पराकाष्ठेच्या धोक्याचें काम होतें. परंतु 'साहसे श्रीः प्रतिवसति' हें ब्रीदवाक्य डोळ्यापुढें ठेवून राष्ट्राचा प्राण पणाला लावून जर्मनीनें आगींत उडी घेतली. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, बेल्जममध्यें तीन राष्ट्रांच्या सैन्याशीं झुंजून एका राष्ट्राला शरण यावयाला लावून

आणि दुसऱ्या दोन राष्ट्रांच्या सैन्यांना 'दे माय धरणी ठाय' असें म्हणावयास लावून पॅरीसच्या जवळपर्यंत मुसंडी मारली.

यावरून जर्मनीचा जबर आत्मविश्वास अनाठायीं नव्हता आणि जर्मनीची लढण्याची तयारी जबर होती आणि त्या मानानें दोस्त राष्ट्रांच्या तयारींत ढिलाई दिसून आली, एवढेंच सिद्ध झालें. याचा अर्थ असा नव्हे कीं, जर्मनी जगांतील सर्व राष्ट्रांविरुद्ध एकटा लढूं शकेल. म्हणून आतापर्यंत मिळालेल्या जयानें चढून जाऊन जर्मनी बेफामपणें वाटेल त्या राष्ट्राला आव्हान देऊं लागला आहे, असें समजणें चुकीचें ठरेल. एकटा फ्रान्स देश जिंकणें हें देखील केवढें दुर्घट काम आहे, याची जाणीव जर्मनीला आहे. तरी पण युद्धांतील चढाईच्या धोरणाचा अत्यावश्यक भाग समजूनच जर्मनीनें आपलें २० लाख सैन्य फ्रान्समध्यें गुंतविलें आहे आणि 'मारूं किंवा मरूं' अशा निकरानें फ्रान्सशीं त्यानें संग्राम चालविला आहे.

### जर्मनीनें इटालीस युद्धांत ओढलें नाहीं

अशा प्राणघातक संग्रामांत जर्मनी गुंतला असतां याच वेळीं इटाली युद्धांत कां पडला, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. इटाली युद्धांत पडल्यानें फ्रान्सला दुहेरी शह बसून त्याची स्थिति अधिक केविलवाणी होईल आणि जर्मनीला फ्रान्सची फळी फोडून पॅरीसच्या दक्षिणेकडच्या मुलुखांत घुसण सुलभ होईल हें खरें. पण इटालीनें युद्धांत भाग घेतल्यानें इटालीच्या ताब्यांतील मुलुखांवर अनेक बाजूंनीं हल्ला करण्याची वाट दोस्त राष्ट्रांना मोकळी होणार आणि इटालीच्या तटस्थपणामुळें व्यापाराच्या दृष्टीनें जर्मनीला जो फायदा मिळत होता, तोहि बुडणार. या दृष्टीनें विचार केल्यास, इटाली युद्धांत सामील झाल्यामुळें जर्मनीला जो फायदा वाटत आहे, त्याच्यापेक्षां अधिक पटींनीं जर्मनीला नुकसान पोंचणार आहे. असें असतां जर्मनीनें ही धोंड गळ्यांत कां अडकवून घेतली ?

पूर्वींच्या महायुद्धांत ऑस्ट्रियासारखें दुर्बळ व बिनतयारीचें राष्ट्र जर्मनीच्या बाजूला असल्यामुळें जर्मनीचें एकंदरींत नुकसानच झालें. पण त्या वेळीं युद्धाचा उगमच ऑस्ट्रियांतून झाला असल्यामुळें ऑस्ट्रियाची धोंड जर्मनीनें आपल्या गळ्यांत कां बांधून घेतली, असा प्रश्नच विचारतां येण्यासारखा नव्हता. ऑस्ट्रियाला युद्धाला निमित्तमात्र पुढें करून जर्मनीनें आपला साम्राज्यवृद्धीचा डाव टाकून पाहिला. तशी स्थिति या वेळीं नाहीं. युद्धाच्या सुरुवातीच्या कारणाशीं इटालीचा कांहीं संबंध नव्हता आणि आतांपर्यंत युद्धाचे रागरंग अनेक प्रकारें पालटले तरी इटालीनें युद्धांत पडलेंच पाहिजे अशी कोणतीहि परिस्थिति उद्भवली नव्हती. अर्थातच इटालीनें युद्धांत भाग घेणें हें केवळ इटालीच्या मनोदयावर अवलंबून होतें. असें असतां जर्मनीनें स्वार्थासाठीं इटालीला या युद्धांत बळेंच ओढलें, अशी जी कित्येकांची समजूत आहे ती चुकीची आहे. इटाली युद्धांत आल्यानें जर्मनीला

नगर वाचनालय सातारा
संग्रहालय



कांहीं कांहीं बाबतींत तात्पुरता लाभ झाल्याचें दिसून आलें, तरी एकंदरींत पाहतां इटालीच्या सहकार्यामुळें जर्मनीला नुकसानच पोंचणार आहे.

इज्जतीच्या दृष्टीनें अगदीं पहिली आपत्ति जर्मनीवरहि ओढवेल कीं, आतांपर्यंत दोस्तांना कोठेंहि जर्मनीवर आक्रमण करण्याला व त्याचा पराभव करण्याला जी संधि मिळाली नव्हती ती इटालीच्या युद्धांत पडण्यानें मिळणार आहे. इटालीच्या इतस्ततः पसरलेल्या प्रदेशांवर कोठेंहि हल्ला करून तो मुलूख दोस्तांना पादाक्रान्त करतां येईल आणि तेवढ्या जयाची घोषणा करून आपल्या राष्ट्रांतील जनतेची विषण्ण झालेलीं मनें प्रफुल्लित करतां येतील आणि जर्मन लोकांना हिणवितां येईल. युद्धशास्त्रदृष्ट्या याचा विशेष परिणाम न झाला तरी मानसशास्त्रदृष्ट्या याचा मोठा परिणाम होणार आहे. ही केवळ तात्त्विक बाजू झाली. याशिवाय दोस्तांचें आरमार भूमध्य समुद्रांत बलाढ्य असल्यानें प्रत्यक्ष इटालीवर हल्ला व आक्रमण होणें शक्य आहे. रणसामुग्रीची नाकेबंदी तर अधिक कडक होईल व तिचा परिणाम इटालीला तर जाणवेलच, पण जर्मनीलाहि तो जाणवल्याशिवाय राहणार नाहीं. आफ्रिकेंतील जर्मन वसाहतींची पूर्वीच्या युद्धांत जी स्थिति झाली तशीच स्थिति या युद्धांत इटालीच्या वसाहतींची होणें संभवनीय आहे.

### मुसोलिनीनें स्वार्थी महत्त्वाकांक्षेनें उडी घेतली

अशा सर्व गोष्टींचा विचार केला असतां जर्मनीनें इटालीला या युद्धांत ओढलें काय, याचें उत्तर नकारार्थीच द्यावें लागतें. वस्तुस्थिति अशी दिसते कीं, हिटलरच्या आग्रहानें मुसोलिनी या युद्धांत पडला नसून इटालीनें या युद्धांत पडूं नये असा त्याचा सल्ला लाथाडून मुसोलिनी या युद्धांत, इटालीच्या फायद्यासाठीं म्हणून, दुराग्रहानें सामील झाला असावा. महायुद्धाच्या आरंभीं जर्मनीची भूमिका अशी होती कीं, रशिया, इटाली, हंगेरी प्रभृति राष्ट्रांनीं जर्मनीविषयीं सहानुभूति दाखवावी, पण तटस्थ राहावें आणि जर्मनीलाच आपलें युद्ध लढूं द्यावें. रशियानें ही भूमिका स्वार्थप्रेरित होऊन आपण होऊन सोडली, जर्मनी अगदीं अल्प काळांत सहजासहजीं पोलंड जिंकू शकतो असें पाहिल्यावर रशियाला स्वस्थ बसवेना. जर्मनीनें पोलंड जिंकल्यावर त्यापासून रशियाला कांहीं तरी लाभ मिळण्याचा करार उभय राष्ट्रांत पूर्वीच झाला असेल. पण प्रत्यक्ष युद्धांत सामील झाल्यानें त्यापेक्षां अधिक लाभ होईल, हें ओळखून रशियानें दुसरीकडून पोलंडवर अकल्पित हल्ला केला आणि पूर्वीच्या करारापेक्षां आपल्या पदरांत अधिक प्रदेश पाडून घेतला. पण रशियासारखें बलाढ्य राष्ट्र युद्धांत सामील झाल्यानें जर्मनीची बाजू कमकुवत न होतां उलट अधिक मजबूत झाली. इटाली युद्धांत सामील होत आहे यांतलाहि हेतु रशियासारखाच आहे. जर्मनीनें पोलंडपासून पांच देश पादाक्रान्त केले आणि इटालीच्या अगदीं शेजारच्या भूमध्य समुद्रांत बंदरें असलेला असा फ्रान्स देशहि

व्यापण्याचें त्याचें कारस्थान यशस्वी होत आलें, असें पाहतांच मुसोलिनीला स्वस्थ बसवेना. एकट्या जर्मनीनें फ्रान्सचें आक्रमण केल्यास इटालीला भूमध्य समुद्रावर जो ताबा गाजवावयाचा आहे, त्यांत वैगुण्य येईल, हें समजण्याइतका मुसोलिनी धूर्त आहे आणि हिटलरच्याइतका नसला तरी थोडा तरी पराक्रम आपण गाजविला पाहिजे अशी हाव धरण्याइतका तो महत्त्वाकांक्षीहि आहे. यामुळें स्वार्थाच्या व महत्त्वाकांक्षेच्या नादीं लागून मुसोलिनीनें युद्धांत भाग घेण्याचें ठरविलें असावें. हिटलरनें मुसोलिनीला लढाई पुकारण्याविषयीं आग्रह केला असणें संभवनीय दिसत नसून, युद्धांत सामील न होण्याचा आग्रह धरला असेल. परंतु जर्मनीचा आतां-पर्यंतचा अचाट पराक्रम आणि फ्रान्सची झालेली केविलवाणी स्थिति या दोहोंचा जबरदस्त परिणाम होऊन मुसोलिनीनें रणशिंग फुंकलें असावें.

### फांसा उलट पडतो का सुलट पडतो पाहावें

वरील विवेचन लक्षांत घेतल्यास युद्धाचा यापुढील रागरंग कसा बनत जाईल, याचा अंदाज करतां येतो. इटाली युद्धांत पडतांच अमेरिका लढाईंत सामील होईल अशी आशा वाटत होती. तूर्त अमेरिकेनें दोस्त राष्ट्रांना लागेल तितकी रणसामुग्री उघडपणें पुरविण्याचें जाहीर केलें आहे, पण स्वतः इटालीविरुद्ध प्रत्यक्ष लढाई सुरू केली नाहीं! अमेरिकेचें हें मर्म मुसोलिनीनें आगाऊ ताडलें असावें आणि म्हणूनच त्याच्या हातून युद्धांत पडण्याचें साहस झालें असेल. इटाली युद्धांत आला कीं, बाल्कन राष्ट्रांत हालचाल सुरू होईल असेंहि भाकीत करण्यांत येत होतें; पण अद्यापि तेंहि खरें ठरण्याचा संभव दिसत नाहीं. अमेरिकेचें मर्म मुसोलिनीला जितकें लवकर ताडतां येईल त्यापेक्षां बाल्कन राष्ट्रांची नाडी त्याला अधिक लवकर जाणतां येईल. यावरून असेंहि अनुमान काढावेसें वाटतें कीं, बाल्कन राष्ट्रांचाहि रागरंग ताडून मगच इटालीनें हें पाऊल पुढें टाकलें असावें. बाल्कन राष्ट्रें जर पूर्णपणें तटस्थ राहतील तर इटालीला तितका धोका कमी वाटेल. तथापि कांहीं झालें तरी जर्मनीला ज्याप्रमाणें, स्वतःचा दोस्तांच्या हल्ल्यापासून बचाव करून, दोस्त राष्ट्रांवर व तटस्थ राष्ट्रांवर वाटेल तेव्हां झडप घालण्याची युद्धशास्त्रदृष्ट्या सोय होती, तशी सोय इटालीला नसून, त्या बाबतींत इटालीची स्थिति जर्मनीच्या अगदीं उलट आहे. दोस्त राष्ट्रें इटालीवर अनेक बाजूंनीं आपल्या सोयीप्रमाणें काळवेळ पाहून हल्ला करू शकतील आणि स्वतः जर्मनी जोंपर्यंत फ्रान्समधील भयानक रणसंग्रामांत पुरेपूर गुंतला आहे, तोंपर्यंत जर्मनी इटालीला हातभार लावूं शकणार नाहीं आणि असा हातभार लावण्याला जर्मनी मोकळा होण्याच्या आंत दोस्त राष्ट्रांनीं जर इटालीचीं हाडें खिळखिळीं केलीं तर इटालीची धडगत रहाणार नाहीं आणि मग जर्मनीलाहि संकटच येऊन पडेल. परंतु जर्मनीनें फ्रान्सच्या आक्रमणाचें कार्य त्वरित आटोपलें आणि

तोंपर्यंत इटाली इतर भागांत कसाबसा टिकून राहिला, तर मागाहून इटालीला साहाय्य करण्याला जर्मनी मोकळा होईल आणि मग इटालीला आज जो पेंच पडलेला दिसत आहे, त्या पेंचांतून इटाली सुटून, उलट दोस्तांवरच पुनश्च अमेरिका, बाल्कन राष्ट्रें किंवा रशिया यांची मनधरणी करण्याचा प्रसंग येईल. अशा रीतीनें फांसा उलट पडणें किंवा सुलट पडणें हें फ्रान्समधील लढाईच्या परिणामावर व कालावधीवर अवलंबून आहे.

---

## फ्रान्सच्या शरणागतीची मीमांसा ५

[ पराभूत फ्रान्सनें विजयी जर्मनीपुढें लोटांगण घालून शरणागति पत्करली आणि जर्मनीच्या कृपाकटाक्षाखालीं चालणारी नवी राज्यघटना करून आपला अर्धामुर्धा जीव कसाबसा वांचविला. अशी विपन्नावस्था फ्रान्सला कां प्राप्त झाली याची मीमांसा या लेखांत आहे. ]

### त्यागी वृत्ति सुटल्याचा हा परिणाम

फ्रान्ससारखें एका काळचें कर्दनकाळ असें राष्ट्र, गेल्या महायुद्धांतल्याप्रमाणें चिकाटी न धरतां या महायुद्धांत इतक्या लवकर हातटेंकीस आलें आणि त्या राष्ट्राच्या सर्वाधिकाऱ्यांनीं जर्मनीला व इटालीला जवळ जवळ कोरा चेकच लिहून देऊन शरणागति पत्करली. हा बनाव अत्यंत खेदजनक असून त्याचे परिणाम अतिशय दूरवर पोंचणारे आहेत, यास्तव त्याची मीमांसा होणें जरूर आहे.

मार्शल पेतॉं यांनीं शस्त्रसंन्यास करण्याचें ज्या वेळीं मनांत योजिलें त्या वेळीं परिस्थिति किती अवघड होती, याची रूपरेषा स्वतः मार्शल पेतॉं यांनीं पुढीलप्रमाणें वर्णिली. "फारच थोडीं मुलें, फारच थोडीं शस्त्रास्त्रें व फारच थोडे दोस्त हें आमच्या पराभवाचें कारण आहे. १९१८ सालीं आमच्या राष्ट्राला विजय मिळाला तेव्हांपासून त्यागाच्या वृत्तीपेक्षां सुखोपभोगाच्या वृत्तीला आमचे लोक जास्त मान देत आले आहेत. लोकांनीं त्याग थोडा केला व मागण्या मात्र पुष्कळ मागितल्या. श्रम टाळण्याकडेच लोकांचा कल वाढत चालला आहे."

फ्रान्स देशांतील एकंदर परिस्थिति किती बिघडली आहे याचें हें अगदीं हुबेहूब चित्र रेखाटलें गेलें आहे यांत शंका नाहीं. तथापि मुख्य मुद्द्याचा प्रश्न हा

---

(केसरी, दि. २८ जून १९४०)

आहे कीं, अशी परिस्थिति कशामुळें आली ? लोकसंख्या इतकी कां घटली, चैनीची इतकी चटक कां लागली, शस्त्रास्त्रांचा व इतर रणसाहित्याचा पुरवठा इतका कमी कां पडला, पूर्वीच्या युद्धांतले फ्रान्सचे कांहीं दोस्त यावेळीं तटस्थ कां राहिले अथवा उलट फ्रान्सच्या जिवावरच कां उलटले इत्यादि प्रश्नांची साधक-बाधक चर्चा होणें समाजहितदृष्ट्या आवश्यक आहे. दोस्तांची संख्या कां घटली हा जो या प्रश्न-मालिकेंतला शेवटचा प्रश्न आहे तो केवळ राजकीय स्वरूपाचा असून फारच गुंतागुंतीचा आहे, यास्तव त्याची चर्चा तूर्त बाजूस ठेवून पहिल्या तीन प्रश्नांचाच ऊहापोह करूं.

घोडा कां अडला, पानें कां कुजलीं, भाकरी कां करपली या तीनहि प्रश्नांचें 'न फिरविल्यामुळें' हें जसें एकच उत्तर देतां येतें, तसेंच वरील तीनहि प्रश्नांचें एकच उत्तर देतां येईल व तें उत्तर हेंच कीं, त्यागापेक्षां भोगाकडे, कर्तव्यापेक्षां हक्काकडे आणि समाजहितापेक्षां वैयक्तिक स्वातंत्र्याकडे लक्ष लागल्याचा हा दुष्परिणाम आहे. युद्धांत एखाद्या राष्ट्राचा पराजय झाला, कुस्तींत एखादा पहेलवान हरला, किंवा परीक्षेंत एखादा विद्यार्थी नापास झाला म्हणजे मागाहून त्या पराजयाची मीमांसा करणें सोपें असतें व तशी मीमांसा करण्यास जो तो अहमहमिकेनें पुढें येतो. पण आमची ही मीमांसा पश्चात् बुद्धीच्या स्वरूपाची नाहीं. गेल्या एकदोन वर्षांत केसरींत परराष्ट्रीय राजकारणावर जे अनेक लेख प्रकाशित झाले व जे लेख '**लढाऊ राजकारण**' या पुस्तकांत एकत्र ग्रथित झाले आहेत त्या लेखांतून त्या वेळींच या प्रश्नांचा ऊहापोह झाला आहे. ता. १४ ऑक्टोबर १९३८ च्या 'जर्मनीचा अभूतपूर्व विजय' या लेखांत जर्मनींतील लोकसंख्येची वाढ आणि फ्रान्स व इंग्लंड यांतील लोकसंख्येची घट होत चालल्यामुळें इंग्लंड आणि फ्रान्स या राष्ट्रांचें महत्त्व युरोपांत कसें कमी होत चाललें आहे याचें दिग्दर्शन केलें होतें. मार्शल पेताँ म्हणतात त्याप्रमाणें त्याग आणि कष्ट करणें याची संवय सुटून सुखोपभोगाची लालसा वाढत चालली आणि चैनीची चटक लागली कीं, समाजाच्या आणि राष्ट्राच्या हिताकडे दुर्लक्ष होऊन कृत्रिम संततिनियमना-सारखीं खुळें बोकाळतात आणि मग शत्रूशीं लढण्याचा प्रसंग आल्यावर संतति कमी म्हणून लष्करांत भरती कमी, आणि सैनिकांची संख्या कमी म्हणून राष्ट्राचें रक्षण करण्याची शक्ति कमी, अशी आपत्तीची परंपरा ओढवते; आणि शत्रूला शरण जाण्याची पाळी येते.

पूर्वीच्या महायुद्धांतल्यापेक्षां चालू महायुद्धांत फ्रान्समध्यें लढणाऱ्या शिपायांची संख्या किती कमी होती याचें आंकडे मार्शल पेताँ यांनींच जाहीर केले आहेत. पूर्वीच्या महायुद्धांत तीन वर्षें भयंकर मनुष्यसंहार झाल्यानंतर देखील फ्रान्समध्यें ३२ लक्ष ८० हजार सैनिक खडे होते. चालू महायुद्धांत युद्धारंभींच फ्रान्सचें लष्कर

नगर वाचनालय, सातारा.



मागील खेपेपेक्षां ५ लक्षांनीं कमी होतें. मागील युद्धांत इतर राष्ट्रांची मदत भरपूर मिळाली होती. त्या वेळीं ब्रिटिशांच्याकडून १५ लक्ष सैनिक युद्धार्थ सज्ज झाले होते, तर यावेळीं अवघे २ लक्षच इंग्रज-फ्रेंच रणभूमीवर उभे ठाकले. अमेरिकेचे ८ ते १० लक्ष शिपाई फ्रान्सच्या मदतीला त्या वेळीं आलेले होते. या वेळीं अमेरिका अद्यापि युद्धांत पडली नाहीं म्हणून ते आंकडे हिशेबांत धरण्याची गरज नाहीं हें खरें; तरी पण ज्या सुखलालसेच्या वृत्तीमुळें, इंग्लंड व फ्रान्स यांतील सैनिकांचा भरणा या वेळीं कमी झाला तेंच कारण अमेरिकेलाहि प्रसंग आलाच तर लागू पडणार नाहीं असें नाहीं. देशाभिमानासाठीं, ध्येयासाठीं आणि तत्त्वासाठीं वैयक्तिक सुखावर लाथ मारून राष्ट्रांतील पुढारी सांगतील ते कष्ट करण्याला आणि प्रसंग पडेल तसा स्वार्थत्याग करण्याला ज्या देशांतील तरुण तयार असतात तेथें अशी आपत्ति कोसळत नाहीं. लढाईसारखा प्रसंग येईल त्या वेळीं आपण बलिदानास सिद्ध होऊं; पण तसें संकट आलें नसतां उगाच वर्षानुवर्ष सुखासुखी हडेलहप्पी करून त्रास कां सोसावा अशी विचारसरणी मनांत आणून चैनीच्या राहणीचें समर्थन केलें जातें; परंतु सुखाची चटक एकदां लागली म्हणजे संकटाच्या वेळीं एकाएकीं मनोवृत्ति बदलूं शकत नाहीं, असा हा मनुष्यस्वभावच आहे; याकरितां समाजांतील घटकांना भरभराटीच्या काळांतहि आपत्तीच्या काळांतल्याप्रमाणेंच सुखावर पाणी सोडण्याची संवय लावून ठेवली पाहिजे.

## मजुरांचे लाड पुरविल्याचा परिणाम

आमचीं शस्त्रास्त्रें अपुरीं पडलीं, जर्मनीच्या सहा विमानांबरोबर फ्रान्सच्या एकेका विमानाला लढावें लागलें अशी जी केविलवाणी कबुली मार्शल पेताँ यांनीं या वेळीं दिली तिच्यावरूनहि हें सामान्य तत्त्वच सिद्ध होतें. महायुद्ध उपस्थित होण्याच्या आधीं फ्रान्समधील कारखान्यांतून मजुरांकडून कामाची टाळाटाळच चालत असे. मजुरांच्या कामाचे तास कमी करतां करतां आठवड्यांत अवघे ४० तास काम घेण्यांत येऊं लागलें. याचा दुष्परिणाम कसा भोवेल याचें भविष्य ता. २७ सप्टेंबर १९३८ च्या केसरींतील लेखांत पुढीलप्रमाणें वर्तविलें होतें. "मॉ. ब्लम यांच्या ४० तासांच्या आठवड्यामुळें फ्रान्सचें लष्करी यंत्र पूर्णपणें पंगू झालें आहे. त्यामुळें जर्मनींत एका महिन्यांत जितकीं विमानें तयार होतात तितकीं विमानें फ्रान्समध्यें सबंध वर्षांत देखील तयार झालीं नाहींत. विमानांची जी कहाणी तीच कहाणी आरमारी जहाजांचीहि आहे." या उताऱ्यावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, मार्शल पेताँ यांनीं शस्त्रास्त्रांच्या तुटवड्याचें जें गाऱ्हाणें आतां गाइलें त्याचें बीज बरेंच पूर्वीपासून पेरलें गेलें होतें. फ्रान्स देशांत कम्यूनिझमचा जो प्रचार अनिर्बंधितपणें केला गेला तोच अशा रीतीनें फळास आला. अधिक काम करून अधिक पगार मिळविण्याची हांव धरण्यापेक्षां संप करून पगार वाढवून

घेण्याची चटक मजुरांना लागली; त्यामुळें राष्ट्रीय संपत्तीचा ऱ्हास होत चालला व मालाचें उत्पादन कमी होत चाललें. अशी जी फ्रान्समध्यें बजबजपुरी माजत चालली तिचा समाजावर वाईट परिणाम होत आहे त्याचेंहि वर्णन ता. १७ मार्च १९३९ च्या अंकांत आलेंच आहे.

वरील सर्व ऊहापोहाचा निष्कर्ष हाच कीं, फ्रेंच राष्ट्राला युद्धाच्या वेळीं सैनिकांची व शस्त्रास्त्रांची जी उणीव भासली व जिच्यामुळें शरणागतीचा प्रसंग आला ती आपत्ति आकस्मिक उद्भवलेली नसून गेल्या वीस-बावीस वर्षांत जी विचारसरणी व जी चैनीची राहणी फ्रान्स वगैरे देशांत प्रसृत करण्यांत आली तिचाच हा परिणाम होय.

## फ्रेंचांची शरणागति इंग्लंडला जाचेल

असो. येथवर फ्रान्सच्या शरणागतीच्या कारणांची मीमांसा झाली. आतां या शरणागतीच्या परिणामाचीहि थोडीशीं मीमांसा करणें प्राप्त आहे. फ्रान्सनें हातचें शस्त्र खालीं टाकल्याबरोबर इंग्लंडची एक बाजू लंगडी पडून महायुद्धाचा सगळा बोजा एकट्या इंग्लंडवर पडला आहे. फ्रान्स शरण जाण्यापूर्वी अमेरिकेची भरपूर मदत दोस्त राष्ट्रांना होण्याचा संभव दिसत होता. परंतु अलीकडे अमेरिकेच्या वृत्तींत चलबिचल दिसूं लागली आहे. अशीच चलबिचल इजिप्त व बाल्कन राष्ट्रें यांच्यांतहि दृष्टोत्पत्तीस येत आहे. त्यांतून फ्रान्स व इटाली यांच्यांत जो तात्पुरता संधि झाला आहे त्यांतील अटी पाहिल्या असतां त्या ब्रिटिशांना आफ्रिकेंतील युद्ध चालविण्याला पुष्कळच नडण्यासारख्या दिसतात. इटालीनें फ्रेंचांचें सोमालीलँडमधलें जें जिबूटी बंदर आपल्याकडे घेण्याचें ठरविलें आहे, त्यामुळें तांबडा समुद्र, एडनचें आखात व अरबी समुद्र यांच्यांतील आरमारी हालचालींवर इटालीला झडप घालतां येईल. एडनपासून जिबूटीचें अंतर अवघें ८० मैल आहे.

या व अशाच इतर अनेक कारणांमुळें फ्रेंचांची ही शरणागति इंग्लंडला आतिशय जाचक होणार आहे. त्यामुळें ब्रिटिश राष्ट्र फ्रान्सवर विश्वासघाताचा आरोप करूं लागलें आहे. परंतु ता. १५ रोजीं ब्रिटिश पार्लमेंटांत चर्चिलचें फ्रान्सच्या शरणागतीसंबंधाचें जें विस्तृत भाषण झालें, त्यावरून फ्रान्सवर विश्वासघाताचा आरोप सिद्ध होतो असें दिसत नाहीं. चर्चिल यानें आपल्या भाषणांत स्वतःच सांगितलें आहे कीं, पेताँ हे अधिकारारूढ होण्यापूर्वी ता. १३ जूनपासून रेनॉ यांनींच आम्हांला वेगळा तह करण्याची परवानगी द्या अशी मागणी सुरू केली होती. अर्थातच फ्रान्सची स्थिति अत्यंत हलाखीची झाल्यामुळें त्याचा टिकाव लागणें शक्य नाहीं आणि इंग्लंड जर युद्ध बंद करीत नसेल तर फ्रान्सला तरी त्यानें त्याच्या वचनांतून मुक्त करावें असा फ्रेंचांचा आग्रह होता. विश्वासघातच करावयाचा असतां तर इंग्लंडला न विचारतांच परभारें फ्रान्सनें जर्मनीशीं बोलणें सुरू केलें असतें. तसें

परभारें बोलणें न करतां फ्रान्सनें इंग्लंडची अनुज्ञा मागितली, यावरून फ्रेंचांचा निरुपाय झाल्यामुळें अशी मागणी करावी लागली हें उघड दिसतें. बरें, फ्रेंचांनीं वेगळा तह करण्याची इच्छा दर्शविल्यावर ब्रिटिश मंत्रिमंडळानें तरी फ्रान्सला उत्तर काय दिलें ? फ्रान्सपुढें दोन योजना ठेवण्यांत आल्या. फ्रान्स् व इंग्लंड यांचा कारभार संयुक्त पद्धतीनें चालावा, अशी एक योजना होती. ती अमलांत आली असती तर फ्रान्सचें स्वतंत्र अस्तित्व कितपत टिकलें असतें, हा एक प्रश्नच आहे. त्या योगानें राष्ट्राचें स्वतंत्र अस्तित्व नाहींसें होतें असें फ्रेंचांना वाटलें म्हणून तसली योजना त्यांनीं नाकारली, आणि फ्रेंच प्रधान जर्मनीच्या गळ्यांत पडले, याला अदूरदर्शी-पणा म्हणून नांवें ठेवतां येतील पण तेवढ्यानें विश्वासघाताचा आरोप फ्रान्सविरुद्ध शाबीत करतां येणार नाहीं.

## इंग्लंडची सूचना अव्यवहार्य होती

विन्स्टन चार्चिल यांनीं आपल्या भाषणांत उघड केलेली दुसरी योजना याच्याहिपेक्षां विचित्र होती. फ्रान्सनें आपलें सगळें आरमार ब्रिटिशांच्या स्वाधीन करावें आणि नंतर मग चाललेलें युद्ध तहकूब करण्यासंबंधानें जर्मनीशीं वाटाघाट करावी. ही अट फ्रान्सनें मान्य केली असती म्हणजे मग फ्रान्सवर विश्वासघाताचा आरोप केला गेला नसता, असें चर्चिलचें मत दिसतें. पण फ्रान्सला सुचविलेली ही अट शक्य कशी आहे, याचा खुलासा चर्चिल यांनीं आपल्या भाषणांत केला नाहीं. इंग्लंडनें सुचविलेली ही अट जर्मनीनें कबूल केलीच पाहिजे असें त्याजवर बंधन कोण घालूं शकणार होतें ? फ्रान्स वाटेल त्या अटी सुचवील, परंतु शरण आलेल्या राष्ट्राच्या कोणत्या अटी मॉन्य करावयाच्या व कोणत्या झिडकारावयाच्या, हें सर्वस्वी जेत्यांच्या मर्जीवरच अवलंबून राहतें. त्यामुळें जर्मनीकडून जर युद्धतहकुबी पाहिजे असेल तर जर्मनीचा ज्या अटीला हटकून विरोध होईल, अशी अट सुचविण्यांत तरी काय स्वारस्य राहिलें असतें ? फ्रान्सनें इंग्लंडच्या सूचनेप्रमाणें आपलें आरमार ब्रिटिश बंदरांत पाठविण्याचें मनांत योजून नंतर तहाची वाटाघाट सुरू केली असती, तर जर्मनीनें साफ सांगितलें असतें कीं, आधीं तुमचें आरमार आमच्या स्वाधीन करा, म्हणजे मग तहाची भाषा बोलूं. असा जबाब आला असतां तर फ्रान्सला दुसरा कोणता मार्ग राहिला होता ? एवंच इंग्लंडनें फ्रान्सला सुचविलेली ही अट त्यांच्या दृष्टीनें इंग्लं-डला कितीहि फायदेशीर असली तरी फ्रान्स जर अगदीं हातटेकीला आल्यामुळेंच तह करण्याला उतावीळ झाला होता, तर अशा वेळीं जी अट जर्मनी कबूल कर-णार नाहीं, अशी अट घालून फ्रान्सला शरण जाण्याला परवानगी देण्यांत शहाण-पणा कोणता ? सशर्त कां होईना पण इंग्लंडनें फ्रान्सला शरणचिठ्ठी लिहून देण्याची परवानगी दिली. त्यांतील शर्त अव्यवहार्य दिसल्यानें ती न पाळतां फ्रान्सनें तह केला, हा विश्वासघात कसा मानावयाचा ?

### इंग्लंडचा दृढनिश्चय

इंग्लंडच्या परवानगीनें असो अथवा परवानगीशिवाय असो, फ्रान्सनें जर्मनी व इटाली या दोन्ही देशांशीं त्यांच्या अतिकडक अटी स्वीकारून तह केला; तेव्हां आतां पुढें काय करावयाचें, हा प्रश्न इंग्लंडपुढें शिल्लक राहतोच. याचें उत्तर चर्चिलसाहेब आपल्या पार्लमेंटपुढील भाषणांत देऊं शकले नाहींत. या वेळीं तें उत्तर देतां येणें शक्यहि नाहीं, यास्तव चर्चिल यांनीं पार्लमेंटला एवढेंच आश्वासन दिलें कीं, पार्लमेंटला कळविल्याशिवाय आणि देशांतील लोकमत काय आहे याचा ठाव घेतल्याशिवाय ब्रिटिश मंत्रिमंडळ कोणतीहि गोष्ट करणार नाहीं. त्यावर अशी शंका निघाली कीं, फ्रान्समध्यें युद्धाचें संकट आल्यामुळें जशी पार्लमेंट भरूं शकली नाहीं, व फ्रेंच वृत्तपत्रेंहि प्रसिद्ध होऊं शकलीं नाहींत, तशी वेळ आल्यास चर्चिल काय करणार ? याला उत्तर म्हणून चर्चिल यांनीं ठासून सांगितलें कीं, इंग्लंडांतील वृत्तपत्रें बंद न पडतील आणि पार्लमेंटची बैठक हमखास भरेल, अशीच तजवीज आपण खात्रीनें करूं. या उत्तरांत इंग्लंडचा दमदारपणा व दृढनिश्चय स्पष्टपणें दिसून येतो. अशा दृढनिश्चयानें इंग्लंड यापुढें युद्ध चालविणार आहे. पण तें कोठें कसें चालविणार याचा खुलासा आतांच करणें शक्य नाहीं व श्रेयस्करहि नाहीं, असें सांगून चर्चिल यांनीं त्याचें उत्तर दिनावधीवर टाकलें. याच कारणास्तव आम्हांलाहि याची मीमांसा पुढें टाकणें भाग आहे.

---

## रशियांतील रणसंग्रामाचा आढावा ६

[ जर्मनीनें १९४१ च्या जून महिन्यांत रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें आणि तीन महिन्यांत सुमारें तीनशें मैलपर्यंत प्रगति केली. एवढ्या झपाट्याच्या आक्रमणानंतर आपापली बाजू स्थिरस्थावर करण्याकरितां दोन्ही बाजूंकडून युद्ध मंदावल्या वेळीं मागील तीन महिन्यांचा युद्धाचा आढावा घेऊन भावी हालचाली कशा घडतील याविषयींचे कांहीं अंदाज या लेखांत व्यक्त केले आहेत. त्यांत यापुढें उत्तर-आफ्रिकेंत शस्त्रांचा खणखणाट सुरू होईल असें केलेलें अनुमान त्यानंतर लवकरच प्रत्ययास आलें.]

महाभारतांत वर्णिलेला भयंकर रणसंग्राम १८ दिवस चालला होता व त्यांत अवघें १८ अक्षौहिणी सैन्यच लढत होतें. तरी देखील रणभूमीवरून रक्ताचे पाट

(केसरी, दि. २३ सप्टेंबर १९४१)

आ४१८८
२०६



दा नं. आ४१८८
से नं ......

वाहत होते आणि सगळ्या रणक्षेत्रभर प्रेतांचा खच पडला होता असें कविवर्णन आहे. हें काव्यमय वर्णन अतिशयोक्तीचें आहे असें आपण समजतों. पण आज रशियांतील २ हजार मैल पसरलेल्या रणक्षेत्राकडे दृष्टि फेकल्यास महाभारतांतील अतिशयोक्तिपूर्ण वाटणाऱ्या देखाव्याहूनहि जास्त भयानक देखावा तेथें दिसून येईल.

जर्मनीनें रशियावर चाल करून प्रत्यक्ष खणाखणीस सुरुवात केल्याला आज तीन महिने झाले. या तीन महिन्यांत फारच थोडे दिवस प्रत्यक्ष युद्धाला खळ पडला असेल. मध्यंतरींचे विश्रांतीचे व नव्या व्यूहरचनेचे कांहीं थोडे दिवस वगळल्यास, बाकीचे सर्व दिवस आकाशांतून अग्निगोळ्यांचा वर्षाव, रणभूमीवरून रणगाड्यांची मुसंडी आणि चौफेर यांत्रिक तोफांतून केला जाणारा मारा यांच्या योगानें भयंकर सैनिकसंहार एकसारखा चालू आहे. यांत परस्परांनीं परस्परांच्या रणसामुग्रीचा आणि सैनिकांचा किती संहार केला, यासंबंधींचे आंकडे अतिशयोक्तीचे असले, तरी त्यावरून या संग्रामाचें भीषण स्वरूप कळून आल्याशिवाय राहत नाहीं. जर्मनीनें प्रसिद्ध केलेले आंकडे पाहिल्यास त्यांत रशियनांची हानि २५ लाखांवर झाली असून जर्मनांची ४ लक्षपावेतों झाली आहे असें सांगण्यांत येतें. रशियाकडून प्रसिद्ध होणारे आंकडे लक्षांत घेतल्यास ते अर्थातच याच्या उलट आहेत. तरी पण त्यावरून उभयपक्षांची मिळून ३० लक्षांपर्यंत हानि झाली असावी, एवढी गोष्ट निर्विवाद ठरते; मग त्यांत कोणाचा वांटा कितीहि कमजास्त असो.

### मायभूमीचा निकराचा बचाव

आ८८

एवढी काल्पनातीत सैनिकांची संख्या रणदेवतेला बळी देऊन उभय पक्षांनीं काय साधलें हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या युद्धांत आरंभापासूनच आपला बचाव करणें भाग पडल्यामुळें आपण आपल्या मायदेशाचा बचाव किती निकरानें करीत आहों एवढेंच रशियाला दाखवितां येण्यासारखें आहे. आणि त्या बाबतींत रशियानें प्रतिपक्षाकडूनहि शाबासकी मिळविली आहे. या महायुद्धाच्या पहिल्या काळांत रशियानें फिनूलंडवर जी स्वारी केली, त्या स्वारींत रशियाला जसें मिळावें व जितक्या लवकर मिळावें तितकें लवकर यश मिळालें नाहीं. त्यावरून कित्येकांनीं जर्मनीच्या वावटळीपुढें रशियन सैन्याची थोड्याच दिवसांत वाताहात होईल असा तर्क करून ठेवला होता; आणि आतां तितक्या अल्पावधींत जर्मनी रशियाला चीत करूं शकला नाहीं, यावरून जर्मनीच्या सामर्थ्याला उतरती कळा लागल्याचें अनुमान कित्येक करीत आहेत. पण यांतलें पहिलें अनुमान चुकीचें असल्यानें दुसरें अनुमान आपोआपच लंगडें पडतें. फिनूलंडच्या युद्धांत रशियाला हातोहात जय मिळाला नाहीं याला अनेक कारणें होतीं. त्यांतलें मुख्य कारण हें कीं, त्या वेळीं रशियाची लढण्याची तयारी पूर्ण झालेली नव्हती, रशियाला त्या वेळीं इंग्लंड किंवा अमेरिका यांच्याकडून कोणतीहि मदत होत नव्हती आणि मुख्य कारण असें कीं, रशियन

नगर वाचनालय, सातारा नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

सैन्य परराष्ट्रावर चालून गेलेलें असून फिन्‌लंडचे वीर मायभूमीच्या रक्षणासाठीं प्राणपणाला लावून लढत होते.

हल्ला करणाऱ्या सैन्याचा आवेश व त्याची चिकाटी आणि आत्मसंरक्षण करीत असलेल्या सैन्याचा आवेश व चिकाटी यांच्यांत स्वभावतःच महदंतर पडतें याची टीकाकारांस कल्पनाच नसावी असें दिसतें. अर्थातच ज्यांना आक्रमक युद्ध व संरक्षक युद्ध या दोहोंत सैनिकांकडून दाखविल्या जाणाऱ्या शौर्यांतील नैसर्गिक फरक लक्षांत येतो त्यांनीं आरंभापासूनच असलीं चुकीचीं अनुमानें काढलीं नव्हतीं. रशियांतलें युद्ध हें कांहीं डेन्मार्क, हॉलंड, बेलजम व फ्रान्स या देशांतल्या युद्धासारखें विद्युत्‌वेगानें संपणारें युद्ध नव्हे, याकरितां जर्मनीला निराळेच डावपेंच योजावे लागतील; आणि हिवाळा सुरू होतांच खंदकांचा आश्रय करावा लागेल, असें आम्ही पूर्वीच लिहिलें होतें; आणि एवढी साधी उघड दिसणारी गोष्ट जर्मन लष्करी तज्ज्ञांच्या लक्षांत आली नसेल अशी टीकाकारांनीं स्वतःची समजूत करून घेण्यांत स्वतःचेंच अज्ञान प्रकट होतें हें उघड आहे.

### जर्मनीनें काय साधलें

या आक्रमक युद्धांत किती दिवसांत आणि किती सैनिक बळी देऊन आपण युक्रेन प्रांत हस्तगत करूं याविषयीं जर्मन सेनाध्यक्षांच्या मनांतले बेत इतरांना समजणें शक्य नाहीं; आणि रणांगणावर कोणत्या पक्षाची किती हानि झाली याचे नक्की आंकडेहि बाहेरच्या लोकांना युद्ध समाप्त होईपर्यंत कळणार नाहींत. यास्तव या दोन्ही अनिश्चित गोष्टींसंबंधानें उलटसुलट चर्चा करण्यांत कालक्षेप न करतां ज्या गोष्टी निर्विवाद सिद्ध होण्यासारख्या आहेत तेवढ्यांचाच आढावा घेऊन तीन महिन्यांच्या युद्धांत जर्मनीनें रशियांत काय साधलें तें पाहूं. बातमी देतांना कितीहि लपवाछपवी केली तरी नकाशांत कांहीं तसली लपवाछपवी होऊं शकत नाहीं. याकरितां रशियाचा प्रत्यक्ष नकाशाच उघडून पाहिला असतां तीन महिन्यांत जर्मनीनें केवढा प्रदेश पादाक्रान्त केला तें दिसून येतें. ईस्ट प्रशियापासून लेनिनग्राडचें अंतर ४५० मैल आहे. ईस्ट प्रशियापासून स्मॉलेन्स्क ३७५ मैलांवर आहे. झेकोस्लोव्हाकियाच्या सरहद्दीपासून कीव्ह ३०० मैल असून तेथून पोल्टाव्हा २०० मैल आहे. पोल्टाव्हापासून ज्या खार्कोव्हकडे जर्मनांचा रोख आहे तें खार्कोव्ह ७० मैल आहे. अगदीं दक्षिणेस बेसअरेबियापासून खरसन बंदर ३०० मैल आहे आणि तेथून पेरिकोव्ह ७५ मैलांवर आहे. अशा प्रकारें कमींत कमी ३०० मैलांपासून तों जास्तींत जास्त ५०० मैलपर्यंत जर्मन सैन्य रशियांत घुसलें आहे. याच प्रदेशाची लांबी कमींत कमी १५०० मैल आहे. यावरून अगदीं किमान पक्ष ४५०००० चौरस मैलांचा प्रदेश जर्मनांनीं आपल्या कबजांत घेतला आहे हें दिसून येईल. युरोपांतील रशियाचें एकंदर क्षेत्रफळ पाहिल्यास तें सुमारें

६५०००००० चौरस मैल आहे. त्यांतला अवघा शेंकडा ७ टक्के मुलूखच जर्मनीनें जिंकला असल्याचें दिसून येतें. रशियाच्या विस्ताराच्या मानानें जिंकलेला मुलूख अगदीं थोडा आहे; आणि त्यामुळें रशियाला एवढा मुलूख गेल्यामुळें क्षेत्रफळाच्या दृष्टीनें कांहीं फारशी अडचण भासणार नाहीं.

### जिंकलेल्या मुलुखाचें महत्त्व

तथापि जर्मनीनें जिंकलेला हा मुलूख सर्वच दृष्टींनीं अतिशय महत्त्वाचा आहे. रशियाच्या खनिज द्रव्यांपैकीं ६० टक्के लोखंड, ३५ टक्के मँगॅनीज, ४४ टक्के ॲल्यू-मिनियम् या प्रांतांतूनच काढलें जात असतें. तसेंच युक्रेन प्रांत हा सुपीकपणा-विषयींहि नांवाजलेला असून एवढा धान्य पिकविणारा मुलूख हातचा जाणें म्हणजे रशियाचें मोठेंच नुकसान होय. याशिवाय उत्तरेस लेनिनग्राडपासून तों दक्षिणेस आझोफच्या समुद्रापर्यंत जो प्रदेश आहे त्यांत अनेक कारखान्यांचीं केंद्रें आहेत. तीं रशियाच्या हातून जाऊन जर्मनीच्या हातांत पडल्यानें रशियाचें दुहेरी नुकसान झालें आहे. कारण हे कारखाने हातचे गेल्यानें रशियाला रणसामुग्रीचा तेथून पुरवठा होण्याचें बंद पडून जर्मनीला कालांतरानें तरी त्यांचा उपयोग होण्यासारखा आहे.

### ' लेनिनग्राड घ्या '

या दृष्टीनें पाहिल्यास जर्मनीनें आतांपर्यंत आपले लाखो सैनिक या युद्धांत बळी दिले असले तरी त्या बलिदानाच्या जोरावर जो मुलूख जर्मनीनें आक्रमिला त्या योगानें जर्मनीला हें युद्ध पुढें चालविण्याला मोठी मदत होणार आहे. आतां रशियांतील हिवाळा लवकरच सुरू होईल आणि त्या वेळीं युद्ध चालविणें अडचणीचें होईल. त्याकरितां जर्मनीनें आगाऊ तजवीज चालविली आहे असें दिसतें. हिवाळ्याची छाया पडण्याच्या आंत लेनिनग्राड शहर हस्तगत करण्यासाठीं जर्मनांची जिवापाड धडपड चालली आहे. खुद्द लेनिनग्राडच्या परिसरांतच निकराची झुंज चालू असून त्यांत उभय पक्ष अगदीं अटीतटीनें लढत आहेत. लेनिनग्राड हातचें गेल्यास त्यांत रशियाची लौकिकदृष्ट्या नामुष्की होऊन शिवाय एवढें मोठें औद्योगिक कारखान्यांचें केंद्र हातचें गेल्यानें त्याची मोठी हानि होणार आहे. शिवाय लेनिनग्राड गेलें कीं बाल्टिक समुद्रावरचा ताबा गेल्यासारखाच आहे. याकरितां रशियन सेनापति कितीहि प्राणहानि झाली तरी या शहराचा ताबा सोडण्यास कबूल होणें संभवनीय दिसत नाहीं. उलटपक्षीं जर्मनांना जर लेनिनग्राड जिंकतां आलें नाहीं तर त्यांची रशियांतील प्रगति येथेंच खुंटेल. लेनिनग्राड जिंकल्याखेरीज मास्कोला खरा शह बसणें शक्य नाहीं आणि हिवाळ्यांत ही आघाडी सांभाळणेंहि जर्मनीला शक्य होणार नाहीं. यास्तव 'कांहींहि करा पण लेनिनग्राड घ्या' असा जर्मन सर्वाधिकाऱ्यांचा सक्तीचा हुकूम आहे आणि त्यामुळेंच उभय पक्षांत येथें भयंकर रणकंदन माजून राहिलें आहे.

मध्यंतरींच्या स्मॉलेन्स्कसमोरील आघाडीवर जर्मनांनीं आपली मोहीम स्थगित केल्यासारखीच दिसते. येथें रशियनांकडून उलट हल्ले होऊं लागले आहेत आणि त्या भागांतील कांहीं गांवें रशियनांनीं परत जिंकून घेतलीं असेंहि प्रसिद्ध झालें आहे. परंतु या आघाडीवरील झटापटीला तादृश महत्त्व नाहीं. लेनिनग्राड जिंकून उत्तरेकडचें जर्मन सैन्य जर मास्कोच्या रोखानें दक्षिणेकडे चालून येऊं लागलें आणि पोल्टाव्हा येथील जर्मनांची आघाडी खारकोव्ह घेऊन तेथून जर मॉस्कोच्या रोखानें उत्तरेकडे वळली तर स्मॉलेन्स्कच्या समोर असलेलें हें रशियन सैन्य आपोआपच मागें पूर्वेकडे हटेल आणि तें तसें न हटेल तर कोंडींत सांपडेल, याकरितां स्मॉलेन्स्कसमोरील रणभूमीचा स्वतंत्र विचार कर्तव्य नाहीं.

## युक्रेनची राजधानी पडली

कित्येक दिवसपर्यंत कीव्हला वेढा घालून अखेरीस जर्मनीनें युक्रेनची कीव्ह ही महत्त्वाची राजधानी जिंकून घेतली. रशियन अधिकाऱ्यांनीं आतां आपण कीव्ह शहर सोडून दिलें, असें स्वतःच कबूल केलें आहे. पण कीव्हमधील किती रशियन सैन्य कोणत्या दिशेनें कोठपर्यंत मागें हटलें याचा अद्यापि उलगडा झाला नाहीं. कीव्हमधून मागें परतणाऱ्या रशियन सैन्याला घेरण्यासाठीं तर जर्मनीनें पोल्टाव्हा घेऊन खारकोव्हकडे मोर्चा वळविला आहे. आणि याच हेतूनें उत्तरेकडचें चर्निगोव्ह येथील सैन्य नैजिनच्या रोखानें खालीं येत आहे, तेव्हां या मार्गांतील युद्धाचा पुढील रागरंग दोन्ही पक्षांच्या सैन्यांच्या हालचाली किती जलद होतील त्यावरच अवलंबून आहे.

अगदीं दक्षिणेकडील जर्मन पथकांनीं अद्यापि ओडेसा बंदर हस्तगत केलें नाहीं. तें बंदर हस्तगत झाल्यानें क्रिमियाकडचा मार्ग निर्वेध होणार आहे. तथापि ओडेसा बंदर न घेतां देखील त्यापुढील खरसन बंदर घेऊन आणि मुखाजवळच नीपर नदी ओलांडून जर्मनीनें पेरिकोपपर्यंत मजल गांठली आहे. पेरिकोप येथील संयोगभूमीनें क्रिमियाचें द्वीपकल्प युक्रेनला जाडलेलें आहे. यामुळें ही संयोगभूमि जर्मनांच्या हातीं जाईल तर क्रिमियाचा उत्तरेकडचा संबंध तुटेल आणि जर्मनांना अझोव्ह समुद्राच्या उत्तर किनाऱ्यानें कॉकेशस प्रांताकडे जाण्याचा रस्ता मोकळा होईल. या बाजूला रशियनांचें फारसें सैन्य नसलें तरी कॉकेशस प्रान्ताच्या पश्चिम सरहद्दीवर रशियाची जय्यत तयारी आहे आणि पेरिकोपपासून कॉकेशसच्या या पश्चिम सरहद्दीचें अंतर सुमारें २७५ मैल आहे. यावरून जर्मन सैन्याला या बाजूनें आतांच कॉकेशस प्रांत गाठतां येईल असें वाटत नाहीं.

## बल्गेरिया व तुर्कस्तान

पण कॉकेशस प्रांतावर चढाई करण्याला काळ्या समुद्रांतूनहि मार्ग आहे. त्या मार्गानें दर्यावरून स्वारी करावयाची म्हटल्यास आरमाराची तयारी मोठीच

करावी लागेल. याकरितां बल्गेरियाचीं बंदरें आणि त्या देशाचें आरमार आपल्याला मिळावें म्हणून जर्मनीची खटपट चालू आहे. बल्गेरियावर एकीकडून जर्मनीचें व दुसरीकडून रशियाचें दडपण आल्यानें त्या देशाची स्थिति कींव करण्यासारखी झाली आहे. या दोहोंतून कोणाच्या तरी एका बाजूला मिळाल्याशिवाय बल्गेरियाला दुसरा मार्ग मोकळा नाहीं आणि जर्मनीला उघड मिळावें कां रशियाची मर्जी राखावी हें ठरविणें लेनिनग्राड व ओडेसा येथील जर्मनीच्या जयापजयावर अवलंबून आहे. जर्मनीनें लेनिनग्राड घेऊन जर मास्कोवर रोख धरला, मध्यंतरींचें स्मॉलेन्स्कच्या पूर्वेचें रशियन सैन्य घेरण्याचा डाव टाकला आणि दक्षिणेकडे ओडेसा बंदर घेऊन तिकडील रशियन सैन्याहि कोंडींत धरलें तर बल्गेरिया उघडपणें जर्मनीला आरमारी मदत देईल आणि काळ्या समुद्रांत दर्यावरील लढाई होऊन कॉकेशस प्रांताला धोका उत्पन्न होईल. परंतु जर्मनीचें हें सगळें मनोराज्य सिद्धीस जाणें संभवनीय नसल्यानें बल्गेरिया शक्य तोंवर टाळाटाळ करील आणि त्यामुळें कॉकेशसवरील स्वारी लांबणीवर पडेल असें वाटतें.

आज बल्गेरियाची जी अवस्था तीच पुढेंमागें तुर्कस्तानची होण्याचा संभव आहे. काळ्या समुद्रांत दर्यायुद्ध होऊन जर्मनी जर कॉकेशस प्रांतावर चालून जाईल तर यापुढें तुर्कस्तानला तटस्थ राहणें अशक्य होऊन जाईल. अर्थातच तुर्कस्तानचा तटस्थपणा टिकणें अथवा दोस्त राष्ट्रांना येऊन मिळणें हें ब्रिटिश व रशियन सैन्याच्या इराणमधील हालचालींवर अवलंबून आहे. इराणचा प्रदेश या दोन्ही राष्ट्रांनीं सध्यां आपल्या मुठींत घेतला आहे. पण तेथून पुढील हालचाली कोणत्या दिशेनें होतील याचा सुगावा अद्यापि लागत नाहीं. आणि तो सुगावा लागल्याशिवाय कॉकेशसच्या आसपास होणाऱ्या सैनिक हालचालींची कल्पना करतां येत नाही.

### उत्तर-आफ्रिकेंत तयारी

कॉकेशस प्रांतांत जर्मनीशीं गांठ घालण्यापेक्षां उत्तर-आफ्रिकेंतच जर्मनीला गांठून त्याच्या हालचालींना पायबंद बसवावा हें अधिक सयुक्तिक दिसतें व त्या दृष्टीनें ब्रिटिशांची उत्तर-आफ्रिकेंत तयारी चालू असल्याची वार्ता येत आहे. उलटपक्षीं जर्मनीलाहि हीच भीति वाटत असल्यामुळें सध्यां जर्मनीनें भूमध्य समुद्रांतून आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर सैनिक आणि साहित्य उतरविण्याचा सपाटा चालविला आहे. भूमध्य समुद्रांतून प्रवास करतांना जर्मनीच्या अनेक बोटी ब्रिटिशांकडून बुडविल्या जात आहेत; तरी पण आपल्या सैन्याच्या व नौकांच्या हानीची पर्वा न करतां जर्मनीनें आपला क्रम चालविलाच आहे. त्यावरून लेनिनग्राड व ओडेसा येथील युद्धवार्तेनंतर उत्तर-आफ्रिकेंतील रणधुमाळीची वार्ता येण्याला सुरुवात होईल असें दिसतें.

भा०
१०४
२०।४।५०



# जपानी चढाईचा परिणाम ७

[ जपाननें दि. ५ डिसेंबरला पर्ल बंदरावर अचानक हल्ला करून अमेरिका व इंग्लंड यांच्याविरुद्ध युद्धाचा पुकारा केला. त्या वेळेपासून एक आठवड्यांत ज्या हालचाली झाल्या त्या लक्षांत घेऊन महायुद्धाचा हा वणवा आतां त्रिखंडांत पसरेल असें भाकित या लेखांत केलें आहे. जपाननें कपटानें आकस्मिक हल्ला केला हें खरें असलें, तरी अमेरिकेला जपानचा डाव अगाऊ ओळखतां आला नाहीं यांत तिची अदूरदृष्टिच दिसतें असें दर्शविलें असून, जपानचा मुख्य कटाक्ष मलाया, ब्रह्मदेश व ईस्ट इंडीज बेटें काबीज करण्याकडे आहे व त्या भूभागांतच प्रथम युद्धाची रणधुमाळी माजेल असें अनुमान काढलें आहे. ब्रह्मदेशावर धाड आल्यानें हिंदुस्थानच्या उंबरठ्यावर युद्ध येऊन ठेपेल; याकरितां ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानच्या स्वराज्याचा प्रश्न लवकर सोडवावा, नाहीं तर पश्चात्ताप करण्याची पाळी येईल, असा इशाराहि या लेखांत दिला गेला आहे. ]

## तीन खंडांत युद्धाचा प्रसार

जपाननें इंग्लंड व अमेरिका यांच्याशीं युद्ध सुरू झाल्याची घोषणा करून महायुद्धाच्या ज्वाला दाही दिशांनीं पसरविल्या आहेत. उत्तर-अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें युद्धांत ओढलीं गेल्यानें गाडीबरोबर नळ्याची यात्रा या न्यायानें दक्षिण-अमेरिकेंतील संस्थानेंहि आपोआपच युद्धांत सामील झाल्यासारखींच आहेत. त्यांतील कांहीं संस्थानें प्रत्यक्ष युद्धांत भाग घेतील, कांहीं थोडीं तटस्थ राहतील, तरी पण द० अमेरिकाहि युद्धांत समाविष्ट झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. युरोप खंडांत तर एक-दोन राष्ट्रांखेरीज इतर सगळीं राष्ट्रें आधींपासूनच युद्धांत गोंवलीं गेलीं आहेत. आशिया खंडांत युद्धाच्या ज्वाला दूरवर पोंचल्या नव्हत्या; पण जपाननें आतां तेवढी कामगिरी केली आणि त्रिखंडभर पसरेल एवढी युद्धाची आग पेटाविली. तुर्कस्तान, अफगाणिस्तान, अरबस्तान, इत्यादि मुसलमानी राष्ट्रांचा मधला गट तेवढाच युद्धापासून अलिप्त राहिल्यासारखा आहे; पण त्यालाहि केव्हां तरी झळ लागल्याशिवाय राहणार नाहीं असें वाटतें.

जपानच्या युद्धघोषणेनें समरभूमि हिंदुस्थानच्या अगदीं दारापर्यंत येऊन भिडली आहे आणि यापुढें हिंदुस्थानच्या पूर्वेकडील भागांत युद्धाच्या ज्वाला

(केसरी, दि. १२ डिसेंबर १९४१)

नगर वाचनालय, सातारा.



केव्हां शिरतील याचा नेम नाहीं. पॅसिफिक महासागरांतील बेटें आणि ऑस्ट्रेलेशिया हा सर्व भूभाग युद्धक्षेत्रच बनला आहे. अशा रीतीनें हें महायुद्ध जगभर पसरल्यासारखेंच झालें आहे. त्याचा एवढा विस्तार होण्याला जपानच जबाबदार आहे. जर्मनीच्या युद्धघोषणेमुळें सुरू झालेली लढाई कितीहि भयंकर स्वरूपाची असली तरी ती युरोपच्या चतुःसीमेंतच मर्यादित होती. इटालीनें युद्धांत पाऊल टाकून ती आग आफ्रिका खंडांत पसरविली आणि आतां जपाननें आशिया, अमेरिका व ऑस्ट्रेलेशिया अशा तीन खंडांत तिचा प्रसार केला. याचा परिणाम कोणकोणत्या देशावर कसकसा होणार आहे याचा विचार करणें अगत्याचें आहे. हिंदुस्थानशीं या युद्धाचा अतिनिकट संबंध येत असल्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांचें लक्ष आतां या युद्धाकडे पूर्वीपेक्षां शतपटीनें अधिक वेधलें जाईल यांत शंका नाहीं.

## जपाननें हीच वेळ कां पसंत केली

महायुद्ध सुरू होण्याच्या पूर्वीपासूनच जर्मनी व इटाली या देशांशीं जपानची गट्टी जमली होती. आणि स्वाभाविकपणें ज्या युद्धांत जर्मनी व इटाली समाविष्ट झाले त्यांत जपान सामील होणार अशीच अपेक्षा सर्वांची होती. परंतु जपानचे मुत्सद्दी विशेष कावेबाज व दूरदर्शी असल्यानें आपण युद्धांत पडावें कां नाहीं, आणि पडावयाचें झाल्यास कोणती पर्वणी साधून युद्धांत पडावयाचें याचा ते अतिबारकाईनें विचार करीत होते. आणि जेव्हां जपानी मुत्सद्द्यांना असें वाटूं लागलें कीं, जर्मनीच्या चढाईमुळें रशियाच्या नाड्या आंखडत चालल्या आहेत आणि या युद्धांत पाऊल टाकल्यास आपल्याला रशियापासून भीति नाहीं, अशी त्यांची खात्री झाली तेव्हांच जपाननें युद्धांत पडण्याचें धाडस केलें. रशियाची शक्ति क्षीण झाली हें जसें जपानला युद्धांत पडण्याला एक कारण झालें, तसेंच उलटपक्षीं अमेरिका व इंग्लंड यांची शक्ति पॅसिफिक महासागरांत दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चालली हेंहि एक जपानला आतांच युद्धांत पडण्यास कारण झालें असावें.

लेलिनग्राड आणि मॉस्को या दोन्ही जुन्या नव्या राजधान्या जर्मनीनें काबीज केल्यानंतर आपण युद्धांत सामील व्हावें असें जपाननें मनांत योजलें होतें. कारण तसें झालें असतां रशियाची भीति पूर्णतः दूर होईल असें त्यास वाटत होतें. परंतु या राजधान्यांनीं अंदाजाहून अधिक काळ टिकाव धरला आणि थंडीच्या कडाक्यामुळें जर्मनीचीहि गति मंदावली. त्यामुळें या राजधान्या पडेपर्यंत वाट पाहावयाची तर बराच काळ कंठावा लागेल आणि तेवढ्या अवधींत इंग्लंड व अमेरिका आपलें युद्धबळ पुष्कळ पटींनीं वाढवितील आणि पॅसिफिक महासागराचा चोहों बाजूंनीं पक्का बंदोबस्त करून आपल्याला पुरतेपणीं वेढून टाकतील, अशी जपानला धास्ती वाटूं लागली. अमेरिकेंत युद्धसामुग्रीचे कारखाने जोरांत चालू आहेत, नवीन आगबोटी व विमानें बांधण्याकरितां कामहि

जारीनें सुरू आहे, आणि दिवसेंदिवस इंग्लंडचें चतुरंग बळ सिंगापूर व हाँगकाँग या बाजूनें जमत आहे, असें पाहिल्यावर जपानला साहजिकच असें वाटलें असावें कीं, युद्धांत जर पडावयाचेंच तर प्रतिपक्षाचें सामर्थ्य वाढण्याच्या आधींच पडणें बरें! इंग्लंड व अमेरिका यांनीं जपानचा जो व्यापारी कोंडमारा चालू केला, त्या कारणामुळें जपान इतक्या लवकर युद्धांत सामील झाला. आपला व्यापारी कोंडमारा झाल्यामुळें आपलें रणसाहित्य वाढविण्याची शक्ति संपुष्टांत येणार आणि दुसरीकडे प्रतिपक्षाची रणसामुग्री रोजच्यारोज वाढत जाणार, हें कोणता रणपंडित उघड्या डोळयानें पाहात राहून हालचाल न करतां स्वस्थ बसेल? अर्थातच युद्धांत न पडल्यानें जितका धोका आहे त्यापेक्षां युद्धांत पडल्यानें कमी धोका आहे असें जपानी युद्धविशारदांना वाटल्यावरून रशियाच्या नाड्या अगदींच आंखडण्याची वाट पाहात न बसतां जपाननें युद्ध पुकारलें असावें.

## अमेरिकन खलित्याचा स्वाभाविक परिणाम

युद्ध पुकारावयाचें हें एकदां निश्चित झाल्यावर त्यांत आपली बाजू ज्या रीतीनें अधिकांत अधिक बलिष्ठ होईल त्या रीतीचा अवलंब कोणीहि युद्धशास्त्रज्ञ स्वाभाविकपणेंच करतो. तेव्हां जापाननें एकीकडे समेटाचीं बोलणीं चालू ठेवलीं आणि दुसरीकडे आपलें लढाऊ बळ युद्धक्षेत्रांत पाठविण्याची अगाऊ तरतूद केली याचें आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. जपाननें आपल्या देशाच्या बाहेर कोणीकडेहि हातपाय पसरू नयेत, चीनमधलें आपलें सैन्य काढून घ्यावें, इंडोचायनांतलें लष्कर परत बोलवावें आणि पॅसिफिक महासागरांत अमेरिका व इंग्लंड यांनीं जीं बेटें आक्रमिलीं आहेत त्यांच्याकडे वांकड्या नजरेनें पाहूं देखील नये, असा पायबंद घालून घेण्याचें जपान मान्य करील अशी ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांनीं आपली समजूत कां करून घ्यावी हेंच कळत नाहीं! प्रे. रूझवेल्ट यांनीं जपानकडे जो खलिता पाठविला तो पाठवितांनाच त्यांच्या हें लक्षांत यावयास पाहिजे होतें कीं, मानी व महत्त्वाकांक्षी जपान या अटी सहसा मान्य करणार नाहीं. त्या खलित्याचें असें भवितव्य अगाऊच जाणून जर ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्दी सावध राहिले असते व युद्धार्थ डोळ्यांत तेल घालून सज्ज झाले असते तर कपटी जपाननें आम्हांस हातोहात सपशेल फसविलें असें म्हणून मनगटें चावण्याची त्यांच्यावर पाळी आली नसती. युद्ध पुकारण्याच्या आधीं जपाननें पहिली गोळी झाडली असेल; पण जपान गोळी झाडण्याची अशी तयारी करीत आहे याची दखलगिरी घेण्याला तरी इंग्लंडला व अमेरिकेला आंतरराष्ट्रीय कायद्यानें बंदी केली नव्हती ना! जपानचें आरमार हवाई बेटापर्यंत पोंचण्याला आठ-दहा दिवस तरी लागले असतील. पण जपानची अशी तयारी चालली आहे आणि त्याचें लढाऊ आरमार व आगलावी विमानें जपानच्या किनाऱ्यावरून निघालीं आहेत ही वार्ता इंग्लंडांत

व अमेरिकेंत आगाऊ कळूं नये ही केवढी नामुष्कीची गोष्ट! शत्रूनें कपटयुक्तीनें फसवूं नये हा वेदान्त ठीक आहे; पण शत्रु कपट करील असें समजून आगाऊ सावध असावें असा राजनीतीचा दंडक असतांना त्याच्याकडे या बलाढ्य राष्ट्रांचें दुर्लक्ष कसें झालें?

### जपानला अनुकूल व प्रतिकूल गोष्टी

अमेरिका व इंग्लंड यांनीं जपानच्या हालचालींकडे दुर्लक्ष केलें त्यांतच मोठी गोम आहे. या उभयतांची समजूत अशीच झालेली दिसते कीं, आम्ही एवढे बलाढ्य आणि आमचें संयुक्त आरमार सगळ्या जगांत अत्यंत प्रबळ, असें असल्यानें आमच्याविरुद्ध युद्ध पुकारण्याची जपानची छातीच होणार नाहीं आणि जर त्यानें युद्ध पुकारण्याची घोडचूक केलीच तर आपण त्याला हां हां म्हणतां चीत करूं. ही स्वसामर्थ्याची कल्पना स्वाभाविक असून ती त्या राष्ट्रांच्या सामर्थ्याला शोभण्यासारखीच आहे. पण यांत गोम एवढीच आहे कीं, युद्धाचें क्षेत्र जपानला कोणकोणत्या बाबतींत अनुकूल आहे याचा या बलाढ्य राष्ट्रांनीं तितका बारकाईनें विचार केलेला दिसत नाहीं. जपाननें पुकारलेलें हें महायुद्ध मुख्यतः पॅसिफिक महासागराच्या उत्तर भागांतच लढलें जाणार. हा प्रदेश जपानला चढाई करण्याला सोयीचा आहे. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सॅन्फ्रान्सिस्को बंदरापासून तों चीनच्या शांघाय बंदरापर्यंत जो अफाट महासागर पसरलेला आहे त्यांतच अमेरिकेच्या ताब्यांतलीं होनोलुलु, हवाई, मिडवे, वेक, ग्वाम, अशीं बेटें पूर्वपश्चिम पसरलीं आहेत. यांतील मिडवे, वेक व ग्वाम हीं बेटें अमेरिकेपेक्षां जपानलाच अधिक जवळ आहेत. अमेरिकेच्या संरक्षणाखालीं असलेलीं फिलिपाइन बेटें तर जपानला विशेष नजीक आहेत; पण याच्यापेक्षां महत्त्वाची गोष्ट ही कीं, याच फिलिपाइन बेटांच्या चारहि बाजूला जपानच्या ताब्यांतील बेटांनीं वेढा दिला आहे. उत्तरेस फोर्मोसा, पश्चिमेस स्प्राटली, दक्षिणेस पालम, आणि पूर्वेस याप अशा बेटांनीं फिलिपाइन बेटाला गराडा घातला आहे. त्यामुळें फिलिपाइन बेटावर हल्ला करणें जपानला अगदीं सुलभ असून त्याचा बचाव करण्याकरितां अमेरिकेला हजारों मैल अंतरावरून चालून यावें लागणार. फिलिपाइन बेटांचा बचाव करणें सोपें व्हावें म्हणून अमेरिकेनें होनोलुलु व हवाई या दोन बेटांत आपले आरमारी तळ व वैमानिक तळ अलीकडे आणून ठेवले आहेत. ग्वाम बेट हें फिलिपाइन्सला अधिक जवळचें असल्यानें त्या बेटांची तटबंदी करावी आणि तेथेंच अमेरिकेच्या युद्धाचा तळ ठेवावा, असें अमेरिकन सरकारनें योजिलें होतें. या ग्वाम बेटाच्या तटबंदीवरूनच प्रथम जपान व अमेरिका यांची कुसफूस सुरू झाली. इंग्लंडनें सिंगापूरचा तट बळकट करण्याची कामगिरी सुरू केली आणि अमेरिका ग्वाम बेटालाहि दुसरें सिंगापूर करू पाहात आहे,

असें दिसूं लागल्यापासून जपानला आपला दक्षिणेकडचा रस्ता रोखला जाणार हें कळून आलें आणि त्या वेळेपासून जपान हा युद्धाचें कांहीं तरी खुसपट काढण्याची संधि पाहात होता. ती संधि त्याला आतां मिळाली व तिचा त्यानें शक्य तितका फायदा झटपट करून घेण्याचा डाव साधला.

## उभय पक्षांच्या बलाबलाची तुलना

युद्ध जाहीर करण्याच्या आधींच अगाऊ आरमार पाठवून जपाननें अमेरिकेच्या पर्ल बंदराचा धुव्वा उडविला, वेक बेट हस्तगत केलें, ग्वाम वेढलें, मॅनिलांत सैन्य उतरविलें, थायलँडला शरण यावयास लावलें, मलायांत प्रवेश केला आणि सिंगापूर येथें तर प्रिन्स ऑफ वेल्स व रिपल्स यांसारखीं जंगी लढाऊ जहाजें बुडवून ब्रिटिश आरमारांत हाहाकार पसरविला. तरी पण शत्रु बेसावध असतांना मिळविलेले हे जय कितपत पचतील याची वानवाच आहे. अमेरिकेजवळ १५ लढाऊ जहाजें, ३५ क्रूझर्स, ५ विमानवाहक जहाजें, १७६ विनाशिका आणि ११५ पाणबुड्या आहेत. इंग्लंडचें आरमार यांच्याहूनहि अधिक आहे. मात्र तें सगळें पॅसिफिक महासागरांत एकदम येऊं शकत नसल्यानें पॅसिफिक महासागरांतील युद्धांत इंग्लंडचें आरमार एकाच वेळीं केवढें येईल हें निश्चित सांगतां येत नाहीं. अमेरिकेच्या आरमाराचे जे आंकडे दिले आहेत तेहि अटलांटिक व पॅसिफिक दोनहि मिळूनच आहेत. तथापि अमेरिका आपल्या आरमाराचा अधिकांत अधिक भाग पॅसिफिकमध्यें आणूं शकेल असें समजून चालण्यास हरकत नाहीं. अशा या संयुक्त आरमाराला तोंड देण्याला जपानजवळ १० लढाऊ जहाजें, ३० क्रूझर्स, १२२ विनाशिका, ८ विमानवाहक जहाजें अशी सामुग्री आहे. जपानच्या पाणबुड्या किती आहेत, याचा नक्की आंकडा जपाननें कोणास कळूं दिलेला नाहीं. विमानांची संख्या ही कोणत्याच राष्ट्राची आज निश्चित सांगतां येत नाहीं. कारण युद्धांत रोज विमानांची नासधूस सुरू आहे आणि नवीन विमानें बांधण्याचें कामहि सगळ्या देशांत चालूच आहे. अशा परिस्थितींत या युद्धाला यापुढें रंग कसा चढेल तें पाहूं.

## ब्रह्मदेशावर जपानचा डोळा

पॅसिफिक महासागरांतील बेटें काबीज करणें हेंच कांहीं जपानचें ध्येय नाहीं. जपानमधील वाढत्या लोकसंख्येसाठीं जपानला हीं बेटें हवींच आहेत. पण त्या बेटांतून जपानची औद्योगिक गरज भागविली जाणार नाहीं. जपानला पेट्रोल, तांबें, शिसें, कथील, रबर इत्यादि अनेक वस्तु पाहिजेत. त्या सगळ्यांचा पुरवठा होण्याचा प्रदेश म्हणजे ईस्ट इंडीज बेटें होत. त्याकरितां त्याला मलाया द्वीपकल्प आणि डचांच्या ताब्यांतलीं बेटें पाहिजे आहेत व त्या बेटांत प्रवेश मिळावा म्हणून जपाननें हें युद्ध सुरू केलें आहे. सिंगापूरचा ब्रिटिशांचा तळ या मार्गांत आडवा येतो, म्हणून सिंगापूरवर हल्ला करण्याची जपाननें तांतडी केली आहे. पेट्रोल व इतर अनेक खनिज द्रव्यें

ब्रह्मदेशांतूनहि मिळूं शकतील; यास्तव ब्रह्मदेशावरहि जपानचा डोळा आहे. ब्रह्मदेशांतून चीनला युद्धसामुग्री पुरविली जाते, याकरितांहि ब्रह्मदेशावर जपानचा रोख आहे. याकरितां वाटेंतील बेटांचा कांटा काढून नंतर जपान ईस्ट इंडीज बेटें, मलाया द्वीपकल्प व ब्रह्मदेश यांतून जिकडे सोयीस्कर पडेल तिकडे आपला मोर्चा वळवील.

## लिबियांत युद्धाला जोर चढेल

जपानच्या या आक्रमणामुळें इंग्लंड व अमेरिका या दोन्ही राष्ट्रांचें लक्ष पॅसिफिक महासागराकडे वळलें असून रशियाला युद्धसामुग्रीचा पुरवठा करण्याची त्यांची कामगिरी सहजच लंगडी पडेल. जर्मनीला हीच गोष्ट इष्ट होती व जपाननें युद्धाचें अरिष्ट आपणांवर ओढून घेऊन जर्मनीला उसंत घेण्याला संधि दिली. या संधीचा फायदा घेऊन जर्मनी रशियांतील आपली चढाई थोपवून धरून जिंकलेल्या प्रदेशाची मजबुती करण्याकडे तिचा उपयोग करणार आहे. त्याबरोबरच भावी चढाईची लष्करी योजना आणि संपत आलेल्या युद्धसामुग्रीचा नवा पुरवठा जर्मनी करून ठेवील असें वाटतें; मात्र रशियांतील युद्ध मंदावलें तरी अफ्रिकेंतील युद्ध न मंदावतां उलट अधिक जोरांत येईल. कारण इंग्लंडला सिंगापूरकडे अधिक आरमार पाठवावें लागल्यानें भूमध्य समुद्रावरील ब्रिटिश आरमाराचा पाहरा कमी पडून जर्मनीचें सैन्य क्रीटमधून आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उतरूं शकेल आणि सुएझ कालव्याच्या प्रदेशांत आणि लिबियांत युद्धाला जोर चढेल.

## हिंदुस्थानचें समाधान आधीं करा

ब्रह्मदेशांत युद्धाला तोंड लागल्यास हिंदुस्थानांतलें बरेंचसें सैन्य ब्रह्मी सरहद्दीकडे जाईल. त्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारास युद्धाची अधिक जय्यत तयारी करावी लागेल. ही तयारी निर्वेधपणें होण्याला हिंदी प्रश्नांचा उलगडा सरकारनें हिंदी जनतेच्या मनाजोगता करणें प्राप्त आहे. यास्तव सरकारला आपलें धोरण पूर्वीहून अधिक लोकमतानुवर्ति करावें लागेल. जपानच्या युद्धाचें संकट नजीक आलेलें जाणूनच भारतमंत्र्यांनीं तरी राजबंद्यांच्या मुक्ततेला परवानगी दिली असावी असा तर्क आहे. जपानी युद्धाची नांदी सुरू होण्यापूर्वीच सरकारला जर आपल्या धोरणांत एवढा इष्ट फेरबदल करावा लागला तर हें युद्ध ऐन रंगांत आल्यावर आपलें धोरण किती बदलावें लागेल याचा विचार करून सरकारनें आतांपासूनच हिंदी जनतेचें पूर्ण समाधान करण्याचा प्रयत्न सुरू करावा; नाहीं तर ही वेळ निघून गेल्यास 'बैल गेला नि झोपा केला' म्हणून हलहळण्याची पाळी येईल.

# सिंगापूर पडलें; आतां तरी कर्तव्य-मार्गाला लागा ८

[ जपानी योद्धयांनीं सिंगापूर हस्तगत केल्यानंतर पूर्वेकडील प्रदेशांत जो धोका निर्माण झाला त्याचें यांत वर्णन असून अशा संकटकालीं सरकारनें व प्रजाजनांनींहि आपआपलें कोणतें कर्तव्य जागरूकतेनें करावें याविषयीं या लेखांत इशारा दिलेला आहे. त्यांत सरकारनें जनतेला विश्वासांत घेऊन आणि राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनवून स्वराज्याच्या मार्गाकडे पावलें टाकावीं ही अशी विधायक सूचना आहे. तशीच जनतेनेंहि निष्कारण घबराट न वाढवितां एकदिलानें स्वसंरक्षणार्थ स्वयंसेवक-दलें उभारून आत्मसंरक्षणार्थ सज्ज राहावें अशीहि विधायक सूचना आहे. ]

युद्धाची परिस्थिति रोजच्या रोज अधिकाधिक घोर व चिंताजनक होत चालली आहे. पॅसिफिक महासागरांत जपाननें चढाई सुरू केल्यापासून त्याचा पाय मुळीं मागें आलाच नाहीं म्हटलें तरी चालेल. 'मी आलों, मी पाहिलें, मी जिंकलें' असें सीझरच्या विजयपरंपरेचें इतिहासप्रसिद्ध वर्णन आहे, तेंच आज प्रायः जपानास लागू पडत आहे. बेफिकीर, नालायक, कर्तव्यच्युत अमेरिकन लष्करी व वैमानिक अधिकाऱ्यांच्या घोडचुकीमुळें पर्ल बंदरांतील आरमार जपान्यांनीं बुडविलें, तेव्हांपासून एकामागून एक प्रचंड विजय जपान संपादन करीत आहे. 'रिपल्स्' व 'प्रिन्स् ऑफ वेल्स्' या ब्रिटिशांच्या जंगी बोटी जवळजवळ कागदाच्या होड्यांप्रमाणें बुडाल्या. हाँगकाँग पडलें, तेव्हांच ब्रिटिशांच्या साम्राजाला धक्का बसला व त्यांच्या नाविक सार्वभौमत्वाचा फुगा फुटला. मलाया जाऊन आतां सिंगापूर, कीं जें ब्रिटिश साम्राज्याचें पॅसिफिक महासागरांतील नाक म्हणून नांवाजलेलें होतें तेंच, दांतीं तृण धरून जपानला शरण गेल्याचें वृत्त आलें आहे.

## जपानी मोर्चा कोणीकडे वळणार ?

सिंगापूर तर शत्रूच्या हातीं गेलेंच, पण त्याचे परिणाम किती दूरवर पोंचणार याची नक्की अटकळ आजच करतां येणें शक्य नाहीं. तथापि सिंगापूर हातचें गेल्यानें पॅसिफिक महासागर जपानी आरमारास स्वैरसंचारास मोकळा सांपडला हें खरेंच. शिवाय यानंतर जावा, सुमात्रा इत्यादि बेटें काबीज करून जपान आपल्या युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याच्या जागा, वैमानिक हल्ला करण्यासाठीं लागणारीं केंद्रें वगैरे बाबतींत जास्त सुसज्ज होणार असें उघड दिसतें. सिंगापूर पडल्या-

( केसरी, दि. १७ फेब्रुवारी १९४२ )

कारणानें हिंदुस्थानबरोबरच ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशांनाहि धोका निर्माण झाला असल्याचें तिकडील जनतेला वाटत आहे. ब्रह्मदेशावर आक्रमण करून, रंगूनवर भयंकर बॉंबहल्ले करून, व हिंदी महासागरांत एक-दोन बोटी बुडवून हिंदुस्थानाविषयींचें आपलें आक्रमणाचें धोरण काय आहे तें जपाननें अगाऊ दिग्दर्शित केलें आहेच. एवढी गोष्ट निश्चित कीं, पॅसिफिक महासागरांतील ब्रिटिशांचा व्यापार आणि ब्रिटिशांचा राज्यविस्तार कांहीं कालपर्यंत तरी संपुष्टांत आला असून हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत जपानी युद्धाच्या ज्वाला प्रसृत होणार. जपानच्या हिंदुस्थानवरील आक्रमणाला बहुतकरून अंदमानपासून सुरुवात होईल, आणि सीलोन व मादागास्कर रोखून हिंदुस्थानची कोंडी करण्यांत येईल, असा तज्ज्ञांचा तर्क आहे. जपानच्या या युद्धप्रगतीबरोबर हिंवाळ्यानंतर जर्मनी काय करणार याचा विचार केला, तर त्याची रशिया व ईजिप्त या रणक्षेत्रांवर जोराची धडकी बसेल आणि त्या धडकीचा परिणामहि सिंध व वायव्य-सरहद्दप्रांत या बाजूच्या हिंदभूमीला भोगावा लागेल अशी धास्ती वाटते.

### चिंता व भीति यांचें साम्राज्य

हें कसकसें होईल तें पुढें दिसेलच. तूर्त जपानी युद्ध एका बाजूनें हिंदुस्थानच्या अंगाशीं येऊन चिकटलें आहे यांत संशय नाहीं. सिंगापूर घेण्यापूर्वीच मार्ताबान, मौलमीन, रंगून या ठिकाणीं जे वैमानिक जपानी हल्ले चालू होते व ज्या हल्ल्यांत कित्येक ब्रह्मी व हिंदी लोक मृत्युमुखीं पडले, त्याचा परिणाम नजीकच्या कलकत्ता, डाक्का या शहरांवर व भागावरच नव्हे, तर मुंबई, पुणें, मद्रास या दूरच्या स्थळींहि थोडथोडा दिसूं लागला होता. जपाननें ब्रह्मदेशावर स्वारी केल्यापासून तर कलकत्त्याहून सहा लक्ष लोक शहर सोडून रेल्वेनें बाहेरगांवीं गेले, असें रेल्वे-खात्यानेंच प्रसिद्ध केलें आहे. हा सर्व प्रकार सिंगापूर पडण्यापूर्वीच झाला; मग आतां तर काय विचारावयासच नको. संक्षेपानें लिहावयाचें म्हणजे जनतेच्या मनाची अतिशय चलबिचल झाली आहे व सामाजिक स्थैर्याचा कांटा ढळला आहे. शहरें सोडून खेडेगांवांत जाऊन राहावें, जिंदगीची कांहीं तरी व्यवस्था करावी, मुलांबाळांस व स्त्रियांस सुरक्षित स्थळीं पोंचवावें, असे विचार जनतेंत बरेच रूढ होऊं लागले आहेत. एकंदरीनें चिंता व भीति यांचें साम्राज्य जनतेच्या मनांत दृढमूल होत आहे, असें स्पष्ट दिसतें.

### सरकारच्या शंभर चुका

प्रस्तुतच्या भीतिप्रद परिस्थितीचा सरकारनें नीट परामर्श घेण्याची वेळ आतां आली आहे. जर्मन युद्धास तोंड देण्याची सिद्धता जी काय करावयाची असेल ती सरकार करील. त्या बाबतींत सरकारनें शंभर चुका आतांपर्यंत केल्या आहेत व अजूनहि करीत आहे. दूरदर्शी ब्रिटिश मुत्सद्दी, विचारवंत

ब्रिटिश वृत्तपत्रें व जबाबदार हिंदी पुढारी, हिंदी प्रश्न ताबडतोब सलोख्यानें सोडवा, असें एकसारखें आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत असतांहि, ब्रिटिश सरकार त्यांच्याकडे लक्ष देत नाहीं. रशियन जनता व चिनी जनता हातावर शीर घेऊन हिरीरीनें आपआपल्या मायभूमीच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं लढत आहे. तशीच स्फूर्तिदायक भावना हिंदी जनतेंत उत्पन्न होईल असें करा, अशी मागणी सरकारकडे केली गेली असतां तिचा बिनदिक्कत अव्हेर केला जात आहे. मध्यवर्ति राज्यकारभारांत राष्ट्रीय सरकार अधिकारारूढ करा, अशी मागणी नेमस्त मतप्रणालीच्या पुरस्कर्त्यांनीं सरकारकडे केली तरी तिचाहि स्वीकार होत नाहीं ! चिनी सैन्य हिंदभूमीवर लढण्यास आणलें जातें; ऑस्ट्रेलियन लष्करी अधिकारी हिंदी पलटणींत नेमले जातात; सर्व देशांना अटलांटिक सनद लागू, पण हिंदुस्थानला मात्र ती लागू नाहीं, असा नकार देण्यास सरकारला दिक्कत वाटत नाहीं ! युद्धकाल असून सीरियाला स्वातंत्र्य दिलें जातें व नव्या अँग्लो-पर्शियन तहानें इराणी स्वातंत्र्याचा आदर करून त्याच्या रक्षणाची हमी घेण्यांत येते; पण हिंदुस्थानला स्वातंत्र्य न देण्यांत युद्धकालाची सबब खुशाल वारंवार पुढें करण्यांत येते !

### मुलकी रक्षणाची योजना

तथापि आजचा तो मुख्य प्रश्न नाहीं. बिनलष्करी हिंदी जनतेचें संरक्षण व धारणपोषण करण्याकरितां सरकार काय करीत आहे व त्यानें काय करावें हा आजचा प्रश्न आहे. हिंदुस्थानांत शांतताभंग झाला, बंडाळी माजली, अराजक निर्माण झालें तर त्याचा प्रतिकार करण्याकरितां सरकारनें काय योजना केली आहे, यासंबंधीं परवा दि. १४ रोजीं मध्यवर्ति लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत प्रश्न विचारण्यांत आले. त्यास गृहमंत्री सर रेजिनॉल्ड मॅक्सवेल यांनीं उत्तर दिलें कीं, राज्यरक्षणकानू व इतर खास कायदे व वटहुकूम त्यांच्यायोगें सरकारनें आवश्यक ती व्यापक सत्ता आपल्या हातीं घेतली आहे; मुलकी संरक्षणखातें स्वतंत्र रीतीनें सुप्रतिष्ठित करण्यांत येत आहे; जनतेचें मनोधैर्य अचल राखण्याचा प्रयत्न तें खातें करीत आहे; तीस हजार जादा पोलीसभरती करण्यांत आली आहे. शिवाय पांसष्ट हजार नगररक्षक आहेतच; फितुरी हुडकून काढण्याची खबरदारी घेण्यांत येत आहे; प्रांतास व स्थानिक अधिकाऱ्यांस जरूर ते विशेष हक्क देण्यांत आले आहेत. अशी ही संरक्षणाची योजना असल्याचें गृहमंत्री मॅक्सवेल यांनीं निवेदन केलें. हिंदुस्थानचा अफाट विस्तार व त्याची निःशस्त्र चाळीस कोटि जनता यांचा विचार केला, तर ही योजना अगदीं अपुरी आहे असें म्हटल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

### जीवनाच्या गरजा भागवा

येथल्या येथें भरपूर हिंदी लष्कर उभारून तें देशरक्षणास सायसंगीन व

समर्थ आहे, असा विश्वास हिंदी लोकांत सरकारनें उत्पन्न केला पाहिजे. युद्धाची परिस्थिति कशीहि विपरीत झाली तरी सरकार लोकांचें रक्षण करूं शकतें व त्यांस खाण्यापिण्यास पुरेसें पुरवूं शकतें ही खात्री लोकांची असली तर त्यांची मनःस्थिति सहसा घाबरटपणाची होत नाहीं. या दृष्टीनें वाहतुकीची व महर्घता-नियंत्रणाची, तशीच नियंत्रित माल ठराविक दरानें लोकांस मिळण्याची व्यवस्था सरकारनें करावयास पाहिजे. मध्यवर्ति असेंब्लींत कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या दुर्दशेचा प्रश्न चर्चेकरितां निघाला असतां, सरकारनें जी वृत्ति दाखविली तिजवरून व नुकत्याच दिल्लीस झालेल्या महर्घता-नियंत्रण परिषदेंत सरकारनें जें धोरण प्रदर्शित केलें त्यावरून असंख्य गरीब व मध्यम वर्गाच्या लोकांच्या जीवनाच्या गरजा भागविल्या जाण्यास नेमकें काय केलें पाहिजे, याची जाणीव सरकारास नाहीं असें आश्चर्यानें व खेदानें म्हणावें लागतें. युद्धपरिस्थितीच्या धामधुमींत शांतताभंग होण्याची जीं अनेक कारणें संभवतात, त्यांपैकीं उपासमार हें एक कारण होय हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. 'बाजार भरला कीं उचल्यांचें फावतें' या न्यायानें जे समाज-कंटक भेदरलेल्या जनतेचें कपाळ निष्कारण छिनतील त्यांचें पारिपत्य योग्य रीतीनें झालेंच पाहिजे. त्याबरोबरच दुःस्थितींत जी वाटमारी व लूटालूट होण्याची भीति असते, तिचेंहि नियंत्रण अंगभर कपडालत्ता व पोटभर जेवण मिळण्याची चांगली तरतूद झाल्यानेंच होऊं शकेल.

### स्वयंसेवक-संस्थांशीं सहकार्य

अर्थात् या सर्व प्रचंड व सुयंत्र योजनेची उभारणी सरकार एकटें करूं शकणार नाहीं. सरकारासहि ही गोष्ट पटली आहे; म्हणून गृहमंत्री सर रेजिनॉल्ड मॅक्सवेल यांनीं आपल्या उत्तरांत सार्वजनिक साहाय्याची आवश्यकता अपेक्षिली आहे. याचा अर्थ, सरकारनें बिनसरकारी संस्थांचें सहकार्य मोकळ्या मनानें व त्यांजवर विश्वास टाकून स्वीकारलें पाहिजे हाच होय. सरकारी संस्थांस व अधिकाऱ्यांस जी मान्यता सरकारदरबारीं प्राप्त होते व होईल तीच मान्यता खाजगी स्वयंसेवक-संस्थांस व त्यांच्या अधिकाऱ्यांस सरकारकडून मिळाली पाहिजे. अशा खाजगी संस्थांशीं सरकारी धोरण कसें असावें हें अद्यापि ठरलें नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. अशा संस्थांशीं सरकारनें आपुलकीचें व विश्वासाचें नातें जोडलें, तरच सरकारचें जनरक्षणाचें कार्य सुलभ होईल व जनतेलाहि आपली चिंता कांहीं अंशीं तरी दूर झाली असें वाटेल. सरकार जर अशा निकराच्या, जीवन-मरणाच्या, प्रसंगींहि जनतेच्या पुढाऱ्यांविषयीं आपला पिढीजात गैरविश्वास दाखवीत राहील, तर जनतेंत बेदिली माजेल व शांततारक्षण करणें सरकारच्या आवाक्याबाहेर जाईल.

### जनतेचें कर्तव्य

युद्धासारख्या प्राणसंकटाच्या वेळीं हिंदी जनतेनें आपल्यापरी आपलें कर्तव्य न

डगमगतां धीरमनस्कतेनें करीत राहिलें पाहिजे. स्वावलंबी होऊन, स्वयंसेवकदलें सज्ज करून, मतभेद व यादवी यांचा नायनाट करून, एकदिल होऊन, शहरोशहरीं व गांवोगांवीं लोकांस धीर देण्याचें व शांततारक्षण करण्याचें कार्य स्वार्थत्यागपूर्वक व सेवाबुद्धि सदैव जागृत ठेवून एकसूत्रीपणानें केलें, तरच हिंदी जनतेचा तरणोपाय आहे. भयग्रस्त होऊन शहरें सोडून जाण्यानें आखिल भारताचा प्रश्न सुटणार नाहीं. तसेंच जनतेनें हेंहि लक्षांत ठेवावें कीं, ज्या गांवांचा किंवा बंदरांचा युद्धकार्याशीं साक्षात् संबंध नाहीं, तीं गांवें किंवा बंदरें सोडून दुसरीकडे जाण्याचें कांहीच कारण नाहीं. गांवांतल्या गांवांत राहूनच अंतर्गत शांतता कशी राखतां येईल याचा विचार पुढाऱ्यांनीं करावा. सहकार्यानें हें राष्ट्रव्यापी कार्य करण्याचा उत्तम मार्ग नेहमीं अग्रगामी असणाऱ्या मुंबई शहरानें दाखवून दिला आहे. त्या शहरांतील सर्व पक्षांच्या व सर्व वर्गांच्या वजनदार पुढाऱ्यांनीं मुंबईच्या शेरिफास मुलकी संरक्षणाचा विचार व योजना करण्याकरितां प्रातिनिधिक नागरिक-सभा भरविण्याची विनंति केली. तिला अनुसरून काल सोमवारींच मुंबईस सभा होऊन योजनेचें काम चालू झालें आहे. इतर शहरांत व गांवांत अशाच तऱ्हेचे प्रयत्न होणें अगत्याचें आहे. स्थानिक संस्था, म्युनिसिपालिट्या, जिल्हाबोर्डें, ग्रामपंचायती इत्यादि संस्थांनीं स्थानिक संरक्षणाची सर्वपक्षीय संघटित योजना आंखण्याच्या कामीं आतां पुढाकार घेतला पाहिजे व सर्व जनतेनें एकोप्यानें सहकार्य करण्यास पुढें आलें पाहिजे. वर्धा येथें जी भारतीय कॉंग्रेस समितीची सभा झाली तींत यासंबंधीं कांहीं आदेश संमत करण्यांत आले आहेत. त्यांत कॉंग्रेसव्यतिरिक्त स्वयंसेवक-संस्थांशीं व जरूर तर सरकारशीं सहकार्य करावें असें म्हटलें आहे. या आदेशानुसार कॉंग्रेसचे अध्यक्ष मौ. अबुल कलम आझाद, पं. जवाहरलाल नेहरू व राजगोपालाचार्य यांचीं जीं भाषणें होत आहेत त्यांतहि सर्व पक्षांशीं राष्ट्रीय सभेनें सहकार्य करण्यावरच मुद्दाम भर देण्यांत येत आहे.

## सहकार्य हाच तरणोपाय

परंतु सांप्रतचा राष्ट्रावरील प्रसंग इतका 'तडातडी'चा आहे कीं, आतां सर्वांनीं पक्षाभिनिवेश स्थगित करून ' सहनाववतु, सहवीर्यं करवावहै ' असें म्हणण्याची पाळी आली आहे. सरकारशीं सहकार्य करावयाचें कीं नाहीं, अमुक केलें कीं सहकार्य होतें कीं नाहीं, तमुक कृत्य केल्यानें पक्षाची निष्ठा राखली जाते कीं नाहीं, याची सूक्ष्म चिकित्सा करण्याची ही वेळ नव्हे. आपल्या आळीचें, गांवाचें, आपल्या जिल्ह्याचें, आपल्या प्रांताचें व आपल्या राष्ट्राचें संरक्षण करण्यास व आपल्या देशबांधवांस धीर देऊन, शांत राखून, त्यांचें रक्षण करण्यास आपण स्वयंसेवक या नात्यानें काय करावें याचेंच चिंतन प्रत्येक सुबुद्ध व विचारी माणसानें केलें पाहिजे व तत्संबंधीं जें कर्तव्य त्यांस करतां येईल तें त्यानें नेटानें पार पाडलें पाहिजे. राष्ट्राचें संरक्षण व जनतेची

सेवा हे दोनच आजचे अतिशय गंभीर व जिव्हाळ्याचे प्रश्न आपणांसमोर आहेत. सरकार, लोकाग्रणी व सामान्य जनता यांच्या सहकार्यानेंच ते सुटूं शकतील. तसें सहकार्य व्यवहारांत सिद्ध होवो व परिणामीं सफळ होवो एवढीच आमची मनापासून इच्छा आहे.

---

# ब्रह्मदेश गेला, आसाम तरी नीट सांभाळा ! ९

[ दुसऱ्या महायुद्धांत जपान सामील होऊन त्यानें प्रथम सिंगापूर हस्तगत केलें आणि तेथून उत्तरेस कूच करीत करीत ब्रह्मदेशहि सगळा व्यापला. ब्रह्मदेशाची दुर्दशा करून जपानी सैन्य हिंदुस्थानांतील आसाम प्रांताच्या सरहद्दीनजीक येऊं लागलें. त्या वेळीं आसामचा तरी लष्करी बंदोबस्त नीट करून हिंदुस्थानवरील जपानी आक्रमण टाळण्याविषयींचा इशारा या लेखांत देण्यांत आला आहे. ]

### युद्धाची यथार्थ वार्ता

प्रत्यक्ष युद्ध संपून गेल्यावर कांहीं दिवसांनीं त्याची खरी हकीकत कोणत्या तरी रूपानें बाहेर येते, असा साधारण युद्धेतिहासाचा नियम आहे. त्याप्रमाणें सर्व ब्रह्मदेश आता प्रायः जपानच्या ताब्यांत जाऊन किरकोळ गनिमी काव्याच्या चकमकीखेरीज तेथील युद्ध संपुष्टांत आल्यावर त्या युद्धाची बऱ्याच अंशीं यथार्थ स्थिति जनतेसमोर येऊं लागली आहे. विलायतेंतील 'डेलि टेलिग्राफ' व 'मॉर्निंग पोस्ट' या वृत्तपत्रांचे वार्ताहर मि. मार्सलंड गँडर यांनीं आसाम-ब्रह्मदेश या सरहद्दीवरून ब्रह्मी युद्धाचें समीक्षण करणारें पत्रक आपल्या पत्रांस पाठविलें तें येथें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. एका हिंदी युद्ध-निरीक्षकानेंहि आपल्या पाहणीचें इतिवृत्त जाहीर केलें आहे. मि. गँडर यांनीं जें समीक्षणपर पत्रक इंग्लंडांत पाठविलें, तें स्वतः सरसेनापति वेव्हेल यांच्याशीं सल्लामसलत करूनच तयार केलें असल्याकारणानें सर्वस्वी अधिकृत समजण्यास हरकत नाहीं. या दोहोंशिवाय गेल्या आठवड्यांत कॉमन्स सभेंत युद्धचर्चा झाली, तिच्या अनुषंगानें माजी युद्धमंत्री मि. होअर-बेलिशा यांनींहि ब्रह्मी युद्धाच्या स्थितीचें तशाच स्वरूपाचें चित्रण आपल्या भाषणांत केलें.

### ब्रह्मी युद्धाचें खरें चित्र

वरील तीन साधनांच्या साहाय्यानें ब्रह्मी युद्धाचें जें चित्र कल्पनेपुढें काढतां

---

( केसरी, दि. २६ मे १९४२ )

येतें, तें अतिशय विस्मयावह व उद्वेगजनक वाटतें. लष्करी अधिकारी त्या परिस्थितीवर कितीहि रंगसफेती करोत व आपल्या अपुऱ्या लष्करी सज्जतेवर भपकेबाज पांघरूण घालोत; अशा वरपांगी उपायांनीं खरें चित्र लपूं शकणार नाहीं. आज दोस्तांचें ब्रम्हदेशांत उरलेलें सारें सैन्य हिंदी सरहद्दीकडे माघार घेतां घेतां चिंदविन नदीवर कालेवा येथें तूर्त सुरक्षित स्थळीं तळ देऊन राहिलें आहे. जपानच्या युद्धांत किती सैन्य बळी पडलें, किती सैन्य कैद झालें, त्याचे आंकडे इतक्यांत कळणें शक्य नाहीं. ही माघार अतिशय तडफेनें व कौशल्यानें घेण्यांत आली, सर्वच पीछेहाटी म्हणजे कांहीं पराभवात्मक नसतात. आमच्या सैन्याचें मनोधैर्य शाबूत आहे, अशी मखलाशी दोस्तांचे लष्करी अधिकारी करीत आहेत. या सैन्यांत अर्थात् हिंदी सैन्यच बहुसंख्य आहे. अशा स्थितींत या सारवासारवीनें हिंदी लोकांचें समाधान होणार नाहीं किंवा त्यांची दिशाभूलहि होणार नाहीं. मार्चमध्ये रंगून पडल्यावर कसें तरी करून जपानी आक्रमण पावसाळ्यापर्यंत अधिक क्षेत्रांत पसरूं द्यावयाचें नाहीं इतकेंच ध्येय आम्ही ठेवलें होतें, असें सेनापति वेव्हेल म्हणतात व त्यांचे दुय्यम सेनापति अलेक्झांडर यांनीं तें काम उत्तम रीतीनें केलें असें त्यांचें समर्थन करण्यांत येतें.

### हीच का चढाई ?

परंतु तें तरी कितपत साधलें आहे ? जपानी सेनेनें ब्रिटिश व हिंदी सैन्य आणि चिनी सैन्य यांची प्रथम ताटातूट केली. ब्रिटिश व हिंदी सैन्यास सर्व बाजूंनीं घेरून त्यास जपानी सेनेनें हिंदी सरहद्दीपर्यंत मागें रेटलें व चिनी सैन्याचा पराभव करून चीनच्या युनान प्रांतांत प्रवेश केला आहे, अशी आजची स्थिति आहे. हेच सेनापति अलेक्झांडर ' चढाई, चढाई, चढाई ' असा विक्रमशाली जयघोष करीत ब्रह्मदेशांत गेले होते व त्यांनीं आपल्या सैन्याचें नेतृत्व स्वीकारलें होतें. मग त्यांचा जयघोष एकाएकी कसा जिरला याचें आश्चर्य वाटतें ! रंगून गेल्यावर अलेक्झांडर यांच्या सैन्यास कुमक, रसद, अन्नपाणी यांचा जरूर तेवढा पुरवठा खुष्कीच्या मार्गानें कां करतां आला नाहीं ? या सैन्यास वैमानिक संरक्षण जितकें मिळावयास पाहिजे होतें तितकें कां मिळूं शकलें नाहीं ? स्थानिक ब्रह्मी जनता सर्वस्वी राजनिष्ठ होती, ती फितूर झाल्याची जी बातमी पसरली होती ती खोटी होती, असें ब्रह्मदेशचे निर्वासित गव्हर्नर दिल्लीस आल्यावर आपल्या भाषणांत म्हणाले होते. तरी ' ब्रह्मी लोक आमच्या सैन्याच्या पाठींत खंजीर खुपसण्यास तयार होतेच ' असा वर उल्लेखिलेल्या विलायतच्या बातमीदारानें निर्देश केला आहे. यावरून ब्रह्मदेशच्या गव्हर्नरनें व बहुधा इतर अधिकाऱ्यांनींहि ब्रिटिश सरकारचा व लष्करी सेनानींचा ब्रह्मी जनतेच्या सहानुभूतीविषयीं गैरसमज करून दिला असावा हें उघड दिसतें.

## फुशारकी नको, बोध शिका

जपानी शिपाई हे कांहीं कोणी मानवी कोटीच्या बाहेरील अदमी नव्हत; त्यांची सायसंगीन सज्जता अधिक आहे इतकेंच; बाकी एका पातळींत ते व आमचे सैनिक उभे राहिले, तर आम्हीच त्यांस भारी आहोंत, अशी फुशारकी ब्रिटिश लष्करी निरीक्षक व अधिकारी यांनीं मारली आहे. तथापि ही फुशारकी विशेष अभिमानास्पद नाहीं. जपान्यांच्याइतकी सिद्धता करण्यास ब्रिटिशांचे कांहीं कोणी हात धरले नव्हते. ब्रह्मी-आसामी सरहद्दीवर आम्ही कडेकोट बंदोबस्त केला आहे, आतां जपानची स्वारी आमच्याकडे वळली तर आम्ही तिला पूर्णपणें तोंड देऊं, असेंहि त्या अधिकाऱ्यांनीं घोषित केलें आहे. ही त्यांची घोषणा सार्थ होवो, अशीच हिंदी जनतेची इच्छा असणार हें सांगावयास नको. परंतु नुसत्या शब्दाविष्कारानें आणि इच्छेनें कोणतेंहि उद्दिष्ट फलित होत नाहीं, हें सरकारानें व त्याच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं नीट ध्यानीं आणलें पाहिजे व हाँगकाँग, सिंगापूर, मलाया, ब्रह्मदेश यांच्या लढ्यांपासून जो बोध शिकावयाचा तो सत्वर शिकला पाहिजे.

## चिनी जनतेची उकडहंडी होईल

ब्रह्मी युद्धाची इतिश्री करून जपाननें आपला मोर्चा चीनकडे वळविला आहे असें दिसतें. हिंदी-ब्रह्मी-चिनी रस्ते जेवढे नवे-जुने असतील ते सारे बंद करून, मुख्यतः अमेरिकेकडून चीनला प्राप्त होणारा मदतीचा प्रवाह स्थगित करावयाचा व चोहोंबाजूंनीं नाकेबंदी करून चिनी जनतेची उकडहंडी करावयाची, असा जपानी लकराचा यापुढील डाव असावा. बाहेरून जमिनीवरून येणारी मदत संपणार; चिनी समुद्रकिनारा जपानी लष्कराच्या ताब्यांत आहेच; ब्रह्मदेशांत जपानी सैन्याच्या पांच पलटणी आहेत त्या युनान प्रांत जिंकावयास रवाना होत आहेत; फूचौ येथें जादा जपानी सैन्य सैन्यवाहू जहाजांतून उतरत आहे; पेकियांग प्रांतांतून मार्शल चांग-कै-शेक यांच्या राजधानीच्या म्हणजे चुंकिंगच्या रोखानें जपानी सैन्य कूच करीत चाललेंच आहे ! अशा रीतीनें सांप्रत पांच-सहा दिशांनीं चीन देशावर जपानी सैन्य आक्रमण करण्यास निघालेलें आहे. यावरून आतां गेलीं पांच वर्षें चिघळत असलेलें चीनचें प्रकरण संपवावें, असा जपानी सरकारचा इरादा दिग्दर्शित होत आहे. आसाम, मणिपूर या भागांत आतां पावसाळा जोराचा सुरू होणार; यास्तव चार महिने तरी त्या भयंकर डोंगराळ व घनदाट जंगली भागांत 'सेनापति पर्जन्याच्या' सैन्यधारांबरोबर दोन हात करण्याचें सोडून, आसाम-बंगालच्या सरहद्दीवर कांहीं महत्त्वाच्या भागावर तुरळक बाँबहल्ले करण्यापलीकडे आपण जास्त कांहीं करूं नये, असें जपानी लष्करी धोरणाच्या सूत्रचालकांनीं योजिलें असावें. चुंकिंग शहर खालीं करण्यांत येत आहे, असें चिनी तारच सांगत आहे. जपानमध्यें 'नॅशनल सर्व्हिस पोलिटिकल कौन्सिल' या नांवाची जपानी पार्लमेंटच्या सभासदांची एक नवी

संस्था स्थापित झाली आहे. तिचें उद्घाटन करतांना या युद्धाचें ‘ पूर्व आशियाचें मोठें युद्ध ’ असें वर्णन जपानी मुख्य प्रधान टोजो यांनीं केलें आहे, यावरून वरील तर्कास पुष्टि मिळते.

## मलायांतील घोडचुका

हें अनुमान खरें ठरलें व हिंदुस्थानवरील जपानी हल्ला चार महिने लांबणीवर पडला, तर या संधिकालाचा भरपूर उपयोग करून, जपानी लढाईचा वणवा अमेरिकेच्या पर्ल बेटावर लागल्यापासून, ज्या चुका संयुक्त सरकारांच्या धोरणांत झालेल्या उघडकीस आल्या त्या दूर करण्याचा कसून प्रयत्न त्यांजकडून झाला पाहिजे. ब्रह्मी युद्धाच्या ब्रह्मघोटाळ्यापासून तर बराच बोध ब्रिटिश सरकारांस घेतां येण्यासारखा आहे. सिंगापूरच्या नजीक मलायांतील जोहोर संस्थानांत सर रिचर्ड विन्स्टेड या नांवाचे एक ब्रिटिश मुत्सद्दी सर्वसाधारण सल्लागार म्हणून होते. त्यांनीं ‘ डेली टेलिग्राफ ’ या ब्रिटिश वृत्तपत्रांत एक पत्र परवा प्रसिद्ध केलें आहे व त्यांत मलायांतील वस्तुस्थितीचें वर्णन केलें आहे. “ मलायांतील लोक मोठे धीराचे आहेत. ते कडवे देशभक्त आहेत. मलायाचें रक्षण करण्यास अवघ्या दोन रेजिमेंट्स् होत्या. मग त्या लोकांनीं आपलें रक्षण कसें करावें ! त्या रेजिमेंट्स्बरोबर अधिकारी होते त्यास मलायाची माहिती नव्हती; त्या लोकांची भाषाहि त्यांस येत नव्हती. अधिक सैन्याच्या पलटणी मलायांत कां उभ्या केल्या नाहींत, जाणते लष्करी अधिकारी कां तयार केले नाहीत, याचा इंपीरियल डिफेन्स कमिटीनें जाब दिला पाहिजे. ब्रिटिश इभ्रतीस जबरदस्त धक्का बसला आहे. ज्यांचें संरक्षण करण्याची आपण हमी दिली व ज्यांस आपण बांचवूं शकलों नाहीं त्यांस नांवें तरी ठेवूं नका. आपण ज्या देशास तोंडघशी पाडून जो देश सोडला व ज्याला जपानशीं सहकार्य करण्याची बतावणी कदाचित् करावी लागेल, त्यावर सूड घेण्याची कल्पना देखील मनांत आणूं नका. ” सर रिचर्ड यांच्या पत्राचा सारांश येणेंप्रमाणें आहे. त्यांत ब्रिटिश सरकारच्या भावी धोरणाच्या व हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीनें शिकण्यासारखें बोधामृत आकंठ भरलेलें नाहीं काय !

## वरातीमागून घोडें कशाला ?

हें मलायाचें झालें. ब्रह्मदेशाच्या युद्धाची जी स्थिति लष्करी व राजकारणी अशा अधिकारी लोकांनीं वर्णिली आहे, तिजवरून सुद्धां ब्रिटिश सरकारास वेळेवर शहाणें व्हावयाचें असेल, तर पुष्कळ शहाणपणा शिकतां येईल. ब्रह्मी युद्धांत दोस्तांची वैमानिक तयारी अगदीं जुजबी होती. म्हणून रंगून, मंडालें, लॅशियो वगैरे महत्त्वाचीं केंद्रस्थानें शत्रूच्या आहारीं लवकर गेलीं. रंगून गेलें तेव्हां सर्व ब्रह्मदेशाचें नाक कापलें गेलें असें झालें. मलाया जपानच्या राज्यांत समाविष्ट झाल्यावर व त्यांतील वैमानिक स्थानें शत्रूकडे गेल्यावर त्या स्थानांचा पुरेपूर उपयोग जपान करणार व ब्रह्मी शहरांवर

हवाई हल्ला करणार, हें कोणीहि सांगू शकलें असतें. तरी देखील ब्रिटिश सरकारनें रंगून वगैरे शहरांचा पक्का वैमानिक बंदोबस्त केला नाहीं. रंगून पडल्यावर ब्रिटिश व हिंदी सैन्याच्या रसदीची वगैरे तजवीज व्हावी तशी झाली नाहीं. स्थानिक ब्रह्मी जनतेचा मनापासून पाठिंबा लष्करास मिळणें अवश्य होतें तो खात्रीचा आणि योग्य प्रमाणांत लाभला नाहीं. वरातीमागून घोड्याप्रमाणें येणाऱ्या अमेरिकन विमानांनीं व उडत्या किल्ल्यांनीं जपाननें कबजांत घेतलेल्या शहरांवर बॉंबहल्ले केल्यानें गेलेला देश साक्षात् परत घेण्याकडे कितपत उपयोग होईल ? त्यापेक्षां तीं विमानें नवी सरहद्द सांभाळण्यास उपयोगांत आणणें बरें नव्हे काय?

**जर्मनी व जपान यांस शह द्या**

याच्या उलट रशियांत काय स्थिति आहे पाहा. जर्मनीची वासंतिक चढाई सुरू होऊन तीन आठवडे झाले तरी, जर्मनीची प्रगति पाहिल्याप्रमाणें होत नाहीं. इतकेंच नाहीं, तर खारकोव्हच्या आघाडीवर रशियानें जर्मनीला कांहींसें मागेंच लोटलें आहे व कर्चच्या सामुद्रधुनीच्या आघाडीवर जर्मनीची प्रगति मोठ्या जिकिरीनें भरमसाठ सैन्य बळी देऊन मगच होत आहे. रशियन जनता युद्धांत अंतःकरणपूर्वक सामील आहे हें याचें एक प्रमुख कारण होय. अखिल रशियांत सर्व जनतेची राष्ट्रीय आघाडी लढाईस दंड थोपटून सज्ज आहे. या गोष्टींचाहि ब्रिटिश सरकारनें विचार केला पाहिजे. जिब्राल्टर काय व माल्टा काय, गट्टी राष्ट्रांनीं अद्यापि घेतलें नाहीं. लीबियांत उभयपक्षांचीं सैन्यें समोरासमोर जवळजवळ तुल्यबल अशा अवस्थेंत ठाकलेलीं आहेत. दोस्त राष्ट्रें बेंगाझी, गझाला या शहरांवर बॉंबहल्ले करतात, तर जर्मन विमानें कैरो, अलेक्झांड्रिया या शहरांवर हवाई हल्ले चढवितात. लीबियांत कांहीं झालें तरी जर्मनीनें कॉकेशस, बाकू हा भाग काबीज केला तर हिंदुस्थानला त्या बाजूनें धोका वाढणार असें खास समजलें पाहिजे. दोस्त राष्ट्रांनीं आयर्लंडमध्यें अमेरिकन, कॅनेडियन वगैरे सैन्य आणून ठेवलें आहे. त्याच्या साहाय्यानें युरोपमध्यें दुसरी आघाडी निर्माण केली व जर्मनीला मागून शह दिला तरच जर्मनीची रशियांत होणारी प्रगति अडविली जाईल. तसेंच अमेरिकन विमानांनीं जपानवर एकदांच यशस्वी हवाई हल्ला केला, त्याचा पाठपुरावा मुळींच केला नाहीं. तसें न करतां ते हल्ले चालू ठेवले व वाढविले तरच जपानचें तोंड सध्यां जें ब्रह्मदेशावरून हिंदुस्थान, सिलोन यांच्याकडे वळलें आहे तें थोडेसें तरी मागें फिरेल. दोस्त राष्ट्रांकडून यांपैकीं कांहींच घडलें नाहीं तर जर्मनी व जपान या दोघांच्या दोन दिशांकडून होणाऱ्या आक्रमणाच्या अडकित्त्यांत हिंदुस्थान सांपडेल; अशा कठीण परिस्थितींत हिंदुस्थानचें संरक्षण ब्रिटिश सरकारास करावयाचें असल्यानें त्यानें हॉंगकॉंग, मलाया, सिंगापूर, ब्रह्मदेश यांच्या युद्धांतील पराजयामुळें दृष्टोत्पत्तीस आलेल्या लष्करी धोरणाच्या घोडचुका दुरुस्त कराव्या आणि हिंदुस्थानांत सरकार व जनता एकरूप आणि एकजीव करून जपानला निकरानें तोंड द्यावें.

## महायुद्धाचा रंग पालटला १०

[ अमेरिका महायुद्धांत सामील होऊन अकरा महिने झाले तरी अमेरिकन सैन्याचा कोठेंच प्रभाव दिसून आला नाहीं; आणि उत्तर-आफ्रिकेंत तर जर्मन सेनापति रोमेल यानें ईजिप्तवर चढाई करून इंग्लंडचें नाक छाटण्याचा घाट घातला; तेव्हां चर्चिल व रूझव्हेल्ट यांनीं आफ्रिकन किनाऱ्यावर एका सुरक्षित स्थळीं भेटून, आठ दिवस लष्करी तज्ज्ञांसह वर्तमान वाटाघाटी करून, भावी मोहिमेचें धोरण ठरविलें आणि उत्तर-आफ्रिकेंत फ्रेंचांच्या मुलुखांत सैन्य उतरवून रोमेलला पिछाडीकडून शह द्यावा आणि ब्रिटिश सैन्यानें ईजिप्तमधून रोमेलच्या आघाडीवर हल्ला चढवून त्याचा मोड करावा, अशी योजना आंखण्यांत आली. ती योजना सफळ होऊन अमेरिकेचें ८ लक्ष सैन्य आफ्रिकेच्या उत्तर-किनाऱ्यावर उतरलें आणि तिकडे ब्रिटिश फौजेनें रोमेलचा पराभव करून त्याला मागें रेटलें. या डावपेचांनीं महायुद्धाचा रंग पालटला असें भाकित या लेखांत केलें असून तें भाकित खरें ठरलें; कारण या वेळेपासून गट्टी राष्ट्रांची एकसारखी पीछेहाटच होत चालली. ]

अमेरिका युद्धांत पडून अकरा महिने होत आले तरी अमेरिकेच्या सैनिकांचा प्रभाव कोठेंच व्यक्त झाला नव्हता; पण आतां उत्तर आफ्रिकेंतील स्वारीचा मुख्य भार आपणांवर घेऊन अमेरिकेनें हिंमतीची चढाई सुरू केली आहे आणि गट्टी राष्ट्रांना गोंधळांत पाडलें आहे. दोस्त राष्ट्रें दुसरी आघाडी कोठें तरी सुरू करणार असें वारंवार सांगण्यांत येत होतें आणि डिपे येथील अनुभवावरून फ्रान्सचा पश्चिम-किनारा हा या आघाडीला सोयीस्कर नाहीं हें सिद्ध झालेंच होतें. तेव्हां या दुसऱ्या आघाडीला आफ्रिकेंत तोंड लागेल असें अनुमान करण्यास कांहींच हरकत नव्हती. अडचण एवढीच होती कीं, फ्रान्सच्या अव्याप्त प्रदेशांत पाऊल ठेवावयाचें म्हणजे फ्रान्सशीं युद्ध सुरू करण्यासारखेंच होणार, तेव्हां जो फ्रान्स जर्मनीच्या अर्धवट छायेखालीं गेला आहे त्याला जर्मनीच्या गटांत पुरताच लोटल्यासारखें होईल अशी धास्ती दोस्त राष्ट्रांस वाटत होती. परंतु फ्रेंच प्रधान लावल याचें धोरण दिवसेंदिवस जर्मनांना अधिकाधिक अनुकूल आणि दोस्त राष्ट्रांना प्रतिकूल असें होऊं लागल्यामुळें केव्हां तरी फ्रान्स उलटणारच, मग तो पुरता उलटण्यापूर्वीच आफ्रिकेंतील फ्रेंच किनाऱ्यावर सैन्य उतरविण्याचा फायदा कां बुडवा

( केसरी, दि. १७ नोव्हेंबर १९४२ )

नगर वाचनालय, सातारा.



असा पोक्त विचार करून इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रांतील लष्करी तज्ज्ञांनीं व मुत्सद्द्यांनीं या स्वारीचा बेत योजिला आणि तो झटपटीनें व मोठ्या शिताफीनें अमलांत आणला !

### अपूर्व नवलाईचें यश

ईजिप्तमधील ब्रिटिशांच्या ८ व्या पृतनेशीं लढण्यांत रोमेल गुंतला असतां इकडे त्याच्या पिछाडीला हें मोठें सैन्य उतरविण्यांत आलें. हें सैन्य आफ्रिकन किनाऱ्यावर उतरण्यापूर्वींच रोमेलचा तिकडे पुरता फडशा पडला होताच. तेव्हां अमेरिकन सैन्य पिछाडीवर उतरलें म्हणून रोमेलला मागें हटावें लागलें असें म्हणतां येणार नाहीं. तरी पण रोमेलची पीछेहाट सुरू होण्याला आणि दोस्तांचीं सैन्यें आफ्रिकन किनाऱ्यावर उतरण्याला एकच गांठ पडल्यामुळें रोमेलच्या पीछेहाटीला धांवपळीचें स्वरूप आलें असावें असें म्हणण्यास हरकत नाहीं. किंबहुना रोमेलचा इतक्या जलदीनें पराभव होईल अशी अगाऊ कल्पना नसल्यानें रोमेलचा पराभव करणें सुकर व्हावें म्हणून इकडे आठव्या पृतनेची चढाई चालू होण्याच्या वेळेसच अमेरिकन सैन्यानें आफ्रिकन किनाऱ्यावर पाऊल ठेवावें अशीच वेळापत्रकाची योजना दोस्त राष्ट्रांनीं केलेली असावी. या योजनेला योजकांच्या कल्पनेपेक्षांहि अधिक प्रमाणांत यश आलें याचें आश्चर्य वाटतें. मार्शल रोमेल हा एवढा नाणावलेला सेनापति असतांना दोस्तांच्या आठव्या सेनेनें त्याच्यावर अवचित हल्ला करून त्याला गोंधळांत पाडलें आणि त्याचा पुरा मोड केला हें अपूर्व नवल नव्हे तर काय !

### रोमेलचें युद्धयंत्र बिघडलें

आफ्रिकेंतील वाळवंटांतल्या या लढायांत जयाचें पारडें अकल्पित रीतीनें इकडचें तिकडे फिरतें असा आतांपर्यंतचा दोन वेळचा अनुभव आहे, तेव्हां तिसऱ्याहि खेपेला अशीच आकस्मिक उलटापालट झाली असेल असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण तें सयुक्तिक दिसत नाहीं. रोमेलची युद्धाची तयारी नव्हती असेंहि म्हणतां येत नाहीं, त्यानें स्वतःच मागल्या महिन्यांत ब्रिटिश सैन्यावर चालून जाण्याचा एक प्रयत्न केला होता, पण तो अपेशी ठरल्यानें ती नुसती शत्रूचें बळ चांचपून पाहण्याची चुणूक होती असें दर्शवून रोमेलला सारवासारव करावी लागली, ह्या-वरून रोमेलच्या लढाईच्या यंत्रांत कांहीं तरी बिघडलें होतें अशी शंका येते. त्यानंतर कांहीं दिवस रोमेल आजारी पडून युरोपांत जाऊन आला. त्याच्या गैरहजेरींत ज्या सेनानीकडे तात्पुरतें आधिपत्य होतें त्यानें नीट बंदोबस्त ठेवला नाहीं अशी सबब सांगण्यांत येते. हा सेनापति व्हॉन स्ट्रोमे या युद्धांत मारला गेला, त्यामुळें या संबंधांत अधिक तपशील बाहेर येणें शक्य नाहीं. तथापि इटालियन व जर्मन युद्धबंदींची जी मोठी संख्या जाहीर झाली आहे आणि युद्धांत मृत्यु पावलेल्यांच्या

संख्येंत जर्मनांत व इटालियनांत जें अंतर दिसून येतें त्यावरूनहि ही लढाई रोमेलच्या तंत्राप्रमाणें लढली गेली नसावी असा संशय येतो. ब्रिटिशांच्या चढाईत आघाडीला रणगाडे न पाठवितां पायदळानेंच प्रथम चढाई केली आणि दक्षिणे-कडील भागावर हल्ला होण्याचा विशेष संभव असतां उत्तरेकडील भागावरच ब्रिटिश पायदळ चालून आलें व त्यानें गट्टी राष्ट्रांच्या सैन्यांत खिंडार पाडून रणगाड्यांना वाट करून दिली असें जें वर्णन आलें आहे तेंहि सूचक आहे.

## आफ्रिकन किनारा ही मोक्याची जागा

तें कसेंहि असो, मार्शल रोमेलसारख्या अव्वल दर्जाच्या जर्मन सेनापतीचा सपशेल पराभव होऊन नुसता ईजिप्तमधलाच प्रदेश नव्हे तर लिबियांतलाहि बेंगाझी-पर्यंतचा प्रदेश त्यास सोडावा लागला आणि विशेषतः टोब्रुकसारखें बळकट स्थळ हातचें गमवावें लागलें, यामुळें आफ्रिकेंतील युद्धाचा रंग पालटला यांत शंका नाहीं; पण नुसता रोमेलचा पराभव करून माँटगॉमेरी त्याच्या पाठीस लागल्यानें युद्धाचा शेवट समीप येण्याचा संभव नाहीं; कारण केवळ आफ्रिकेंतील दोन सैन्यांच्या जयापजयावर महायुद्धाचें भवितव्य अवलंबून नाहीं. आफ्रिकेंतल्या ज्या नव्या घडामोडी-मुळें महायुद्धाचा रंग पालटूं लागला ती घडामोड रोमेलच्या पराभवाहून वेगळीच आहे. अमेरिकेचें लाख दीड लाख सैन्य, ब्रिटिश आरमाराच्या मदतीनें आणि ब्रिटिश विमानांच्या सहकारितेनें, आफ्रिकेच्या उत्तर-किनाऱ्यावर येऊन उतरलें ही घडामोड खरी प्रभावी ठरणार आहे. आतांपर्यंत अमेरिकेंतून आठ लक्ष सैनिक युद्धासाठीं पर-देशांत रवाना झाले आहेत. तथापि ते अनेक ठिकाणीं पांगलेले असून त्यांची त्यांतली कोणतीहि छावणी महत्त्वाची रणभूमि झालेली नाहीं. पण उत्तर-आफ्रिकेच्या किना-ऱ्याची जागा ही अशी मोक्याची जागा आहे कीं, त्या रणभूमीवरून महायुद्धाला महत्त्वाचें वळण देतां येण्यासारखें आहे आणि हें बिंग ओळखूनच पाताळयंत्री चर्चिलसाहेबांनीं स्टॅलिनची भीडमुर्वत न धरतां आफ्रिकेंतच दुसरी आघाडी कर-ण्याची आपली योजना ठाम केली.

## फ्रेंचांचा मुलूख बेवारशी इस्टेट

आफ्रिकेच्या पश्चिम व उत्तर-किनाऱ्यावर फ्रेंचांचा पुष्कळच मुलूख असून फ्रान्सच्या शरणागतीपासून त्या मुलुखाची बेवारशी इस्टेटीसारखी स्थिति झाली आहे. दोस्त राष्ट्रांना अनुकूल असलेले फ्रेंच सेनापति तेथें ठाणें मांडून बसले तर तो मुलूख दोस्तांच्या बाजूला वळतो. उलटपक्षीं गट्टी राष्ट्रांना अनुकूल असलेल्या अधिकाऱ्यांनीं जोराची हालचाल केल्यास तेथील सत्तेचें पारडें गट्टी राष्ट्रांच्या बाजूला झुकूं लागतें. अशा परिस्थितींत अमेरिकेचें व ग्रेट ब्रिटनचें मोठें आरमार व सैन्य यानें तेथें येऊन त्या मुलुखाचा कबजा घ्यावयाचें मनांत आण-ल्यास तेथील फ्रेंच अधिकारी दोस्तांना येऊन मिळतील असा भरंवसा वाटल्या-

वरूनच अमेरिकनांनी चढाईसाठीं ही मोक्याची जागा पसंत केली असावी असें दिसतें आणि दोस्त राष्ट्रांच्या मुत्सद्द्यांचा हा तर्क वावगा नाहीं असें आतांपर्यंतच्या घडामोडींवरून दिसत आहे. अमेरिकन सैन्य आफ्रिकन किनाऱ्यावर येऊन उतरतांच फ्रेंच ॲडमिरल डॉर्ला यानें अमेरिकनांना प्रतिकार करावयाचा नाहीं असें ठरविलें आणि व्हिशी येथून आलेले हुकूम धाब्यावर बसविले. फ्रेंच सेनापति गिरॉड ह्याहि डार्लाच्या तंत्रानेंच वागतो आहे असें दिसतें. तथापि त्या उभयतांचे बेत कितपत सिद्धीस गेले हें अद्यापि उघडकीस आलें नाहीं. ॲडमिरल डार्ला यांना अटक करण्यांत आली असेंहि वृत्त प्रारंभीं प्रसिद्ध झालें होतें. पण अलीकडे डॉर्ला व गिराड यांच्यासंबंधानें निश्चित अशी कांहींच वार्ता आलेली नाहीं.

### व्हिशी सरकारची केविलवाणी स्थिति

व्हिशी सरकारची मात्र अगदीं केविलवाणी स्थिति झाली आहे. अमेरिकेनें फ्रेंचांच्या मुलुखांत पाऊल टाकूं नये असें व्हिशी सरकारनें रूझवेल्ट यास कळविलें असतां तें अर्थातच मानलें गेलें नाहीं. उलट बाजूनें अमेरिकांनाना आम्ही प्रतिबंध करतों असें व्हिशी सरकारनें गट्टी राष्ट्रांना कळविलें असतां त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. अमेरिकन स्वारीला तोंड देण्याचें सामर्थ्य फ्रेंचांच्या अंगीं नाहीं आणि शिवाय व्हिशी सरकारनें अमेरिकनांना प्रतिबंध करण्यासंबंधानें हुकूम आफ्रिकेंतील आपल्या अधिकाऱ्यांना दिले तरी ते अधिकारी व्हिशी सरकारची आज्ञा कितपत पाळतील याविषयींहि गट्टी राष्ट्रांना साहाजिकच संशय वाटत आहे. अशा या दुहेरी कारणांमुळें गट्टी राष्ट्रांनीं असें ठरविलें कीं, फ्रेंचांच्या हालचालींवर विसंबून न राहतां दोस्तांच्या दुसऱ्या आघाडीला तोंड देण्यासाठीं जी कांहीं तजवीज करावी लागेल ती आपली आपणच करावी; आणि तशी तजवीज करावयाची म्हटल्यास फ्रान्सशीं झालेला पूर्वीचा करार मोडून फ्रान्सच्या अव्यात भागांत आपलें सैन्य पाठवावें लागणार; पण युद्धाच्या धाऊगर्दीत असल्या करारांना किंमत कितपत असते हें अनुभवसिद्धच आहे.

### फ्रेंच आरमाराचें काय होणार ?

अर्थातच जर्मनी व इटाली या उभतांनींहि आपआपलीं सैन्यें फ्रान्सच्या आतांपर्यंतच्या अव्यात भागांत पाठवून तेथून दोस्त राष्ट्रांच्या चढाईला तोंड देण्याची तजवीज सुरू केली आहे. त्यांत जर्मनीनें फ्रान्सचा दक्षिण-किनारा आणि विशेषतः त्या किनाऱ्यावरील मार्सेलिस व टूलोन हीं बंदरें आपल्या संरक्षणाखालीं घेतलीं असून इटालीनें नाईस शहर व्यापलें आहे. ऑफ्रिकेचा किनारा व्यापल्यानंतर भूमध्य समुद्रांतून इटालीवर व फ्रान्सवर चालून येण्याचा दोस्तांचा मानस असणार असें समजून जर्मनीनें इटालीच्या मदतीसाठीं म्हणून आपलें कांहीं सैन्य इटालींतहि रवाना केलें आहे. फ्रेंच किनाऱ्यावर उतरण्यापूर्वी कॉर्सिका बेट दोस्तांकडून व्यापलें जाईल असा तर्क करून इटालीनें कॉर्सीका बेटहि आपल्या ताब्यांत घेतलें आहे.

टूलोन बंदरांतल्या फ्रेंचांच्या आरमाराचें पुढें काय झालें तें मात्र नक्की कळलें नाहीं. तें आरमार दोस्तांच्या हातीं पडणार कां जर्मनीला मिळणार याच्यावर भूमध्य समुद्रांतील लढाईतलें यशापयश पुष्कळ अंशीं अवलंबून राहील याकरितां फ्रेंच आरमार आपल्या हातीं घेण्यासाठीं उभयतांचे डावपेंच चालू आहेत. स्वतः फ्रेंच सरकारचें म्हणणें असें आहे कीं, आमचें रक्षण आम्ही करूं, त्या भानगडींत इतरांनीं पडूं नये; परंतु दुर्बळांच्या असल्या तक्रारीला कोण जुमानणार !

### घाव जर्मनीच्या वर्मीं झोंबला

आफ्रिकेच्या किनाऱ्यावर सैन्य उतरविण्याचें कार्य दोस्त राष्ट्रांनीं मोठ्या धाडसानें पार पाडलें यांतहि शंका नाहीं. हें सैन्य वाहून आणणाऱ्या जहाजांबरोबर एवढा कडक आरमारी बंदोबस्त होता कीं, जर्मन पाणबुड्या कोठेंच धोका उत्पन्न करूं शकल्या नाहींत. दोस्त राष्ट्रांचें वैमानिक दलहि आतां चांगलेंच प्रबळ झालें असल्यानें जर्मन हवाईदलाकडूनहि या जहाजांना उपसर्ग पोंचूं शकला नाहीं. यावरून अमेरिकेला वाटेल तितकें सैन्य वाटेल त्या वेळीं आफ्रिकेंत उतरवितां येईल असा विश्वास उत्पन्न झाला असून त्याच प्रकरणांत जर्मनांचा धीर खचला असावा असें दिसतें. नुकतेंच हिटलरचें जें भाषण झालें त्या भाषणांतला त्याचा नूर या नव्या घडामोडींमुळें अगदींच पालटलेला दिसत होता. त्या भाषणांत चढाईची धमकी व्यक्त न होतां ' मी केव्हांहि शरण जाणार नाहीं ' अशी निर्वाणीची भाषा होती. यावरूनच दोस्त राष्ट्रांचा हा घाव जर्मनीला वर्मीं झोंबला असावा असें उघड दिसतें.

### स्पेनचा तटस्थपणा

दोस्त राष्ट्रांनीं भूमध्य समुद्रांतून इटालीवर व फ्रान्सवर स्वारी करावयाची म्हटल्यास स्पेनचीहि अनुकूलता असणें अवश्य आहे. मात्र दोस्त राष्ट्रांना स्पेनची मदत मिळणें संभवनीय दिसत नाहीं व तशी आशाहि दोस्त राष्ट्रें बाळगीत नसतील. स्पेन तटस्थ राहिला तरी पुरें एवढीच दोस्तांची अपेक्षा दिसते; पण तेवढी तरी यथार्थ ठरेल का नाहीं याविषयीं निश्चितपणें कांहीं सांगतां येत नाहीं. स्पेन जर गट्टी राष्ट्रांना मिळाला तर दोस्त राष्ट्रांनीं दिलेला सध्यांचा शह अपुरा पडेल आणि दोस्तांना इटालीच्या किनाऱ्यावर उतरून गट्टी राष्ट्रांना तंबी देणें कठीण पडेल. उलटपक्षीं जर्मनी व इटाली यांना स्पेनच्या किनाऱ्याचा उपयोग करतां आल्यास आफ्रिकन किनाऱ्यावर अमेरिकेचें कितीहि मोठें सैन्य उतरलें तरी तें फारसें प्रभावी होऊं शकणार नाहीं. स्पेनवर व स्पेनच्या आफ्रिकेंतील वसाहतीवर आपण चाल करणार नाहीं असें आश्वासन दोस्त राष्ट्रांनीं स्पेनला दिलें आहे. या आश्वासनावरूनच स्पेन आपल्याला मिळेल असें दोस्तांना वाटत नसावें असें अनुमान निघतें. कारण स्पेननें गट्टी राष्ट्रांना जाऊन मिळूं नये

नगर वाचनालय, सातारा.

नगर वाचनालय सातारा
दा. नं. ३७४८
स. २०६



एवढ्याचकरितां असलें आश्वासन देण्यांत आलें असावें हें उघड आहे. जर्मनीनेंहि स्पेनला असेंच आश्वासन दिलें आहे अशी वार्ता प्रसृत झाली होती; पण तिचा तावडतोब इन्कार करण्यांत आला हें मोठें सूचक आहे. आधीं आश्वासन देऊन मागाहून तें धाब्यावर बसविण्याची वचनभ्रष्टता जर्मनीच्या हातून होणार नाहीं असें मुळींच नाहीं; तरी पण असें आश्वासन मुळीं दिलेंच नाहीं असें जाहीर करण्यांत वचनभंगाचा आरोप करण्याला मागाहून जागा राहूं नये अशाविषयीं जर्मनी जपत आहे असें दिसतें. तथापि एकंदर परिस्थिति पाहतां स्पेन आपला तटस्थपणा सोडणार नाहीं हेंच जास्त संभवनीय आहे.

### तुर्कस्तानच्या तटस्थतेचा भंग होईल काय ?

तुर्कस्तानने आपण तटस्थ राहणार असें पुनश्च एकदां जाहीर केलें आहे. महायुद्धाला सुरुवात झाल्यापासून तुर्कस्तान अशी घोषणा वारंवार करीत आला आहे आणि त्या बाबतींत तुर्कस्तानच्या आजूबाजूची परिस्थितीच अशी आहे कीं, तुर्कस्तानला तटस्थ राहणें हेंच सर्वांत अधिक फायदेशीर आहे, यास्तव तुर्कस्ताननें यावेळीं कांहींहि घोषणा न केली तरी कोणीहि असेंच अनुमान करील कीं, तुर्कस्तानच्या तटस्थतेच्या भंग होण्याची वेळ आलेली नाहीं. असें असतां याच वेळीं जर्मनी सीरियावर स्वारी करणार व त्याकरितां तुर्कस्तानकडे वाट देण्याची मागणी करणार, जशी जी बातमी प्रसिद्ध केली जात आहे ती कोणी तरी जाणूनबूजून दिशाभूल करण्यासाठीं उठविलेली हूल असावी; कारण जर्मनीला सध्यां आपल्या हातचीं रणांगणें सांभाळणेंच अवघड होत चाललें असून अशा वेळीं जर्मनी सीरियाची नवी मोहीम अंगावर कशी घेईल ? ईजिप्तमधील युद्धांत जर्मन सेनापतीच्या हातून कितीहि चुका घडल्या असल्या तरी सीरियाच्या मोहिमेची नसती भानगड अंगावर ओढून घेऊन तुर्कस्तानला डिवचून आपण होऊन त्याला दोस्तांच्या गटांत सामील होण्याची संधि देण्याइतके कांहीं जर्मन सेनापति वेडे नसतील. अर्थातच जर्मनीचें सगळें लक्ष सध्यां आफ्रिकेंतील आपली बाजू कशी सांभाळावयाची आणि दोस्त राष्ट्रांची मोहीम युरोपांतल्या आपल्या प्रदेशावर येऊन ठेपेल तर तिचा प्रतिकार कसा करावयाचा याकडेच पूर्णपणें वेधून राहील. रशियांतील सर्व आघाड्यांवर जर्मनी यापुढें हिवाळा संपेपर्यंत बचावाचेंच धोरण स्वीकारील. मात्र रशिया त्याला तसें स्वस्थ बसूं न देतां सतावून सोडण्याचा डाव टाकील व त्याचा शक्य तितका प्रतिकार जर्मनीला करावा लागेल.

### जपानचे डावपेंच

दोस्तांच्या या नव्या चढाईचा परिणाम जर्मनीच्या रशियन मोहिमेवर खात्रीनें होत आहे; परंतु जपानच्या डावपेंचांवर याचा परिणाम विशेष लक्षांत

घेण्यासारखा होणार नाहीं. आतांपर्यंत जर्मनीचे व जपानचे डावपेंच परस्परांना अप्रत्यक्ष रीतीनें पोषक असले तरी ते अलग अलग असून त्यांचा प्रत्यक्षतः एकमेकांवर परिणाम घडत नसे असेंच दिसून आलें आहे. याच दृष्टीनें पाहिल्यास या वेळीं जपान सैबेरियावर स्वारी करील ही अपेक्षा असमर्थनीय ठरते. जर्मनीला जशी सध्यांची आघाडीच पुरून उरणार आहे त्याप्रमाणें जपानलाहि सालोमन बेटें, चीनं व ब्रह्मदेश या तीन ठिकाणच्या आघाड्या पुरून उरणार आहेत. याकरितां सध्यां तरी ऑस्ट्रेलियावर स्वारी करण्याचा विचार जपान मनांत आणणार नाहीं आणि सैबेरियाची स्वारी तर त्याच्या युद्धाच्या डावपेंचांतच अद्यापि समाविष्ट झालेली दिसत नाहीं. ब्रह्मदेशांतच काय ती त्याची विशेष हालचाल दिसेल. ती चढाईची होईल कां बचावाची होईल हें दोस्त राष्ट्रांच्या या बाजूच्या सैन्याच्या सामर्थ्यावर व हालचालींवर अवलंबून राहणार आहे.

---

## यांत कोणाचें काय साधलें ? ११

[ फ्रान्सच्या शरणागतीनंतर अनाक्रान्त फ्रान्सचा कारभार जर्मनांच्या तंत्रानें चालला होता. त्यामुळें फ्रेंचांचें आरमार जर्मनीच्या हातीं पडेल, अशी दोस्त राष्टांना भीति वाटत होती. ही भीति निर्मूल करण्याकरितां ब्रिटिशांनीं फ्रेंच आरमार आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें. पण त्यामुळें जर्मनांचा आपल्यावर रोष होईल आणि आपल्या अस्तित्वाला धोका येईल म्हणून व्हिशी सरकारनें आपलें आरमार ब्रिटिशांच्या हवालीं करण्याचें नाकारलें. तेव्हां आफ्रिकेंतील ओरान बंदरांतलें फ्रेंचांचें आरमार ब्रिटिशांनीं बुडविलें आणि फ्रान्सच्या टुलोन बंदरांतलें आरमार हस्तगत करण्याचा प्रयत्न चालविला. त्यावेळीं फ्रेंच आरमारानें तें संकट टाळण्यासाठीं जलसमाधि घेतली. त्या रोमहर्षण हौतात्म्याची पूर्वपीठिका यांत वर्णिली आहे. ]

महायुद्धाच्या प्रस्तावनेपासून आतापर्यंतच्या काळांत ज्या अनेक अद्भुत घटना घडल्या त्यांत टुलोन बंदरांतल्या फ्रेंच आरमारानें घेतलेली जलसमाधि ही एक अद्‌भुत रोमांचकारी घटना गणली जाईल यांत शंका नाहीं. जलसमाधीची ही आश्चर्यचकित करून सोडणारी वार्ता कानीं आल्यापासून या जलसमाधीचा परिणाम कोणावर कसा घडेल याचा विचार साहजिकच मनांत घोळतो. पण ही

( केसरी, दि. ११ डिसेंबर १९४२ )

परिणाममीमांसा करण्यापूर्वी स्वतःला समुद्रांत बुडवून घेऊन जगाला आश्चर्यांत बुडविणाऱ्या या हुतात्म्यांनीं हें सतीचें वाण कां घेतलें याची कारणमीमांसा करणें आवश्यक आहे.

बेल्जम, इंग्लंड व फ्रान्स यांचे सेनाशकट विध्वंसून, फ्रान्स देशांत मुसंडी मारून, जेव्हां जर्मन सैन्यानें फ्रेंचांची लांडगेतोड चालविली, त्यावेळीं 'दे माय धरणी ठाय ' असेंच अक्षरशः म्हणण्याची फ्रेंचांवर पाळी आली. त्या संकटकालीं धीर देण्याला दोस्त राष्ट्रांतलें कोणीहि सोबती ठिकाणावर राहिले नाहींत, असें पाहून नाराज झालेल्या फ्रेंचांना नलोपाख्यानांतील **'कठिण समय येतां कोण कामास येतो '** या राजहंसोक्तीचें वारंवार स्मरण झालें असल्यास नवल नाहीं. अशा संकटप्रसंगीं फ्रेंच मंत्रिमंडळ पॅरिस सोडून बोर्डोला गेलें आणि तेथें पुढें काय करावें याची भवति न भवति झाली. त्या वेळीं फ्रेंच मंत्रिमंडळांत दोन पक्ष निर्माण झाले.

### व्हिशी सरकारची स्थापना कशी झाली ?

इंग्लंडच्या सैन्यानें डंकर्क पाहिल्यामुळें यापुढें फ्रान्स देशांत ठाण मांडून जर्मनांचा प्रतिकार करणें अशक्य आहे याविषयीं मंत्रिमंडळांत मतभेद नव्हताच. मात्र एका पक्षाचें म्हणणें असें होतें कीं, मंत्रिमंडळानें फ्रान्स देश सोडून उत्तर आफ्रिकेंत जावें आणि तेथील फ्रेंच वसाहतींतून जर्मनांशीं युद्ध चालवावें. दुसऱ्या पक्षाला हा बेत नापसंत होता. त्याची विचारसरणी अशी होती कीं, आफ्रिकेंत जाऊन तरी आपण कोणाच्या बळावर लढणार ? फ्रान्सांत एवढी सेना व रण-सामुग्री सज्ज असतांना जेथें टिकाव लागला नाहीं तेथें आफ्रिकेंतल्या तुटपुंज्या रणसाहित्यावर कसा निर्वाह लागेल ? अर्थातच निरुपाय म्हणून संकटापुढें मान लववावी आणि जर्मनांशीं शस्त्रसंधि करून फ्रान्सचा अर्धामुर्धा भाग आणि इतरत्र असलेल्या सर्व वसाहती वांचवाव्या आणि युद्धाचा शेवट होईपर्यंत तटस्थ वृत्ति धारण करून मार्गप्रतीक्षा करीत राहावें. या शरणागति पक्षाचें अध्वर्युत्व लाव्हल यांजकडे होतें. मार्शल पेताँ हे प्रथम युद्ध चालू ठेवावें या मताचें होतें; आणि त्यांच्या वजनानें युद्ध चालवावें म्हणणाऱ्या पक्षाचें माताधिक्य होऊन फ्रेंच सर-कारची कचेरी उत्तर आफ्रिकेंत नेण्याचें व तेथून लढाई चालविण्याचें ठरलें. पण लाव्हल, मार्के आणि अलिबर्ट या त्रयीनें रातोरात मार्शल पेताँ यांची भेट घेऊन त्यांस गळ घातली आणि निष्कारण युद्ध लांबवून फ्रेंच जनतेचे हाल वाढवूं नका, असा युक्तिवाद करून बुद्धिभेद केला; त्यामुळें आदल्या दिवशीचा बेत डळमळला आणि शस्त्रसंधि ठरून व्हिशी येथें नव्या फ्रेंच सरकारची स्थापना झाली.

### ओरान व टूलोन यांचा संबंध

ही सगळी उलटापालट घडवून आणण्याची कारवाई लाव्हल यांच्या शल्य-नीतीनेंच केली. याच कारणावरून त्या वेळेपासून नव्या फ्रेंच सरकारचे डावपेंच

लाव्हलच्या धोरणाला अनुसरून चालूं लागले. लाव्हल यांचें हिटलरवर वजन मुळींच नाहीं, पण मुसोलिनीची व त्याची मोठी दोस्ती आहे; तेव्हां मुसोलिनीमार्फत हिटलरवर वजन पाडून आपण आपला कार्यभाग साधूं असें लाव्हलला वाटत होतें. उलटपक्षीं लाव्हल हा इंग्रजांचा द्वेष्टा असल्याची जाणीव ब्रिटिश मंत्रिमंडळाला असल्यानें लाव्हलच्या हातीं सत्ता गेल्यास फ्रान्स देश तटस्थ न राहतां गट्टी राष्ट्रांना मिळेल अशी त्यांना धाकधूक वाटत होती आणि याचें प्रत्यंतर फ्रेंच आरमाराच्या हालचालीवरून येऊं लागलें. व्हिशी सरकारच्या डळमळीत धोरणावरून फ्रेंच आरमार जर्मनीच्या हातीं पडेल असें वाटून ब्रिटिशांनीं तें हस्तगत करण्याचा विचार ठरविला. त्यामुळें उत्तर आफ्रिकेंतील ओरान बंदरांत आरमारी चकमक झडली आणि फ्रेंचांचें तेथलें आरमार बुडविलें गेलें. हा ओरानचा प्रसंग लक्षांत घेतला म्हणजे टूलॉन येथलें आरमार कसें व कां बुडविलें गेलें यांचा ग्रंथ लागतो.

## फ्रान्समधील तीन पक्ष

फ्रेंचांच्या शरणागतीच्या प्रसंगापासून फ्रेंच जनतेंत तीन पक्ष निर्माण झाले आहेत. द गुल यांचा स्वतंत्र फ्रान्स पक्ष. हा सर्वतोंपरी ब्रिटिशांच्या बाजूचा असून ब्रिटिशांच्या साहाय्यानें फ्रान्सचें स्वातंत्र्य परत मिळविण्याची उमेद बाळगणारा आहे. मार्शल पेताँ व ॲडमिरल डार्लां यांचा पक्षहि द गुल यांच्या पक्षाइतकाच जर्मनद्वेष्टा आहे. तथापि डंकर्क प्रकरणापासून त्यांच्या मनांत इंग्लिशांविषयींहि अढी बसलेली आहे, त्यामुळें इंग्लंडचें साहाय्य मिळवून फ्रेंच साम्राज्य टिकवितां येईल असें त्यांस वाटत नाहीं. त्यापेक्षां शस्त्रसंधीच्या अटी पाळून अव्याप्त फ्रान्स आणि फ्रेंच वसाहती यांचें आपणच स्वतंत्रपणें संरक्षण करावें असें या पक्षाचें म्हणणें आहे. याहून द गुल यांची विचारसरणी वेगळी असल्यामुळें द गुल व ॲड. डार्लां यांच्यांत वितुष्ट आलें आणि डाकारच्या मोहिमेमुळें उभयपक्षांतला मतभेद वज्रलेप झाला. शल्यमामा लाव्हल यांचा तृतीय पंथ तर सर्वश्रुतच आहे. त्यांचें इटालीशीं पूर्ण सख्य आणि इटालीची जर्मनीशीं दोस्ती म्हणून लाव्हलचीहि जर्मनीशीं दोस्ती. अर्थातच जर्मनीशीं नमतें घेऊन वागल्यानेंच फ्रेंच वसाहती सुरक्षित राहतील आणि युद्ध-समाप्तीनंतर जर्मनव्याप्त फ्रान्सहि परत आपल्या हातीं येईल या आशेवर यांचा कारभार चाललेला. अशा परिस्थितींत जर्मनांना तर दुखवावयाचें नाहीं आणि जर्मनीकडून फ्रेंचांना अधिकाधिक सवलती मागून घेऊन फ्रेंचांना खूष ठेवावयाचें, असा तारेवरचा नाच लाव्हल यांनीं चालविला होता. या दुटप्पी धोरणांत फ्रेंचांना खूष राखणें जेव्हां अशक्य झालें तेव्हां लाव्हलला नव्या मंत्रिमंडळांतून निघावें लागलें; परंतु लाव्हल निघाल्यानें जर्मनीची बाजू फ्रेंच कारभारांत लंगडी पडूं लागली. तेव्हां जर्मनीनें तंबी देऊन लाव्हलची पुनश्च सल्लागार मंडळांत स्थापना करविली; एवढेंच नव्हे तर लाव्हलच्या परवानगीशिवाय फ्रेंचांच्या कारभारांत पानहि हालूं नये असा बंदोबस्त जर्मनीनें केला.

…पूर वाचनालय, सातारा.



## उत्तर-आफ्रिका हें रणक्षेत्र झालें

अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप करून फ्रान्सचीं सगळीं अधिकारसूत्रें लाव्हलच्या हातीं येतील अशी तजवीज जर्मनांनीं केली तरी युद्धांतले जयापजय त्यांच्या स्वाधीन नसल्यामुळें रणांगणावरील घडामोडींचा फ्रान्सच्या कारभारावर व फ्रेंच जनतेच्या मनावरहि परिणाम घडल्याशिवाय राहिला नाहीं. फ्रान्सचें मादागास्कर बेट ब्रिटिशांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. अमेरिकेंतल्या फ्रेंच वसाहतींवर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा सासूपणा गाजूं लागला आणि अखेरीस दोस्त राष्ट्रांनीं फ्रेंचांच्या उत्तर-आफ्रिकेंतील वसाहतींत सैन्य उतरवून तेंच आपलें रणक्षेत्र बनविलें. यामुळें ॲड. डार्ला व द गुल यांचे पक्ष बळावून लाव्हलच्या पक्षाचें पारडें हलकें झालें. फ्रेंच जनता जरी व्हिशी सरकारच्या हुकमतीखालीं नांदत असली तरी मनांतून तिचा कल दोस्त राष्ट्रांकडे आहे हें स्पष्ट झालें; आणि आफ्रिकेंतील वसाहतींतील फ्रेंच सैन्याकडून जर्मनीला उघड विरोध होऊं लागला. असा विरोध होणें हें शस्त्र-संधीच्या अटींच्या विरुद्ध आहे अशी तक्रार जर्मनीनें व्हिशी सरकारकडे केली; परंतु दुबळें व्हिशी सरकार काय करणार ? वसाहतींत आमचा अधिकार चालत नाहीं, तेव्हां तुमचें तुम्ही पाहा असें लाचारीचें उत्तर देण्यावांचून व्हिशी सरकारला गत्यंतरच नव्हतें.

## अव्याप्त फ्रान्समध्यें जर्मन सैन्य

अर्थातच इच्छेविरुद्ध दोस्त राष्ट्रांनी जर आफ्रिकेंतील फ्रेंच वसाहतींत सैन्य उतरविलें असेल तर आम्ही तें पाहून घेऊं; पण उद्या जर दोस्तांचें सैन्य फ्रांसच्या दक्षिण किनाऱ्यावर उतरूं लागलें तर काय करणार, असा प्रश्न जर्मनीकडून आलाच. यालाहि कांहीं तरी गुळमुळीत उत्तर पेतॉंकडून मिळालें असेल. परंतु अशा स्वारीच्या वेळीं तुमचें टुलोन बंदरांतलें आरमार काय करणार, असा जेव्हां अगदी अंगाशीं भिडणारा प्रश्न आला तेव्हां फ्रेंच सरकार उत्तर काय देणार? तात्पुरत्या तहाच्या अटींत फ्रेंचांचें आरमार तटस्थ राहावें, जर्मनीनें तें आपल्या ताब्यांत घेऊं नये आणि व्हिशी सरकारनेंहि ते ब्रिटिशांच्या हातीं देऊं नये, असें ठरलें होतें. परंतु दुबळ्याच्या हातची इस्टेट जो पहिल्या प्रथम घाला घालील त्याच्या हातांत जाणार हें उघड आहे; तेव्हां व्हिशी सरकारची इच्छा असो वा नसो, दोस्तांचें सैन्य जसें आफ्रिकन किनाऱ्यावर उतरलें, तसेंच तें जर फ्रेंच किनाऱ्यावर उतरण्याकरितां आलें तर फ्रेंचांच्या हातून त्याला विरोध केला जाणार नाहीं हें ओळखून हिटलरनें फ्रेंचांचीं बंदरें, किनारा व आरमार आपल्या हातीं घेण्याचा संकल्प केला. या बाबतींत केवळ अनुमानावरच अवलंबून न राहतां 'दोस्त राष्ट्रांना विरोध करूं नका' अशा आशयाचे हुकूम दिले गेलेले आपल्या हातीं लागले आहेत असें हिटलर म्हणतो ! तसा कागदोपत्रीं पुरावा प्रत्यक्ष मिळाला

असो किंवा नसो, लाव्हलची सत्ता आरमारावर चालत नाहीं, तेव्हां फ्रेंच आरमार ब्रिटिशांच्या हातीं पडण्याचाच संभव जाणून, हिटलरनें शस्त्रसंधीच्या अटी झुगारून देऊन, अव्याप्त फ्रान्समध्यें आपलें सैन्य घुसविलें आणि टुलोन बंदराचा ताबा घेण्याचा उपक्रम केला.

## फ्रेंच आरमार ब्रिटिशांस कां मिळालें नाहीं ?

जर्मनीकडून असा धसमुसळेपणा केला जाईल हें जर फ्रेंचांना दिसत होतें आणि फ्रेंचांचें बहुमत जर दोस्त राष्ट्रांना अनुकूल असें होतें तर जर्मनीची धाड टुलोनवर येण्यापूर्वीच तेथलें आरमार तेथून निघून जिब्राल्टर किंवा माल्टा येथें जाऊन ब्रिटिशांना कां मिळालें नाहीं असा प्रश्न साहजिकच पुढें येतो. परंतु फ्रेंचांना जर्मनीविषयीं तिटकारा वाटत असला तरी इंग्रजांच्या गळ्यांत मिठी मारण्याइतकें त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत प्रेमहि राहिलें नाहीं. डंकर्क, ओरान, डाकार, मादागास्कर या नांवांची आठवण झाली कीं, फ्रेंचांच्या मनाची चलबिचल होते. त्यामुळेंच द गुल याला तितकासा पाठिंबा न मिळतां ॲड. डार्लां यांच्याविषयीं फ्रेंचांना अधिक आदर वाटतो आणि आरमारावर डार्लांची जशी छाप आहे तशी दुसऱ्या कोणाची नाहीं. अर्थातच ओरान व डाकार येथील प्रसंगांमुळें चिडलेलें फ्रेंच खलाशी आपलें आरमार सुखासुखीं ब्रिटिशांच्या हवालीं करण्याच्या मनःस्थितींत नव्हते.

## फ्रेंचांची मानी वृत्ति

जर्मनांच्या विषयींचा जुना द्वेष आणि ब्रिटिशांच्या विषयींची कलुषित बुद्धि या दोहोंच्या झगड्यांत कोणालाच न मिळतां स्वतंत्र राहावें आणि तें शक्य नसेल तर बुडावें पण दुसऱ्याच्या हातीं लागूं नये, एवढाच मार्ग फ्रेंच खलाशांच्या पुढें मोकळा राहिला आणि त्या मार्गाचाच अवलंब अखेरीस फ्रेंच आरमारानें केला. मोडेन पण वांकणार नाहीं, ही मानी पुरुषाची वृत्ति अथवा जीभ हासडून प्राण देईन पण परपुरुषाचा हात लागूं देणार नाहीं, हा सतीचा बाणा या बाबतींत प्रतीत झाला. असलें हौतात्म्य फ्रेंचांसारख्या भावनावश लोकांनाच शक्य आहे. व्हर्सायच्या तहानंतर जर्मन आरमाराच्या कप्तानांनींहि आपलें आरमार याच वृत्तीनें बुडविलें. पण त्यांना त्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. फ्रेंचांची कांहीं तशी अगतिक स्थिति झाली नव्हती. त्यांच्या मनांत असतें तर त्यांनीं ब्रिटिशांशीं नसलें तरी अमेरिकनांशीं संधान बांधून आपलें आरमार यापूर्वीच बाहेर काढून तें वांचविलें असतें; उलटपक्षीं जर्मनीलाच मिळावयाचा त्यांचा हेतु असतां तर, जागच्याजागीं राहून, 'आम्हीं काय करावें, जर्मनीनें आमच्यावर जबरदस्ती करून आमचें आरमार पकडून नेलें' असें कायदेशीर उत्तर त्यांस देतां आलें असतें. मनांत असलें म्हणजे 'अग अग म्हशी मला कां नेशी' ही म्हण आत्मसमर्थनार्थ तयार असतेच ! परंतु दोस्तांना जाऊन मिळा अथवा गड्डी राष्ट्रांना जाऊन मिळा, कांहींहि केलें तरी त्यांत मानखंडनाच आहे. वीरवृत्तीचें

तेज त्यांत नाहीं, हें जाणून फ्रेंच खलाशांनीं हा वीरवृत्तीचा मार्ग पत्करला हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे.

### व्हिशी सरकारची वडवाघळाची स्थिति

व्हिशी सरकारच्या दुरवस्थेची मात्र कोणासहि कींवच येईल. जर्मनीच्या हातीं शेंडी असल्यामुळें बाह्यतः जर्मनीचा अनुनय, दोस्तांचा जय झाला तर जर्मनीचें परभारें उट्टें निघाल्यानें मनांतून वाटणारें समाधान पण तें बाहेर दाखविण्याचीहि चोरी, आणि उघडपणें कोणत्या तरी एका पक्षास मिळून होतील ते परिणाम सोसण्याला लागणारा कणखरपणाचा अभाव, या त्रिदोषाच्या तावडींत सांपडल्यानें व्हिशी सरकारला धड जर्मनींची मर्जी सांभाळतां आली नाहीं, धड दोस्तांची मैत्रीहि राखतां आली नाहीं, त्यामुळें त्याची वडवाघळासारखी स्थिति झाली आहे. मनाच्या असल्या दोलायमानस्थितींत व्हिशी सरकारनें आपल्या आरमारास बुडून जाण्याचा सल्ला दिल्याचें पाहून कोणासहि कृष्णाकुमारीच्या दुबळ्या मनाच्या पित्याची आठवण होईल. दोघां रजपूत राण्यांनीं तिला मागणी घातली असतां ती कोणा एकाला दिली असतां दुसरा राणा आपला शत्रु होईल याची धास्ती खाऊन त्या भित्र्या राण्यानें कृष्णाकुमारीला विष देऊन मारून टाकण्याचें ठरविलें व त्या बिचारीचा प्राण घेतला ! व्हिशी सरकारचीहि तशीच गत झाली. जर्मनीचा व इंग्लंडचा कोणाचाच राग सहन करण्याचें धैर्य अंगीं नसल्यामुळें या पेंचांतून सुटण्याचा मार्ग म्हणून आरमाराचें बलिदान देण्याचें त्या दुबळ्या सरकारनें ठरविलें. त्यामुळें बिचाऱ्या कृष्णाकुमारीप्रमाणें आरमार तेवढें फुकट बळी गेलें; पण आतां दोन्ही राष्ट्रें संतप्त होणार याची वाट काय ! आम्हांस या लबाडीनें फसविलें म्हणून दोघेंहि यापुढें त्यावर दांतओंठ खाणार व त्यांच्याशीं शत्रुत्वानें वागणारच वागणार.

### फ्रेंच हुतात्म्यांस वीरोचित स्वर्गलोक

अर्थातच आरमाराच्या या बलिदानामुळें व्हिशी सरकारचा बेत साधला नाहीं, जर्मनांच्या हातचा डाव फुकट गेला आणि दोस्तांचें कारस्थानहि फिसकटलें. यांत कोणाचेंच कांहीं साधलें नाहीं. मात्र आईबापांवरचें संकट टाळण्याकरितां व कुलाची अब्रू वांचविण्याकरितां कृष्णाकुमारीनें विषाचा प्याला धैर्यानें पिऊन टाकला यामुळें तिची कीर्ति जशी अजरामर झाली त्याचप्रमाणें व्हिशी सरकारावरचें संकट टाळण्याकरितां आणि फ्रेंच राष्ट्राची अब्रू राखण्याकरितां, ज्या फ्रेंच खलाशांनीं आपलें आरमार आपल्या हातानें बुडविलें व त्याचबरोबर स्वतःच्या जीवाचेंहि बलिदान दिलें त्या हुतात्म्यांची कीर्ति मात्र इतिहासांत अजरामर राहील, कारण त्यांनींच तेवढा वीरोचित स्वर्गलोक साधला.

---

# दोस्तांचा पहिला खरा विजय १२

[ दुसरें महायुद्ध सुरू झाल्यापासून दोस्त राष्ट्रांची सर्वत्र पीछेहाटच होत होती. अशीं तीन वर्षें हार खाल्ल्यावर स्टॅलिनग्राड येथें रशियानें पहिला मोठा विजय मिळवून जर्मन सैन्याला शरण येण्यास भाग पाडलें. तरी पण जर्मनीच्या मर्मावर घाव बसला नव्हता. आफ्रिकेंतील युद्ध जिंकून दोस्त राष्ट्रांनीं सिसिली बेटावर स्वारी केली व तें बेट काबीज करून इटालींत कायमचें ठाण मांडलें, त्या वेळीं दोस्तांच्या खऱ्या विजयाबद्दल अभिनंदनपर असा हा लेख आहे.]

## शाखा-पल्लव तोडले

महायुद्धाला प्रारंभ होऊन चार वर्षे होत आलीं. एवढ्या दीर्घकालांत दोस्त राष्ट्रांना अभिमानास्पद आणि शत्रुराष्ट्रांच्या मर्मी झोंबणारा असा ठसठशीत विजय मिळाला नव्हता. रशियानें स्टॅलिनग्राड येथें लक्षावधि जर्मनांना दातीं तृण धरावयाला लाविलें व स्टॅलिनग्राडपासून खारकोव्हपर्यंत शेंकडों मैल मागेंहि हटविलें. तथापि त्यांत रशियानें नवें कांहीं कमावलें नसून पूर्वी गमावल्यांतलाच पुष्कळसा भाग परत जिंकला. ब्रिटिश व अमेरिकन सैन्यांनीं सगळी उत्तर-आफ्रिका शत्रूंच्या हातून सोडविली; तरी तो विजय शत्रुरूपी वटवृक्षाच्या शाखा-पल्लव तोडण्याच्या तोडीचाच झाला. त्यांत बुंध्याला धक्का लागला नव्हता. आतां मात्र दोस्तांनीं सिसिली बेट हस्तगत करून इटालीच्या मर्मावरच घाव घातला आहे आणि याचा परिणाम एकट्या इटालीवरच होणारा नसून, त्याची कळ जर्मनीच्या मस्तकापर्यंत जाऊन भिडली आहे.

## दोस्तांचा वरचढपणा

टयुनीशिया जिंकल्यानंतर दोस्तांची चढाई सिसिलीवरच होणार हें ठरलेंच होतें; असें असून देखील गट्टी राष्ट्रांना सिसिलीवरील स्वारी टाळतां आली नाहीं, अडवितां आली नाहीं आणि सिसिली राखतांहि आली नाहीं, यावरून गट्टी राष्ट्रांचें सर्व प्रकारचें लष्करी बळ दिवसेंदिवस ओहोटीला लागत चाललें आहे हें उघड सिद्ध होतें. आफ्रिकेंत रोमेलच्या सैन्याला मागें हटविण्यांत दोस्तांच्या वैमानिक दलांचें वाढतें सामर्थ्य व्यक्त झालें. रोमेलला युरोपांतून सैनिक व रणसाहित्य यांचा पाठपुरावा होऊं शकला नाहीं, यांत दोस्तांच्या आरमारांचें प्रभुत्व सिद्ध झालें आणि इटालीच्या अगदीं पायानजीकचें सिसिली बेटहि त्यास राखतां आलें नाहीं, यांत

( केसरी, दि. २० ऑगस्ट १९४३ )

गट्टी राष्ट्रांच्या सैन्याची कमतरता दिसून आली. दोस्तांचे अवघे एक लक्ष पंचाहत्तर हजार सैनिकच सिसिलींत उतरले होते. तथापि गट्टी राष्ट्रांना या सैन्याला तोंड देण्याइतकें मोठें सैन्य सिसिलींत पाठवितां आलें नाहीं; यावरून जर्मनीचें सैन्यबळहि चार ठिकाणीं विभागलें गेल्यामुळें अपुरें पडूं लागलें आहे हें उघड दिसून आलें. एवंच सिसिलीच्या विजयानें दोस्त राष्ट्रांनीं गट्टी राष्ट्रांवर सर्वच साधनांत वरचढपणा सिद्ध केला असून, इटालीचा हा मोठा लचका तोडून त्यांनीं त्याला पुरा हैराण केला आहे यांत शंका नाहीं. सिसिली बेटाचें क्षेत्रफळ ९९२६ चौरस मैल असून युद्धापूर्वीची तेथली लोकसंख्या ४० लक्ष होती. एवढा मोठा प्रदेश हातचा गेल्यानें इटालीची मोठी हानि झाली, हें तर खरचें; पण सिसिली बेट इटालीच्या भूप्रदेशाच्या अगदीं लगतचें असल्यानें सिसिली हें इटालीवरील माऱ्याचें केंद्रस्थान होईल हा मोठा धोका इटालीला आहे.

### इटालीची दामटी वळेल

सिसिली बेट हातचें जाऊन इटालीवरील हल्ल्याचा धोका बळावला याचा परिणाम इटालींतील राजकारणावर काय होतो तें पाहावें. सिसिलीवरील स्वारी सुरू होतांच इटालींत गडबड उडाली आणि मुसोलिनी अधिकारभ्रष्ट झाला. त्याच वेळीं इटाली शरण जाईल अशीं लक्षणें दिसत होतीं; परंतु दोस्त राष्ट्रांनीं संपूर्ण शरणागतीची अट घातल्यामुळें इटालींतील राजकारणाचें पारडें फिरलें. वाघ्या म्हटलें तरी खातो व वाघोबा म्हटलें तरी खातो, मग वाघोबा म्हणण्याची लाचारी तरी कां पत्करा ? अशीच इटालियनांची विचारसरणी असल्यास ती स्वाभाविक आहे. यामुळेंच मुसोलिनी गेला व बदाग्लिओ आला तरी प्रतिकार चालूच राहिला. तथापि सिसिलीची मोहीम चालू असतांनाच इटालीवर आकाशांतून जी आग ओकण्यांत आली तिचे चटके इटालियनांना असह्य होऊं लागले आहेत. आतां तर काय, सिसिलीचा सगळा प्रदेश हा युद्धाचा पायाच झाल्यानें तेथून विमानांतून व लढाऊ जहाजांवरून इटालीच्या कोणत्याहि भागावर बेफाम मारा करतां येईल. या घोर संकटाला तोंड कसें द्यावयाचें याचा इटालियनांना विचार पडला आहे. सिसिलीची मोहीम आटोपली हें कळतांच बदाग्लिओनें मंत्रिमंडळाची बैठक तांतडीनें बोलावली. पण त्या बैठकींत तरी दुसरें काय ठरणार ! दोस्त राष्ट्रें जर इटालीला युद्धांत ओढण्याचा आग्रह न करतां आणि इटाली हीच रणभूमि न करतां त्यांस तटस्थ राहूं देतील तर कदाचित् इटाली शरणचिठ्ठी लिहून देईल. परंतु इटालीच्या रणभूमीवरच जर दोस्त राष्ट्रें आणि जर्मनी यांचा झगडा जुंपावयाचा असेल तर इटाली कोणाच्याहि बाजूचा झाला तरी त्याची 'जंबुको हुडुयुद्धेन' या न्यायानें दामटी वळल्याविना राहणार नाहीं. हें जर खरें तर तोंड फिरविल्याची नामुष्की तरी कां पत्करा, असाच विचार बदाग्लिओचें मंत्रिमंडळ करील.

अमेरिकेंत जें राजकारण चालू आहे त्यांत या मुद्द्याचा खल चाललाच असेल. परराष्ट्रमंत्री ईडन हे आपल्या हस्तकांसह त्वरेनें क्वेबेकला गेले ते कांहीं लष्करी सल्ला देण्यासाठीं गेले नाहींत. इटालीला आपल्या बाजूला वळवून घेऊन जर्मनीविरुद्ध करावयाची चढाई फ्रेंच किनाऱ्यावर उतरून करणें बरें कां इटाली जिंकून नंतर मग तेथून जर्मनीवर हल्ला करणें बरें यांतील तरतमभाव पारखून अखेर निर्णय घेण्यांत येईल; आणि केवळ लष्करी दृष्टीनें न पाहतां राजकीय दृष्टीनें पाहिल्यास इटाली जिंकून तेथें तळ देऊन बसून जर्मनीवरील मोहीम चालविण्यांत फायदा आहे हें उघड होय. यास्तव इटालीची गय न करतां तीवर चढाई करण्याला प्रारंभ होईल व त्याची कडेकोट तयारी झाल्याचीहि वार्ता कानावर येऊं लागली आहे. तेव्हा दोस्तांचें सैन्य इटालींत शिरलें तर यापुढें युद्धाला रंग कसा काय चढेल हेंच पाहणें आहे.

## जर्मनी दोस्तांना कोठें अडवील

दोस्त राष्ट्रें इटालीला कांहीं सवलती देण्याचें मान्य करोत अगर न करोत, जर्मनीच्या दृष्टीनें इटालींतच दोस्तांच्या सैन्याशीं निकराचा सामना करणें आवश्यक असल्यानें जर्मनी तशा तयारीला लागला आहे. सिसिलींतून जेवढें सैन्य व रण-साहित्य काढून आणलें तेवढें तर इटालींत राहणारच; पण त्याशिवाय जर्मनींतून खास पलटणी व रणसाहित्य इटालींत पाठवून इटालीचा उत्तरभाग जर्मनीनें लष्करी-दृष्ट्या व्यापण्यास सुरुवात केली आहे. दोस्तांच्या चढाईला अडविण्याची मुख्य जागा उत्तर इटाली असली तरी दोस्तांना इटालीचा दक्षिण भाग बिनविरोध व्यापतां येईल असा त्याचा अर्थ नव्हे. सिसिलींत दोस्तांचें सैन्य उतरत असतांना विशेष अड-थळा झाला नाहीं; तसा प्रकार इटालींत होणार नाहीं. इटालींत पाऊल ठेवण्याच्या वेळेपासूनच जर्मन सैन्य दोस्तांना अडाविण्याची शिकस्त करील. तथापि दोस्तांच्या अमूप विमानांच्या माऱ्यामुळें जर्मनांना दक्षिण इटालींत फार वेळ टिकाव धरणें शक्य होणार नाहीं. यामुळें ते उत्तरेकडे मागें सरकत जातील. परंतु लिग्युरिअन अपेनाइन्स पर्वताचा आसरा घेऊन आर्नो नदीच्या कांठीं दोस्त सैन्याला अडवून धरण्याची शिकस्त जर्मनीकडून करण्यांत येईल.

पो नदीच्या तीरावर जर्मनांची मोर्चेबंदी चालू झाली आहे, हें खरें असलें तरी पो नदीपर्यंत दोस्तांना बिनविरोध जाऊं दिलें जाईल असा त्याचा अर्थ होत नाहीं. इटालीवरील दोस्तांची चढाई पश्चिम व पूर्व अशा दोन्ही किनाऱ्यांवरून सुरू होईल. त्या दोहोंत पश्चिम किनाऱ्याचा भाग अधिक डोंगराळ असल्यामुळें त्या बाजूची प्रगति मंदगतीनें चालेल. पूर्व किनाऱ्यावरील प्रगति अधिक झपाट्यानें झाली तरी जसजसें उत्तरेस जावें तसतसा सपाट प्रदेश संकुचित होत जात अस-ल्यानें ही प्रगति मंदावेल. अर्थातच अक्षांश ४३$\frac{1}{2}$ च्या सुमारास लेगहार्न, फ्लॉरेन्स,

सानमारिनो या रेषेवर पाठीशीं असलेली अपेनाइन्सची रांग आणि पुढें आर्नो नदी-तीरावर केलेली मोर्चेबंदी यांच्या साहाय्यानें जर्मन सैन्य दोस्तांची चढाई थोपविण्याचा कडोविकडीचा प्रयत्न करील. ही रांग फुटली तरी इटालींतला शेवटचा सामना पो नदीच्या तीरावर होईल; आणि तेथें जर्मन सैन्य हटलें तर दोस्तांची सेना आल्प्स ओलांडण्याचा प्राणघातक उपद्व्याप न करतां पूर्वेला वळून ऑस्ट्रियांत घुसण्याचा सीधा मार्ग धरील.

## जर्मनीच्या मर्मस्थानावर घाव

दोस्तांची चढाई इतक्या पल्ल्याला पोंचेपर्यंत किती काळ लोटेल याचा अंदाज सांगतां येत नाहीं. ही मोहीम येत्या नाताळापर्यंत आटोपेल असें चर्चिल बोलल्याचें कॅनडांत प्रसिद्ध झालें. पण 'मी तसें बोललों नाहीं' असें सांगून चर्चिलनें त्या वार्तेचा ताबडतोब इन्कार केला, तरी पण यावरूनच येत्या तीन-चार महिन्यांत इटालीची गठडी वळेल आणि जर्मनीच्या मानेला तात लागेल, असा मुत्सद्यांचा कयास असावा. परंतु लष्करी तज्ज्ञांना ही गोष्ट इतकी सोपी वाटत नसावी असें वाटतें. रशियाच्या बाजूला जर्मनी एकसारखी माघार घेत आहे, नॉर्वेत धामधूम सुरू झाल्याची वार्ता आहे आणि इटाली व खुद्द जर्मनी या देशांवर जो भयंकर आगीचा मारा होत आहे त्यामुळें लोक हैराण होत आहेत. तयार झालेल्या रणसामुग्रीची आगीनें राख होत आहे, कारखाने बंद होत आहेत आणि वाहतुकीच्या साधनांची मोडतोड झाल्यानें सैन्याच्या हालचाली वक्तशीर होऊं शकत नाहींत. इतक्या विविध अडचणींना तोंड देऊन जर्मनी किती दिवस टिकाव धरूं शकेल याचा नक्की अंदाज करणें शक्य नाहीं; कारण तसा अंदाज करण्याला जरूर ती माहिती उपलब्ध होत नाहीं. रशिया विजयी होऊन पुढें धांव घेत आहे हें खरें. पण त्याची मनुष्यहानि किती होत आहे व त्याचा रण-साहित्याचा पुरवठा टिकून आहे कां, खलास झाला आहे, हें तरी कोठें कळतें? त्याचप्रमाणें इटालींत रणकंदन सुरू झाल्यावर दोस्तांचीं विमानें जर्मनी व फ्रान्सवर हल्लीं सारखाच आगीचा वर्षाव करूं शकतील कां नाहीं याची शंकाच आहे. पूर्वेकडील जपानवरील मोहीम कितपत नेट धरूं लागेल हेंहि पाहिलें पाहिजे. या सर्वच गोष्टी अज्ञात असल्यानें जर्मनी किती वेळ धीर धरूं शकेल हें जसें नक्की सांगतां येत नाहीं, त्याचप्रमाणें दोस्तांची प्रगति किती वेगानें होईल अथवा किती दिवस खुंटून राहील हेंहि सांगवत नाहीं. तथापि यापूर्वीं जर्मनी दोस्त राष्ट्रांच्या मर्मस्थानावर घाव घालीत होता, ती स्थिति पालटून जर्मनीच्या मर्मस्थानावर घाव बसूं लागले; एवढी उलटापालट सिसिलीच्या विजयानें झाली, म्हणूनच या विजयाला दोस्तांचा पहिला खरा विजय म्हणावयाचें.

# जय निश्चित, काळ अनिश्चित १३

[ महायुद्धाचें पारडें जर्मनीच्या व जपानच्या विरुद्ध उलटून दोस्त राष्ट्रांना विजय प्राप्त होण्याची निश्चिति दिसूं लागली. त्या वेळीं हें पारडें खरोखरच फिरलें, आतां जर्मनी टिकाव धरूं शकत नाहीं हें निश्चित आहे, मात्र अखेरचा जय मिळण्याला कालावधि किती लागेल तेवढेंच अनिश्चित आहे, असें मत या लेखांत स्पष्टपणें दिलें असून तोच अंदाज पुढें खरा ठरला. ]

### हिंदी वीरांचा पराक्रम

गेल्या पंधरा दिवसांत दोस्त सैन्यांची जी सर्वच रणक्षेत्रावर सरशी होत चालली तिच्या योगानें मध्यंतरीचें मंदीचें वातावरण बदलून सर्वत्र तेजीचें वातावरण अनुभवास येऊं लागलें आहे. मे महिन्याच्या प्रारंभींच्या आठवड्यांत महायुद्धाला एकप्रकारें स्थगितपणा आला होता. परंतु मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून सर्वच आघाड्यांवरचा रंग बदलत चालला. आसामांत कोहिमाची मुक्तता झाली, क्रायमियांत सेबॅस्टोपोलचा अजिंक्य किल्ला जर्मनीच्या हातून रशियनांनीं हिसकावून घेतला आणि इटालींत दोस्त सैन्यानें जर्मनांची गुस्टाव्ह-फळी फोडून जर्मनांच्या विजयाच्या आशेच्याहि चिंधड्या उडविल्या. या तीन ठिकाणच्या विजयांपैकीं दोन ठिकाणचे विजय हिंदी वीरांच्या पराक्रमानें प्राप्त झाले आहेत हें नमूद करून ठेवण्यासारखें आहे.

इटालींतला जर्मनांनीं रचलेला कॅसिनोचा चक्रव्यूह अभेद्य मानला जात होता; परंतु दि. ११ मेच्या दिवशीं गुस्टाव्ह फळीवर दोन हजार तोफांचा भडिमार सुरू झाला आणि तीन दिवसांच्या आंत हिंदी पठ्ठ्यांनीं रॅपिडो नदी ओलांडून सेंट अँजेलो ठाणें हस्तगत केलें. गुस्टाव्ह फळीच्या दुसऱ्या टोंकास अमेरिकन सैन्यानेंहि त्याच दिवशीं गॅरिग्लिआनो नदी ओलांडून कॅसलफोर्ट ठाणें बळकाविलें आणि निकरानें पुढें चाल केली. या दुहेरी विजयाचा परिणाम असा झाला कीं, जर्मनांचा कॅसिनोचा चक्रव्यूह उध्वस्त झाला आणि त्यांना तो व्यूह सोडून द्यावा लागला. एवढेंच नव्हे तर, गुस्टाव्ह फळी सोडून देऊन तिच्या पाठीमागील हिटलर फळीपर्यंत माघार घ्यावी लागली. गुस्टाव्ह फळी फोडण्याला सहा महिने झगडावें लागलें, तेव्हां तिच्याहून अधिक बळकट अशी हिटलर फळी फोडण्याला आणखी किती तरी कालावधि लागेल असें कोणास वाटण्याचा संभव आहे. पण हें कांहीं साधें 'काळकामवेगाचें' गणित नव्हे. गुस्टाव्ह फळी फोडण्याला सहा महिने लागले

( केसरी, दि. २६ मे १९४४ )

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
नगर वाचनालय, सातारा.



असले तरी ज्या साधनांनीं व ज्या वेगानें गुस्टाव्ह फळी फोडली गेली त्या साधनांचा व त्या वेगाचाच उपयोग होऊं शकल्यास जर्मनांना हिटलर फळीहि टिकविणें अशक्य होईल.

### बॉंबर्सच्या हल्ल्यांचा प्रताप

सहा महिने स्थगित झालेली प्रगति एकाएकी इतक्या झपाट्यानें कशी चालू झाली हें कोडें उलगडणें कांहीं फारसें कठीण नाहीं. जर्मनीवर आणि जर्मनव्याप्त फ्रान्सवर हजारों बॉंबर्सचा जो फेरफटका अलीकडे एकसारखा चालू आहे त्याचा परिणाम जर्मनीचें लष्करी यंत्र खिळखिळें होण्यांत अवश्य झाला असला पाहिजे. रणसाहित्याच्या कारखान्यावर आगीचा वर्षाव झाल्यानें कारखान्यांचें काम बरेंच दिवस थंड पडतें; तेलाच्या साठ्यावर ठिणगी पडून तें पेटल्यानें तेलाच्या अभावीं कामें बंद पडतात; आगगाडीच्या स्टेशनवर हल्ले झाल्यानें वाहतुकीचे डबे जळून निरुपयोगी होतातच. पण त्याशिवाय रेल-रस्ते उखडले गेल्यामुळें आगगाड्यांची वाहतूक सुरळीत चालूं शकत नाहीं. बॉंबफेकी विमानें डोक्यावर घरघरूं लागलीं म्हणजे खंदकांचा आश्रय घ्यावा आणि तीं विमानें आपलें विध्वंसनाचें कार्य करून गेलीं म्हणजे इंजिनियरांनीं हजारों मजूर गोळा करून कारखान्यांतील यंत्राची व आगगाडीच्या रस्त्यांची जुळवाजुळव करावी व गाड्या कशाबशा चालू कराव्यात, तों इतक्यांत विमानांची दुसरी धाड येऊन दुरुस्त केलेले रस्ते पुनश्च नादुरुस्त व्हावेत, असा प्रकार एकसारखा चालू आहे. फ्रान्सच्या किनाऱ्याकडे जाणाऱ्या आगगाड्यांच्या रस्त्यांवर दोस्तांच्या विमानांचा विशेष कटाक्ष असल्यानें त्या बाजूच्या आगगाड्यांचें दळणवळण जवळ जवळ बंद पडल्यासारखेंच झालें आहे.

फ्रेंच किनाऱ्याकडे जाणाऱ्या रेल्वेची जितकी दुरवस्था झाली आहे तितकी नसली तरी बर्लिनहून रोमकडे जाणारे रस्तेहि असेच वारंवार उध्वस्त केले जातात; त्यामुळें आघाडीवरील सैन्याला रणसाहित्याचा सतत पुरवठा वक्तशीरपणें होऊं शकत नाहीं. गुस्टाव्ह फळीवर चालून जाण्यापूर्वी दोस्तांच्या विमानांनीं ब्रेन्नर खिंडींतून बाहेर पडणाऱ्या लोहमार्गाचा आधीं खरपूस समाचार घेतला, याचें कारण वरील मीमांसेंतच आढळून येईल. आणि आतांसुद्धां हिटलर फळीच्या पिछाडीवरील जर्मन सैन्याच्या छावणीवर आधीं वैमानिक हल्ले करून मागाहूनच चढाई करणाऱ्या दोस्त सैन्याचें आगेकूच होत असतें.

### रोम वांचविण्याचा प्रयत्न

अशा रीतीनें जर्मनांचें व्यूह विसकटत विसकटत दोस्त सेना रोम गांठणार हें निश्चित आहे. मात्र याला कालावधि किती लागणार तेवढें मात्र अनिश्चित आहे. रोम गेलें कीं, जर्मनांचा जीव अर्धमेला होणार हें उघड असल्यानें रोमच्या

बचावासाठीं केसरलिंग हा विश्वप्रयत्न करीत आहे. त्यानें तेथील झुंजीसाठीं आपलीं खास झुंजार तुफानी पथकें तेथें आणविलीं असून लिरी खोऱ्यांत अटीतटीनें प्रतिकार केला जात आहे.

गुस्टाव्ह फळी अभेद्य मानली जात असतां ती तीन दिवसांत फुटली तेव्हां लिरी खोऱ्यांतला प्रतिकार तरी कितीसा टिकेल अशी शंका येतें खरी, पण गुस्टाव्ह फळी फोडण्याला जी अनुकूलता लाभली ती आतां यापुढील रणकंदनाला लाभेलच असें नाहीं. गुस्टाव्ह फळी फोडण्यासाठीं सेनापति अलेग्झांडर यानें पाहिली महत्त्वाची युक्ति ही केली कीं, कसलेल्या आठव्या डिव्हिजनचे सैनिक पूर्वींच्या जागेवरून गुपचूप हलवून ३८ तासांच्या आंत अमेरिकेच्या ५ व्या सेनेच्या साहाय्यार्थ आणून उभे केले. या जुटीचा अपेक्षित परिणाम तत्काळ व्यक्त झाला. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही कीं, तिसऱ्या आघाडीसाठीं तयार ठेवलेल्या सैन्यांतलें बरेंचसें सैन्य आणि त्यांचें रणसाहित्य इटालीच्या किनाऱ्यावरच उतरवून पूर्वींच्या सैन्याचें बल अतोनात वाढविलें. यामुळेंच एकाच वेळीं दोन हजार तोफांतून भडिमार करतां आला आणि लिरी खोऱ्यांतील चढाईसाठीं एक हजार रणगाडे पुढें लोटतां आले. दोस्तांच्या सैन्याचें हें वाढतें बळ जर्मनांच्याहि आतां लक्षांत आलें असून त्यांनींहि आतां आपली राखीव सेना आणि आड्रिआटिक समुद्राच्या किनाऱ्याकडची टेहळणीची सेना रोमच्या बचावाकरितां आणून उभी केली आहे. यामुळें जर्मनांच्या प्रतिकाराचा जोर वाढला आहे खरा, पण तिकडे आड्रिआटिक किनारा असुरक्षित झाला असल्यानें दोस्तांच्या तिसऱ्या आघाडीचें सैन्य यापुढें इटालीच्या पश्चिम किनाऱ्यावर न उतरतां इटालीच्या पूर्व किनाऱ्यावर अथवा अल्बानियाच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरण्याचा संभव आहे.

## दोस्तांचें सैन्य कोठें उतरेल ?

फ्रान्सवर हल्ला करण्याची हुलकावणी दाखवून त्या बाजूला जर्मनांची पुष्कळशी फौज डांबून ठेवून दोस्तांनीं इटालींत सैन्यभरती केली आणि गुस्टाव्ह फळी फोडण्याचा डाव साधला. आतां यापुढें दोस्तांचें सैन्य कोठें उतरणार हा प्रश्नच आहे. बाल्कन्सवर तें उतरेल असें मानून, फ्रान्सांतलें सैन्य कमी करून तें त्या बाजूला पाठवावें तर फ्रान्सच्याच किनाऱ्यावर अचानक स्वारी होऊं शकेल. बरें, फ्रान्सांतून सैन्य हलवूं नये म्हटल्यास इटालीचा व बाल्कन्सचा बचाव कसा करावयाचा? असा दुहेरी पेंच जर्मनांपुढें पडला आहे. यांतून योग्य मार्ग शोधण्यासाठींच रुंडस्टेड आणि रोमेल यांची नुकतीच फ्रान्सांत गुप्त सल्लामसलत झाली. रुंडस्टेट व रोमेल यांच्यांत खडाजंगी भांडण झाल्याचें वृत्त कांहीं दिवसांपूर्वीं आलें होतें, त्याचा ग्रंथ आतां नीट लागतो. फ्रान्सला धोका अधिक कां बाल्कन्सला धोका अधिक हाच त्यांच्यांतला वादाचा

मुद्दा होय. जो तो आपल्या बाजूला अधिक सैन्य आणि जादा रणसाहित्य ओढूं पाहणार आणि त्या बाबतींत एकमत होणें कठीण आहे. कारण कोठलीहि एक बाजू कमकुवत झाल्यास दोस्तांची तिसऱ्या आघाडीची झडप नेमकी त्या बाजूवरच पडावयाची. या अडचणींतून मार्ग काढून जर्मन सरसेनापति फ्रान्स, इटाली व बाल्कन्स या तीनहि बाजूंचा बचाव कसा करूं शकतील हा प्रश्नच आहे; आणि म्हणूनच दोस्तांचा जय निश्चित आहे. तथापि या सगळ्या घडामोडी दोस्तांना अनुकूल अशा घडून येण्याला कालावधि किती लागेल तें मात्र अनिश्चित आहे.

## रशिया वाट पाहात राहील

रशियानें सेबास्टोपोल घेऊन आपल्या पराक्रमाचा उच्चांक गांठला. त्या वेळेपासून त्या आघाडीकडची हालचाल मंदावली आहे. तथापि रशिया कांहीं एवढ्यानें थकून किंवा समाधानाची ढेकर देऊन स्वस्त बसणारा नाहीं. मात्र त्याला नव्या चढाईची पक्की तयारी करण्याला कांहीं फुरसद हवी. पण त्याशिवाय खरी महत्त्वाची बाब म्हणजे आतां यापुढें दोस्तांच्या तिसऱ्या आघाडीची सुरुवात होण्याची तो वाट पाहात राहणार. आजपर्यंत रशियानें एकट्यानेंच जर्मनीशीं सामना करून अतोनात नुकसान सोसलें; पण तो रशियाचा जगण्यामरण्याचा व मानापमानाचा प्रश्न होता. रशियाचा सुपीक, समृद्ध आणि औद्योगिक केंद्रें असलेला प्रांतच जर्मनीनें प्रत्यक्ष बळकाविला असल्यामुळें दोस्तांच्या चढाईची वाट न पाहतांच रशियाला तो सोडविणें आवश्यक वाटलें. परंतु यापुढची चढाई पोलंड, झेकोस्लोव्हाकिया आणि बाल्कन्स या परराष्ट्रांतून व्हावयाची आहे. ही चढाई यशस्वी करण्यासाठीं रशियनांना हजारों वीरांचा बळी द्यावा लागेल; पण अखेरीस तो मुलूख कोणाच्या अधिराज्याखालीं राहणार हा प्रश्नच आहे. पोलंड आपला स्वतःचा मुलूख रशियाला देऊन त्याच्या मोबदला जर्मनींतला मुलूख घेऊन बसण्याला खुषी नाहीं, असें आतां चर्चिल यांनीं पार्लमेंटांत उघडपणें सांगून टाकलें. बाल्कन्स संबंधांत तशी वाच्यता झाली नसली तरी तोहि प्रश्न तितकाच भानगडीचा असणार. अर्थातच भावी राजकीय धोरणाविषयीं एकवाक्यता झाल्याशिवाय आणि दोस्त राष्ट्रांनींहि तिसरी आघाडी उघडून बाल्कन प्रांतांना पश्चिम बाजूनें शह दिल्याशिवाय रशिया पूर्वेकडून बाल्कन्सवर चालून येण्याची घाई करणार नाहीं. बाल्कन्सवर स्वारी करण्यापेक्षां फ्रान्सच्या किनाऱ्यावर सैन्य उतरविणेंच दोस्तांना इष्ट वाटल्यास रशिया आपली चढाई कायमची स्थगित करील असें नाहीं. त्याची स्वतःची पूर्ण तयारी होतांच तो जर्मनीवर पूर्वेकडून हल्ला चढवील; पण मग युरोपच्या पूर्वभागांतील राजकारणांत तो ब्रिटिशांना ढवळाढवळ करूं देणार नाहीं. अशा रीतीनें हा प्रश्न गुंतागुंतीचा असल्यामुळें या चढाईची नक्की वेळ आतांच अंदाजतां येत नाहीं आणि म्हणूनच दोस्तांचा जय निश्चित असला तरी त्याची वेळ तूर्त तरी अनिश्चितच आहे.

### ब्रह्मदेशांतल्या लढाईचें वेळापत्रक

ब्रह्मदेशच्या बाजूच्या लढाईची परिस्थिति पाहिल्यास तिकडील वेळापत्रक तर अधिकच अनिश्चित आहे. मार्च महिन्यापासून जपाननें इंफळ व कोहिमा वेढून प्रत्यक्ष हिंदुस्थानच्या हद्दींतच पाय रोवला. तेथून त्याला हुसकून देणें मोठें मुष्किलीचें होऊन बसलें. चाळीस दिवसांच्या झटापटीनंतर आतां कोठें कोहिमा रिज मोकळा झाला आहे. तरी देखील इंफळचा धोका पूर्णतः दूर झालेला नाहीं. इंफळच्या बाजूला जपान्यांच्या सैन्याची भरती वाढतच असल्याची ताजी वार्ता आहे. चीनच्या बाजूनें जपानला ताण बसवावा, तर तेंहि सद्यःस्थितींत संभवनीय दिसत नाहीं. चीनच टेकीला आला असून, रणसाहित्याचा पुरवठा करण्यासाठीं तो दोस्तांच्यापुढें गयावया करीत आहे. तिसऱ्या आघाडीच्या तंगीमुळें दोस्तांनाहि आपलें रणसाहित्य दूरवर पाठविणें जड जात आहे. अशा परिस्थितींत स्टिलवेलच्या सैन्यानें मिटकियानच्या भागांत कितीहि पराक्रम गाजविला तरी त्याचा परिणाम सबंध आघाडीवर होऊं शकत नाहीं. चीनचें सैन्य दक्षिणेकडे वळून स्टिलवेलच्या सैन्याला येऊन मिळालें तर सैनिकांची संख्या वाढेल, पण त्यामुळें युद्धसाहित्याचा तुटवडा दूर होण्याच्याऐवजीं तो अधिकच जाणवूं लागेल. आसाम-बर्मा सरहद्दीवर पावसाळा सुरू झाल्यावर दोस्तांना चढाई करणें कठीण जाईल. जपानलाहि ती अडचण आहेच, तरी पण दोहोंतला हा फरक लक्षांत घेतलाच पाहिजे कीं, कोहिमा व इंफळ यांच्या पश्चिमेला जितकी घनदाट बरसात होते तितकी कांहीं ब्रह्मदेशांत होत नाहीं. त्यामुळें कोहिमा व इंफळ येथील दोस्त सैन्याला पावसाळ्यांत हिंदुस्थानशीं संबंध ठेवणें जितकें अवघड जाईल तितकें कांहीं जपानी सैन्याला आपल्या पिछाडीशीं संबंध राखणें अवघड जाणार नाहीं. यामुळें त्या बाजूचा पावसाळा संपून जाईपर्यंत आसामच्या आघाडीवरील चढाई दोस्तांना निकालांत काढतां येणार नाहीं.

### आस्ते-कदम प्रगति

प्रशांत महासागरांतून एकेक बेट हस्तगत करून जपानवरील हल्ला करण्याचें क्षेत्र आटोक्यांत आणण्याचें कामहि आस्ते-आस्तेच चालावयाचें आहे. पश्चिमेकडे एखादी महत्त्वाची लढाई जिंकली व हिटलर फळीसारखी फळी फोडली कीं, एकदम शत्रूची बाजू ढासळण्याचा जसा संभव आहे, तसा कांहीं संभव प्रशांत महासागरावरील चढाईंत नाहीं. अर्थातच ती प्रगति आस्ते-कदमच चालणार असल्यामुळें तिचें वेळापत्रक आगाऊ ठरवितांच येत नाहीं.

एवंच महायुद्धाच्या तीन आघाड्यांपैकीं पूर्वेकडील आघाडीचा कार्यक्रम स्वाभाविकच दिरंगाईचा आहे. रशियन आघाडीवरील चढाई दोस्तांच्या बाल्कन्सवरील चढाईवर अवलंबून आहे. आणि दोस्तांची बाल्कन्सवरील चढाई रोमच्या विजयावर अवलंबून आहे. अर्थातच इटालींतील रणभूमीवर आपलें शक्तिसर्वस्व खर्च

करून जर्मनांचा पूर्ण मोड करून रोम लवकर गांठल्यास लढाई आटोक्यांत येण्याचा अवधि नजीक येईल. उलटपक्षीं रोम गांठणें जितकें लांबणीवर पडेल, तितकें लढाईचें शेपूट अधिकाधिकच लांबत जाईल.

---

## युरोपांतलें नवें जिब्रॉल्टर १४

[ दोस्त राष्ट्रांनीं फ्रेंच किनाऱ्यावर उतरून नवी आघाडी निर्माण केली त्या वेळीं फ्रान्सच्या पश्चिम किनाऱ्यावरील जर्मनीनें नवा निर्माण केलेला शेरबुर्गचा बळकट किल्ला हस्तगत करावा लागला. हें बळकट ठाणें हस्तगत झाल्यानें महायुद्धाला कलाटणी कशी मिळेल त्याची या लेखांत भवति न भवति केली असून, महायुद्धाची समाप्ति झाल्यानंतर देखील राष्ट्रसंघाला जर्मनीवर दाब ठेवण्याला आणि फ्रान्सला संरक्षणाची शाश्वती वाटूं लागण्याला शेरबुर्गचा कसा उपयोग होईल याचें विवेचन यांत असून, जिब्रॉल्टरमुळें जसें भूमध्यसमुद्राचें नाकें ब्रिटिशांच्या हातीं आहे त्याचप्रमाणें अटलांटिक महासागराचें नाकें शेरबुर्गमुळें राष्ट्रसंघाच्या हातीं राहणार असल्यानें त्याला युरोपांतलें दुसरें जिब्रॉल्टर म्हटलें आहे. ]

दोस्त राष्ट्रांच्या नव्या चढाईंत अमेरिकन सैन्यानें फ्रान्सच्या किनाऱ्यावरील सर्वोत्कृष्ट व अत्यंत दुर्गम असें शेरबुर्गचें बंदर हस्तगत करून आपल्या पराक्रमाचा उच्चांक गांठला. दोस्तांची युरोपच्या पश्चिम-किनाऱ्यावरील स्वारी म्हणजे जर्मनीच्या दुर्भेद्य किल्ल्यावरील चढाईच होय. या चढाईंत नॉर्मंडीच्या किनाऱ्यावर ब्रिटिश व कॅनेडियन सैन्य उतरवून आणि शेरबुर्ग द्वीपकल्पांतील जर्मन सैन्याची अमेरिकन सैनिकांकडून कोंडी करवून, दोस्त राष्ट्रांनीं जर्मनीच्या दुर्भेद्य किल्ल्याच्या तटाखालीं सुरुंगच लावले होते आणि आतां शेरबुर्गचा पाडाव करून अमेरिकनांनीं जर्मनीच्या अटलांटिक तटांत मोठेंच भगदाड पाडलें आहे. याच वेळीं मॉंटगॉमेरीनेंहि नॉर्मंडींतून जोराची चढाई चालविली आहे. ही चढाई यशस्वी होऊन, तिकडील तटासहि खिंडार पडलें. आतां यापुढें अमेरिकन आणि ब्रिटिश सैन्यें हातास हात मिळवून पॅरिसवर चाल करून जाऊं लागलीं म्हणजे जर्मनीचा दुर्भेद्य मानलेला अटलांटिक तट जमीनदोस्त झाला असें म्हणावें लागेल.

( केसरी, दि. ३० जून १९४४ )

जर्मनीच्या काळजावर घाव घालण्याची वाट मोकळी करून देणारें हें शेरबुर्गचें दुर्घट स्थळ जर्मनीनें कांहीं सुखासुखी सोडलें नाहीं. शेरबुर्ग हातचें गेलें म्हणजे आपल्या युरोपच्या दुर्गम किल्ल्याचा तटच ढांसळल्यासारखा आहे, हें जर्मनी पक्कें जाणत असल्यानें त्यानें शेरबुर्गच्या बचावासाठीं निकरानें झुंज खेळण्यांत कसूर केली नाहीं आणि अमेरिकनांनाहि शेरबुर्गचा पाडाव करण्यास अतोनात बळी द्यावे लागले हें निकामी झालेल्या सैनिकांचे आंकडे प्रसिद्ध होत आहेत, त्यावरून कळून येईलच. अर्थातच शेरबुर्गचा संग्राम ही चालू महायुद्धांतील क्रांतिकारक लढाई आहे हें ओळखून उभय पक्षांनीं आपआपल्या पराक्रमाची शर्थ केली. त्यांत जर्मन पक्षाला साधनसामुग्रीचा व विशेषतः दारूगोळ्याचा अखेरीस तुटवडा पडून हार खावी लागली आणि अमेरिकनांना विजयश्रीनें वरलें.

जर्मनीच्या बाजूला साधन-सामुग्रीचा तुटवडा पडत जाऊन यापुढें जर्मनीची बाजू ढांसळत जाणार हें भाकीत आम्हीं ता. ९ जूनच्या अग्रलेखांत केलें होतें व त्याचें आतां प्रत्यंतर येत आहे. दोस्त राष्ट्रांच्या वैमानिक हल्ल्यांनीं जर्मनीच्या सर्वच शस्त्रास्त्रांची धुळधाण होत असल्यानें जर्मनीला यापुढें मोठें सैन्य एकत्र जमवून प्रतिपक्षाचा हल्ला थोपवून धरणें दुर्घट होत जाईल. उलटपक्षीं दोस्त राष्ट्रांची साधनसामुग्री दिवसेंदिवस वाढत जात आहे आणि एकेक नवें मोक्याचें ठाणें जिंकल्यानें साधनांची जमवाजमव करण्याची त्यांची अनुकूलताहि वृद्धिंगत होत आहे. याचा नैसर्गिक परिणाम जर्मनीच्या पराजयांत होणार हें आतां उघड दिसूं लागलें आहे.

### स्वारीपूर्वीची प्रचंड तयारी

तिसऱ्या आघाडीवरील स्वारी हा या युद्धांतला क्रांतिकारक भाग असल्यानें दोस्त राष्ट्रांनीं या चढाईची तयारीहि तशीच प्रचंड केली होती. किनाऱ्यावर सैन्य उतरविणें, मार्गांत त्याचें रक्षण करणें आणि किनाऱ्यावर उतरलेल्या सैन्याला युद्ध-साहित्य पुरविणें या कामीं दोस्तांचीं ६५०० जहाजें सतत खपत होतीं आणि अद्यापहि त्यांची ही कामगिरी सारखी चालूच आहे. ही स्वारी निर्वेधपणें करतां यावी म्हणून दोस्तांच्या वैमानिकांनीं प्रथम जर्मन पाणबुड्यांचा ठावठिकाणा शोधून त्यांच्यावर अग्निगोलांची वृष्टि करून त्यांचा समाचार घेतला आणि गलबतांचा मार्ग निष्कंटक केला. त्यानंतर फ्रान्सचा किनारा गांठण्यापूर्वीं वाटेंतले पाण-सुरुंग काढून रस्ता मोकळा करणें जरूरीचें होतें. हें काम दोस्तांच्या सुरुंगझाडू जहाजांनीं आपल्या जिवाची तमा न बाळगतां मोठ्या धाडसानें पार पाडलें. अशा रीतीनें किनाऱ्याकडे जाण्याचा रस्ता खुला झाल्यावर फ्रेंच किनाऱ्यावरील जर्मन बातेऱ्यांचा समाचार घेणें जरूरीचें होतें. ही कामगिरी बॉम्बफेकी विमानें आणि बेडर जहाजें या उभयतांकडे सोंपविण्यांत आली होती. शंभर शंभर विमानांचा

एकेक ताफा असे पंधरा ताफे या कामगिरीवर होते. अशा १५०० विमानांनीं एकेका दिवसांत दहा ते पंधरा खेपा करून फ्रान्सच्या किनाऱ्यावर जेथें कोठें जर्मन तोफांचे ताफे, दारुगोळयाचीं कोठारें, पेट्रोलच्या टाक्या, रणगाड्यांचे तळ, विमानांचे तळ, सैन्यवाहू आगगाड्यांचे डबे दिसले त्या त्या भागावर अग्निगोलांचा एकसारखा वर्षाव करून जर्मनीच्या युद्धसाहित्याचा धुव्वा उडविला. वैमानिकांनीं फेकलेल्या बॉम्बसनाहि दाद न देणाऱ्या ज्या बातेऱ्या किनाऱ्यावर होत्या त्यांच्यावर दोस्तांच्या रणतऱ्यांनीं आग ओकण्यास सुरुवात केली. नेल्सन, रॅमिलीज, वॉरस्पाइट इत्यादि ब्रिटिशांची आणि टेक्सस, नेव्हाडा, आर्केन्सस प्रभृति अमेरिकनांची अव्वल दर्जाचीं बेडर जहाजें जर्मनांच्या बंदर-संरक्षक तोफखान्यावर जेव्हां आपले अजस्र गोळे फेकूं लागलीं तेव्हां जर्मन बातेऱ्यांच्या ठिकऱ्या उडूं लागल्या. एके ठिकाणीं जर्मनांच्या १७ तोफांची बातेरी होती तिचा सुगावा काढून ब्रिटिशांच्या सुप्रसिद्ध नेल्सन रणतरीनें तिच्यावर रोख धरला आणि आपल्या १५ इंची व्यासाच्या तोफांच्या तोंडांतून दर मिनिटास ९ टन वजनाचे गोळे फेंकण्यास सुरुवात केली. एवढ्या जबरदस्त माऱ्यापुढें जर्मन बातेऱ्या टिकाव धरूं शकल्या नाहींत, त्यांच्या चिंधड्या उडाल्या आणि जर्मनांच्या तोफा बंद पडल्यानें दोस्तांचें सैन्य निर्वेधपणें किनाऱ्यावर उतरून दहा-पंधरा मैल आंतपर्यंत घुसूं शकलें.

### वैमानिकांनीं केलेला आगीचा वर्षाव

दोस्तांच्या फौजा किनाऱ्यावर उतरून तेथें आपला तळ देऊन ठाण मांडून बसल्यावर बेडर जहाजांची कामगिरी संपली. पण बॉम्बफेक्या वैमानिकांच्या कामगिरीला अंतच नाहीं. आपल्या सैन्याच्या तळावर शत्रूच्या विमानांची धाड येऊं नये म्हणून कांहीं लढाऊ विमानें पहारा करीत असतात आणि बाकीचीं लढाऊ विमानें बॉम्बवृष्टि करणाऱ्या विमानांच्या संरक्षणाकरितां त्यांजबरोबर जाऊन बॉम्बबरसात करण्यास साहाय्य करतात. दोस्तांचे वैमानिक हल्ले युरोपवर सुरू झाल्यावेळेपासून दि. १५ जूनपर्यंत दोस्तांच्या बॉम्बफेक्या विमानांनीं चार लक्ष टन बॉम्बगोळे युरोपवर फेंकले व त्यांतले दोन लक्ष पंचाहत्तर हजार टनाचे गोळे खुद्द जर्मनीवर फेंकले, एवढें सांगितलें म्हणजे वैमानिक हल्ल्यांमुळें जर्मनीच्या कारखान्यांचा, रणसाहित्याचा, वहातुकीच्या साधनांचा कसा चुराडा झाला असेल आणि पेट्रोलसारख्या ज्वालाग्राही वस्तूंचा केवढा भडका उडाला असेल याची कल्पना येईल.

अशा रीतीनें जर्मनव्याप्त प्रदेश सडकून काढून जर्मनीचें युद्धयंत्र खिळखिळें केल्यावर अमेरिकनांनीं शेरबुर्गला गराडा दिला आणि त्याजवर जल, स्थल व आकाश अशा तिन्ही बाजूंनीं भडिमार सुरू केला. जर्मनीचें या भागांत २५ ते ३० हजार सैनिक होते, त्यांतले तीन-चार हजार बंदिवान् झाले. इतर सर्वांचा बहुतेक फडशा पडला तेव्हांच जर्मनांनीं हें दुर्घट स्थळ हातचें जाऊं दिलें. अमेरि-

कनांनाहि हें स्थळ घेण्यासाठीं भारीच किंमत द्यावी लागली. दि. २० जूनपर्यंतच्या पंधरा दिवसांतच त्यांचे सुमारें ३ हजार सैनिक ठार, १२ हजार जखमी, ८ हजार बेपत्ता झाले होते. खरा निकराचा संग्राम दि. २० ते २६ पर्यंत झाला. या सहा दिवसांतील हानि लक्षांत घेतल्यास जर्मन सैन्याच्या हानीपेक्षां ती अधिकच भरेल.

## दिल्ली दरवाजाची किल्ली

एवढें भारी मोल द्यावें लागलें तरी तें देऊन शेरबुर्ग हस्तगत केलेंच पाहिजे असेंच या स्थळाचें महत्त्व आहे. प्रचंड जहाजांतून सैनिक आणि अवजड रणगाडे किनाऱ्यावर उतरविण्याला शेरबुर्गसारखें दुसरें सोयिस्कर बंदर नाहीं. इंग्लंडच्या साउथॅम्पटन बंदरापासून तें अवघें ८३ मैल अंतरावर असल्यामुळें इंग्लंडला रण-साहित्य उतरविण्याला तें सोयिस्कर आहे. क्वीन मेरीसारखें प्रचंड जहाज ओहोटी-च्या वेळीं देखील धक्क्याला लागूं शकेल अशी त्याची नैसर्गिक रचना आहे, शिवाय त्या बंदराच्या अडीच मैल घेराच्या टापूंत नांगरलेल्या जहाजांना वादळाचा उपसर्ग पोंचत नाहीं. हें या बंदराचें वैशिष्ट्य होय. असें बंदर हातीं येणें म्हणजे युरोप खंडाच्या तटबंदींतील दिल्ली दरवाजाची किल्लीच हातीं येण्यासारखें असल्यानें दोस्त सेनापतींनीं शेरबुर्ग बंदराचाच रोख धरून या स्वारीकरितां पाऊल पुढें टाकलें. अमेरिकन सैन्यानें अचाट पराक्रम करून एवढें महत्त्वाचें ठाणें काबीज केलेलें पाहून ब्रिटिश सैनिकांना त्यांच्या यशाचा हेवा वाटूं लागला आहे. याचकरितां 'तिकडे नॉर्मंडीहून मॉंटगॉमेरीनें चढाई करून रोमेलचें रणगाड्यांचें पथक अडवून धरलें म्हणून अमेरिकनांना शेरबुर्गची कोंडी करतां आली व त्याचा पाडाव इतक्या लवकर झाला', असा खुलासा करण्यांत येत आहे. पण त्यांत कांहीं हंशील नाहीं. स्वारीची योजना ठरवितांना शेरबुर्गची अवघड कामगिरी अमेरिकनांच्या वांट्यास देण्यांत आली व ती त्यांनीं पत्करिली यांतच त्यांचा आत्मविश्वास प्रकट झाला आणि तो यथार्थ होता हें त्यांनीं शेरबुर्ग घेऊन सिद्ध करून दाखविलें यांत शंका नाहीं.

## महायुद्धाला मिळणारी कलाटणी

दोस्तांनीं शेरबुर्ग जिंकलें तेव्हा फ्रेन्च रणभूमीवर ते शेर झाले हें उघड आहे. आतां या विजयाचे भावी परिणाम काय होणार आणि महायुद्धाला कशी कलाटणी मिळणार तें पाहिलें पाहिजे. दोस्तांनीं तिसरी आघाडी सुरू करून जर्म-नीची अटलांटिक तटबंदी फोडली, आतां याचा कसकसा फायदा घेतां येईल तें पाहूं. शेरबुर्ग बंदराचा जर्मनांनीं जातां जातां विध्वंस केला असला, तरी अमेरिकन स्थापत्यविशारदांना तें बंदर कामचलाऊ स्थितींत आणण्याला मोठासा कालावधि लागेल असें नाहीं. बंदरांतील वाहतूक निर्वेध झाली कीं, इंग्लंडांतील साऊथॅम्पन बंदरापासून शेरबुर्गपर्यंतचा ८३ मैलांचा सागर-मार्ग रोखून धरून त्यांत

जर्मनांचें चिटपाखरू फिरकूं शकणार नाहीं, इतका त्याचा कडेकोट बंदोबस्त करण्यांत येईल. अशा रीतीनें लोहमार्गाइतकाच हा सागर-मार्ग सुगम झाला म्हणजे इंग्लंडांतील प्रचंड तोफा, रणगाडे व इतर अवजड रणसाहित्य हजारों सैनिकांसह फ्रेंच रणभूमीवर उतरविण्यांत येईल आणि तें पॅरिसची वाट चालूं लागेल. तत्पूर्वी शेरबुर्ग द्वीपकल्पांत शक्य असेल तेथें विमानांचे तळ बांधण्यांत येतील. एकदां हे तळ तयार झाले म्हणजे जर्मनीवर विमानहल्ले करण्याला इंग्लंडांतून न निघतां शेरबुर्ग द्वीपकल्पांतून निघतां येईल. जर्मनीच्या पूर्व-सरहद्दीवर रशियानेंहि विमानतळ बांधून त्यांचा उपयोग करण्याची दोस्तांना मुभा दिली असल्यामुळें वैमानिक हल्ल्याची मोठीच सोय झाली आहे. शेरबुर्गहून निघावें आणि जर्मन प्रदेशावर यथेच्छ घिरट्या घालून बॉम्ब टाकणें संपतांच रशियन विमानतळावर उतरावें आणि तेथून पेट्रोलची व बॉम्बची नवी भरती करून घेऊन जर्मनीवर आग ओकीत ओकीत परत शेरबुर्गला येऊन उतरावें. या सोयीमुळें एका फेरींत पूर्वीच्या दुप्पट विध्वंसनाचें कार्य होऊं शकेल.

### मॅजिनो तटबंदीपर्यंत माघार

शेरबुर्ग बंदरांत उतरणारे भावी रणगाडे पॅरीसच्या रोखानें चालू लागले म्हणजे त्यांना अडविणें जर्मनांना जड जाईल. कारण इटालींत होता तसा डोंगराळ मुलूख येथें वाटेंत नाहीं. या कारणामुळें जर्मनांना पॅरिस सोडून फ्रेंच मुलुखाला रामराम ठोकावा लागेल. अशा रीतीनें जर्मनांना मॅजिनो तटबंदीपर्यंत माघार घ्यावी लागेल. अर्थातच पॅरिस शहर दोस्तांच्या हातीं पडतांच जर्मनी आपण होऊन बेल्जम-हॉलंडमधलें सैन्य मागें घेईल.

दोस्तांच्या चढाईला तोंड देण्यांत आपल्या सैन्याची व्यर्थ हानि करून घेण्यापेक्षां आपण होऊनच आपलें रणक्षेत्र संकुचित करण्यांत जर्मनीचा दुसराहि एक फायदा होऊं शकेल. रशियनांची नवी मुसंडी सुरू झाली आहे व तिला थोपविण्याला जर्मनीला सैनिक आणि रणसामुग्री दोहोंचीहि उणीव भासत आहे, यास्तव जर्मनी पश्चिमेकडील आपली आघाडी आंखडून घेऊन मॅजिनो लाइनवर बचावाची लढाई देत राहील आणि त्या बाजूचें जादा सैन्य रशियन आघाडीवर आणून रशियाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करील. कारण जर्मनीला जसा रणसाहित्याचा तुटवडा भासत आहे तसाच सैनिकांचाहि तुटवडा भासूं लागला आहे. जर्मनी जेथें एक नवा सैनिक उभा करूं शकतो तेथें दोस्त ६ सैनिक उभे करूं शकतात.

एवंच, शेरबुर्ग हातचें गेल्यानें जर्मनीला आपले युद्धाचे सगळेच जुने बेत बदलून नव्या परिस्थितीला तोंड द्यावें लागेल. अशा परिस्थितींत बचावाचें धोरण तरी किती काळ टिकवितां येईल हा प्रश्नच आहे. युरोपच्या रणभूमीवर पश्चिमे-

करून दोस्तांना पाऊल ठेवूं देणार नाहीं, ही जर्मनीची वल्गना तर फोल ठरली आहेच, पण शेरबुर्ग गमाविल्याचे परिणाम जर्मनीवर इतके दूरगामी होणार आहेत कीं, जर्मनीला यापुढें चढाईचें धोरण स्वीकारणें अशक्य होईल.

### राष्ट्रसंघाच्या संरक्षण-योजनेचा तळ

चालू महायुद्धाच्या हालचालीपुरतेंच वरील वाक्य मर्यादित नाहीं. भावी युद्धांतहि जर्मनीच्या फ्रान्सवरील चढाईला पायबंद बसणार आहे. पहिल्या व चालू अशा दोन्ही महायुद्धांत जर्मनीनें पहिल्या धडाक्यासरशीं फ्रान्सला लोळविलें आणि दोस्तांना फ्रेंचांना वेळेवर मदत पाठविणें दुस्तर झालें. यापुढें शेरबुर्गचा किल्ला हा दुसरा जिब्रॉल्टरचा किल्ला होईल. जिब्रॉल्टरमुळें भूमध्य समुद्र जसा ब्रिटिशांना निर्वेधपणें वापरतां येतो व शत्रूचा तेथें प्रवेश होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें शेरबुर्गरूपी भावी जिब्रॉल्टरच्या आधारावर ब्रिटिश मुत्सद्दी फ्रेंचांना कायमचें संरक्षणाचें आश्वासन देऊं शकतील. फ्रेंच लोक शेरबुर्गसारखें बंदर आपल्या हातून कायमचें जाऊं देतील व ब्रिटिश तें बळकावतील असा त्याचा अर्थ नव्हे. परंतु हें महायुद्ध समाप्त झाल्यानंतर पुनश्च जर्मनीनें डोकें वर काढूं नये यासाठीं राष्ट्रसंघामार्फत संरक्षणाच्या ज्या अनेक योजना आंखण्यांत येतील त्यांत रखवालीच्या कामासाठीं राष्ट्रसंघाचें कांहीं आरमार, कांहीं लष्कर आणि कांहीं विमानदल येथें कायमचें ठेवून द्यावें असें ठरेल. तसें ठरल्यास राष्ट्रसंघाच्या या सैनिकांना तळ देण्याला शेरबुर्गसारखें दुसरें सोयिस्कर स्थान मिळणार नाहीं. यास्तव स्वित्झर्लंडनें राष्ट्रसंघाच्या कचेरीची जशी सोय केली आहे तशी फ्रान्सलाहि राष्ट्रसंघाच्या या रखवालदारांची कांहीं सोय करावी लागेल आणि त्या सोयींच्या दृष्टीनें शेरबुर्गची इतकी मजबुती केली जाईल कीं, जिब्रॉल्टरला देखील त्याचा हेवा वाटूं लागण्याचा संभव आहे.

---

## पराजयाला हिंवाळा आड १५

[ नोव्हेंबर महिन्याच्या मध्याला आणि युरोपांतील हिंवाळ्याच्या सुरुवातीला हा लेख लिहिला असून त्यांत महायुद्धांतील सर्व आघाड्यांवरील परिस्थितीचा आढावा घेण्यांत आला आहे. या आढाव्यावरून असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं, गट्टीराष्ट्रांचा चारी बाजूंनीं कोंडमारा झाला असून त्यांची कुचंबणा दिवसेंदिवस वाढतच आहे. दोस्त राष्ट्रांतील मुत्सद्द्यांना आतां जयाची

( केसरी, दि. १४ नोव्हेंबर १९४४ )

निश्चिति वाटूं लागल्यामुळें त्यांच्या मागच्या विवंचनेचा ससेमिरा सुटला आहे. त्यांतल्या त्यांत रूझव्हेल्ट व स्टॅलिन यांच्या भाषणांतून विजयोन्मादाच्या लाटा आतांच उसळूं लागल्या आहेत. तरी पण हिंवाळा संपेपर्यंत विशेष महत्त्वाच्या घडामोडी घडणार नाहींत आणि गट्टी राष्ट्रें कितीहि हतबल झालीं असलीं तरी अखेरचा संपूर्ण विजय दोस्त राष्ट्रांना वाटतो तितका सुलभतेनें मिळणार नाहीं.]

दुर्धर रोगानें पछाडलेला मनुष्य रोगाचें समूळ उच्चाटन करण्याची आशा खालावत चालली म्हणजे ज्याप्रमाणें मृत्यूची वेळ कशी लांबणीवर पडेल याच्या योजनेंत गढलेला असतो, त्याप्रमाणें जर्मनीहि आपल्या पराजयाची घटका लांबणीवर कशी ढकलतां येईल या विचारांत गढलेला असून, हिंवाळ्याचें आगमन हें एक युद्ध मंदावण्याचें व पराभवाची वेळ दुरावण्याचें साधन त्याच्या उपयोगी पडत आहे. हिंवाळ्याचा विशेष प्रभाव नॉर्वे, बाल्टिक प्रदेश, पूर्व-प्रशिया, कार्पेथियन पर्वत व झेकोस्लोव्हाकिया या भागांत दिसणार असून, पश्चिम आघाडीपैकीं दक्षिण-विभाग आणि उत्तर-इटाली या प्रदेशांतहि थंडीच्या कडाक्यांत रणधुमाळी चालविणें दुर्घट होईल. याचा परिणाम असा होईल कीं, आतांपर्यंत जर्मनीला आपल्या शत्रूचा प्रतिकार करण्याला जो जिवापाड आटापिटा करावा लागत होता ते परिश्रम कांहीं काळ वांचतील आणि जर्मन सैन्याची विस्कट-लेली घडी पुनश्च बसविण्याला थोडीशी उसंत मिळेल.

### व्हिएन्ना पडेल काय ?

रणक्षेत्रावरची सद्यःस्थिति अशी आहे कीं, दोस्त राष्ट्रें जर्मनीला बहुतेक बाजूनें गराडा घालून अगदीं त्याच्या उंबरठ्याला येऊन भिडलीं आहेत. उत्तरेकडची बाजूच जर्मनीला थोडीशी मोकळी आहे. दक्षिणेलाहि आल्प्स पर्वत जर्मनीला दरवाजाच्या अडसरासारखा उपयोगी पडणारा असल्यानें तिकडून शत्रु घरांत घुसण्याची धास्ती जर्मनीला तितकीशी वाटत नाहीं. परंतु पूर्व आणि पश्चिम या दोन्ही आघाड्या अगदीं धोक्याच्या झाल्या आहेत. पूर्व-प्रशियाचा बहु-तेक भाग सपाट असल्यानें तेथें प्रतिकाराच्या नैसर्गिक साधनांचा अभावच आहे. याकरितांच रशियाचा मुख्य रोख पूर्व-प्रशियांतून बर्लीनवर चालून जाण्याचा आहे. त्या भागांतल्या जर्मन सैन्याचा कडवा प्रतिकार लक्षांत न घेतला तरी त्या भागांतील कडक हिंवाळा, दलदली व जंगलें यांच्या योगानेंहि त्या चढाईस पुष्क-ळच प्रतिबंध होईल. झेकोस्लोव्हाकियांतून जर्मनीवर चढाई करणें तितकेंसें सुलभ नाहीं. याकरितां रशियानें हंगेरींत लढाईला तोंड पाडून बुडापेस्टवर मारगिरी चालविली आहे. प्रत्यक्ष हंगेरी हा देश डोंगराळ नसला तरी, हंगेरीच्या भोंवतीं डोंगराळ मुलखाचें कडें आहे, त्यामुळें रशियाला हंगेरींतील चढाईच्या सैन्याचा

पाठपुरावा करणें जिवावर येईल. हंगेरीवरील स्वारींत रुमानियाच्या साहाय्याची रशियाला अत्यंत आवश्यकता भासणार हें उघड आहे, आणि रशियाच्या अपेक्षेप्रमाणें त्याला रुमानियाकडून मदत पोंचत नसावी. म्हणूनच रशियानें रुमानिया आपल्या तहाच्या अटी पाळीत नाहीं अशी कुरकुर चालविली आहे. त्यांतूनहि रशियानें पराक्रमाची शर्थ करून बुडापेस्ट हस्तगत केलें तरी तेथून व्हिएन्नावर चाल करून जाणें सोपें नाहीं. बुडापेस्ट आणि व्हिएन्ना यांच्या दरम्यान दऱ्याखोरीं, घनदाट अरण्य आणि नद्या यांचें जाळें असून जर्मनीला व्हिएन्नाचें संरक्षण करण्याला नैसर्गिक अनुकूलता पुष्कळच आहे. तेव्हां बुडापेस्ट गेलें कीं, त्याच्या पाठोपाठ व्हिएन्नाहि लगेंच जाईल असें मानण्यांत अर्थ नाहीं.

### दोस्तांचा खरा डाव

इटालींतील दोस्त सैन्याची प्रगति ही केवळ स्थानिक महत्त्वाची बाब आहे. तिचा जर्मनीच्या मर्मावर घाव घालण्याचा प्रत्यक्ष उपयोग होऊं शकणार नाहीं, यास्तव तो विचार तूर्त सोडून देऊं. त्यानंतरचें महत्त्वाचें रणक्षेत्र म्हणजे नान्सी ते बेलफोर्ट ही सरहद्द होय. या बाजूनें दोस्त सैन्याची चढाई होत असल्याच्या वार्ता, ही नवीन आघाडी उघडली गेली तेव्हां, बऱ्याच पसरल्या होत्या. परंतु हा भूभाग आधुनिक रणगाड्यांच्या हालचालीला इतका प्रतिकूल आहे कीं, त्या बाजूनें प्रथम जर्मनींत घुसणें शक्य दिसत नाहीं. नान्सीच्या उत्तरेकडचा मेट्झपर्यंतचा जो प्रदेश आहे त्या रणक्षेत्रांत सध्यां जोराची हालचाल सुरू आहे. दोस्तांचें सैन्य मेट्झपासून अवघ्या पांच मैलांवर आलें असल्याचें ताजें वृत्त आहे. तरी पण या बाजूची चढाई ही जर्मनीचा मोठा सेनाविभाग गुंतवून ठेवण्याच्या इराद्यानेंच असली पाहिजे. बोलोन, लग्झेंबर्ग, मेट्झ, नान्सी, बेलफोर्ट या बाजूनें चढाईची हुलकावणी दाखवून जर्मनीचा मोठा सेनाविभाग इकडे आकर्षून घ्यावयाचा आणि नायमेजेन, आर्न्हेमन या बाजूनें खरी चढाई करावयाची, असाच दोस्त सेनापतींचा खरा डाव असला पाहिजे.

अशा प्रकारें पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंनीं एकदम चढाई सुरू झाल्यास जर्मनीचा प्रतिकार ढासळेल अशी दोस्त राष्ट्रांची कांहीं महिन्यापूर्वी समजूत होती. पण जसजसा जर्मनीचा प्रतिकार ढिला पडण्याऐवजीं तो अधिकाधिक निकराचा होत चालला, तसतसी हिवाळ्याच्या आंत पश्चिम आघाडीवरील लढाई आटोपण्याची आशा मावळत चालली आणि आतां तर प्रत्यक्ष हिंवाळा ठेपलाच. अर्थातच हिंवाळ्याच्या पूर्वीचे चढाईचे बेत हिंवाळ्यांत उपयोगी पडणार नसल्यानें दोस्त सेनानींना आपल्या चढाईच्या योजनांची फेरतपासणी करावी लागेल.

### जर्मनीच्या तुफान पलटणी

अशी फेरतपासणी करीत असतां दोस्त राष्ट्रांच्या युद्धश्रेष्ठींना आढळून आलें

नगर वाचनालय, सातारा.



नगर वाचनालय सातारा २०६ २।५।८८

आहे कीं, जर्मनीजवळ अद्यापि २५० डिव्हिजन्स इतकें सैन्य जय्यत तयार आहे. त्यांतील ११८ डिव्हिजन्स पूर्व-आघाडीवर आहेत. ७०-८० डिव्हिजन्स पश्चिम-आघाडीवर आहेत आणि बाकीच्या इटाली, बाल्कन्स, नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड इत्यादि भागांत आहेत. हें सगळेंच सैन्य करोल व कसलेलें आहे असें नाहीं; तथापि त्यांतल्या ज्या निवडक तुफान पलटणी आहेत त्यांचा उपयोग केव्हां कोठें करावयाचा हें जाणण्यांत जर्मन रणपंडित पूर्ण वाकबगार आहेत. त्यामुळें पूर्व-प्रशियाकडील रशियाचा लोंढा अनावर झाल्यास या तुफान पलटणी त्या दिशेला रवाना होतात व शत्रूला तडाखा देऊन शत्रुसैन्याची अमूप हानि करून त्याची प्रगति थोपवून धरतात व परत येतात. इकडे आखेन, आर्न्हीम इत्यादि भागांत तसाच बिकट प्रसंग आला तर त्या तुफानी पलटणींची रवानगी त्या दिशेनें केली जाते आणि दोस्तांच्या चढाईला पायबंद बसतोच. या तुफानी पलटणी एकाच ठिकाणीं सतत लढत व प्रतिकार करीत ठेवल्या जात नाहींत, त्यामुळें त्यांची हानि विशेष होत नाहीं आणि या कजाग पलटणींनीं शत्रूची हड्डी नरम केल्यावर पुढची कामगिरी इतर मामुली पलटणींवर सोंपविली जात असल्यामुळें या करोल पलटणींना विश्रांतीहि भरपूर मिळते.

जर्मनीनें ठिकठिकाणचे पेंचप्रसंग सोडविण्याकरितां आपल्या सैन्याचा उपयोग कसा कौशल्यानें चालविला आहे याचें वर दिलेलें वर्णन आमच्या पदरचें नसून दोस्त गोटांतील ती अधिकृत मल्लिनाथी असल्यानें ती खरी मानून चालण्यास हरकत नाहीं. या मल्लिनाथीवरून असा निष्कर्ष निघतो कीं, जर्मनीच्या निवडक तुफानी पलटणींशीं टक्कर देण्यास दोस्तांचे सामान्य सैनिक समर्थ नाहींत. तथापि एकाचवेळीं अनेक बाजूंना पेंचप्रसंग निर्माण झाल्यास जर्मनी तरी आपल्या तुफानी सैन्याला किती धांवाधांव करावयास लावूं शकेल? पण दोस्तांच्या सर्व आघाड्यांवरील निकराच्या चढाईचीं वेळापत्रकें एकमेकाशीं जमत नसल्यानेंच जर्मनीला असा डाव खेळतां येणें शक्य होत असावें, असाहि निष्कर्ष त्यांतून निघतो.

तें कसेंहि असो. तूर्त तरी जर्मनी जरी सर्व बाजूंनीं वेढला गेला असला तरी उंबरठ्याच्या आंत घुसून त्याच्या घरांतच काटाकाटी सुरू करण्याची वेळ अद्यापि आली नाहीं व हिंवाळा संपेपर्यंत ती येईलसें दिसत नाहीं. तसें झाल्यास हिंवाळ्यांत जर्मनी आपल्या रणसामुग्रीच्या निर्मितीची वाढ करूं शकेल कीं काय, हाच काय तो मुख्य प्रश्न आहे. वैमानिक हल्ल्यांमुळें जर्मनींतले युद्ध-सहाय्यक कारखाने मोडकळीस आल्याचीं वर्णनें आपण वारंवार वाचतों. तरी पण अद्यापि त्याचा दुष्परिणाम जर्मनीला रणांगणावर फारसा जाणवूं लागल्याचीं चिन्हें दिसत नाहींत. विमानांची संख्या जर्मनीला अपुरी पडते आणि पाणबुड्यांचीहि निर्मिति खुंटली, एवढा परिणाम निश्चित दिसतो. मात्र जे कारखाने पृथ्वीच्या पोटांत गुप्तपणें चालवितां

येतात त्यांचीं कामें बंद पडलीं नाहींत असें दिसतें, आणि हिंवाळ्यांतलें धुक्याचें वातावरण तर वैमानिक हल्ल्यांना अनकूल नसल्यामुळें हिंवाळ्यांत हे हल्ले वाढण्याऐवजीं कमीच होतील आणि जर्मनीला आपली शस्त्रनिर्मिति वाढवितां येईल.

### स्फोटक बाणांचा मारा वाढणार

या शस्त्रनिर्मितींत जर्मनीचा मुख्य भर सध्यां तरी "रॉकेट बॉम्ब्स्" (स्फोटक-बाण) यांच्यावर दिसतो. हे स्फोटक बाण इतक्या जलद उडतात कीं, त्यांचा आवाज ऐकूं येण्यापूर्वीच त्यांचा प्रत्यक्ष प्रहार होऊन जातो ! यामुळें स्फोटक बाण सुटल्याचा इषारा देऊन जनतेला सावध करतां येत नाहीं. या स्फोटक बाणांचा मारा इंग्लंडवर तर चालू आहेच, पण यापुढें तो बेल्जम आणि फ्रान्समधील दोस्तांच्या छावण्यांवरहि चालू होईल. इंग्लंडवर जसा हा स्फोटक बाणांचा प्रहार चालू आहे तसा तो रशियावर कां चालू नाहीं अशी शंका कित्येकांकडून विचारली जाते. पण रशियाचा मुलुख इतका अफाट आहे कीं, त्याच्या कारखान्यांचें, लोकवस्तीचें आणि छावण्यांचेंहि केन्द्रीकरण इंग्लंडांतल्याप्रमाणें झालेलें नाहीं, यास्तव रशियावर फेकलेले स्फोटक बाण कोठें तरी ओसाड माळावर पडून फुकट जावयाचे आणि अशी उधळपट्टी करण्याइतकी जर्मनीची परिस्थिति नाहीं, यास्तव इंग्लंडच्या आणि फ्रान्स-बेल्जमच्या दाट वस्तीवरच सध्यां त्यांचा मारा चालू आहे. रशिया जर बुडापेस्टवरून व्हिएन्नावर चालून येऊं लागेल तर त्यालाहि त्या वेळीं या बाणांचा प्रसाद मिळाल्याखेरीज राहणार नाहीं.

### राजकीय परिस्थितींत वसंत ऋतु

असो. प्रत्यक्ष युद्धपरिस्थितीचा हा विचार झाला. त्याबरोबरच राजकीय परिस्थितीचाहि विचार होणें जरूर आहे. राजकीय बाबतींत मात्र दोस्त राष्ट्रें हिंवाळ्यांतील गारठ्यांनीं कुडकुडत नसून वसंत ऋतूनें हर्षोत्फुल्ल झालेलीं दिसतात. प्रे. रूझवेल्ट यांनीं निवडणूक जिंकल्यामुळें अमेरिकेचा युद्धविषयक निश्चय व्यक्त झाला आणि गट्टी राष्ट्रांचा निःपात करण्याचें आपलें धोरण नेटानें पुढें चालविण्यास रूझवेल्टचे हात मोकळे झाले. मार्शल स्टॅलिन हा तर पूर्वीपासूनच निरंकुश सर्वाधिकारी आहे. त्यांतून फिन्लंड, रुमानिया, बल्गेरिया इतक्या राष्ट्रांना वांकवून त्यांच्याकडून आपल्या मनाजोगते तह करून घेतल्यामुळें रशियन सैनिकांची त्याच्यावरची निष्ठा द्विगुणित झाली आहे. ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल यांना मात्र तसा कांहीं नवा पराक्रम दाखवून आपली लोकप्रियता वाढविण्याची संधि मिळाली नाहीं; तरी पण चर्चिलला इंग्लंडांत दुसरा कोणी प्रतिस्पर्धी नसल्यामुळें तो आपलें स्थान संभाळून आहे व पार्लमेंटची निवडणूक एक वर्ष पुढें ढकलून, मजूर पक्षाशीं होणारी घासाघीस तूर्त त्यानें थांबविली आहे. बिचारा चांग-कै-शेक याची स्थिति मात्र अगदींच केविलवाणी झाली आहे. अमेरिकन राष्ट्राचा

त्याच्यावरचा विश्वास उडाला आहे. त्याला पुरविलेली युद्धसामुग्री जपानविरुद्ध उपयोगांत आणण्याऐवजीं आपल्या देशांतील प्रतिस्पर्ध्यांशीं लढण्यांत तिचा विनियोग केला जातो, असा त्याजवर इतर दोस्तांचा आरोप आहे. त्यामुळें त्याला अमेरिकेकडून यापुढें पूर्वींसारखें साहाय्य मिळेल असें दिसत नाहीं.

## दोस्तांच्या प्रमुखांची विचारसरणी

दोस्त-राष्ट्रचतुष्टयांच्या प्रमुखांची मनःस्थिति वर वर्णिल्याप्रमाणें वेगवेगळ्या प्रकारची असल्यानें तिचें वेगवेगळें प्रतिबिंबहि त्यांच्या भाषणांत उमटून येतें. योगायोग असा आला कीं, एकाच आठवड्यांत कांहीं विशिष्ट प्रसंगामुळें प्रत्येकाला भाषण करण्याची संधि मिळाली. रूझवेल्ट यांनीं निवडणूक जिंकल्यामुळें आपल्या विजयाबद्दल राष्ट्राचे आभार मानतांना स्वातंत्र्यविरोधी गट्टी-राष्ट्रांचा आपण पुरेपूर समाचार कसा घेऊं, याचें त्यांनीं दिग्दर्शन केलें. मात्र त्या स्वातंत्र्याचा पददलित राष्ट्रांना कितपत लाभ होईल, हें पाहावयाचें आहे. स्टॅलिननें रशियन क्रांतीच्या स्मृतिदिनानिमित्त भाषण केलें आणि त्यांत बर्लिनवर लाल निशाण फडकविण्याची मनीषा व्यक्त केली. परंतु रशियाचा वाढतां विजय शेजारच्या राष्ट्रांना स्वातंत्र्यदायक होईल कां नाहीं, याची शंकाच वाटते. पोलंडबद्दलची त्याची अढी कायम आहे. रुमानियाविरुद्ध त्याची तक्रार चालूच आहे. फ्रान्समधलें नवें सरकार रशियनांना नीट वागवीत नाहीं, असा त्याचा दावा आहे. बिचाऱ्या इराणला तेलाच्या खाणींसंबंधांत धाकदपटशा चालू आहे आणि चीनमधील सरकार तेथील कम्यूनिस्टांशीं सहकार्य करीत नाहीं, म्हणून चिनांत ढवळाढवळ करण्याचा त्याचा विचार दिसतो. त्याची पूर्वसूचना म्हणून जपानविरुद्ध प्रचार रशियन पत्रांतून चालू आहे. जपानच्या विरुद्ध बनत चाललेलें रशियांतलें वातावरण आणि बर्लिनवर होणारी रशियाची भावी स्वारी या दुहेरी संकटाची जाणीव झाल्यानेंच जपाननें बर्लिनमधली आपली वकिलात गुंडाळून ती स्वीडनमध्यें नेऊन ठेवली असावी.

## इकडे रूझवेल्ट, तिकडे स्टॅलिन

चर्चिलला आपल्या भाषणांत बढाई मारण्यासारखा कोणताच विषय आणतां आला नाहीं. तरी पण दि. ९ नोव्हेंबरला लंडनच्या मेयॉरच्या मेजवानीच्या दिवशीं प्रधानानें भाषण करण्याचा संप्रदायच असल्यानें त्याला बोलावें लागलें. त्यांत त्यानें एवढीच प्रौढी मिरविली कीं, रूझवेल्टचा नव्या निवडणुकींत जय झाल्यानें आतां रूझवेल्ट व स्टॅलिन यांची एकत्र गांठ घेण्याची संधि लवकरच लाभेल. एवंच रणक्षेत्रावर ज्याप्रमाणें रशिया व अमेरिका यांच्या धोरणानेंच इंग्लंडला पाऊल टाकावें लागतें, त्याप्रमाणें राजकारणांतहि स्टॅलिन व रूझवेल्ट यांच्या तंत्रानेंच चर्चिलला राबावें लागणार. पण त्यांतहि एक अडचण अशी

येणार आहे कीं, यापुढें रूझवेल्ट व स्टॅलिन यांच्यांतच मतभेद झाला, तर चर्चिल कोणाचा पाठपुरावा करणार ? रूझवेल्टचा पाठपुरावा करावा, तर साम्राज्यांतील सर्व घटकांना स्वातंत्र्य द्यावें लागणार आणि स्टॅलिनचा पाठपुरावा करावा तर युरोपांतील बोल्शेव्हिझमची लाट इंग्लंडवर येऊन आदळणार ! या दोहोंतून वाट काढण्यासाठीं ग्रीस, स्पेन, फ्रान्स व इटाली या चार राष्ट्रांशीं त्याचीं कारस्थानें चालू आहेत. जर्मनी व जपान हीं जीं उलट पक्षाचीं राष्ट्रें, त्यांच्या प्रमुखांच्या तोंडाला सध्यां खीळच बसली आहे. म्यूनिचच्या चढाईचा वार्षिक दिन आज-पर्यंत कधीं हिटलरच्या भाषणाशिवाय सुना गेला नव्हता; पण यंदा त्या दिवशीं तर त्याचें भाषण झालें नाहींच; पण दि. १२ ला नाझी सैनिकांनीं निष्ठेची शपथ घेतली, त्या वेळींहि हिटलरचें प्रत्यक्ष भाषण न होतां तें वाचून दाखविण्यांत आलें. फिलिपाईन बेटावरची अमेरिकनांची चढाई आणि फिलिपाइन्सनजीक झालेली जपानी नाविक दलाची मोठी हानि, यामुळें जपानी पंतप्रधानांनाहि आपल्या जन-तेच्या चिंतेचें निराकरण कसें करावें याची पंचाईत पडली आहे.

### विजय सुलभ नाहीं !

सारांश, युद्धकारणांत व राजकारणांतहि गट्टी राष्ट्रांवर मोठाच पेंच येऊन पडला आहे; आणि दोस्त राष्ट्रांच्या नेत्यांचे बाहु व ओंठ फुरफुरत आहेत. तथापि या वरवरच्या देखाव्यांच्या आंत खोल शिरून पाहिल्यास दोस्त राष्ट्रांनाहि आपला विजय सुलभ आहे असें वाटेनासें झालें आहे; आणि जर्मनीला तर चालू हिंवाळा हा आपला पराभव टाळण्याला ढालीसारखा उपयोगी पडेल असें वाटत आहे. या ढालीचा उपयोग जर्मनी किती कौशल्यानें करून घेईल, त्यावर भावी लढ्यांतील जयापजयाचे हेलकावे अवलंबून राहतील.

---

## काळ्या समुद्रांतलें काळकूट १६

[ जर्मनीविरुद्ध उघडलेली तिसरी आघाडी बरीच यशस्वी होऊन जर्मनी-च्या नाड्या आंवळत आल्यावर दोस्त राष्ट्रांचे तिघे श्रेष्ठी, शत्रु-राष्ट्रांची अखेरची विल्हेवाट लावण्याची योजना आंखण्यासाठीं याल्टा येथें जमले. याल्टा हें बंदर काळ्या समुद्रांतील क्रायमिया द्वीपकल्पांतलें एक हवाशीर ठाणें आहे. त्या ठिकाणीं रूझ्व्हेल्ट, चर्चिल व स्टॅलिन हें त्रिकूट एकत्र येऊन त्यांनीं दि. ५ ते

( केसरी, दि. १६ फेब्रुवारी १९४५ )

नगर वाचनालय, सातारा.



१२ फेब्रुवारीपर्यंत सात दिवस विचारविनिमय करून जे निर्णय घेतले ते जर्मनी व जपान या शत्रु-राष्ट्रांना **'काळकूट'** विषासारखे मारक होणार हें दर्श-विण्याकरितां **'काळकूट'** हा शब्द योजिला आहे. शिवाय या निर्णयांची बजावणी केव्हां, कशी व्हावयाची आणि त्या बजावणींत कोणत्या नव्या भानगडी उपस्थित होतील हें एक काळाच्या पोटांतलें कूट म्हणजे कोडेंच असल्यानें त्या अर्थानेंहि या निर्णयाला **'काळकूट'** असा शब्द लागू होतो. अशा दुहेरी अर्थानें **'काळकूट'** हा शब्द योजून, श्रेष्ठीत्रयांच्या या वाटाघाटीचा महायुद्धावर यापुढें काय परिणाम होईल याचा विचार या लेखांत केला आहे. ]

### काळकूट शब्दाचा दुहेरी अर्थ

कै. हरीभाऊ आपटे यांनीं 'कालकूट' नांवाची आपली सुप्रसिद्ध कादंबरी लिहिली त्या वेळीं त्या कादंबरीच्या प्रास्ताविक भागांत 'काळकूट' या शब्दाचें निरुक्त करतांना त्यांनीं तें दोन प्रकारांनीं केलें होतें. देव-दैत्यांच्या समुद्रमंथनांतून निघालेलें व जगाचा संहार करूं पाहणारें 'काळकूट' विष असा त्या शब्दाचा रूढ अर्थ तर उघडच आहे; पण त्या कादंबरींत वर्णिलेला जो अद्‌भुत प्रसंग तो कसा घडला आणि त्याचा पुढें परिणाम काय होणार, हें एक 'काळाच्या पोटांत दडलेलें कूट' म्हणजे 'कोडें'च आहे असा त्या 'काळकूट' शब्दाचा जो दुसरा अर्थ त्यांनीं दिला तो विशेष मार्मिक होय. प्रस्तुत प्रसंगालाहि हे दोन्ही अर्थ यथार्थतेनें लागू पडत असल्यामुळें आम्हीं वरील मथळ्यांतला 'काळकूट' हा शब्द असाच दुहेरी अर्थानें वापरला आहे. काळ्या समुद्राच्या कांठीं एकत्र जमलेल्या त्रिराष्ट्र-प्रमुखांच्या विचारमंथनांतून जें 'कालकूट' निर्माण झालें तें जर्मनी व जपान या देशांतील नाझी पक्षांचा संहार करूं पाहणारें जहर विष आहे, यांत तर शंकाच नाहीं; पण यां विचारमंथनाचा जो निष्कर्ष निघाला त्याचा भावी घडा-मोडींवर आणि जागतिक शांततेवर कसा काय परिणाम घडणार हें एक काळाच्या पोटांत दडलेलें कोडेंच आहे, त्यांतहि शंका नाहीं. अर्थातच त्रिराष्ट्र प्रमुखांच्या निर्णयाचा वरील दोन्ही अर्थांनीं विचार करणें क्रमप्राप्त आहे.

### माल्टा ते याल्टा

मार्शल स्टॅलिन हा आपलें रणक्षेत्र सोडून दूरवर जाऊं इच्छित नसल्यामुळें रूझवेल्ट आणि चर्चिल हे आपआपल्या राजधान्या सोडून प्रथम याल्टा बेटांत पर-स्परांस भेटले. तेथें प्रथम उभयतांचा खल होऊन त्यांत आपले कोणते मुद्दे स्टॅलि-नला मान्य करावयाला लावावयाचे आणि स्टॅलिनच्या कोणत्या मुद्द्यांपुढें आपण किती मान वांकवावयाची याची रंगीत तालीम होऊन नंतर हे दोघे राष्ट्रप्रमुख

तिसऱ्या बड्या दादाच्या भेटीला निघाले. क्रायमिया द्वीपकल्पांत सेबॅस्टोपोलच्या पूर्वेस ३० मैलांवर याल्टा नांवाचें एक हवाशीर ठिकाण आहे. तेथें रशियाचा माजी झार दुसरा निकोलस याचा उन्हाळ्यांत येऊन राहावयाचा राजवाडा आहे. त्याच राजवाड्यांत या तिघां आधुनिक झारांची सोमवार दि. ५ ते सोमवार दि. १२ अखेर आठ दिवस बैठक होऊन, सोमवारीं अमावास्येच्या रात्रीं त्रिवर्गाच्या सह्यांचें पत्रक तयार होऊन तो निर्णय जगजाहीर करण्यांत आला.

## सटवाईनें काय लिहिलें आहे ?

नव्वद वर्षांपूर्वी ज्या क्रायमिया द्वीपकल्पांत ब्रिटिश व रशियन सेनापति शत्रुत्वानें प्राणपणानें लढत होते त्याच क्रायमियांत या वेळीं त्याच राष्ट्रांचे सेनापति जर्मनीविरुद्ध चढाई करण्याच्या योजना अत्यंत मित्रत्वानें आंखीत बसलेले पाहून कोणास चमत्कार वाटणार नाहीं ? असो. माजी झारच्या राजवाड्यांत बसून ठरविलेल्या या निर्णयावर झारशाहीची छटा उमटली असल्यास त्यांत नवल नाहीं. मागील युद्धाच्या वेळीं प्रे. विल्सनसारखा एक तरी सत्त्वशील पुढारी विजयी राष्ट्रांच्या प्रमुखांत असल्यामुळें वरकरणीं तरी 'ना मुलुख ना खंडणी' अशा घोषणा केल्या गेल्या. याल्टा येथील सांप्रतच्या निर्णयांत तसला कांहीं आडपडदा न ठेवतां जर्मनीला पूर्णपणें चिरडून त्याचा लोळागोळा करण्याचें ठरलें आहे. जी जर्मनीची गत करण्याचें योजिलें गेलें आहे, तसलीच योजना जपानसंबंधानेंहि ठरविली गेली असावी; पण ती योजना प्रकट करण्याची वेळ अद्यापि आली नसल्यानें जपानासंबंधीं एक अवाक्षरहि या जाहीर घोषणेंत नाहीं. तथापि जर्मनीचा निकाल लावल्यानंतर जपानची पाळी येईल त्या वेळीं त्याच्या कपाळींहि जर्मनीसारखींच बंधनें लिहिलीं जातील हें सांगावयास नकोच. मूल जन्माला आल्यानंतर पांचव्या दिवशीं सटवाई त्याच्या कपाळावर त्याचें भविष्य गुप्तपणें लिहून ठेवते. त्याप्रमाणें या त्रिराष्ट्र प्रमुखांनीं जपानचेंहि भविष्य या बैठकींत गुप्तपणें चर्चिलें असेल; पण तें प्रकट करण्याची संधि अद्यापि दूर असल्यानें त्याची परिस्फुटता करण्यांत आली नाहीं. तरी पण अमेरिकेच्या परराष्ट्र संबंधींच्या समितीचा अध्यक्ष सीनेटर कोनाली हा एवढें बोलून गेलाच कीं, यापुढें जपानच्या युद्धांत भागीदार होण्याचें वचन स्टॅलिननें रूझव्हेल्टला दिलेंच असेल ! पण आपण हा गौप्यस्फोट करीत आहों असें वाटून लगेच जीभ चावून त्यानें त्यावर अशी मल्लिनाथी केली कीं, मला अशी माहिती कळली आहे असा याचा अर्थ घेऊं नका, हा केवळ माझा तर्क आहे. तर्क असो अथवा प्रत्यक्ष कळलेलें वृत्त असो, युरोपच्या विल्हेवाटींत स्टॅलिनला प्रामुख्य देऊन आणि त्याच्या संतोषाकरितां पोलंडच्या पूर्व-भागाचें त्यास बलिदान करून, स्टॅलिनकडून जपानच्या युद्धांत सहकार्य करण्याचें वचन चर्चिल व रूझव्हेल्ट यांनीं मिळविलें असणें संभवनीय आहे.

### झारशाहीवर ताण करणारे ठराव

या गुप्त बैठकींत जर्मनीवर चौफेर हल्ला कसा चढवावयाचा याची योजना निश्चित झाली आणि तींत एकसूत्रीपणा येण्याकरितां त्रिराष्ट्रांच्या लष्करी तज्ज्ञांनीं वारंवार विचारविनिमय करावा असें ठरलें, हें स्वाभाविकच आहे; कारण महा-युद्धाचा त्वरित निकाल लावणें हा मुख्य उद्देश आहे. परंतु जर्मनीला बिनशर्त शरणागति स्वीकारावयाला लावणें, युद्धसमाप्तीनंतर त्याला निःशस्त्र करणें, रण-साहित्यांचा लवलेश जर्मनींत राहूं न देणें, रणसामुग्रीचे कारखाने नामशेष करणें, नुकसानभरपाईचें ओझें जर्मनीवर लादणें, युद्धगुन्हेगारांना शासन करणें, नाझी-पक्ष नामशेष करणें, केवळ नाझी अनुयायांनाच नव्हे तर युयुत्सु वृत्तीच्या जर्मनांना कोठेंहि ठाव मिळूं न देणें, जर्मनीची लष्करी योजनासमिति निर्मूळ करणें आणि या सर्व योजनांची बजावणी करण्यासाठीं जर्मनीचे तीन, किंवा फ्रान्स सामील झाल्यास चार, विभाग करून त्यांवर मित्रराष्ट्रांचे नियंत्रक नेमणें आणि त्या नियं-त्रक श्रेष्ठींनीं बर्लिनमध्यें बसून सर्व बंधनांची बजावणी करणें, अशा स्वरूपाचे जे ठराव झाले आहेत ते आजपर्यंत गाजलेल्या कोठल्याहि झारशाहीवर ताण करणारे आहेत यांत शंका नाहीं. इतक्या कडक बंधनांनीं जर्मन राष्ट्राला करकचून आव-ळावयाचें ठरलें असून, जाहीर घोषणेंत पुनश्च अशी प्रौढी मिरविली आहे कीं, जर्मन जनतेचा आम्हांस उच्छेद करावयाचा नसून फक्त जर्मनींतला नाझी-पक्ष व सोटेशाही यांचींच तेवढीं पाळेंमुळें खणून काढावयाचीं आहेत. एखाद्या माणसाला, तो शिव्या देतो म्हणून जीभ छाटून, लाथा देतो म्हणून पाय तोडून, गुद्दे मारतो म्हणून हात कलम करून लुळापांगळा केल्यावर तुला ठार करावा अशी कांहीं आमची इच्छा नाहीं, फक्त तुझे उपद्रवी अवयव तेवढेच छाटले आहेत, असें सांगण्यानें जेवढें समाधान वाटेल तेवढेंच समाधान जर्मन जनतेला त्रिराष्ट्र-प्रमुखांच्या मुखांतून निघालेली ही घोषणा ऐकून वाटेल. जर्मनीची वर दर्शविल्या-प्रकारें खच्ची केल्यावर बाकी जागेवर जें राहील तें जर्मन राष्ट्र म्हणून तरी ओळखतां येईल कां नाहीं याची वानवाच आहे. ज्या देशांतले शेंकडा ९५ टक्के लोक नाझी-पक्षाचे आहेत त्या देशांतला नाझी-पक्ष तेवढा नष्ट करावयाचा म्हटल्यास बाकी शिल्लक काय राहणार असा प्रश्न विचारावयासच नको.

### याची बजावणी कशी करणार ?

खरा प्रश्न आहे तो हा कीं, त्रिराष्ट्र-प्रमुखांनीं हे सगळे डोंगर रचले खरे, पण ते सगळे कितपत आणि किती दिवस टिकतील ? जर्मनी बिनशर्त शरण आला पाहिजे असा आग्रह धरल्यामुळें युद्ध लांबत जात नाहीं काय, असा एक सूचक प्रश्न कांहीं दिवसांपूर्वीं कॉमन्स सभेंत विचारला गेला होता. त्याला त्या वेळीं जरी नकारार्थी उत्तर देण्यांत आलें, तरी आतां जर्मनीवर लादले जाणारे

हे निबंध जाहीर झाल्यावर त्यामुळें युद्ध लांबणार नाहीं काय, असा प्रश्न पुनश्च विचारावासा वाटतो. कारण कोणतेंहि स्वाभिमानी राष्ट्र या अटी स्वखुषीनें आपल्या-वर लादून घेण्याला तयार होणार नाहीं आणि बळजबरीनें त्या त्याजवर लादा-वयाच्या म्हटल्यास दोस्त राष्ट्रांना त्यासाठीं आणखी किती दिवस लढावें लागेल याचा नेम नाहीं. त्रिकुटाची ही काळकूटवजा घोषणा ऐकून 'जर्मन राष्ट्र नष्ट करा-वयाचा हा कट आहे', 'मानवतेला कलंक लावणारा हा घोर गुन्हा आहे', 'असले आसुरी बेत आम्ही हाणून पाडूं' असले प्रतिध्वनि जर्मनींतून उमटूं लागले आहेत. हतबल व हताश झालेल्या शत्रूच्या बडबडींत फारसें तथ्य नसतें हें खरें असलें तरी जर्मनी आपला सगळा स्वाभिमान कोळून पिण्याइतका हतबल झाला आहे कीं काय याविषयीं शंका घेण्याला जागा आहे.

## पोलंडचें भवितव्य काय ?

जर्मनी बोलूनचालून नंबर एकचें शत्रु-राष्ट्र; तेव्हां त्याच्या मानापमानाचा विचार दोस्त कशाला करीत बसतील ? पण पोलंड तर मित्र-राष्ट्र. एवढेंच नव्हे तर पोलंडचा टीचभर लचका जर्मनी तोडीत होता म्हणून तर इंग्लंडनें तलवार उप-सली. आणि आतां नुसता 'टीचभर'च नव्हे तर 'हातभर' प्रदेश रशिया बळका-वीत असतां इंग्लंड त्यास संमति कशी देणार ? परंतु दुर्बळांच्या शंकाकुशंकांना या जगांत भीक कोण घालणार ? रशियाच्या मदतीखेरीज जर्मनीचा पराजय कर-ण्याची धमक इंग्लंडच्या अंगांत असती तर इंग्लंडनें असला अवघड प्रसंग आपल्या-वर ओढवून घेतला नसता. तशी धमक नव्हती म्हणून तर रशियाच्या हाता-पाया पडून त्याला आपल्या बाजूला ओढला. त्याला रणसाहित्य देऊं केलें. इतर सर्व प्रकारें मदत केली आणि तोच रशिया आतां इतका शेर होऊन बसला कीं, चर्चिल व रूझवेल्ट या उभयतांचीहि स्टॅलिनला दुखविण्याची छाती होत नाहीं. यास्तव या त्रिकूटाच्या पत्रकांत पोलंडच्या बाबतींत असा निर्णय ठरविण्यांत आला आहे कीं, व्हर्सायच्या तहाच्या आधीं लॉर्ड कर्झन यांनीं पोलंड व रशिया यांच्यांत जी सीमा ठरविली होती तीच पूर्वेकडील सीमा पोलंडनें मान्य करावी. यामुळें पोलंडचें जें नुकसान होईल तें भरून काढण्यासाठीं पोलंडला उत्तरेला आणि पश्चिमेला जर्मनीच्या ताब्यांतला नवा प्रांत देण्यांत येईल. याचा अर्थ असा कीं, पोलिश लोकांच्या पूर्वापार वस्तीचा बराचसा मुलुख रशियाच्या राज्यांत सामील होणार आणि जर्मन लोकवस्तीचा भांडखोर प्रांत पोलंडांत सामील केला जाणार !

त्याचबरोबर इंग्लंडला व अमेरिकेला इंग्लंडमध्यें येऊन राहिलेलें पोलिश सरकार अमान्य करून रशियाच्या पंखाखालच्या लुब्लिन कमिटीला पोलिश सर-कार म्हणून मान द्यावा लागणार ! यांत इंग्लंड-अमेरिका यांचा सपशेल अपमान आहेच; पण त्याचें शल्य थोडेसें बोथट करण्यासाठीं असें ठरविण्यांत आलें कीं, लुब्लिन

कमिटी ही अगदींच छोटी कमिटी असल्यानें तिच्यांत पोलंडमध्यें अगर परदेशांत राहात असलेले, पण नाझीविरोधी असे आणखी कांहीं पोलीश देशभक्त समाविष्ट करून घ्यावे आणि अशी जी संयुक्त समिति बनेल, तिला तात्पुरतें पोलंडचें सरकार म्हणून सर्वांनीं मान्यता द्यावी. आणि त्या समितीनें नव्या निवडणुकी करून जें मंत्रिमंडळ निवडून येईल त्याच्या हातीं सर्व कारभार सोंपवावा. अशा रीतीनें रशियानें निर्माण केलेली ल्युब्लिन कमिटी हीच बहुतांशीं सर्वाधिकारी बनणार असून इंग्लंडांतलें पोलिश सरकार देशोधडीला लागणार! इंग्लंड व अमेरिका यांनी रशियाच्या मुर्वतीस्तव व स्वतःच्या गरजेस्तव आज हा निर्णय मान्य केला असला तरी पोलंडमधील जनतेला तो कितपत मान्य होईल आणि भावी कालांत पोलंड-मध्यें शांतता कितपत टिकूं शकेल हा एक वादग्रस्तच प्रश्न राहील.

### इतर राष्ट्रांची विल्हेवाट

युगोस्लाव्हियाच्या बाबतींतहि असेंच 'त्वयार्धं मयार्धं'चें धोरण स्वीकारण्यांत आलें. मार्शल टिटो आणि इंग्लंडांत राहिलेला डॉ. सुवासिक या उभयतांनीं समेट करून संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन करावें, त्या मंत्रिमंडळानें हंगामी पार्लमेंट बोलवावें व त्यांत जुन्या विधिमंडळांतलें, लोकशाही मताचे सभासद समाविष्ट करून घ्यावे. अर्थातच एकट्या मार्शल टिटोच्या हातांत सत्ता न देतां जुन्या विधिमंडळाशीं सहकार्य करण्याला तूर्त तरी त्याला भाग पाडण्यांत येत आहे. याखेरीज इतर बाल्कन राष्ट्रांचा विचार त्रिकूटानें केला, एवढेंच मोघम शब्दांत जाहीर झालें आहे. त्यावरून असें अनुमान निघतें कीं, रशियानें रुमानिया, बल्गेरिया वगैरेंच्या बाबतींत आणि इंग्लंडनें ग्रीसच्या बाबतींत जें कांहीं ठरविलें असेल त्यांत इतरांनीं कांहीं ढवळाढवळ करूं नये. यावरून ग्रीसच्या बाबतींत तेवढा इंग्लंडला मुभा मिळाली, इतर सर्व राष्ट्रांच्या कारभारांत रशियानें स्वतः मनसोक्त व्यवस्था करून घेतली असें समजावयास कांहीं हरकत नाहीं.

### परस्परांत विचारविनिमय.

चालू युद्धाचीं सूत्रें एकधोरणानें चालविण्याकरितां त्रिराष्ट्रांच्या लष्करी तज्ज्ञांचें एक युद्धमंडळ असावें व त्या युद्धमंडळाच्या सूचनेनुसार युद्धाचें तंत्र चालवावें. याशिवाय इतर राजकारणाचे जे प्रश्न वेळोवेळीं उपस्थित होतील त्यांचा निकाल लावण्याकरितां तीनहि राष्ट्रांच्या परराष्ट्रीय मंत्र्यांची वारंवार बैठक होत जावी. अशा प्रकारची पहिली बैठक एप्रिलअखेर अगर मेच्या प्रारंभीं लंडन शहरीं भरेल आणि त्यानंतर ज्या ज्या ठिकाणीं गरज भासेल तेथें तेथें हे परराष्ट्रमंत्री खलबत करण्यासाठीं जमतील.

### नव्या राष्ट्रसंघाची योजना

हा सगळा युद्धकालांतील तात्पुरत्या अडचणींचा विचार झाला. युद्धसमाप्ती-

नंतर जी नवी घडी बसविली जाईल ती टिकावी व सुरळीत चालावी याकरितां कांहीं तरी मध्यवर्ति योजना हवी. अशी योजना करणें म्हणजेच नवा राष्ट्रसंघ स्थापणें होय. जुन्या राष्ट्रसंघाच्या घटनेंतील दोष वगळून नवे दुरुस्त नियम करण्यांत येतील व त्या नियमांनुसार नवा राष्ट्रसंघ निर्माण करण्यांत येईल. या राष्ट्रसंघाची योजना सुकर करण्याकरितां दि. २५ एप्रिलला अमेरिकेंत सान्फ्रान्सिस्को येथें संयुक्तराष्ट्र परिषद भरेल. त्या परिषदेच्या निमंत्रकांत त्रिराष्ट्रांबरोबरच चीन व फ्रान्स यांचा समावेश करण्यांत येणार आहे. म्हणजे नियंत्रक राष्ट्रें पांच झालीं. निमंत्रित राष्ट्रें किती असतील याचा आंकडा अद्यापि बाहेर पडला नाहीं. पण शत्रुराष्ट्रांखेरीज इतर सर्वच राष्ट्रांना त्यांत भाग घेण्यास निमंत्रण दिलें जाईल असें वाटतें. मात्र या नव्या राष्ट्रसंघांत मतदान-पद्धति कशी ठेवावयाची आणि पूर्वीच्या राष्ट्रसंघाप्रमाणें बिनविरोध मान्य होतील तेवढेच ठराव संमत मानावयाचे कां विशिष्ट बहुमतानें मान्य केलेले ठराव सर्वांवर बंधनकारक म्हणून लादावयाचे, याचा विचार सान्फ्रान्सिस्को येथें ठरविण्यांत येईल. अशा रीतीनें जो राष्ट्रसंघ स्थापण्यांत येईल, त्याच्याकडे राष्ट्राराष्ट्रांतील राजकीय व आर्थिक वाद निवाड्या-करितां सोंपविले जातील आणि त्या वादांचा निकाल लागून जगांत शांतता टिकेल, कोणी कोणावर आक्रमण करून शांतताभंग न करील, हें पाहण्याची जबाबदारी त्या राष्ट्रसंघाकडे राहील.

## अटलांटिक सनदेचा पुनरुच्चार

राष्ट्रसंघापुढें येणाऱ्या वादविषयक प्रश्नांचा निर्णय लावण्याचें धोरण म्हणून अटलांटिक सनदेचा पुनुरुच्चार करण्यांत आला. कांहीं महिन्यांपूर्वी स्वतः प्रे. रूझवेल्ट यांनींच असें म्हटलें होतें कीं, 'अटलांटिक सनद' असा शब्दप्रयोग आपण योजतों खरें; तथापि तसला कांहीं करारमदार लिहिला गेला नव्हता, व त्याजवर कोणाच्या सह्याहि घेतल्या गेल्या नव्हत्या! आतां राष्ट्रसंघानें जगांत सर्वत्र शांतता व सुव्यवस्था राखावयाची असा विचार पुढें येतांच लोकशाही राज्यपद्धति, स्वयं-निर्णयाचा हक्क, चतुर्विध स्वातंत्र्य इत्यादि सगळे आधुनिक राजकीय धोरणाचें लटांबर त्याच्याबरोबर आलेंच. त्यामुळें राष्ट्रसंघाला अधिष्ठान म्हणून अटलांटिक सनदेची स्मृति ताजीतवानी करावी लागली. ज्या सनदेस मूर्त स्वरूप कधींच प्राप्त झालें नव्हतें, त्या अमूर्त स्वरूपांतल्या सनदेवर आधिष्ठित झालेला राष्ट्रसंघ तरी कितपत मूर्त स्वरूप धारण करतो पाहावें. यांतल्या अटलांटिक सनद व राष्ट्रसंघ एवढ्या दोनच बाबी अमूर्त स्वरूपाच्या अतएव अनिश्चित आहेत असें नाहीं. या सगळ्या मनोराज्यांच्या डोलाऱ्याची उभारणी जर्मनी व जपान यांना बिनशर्त शरण येण्याला भाग पाडण्यावर आहे; ती गोष्ट प्रथम शक्य झाल्यावर नंतरचे सगळे पुढचे बेत अमलांत यावयाचे. जर्मनी व जपान हीं राष्ट्रें थकून टेकीस

आलीं असल्याचीं चिन्हें दिसतात खरीं, परंतु त्यांच्यापुढें काळ्या समुद्रांतल्या काळकूटाचें भयानक दृश्य दिसूं लागल्यावर त्यांना निराशेचा चेव आल्यास व त्यांत पोलंडच्या लोकांच्या असंतोषाची भर पडल्यास युद्धाचें शेपूट किती लांबेल कोणीं सांगावें !

हें कोडें काळच उकलून दाखवील

मरणच पत्करावयाचें तर, शक्य तोंवर प्रतिकार करूनच, कां तें न पत्करावें, असा विचार गट्टी राष्ट्रांच्या मनांत येऊन गनिमी काव्याच्या प्रतिकारास प्रारंभ होईल. एवढासा ग्रीस देश, पण तोहि आवरतां आवरतां चर्चिलच्या नाकीं नव आले. तेव्हां जर्मनी व जपान यांसारख्या राष्ट्रांना बिनशर्त शरण आणूं हें म्हणणें अक्षरशः खरें करून दाखविणें असंभवनीय दिसतें. कदाचित् वरकरणीं अशी भाषा असली तरी 'नाझी-पक्षाचा तेवढाच नाश आम्हीं करूं, जर्मन जनतेशीं कांहीं आमचें शत्रुत्व नाहीं', असा जो खुलासा केला गेला आहे, त्याच्यांत कांहीं कूस राखली गेली असल्यास 'नाझी जर्मनी बिनशर्त शरण आला' अशी प्रौढी मिरवूनहि सशर्त शरणागति स्वीकारण्यांत येईल. पण त्यासंबंधांत आजच निश्चित असें अनुमान कांहीं करतां येत नाहीं. सारांश, काळ्या समुद्रांतील मंथनांतून निघालेलें हें काळकूट जबर विषारी तर आहेच, पण दुसऱ्या अर्थानेंहि या ठरावांची अक्षरशः बजावणी करणें दोस्त राष्ट्रांना कितपत शक्य होईल, हेंहि एक काळाच्या पोटांत दडून बसलेलें कोडेंच आहे. तें कोडें काळच उकलून दाखवील, तेव्हां त्याचा उलगडा होईतोंपर्यंत केले जाणारे तर्क व्यर्थच होत.

---

## महायुद्धाचें अखेरचें पर्व १७

[ महायुद्धाच्या भरतीचा जोर ओसरून ओहटीचाहि अखेरचा टप्पा गांठण्याची वेळ आलेली पाहून महाभारतांतील शेवटच्या गदापर्वाशीं चालू महायुद्धाचें साम्य या लेखांत वर्णिलें आहे. मुसोलिनीचा जो शोचनीय अंत झाला त्यांत इटालियन लोकांनीं दाखविलेल्या हलकट कृतघ्नतेचा धिक्कार केला आहे. आणि हिटलर हा अखेरसि टिपू सुलतानाप्रमाणें लढतां लढतां मरेल पण शरण जाणार नाहीं, हें पूर्वींच वर्तविलेलें भाकित कसें खरें ठरलें, तें दिग्दर्शित केलें आहे.]

महाभारतांतील युद्धांत भीष्म, द्रोण, कर्ण, शल्यादि पर्वें संपून शेवटच्या गदापर्वाला प्रारंभ झाला. त्याप्रमाणेंच चालू महायुद्धांतहि शेवटच्या पर्वाला प्रारंभ

(केसरी, दि. ४ मे १९४५)

झाला आहे. मात्र भारतीय युद्धांत गदापर्वानंतर सौप्तिक पर्व झालें तसें सौप्तिक पर्व चालू महायुद्धांतहि होणार कीं गदापर्वानेंच या महायुद्धाची परिसमाप्ति होणार एवढें अनिश्चित आहे, उपमेंत केव्हांहि अक्षरशः सादृश्य पाहावयाचें नसतें. त्याप्रमाणें येथेंहि महाभारताची तंतोतंत पुनरावृत्ति झाली की काय हें पाहावयाचें नसलें तरी भीष्म-द्रोण-कर्णादिकांचा वध झाल्यानंतर देखील शल्याकडून पांडवांचा वध होईल, अशी जशी वेडी आशा कौरवांना वाटत होती, तशीच वेडी आशा जर्मनांना अद्यापि वाटत असावी, असें अनुमान हिटलरच्या मृत्यूनंतरहि ॲडमिरल डोएनिट्झ याला सेनाधिपत्य देऊन जर्मनांनीं युद्ध चालू ठेवलें आहे यावरून निघतें.

## मरणान्तानि वैराणि

महाभारतीय युद्धांत व चालू महायुद्धांत आजपर्यंत अनेक प्रसंगीं दर्शविल्याप्रमाणें पुष्कळच साम्य असलें तरी कांहीं उद्वेगजनक ठळक विरोध आढळतात व त्यांचाच आज ऊहापोह करणें क्रमप्राप्त आहे. जर्मन राष्ट्राचा नेता हिटलर यानें महायुद्धाच्या ज्वाळा पेटविल्या आणि इटालियन राष्ट्राचा नेता जो मुसोलिनी त्यानें त्या आगींत तेल ओतल्यामुळें त्या ज्वाळा अधिक भडकल्या. यामुळें हिटलर व मुसोलिनी या उभयतांवर प्रतिपक्षीय राष्ट्रांचा राग असणें अगदीं स्वाभाविक आहे; पण तो राग दर्शविण्याच्या प्रकारांतहि कांहीं माणुसकी राखावी लागते. भारतीय युद्धांत ती बहुतांशीं राखली गेली होती. अभिमन्यु मृत्युशय्येवर पडल्यावर जयद्रथानें त्याला लत्ताप्रहार केला असा प्रवाद आहे. एवढा अपवाद सोडल्यास शत्रुसंबंधानें कोठेंहि माणुसकीला न शोभेल, असा अनादर दर्शविल्याचें उदाहरण नाहीं. आणि जयद्रथाच्या या अधमपणाचें केवढें घोर प्रायश्चित्त त्यास तत्काळ मिळालें हेंहि सर्वश्रुतच आहे. जिवंतपणीं समोरासमोर एकमेकांचे उघड अपराध बोलून दाखविण्यानें कांहीं माणसकीला बाध येत नाहीं; पण मृत्यूनंतर तर सर्व अपकृत्यांवर पडदा पडला पाहिजे असें आर्य संस्कृति सांगते. याच कारणानें 'मरणान्तानि वैराणि' ही म्हण रूढ झाली आहे. या रूढीला अनुसरूनच वालिवधानंतर सुग्रीवाला आणि रावणवधानंतर बिभीषणाला श्रीरामचंद्रानें आपल्या मृतबांधवांचा योग्य सन्मानपूर्वक अंत्यविधि करावयास आज्ञा केली. रामायणकालापासून ही नीति आतांपर्यंत आपल्याकडे पाळली जात आहे.

## मरणपूर्वकाणि वैराणि

पाश्चात्य राष्ट्रांत, निदान अलीकडे तर, ही नीति सुटत चालली असून 'मरणान्तानि वैराणि' याच्याऐवजीं कित्येक ठिकाणीं तर 'मरणपूर्वकाणि वैराणि' अशासारखा उलटा प्रकार सुरू झालेला दिसतो! कारण शत्रूच्या मृत्यूनंतर त्याची भीति पूर्णपणें दूर झाल्यानें प्रतिपक्षाचा सूड उगविण्याच्या बुद्धीला चेव येतो.

आणि त्या सूडबुद्धीनें घडणारे अनेक किळसवाणे प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात. महायुद्धाला सुरुवात होण्यापूर्वी हिटलरसंबंधीं आणि मुसोलिनीसंबंधीं कोणी कांहीं लिहिलें नव्हतें असें नाहीं, पण त्यांची युद्धपूर्वकालीन शब्दचित्रें आणि युद्धकालीन शब्दचित्रें हीं जोडून पाहिलीं, तर हीं दोन्ही शब्दचित्रें एकाच व्यक्तीचीं असतील असें कोणी सहसा म्हणूं शकणार नाहीं. परंतु आमचा कटाक्ष प्रतिपक्षीयांच्या शाब्दिक दुर्वर्णनावर तितकासा नसून इटालियन लोकांच्या हातूनच मुसोलिनीचा शेवट ज्या रीतीनें केला गेला व त्याच्या मृत देहाची जी अवहेलना केली गेली त्यावर मुख्यतः आहे.

### गोल्डस्मिथचें मत

इटालियन लोकांइतके चंचल व उथळ बुद्धीचे लोक जगांत नसतील. गोल्डस्मिथनें पावणेदोनशें वर्षांपूर्वी त्यांचें जें वर्णन केलें आहे तें आजच्या इटालियनांनाहि लागूं पडतें. गोल्डस्मिथ लिहितो, – "Though grave yet triffling, zealous yet untrue; And even in penance planning sins a new" "हे इटालियन लोक गंभीर पण क्षुद्र बुद्धीचे, कळकळीचे पण बेइमानी आणि पापाचें प्रायश्चित्त घेतां घेतांनाच पुनः तें पाप करण्याचा संकल्प करणारे असे आहेत." हा त्यांचा चवचालपणा जसा मागील युद्धांत तसाच या चालू युद्धांतहि दृग्गोचर झाला. त्यासंबंधाचा सविस्तर ऊहापोह करण्याची आज आवश्यकता नाहीं. तथापि मुसोलिनीशीं त्यांचें जें वर्तन झालें तेवढ्यापुरतांच आज विचार करावयाचा आहे.

### मुसोलिनीची कामगिरी

१९१० सालापासून मुसोलिनीनें इटालीच्या उत्कर्षासाठीं देह झिजविला. क्लासवॉर, अव्हान्टी आणि पोपोलो डी इटालिया या वृत्तपत्रद्वारें आणि युटोपिया या मासिकांतून त्यानें इटालींत जागृति आणि संघटना केली. गेल्या महायुद्धांत इटालीनें सामील व्हावें याविषयींचा प्रयत्न मुसोलिनीनेंच केला. दोन वर्षें युद्ध रेंगाळतांच हल्लींच्याप्रमाणेंच इटालियन सैन्यांत चलबिचल सुरू झाली व ते तह करून मोकळे होण्यास उतावीळ झाले. त्या वेळीं मुसोलिनीनेंच त्यांना आबरून धरलें. युद्धसमाप्तीनंतर सोशालिस्टांच्या आत्मघातकी चळवळीमुळें जेव्हां इटालींतील राज्यकारभाराला व उद्योगधंद्यांना खीळ बसण्याची वेळ आली, त्या वेळीं मुसोलिनीनें फॅसिस्ट संघटना करून इटालीचा बचाव केला. तत्त्वदृष्ट्या फॅसिझम, सोशालिझम, बोल्शेव्हिझम यांची तुलना करण्याचा यांत हेतु नाहीं; पण इटालियनांची त्यानें जी संघटना केली ती त्यांना पटली म्हणूनच त्यांचा बचाव झाला. प्रारंभीं जे ४५ अनुयायी होते त्याचे लक्षावधि अनुयायी होण्याच्या वेळीं मुसोलिनीच्या हातीं सर्वाधिकार आलेला नव्हता. अर्थातच ही संघटना अधिकाराच्या जोरावर

प्रस्थापित झाली नसून आधीं देशाला संघटना पटून अनुयायी वाढले आणि मगच मुसोलिनीच्या हातीं सर्वाधिकार आला. सर्वाधिकार हातीं आल्यावर त्यानें ॲबिसीनियावर स्वारी करून सत्तेचा दुरुपयोग केला हें खरें. पण आजपर्यंत कोणत्या सत्ताधाऱ्यांनीं परकीयांवर आक्रमण करावयाचें सोडलें आहे ? सर्वच सत्ताधारी जर एकाच माळेचे मणी आहेत, तर एका सत्ताधाऱ्यानें दुसऱ्या सत्ताधाऱ्याला नांवें ठेवण्यांत हंशील काय ? तेंहि एक वेळ असो. इतर राष्ट्रें मुसोलिनीला कांहींहि म्हणोत, त्यांच्या मतांची चिकित्सा आज आम्हांस कर्तव्य नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच कीं, ज्या इटालियन जनतेच्या हितासाठीं मुसोलिनी गेलीं ३५ वर्षें अहर्निश झटला, त्या इटालियनांनीं तरी त्याच्या संबंधांत असला कृतघ्नपणा करावयाचा नव्हता.

दोन वर्षांपूर्वीच इटालियनांच्या चवचालपणाला भरती आली आणि त्यांनीं मुसोलिनीविरुद्ध कट करून त्याला पकडून ठेवलें. त्या वेळीं हिटलरच्या हातीं वासवी शक्ति होती म्हणून त्यानें मुसोलिनीची अद्भुत रीतीनें सुटका करविली व त्यामुळें त्या वेळचें संकट टळलें. पण आतां स्वतः हिटलरवरच घोर प्रसंग येऊन ठेपल्यामुळें ज्यानें त्यानें आपला रस्ता सुधारावा असें म्हणण्याची वेळ आली. अशा परिस्थितींत उत्तर-इटालींत कम्यूनिस्टांचा वाढतां जोर पाहून त्याला आळा घालण्याकरितां फॅसिस्टांचा जो प्रयत्न चालला होता त्याला दुजोरा देण्यासाठीं मुसोलिनी परत इटालींत आला असतां, कम्यूनिस्टांनीं त्याच्यावर अचानक छापा घालून त्याला पकडलें आणि त्याच्या चौकशीचा नुसता देखावा देखील न करतां त्याला गोळ्या घालून ठार केलें.

शेक्सपिअरनें 'ज्यूलिअस सीझर' या नाटकांत सीझरबद्दल अँटोनीच्या तोंडून जें वदविलें आहे तें मुसोलिनीच्या या अवस्थेशीं तंतोतंत जुळतें. अँटोनी म्हणतो, 'कालपर्यंत ज्याचा शब्द खालीं पडूं देण्याची जगांत कोणाची प्राज्ञा नव्हती, तो स्वतःच आज असा धूळ खात पडला आहे.' 'माणसानें आयुष्यभर जें काय जगाचें भलें केलें असेल, तें त्याच्या मरणाबरोबर विसरलें जातें आणि त्याची वाईट कृति तेवढी लोक वारंवार उगाळीत बसतात!' 'तलवारीनें त्याच्या छातीचें जितकें विदारण होऊं शकलें नाहीं, तितकें देशभक्तीच्या नांवाखालीं देशद्रोह करणाऱ्यांच्या कृतघ्नतेनें त्याच्या छातीचें विदारण केलें.' जणुं काय शेक्सपिअरनें मिलानच्या रस्त्यावर पडलेल्या मुसोलिनीच्या प्रेताकडे पाहूनच हें लिहिलें असें वाचकांस वाटत नाहीं काय ?

### मिलानच्या नागरिकांची कृतघ्नता

मुसोलिनीला ठार केल्यानंतर त्याच्या देहाची जी अवहेलना करण्यांत आली, ती अत्यंत किळसवाणी व गर्हणीय आहे. ज्या मिलान शहरावर त्याचें अत्यंत प्रेम होतें,

ज्या मिलान शहरवासीयांनीं पूर्वीं त्याला मानपत्र देऊन त्याचा गौरव केला होता, ज्या मिलान शहराला तो इटालीचें बुद्धिकेंद्र समजे, ज्या मिलान शहरांतूनच त्यानें रोमवर चाल करून आपल्या हातीं अधिकारसूत्रें घेतलीं, त्याच मिलान शहरांत त्याचें प्रेत उलटें टांगलें जावें, रस्त्यांत भिरकावून दिलें जावें, त्याच्या प्रेतावर बायका-मुलांनीं थुंकावें, लोकांनीं तें तुडवावें इत्यादि प्रकार अत्यंत गलिच्छ व माणुसकीला न शोभणारे होत, याविषयीं कोणाचा मतभेद असण्याचें कारण नाहीं. तो शत्रुपक्षीय असून, जुलमी असेल, त्याचीं मतें कोणास पटणारीं नसतील, त्याच्या साम्राज्यतृष्णेच्यापायीं राष्ट्रावर युद्धाची आपत्ति ओढवली असेल, अथवा आणखी शेंकडों अपराध त्याच्या हातून झाले असतील. पण म्हणून इटालियनांनीं त्याच्या देहाचे जे धिंडवडे काढले ते कमी गर्हणीय ठरतात असें नाहीं. ज्यूलिअस सीझरच्या मृत्यूबद्दल सूड घेणारा जसा अँटोनी भेटला तसा कोणी अँटोनी भेटेपर्यंतच त्यांच्या या गमजा चालावयांच्या !

### हीं काय भेकडपणाचीं लक्षणें

शारीरिक अवहेलना करणाऱ्या लोकासंबंधीं वर जें विवेचन केलें तेंच त्याची शाब्दिक अवहेलना करणाऱ्यांसहि लागू आहे. तो जिवंत असतां त्याच्याविरुद्ध एक शब्दहि बोलण्याची ज्यांची छाती नव्हती ते आतां त्यास भेकड, नतद्रष्ट, खुनशी इत्यादि वाटेल त्या अपशब्दांची लाखोली वाहात आहेत. ज्यानें लहानपणींच प्रतिपक्षाला दगडानें चेचण्यास कमी केलें नाहीं, शाळेंतील वादविवादांत राजा जुलमी झाला, तर तो देहान्त शिक्षेस पात्र ठरतो, असें छातीठोकपणानें ज्यानें सांगितलें, फोर्ली गांवच्या मेयरला भर सभेंत खिडकींतून फेकून देण्याची ज्यानें धमकी दिली, तुम्ही शिक्षा दिलींत तरी मी पुनः हें कृत्य करणार, असें ज्यानें न्यायाधिशास बजाविलें, जो खांद्यावर बंदूक टाकून गेल्या महायुद्धांत लष्करांत दाखल झाला, तोफा डागण्याचें काम स्वतः करीत असतां तोफ फुटून बेचाळीस जखमा झाल्या असतांना, क्लोरोफॉर्म न घेतां ज्यानें आपल्या अंगांतले तोफेचे तुकडे काढविले, विमान विद्या आत्मसात् करण्याची ज्यानें मोठेंपणींहि हांव धरली आणि कोणाच्याहि धाकदपटशानें ज्यानें आपल्या मताला कधींहि मुरड घातली नाहीं, तो मुसोलिनी भेकड होता, असें आतां त्याच्या पश्चात् जगास भासविणें हा मात्र भेकडपणा खरा.

### तीन महिन्यांपूर्वींचें भाकीत खरें ठरलें

असो. मुसोलिनीचा अशा रीतीनें शोचनीय अंत झाला, पण हिटलरची वाट काय झाली, याचें उत्तर मात्र तर्काच्या जोरावरच द्यावें लागतें. हिटलर बर्लिनमध्यें असतांना गोळ्याचा धक्का लागून मरण पावला, का आत्महत्या करून त्यानें देह टाकला, अगर त्याचा कोणी अज्ञात इसमानें खून केला, अथवा तो बर्लिनहून गुप्तपणें निघून गेला असून त्याचा शोध केला जाऊं नये म्हणून त्याच्या मृत्यूची कंडी उठ-

विली गेली आहे, याचें चक्षुर्वै सत्यं असें उत्तर मिळणें सद्यःस्थितींत अशक्य आहे. पण अनुमानानेंच ठरवावयाचें झाल्यास, बर्लिन शहरांत असतांनाच युद्धाच्या डोंबाळ्यांत त्याची आहुति पडली असावी, हेंच सर्वांत अधिक संभवनीय आहे. इटालियनांप्रमाणें जर्मन लोक चंचल व विश्वासघातकी नसल्यानें मुसोलिनीप्रमाणें हिटलरचा जर्मनांच्या हातून घात झाला नसावा. मृत्यूला कवटाळण्याचा निश्चय झाला असतां त्याच वेळीं युद्धाचा वणवा जर बर्लिन शहरांत पसरलेला आहे, तर आत्महत्येचें निराळें साधन शोधण्याचें त्यास कारणच नव्हतें. बर्लिन सोडून इतरत्र जाऊन गनिमी काव्याचें युद्ध चालविण्यासारखी परिस्थितीहि राहिलेली नाहीं; यास्तव मृत्यूची खोटी अफवा पसरविण्यांत हंशील नाहीं; आणि शत्रूच्या हातीं सांपडून अवहेलना करून घ्यावयाची नाहीं हा तर हिटलरचा कृतनिश्चय; तेव्हां हिटलर बर्लिनमध्येंच राहून मरण पावला असावा हाच तर्क सुप्रतिष्ठित ठरतो. दि. ६ फेब्रुवारीच्या अंकांतच टिपूप्रमाणें हिटलर लढाईंत मरणार आणि त्याच्या राज्याच्या वांटण्या होणार असें भाकित केलें होतें, तेंच आज खरें ठरत आहे.

## बिनशर्त शरणागतीच्या अटी !

'बर्लिन पडल्यावर पुढें काय' असा जो प्रश्न मागील अंकीं विचारला होता त्याचें निश्चित उत्तर देण्याची परिस्थिति अद्यापि आलेली नाहीं. तथापि मागल्या आठवड्यांत पडद्याआड असलेल्या बऱ्याच गोष्टी या आठवड्यांत पडद्याबाहेर आल्यानें या संबंधांतले तर्क आतां अधिक साधार ठरण्याचा संभव आहे. स्वीडनचे काऊंट बर्नेडोट यांच्यामार्फत तहाचें कांहीं तरी सूत्र लागलें असावें याविषयीं तर शंकाच नाही. पण त्यांत अँग्लो-अमेरिकन आणि रशियन यांचें एकमत होत नाहीं म्हणून हें घोंगडें भिजत पडलें आहे. बर्लिन सर केल्याखेरीज युद्ध समाप्त करणें रशियाला कमीपणाचें वाटत असल्यामुळें बर्लिन जिंकल्याची घोषणा होईपर्यंत रशिया मुग्ध राहणार हें स्वाभाविकच होतें. आतां बर्लिन हस्तगत झाल्याची घोषणा होऊन गेली आणि हिटलर कांहीं हातीं लागत नाहीं हेंहि निश्चित झालें. तेव्हां यापुढें दिरंगाई होण्याचें वास्तविक कांहीं कारण नाहीं. बरें, तहाची रूपरेषा ठरण्याला वेळ लागतो म्हणावें, तर 'बिनशर्त शरणागतींत' तहाचीं कलमें कांहींच नसावयाचीं, मग विचारविनिमय कसला व्हावयाचा व त्याला कालावधि तरी कशाला पाहिजे? पण या बिनशर्त शरणागतींतच कांहीं तरी गोम असली पाहिजे; कारण बिनशर्त शरणागतीच्या अटी अद्यापि ठरल्या नाहींत, अशी एक तार मध्यंतरीं गफलतीनें प्रसिद्ध झाली होती. त्यावरून वस्तुस्थिति अशी दिसते कीं, निर्गुणनिराकार देवाचेंहि वर्णन करण्याला जशी कांहीं शब्दसंकेताची जरूरी असते, त्याप्रमाणें बिनशर्त शरणागतीच्या जाहीर घोषणेलाहि कांहीं शब्दसंकेताची जरूरी आहे. ज्या शब्दसंकेतामुळें दोस्त राष्ट्रांना आपण शत्रूला

नगर वाचनालय, सातारा.



बिनशर्त शरण यावयाला लावलें असें समाधान मानून घेतां घेईल, पण त्याबरोबरच जर्मनीचें पुढें काय करावयाचें या संबंधाच्या वाटाघाटीचें बीं रुजत घातलें गेल्यामुळें, जर्मनांनाहि आपण बिनशर्त शरण गेलों तरी आपल्यावरील आपत्तीला कांहीं विशिष्ट मर्यादा पडेल, असा विश्वास वाटेल अशी भाषा ठरावयाची आहे असें दिसतें.

अग अग म्हशी, मला का नेशी ?

जयसिंगानें शिवाजीला बिनशर्त शरण ये असेंच प्रथम बजाविलें. पण मागाहून त्याचे २०च किल्ले घेऊन १२ किल्ले त्याच्याकडेच ठेविले व अवरंगजेबाची समजूत पाडली; त्याचप्रमाणें हल्लींच्या वाटाघाटींतूनहि रशियाचें समाधान होईल पण आपल्या अंगलट येणार नाहीं, अशा अटी ठरविण्यांत अँग्लो-अमेरिकन मुत्सद्दी गुंतले असावेत. जर्मनांचा तर आतां पुरता नाश झालाच आहे; तेव्हां ते आतां 'डर तो पीछे रही' असें म्हणण्याइतके निस्संग झाले आहेत. याचमुळें तर 'नंगेकू खुदाबी डरता' या म्हणीप्रमाणें अँग्लो-अमेरिकन हे जर्मनीला डरत आहेत. कारण जर्मनीनें काखा वर करून सगळा मुलूख रशियनांच्या हवालीं केला, अथवा लवकर तह न झाल्यामुळें रशियनांनीं हॅंबुर्ग, कील यांसारखीं बंदरें काबीज केलीं, तर उद्यां त्याला तीं सोडावयाला कशीं लावावयाचीं ? अर्थातच आतां जर्मनीनें लवकर शरण यावें यांतच अँग्लो-अमेरिकनांचा फायदा आहे. म्हणूनच 'अग, अग, म्हशी मला का नेशी' असें म्हणून म्हशीचें शेंपूट धरून घरांत शिरणाऱ्याप्रमाणें जर्मनीनें बिनशर्त शरणागति पत्करली असा पुकारा करून, युद्ध समाप्त झाल्याची घोषणा जितक्या त्वरित करतां येईल तितकी ती अँग्लो-अमेरिकनांना हवी आहे. अशी ही घोषणा आपल्या मनाजोगती घडवून आणण्यांत सध्या चर्चिल गुंतले आहेत. त्यांत त्यांचा डाव अधिक लवकर साधतो का रशियाचा साधतो, एवढेंच काय तें पाहावयाचें.

---

महायुद्धाच्या समुद्रमंथनांतून निघालेल्या

## रत्नांच्या वांटणीची वाट काय ? १८

[ जपानची शरणागति जाहीर होऊन दुसऱ्या महायुद्धाची समाप्ति झाली. त्यानंतर तहाच्या वाटाघाटीला प्रारंभ झाला. या महायुद्धरूपी सागरमंथनांतून काय काय बाहेर आलें व त्याची वांटणी कशी होईल याविषयीं अगाऊ चर्चा करून समुद्रमंथनाच्या पौराणिक कथेच्या दृष्टान्तानें कोणाच्या वांट्यास हालाहल,

(केसरी, दि. २४ ऑगस्ट १९४५)

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

कोणाच्या वांट्यास लक्ष्मी, कोणाच्या वांट्यास कौस्तुभ, तर कोणाच्या वांट्यास शंख येईल आणि शेवटीं अमृताच्या वांटणींतून पुनश्च कलह निर्माण होऊन तिसरें महायुद्ध कसें उद्भवेल याचें भविष्यकथन या लेखांत आहे. ]

आपल्या पुराणांतून समुद्रमंथनाची कथा अतिशय चटकदार रीतीनें वर्णिली आहे. तींत सकृद्दर्शनीं अतिशयोक्ति व असंभवनीयता हे दोष आढळत असल्यानें, त्या कथेंत खोल शिरून तिचें रहस्य जाणण्याचा प्रयत्न सहसा केला जात नाहीं. या कारणास्तव त्या कथेचें मर्म सामान्य वाचकांना अपरिचित आहे. पण जरा सूक्ष्म दृष्टीनें त्या कथेचें मर्म समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास, तिच्यांत राजकारणाचीं किती तरी गूढ तत्त्वें ग्रथित केलेलीं आढळतील. अन्योक्तिरूपानें सांगितलेल्या या पौराणिक कथेचें प्रस्तुतच्या महायुद्धाच्या घडामोडींशीं विलक्षण साम्य आहे. त्या साम्याचें नीट विशदीकरण केल्यास भूतकालांतील अनेक कोड्यांचा तर उलगडा होतोच; पण त्याबरोबरच भविष्यकालांतील अनेक परिणामांविषयीं अनुमानें बांधतां येतात.

अरयोऽपि हि संधेयाः सति कार्यार्थगौरवे

या महायुद्धांत शत्रुमित्रांची उलटापालट इतक्या वेळां आणि इतक्या झटपट झाली कीं, कित्येक वेळां भविष्यकाळाबद्दल निश्चितपणें बोलणें अवघड होऊन बसलें. अशा वेळीं समुद्रमंथनाच्या कथेंतलें वरील सूत्र लक्षांत घेतलें असतें, तर आपली दिशाभूल इतक्या वेळा झाली नसती. जशी समुद्रमंथनाच्या उद्योगाला सुरुवात देवदैत्यांच्या समेटानेंच झाली तशीच दुसऱ्या महायुद्धाच्या हालचालीला सुरुवात रुसो-जर्मन समेटानेंच झाली आणि समुद्रमंथनाचें पर्यवसान जसें देवदानवांच्या झगड्यांत झालें; तसेंच नुकत्याच संपलेल्या महायुद्धाचें पर्यवसानहि, रशिया व जर्मनी यांच्या झगड्यांतच झालें. जर्मनी व रशिया एक झाले नसते, तर हें महायुद्ध मोठ्या प्रमाणावर पेटलेंच नसतें आणि रशिया जर जर्मनीवर उलटला नसता तर जर्मनीचा आतां जसा सपशेल मोड झाला तसा मोड झालाच नसता आणि मग युरोपांतल्या छोट्या राष्ट्रांचें पुनरुज्जीवन होऊंच शकलें नसतें.

युरोपांतल्या दोन बड्या राष्ट्रांत जसा हा रंगपालट झाला, तसाच तो आशिया खंडांतल्या दोन राष्ट्रांतहि झाला. रशियानें जपानशीं तटस्थतेचा जो संधि केला त्याच्याच जोरावर जपाननें महायुद्धांत शस्त्र उपसलें आणि रशिया मित्राचा शत्रु बनतांच जपानला आपल्या हातचें शस्त्र खालीं ठेवावें लागलें. अशा रीतीनें पूर्व गोलार्धांत आणि पश्चिम गोलार्धांत दोनहि ठिकाणीं देवदानवांच्या समेटामुळें महायुद्धरूपी समुद्रमंथन सुरू झालें आणि त्यांच्यांत फूट पडल्यामुळेंच समुद्रमंथन थांबलें. ठोकळ मानानें एथवर हें साम्य जुळलें. यापुढें पौराणिक कथे-

तील समुद्रमंथनांतून जशीं अनेक रत्नें निघालीं आणि त्यांचीं वांटणी झाली तशी या महायुद्धरूपी समुद्रमंथनांतून कोणतीं रत्नें निघालीं व त्यांच्या वांटणीची वाट काय, याचा विचार होणें अगत्याचें आहे.

### कालकूटाची वाट काय झाली ?

समुद्रमंथनांतून जसें शेवटीं अमृत निघालें, तसें या महायुद्धांतूनहि 'स्वातंत्र्यचतुष्टय'रूपी अमृत निघालें आहे असें म्हणतात. त्या अमृताची वांटणी अद्यापि व्हावयाची असल्यानें त्याची चिकित्सा शेवटीं करूं; पण तत्पूर्वी जें हालाहल विष निघालें त्याची वाट काय झाली तें पाहूं.

महायुद्ध म्हटलें कीं, त्यांत वस्तुमात्रांचा व मनुष्यमात्रांचा भयंकर संहार व्हावयाचा हें ठरलेलेंच आहे. असा भयंकर संहार आणि जनतेचे तज्जन्य हाल हेंच यांतलें हालाहल विष होय. समुद्रमंथनांतलें हालाहल विष प्राशन करण्यास महादेव तयार झाले म्हणूनच देवदानवांचें समुद्रमंथन चालू राहूं शकलें. प्रस्तुतच्या महायुद्धांतली हानि सोसण्याला अमेरिकेसारखा धनाढ्य देश पुढें आला नसता तर हें महायुद्ध केव्हांच संपुष्टांत आलें असतें. महादेवाचा प्रत्यक्ष समुद्रमंथनांत कांहीं संबंध नसतांना

एतावान् हि प्रभोरर्थो यद्दीनपरिपालनम् ।

म्हणजे दीनांचें परिपालन करणें हाच मोठ्यांचा धर्म आहे, असें म्हणून केवळ देवांच्या रक्षणासाठीं महादेवानें आपणांवर विषप्राशनाचें संकट ओढवून घेतलें. तसेंच अमेरिकेनेंहि प्रारंभीं तरी केवळ इंग्लंडच्या आणि मागाहून इंग्लंडच्या दोस्तांच्या रक्षणासाठीं युद्धांतील हानि सोसण्याचा भार स्वशिरावर घेतला; एवढ्यापुरतेंच हें साम्य समजावयाचें. मागाहून जपान युद्धांत पडल्यानें अमेरिकेचा महायुद्धाशीं साक्षात् संबंध आला हा भाग वेगळा. पण मुळारंभीं तरी हालाहल विष पचविण्याला अमेरिकाच पुढें झाली. पण विषाचा धर्मच असा आहे कीं, तें आपला प्रभाव दाखविल्याशिवाय राहात नाहीं. महादेवानें हालाहल प्राशन केलें, तरी तें प्राशन करतांना त्यांतलें कांहीं विष खालीं सांडलें आणि

प्रस्कन्नं पिबतः प्राणैर्यत्किंचिज्जगृहुः स्म तत् ।
वृश्चिकाहिविषौषध्यो दन्दशूकाश्च ये ऽ परे ॥

म्हणजे तें सांडलेलें विष साप, विंचू व इतर कीटक आणि वनस्पति यांनीं ग्रहण केलें आणि तेवढ्या विषाच्या जोरावर तें प्राणिमात्रांना छळत असतात. असाच प्रकार आधुनिक महायुद्धरूपी समुद्रमंथनांतहि झाला आहे. युद्धाची हानि सोसण्याला प्रत्यक्ष अमेरिका पुढें झाली तरी मानवरूपधारी सर्पवृश्चिकादिकांनीं त्या विषाच्या प्रभावानें काळ्या बाजारांतून अनेकांना दंश करून छळाची पराकाष्ठा केली.

## ॲटॉमिक बाँबरूपी नारायणास्त्र

प्रस्तुतच्या महायुद्धाचें पौराणिक समुद्रमंथनाच्या कथेशीं असलेलें कांहीं साम्य वर वर्णिलें आहे. पण या आधुनिक समुद्रमंथनांतून दुसरें जें कालकूट विष निघालें त्यानें पूर्वीच्या हालाहल विषावर मात केली आहे. ॲटॉमिक बाँबरूपी भयंकर विषाचा जो नवा शोध या महायुद्धांतून निघाला तें विष मात्र महादेवहि पचवूं शकत नाहीं. या अस्त्राच्या सर्वसंहारकशक्तीपुढें जपानसारख्या क्षात्रवृत्तीच्या मानी राष्ट्रालाहि मान वाकवावी लागली. भारतीय महायुद्धांत असाच प्रकार घडल्याचा जुना दाखला आहे. द्रोणाचार्यांच्या वधानंतर संतापानें बेभान होऊन अश्वत्थाम्यानें नारायणास्त्र सोडलें. त्याचा प्रतिकार इतर कशानेंहि होऊं शकत नसल्यामुळें अर्जुनासह सर्व क्षत्रियांनीं हातचें शस्त्र खालीं ठेवून, नारायणास्त्राला वंदन करून आपले प्राण वांचविले. भीमदादाला असलें वर्तन मान्य होईना ! त्यानें आपल्या हातची गदा खालीं ठेवण्याचें नाकारलें, त्यामुळें त्याचा देह होरपळूं लागला. श्रीकृष्णानें तें पाहून भीमाच्या रक्षणासाठीं धांव घेतली आणि श्रीकृष्ण व अर्जुन यांनीं बळजबरीनें भीमाच्या हातून गदा काढून घेऊन, त्यांस नारायणास्त्रास वंदन करावयास भाग पाडलें. अशा रीतीनें पांडवांचा बचाव झाला; पण त्यांत क्षत्रियाला अनुचित अशी मानहानि सोसावी लागली. तथापि ज्या अस्त्राचा प्रतिकार होणें अशक्य आहे त्याच्यापुढें मान वाकविण्याशिवाय गत्यंतर नाहीं हें जाणून अर्जुनासारख्या वीरानेंहि जो मार्ग अनुसरला तोच मार्ग जपान्यांनाहि पत्करावा लागला. भारतीय युद्धांत ज्याप्रमाणें

प्रभु भुज उभारुनि म्हणे सैनिक हो शीघ्र आयुधें सोडा ।
यानावरूनि उतरा, कर या अस्त्रासि सर्वही जोडा ॥

अशा शब्दांनीं श्रीकृष्णानें पांडवचमूला शरण जाण्याची आज्ञा दिली. त्याच शब्दांत जपानच्या प्रभूनेंहि आपल्या सैनिकांस शस्त्र खालीं ठेवून, युद्ध बंद करण्याची आज्ञा दिली आहे. क्षत्रियानें प्राण गेला तरी शस्त्र खालीं ठेवूं नये हें खरें; पण त्या नियमालाहि कांहीं अपवाद आहेत. ॲटॉमिक बाँब हें आधुनिक 'नारायणास्त्र'च असल्यानें या अपवादाचा फायदा घेऊन जपानी सम्राटानें तत्त्वतः मानहानि न होतां शरणागति पत्करण्याची संधि साधली. जपानी सैन्यांतहि नारायणास्त्राला न जुमानणारे कांहीं भीम आहेतच ! त्यामुळेंच तिकडे शरणागतीची घोषणा झाली तरी इकडे कांहीं ठिकाणीं झटापट चालू आहेच. पण हे अपवाद लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. या संबंधांत इतका विस्तार करण्याचें कारण एवढेंच कीं, जपानची शरणागति जाहीर करण्यांत जी भाषा वापरली गेली व कांहीं ठिकाणीं तद्विरुद्ध वर्तन केलें गेलें त्याची संगति लावतां न आल्यानें कित्येकांनीं जपानवर रगेलपणाचा, तर कित्येकांनीं कपटाचा आरोप केला; परंतु हे दोनहि

आरोप निराधार आहेत. ॲटॉमिक बॉंबमुळेंच आम्ही शस्त्र खालीं ठेवीत आहों असें बजावून सांगण्यांत आपण व्रतभंग करीत नाहीं हें दर्शविण्याचाच उद्देश आहे. अर्जुनाचीहि युद्धांत गांडीव धनुष्य खालीं ठेवावयाचें नाहीं अशी प्रतिज्ञा होती. ती प्रतिज्ञा आतां कशी मोडतोस असा टोमणा भीमानें मारला. त्याला चोख उत्तर मिळालें तें असें —

जिष्णु म्हणे आर्या मी न करिन अन्यत्र कार्मुकन्यास ।
नारायणास्त्र गोद्विजतेजा द्यावा न मान अन्यास ॥

अगदीं हुबेहूब याच शब्दांत हिरोहिटो यांनींहि आपल्या शरणागतीचें समर्थन केलें आहे व त्यांत रगेलपणाचा संबंध नाहीं. बरें कांहीं क्षत्रियांनीं व्यक्तिशः मृत्यु पत्करला, पण शरण जाण्याचें नाकारलें, यांतहि त्यांच्या पदरीं दोष येत नाहीं. व्यक्तिशः ज्याचा तो मृत्यु पत्करण्याला मुखत्यार आहे. तथापि सामुदायिक रीत्या युद्ध चालू ठेवणें अशक्य असल्यानें युद्धबंदीची जी अधिकृत घोषणा झाली ती प्रतिपक्षानें खरी मानून चाललें पाहिजे.

### हें विष कोण पचविणार ?

महायुद्धरूपी समुद्रमंथनांतून जें दुसरें, हालाहल निघालें त्याचें तात्कालिक पर्यवसान अशा रीतीनें झालें. पण एवढ्यानें कांहीं त्या विषाचा कायमचा बंदोबस्त झाला असें म्हणतां येत नाहीं. ॲटॉमिक बॉंबच्या प्रयोगावर राष्ट्रसंघानें निर्बंध लादावे अशी सूचना पुढें येत आहे. तथापि ती बऱ्या राष्ट्रांना कितपत ग्राह्य होईल व ती कितपत व्यवहार्य होईल, याचा निर्णय ठरण्याला पुष्कळच कालावधि लागेल.

असो; सागरमंथनांतून निघालेल्या विषाचा हा विचार झाला. आतां या मंथनांतून जीं कांहीं सामान्य रत्नें निघालीं त्यांची वांटणी कशी होणार आणि 'स्वातंत्र्य-चतुष्टय' रूपी जें अमृत निघालें असें म्हणतात तें कोणाकोणाच्या वांटणीस येणार याचा विचार पाहूं. याहि बाबतींत इतिहासाची पुनरावृत्ति होणार असेंच दिसतें. विषप्राशनाला महादेव व लक्ष्मीला वरण्याला विष्णु पुढें आला, त्याप्रमाणें या महायुद्धांतली हानि सोसण्याला अमेरिका आणि लाभ लाटावयाला रशिया पुढें येणार हें उघड दिसत आहे. अमेरिकेची द्रव्यद्वारा हानि कल्पनातीत झाली आहे; तथापि त्याला कांहीं युरोपांत अथवा आशिया खंडांतहि नवा मुलूख मिळेल असें दिसत नाहीं. रशिया मात्र युरोपांत आणि आशियांत दोनहि ठिकाणीं बेसुमार हात-पाय पसरणार असें दिसतें. युरोपांतला अर्धा अधिक भाग त्यानें आपल्या दिमती-खालीं घेतलाच आहे. आशिया खंडांत जपानशीं नाममात्र युद्ध पुकारून तेवढ्या जोरावर तो मांचुरिया, सिंगकांग, साघालिन इत्यादि प्रदेश गिळून शिवाय चीन-वर कम्यूनिस्टांमार्फत वर्चस्व ठेवूं इच्छित आहे.

### हिंदुस्थानच्या वांट्याला शंख !

रशियाला लक्ष्मी मिळून शिवाय इतर रत्नांपैकीं सुरा त्याच्या वांट्यासच जाईल. किंबहुना ती आतांच त्यानें आत्मसात् केली आहे असें त्याच्या वर्तनावरून दिसत आहे. इंग्लंडला प्रत्यक्ष फायद्याचें कोणतेंहि रत्न मिळेलसें दिसत नाहीं. महायुद्धाच्या विजयाचें द्योतक असें कौस्तुभ रत्न त्याच्या वांटणीला आलें आहेच. तेवढ्या मानावरच त्याला संतुष्ट राहावें लागेल. पारिजातक वृक्षहि त्याच्या वांटणीला येईल. पण त्या वृक्षाचा गुणच असा आहे कीं, त्याचा उपयोग शेजाऱ्यालाच अधिक होतो – त्या दृष्टीनें इंग्लंडला प्राप्त झालेल्या पारिजातकाचा उपयोग त्याच्या वसाहतींनाच अधिक होईल. हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जाहि अद्यापि मिळालेला नसल्यानें हिंदी लोकांनीं त्या पारिजातकाच्या फुलांचा लाभ आपणांस मिळेल असा आशाळभूतपणा धरूं नये.

अमेरिकेच्या कर्तबगारीचें फळ म्हणून त्यास कामधेनु मिळून शिवाय उच्चैःश्रवा हें शीघ्र वाहन मिळेल. त्याशिवाय ॲटॉमिक बॉंबरूपी सुदर्शनचक्र व धनुष्य हीं शस्त्रें अमेरिकेच्या वांटणीस आलींच आहेत. दोस्त राष्ट्रांना ऐन वेळीं मदत करण्याचें बक्षीस म्हणून फ्रान्सच्या वांटणीला रंभादि अप्सरा येतील. चीनलाहि दोस्त राष्ट्रांत स्थान मिळालेलें असल्यानें त्याला दिखाऊ मान म्हणून आणि त्या राष्ट्रानें सोसलेल्या दीर्घकालीन तापाच्या शमनाचा उपाय म्हणून त्याला चंद्र (अर्ध) दिला जाईल. हिंदुस्थानच्या साहाय्याचा वारंवार उच्चार केला गेला आहे, तेव्हां त्यास अगदींच रिक्त हस्तानें परत पाठविणें अनुचित दिसेल म्हणून चौदा रत्नांतून राहिलेलें 'शंख' हें आयुध हिंदुस्थानच्या वांटणीला येईल !

### मोहिनी अमृत वांटणार

अशा रीतीनें इतर रत्नांची विल्हेवाट लागेल. सर्वांत मुख्य असें जें स्वातंत्र्यरूपी 'अमृत' त्याची वाट काय असा प्रश्न पुढें येईलच. त्याचें उत्तर उघडच आहे. इतर रत्नांप्रमाणें 'अमृत' हें कांहीं एकट्याला देऊन टाकावयाचें रत्न नव्हे. 'अमृत' हें सर्वांनाच यथाभाग वांटून द्यावयाचें आहे. तें वांटतांना कलह होऊं नये म्हणून तें वांटण्याचें काम मोहनीकडे दिलें जाईल आणि देव व दैत्य यांच्या वेगवेगळ्या पंक्ति बसवून क्रमाक्रमानें तें वांटण्यांत येईल. अर्थातच देवांच्या पंक्तींत वाढतां वाढतां तें संपून गेलें तर दैत्यांना नुसत्या वाटण्याच्या अक्षतांवर संतुष्ट राहावें लागेल. अशा रीतीनें आपली वंचना होऊं नये म्हणून इटाली, रुमानिया यांसारखें कांहीं राहू, केतू आपली रांग सोडून देवांचें रूप धारण करून त्यांच्या पंक्तींत बसूं पाहात आहेत; पण देवांच्या रांगेंतले कांहीं सूर्य-चंद्र ही लबाडी उघडकीस आणतील. अशा रीतीनें पूर्वेतिहासाची पुनरावृत्ति याहि बाबतींत घडावयाचीच आहे. मात्र यांत मोहनी होऊन अमृत वांटण्याचा मान कोणाला मिळावयाचा

तें ठरावयाचें आहे. तह-परिषदेंत अथवा आधुनिक नांवानें ओळखल्या जाणाऱ्या 'जागतिक शांतता व सुरक्षितता' परिषदेंत याचा निर्णय व्हावयाचा आहे. तेव्हां त्या-संबंधांत आतांच कांहीं लिहिण्याची घाई करण्याचें कारण नाहीं. त्याची चर्चा करण्याला अद्यापि पुष्कळ अवधि आहे. मात्र एक गोष्ट निश्चित असल्यानें ती आतांच सांगून ठेवण्यास हरकत नाहीं. ती हीच कीं, स्वातंत्र्यरूपी अमृताची वांटणी यथान्याय होत नाहीं असें दिसूं लागतांच, पौराणिक काळांत ज्याप्रमाणें देवदैत्यांचा झगडा पुनश्च सुरू झाला, तसाच झगडा या महायुद्धानंतरहि होणार आहे. त्या झगड्या-लाच कोणी तिसरें महायुद्ध असें म्हणतात. तो झगडा टळणार नाहीं. याचें कारण हेंच कीं, सागरमंथनांतून निघालेल्या रत्नांची वांटणी यथान्याय झाली नाहीं आणि अमृताच्या वांटपांतहि पक्षपात व पंक्तिप्रपंच होणार हें ढळढळीत दिसत आहे. अर्थातच पुनश्च महायुद्ध उद्भवूं नये असें वाटत असल्यास मोहिनीनें अन्याय टाळून सर्वांना अमृताचा सारखा वांटा द्यावा; नाहींतर जगावर तिसऱ्या महायुद्धाची आपत्ति ओढवलेली पाहावयास तयार राहावें.

---

## इंग्लंड व रशिया यांची तेढ १९

[दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगांत चिरकाल शांतता नांदावी या हेतूनें शांतता प्रस्थापित करणारा संयुक्त राष्ट्रसंघ निर्माण करण्यांत आला व त्याच्या बैठकी सुरू झाल्या; तरी राष्ट्राराष्ट्रांतील संशयाचें व भीतीचें वातावरण दूर तर नाहींच, पण त्या राष्ट्रसंघांतच चुरस लागून इंग्लंड आणि रशिया यांच्यां-तील तेढ दिवसेंदिवस कशी वाढत आहे, याचा तपशील या लेखांत दिला आहे.]

### नवी संघटना

जगांत चिरंतन शांतता संस्थापन व्हावी, लहान लहान राष्ट्रांना लोकशाही व स्वातंत्र्य या तत्त्वांनुसार सुरक्षितता प्राप्त करून द्यावी आणि आंतरराष्ट्रीय तंटे-बखेडे अग्निदिव्याचा प्रयोग केल्याशिवाय पंचायतीच्या मार्गानें तोडावे या हेतूनें दुसऱ्या जागतिक युद्धानंतर "युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन" किंवा संयुक्त राष्ट्रांची संघटना स्थापन केली गेली. या संघटनेंत एकंदर एकावन्न राष्ट्रांचे प्रति-निधि असले तरी ज्या मुख्य समितीच्या हातीं सर्व सूत्रें आहेत ती समिति अकरा सभासदांची आहे. यालाच 'सेक्युरिटी कौन्सिल' किंवा 'सुरक्षितता समिति'

(केसरी, दि. १ फेब्रुवारी १९४६)

असें म्हणतात. या समितींत इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स व चीन यांना कायमचें प्रतिनिधित्व दिलें असून, बाकीच्या राष्ट्रांचे सहा प्रतिनिधि आलटून-पालटून निवडले जाणार आहेत. मागील युद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्र-संघांत व या समितींत मूलभूत भेद आहेत. मागील राष्ट्रसंघांत सर्व लहान-मोठ्या राष्ट्रांना अधिकाराच्या दृष्टीनें बरोबरीचें स्थान होतें आणि या समितींत श्रेष्ठ व सामर्थ्यवान् अशा पांच राष्ट्रांचाच कायमचा वरचष्मा ठेवला आहे. त्यांतहि बिचारा चीन केवळ अमेरिकेच्या कृपेनें तेथें आहे व फ्रान्सच्या राजकारणांतील छायाप्रकाश इतक्या द्रुतगतीनें बदलतो कीं, फ्रान्स एका दृष्टीनें या समितींत कमकुवतच ठरतो. राहिलेल्या तीन राष्ट्रांत आज इंग्लंड सर्व दृष्टीनें सामर्थ्याच्या बाबतींत खालच्या श्रेणींत आहे. अमेरिकेपाशीं ॲटम् बॉम्ब आहे. रशियापाशीं तशींच गुप्त शस्त्रें आहेत असें म्हणतात. इंग्लंडजवळ यांतलें कांहीं नाहीं. शिवाय इंग्लंडच्या साम्राज्याचा पसारा जगभर पसरला असल्यानें व त्या साम्राज्याच्या पोटांत गुलाम राष्ट्रांचे अनेक ज्वालामुखी धुमसत असल्यानें, इंग्लंड मोठ्या पेंचांत सांपडलेलें दिसतें व रशिया या उणीवेचा पुरेपूर फायदा घेत आहे.

## ऐतिहासिक वैर

इतिहासाचा ओघ पाहिला तर रशिया व इंग्लंड यांचें सूत केव्हांच जमत नाहीं असेंच दिसतें. अमेरिकेचेंहि रशियाशीं फारसें जुळतें असें नाहीं; पण संपत्तिमान् व सामर्थ्यसंपन्न अमेरिका रशियाची फारशी पर्वा करीत नाहीं. उलट इंग्लंड व रशिया यांच्या सरहद्दी भौगोलिकच नव्हे तर आन्तरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या दृष्टीनेंहि एकमेकांस टेकलेल्या आहेत. यामुळें रशिया व इंग्लंड यांचे खटके वारंवार उडत असलेले दिसतात. सुविख्यात लेखक मि. लुई फिशर यांनीं या दोन राष्ट्रांच्या संबंधाचें चित्रण करतांना म्हटलें आहे कीं, इंग्लंडचा सिंह व रशियाचें अस्वल हें यापुढें एकत्र गुण्यागोविंदानें नांदतील असें दिसत नाहीं. कारण इंग्लंडप्रमाणेंच रशियाहि आतां बाल्टिक समुद्र, अटलांटिक महासागर, भूमध्य समुद्र, प्रशांत महासागर आणि इराणचें आखात येथें आपली नाविक सत्ता स्थापन करण्याच्या प्रयत्नांत यशस्वी होत आहे. यामुळें, मि. लुई फिशर म्हणतात कीं, रशियाचें अस्वल हें गुरगुरूं लागलें असून ब्रिटनच्या सिंहाबरोबर या सुरक्षितता-समितींतहि खेळीमेळीनें राहूं इच्छित नाहीं. विशेषतः या सिंहाचा पराक्रम फारसा भीतिदायक राहिला नाहीं व त्याची गर्जनाहि आतां अगदींच शेळीच्या बेंबेंसारखी ऐकूं येते. याशिवाय सध्यांच्या रशियाचे हुकूमशाही सूत्रधार मा. स्टॅलिन यांचें परराष्ट्रीय धोरण हें एक गूढ असल्यानें व प्रत्यक्ष स्वरूपांत मागील झारांच्या साम्राज्यशाही धोरणाशीं तें सुसंगत असल्यानें, इंग्लंड व रशिया यांचें ऐतिहासिक वैर पुनः या ना त्या स्वरूपांत जागृत झालेलें दिसत आहे.

## इराणचें गाऱ्हाणें

सध्यां लंडनमध्यें चालू असलेल्या संयुक्त राष्ट्रीय संघटनेच्या सर्व प्रतिनिधींच्या सभेंत गेल्या आठवड्यांत रशिया व इंग्लंड यांच्या बेबनावाला चांगलाच रंग आला. 'सुरक्षितता-समिती'च्या अध्यक्षस्थानीं बेल्जमचे परराष्ट्रीय मंत्री मि. स्पॅक यांची निवडणूक करतांना प्रमुख राष्ट्रांशीं संबंध असणारा अध्यक्ष नसला तर तो निःपक्षपाती राहील हा उद्देश होता, तसेंच या संघटनेचे चिटणीस म्हणून दोन दिवसांपूर्वींच नॉर्वेचे परराष्ट्रीय प्रमुख मॉ. ली यांची नुकतीच नेमणूक झाली. अध्यक्ष व चिटणीस हे निःस्पृह, स्वतंत्र बुद्धीचे व निःपक्षपाती असले म्हणजे ते कोणत्याहि सामर्थ्यवान् राष्ट्राला दाद देणार नाहींत, अशी ही योजना आहे व त्याचें प्रत्यक्ष फल दिसलेंहि. इराणच्या प्रतिनिधींनीं या सुरक्षितता-समितीपुढें रशियाच्या धोरणाविरुद्ध आपलें गाऱ्हाणें मांडलें. मि. सय्यद हसन यकिझडेह यांचें म्हणणें कीं, रशियानें आपल्या अन्तर्गत राज्यकारभारांत विनाकारण ढवळाढवळ केली आणि आपल्या अझरबैझान या प्रांतांत बंड उठवून इराणपासून तो प्रांत स्वतंत्र केला व तो आपल्या पंजाखालीं घातला. बंडखोरांचें शासन करण्याकरितां इराणी सरकारानें पाठविलेलें सैन्य रशियाच्या लष्करानें पुढें जाऊं दिलें नाहीं. या तक्रारीची समितीनें चौकशी करावी व मार्च २ च्या आंत रशियानें आपलें लष्कर आपल्या प्रांतांत परत न्यावें, अशी त्यांनीं मागणी केली. रशियाच्या कारस्थानी मुत्सद्दयांनीं या प्रश्नावर सुरक्षितता-समितीनें न्याय-निवाडा करूं नये, म्हणून नवाच मनसुबा केला. त्याचा परिणाम हा झाला कीं, इराणच्या मुख्य प्रधानानें राजीनामा दिला व नव्या प्रधानांनीं रशियाशीं परस्पर बोलणीं करण्याचें ठरविलें. तथापि हा प्रश्न सुरक्षितता-समितीपुढें अध्यक्षांच्या परवानगीनें आलाच आला.

## इंग्लंडविरुद्ध कांगूर

रशियाच्या मुत्सद्दयांनीं तोडीस तोड उठवून देण्याकरितां ब्रिटनविरुद्ध गंभीर स्वरूपाचें आरोपपत्र तयार केलें. रशियाचें म्हणणें कीं, भूमध्य समुद्रावर आपलें वर्चस्व कायम राहावें म्हणून ग्रीसच्या अंतर्गत राजकारणांत इंग्रजांनीं हस्तक्षेप केला, इतकेंच नव्हे तर त्यांनीं आपलें सैन्य त्या देशांत कारण नसतां ठेवलें असून, त्या सैन्याच्या दराऱ्यावर आपले साम्राज्यवादी हेतु इंग्लंड साधीत आहे. याबद्दलची चौकशी समितीनें करून न्यायनिवाडा करावा अशी रशियाची मागणी आहे. याबरोबरच आपल्या ताटाखालील मांजर असलेल्या युक्रेनियाच्या प्रतिनिधीकडून दुसरी मागणी अशी करविली कीं, इंडोनेशियाच्या बाबतींतहि इंग्लंडनें जें धोरण स्वीकारलें आहे त्याचीहि चौकशी करावी. या आरोपाचा इत्यर्थ हा आहे कीं, इंडोनेशियांत तेथील देशाभिमानी लोकांनीं जी स्वातंत्र्याची चळवळ चालविली आहे ती दडपून टाकावी असा इंग्लंडचा हेतु आहे.

इंग्लंड ह्याच्या मदतीकरितां आपलेंच सैन्य केवळ उपयोगांत आणीत नसून जपानी शिल्लक सैन्यहि उपयोगांत आणीत आहे, असाहि गंभीर आरोप युक्रेनियाच्या प्रतिनिधींनीं केला आहे. या आरोपामुळें समितीच्या सभेंत एक बॉंबगोळा टाकल्याप्रमाणें खळबळ उडाली. इरेस पेटलेल्या इंग्लंडचे परराष्ट्रीय प्रधान मि. बेव्हिन यांनीं या प्रकरणाची खुशाल चौकशी करावी, अशी मान्यता देऊन रशियाचें हें आव्हान स्वीकारलें आहे. अशी तेढ इंग्लंड व रशिया यांच्यासारख्या बलाढ्य राष्ट्रांत उत्पन्न झालेली असल्यानें ही सुरक्षितता-समिति या वेळीं काय करते याकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे. रशियाच्या प्रतिनिधींनीं इराणच्या आरोप-पत्रासारखें पत्र घेऊं नये अशी कैफियत दिली. पण रशिया व युक्रेनिया यांचीं दोन मतें फक्त विरोधी पडून समितींतील सदस्यांच्या बहुमतानें हें आरोपपत्र विचारांत घेण्याचें ठरलें. पण अखेर त्या बाबतींत रशियाचाच पक्ष प्रबळ ठरला असें म्हणणें प्राप्त येतें.

## स्वातंत्र्याला शह

रशियांतील मुत्सद्द्यांनीं इंग्लंडवर मात करण्याकरितां आपल्या भात्यांतून आणखी विषारी बाण काढले असून त्यांचा मारा इंग्लंडवर ते करीत आहेत, हेंहि या वेळीं दृष्टीपुढें ठेविलें पाहिजे. रशियाच्या कम्यूनिस्ट पक्षाचें मुखपत्र 'बोल्शेव्हिक' यानें तर ब्रिटिशांच्या वसाहतीच्या साम्राज्यशाही धोरणावर कडाडून हल्ला चढविला आहे. इंडोनेशिया व इंडोचायना येथें इंग्लंडनें जें विशिष्ट धोरण स्वीकारलें आहे तें हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांमध्यें जी नवी स्वातंत्र्याची वावटळ उठली आहे, तिला आगाऊ शह देण्याकरितां आहे, असें त्याचें म्हणणें आहे. हें म्हणणें नीट दिसावें म्हणून इंग्लंडच्या सध्यांच्या आर्थिक परिस्थितीचीहि चर्चा अनेक ठिकाणीं रशियाच्या प्रेरणेनें चालू आहे. 'नेशन' या पत्रांत मि. ॲंड्रयू रॉथ हे लिहितात कीं, "युद्धोत्तर इंग्लंडची आर्थिक परिस्थिति इतकी नाजूक झालेली आहे कीं, इंग्लंडला आपलीं देणीं देण्याचें सामर्थ्य नाहीं, वसाहतींतल्या बाजारपेठांहि इंग्लंडच्या हातच्या जात आहेत. अशा स्थितींत आपल्या वसाहतींवरचा व अंकित देशांवरचा ताबा इंग्लंड सोडूं इच्छित नाहीं. हिंदुस्थान, ब्रह्मदेश, मलाया, इंडोनेशिया या देशांत जगांतील ९० टक्के क्विनाईन, ८० टक्के रबर, ७० टक्के कथील आणि कोळसा, लोखंड, तेल, मॅंगनीझ, बॉक्साईट, टुंगस्टन यांसारखे बहुमोल खनिज पदार्थ बव्हंशानें उत्पन्न होतात. तांदूळहि या भागांतच अधिक पिकतो. अशा या संपन्न प्रदेशावरचा ताबा इंग्लंड यावेळीं तरी कसा सोडील ? तथापि या देशांत स्वातंत्र्याची चळवळ जोरानें उभारली गेली असून ती हाणून पाडल्याशिवाय इंग्लंडला गत्यंतर नाहीं. अशा स्थितींत आंतरराष्ट्रीय प्रश्नांची दाद घेऊन न्यायनिवाडा करण्याचें सामर्थ्य असलेल्या सुरक्षितता-समितीनें या प्रश्नाचाहि विचार केला पाहिजे", असें त्यांचें म्हणणें आहे.

नगर वाचनालय, सातारा.

नगर वाचनालय सातारा
दा नं. ३४१५८
से नं. २०८



## परतंत्र हिंदुस्थानचा प्रश्न

हे सर्व प्रश्न या ना त्या निमित्तानें आतां आंतरराष्ट्रीय समितीच्या लंडनमध्यें भरलेल्या सभेपुढें आले आहेत. इराणच्या प्रश्नाची सोमवारीं चर्चा होऊन आरोपः प्रत्यारोप केले गेले; पण रशियाच्या प्रतिनिधींचें म्हणणें मान्य करून त्या प्रश्नाचा निकाल प्रथम बुधवारपर्यंत पुढें ढकलला गेला. त्यानंतर इराण व रशिया यांनीं परस्पर बोलणीं करून हा प्रश्न निकालांत काढावा व तोंपर्यंत हें प्रकरण स्थगित करावें, त्या दोन राष्ट्रांत जर समेट झाला नाहीं, तर सुरक्षितता-समिति त्याचा पुनः विचार करील, असें बुधवारीं ठरलें. इंग्लंडविरुद्ध केलेल्या आरोपांचा निकाल काय होतो तें पुढें समजेल. मात्र हिंदुस्थानच्या दृष्टीनें एक गोष्ट महत्त्वाची घडली आहे, ती ही कीं, हिंदुस्थानच्या तक्रारींचीहि दाद या समितीनें घ्यावी असा प्रयत्न चालू आहे. ' न्यू टाइम्स ' या सोव्हिएट मासिकानें नुकतेच हिंदुस्थानसंबंधीं जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते विचारार्ह आहेत. तें पत्र म्हणतें कीं, " संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेमध्यें हिंदुस्थानला प्रतिनिधित्व दिलें आहे. परंतु मौज ही कीं, समान हक्क व स्वयंनिर्णय ह्या दोन तत्त्वांवर ही संघटना उभारलेली असली तरी त्याचा अंमल हिंदुस्थानवर मात्र करूं दिला जात नाहीं, ही घटना विचित्र आहे ! तह-परिषदेंत हिंदुस्थान भाग घेणार व खुद्द हिंदुस्थानला मात्र राष्ट्रीय राज्यघटना नाहीं, राष्ट्रीय सरकार नाहीं व स्वतःचें परराष्ट्रीय खातें नाहीं. हा सर्व कारभार परके इंग्रज लोक करतात." या लिखाणाचा रोख कोणीकडे आहे हें सांगावयास नको. स्वतंत्र व सामर्थ्यवान् राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींच्या मांडीला मांडी लावून हिंदुस्थानचा प्रतिनिधि बसत असला तरी त्याची मायभूमि राजकीयदृष्ट्या गुलाम आहे हें दृश्य विलक्षण व अपमानकारक नाहीं काय ! लंडनमध्यें भरत असलेल्या या समितीपुढें त्रावणकोर येथें जन्मलेले अमेरिकेच्या हॉवर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर डॉ. के. अलेक्झांडर, हे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न मांडणार असल्याचें जाहीर झालें आहे. त्यांच्या या प्रयत्नाचें कांहींहि होवो; हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पक्षांनीं या बाबतींत एकमत करून हिंदुस्थानचा प्रश्न या समितीपुढें कसा मांडतां येईल याचा विचार करावा व शक्य तितक्या लवकर यासंबंधीं निश्चित योजना करावी, हें आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे असें आम्हांस वाटतें.

# देशांतील राजकीय घडामोडी

## प्रांतिक स्वराज्याचा पहिला हप्ता

१

[ इ. स. १९०७ पूर्वी हिंदुस्थानांतील सर्वच कारभाराची सत्ता भारतमंत्र्याच्या हातीं केंद्रित झाली होती. प्रांतिक सरकारनें आपलें अंदाजपत्रक सिमल्याला पाठवावें, सिमला सरकारनें तें विलायतेंत भारतमंत्र्याकडे पाठवावें, भारतमंत्र्यानें तें ब्रिटिश पार्लमेंटपुढें ठेवावें आणि पार्लमेंटच्या संमतीचा फार्स झाला म्हणजेच अंदाजपत्रक पक्कें झालें असें समजावें असा प्रघात होता. मोर्ले-मिंटो सुधारणा मंजूर झाल्यावर अधिकाराचें एवढें केंद्रीकरण योग्य नव्हे असें वाटून अधिकारविभागणी सुचविण्याकरितां एक रॉयल कमिशन नेमण्यांत आलें, आणि कमिशननें 'डोंगर पोखरल्यावर त्यांतून उंदीर बाहेर पडण्या'चा जो नेहमींचा अनुभव तोच अनुभव याहि बाबतींत आला. त्या दृष्टीनें मुंबई प्रांतिक सरकारच्या अधिकारांत कितपत इष्ट वाढ झाली याचा विचार या लेखांत केला असून 'सरकारी अधिकाऱ्यांच्या सूचनांवर लोकमताचा दाब बसण्याची तजवीज केल्याखेरीज प्रांतिक सरकारला कर बसविण्याचा अधिकार दिला जाऊं नये,' ही प. वा. रमेशचंद्र दत्त यांची सूचनाच 'केसरी'नें पुरस्कारिली आहे. ग्रामपंचायती स्थापण्याचा अधिकार प्रांतिक सरकारला, एवढी एकच

(केसरी, दि. २८ मे १९१२)

ता.

सुधारणा या सरकारी ठरावांत अभिनंदनीय आहे, असें आपलें मत केसरीनें या लेखांत स्पष्टपणें दिलें आहे. ]

### पांच मुद्द्यांवर मतें मागविलीं

इ. स. १९०७ सालीं, हिंदुस्थानांतील प्रचलित राज्यपद्धतीचें परीक्षण करून त्यांत कांहीं फेरबदल करणें इष्ट आहे कीं काय तें ठरविण्याकरितां, एक 'रॉयल कमिशन' नेमण्यांत आलें होतें. त्या कमिशननें वरिष्ठ सरकार व प्रांतिक सरकार, आणि त्यांचे खालील अधिकारी, ह्यांच्या दरम्यान कामाची व अधिकाराची वांटणी कशी करावी ह्याचा विचार करून, ता. २५ फेब्रुवारी १९०९ रोजीं रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्या रिपोर्टाचें काम चालू असतांनाच कायदे-कौन्सिलांची वाढ करण्याची सूचना अंमलांत आली. त्यामुळें सदरहू रिपोर्टांतील सूचनांची बजावणी करण्याचें काम दिनावधीवर पडलें. तें आतां हिंदुस्थान सरकारनें हातीं घेतलें आहे. अधिकार-विभागणी-कमिशनच्या रिपोर्टाला अनुसरून प्रांतिक सरकारांना जमाखर्चाच्या बाबतींत कोणते नवीन अधिकार द्यावयाचे ह्या प्रश्नांचा वरिष्ठ सरकारनें प्रथम खल केला; आणि प्रांतिक सरकारांचीं मतें मागवून व विशिष्ट फेरफाराला जरूर तेथें स्टेट सेक्रेटरीची मंजुरी घेऊन त्यांनीं आतां ह्या बाबतींत एक नवीन ठराव प्रसिद्ध केला आहे. वरिष्ठ सरकारनें आपलें मत निश्चित करण्यापूर्वीं प्रांतिक सरकारांचीं मतें पुढील पांच मुद्यांवर मागविलीं होतीं. (१) हल्लींच्या प्रांतिक करारांत करावयाचे फेरफार. (२) प्रांतिक सरकारनें स्थानिक कर बसविण्याची युक्तायुक्तता. (३) प्रांतिक सरकारनें स्वतंत्रपणें कर्ज काढण्याच्या हक्काची आवश्यकता. (४) स्थानिक-स्वराज्याच्या कर्ज काढण्याच्या अधिकारावर देखरेख. (५) एका खात्याकडे मंजूर झालेल्या खर्चाच्या रकमेचा दुसरीकडे विनियोग. ह्या पांच प्रश्नांपैकीं पहिलाच प्रश्न काय तो महत्त्वाचा व व्यापक आहे; सबब ह्याच्या अनेक अंगांपैकीं फक्त तीनच अंगांचा विचार ह्या ठरावांत करण्याचें वरिष्ठ सरकारनें ठरविलें होतें; व तेवढ्यापुरतींच प्रांतिक सरकारांचीं मतें विचारण्यांत आलीं होतीं. हल्लींची जी उत्पन्नाच्या बाबतींत प्रांतिक व वरिष्ठ सरकारांत हिस्सेरशी ठरली आहे, ती पद्धति सर्वस्वी सोडून देणें इष्ट वाटत नसल्यामुळें (१) वरिष्ठ व कनिष्ठ सरकारांची हिस्सेरशी प्रांतिक सरकारला सोयीस्कर होईल अशी करणें. (२) ह्या हिस्सेरशीच्या बाबींची छाटाछाट करून त्या शक्य तितक्या संपुष्टांत आणणें. (३) आणि प्रसंगविशेषीं वरिष्ठ सरकारनें प्रांतिक सरकारला मदतीदाखल अथवा विशिष्ट कामासाठीं ठोक देणग्या देणें. एवढ्या तीन मार्गांचाच विचार करून सरकारनें पुढीलप्रमाणें निकाल दिला आहे. हिस्सेरशीच्या बाबी अजिबात कमी करून उत्पन्नाच्या बाबींपैकीं अमुक बाबी प्रांतिक आणि अमुक वरिष्ठ

सरकारच्या, असा कायमचा ठराव करण्याला हिंदुस्थान सरकार आज तयार नाहीं; परंतु ज्या ज्या वेळीं स्थानिक सरकारच्या योग्य व आवश्यक अशा वाढत्या खर्चाला त्यांना देण्यांत आलेला हिस्सा पुरेनासा होईल, त्या त्या वेळीं, किंवा वरिष्ठ सरकारनें करावयाच्या खर्चाची जबाबदारी घेण्याला प्रांतिक सरकार तयार असेल त्या वेळीं वरिष्ठ सरकार आपला हिस्सा प्रांतिक सरकारला तोडून देण्याला तयार होईल. आतां वरिष्ठ सरकार आपल्याकडून मिळावयाच्या देणग्या सर्वस्वीं बंद करण्याला तयार नाहीं. तथापि, प्रांतिक सरकारनें अशा 'धर्मदाया'ची अपेक्षा करून आपला खर्च आटोक्याबाहेर वाढवूं नये. जेव्हां जेव्हां अशा देणग्या देण्यांत येतील तेव्हां त्या कोणत्या कामीं खर्च करावयाच्या याचा निर्णयहि वरिष्ठ सरकारच करील असें ठरविण्यांत आलें आहे. प्रांतिक सरकारला ह्या कामीं एवढेंच स्वातंत्र्य मिळेल कीं, देणगी देण्यापूर्वी ती रकम कोणत्या कामाकरितां पाहिजे आहे त्याविषयीं त्याचें मत विचारलें जाईल, पण ती रकम त्याच कामाकडे खर्च पडली कीं नाहीं एवढें पाहण्याखेरीज अधिक ढवळाढवळ वरिष्ठ सरकारकडून होणार नाहीं. हे नवीन फेरबदल लक्षांत घेतां इतर बाबतींत मुंबई, मद्रास, संयुक्त-प्रांत, मध्यप्रांत, पंजाब व ब्रह्मदेश यांच्याशीं झालेले प्रांतिक करार यापुढें कायमचे समजण्यांत येतील; आणि बंगाल, बहार व आसाम प्रांतांचे करारहि ह्याच तत्त्वावर लवकरच कायमचे ठरविण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें ज्या ज्या उत्पन्नांत वरिष्ठ सरकारचा हिस्सा आहे तेवढ्यापुरताच त्या सरकारचा स्थानिक अंदाजपत्रकावर ताबा राहील. मात्र एकंदर जमेच्या व खर्चाच्या रकमा पाहून, त्यांत जमेपेक्षां खर्चाची वाढ अधिक नाहीं आणि जितकी किमानपक्ष शिल्लक राहिलीच पाहिजे तेवढी शिल्लक अंदाजपत्रकावरून राहात आहे कीं नाहीं, हें पाहण्याची वरिष्ठ सरकार दक्षता घेईल. आतां प्रांतिक सरकारला अंदाजापेक्षां उत्पन्न अधिक होऊन शिल्लक वाढत चालली तर त्याचा खर्च कायमच्या बाबींकडे न करतां तात्पुरत्या कामाकडे करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे. असा खर्च न होतां जी शिल्लक राहील ती दरसाल बजेटांत दाखल करावी, म्हणजे वरिष्ठ सरकार त्याची विल्हेवाट लावण्याचा विचार करील. उलटपक्षीं, प्रांतिक सरकारच्या शिलकेंत तूट येऊं लागली तर त्या सरकारनें वरिष्ठ सरकारकडून थोड्या मुदतीनें रकम कर्जाऊ म्हणून घ्यावी आणि तिची फेड हप्त्याहप्त्यानें सव्याज करावी. अशा कर्जाची फेड होईपर्यंत कोणत्याहि खात्यांत बचत राहिलेल्या रकमेचा विनियोग कर्जफेडीखेरीज दुसरीकडे करावयाचा नाहीं.

### मध्यवर्ती सरकारचा सासूपणा कायम

प्रांतिक व वरिष्ठ सरकारांच्या उत्पन्नाची हिस्सेरशी ठरल्यावर बाकीचे प्रश्न विशेष भानगडीचे राहात नाहींत. प्रांतिक सरकारनें स्वतंत्रपणें कर्ज काढण्या-

नगर वाचनालय, सातारा.



संबंधीं कमिशननें निषेधार्थी अभिप्राय दिला होता, आणि हिंदुस्थान सरकारनेंहि तोच निषेध कायम केला आहे. नवे स्थानिक कर बसविण्याविषयीं हिंदुस्थान सरकारनें कमिशनच्या मताला अनुसरून सर्व अधिकार पूर्वीप्रमाणें आपल्याचकडे ठेविले आहेत. तथापि, सार्वत्रिक कराच्या योगानें कर देण्याला पात्र असून त्याजवर कमी कर आणि कर देण्याला अपात्र असणारांवर जबर कर, जसा जो केव्हां केव्हां प्रकार घडतो त्याची दुरुस्ती करून सर्वांवर कराचें ओझें सारखें करण्याला तो एक मार्ग आहे, आणि जो एखादा कर देशांतील सर्व प्रजेवर एकदम बसविला असतां जड वाटेल आणि प्रसंगविशेषीं असंतोषास कारणीभूत होईल असा कर प्रारंभीं नमुन्यादाखल एखाद्या छोट्या प्रांतांत बसवून नंतर त्याची व्याप्ति सर्व देशभर करणें सोयीचें होईल; त्याकरितां प्रांतिक सरकारनें वरिष्ठ सरकारच्या परवानगीनें नवीन कर बसविण्याचें तत्त्व वरिष्ठ सरकारनें मान्य केलें आहे. म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें वगैरे स्थानिक संस्थांनीं कर्ज काढावयाचें झाल्यास त्यांना आजपर्यंत हिंदुस्थान सरकारची मंजुरी लागत असे. पण आतां यापुढें केवळ स्थानिक सरकारच्या मंजुरीवरच पांच लाख रकमेपर्यंतचें तीन वर्षांच्या मुदतीचें कर्ज काढण्याला त्यांना मोकळीक दिली आहे. एका पोटखात्याकडे मंजूर झालेली रक्कम त्याच वर्गांतील दुसऱ्या पोटखात्याकडे खर्च करण्याचा अधिकार त्या त्या खात्याच्या अधिकाऱ्यांस देण्यांत आला आहे. मात्र ही खर्चाची वर्गावर्गी करतांना पगारखात्यासारख्या कायम खर्चाच्या खात्यांतील बचत आकस्मिक कामाकडे, अथवा तात्पुरत्या खर्चाकरितां दिलेली रक्कम कायम खात्याकडे खर्च करूं नये, आणि शिवाय हा अधिकार काढून घेणें किंवा तहकूब ठेवणें, स्थानिक सरकारच्या हल्लींच्या स्वतःच्या अधिकारांत जितक्या रकमेचा खर्च करण्याची परवानगी आहे तिची मर्यादा वाढविणें, या विषयींचा ठरावहि लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

### प्रांतिक सरकारचा दर्जा वाढला नाहीं

हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नव्या ठरावाचा जो बिस्तृत गोषवारा वर दिला आहे त्यावरून त्या ठरावाच्या स्थूल स्वरूपाची वाचकांना कल्पना आलीच असेल. आतां ह्या बड्या ठरावांत सत्त्वांश किती हातीं लागतो हें पाहूं गेल्यास बहुतेक नन्नाचाच पाढा वाचावा लागतो. मुंबई आणि मद्रास सरकारांत हल्लीं जे हक्क आहेत, तितके सुद्धां ज्यांच्या वांटणीला आलेले नाहींत, त्यांना ह्या ठरावांत कांहीं थोडेबहुत अधिकार प्राप्त झाले असल्यास न कळे. परंतु प्रस्तुत आपण मुंबई इलाख्याचेंच उदाहरण घेतल्यास, प्रांतिक सरकारच्या दृष्टीनें अथवा प्रजेच्या दृष्टीनें कसेंहि पाहिलें तरी, प्रांतिक स्वातंत्र्याची वाढ कोठेंच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. ज्या पांच मुद्द्यांचा विचार प्रस्तुत ठरावांत केलेला आहे, त्यांतून महत्त्वाच्या तीन

मुद्द्यांवर तर नकारार्थीच शेरा मिळालेला दिसतो, राहतां राहिले दोन किरकोळ प्रश्न. त्या प्रश्नांवर जरी वरिष्ठ सरकारनें 'हो'कारार्थी मत दिलें असलें तरी त्यापासून प्रांतिक सरकारला सुखदुःख थोडेंच आहे. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें ह्यांना कर्ज काढण्याची परवानगी देण्याचा अधिकार पूर्वी हिंदुस्थान सरकारकडे होता तो आतां कांहीं नियमित रकमेपर्यंत स्थानिक सरकारला बजावतां येऊं लागणार. पण त्यांत प्रांतिक सरकारचा दर्जा कांहीं वाढला असें थोडेंच आहे. पुणें किंवा नगर म्युनिसिपालिटीनें काढावयाच्या कर्जाचें प्रकरण मंजुरीकरितां कलकत्त्याला रवाना होण्याच्या ऐवजीं मुंबईंतच त्याचा निकाल लागला तर म्युनिसिपालिटीला आपलें काम लवकर उरकलें म्हणून हर्ष होईल; पण त्यामुळें मुंबई सरकारला आपल्याला पूर्वी नसलेला एखादा अधिकार प्राप्त झाला म्हणून स्वर्ग दोन बोटें उरला असें थोडेंच होणार आहे! किरकोळ खर्चाची पोटखात्यांत वर्गावर्गी करण्याचा अधिकारहि कांहीं नवीन नाहीं. पण कांहीं प्रांतिक सरकारांच्या गैरसमजुतीमुळें त्या हक्काची आजवर अम्मलबजावणी होत नव्हती ती आतां होऊं लागेल एवढेंच काय तें. असल्या क्षुल्लक वर्गावर्गींच्या योगानें एकंदर अंदाजपत्रकाच्या धोरणांत रेसभरसुद्धां फरक पडण्याचा संभव नाहीं.

## नवीन हक्क मिळाले नाहींत

आतां बाकीच्या तीन महत्त्वाच्या मुद्द्यासंबंधीं पाहतां, स्वतंत्रपणें कर्ज काढण्याची परवानगी प्रांतिक सरकारांनीं मागितली होती. आमच्या मुंबई सरकारचा तर ह्या कामीं विशेष आग्रह दिसत होता; परंतु प्रांतिक सरकारांच्या उधळपट्टीला आळा घालणें अवश्य वाटल्यामुळें असो, अगर ठरावांतच कारण नमूद केल्याप्रमाणें सराफकट्ट्यावर प्रांतिक सरकार व वरिष्ठ सरकार ह्यांच्या कर्जाची परस्परांत चढाओढ होणें इष्ट वाटलें नाहीं म्हणून असो, हा अधिकार देण्याचें हिंदुस्थान सरकारनें साफ नाकारिलें आहे. विभागणी-कमिशनच्या रिपोर्टांतच, ही मागणी मान्य केली तरी कांहीं अटींवर मान्य करावी, अशी शिफारस होती; अर्थात् हिंदुस्थान सरकारला कमिशनच्या पडत्या फळाची आज्ञा पुरी होऊन मुंबई सरकारची मागणी फेटाळण्यांत आली. नवे कर बसविण्याचें तत्त्व वरिष्ठ सरकारनें मान्य केलें आहे; परंतु आजपर्यंत कोणत्याहि प्रांतिक सरकारनें तितक्या नेटानें नवीन कर बसविण्याची मागणी केलेली नाहीं. आणि यापुढेंहि तशी मागणी होईलच अशी खात्री वाटत नाहीं. नाहीं म्हणावयास सिंध प्रांतांत फक्त मुसलमानांवर स्थानिक कर बसवून आपल्या जातीय शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतूनें ना. भुर्गी ह्यांनीं मुंबई कायदेकौन्सिलांत बिल आणिलें आहे. हें बिल कौन्सिलपुढें मांडण्याला सरकारनें परवानगी दिली, त्यावरूनच ह्या बाबतींत असा स्थानिक कर बसविण्याला वरिष्ठ सरकारकडून परवानगी मिळाली असावी असा तर्क होतो. परंतु

त्याचा स्पष्ट खुलासा तें बिल पास होईपर्यंत व्हावयाचा नाहीं. कसेंहि झालें तरी नवीन कर बसविण्याला हिंदुस्थान सरकारच्या आणि स्टेट सेक्रेटरीच्या अशा जोड संमतीची आवश्यकता आहे तोंपर्यंत प्रांतिक सरकारची अधिकारमर्यादा या दिशेनें विस्तृत झालेली दिसून येत नाहीं. जमाखर्चाच्या कराराविषयीं पाहिलें तर मुंबई सरकार आणि वरिष्ठ सरकार ह्यांच्या दरम्यान इ. स. १९०७ सालीं जो प्रांतिक करार झाला होता तोच हल्लींहि बहुतांशीं कायम करण्यांत आला आहे; म्हणजे पूर्वींचा ठराव कांहीं वर्षांच्या अवधींत बदलेल अशी जी अनिश्चितता वाटत होती, तेवढी दूर करण्यांत आली. त्या योगानें अंदाजपत्रकाला स्थैर्य आलें ही गोष्ट नाकबूल करतां यावयाची नाहीं. तथापि पूर्वीपेक्षां ह्या नवीन ठरावानें आज कांहीं नवीन हक्क पदरांत पडले काय हें पाहिल्यास नकाराचाच पाढा वाचावा लागतो.

नवीन अधिकार मिळण्याच्या दृष्टीनें प्रस्तुत ठरावाचा विचार झाला. आतां स्थानिक सरकारच्या अधिकाराला जीं बंधनें होतीं त्यांतील कांहीं बंधनें तरी ढिलीं झालीं आहेत काय असा प्रश्न केल्यास तिकडूनहि सरकारची निराशाच झाली आहे. जमाखर्चाच्या खर्चांतील किरकोळ रकमांचीहि पूर्वी वरिष्ठ सरकारकडून पाहणी होत असे तितक्या बारीक रकमा तपासण्याचें यापुढें कारण नाहीं, असा अभिप्राय विभागणी-कमिशननें दिल्यावरून जमेच्या वाढीपेक्षां खर्चाची वाढ अधिक नाहीं, एवढी खात्री करण्यापुरतीच अंदाजपत्रकाची तपासणी करण्यांत येईल, असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. पण त्या लहानशा सवलतीखेरीज इतर बंधनें पूर्वीप्रमाणेंच दृढ राखिलीं आहेत. वरिष्ठ सरकारनें विशिष्ट कामासाठीं दिलेल्या देणग्यांचा उपयोग आपण कसा केला हें आपणांस विचारण्यांत येऊं नये अशी एक मुंबई सरकारची मागणी होती; पण तिची वाट इतर मागण्यांप्रमाणेंच लागली. तसेंच पांच लक्ष रुपयांपर्यंत आपणांला कोणत्याहि एखाद्या नवीन कामाकडे खर्च करावयाचा असल्यास त्याविषयीं परवानगी विचारण्याचें कारण पडूं नये, अशीहि एक प्रांतिक सरकारची मागणी होती; ती देखील नामंजूर झाली. सारांश, अधिकार-विभागणी-कमिशनच्या रिपोर्टावरून वरिष्ठ सरकारनें 'प्रांतिक स्वराज्या'चा हा जो पहिला हप्ता वांटला त्यांत तर आपल्या मुंबई सरकारच्या वांटणीला फारसा लभ्यांश आल्याप्रमाणें दिसत नाहीं.

### प्रजेला विषाद वाटणार नाहीं

येथवर नमूद केलेले विचार सरकारच्या दृष्टीनें झाले. रयतेच्या हिताहिताच्या दृष्टीनें पाहतां सध्यांच्या ठराविक लोकांना जरी कांहीं नवीन हक्काची प्राप्ति नसली तरी कांहीं गोष्टींत जुनीं बंधनें ढिलीं केलीं गेलीं नाहींत हें सरी एका अर्थी इष्टच आहे असें म्हणणें प्राप्त आहे. उदाहरणार्थ, स्थानिक कर बसविण्याला अथवा वाढविण्याला, कर्ज काढण्याला, वरिष्ठ सरकारच्या

देणग्यांचा आपल्या मनोदयाप्रमाणें खर्च करण्याला आणि पांच लक्ष रुपयांपर्यंत कोणत्याहि नवीन कामाकडे खर्च करण्याला स्थानिक सरकारास जर हक्क मिळाला असता तर, त्या हक्काचा दुरुपयोग होणार नाहीं अशाबद्दल हमी देण्याला कोणी तरी आहे काय ? कायदेकौन्सिलाची वाढ झाली तरी लोकनियुक्त सभासदांना जमाखर्चाच्या खर्ड्यांत कोणताहि महत्त्वाचा फेरफार करतां येण्याचा संभव अद्यापि प्राप्त झालेला नाहीं. आणि लोकप्रतिनिधींना तसा हक्क स्पष्टपणें मिळेपर्यंत खर्चाची काटकसर होण्याला त्रयस्थाची मंजुरी हेंच साधन होय. नाहीं तर अंदाजपत्रकावर वरिष्ठ सरकारचा दाब नाहीं, आणि प्रांतिक कर बसविण्याला आणि स्वतंत्रपणें कर्ज काढण्यालाहि मुभा, अशा स्वैर अधिकाराचें पर्यवसान इष्ट होईलच अशी कोणी खात्री बाळगूं शकणार नाहीं. प्रांतिक सरकारला जर खरेंखुरेंच स्वातंत्र्य द्यावयाचें असलें तर अगोदर लोकनियुक्त सभासदांना त्याचा योग्य वांटा मिळण्याची तरतूद झाली पाहिजे. सरकारी अधिकाऱ्यांच्या सूचनांवर लोकमताचा दाब बसण्याची तजवीज केल्याखेरीज प्रांतिक सरकारास कर बसविण्याचा अधिकार देऊं नये, असें आपलें मत प. वा. रमेशचंद्र दत्त यांनीं कमिशनच्या रिपोर्टांतच दिलें आहे आणि सध्यांच्या वाढलेल्या कायदेकौन्सिलांत देखील बिगर अधिकारी सभासदांच्या मताचा दाब सरकारी अधिकाऱ्यांवर हटकून पडल्याचें अद्यापि तरी कोठें आढळून आलें नाहीं. अशी स्थिति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत प्रांतिक सरकारच्या मागण्या वरिष्ठ सरकारनें झिडकारल्या म्हणून प्रजेलाहि फारसा विषाद वाटण्याचें कारण नाहीं.

### अधिकारगंगा वाटेंतच गुप्त झाली

खरें पाहूं गेलें असतां अधिकार-विभागणी-कमिशनच्या ज्या कांहीं एकंदर सूचना आहेत त्यांहि एकत्र ग्रथित केल्या तरी त्यांमध्यें आम्हांस अनुकूल अशा सूचना फारच थोड्या असल्याचें आढळून येईल. 'सामान्य लोकांना सरकारी कामांत अधिकाधिक वांटा देऊन सार्वजनिक कामाकडे त्यांची प्रवृत्ति बळविणें, आणि तशा प्रकारचीं कामें बजाविण्याचें त्यांना शिक्षण देऊन त्याच्या योगानें आपल्या अधिकाराला दृढता आणणें' हा एक अधिकार-विभागणी करण्याच्या मुळाशीं महत्त्वाचा मुद्दा होता. परंतु त्या कमिशनच्या सर्व सूचनांमध्यें वर नमूद केलेल्या हेतूला पोषक अशी सूचना म्हटली म्हणजे ग्रामपंचायती स्थापन करणें एवढी एकच होय. त्या व्यतिरिक्त इतर जें कांहीं भारूड आहे, त्यांत गव्हर्नर-जनरलचे कांहीं अधिकार गव्हर्नरास, गव्हर्नरचे कमिशनरास, कमिशनरचे कलेक्टरास, अशीच मालिका आहे. पण गंगाप्रवाह जसा स्वर्गांतून खालीं आला खरा, तथापि शंकराच्या जटेंतच गुप्त झाला, तसाच प्रकार येथेंहि झाला आहे. कारण ही अधिकाररूप गंगा सिमल्याहून जी खालीं निघाली ती जिल्ह्याच्या

कलेक्टरपर्यंत आली, पण तेथेंच तिची गति खुंटली. तिच्या पवित्र जलाचा उपयोग सामान्य जनसमूहाला झाला नाहीं. एवंच 'आडांतच नाहीं मग पोहोऱ्यांत कोठून येणार?' ह्या म्हणीप्रमाणें कमिशनच्या रिपोर्टरूपी आडांतच जर प्रजेच्या हक्काचा खडखडाट, तर हिंदुस्थान सरकारच्या ठरावरूपी पोहोऱ्यांत आम्हांस काय लभ्यांश होणार? देशांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याकरितां आपआपल्या प्रांतांतील कारखान्यांना उत्तेजनार्थ कांहीं विवक्षित मर्यादेपर्यंत देणगी देण्याचा अधिकार आपणांस असावा अशी मागणी संयुक्तप्रांताचे माजी ले. गव्हर्नर सर जॉन ह्यूएट ह्यांनीं केली होती. परंतु कमिशनच्या सभासदांना तेवढी मागणी सुद्धां मान्य करवली नाहीं, आणि असल्या कामीं हिंदुस्थान सरकारचा तुम्ही सल्ला घेतला पाहिजे, असा त्यांस जबाब मिळाला. असो; तात्पर्य काय कीं, प्रस्तुतचा प्रसिद्ध झालेला ठराव घ्या, अगर ह्यापुढें प्रांतिक सरकारच्या खर्चाच्या मर्यादेची व्याप्ति वाढविण्याचा जो ठराव पुढें येण्याचें अभिवचन मिळालें आहे तो ठराव धुंडाळून पहा, प्रजेच्या अधिकाराचें क्षेत्र वाढल्याचें त्यांत आढळणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

---

## करायला गेला एक, झालें भलतेंच २

[ होमरूल लीगची चळवळ देशभर जोरानें पसरत चाललेली पाहून बावरलेल्या नोकरशाहीचे स्वयंभू पुढारी, मद्रासचे गव्हर्नर, लॉर्ड पेंटलंड यांनीं बेझंटबाई आणि त्यांचे दोघे सहकारी यांना स्थानबद्ध करून वेगवेगळ्या ठिकाणीं नेऊन ठेवलें. पोटांतला हेतु हा कीं, अशा दबकावणीनें होमरूलची चळवळ दबून जाऊन मंदावेल. पण लॉर्ड पेंटलंड यांना अनुभव मात्र उलटा आला. बेझंटबाईच्या स्थानबद्धतेमुळें हिंदुस्थानांत सर्वत्र खळबळ उडाली. जे प्रतिष्ठित लोक पूर्वीं होमरूलच्या चळवळींत सामील झाले नव्हते ते अहमहमिकेनें होमरूल लीगचे सभासद होऊं लागले. पं. मदन मोहन, बाबू सुरेंद्रनाथ, ना. भुर्ग्री, बॅ. जिना इत्यादि अनेक हिंदु व मुसलमान पुढारी होमरूलच्या चळवळीला पाठिंबा देऊं लागले आणि लॉर्ड पेंटलंड यांचा निषेध करून त्यांना परत बोलवा अशी मागणी करणाऱ्या शेंकडों तारा विलायतेस रवाना झाल्या. बेझंटबाईच्या स्थानबद्धतेमुळें हा जो पेंटलंड यांच्या अपेक्षेच्या विरुद्ध परिणाम झाला त्या प्रतिक्रियेचें वर्णन यांत आहे. ]

( केसरी, दि. २६ जून १९१७ )

## दडपशाहीचीं पूर्वचिन्हें

नशीब बलवत्तर असलें म्हणजे कोणी अपकार करावयास लागला तरीहि तो उलट उपकार होतो. 'विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया' अशी जी एक जुनी म्हण आहे तिचा प्रत्यय गेल्या आठवड्यांत मिसेस बेझंटबाईंस व त्यांच्या दोन साथीदारांस मद्रास सरकारनें अन्यायाची अटक केल्यामुळें सर्व हिंदुस्थानभर जी खळबळ उडून गेली तीवरून चांगला नजरेस येतो. स्वराज्य किंवा होमरूल, मग तें राष्ट्रीय सभेनें आणि मुस्लिम लीगनें मंजूर केलेलें असो वा दुसरें कोणतेंहि असो, आमच्या येथील अधिकारीवर्गास कधींच प्रिय होण्याचा संभव नव्हता व नाहीं. कांहीं कांहीं अधिकारी यांस अपवाद म्हणून सांपडतील; पण सामान्यतः पाहिलें तर आपल्या हातांतील अनियंत्रित सत्ता गमावण्यास कोणीहि झाला तरी नाखूषच असणार, आणि गमावण्याची वेळ आल्यास ती टाळण्यास किंवा निदानपक्षीं आजचें मरण उद्यांवर ढकलण्यास तो कधींहि मागें घेणार नाहीं. किंबहुना हा मनुष्यस्वभावच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं, व अशा दृष्टीनें विचार करतां लॉर्ड पेंटलंड यांस त्यांनीं केलेल्या कृत्याबद्दल नांवें ठेवण्याचीहि जरूर नाहीं. लॉर्ड पेंटलंडच काय पण लॉर्ड चेल्म्सफर्ड आणि मि. चेंबरलेन हे वस्तुतः पाहतां हिंदुस्थानांतील अनियंत्रित सनदी अधिकारीवर्गाचे म्होरके होत, आणि या नात्यानें त्यांनीं एवढा वेळपर्यंत होमरूलचें बोलणें व चळवळ चालू दिली हेंच थोडें-बहुत आश्चर्य म्हणावयाचें! कसेंहि असो; स्वराज्यासंबंधानें येथील अधिकारीवर्ग आणि त्यांच्यातर्फे बोलणारे गव्हर्नर, गव्हर्नर-जनरल किंवा सेक्रेटरी ऑफ स्टेट हे यापुढें काय धोरण स्वीकारणार हें मिसेस बेझंटबाईंची जी संभावना झाली तीवरून आतां सर्व लोकांस कळून चुकलें आहे. स्वराज्य हें हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेचें अंतिम ध्येय आहे असें तोंडानें गोड गोड बोलून अपात्रतेच्या सबबीवर या स्वराज्याचा पहिला हप्तादेखील हिंदुस्थानांतील लोकांस द्यावयाचा नाहीं, असाच येथील अधिकारीवर्गाचा म्हणजे अर्थात् त्याबरोबरच गव्हर्नर-जनरल आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचा, संकल्प झालेला दिसतो. हा संकल्प लखनौच्या राष्ट्रीय सभेनंतर लवकरच जाहीर व्हावयाचा. पण मध्यें कर्टिसप्रकरण निघालें व महायुद्धासाठीं हिंदुस्थानांत कर्ज उभारून सैन्याचीहि भरती करावयाची होती, तथापि त्यांतल्या त्यांत मुंबई इलाख्यांत टिळकांवर फिर्याद होऊन मुंबई व मध्यप्रांत यांत येण्याची बेझंटबाईंस मनाई झाली; आणि टिळक व पाल यांनीं पंजाबांत येऊं नये म्हणून राज्यरक्षणकायद्याखालीं हुकूम सुटले. पुढे वारा कसा वाहणार याचीं हीं पूर्वचिन्हेंच होतीं म्हटलें तरी चालेल. पण विलायतेंत महायुद्धासंबंधानें बोलतांना प्रमुख मुत्सद्यांनीं वेळोवेळीं काढलेले उद्गार वाचून व आयर्लंडास स्वराज्य देण्यासंबंधानें तिकडे जी चळवळ चालू आहे ती पाहून, हिंदुस्थानांत स्वराज्याची चळवळ बेकायदेशीर मानली जाणार नाहीं, आणि निकृष्ट कां होईना पण स्वराज्याची

खरीखुरी पहिली पायरी युद्धानंतर विशेषशी कटकट न करतां सरकार आपण होऊनच आम्हांस देईल, अशी आमच्याकडे बऱ्याच लोकांना आशा वाटत होती.

ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें विलायतेस मेअखेर कॉंग्रेसचें डेप्युटेशन जावें असें ठरविलें असतां तें अद्यापहि गेलें नाहीं, यांतील मर्म हेंच होय. आणि ठरल्याप्रमाणें तें गेलें असतें तर कदाचित् स्वराज्याच्या चळवळीवर आलेला आजचा प्रसंगहि टळला असता; पण होणारी गोष्ट टळणार कशी ? परमेश्वराच्या मनांतूनच स्वराज्याच्या चळवळीचा जोर कसास लावून त्याची शक्ति राज्यकर्ते आणि प्रजा या दोघांच्याहि निदर्शनास आणून द्यावयाची होती. म्हणून स्वराज्याची चळवळ हाणून पाडण्याच्या येथील अधिकारीवर्गाच्या मनांत धुमसत असलेल्या इच्छेस मद्रासमध्यें एकाएकी तोंड फुटून तिनें मद्रासलाच काय तर सर्व हिंदुस्थानभर गोंधळ उडवून दिला आहे.

## चळवळीस जोर चढला

लॉर्ड पेंटलंड यांस अशी उमेद होती कीं, हिंदुस्थानांत पुनः मवाळजहालांत फूट पडून सरकारची बाजू समर्थन करणारे कांहीं तरी कायदेकौन्सिलचे त्यांच्या मतें समंजस सभासद त्यांस येऊन मिळतील. पण होमरूलचें दैव असें कांहीं विचित्र आहे कीं, त्यामुळें बेझंटबाईवर झडप घातल्यानें अधिकारीवर्गाला इष्ट तो परिणाम न होतां उलट होमरूलच्या चळवळींत किती जोर आहे हें त्यामुळें अधिकाधिकच व्यक्त होत चाललें आहे. दुसरीकडे दिलेल्या हकीकतीवरून वाचकांस कळून येईल कीं, गेल्या आठवड्यांत हजारों लोकांच्या तोंडून पेंटलंडच्या कृतीचा आणि समजुतीचा जोरानें तीव्र निषेध झाला, आणि आजपर्यंत स्वराज्यसंघांत उदासीनतेनें सामील न झालेले असे शेंकडों नामांकित गृहस्थ स्वराज्यसंघाचे भराभर सभासद झाले व होत आहेत. मवाळ आणि जहाल हा भेद नाहींसा झाला; अलाहाबादेंतील प्रमुख लोकांचा नवीन स्वराज्यसंघ स्थापन झाला; कलकत्त्यास सर्व बंगालप्रांतभर स्वराज्याची चळवळ करण्याचें ठरलें; लखनौ येथील मुसलमान लोकांच्या सभेनें पेंटलंडसाहेबांच्या कृत्याचा पूर्ण निषेध करून बेझंटबाईशीं आपली सहानुभूति व्यक्त केली; कायदेकौन्सिलचे सभासद, बॅरिस्टर, वकील वगैरे दरएक प्रांतांत अनेक गृहस्थ — जे इतक्या लवकर तरी स्वराज्यसंघास येऊन मिळाले नसते ते होमरूल लीगचे सभासद होऊं लागले; सरकार विरुद्ध झालें तरी हरकत नाहीं, आम्ही स्वराज्याच्या प्राप्तीकरितां पूर्ण निश्चयानें खटपट करणार, मागें घेणार नाहीं, असा आपला कृतसंकल्प शेंकडों हजारों लोकांनीं जाहीर केला; स्वदेशी व बहिष्कार यांच्या शपथेचा पुनरुच्चार होऊं लागला; सरकारच्या कृत्याबद्दल नाखुषी दाखविण्याकरितां कायदेकौन्सिलांतील लोकांनीं आपल्या जागा सोडाव्या अशा सूचना 'ट्रिब्यून'सारख्या प्रतिष्ठित

वर्तमानपत्रांत येऊं लागल्या; भारतसंरक्षक सैन्यांत भरती करण्यासाठीं जे लोक खटपट करणार होते त्यांनीं उघडपणें तीं बंद करण्याचें ठरविलें; पेंटलंडसाहेबांना घरीं परत बोलवा म्हणून विलायतेस तारा झाल्या; आणि मि. बमनजी या एकट्या गृहस्थानेंच स्वराज्याची चळवळ नेटानें चालविण्यास लाख रुपये देण्याचें अभिवचन दिलें. सर्व हिंदुस्थानभर सर्व पक्षांत, सर्व जातींत आणि सर्व प्रांतांत अशा प्रकारची चळवळ ज्या पेंटलंडसाहेबांच्या एका हुकुमानें व एका भाषणानें झाली, त्यांस हिंदुस्थानचे हितकर्ते म्हणावें कीं शत्रु म्हणावें याचा क्षणभर तरी संशय पडल्याखेरीज राहात नाहीं. लॉर्ड कर्झन यांनीं बंगालची फाळणी करून हिंदुस्थानांतील लोकमत जसें क्षुब्ध केलें, तशीच पण त्यापेक्षांहि विशेष महत्त्वाची गोष्ट लॉर्ड पेंटलंड यांच्या हातून घडून आली आहे. करावयाला गेला एक आणि झालें भलतेंच !

बेझंटबाईस दोन सामोपचाराच्या गोष्टी सांगून किंवा दुसऱ्या कांहीं अपरोक्ष रीतीनें घेरून स्वराज्याची चळवळ नरम पाडण्याचा जर लॉर्ड पेंटलंड यांनीं उद्योग केला असता, तर आज सर्व हिंदुस्थानभर स्वराज्याच्या चळवळीनें चोहोंकडे जशी उचल खाल्ली आहे व स्वराज्याच्या प्राप्तीप्रीत्यर्थ सर्व लोकांत एकजुटीनें उद्योग करण्याची जी उत्कंठा उत्पन्न झाली आहे ती झाली असती काय ? अलाहाबादचे मदन मोहन, कलकत्त्याचे सुरेंद्रनाथ, मुंबईचे जिना, सिंधचे ना. भुर्गी वगैरे जे सन्माननीय हिंदु व मुसलमान गृहस्थ " मी स्वराज्यवादी आहें, मी स्वराज्यवादी आहें, कांहीं होवो मी स्वराज्याकरितां उद्योग करणार " म्हणून अहमहमिकेनें आज पुढें आले आहेत व येत आहेत ते कशामुळें ? हिंदुस्थानांतील लोकांस स्वराज्याची प्राप्ति करून देण्यासाठीं हातांत कंकण घातलेल्या मनोभावेंकरून त्यासाठीं नित्य झटणाऱ्या बेझंटबाईचा छळ झाला म्हणून ना ? ज्या छळापासून अशा प्रकारचा परिणाम होतो तो छळ भोगणें फारच थोड्या लोकांच्या नशिबीं येत असतें; आणि राज्यकर्ते या नात्यानें बेझंटबाईचा अशा प्रकारचा छळ करून लॉर्ड पेंटलंड यांनीं बायबलांतील पायलटची कीर्ति संपादन केली आहे असें आम्हांस वाटतें. ख्रिस्ताची ज्या वेळेला रोमन गव्हर्नर पायलट याच्यापुढें चवकशी झाली त्या वेळीं ख्रिस्तानें मी सत्यासाठीं झटणार असें सांगितल्यावर " सत्य म्हणजे काय " असें पायलटच्या तोंडून उद्गार निघाल्याचें नव्या करारांत म्हटलें आहे. लॉर्ड पेंटलंड व बेझंटबाई यांच्यामधील संवाद अशाच प्रकारचा आहे. स्वराज्य म्हणजे काय, कॉंग्रेसनें त्या बाबतींत काय ठराव केला आहे वगैरे गोष्टी लॉर्डसाहेबांस बेझंटबाई, समजून देत असतां " हें मला नको, याची चर्चा मी करीत नाहीं. " अशा प्रकारचीं लॉर्ड पेंटलंड यांनीं उत्तरें दिलीं आहेत; आणि बाईची चळवळ साम्राज्याला विघातक ठरवून जो कायदा साम्राज्याशीं बेइमान होणाऱ्या लोकांकरितांच लागू करावयाचा त्याचा बेझंटबाईवर अंमल करून आपली नीति व शहाणपणा जगास

व्यक्त केला आहे. पायोनिअरसारख्या अँग्लो-इंडियन वर्तमानपत्रकर्त्यांनीं या कृत्याबद्दल लॉर्डसाहेबांचें अभिनंदन केलें असल्यास यांत कांहीं नवल नाहीं. गुळाचा गणपति आणि गुळाचाच नैवेद्य. पण त्यांतल्या त्यांतहि कित्येकांस लाज वाटून ते " जुलूम केलात हें ठीक झालें, पण कांहीं हक्क देण्याचें तरी जाहीर करा " असें म्हणूं लागले आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वेळ मोठ्या आणीबाणीची आहे. महायुद्धानंतर साम्राज्याची जी पुनर्घटना होणार त्यांत स्वराज्यवाद्यांचा जय होऊन व्युरॉक्रसीस म्हणजे अधिकारीवर्गाच्या सत्तेस उतरती कळा लागते, किंवा स्वराज्यवाद्यांचा पूर्ण नायनाट होऊन अधिकारी-वर्गाची अनियंत्रित सत्ता हिंदुस्थानांत पुनः शेंकडों वर्षें तोऱ्यानें नाचत राहते, हें ठरण्याची आतां वेळ आलेली आहे.

## धैर्यानें व जुटीनें चळवळ चालवा

लॉर्ड पेंटलंड यांच्या भेडसावण्याला भिऊन हिंदुस्थानांतील लोक जर या वेळीं गप्प बसतील तर घात झाला म्हणून समजा; आणि आमचा घात म्हणजे ब्युरॉक्रसीचा जय होय! युरोपांतील महायुद्धांत जर्मनीविरुद्ध एकवटलेलीं सर्व राष्ट्रें आपण सर्व देशांत स्वतंत्रता व स्वराज्य प्राप्त करून देण्याकरितां झटत आहोंत असें कंठरवानें जगास सांगत आहेत; मग हिंदुस्थाननेंच काय म्हणून मागें राहावें? लॉर्ड पेंटलंड कांहींहि म्हणोत; आज हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त होण्याची वेळ आली आहे हें निश्चित होय. पण स्वराज्याचें हें जांभूळ अचानक तुमच्या तोंडांत पडेल असें समजूं नका, किंबहुना हें जांभूळ तुमच्या तोंडांत दीर्घकालपर्यंत — कांहीं शतकेंपर्यंत — अर्थात्, बहुतेक केव्हांहि पडूं नये अशी येथील तुमच्यावर अनियंत्रित अधिकार चालविणाऱ्या वर्गाची इच्छा आहे; व त्यासाठीं तें काय करण्यास तयार आहेत याचा पूर्वी जरी कित्येकांस संशय असला तरी तो संशय दूर करण्याचें श्रेय मोठ्या धैर्यानें आणि धाडसानें लॉर्ड पेंटलंड यांनीं घेतलेलें आहे. लॉर्ड पेंटलंड यांच्या या अविचारी कृत्यानें स्वराज्य प्राप्त करून घेण्याबद्दलच्या आस्थेची, कळकळीची आणि निश्चयाची जी लाट आज हिंदुस्थानभर पसरलेली आहे तीच दृढतर व चिरस्थायी करून स्वराज्याचे हक्क मिळेपर्यंत ती तशीच कायम ठेवणें हें या वेळेचें आपलें कर्तव्य होय. आणि तें मोठ्या उत्साहानें, नेटानें आणि धैर्यानें कोणत्याहि प्रकारचा मतभेद न ठेवतां केवळ मातृभूमीच्या उद्धाराकडे लक्ष देऊन सर्वांनीं पार पाडावें अशी त्यास आमची प्रार्थना आहे. झालें हें कांहींच नाहीं. स्वराज्यसंघाचे सभासद हजारांनीं नव्हे लक्षांनीं मोजण्याइतके झाले पाहिजेत, आणि या लक्षावधि लोकांचा हाकाटा व ओरड सहा हजार मैलांवर पोंचून तिनें विलायतेस इतका कल्लोळ उडवून दिला पाहिजे कीं, त्यामुळें येथें अनियंत्रित सत्ता चालविणाऱ्या अधिकारी-वर्गास लाज वाटून हिंदुस्थानांतील प्रजेच्या न्याय्य मागणीस हर-

कत न करतां 'आलिया भोगासी असावें सादर' या न्यायानें उलट सदर अधिकारी-वर्गच अशा प्रकारच्या मागणीस अनुकूल होऊन त्याप्रमाणें स्वतः अंमल करण्यास तयार होईल. आम्ही सांगतों हें कांहीं मनोराज्य नव्हे, ही गोष्ट होणारी आहे व होईल, धैर्य धरून नेटानें व एकजुटीनें आम्हीं आपला उद्योग मात्र केला पाहिजे, आणि असा उद्योग झाला म्हणजे आम्हांस हाणून पाडण्याकरितां केलेले प्रयत्न आमच्या फायद्याचे कसे होतात याचें आज एक प्रत्यक्ष उदाहरण आमच्या डोळ्यापुढें आहे.

---

## कलकत्त्याच्या कॉंग्रेसची अपूर्वता ३

[ कलकत्ता शहरीं १९१७ च्या नाताळांत कॉंग्रेसची जी बैठक श्रीमती बेझंटबाईच्या अध्यक्षतेखालीं झाली त्या बैठकींतील अपूर्वतेचें वर्णन या लेखांत आलेलें आहे. १९१६ सालच्या लखनौच्या अधिवेशनांत 'कॉंग्रेस-लीग पॅक्ट' मंजूर करून घेण्याचा जो डाव लो. टिळकांनीं अति कुशलतेनें व मुत्सद्देगिरीनें साधला त्यामुळें स्वराज्याची मागणी एकजुटीनें करण्याचा मार्ग मोकळा होऊन. चळवळीला कल्पनातीत जोर चढला. ही होमरूल लीगची चळवळ दडपून टाकण्यासाठीं मद्रास सरकारनें बेझंटबाईंना स्थानबद्ध केलें. परंतु लोकमताच्या प्रभावापुढें सरकारला हार खावी लागली व बेझंटबाईच कॉंग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. या अपूर्व घटनेचें वर्णन या लेखांत आलेलें आहे. ]

### बदललेल्या मनूची साक्ष

मनुष्यप्राणी निसर्गतः काव्यलोलुप आहे आणि काव्याची तर सगळी मदार अतिशयोक्तीवर; यामुळें सहजगत्याच मनुष्याची अतिशयोक्तीकडे असलेली प्रवृत्ति हरहमेश घडणाऱ्या रोजच्या व्यवहारांत देखील दृष्टोत्पत्तीस येते. दरसाल हिंवाळा किंवा उन्हाळा येतो व जातो; पण प्रत्येक वर्षी यंदाइतकी कडक थंडी कधी पडली नव्हती, अथवा इतका असह्य उष्मा कधीं झाला नव्हता, हें सर्टिफिकीट त्याला आपलें दरसाल ठेवलेलेंच! तोच न्याय कॉंग्रेससारख्या समारंभांनाहि लागू होतो. सालोसाल कॉंग्रेसच्या बैठकींत कांहीं तरी नावीन्य कसेंबसें तरी शोधून काढावें आणि अशी कॉंग्रेस यापूर्वी कधीं झाली नव्हती असा शिक्का ठोकून द्यावा, कीं झालें त्यांच्या मनाचें समाधान! परंतु यंदाच्या बत्तिसाव्या कॉंग्रेसचें जो कोणी वर्णन

---

( केसरी, दि. १ जानेवारी १९१८ )

करूं जाईल त्याची स्थिति नेहमीच्या अगदीं उलट होईल. त्यास या काँग्रेसची अपूर्वता शोधून काढण्याला तर परिश्रम करावे लागणार नाहींतच; पण उलटपक्षीं घडलेल्या सर्व अपूर्व चमत्कारांचें मी कोठवर वर्णन करूं असें म्हणूनच तो भांबावून जाईल. वर्णन चटकदार करण्याला त्याला तिखटमीठ लावून स्वकपोलकल्पित गोष्टी घुसडून द्याव्या लागणार नाहींत; तर आपल्या डोक्यांतील गोंधळ कमी करण्याकरितां प्रत्यक्ष घडलेल्या कांहीं गोष्टी त्यास स्मृतिपटलावरून घालवून द्याव्या लागतील ! सारांश, हिंदुस्थानच्या पूर्व भागांतील पूर्वराजधानींत भरलेली ही काँग्रेस अत्यंत अपूर्व झाली यांत तिळमात्र शंका नाहीं !

या काँग्रेसच्या अपूर्वतेचें वर्णन तरी कोठवर करावें ? आज बत्तीस वर्षांत अध्यक्षपदाचा मान कधीं तरी स्त्री जातीच्या वांट्यास आला होता काय ? राष्ट्रीय सभेनें सभापतित्वाची माळ पुरुषवर्गांतील व्यक्तींच्या गळ्यांत घालणें हें नैसर्गिक आहे. परंतु स्त्री-वर्गांतील व्यक्ति सभापति होणें हा अपूर्व चमत्कार नव्हे तर काय ! बरें, बेझंटबाईंची अध्यक्षपदावर योजना होण्याची कल्पना केव्हां उद्भवली व कशानें बळावली याचा विचार केला तर तिकडूनहि अचंबाच वाटतो. अधिकाऱ्यांच्या डोळ्याकडे नजर देऊन तदनुसार आपलें वर्तन ठेवण्याचीच जेथें आजपर्यंतची बहुजनसमाजाची वहिवाट तेथें सत्ताधीशांच्या रोषास पात्र झालेल्या व्यक्तीस धिटाईनें बहुमानाच्या अत्युच्च पदावर आरूढविणें ही गोष्ट बदललेल्या मनूचीच साक्ष देत नाहीं काय ? वीस वर्षांपूर्वी सरदार नातूबंधूंना निष्कारण बंदिवास घडला असतां त्याचा निषेध करण्याचा ठराव काँग्रेसपुढें येण्यास केवढी मारामार पडली ! दहा वर्षांपूर्वी बेझंटबाईप्रमाणेंच विनाकारण अटक झालेल्या लाला लजपतरायांस अध्यक्षस्थान देण्याची नुसती कल्पना पुढें येतांच कित्येकांच्या अंगास कसा दरदरून घाम सुटला ! या गोष्टींची स्मृति नष्ट झाली नसतां या वर्षी बेझंटबाईंच्या निवडणुकींविषयीं राष्ट्रांत इतकें ऐकमत्य व औत्सुक्य दिसून आलें, यावरून हिंदुस्थानांत राष्ट्रीय जागृति करणारी अपूर्व ज्योत पेटली आहे असेंच अनुमान काढावें लागतें. बेझंटबाईंची अध्यक्षस्थानीं झालेली निवडणूक आणखी एका दृष्टीनेंहि मन्वंतरदर्शक असल्याचें दिसून येतें. दोन वर्षांपूर्वी मुंबईस काँग्रेसच्या बैठकीच्या वेळीं बेझंटबाईनें 'होमरूल लीग' स्थापण्याचा आपला विचार राष्ट्रसभाभक्तांस कितपत रुचतो हें उगीच खडा टाकून पाहिलें; पण तेवढ्या एका खड्यानें राष्ट्रसभेच्या भक्तांच्या चित्तवृत्तींत एवढा गोंधळ उडवून दिला कीं, होमरूल लीग ही काँग्रेसची निस्सीम साह्यकर्ती असतां काँग्रेसद्वेष्ट्यांनीं काँग्रेसचा घात करण्याकरितां ही दुसरी सवत निर्माण केली असे प्रलाप कित्येकांच्या तोंडून निघूं लागले. परंतु ५२ दुगणी १०४ आठवडे गेले नाहींत तोंच 'सवत' मानल्या गेलेल्या होमरूल लीगच्या प्रवर्तक बेझंटबाई एकमतानें काँग्रेसच्या अध्यक्षपदारूढ झाल्या आणि त्यांच्या निवडणुकीस प्रारंभीं विरोध करणाऱ्या सुरेंद्रबाबूंनीं त्यांस

अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करतांना 'होमरूल लीग'ची स्थापना ही एक बेझंटबाईंची अलौकिक कामगिरी होय असें म्हणून होमरूल लीगचाहि गौरव केला! हा सगळाच अपूर्व चमत्कार नव्हे काय?

### सत्याग्रहरूपी सत्यनारायण पावला

बेझंटबाईंची अध्यक्षपदावर योजना करण्याच्या कल्पनेची परिस्फुटता होतांच कित्येकांनीं अशी शंका प्रदर्शित केली होती कीं, या योजनेमुळें बाईंच्या अज्ञातवासाची मुदत कमी होण्याऐवजीं ती उलट लांबेल; कारण हिंदी लोकमताला आपण किती तुच्छ लेखितों हें दाखविण्याकरितांच ब्युरॉक्रसीकडून मुद्दाम त्यांच्या अटकबंदीची मुदत वाढविण्यांत येईल! आणि ब्युरॉक्रसीच्या हट्टी स्वभावाचा व इज्जतीच्या कल्पनेचा आजपर्यंतचा अनुभव पाहतां ही शंका कांहीं अगदींच निराधार नव्हती. परंतु २५ कोटि हिंदी लोकांच्या प्रबल व तीव्र आत्मिक शक्तीनें ब्युरॉक्रसीच्या हट्टाचा अभेद्य व्यूहहि ढासळला. अकल्पित योगायोग घडून त्याच वेळीं मेसापोटोमिया-प्रकरण चव्हाट्यावर आलें, चेंबरलेनसाहेब अधिकारसंन्यास करून घरीं बसले, त्यांच्या जागीं तरतरीत बुद्धीचे, नव्या दमाचे आणि ब्युरॉक्रसीच्या आहारीं न गेलेले असे मॉंटेग्यूसाहेब अधिष्ठित झाले आणि त्यांच्या तोंडूनच स्वराज्यदानाचा संकल्पहि जाहीर झाला. अशा रीतीनें हिंदी जनतेची उत्कट भक्ति पाहून सत्याग्रहरूपी सत्यनारायण पावला. त्या योगानें इकडे ब्युरॉक्रसीचें धाबें दणाणलें आणि बेझंटबाईंची अचानक मुक्तता झाली! त्यानंतर बंगाल प्रांतांतील पुढाऱ्यांतच दुही माजून यंदाची कॉंग्रेस कलकत्त्यास भरते तरी कीं नाहीं, असा एक प्रश्न पुढें येऊन पडला आणि कित्येक अधीर प्रकृतीच्या लोकांनीं तेवढ्यांत पराचा कावळा करून कॉंग्रेसचें स्थानांतर करण्याचा आणि आपल्या मताचा नवा अध्यक्ष निवडण्याचा घाट घातला! परंतु राष्ट्राच्या खऱ्या एकनिष्ठ भावनेपुढें असलीं क्षुल्लक विघ्नें कसलीं टिकणार? जेथें अधिकारारूढ ब्रिटिश ब्युरॉक्रसीचा हट्ट देखील चालला नाहीं तेथें मुंबईच्या हतबल झालेल्या ब्युरॉक्रसीचें काय चालणार! एवंच मध्यंतरींच्या सर्व संकटांचा परिहार होऊन 'यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी' या सिद्धान्ताचा सर्वांस प्रत्यय आला.

अशा प्रकारें बेझंटबाईंची अध्यक्षपदावर स्थापना होणें ही यंदाच्या कॉंग्रेसच्या अपूर्वतेची नुसती प्रस्तावना होय. अर्थातच यापुढें जी जी गोष्ट घडून आली ती ती या प्रस्तावनेस साजेल अशीच अपूर्व थाटाची होती. ता. २४ पासून एकेक प्रांताचे प्रमुख पुढारी स्वपरिवारासह कलकत्त्यास येऊन दाखल होऊं लागले, आणि स्वागतमंडळानें सर्वांचा यथोचित सत्कार केला. बेझंटबाईंची बारा घोड्यांच्या रथांतून निघालेली मिरवणूक अभूतपूर्व होती. मुंबईची स्पेशल गाडी निवडक प्रतिनिधींना घेऊन आली व त्यांचें स्वागतहि तसेंच स्पेशल झालें, हें सांगावयास

नकोच. कॉंग्रेसकरितां मुद्दाम उभारलेला दहा हजार प्रेक्षकांचा सहज समावेश होईल एवढा भव्य दीर्घ गोलाकार मंडप प्रतिनिधींनीं व प्रेक्षकांनीं फुलून गेला होता. उच्चासनावर प्रत्येक प्रांतांतील प्रतिष्ठित पुढारी झळकत होते. बंगाली युवयुवतींच्या 'वंदे मातरम्' च्या कर्णमधुर आलापांनीं प्रेक्षकांच्या चित्तवृत्ति तल्लीन करून सोडल्या होत्या. अशा वेळीं महर्षितुल्य रवींद्रनाथांची भव्य मूर्ति पुढें आली आणि तिनें गंभीर वाणीनें राष्ट्रकार्यास स्फूर्तिदायक अशी स्वकृत प्रार्थना म्हणून दाखविली.

## हिंदमातेच्या आकांक्षांचें प्रतिबिंब

अशा रीतीनें सर्व प्रास्ताविक विधि कल्पनातीत थाटानें पार पाडल्यानंतर बेझंटबाईंची भव्य मूर्ति उभी राहून तिनें इतक्या उतारवयांतहि कायम राहिलेल्या आपल्या खणखणीत आवाजानें आपलें भाषण वाचून दाखविलें. हें भाषण म्हणजे हिंदमातेच्या सर्व आकांक्षांचें प्रतिबिंबच होय. प्रस्तुत प्रसंगीं हिंदराष्ट्राचें सर्व लक्ष स्वराज्याच्या प्रश्नानें आकर्षित केलें असल्यामुळें अध्यक्षांच्या भाषणांतहि त्यासच प्राधान्य देण्यांत आलें होतें, हें वेगळें सांगावयास नकोच; परंतु त्यांच्या भाषणांतील विशेष हा कीं, त्यांत मिळमिळीतपणा, लेचेपेचेपणा किंवा धरसोडपणा मुळींच नसून सर्व कांहीं जाबजबाब रोखठोक होता. पाश्चात्यांच्या एककल्ली सुधारणेचा कसा घोर परिणाम घडून येत आहे, त्यांतून जगाची सुटका करण्याचें सामर्थ्य आर्य-संस्कृतींत कसें सांठविलेलें आहे, सर्व जगांत धर्माचें व शांततेचें साम्राज्य पसरण्याचें आर्यराष्ट्राचें उद्दिष्ट सिद्धीस जाण्याला हें राष्ट्र स्वयंशासित होणें कितां अगत्याचें आहे, आम्ही जें स्वराज्य मागतों तें केवळ स्वार्थाकरितां, सुखाकरितां, नसून त्यांत जगाचें कल्याण कसें साधणार आहे, ब्रिटिश साम्राज्याच्या बळकटीला व चिरस्थायित्वाला या देशास स्वराज्य देऊन समर्थ करणें किती आवश्यक आहे, इत्यादि प्रश्नांची सांगोपांग चर्चा करून बेझंटबाईंनीं आपल्या भाषणांत स्वराज्यमंदिराची रूपरेषाहि रेखाटली आहे. त्यांच्या या भाषणांत आक्षेपकांच्या सर्व आक्षेपांचें निरसन आहे, शंकितांच्या शंकांचें निराकरण आहे, विधायक टीका करा असें म्हणणाऱ्यांचेंहि समाधान होण्याजोगा विधायक भाग आहे आणि राष्ट्राची मागणी मोघम शब्दांत व गुळमुळीत भाषेंत न सांगतां लखनौच्या कॉंग्रेसनें मंजूर केलेली योजना आतांच अमलांत आणा आणि दहा वर्षांत स्वराज्याचे सर्व अधिकार स्वाधीन करण्याची तयारी करा व तशा स्वरूपाचें बिल १९१८ सालीं पार्लमेंटांत पास करून द्या, अशा स्पष्ट शब्दांत ती मागणी नमूद करण्यांत आली आहे. सारांश, हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांतील लोकांस गौरवपर उत्तेजन देणारें, ब्रिटिश मुत्सद्दयांस स्वराज्य न दिल्यास ओढवणाऱ्या भावी साम्राज्यसंकटाची इषारत देणारें, आक्षेपकांच्या आक्षेपांस अवकाश राहूं न देणारें

आणि निराशावादी लोकांच्या अंतःकरणांतहि आशेचा उदय पावविणारें असें सर्वांगसुंदर भाषण अध्यक्षांच्या तोंडून ऐकण्याची अशी संधि अपूर्वच होय.

परंतु या कॉंग्रेसच्या अपूर्वतेची येथें परिसमाप्ति झाली नसून हा तर नुसता प्रारंभ होता. कारण अध्यक्षांच्या भाषणांत जसें यंदाच्या बैठकीचें वैशिष्टय दृग्गोचर झालें, तसेंच तें पुढील सर्व कार्यक्रमांतहि दिसून आलें. यंदाच्या कॉंग्रेसनें भाराभर ठराव घेऊन वक्त्यांची धांवपळ केली नाहीं. चालू सालीं स्वराज्याचा एकच ठराव कॉंग्रेसनें घ्यावा अशी कित्येकांची सूचना होती; परतु अनेक महत्त्वाच्या नव्या नव्या प्रश्नांवर लोकमत प्रकट करणें जरूर असल्यामुळें ती सूचना-ग्राह्य होणें शक्य नव्हतें. अर्थातच जनतेच्या अंतःकरणास हलवून सोडणारे असे निवडक प्रश्न तेवढेच चर्चेकरितां घेण्याचा मध्यम मार्ग स्वीकारण्यांत आला. ठरावांची संख्या मर्यादित केल्याच्या योगानें वक्त्यांनाहि आपलें म्हणणें मुद्देसूद रीतीनें मांडतां आलें. अलीबंधूंच्या सुटकेविषयींच्या ठरावास अग्रस्थान देण्यांत येऊन त्यावर भाषण करण्याचा अग्रमान लो. टिळकांना देण्यांत आला होता. क्रॉनिकलचे संपादक मि. हॉर्निमन यांनीं प्रेस ॲक्टाच्या झोटिंगपाच्छाईवर झोड उठवून दिली. बंगाली पुढारी जे चौधरी व इतर वक्ते यांनीं बंगाली तरुणांच्या अटकबंदींतील दुःखांचें केलेलें वर्णन ऐकून पाषाणहृदयी माणसाच्या अंतःकरणासहि पाझर फुटला असता. चौकशीचें ढोंग करून जी नवी कमिटी स्थापण्यांत आली आहे तिचा उद्देश निरपराधी बंदिवानांची सुटका करण्याचा नसून हल्लींच्यापेक्षां आणखी भयंकर कडक कायदे करण्याचा तिचा हेतु उघड उघड दिसत असल्यामुळें त्या कमिटीचा कॉंग्रेसनें धिक्कारपूर्वक निषेध केला.

### सर्वसंमत स्वराज्याची मागणी

वर निर्दिष्ट केलेले ठराव कितीहि महत्त्वाचे असले तरी राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेच्या व राष्ट्राच्या भावी कल्याणाच्या दृष्टीनें सर्व समाजाचें लक्ष स्वराज्याच्या ठरावाकडे गुंतून राहिलें होतें. स्वराज्याचा ठराव यंदाच्या कॉंग्रेसपुढें कोणत्या स्वरूपांत येईल याविषयीं सारखी चर्चा सुरू असून सर्वांचीं अंतःकरणें औत्सुक्यपूर्ण झालीं होतीं. ता. २० ऑगस्टच्या 'जबाबदार राज्यपद्धती 'च्या जाहीरनाम्यानंतर लखनौच्या कॉंग्रेसचा ठराव अपुरा असल्यामुळें या नव्या बादशाही वचनास अनुसरून कांहीं तरी जबाबदारीचा वांटा मागण्यांत यावा, कारण नुसती कायदेकौन्सिलची वाढ व बजेटावर ताबा एवढे हक्क म्हणजे कांहीं जबाबदार राज्यपद्धति नव्हे, असें एका पक्षाचें म्हणणें होतें; आणि त्यांत अपूर्व चमत्कार हा कीं, लखनौच्या कॉंग्रेच्या वेळीं हिंदी लोकांना आफ्रिकन नीग्रोंच्या पंक्तीस बसवून त्यांच्यावर ब्रिटिश वसाहतींनीं आपला अधिकार गाजवावा असें मत प्रतिपादन करणाऱ्या कर्टिससाहेबांच्या लेखामुळेंच खरी जबाबदार राज्यपद्धति निदान प्रांतिक

नगर वाचनालय सातारा नगर वाचनालय, सातारा.
संग्रहार्थ भेट


स्वराज्यापुरती तरी मागण्याची कल्पना विशेष जोरानें पुढें आली ! या नव्या जादा मागणीविषयीं बंगाल प्रांताची आतुरता विशेष दृग्गोचर झाली. इतर प्रांतांहि या मागणीला प्रतिकूल होते असें नाहीं. परंतु मागील कॉंग्रेसच्या ठरावांच्या धोरणावरच आतांपर्यंत सर्व चळवळ झाली असून राष्ट्रांतून त्या योजनेला संमतिदर्शक असे लक्षावधि सह्यांचे अर्ज रवाना झाले आहेत. दिल्ली, कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादि ठिकाणीं शिष्टमंडळांनीं भारतमंत्र्यांची मुलाखत घेऊन राष्ट्राची मागणी म्हणून हाच ठराव त्यांच्यापुढें मांडला आहे; असें असतां तो ठराव इतक्यांतच बदलला असतां मागील सर्व चळवळींचा पाया ढासळून जाऊन 'नवी विटी नवें राज्य' असा प्रकार होईल, आणि स्वराज्यास विरोध करणाऱ्या प्रतिपक्षास आयतेंच चांगलें फावेल; आणि 'तेल गेलें तूप गेलें हातीं धुपाटणें आलें' अशी हास्यास्पद स्थिति होईल. शिवाय आपल्यांतील कांहीं अल्पसंख्याक लोकांना व विशेषतः मुस्लिम लीगला हा नवा ठराव अमान्य असल्यानें आपल्यांत फूट पडेल व ती इष्ट नाहीं इत्यादि दीर्घदर्शी विचारानें गेल्या सालचीच मागणी फिरून स्पष्ट शब्दांत करण्यांत आली. तथापि गेल्या सालच्या ठरावांत स्पष्ट शब्दांनीं कालनिर्दिष्ट करण्यांत न आल्यानें जें वैगुण्य राहिलें होतें व त्यामुळें कित्येकांस स्वतः-च्या कोत्या कल्पनेप्रमाणें वाटेल तसें भाष्य करण्यास संधि सांपडत होती, ती उणीव काढून टाकण्याची यंदा खबरदारी घेण्यांत येऊन कॉंग्रेसची ही मागणी अगदीं कमींत कमी असून इतके अधिकार आतांच द्या आणि १९१८ सालांत त्यासंबंधीं बिल पास करून त्यांत संपूर्ण स्वराज्य कधीं देणार तो काल, विशेष दूर नाहीं असा, नमूद करा, असा ठराव करण्यांत आला. या दुरुस्त ठरावानें अर्थातच सर्वांचें सारखें समाधान होऊन सात-आठ उपसूचना आलेल्या आपखुषीनें परत घेण्यांत आल्या. या स्वराज्याच्या ठरावास एका नामशूद्रप्रतिनिधीनें आपल्या जातीतर्फे संमति दिली हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

## डेप्युटेशन पाठविण्यास दिरंगाई करूं नका

या ठरावाच्याच अनुषंगानें प्राप्त होणारा आणि कार्यसिद्धीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा ठराव विलायतेस पाठविण्याच्या डेप्यूटेशनचा होय. आम्हीं मागील अंकांत अशी सूचना केली होती कीं, विलायतेस डेप्युटेशन पाठविणें व कॉंग्रेसच्या ठरावांची बजावणी करण्याकरितां एखादें सुटसुटीत कार्यकारी मंडळ स्थापणें हें यंदाच्या कॉंग्रेसचें मुख्य कर्तव्य आहे. यांतील पहिला भाग कॉंग्रेसनें स्वीकारला आणि विलायतेस डेप्युटेशन पाठविण्याचें निश्चित केलें. परंतु त्या कामाकरितां छोटेसें कार्यकारी मंडळ न नेमतां डेप्युटेशन पाठविण्याची कामगिरी ऑ. इं. कॉं. कमिटीवरच सोंपविली. डेप्युटेशनमध्यें कोणी, केव्हां व किती जणांनीं जावें, याचाहि नामनिर्देश केला नाहीं, या दोषामुळें हा ठराव पंगु झाला आहे. तथापि त्याची बजावणी

करण्यांत ऑल इं. काँ. कमिटी यंदाच्या सालीं आळस करणार नाहीं अशी आम्हांस उमेद आहे. काँग्रेसनें स्वतः पाठविण्याच्या डेप्युटेशनच्या या ठरावाशिवाय आणखी एक महत्त्वाचें कार्य काँग्रेसनें केलें. परंतु तें 'सहज पडे दंडवत घडे' अशांतलें असल्यामुळें त्याचें श्रेय काँग्रेसला फारसें देतां येत नाहीं. बॅ. बाप्टिस्टा हे हल्लीं विलायतेंत असून त्यांनीं मजूरपक्षाची सहानुभूति संपादन केली आहे व ते त्यांच्या परिषदेस हजर राहणार आहेत. त्या वेळीं हिंदी स्वराज्याचा प्रश्नहि चर्चेकरितां निघेल असें आश्वासन मजूरपक्षाकडून बाप्टिस्टास मिळालें आहे. तथापि त्या सभेंत बोलतांना बॅ. बाप्टिस्टा हे हिंदी स्वराज्यसंघाचे प्रतिनिधि आहेत एवढेंच सांगण्यापेक्षां ते राष्ट्रीय सभेचे, अर्थात् अखिल हिंदराष्ट्राचे, प्रतिनिधि आहेत असें सांगतां आल्यास त्याचा मजूरपक्षावर अधिक परिणाम होईल हें सागणें नलगे. याकरितां बॅ. बाप्टिस्टांस सर्व राष्ट्राच्या तर्फे प्रतिनिधि निवडण्यांत यावें अशी सूचना पुढें येऊन ती सर्वसंमत झाली. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचे कैवारी मि. पोलक यांनाहि मजूरपक्षाच्या परिषदेस प्रतिनिधि म्हणून पाठविण्याचें ठरलें. मि. पोलक व बॅ. बाप्टिस्टा हे इतर निमित्तानें तिकडे आयते गेलेलेच आहेत; त्यांतच हाहि कार्यभाग साधून घ्यावा, अशा दूरदर्शी विचारानें वाहत्या गंगेंत हात धुण्याचा हा पोक्त ठराव काँग्रेसनें मंजूर केला! पण तें कसेंहि असो. मजूरपक्षाची जी सहानुभूति मिळत आहे तिचें या ठरावानें दृढीकरण होईल आणि बॅ. बाप्टिस्टांस यापुढें विलायतेंत कोणत्याहि सभेंत हिंदुराष्ट्राचा प्रतिनिधि म्हणून सर्व राष्ट्राच्या वतीनें वकिली करतां येईल. परंतु एवढ्यावरच संतुष्ट न राहतां ऑ. इं. काँ. कमिटीनें यंदा तरी मि. माँटेग्यु यांच्या पाठोपाठ डेप्युटेशन पाठविण्यास बिलकूल आळस किंवा दिरंगाई करूं नये, असें आमचें आग्रहाचें सांगणें आहे.

## अस्पृष्ट-वर्गाची सुधारणा

स्वराज्याच्या ठरावाची दुरुस्ती आणि त्यास जोडलेली डेप्युटेशनची पुस्ती यांच्या योगानें काँग्रेसच्या अपूर्वतेंत मोठीच भर पडली. याशिवाय यंदाच्या काँग्रेसचा दुसरा अेक विशेष म्हटला तर मद्रासच्या ब्राह्मणेतरांकडून व विशेषतः पंचम लोकांकडून आलेला संमतिदर्शक संदेश होय. काँग्रेसची चळवळ मूठभर ब्राह्मणांची किंवा फार तर सुशिक्षित वर्गाची आहे असें म्हणणारांस स्वराज्याच्या अर्जावरील द्वादश लक्ष सह्यांनीं परभारें उत्तर दिलेंच आहे. तथापि काँग्रेसच्या वेळीं मद्रास इलाख्यांतून केवळ कनिष्ठ वर्गाच्या ७०० राष्ट्रभक्तांनीं संदेश रवाना करण्यानें राष्ट्रीय चळवळीचीं पाळेंमुळें शेवटल्या थरापर्यंत जाऊन पोंचलीं असें उघड सिद्ध झालें, आणि मद्रासचे मि. नटेसन् यांनीं कनिष्ठ वर्गाचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचा ठराव काँग्रेसपुढें मांडून सुशिक्षित वर्गाची अशिक्षितांविषयींची कळकळ व्यक्त केली. काँग्रेसच्या ठरावांच्या यादींत निकृष्ट वर्गाची स्थिति सुधारण्यासंबंधाचा ठराव अपूर्वच होय.

## परराष्ट्रीय मुत्सद्द्यांच्या मनावर परिणाम

अशा रीतीनें कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या बैठकीचें काम अत्यंत उत्साहानें व अपूर्व थाटानें फार पडलें असून त्याचा ध्वनि सर्व देशभर दुमदुमून राहिला आहे. या सभेच्या अद्‌भुत प्रसंगीं भारतमंत्र्याची स्वारी कॉंग्रेसला हजर राहिली असता तर शेंकडों डेप्युटेशनांनीं त्यांच्या मनावर जितका परिणाम घडला असेल त्याच्या अधिक व चिरस्थायी घडला असता. परंतु तसें घडून येणें ब्युरॉक्रसीला इष्ट नसल्यानें कॉंग्रेसचा ध्वनि देखील त्यांच्या कानावर जाऊं नये म्हणून त्यास कलकत्त्यापासून शक्य तितकें दूर ठेवण्यांत आलें. परंतु कॉंग्रेसपुढें चाललेल्या कार्यभागांत सर्व हिंदी राष्ट्राचें आत्मिक बल एकवटलें असल्यानें तेथें प्रकट झालेले विचार शब्दध्वनिबरोबरच नष्ट न होतां त्यास प्राप्त झालेल्या प्रचंड अतींद्रिय शक्तीनें सातासमुद्रापलीकडच्या अंतःकरणावर देखील आपली छाप पाडूं शकतील. मग मुंबईस असलेल्या मॉंटेग्युसाहेबांच्या मनावर त्यांचा पगडा बसेल यांत नवल तें काय ! दरसाल होणाऱ्या कॉंग्रेसची हकीकत रायटरनें विलायतेस पाठविलेल्या दहावीस वाक्यांच्या संक्षिप्त रूपानें स्टेट सेक्रटरीस कळत असते. परंतु यंदाच्या बैठकीची सविस्तर ताजी हकीकत त्यास वाचावयास मिळाली असेलच आणि तेवढ्यावरून देखील त्यास हिंदी राष्ट्राचें खरें हृद्गत कळून आलें असेल. याशिवाय कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर बेझंटबाईसारख्या त्रिखंडविख्यात व्यक्तीची स्थापना झालेली असल्यानें या कॉंग्रेसची हकीकत युरोपांतील व अमेरिकेंतीलहि पत्रांतून दरसालपेक्षां बरीच विस्तारानें येईल; आणि बेल्जमसारख्या चिमुकल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां लढणाऱ्या ब्रिटिश राष्ट्राच्या पायाखालीं काय जळतें आहे, याचें दोस्त राष्ट्रांस यथार्थ ज्ञान होऊन त्यांच्याकडून इंग्लंडला असा जबाब विचारला जाईल कीं, तुम्ही प्रशियन ब्युरॉक्रसीच्या विरुद्ध एवढें आकांडतांडव करीत आहां, पण हिंदुस्थानांत अनियंत्रित सत्ताधारी बेजबाबदार ब्युरॉक्रसी तुम्ही चालू ठेवतां हें कसें ? सारांश, या सालच्या कॉंग्रेसचा युरोपिअन व अमेरिकन मुत्सद्द्यांच्या मनावर बराच परिणाम घडेल आणि त्याचा अप्रत्यक्ष फायदा आपणांस मिळेल यांत संशय नाहीं.

बेझंटबाईंस अध्यक्षस्थान दिल्यानें पुढील कॉंग्रेसपर्यंत सर्व राष्ट्राचें धुरीणत्व त्यांजकडे साहजिकच आलें आहे, आणि त्यांच्या निरलस व अश्रांत श्रम करण्याच्या पद्धतीनें त्या आतां बारा महिने सतत चळवळ चालू ठेवून राष्ट्रीय सभेनें केलेल्या ठरावांची बजावणी करण्याचा विश्वप्रयत्न केल्याखेरीज राहणार नाहींत. आपल्या खात्रीचे व पसंतीचे मि. रामस्वामी अय्यर आणि पी. केशवस्वामी पिले यांची कॉंग्रेसच्या चिटणिसांच्या जागीं नेमणूक करवून घेऊन त्यांनीं पुढील कार्यास इतक्यांतच प्रारंभ देखील केला असें म्हणावयास हरकत नाहीं; आणि या वर्षांत तरी ऑ. इं. कॉं. कमिटीला या बाई कांहीं झोंपी जाऊं देणार नाहींत हें निस्संशय

खरें आहे. अर्थातच विलायतेस डेप्युटेशन पाठविणें, सरकारी स्वराज्याची योजना जाहीर झाल्यास जादा कॉंग्रेस भरविणें वगैरे अनेक महत्त्वाचीं कामें वेळच्या वेळीं उत्सुकतेनें होऊन राष्ट्रकार्याचा गाडा पुढील बारा महिन्यांत बराच मार्ग आक्रमील अशी खात्री वाटूं लागली, हाहि एक यंदाच्या कॉंग्रेसचा विशेष होय.

### अपूर्व जळफळ व खळबळ

यंदाच्या कॉंग्रेसच्या प्रातिनिधींची संख्या पांच हजारांपर्यंत गेली हा प्रकार नुसता अपूर्वच नव्हे तर कल्पनातीत होता. त्यांत स्त्रियांची संख्याच ४०० वर होती हेंहि राष्ट्रजागृतीचें अपूर्व सुचिन्हच होय. प्रतिनिधींतः नामशूद्रांचाहि समावेश झाला होता हेंहि लक्षांत ठेवण्याजोगें आहे. अशा रीतीनें ५ हजार प्रतिनिधि व ५ हजार प्रेक्षक एवढा मोठा श्रोतृसमुदाय, वक्त्यांचीं भाषणें आतुरतेनें व बाह्यतः शांतपणें ऐकून घेत होता. तथापि श्रोतृसमुदायाची चित्तवृत्ति पूर्वी कधींहि क्षुब्ध झाली नसेल इतकी आंतून क्षुब्ध झालेली होती. हजारों तरुणांच्या अटकबंदीनें सगळे वंगबांधव आंतून जळफळत होते. अलीबंधू व इतर प्रमुख पुढारी अटकेंतून न सुटल्यामुळें महंमदी समाज खवळून गेलेला होता. त्यांतून महंमदअलींची माता आबादी बानू प्रत्यक्ष सभागृहांत हजर असून त्यांच्या समक्ष जेव्हां लो. टिळकांनीं अशाच शेंकडों वीरमाता या देशांत निपजोत अशी प्रार्थना केली, त्या वेळीं तर श्रोत्यांचीं अंतःकरणें वीर व करुण या रसांच्या अद्‌भुत मिश्रणानें खळबळून गेलीं. त्या वेळचा अवर्णनीय अद्‌भुत देखावा यापूर्वी कॉंग्रेसच्या मंडपांत कधींच कोणीं अवलोकन केला नसेल. सारांश, कोणत्याहि बाजूनें विचार केला तरी कलकत्त्याची बत्तिसावी कॉंग्रेस ही केवळ औपचारिक रीत्या नव्हे, किंवा अतिशयोक्तीनें नव्हे तर खरोखरच शब्दशः शेंकडों प्रकारांनीं अपूर्व झाली असेंच कोणीहि मत देईल.

---

# घरीं कामधेनू पुढें ताक मागें !

[ पहिल्या जर्मन महायुद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं ब्रिटिश सेनापतींना सैनिकांचा तुडवडा भासूं लागला, त्या वेळीं ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं छोट्या वसाहतींकडे रिक्रूटांची मागणी केली. परंतु हिंदी जनतेला राजकीय हक्क देऊन व तिच्यांत आत्मीयता उत्पन्न करून हिंदुस्थानांत लष्करभरती होण्याला प्रोत्साहन दिलें नाहीं, या गैरविश्वासाच्या धोरणाला अनुलक्षून हा लेख

( केसरी, दि. ९ एप्रिल १९१८ )

लिहिला असून, हिंदी जनतेला जर स्वातंत्र्याची प्राप्ति होण्याची शक्यता दिसली आणि आत्मीयता उत्पन्न झाली तर एकटा हिंदुस्थानच लागेल तितकी लष्करभरती करूं शकेल, पण ब्रिटिश मुत्सद्द्यांना अद्यापि ही सद्बुद्धि सुचत नाहीं, हें दुर्लक्षण होय, अशी टीका या लेखांत आहे. ]

बोअरयुद्धाच्या वेळीं इंग्लिशांचा असा बाणा होता कीं, गोऱ्या राष्ट्रांच्या झगड्यांत ' काळ्या आदमी 'ला आपल्या मदतीला घ्यावयाचें नाहीं, प्रतिपक्षावर जी काय मात करावयाची ती आमची आम्ही करूं; आमच्या यशांत दुसरा कोणी वांटेकरी नको ! मूठभर बोअर लोकांस चिरडून टाकण्यास प्रबळ ब्रिटिश राष्ट्र सर्वस्वीं समर्थ असल्यानें ब्रिटिशांचा हा पण त्या वेळीं सिद्धीस गेला. तथापि त्या वेळच्या कटु अनुभवानें असो, अथवा प्रस्तुतच्या महायुद्धाच्या जगड्व्याळ स्वरूपाचें प्रारंभींच भविष्यज्ञान झाल्यामुळें असो, जर्मनीविरुद्ध महायुद्धाचा पुकारा होतांच ग्रेट ब्रिटननें आपल्या गोऱ्या वसाहतींबरोबरच काळ्या हिंदी प्रजेसहि रणदीक्षा घेण्यास पाचारण केलें आणि हिंदी वीर ब्रिटिशांच्या खांद्यास खांदा लावून फ्रेंच रणभूमीवर आपला प्रताप गाजवूं लागले. रणभूमि ही सद्गुण पारखण्याची एक कसोटी असल्यानें तेथें हिंदी सैनिकांच्या अंगच्या अनेक अमूल्य गुणांची पारख झाली व हिंदी लोक पूर्णपणें कसास उतरले. ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदी वीरांनीं जर्मनीच्या प्रगतीस कसा प्रतिबंध केला आणि केवळ पॅरिसचें व फ्रान्सचेंच संरक्षण केलें असें नव्हे, तर आधुनिक पाश्चात्य सुधारणादेवीचें त्यांनीं कसें रक्षण केलें हा इतिहास आतां सर्व राष्ट्रांस अवगत झालाच आहे, सबब त्याचें आम्हीं पुनरुच्चारण करीत नाहीं. परंतु या आकस्मिक आघाताच्या वेळीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यपद्धति कशी कसास लागली व तींत कोणते गुणदोष दृष्टोत्पत्तीस आले एवढेंच आम्हांस तूर्त पाहावयाचें आहे.

### हिंदी सेना सदा सज्ज

हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्ययंत्राचा पहिला मोठा गुण हा दिसून आला कीं, या राज्ययंत्रानें बनविलेला माल पक्क्या स्वरूपाचा असून तो तात्काल उपयोगांत आणतां येतो. युद्ध जाहीर होऊन महिना झाला नाहीं तोंच पूर्णपणें सज्ज असें सैन्य हिंदुस्थानच्या बंदरांतून बोटीवर चढूं लागलें आणि महायुद्धाचा दुसरा महिना पूर्ण होण्यापूर्वीच ६ हजार मैल अंतरावर असलेल्या समरभूमीवर हिंदी वीर पुढें सरसावून अजरामर कीर्ति मिळवूं लागले. फ्रान्स आणि इंग्लंड हे दोन देश अगदीं एकमेकांस चिकटलेलेच असल्यानें इंग्लंडचें सैन्य हिंदी सैन्याच्या आधीं फ्रेंच रणभूमीवर अवतीर्ण झालें असल्यास नवल नाहीं. परंतु ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहतींचें सैन्य येऊन दाखल होण्यापूर्वीं भारतीय सैन्य भारती युद्धांत नांव गाजवूं

वाचनालय सातारा
ग्रंथांकित

लागलें होतें. शिवाय हिंदी सेनाविभाग सर्व प्रकारें स्वयंपूर्ण असा होता. अर्थातच या सैन्याला शस्त्रास्त्रें, तोफखाना, दारुगोळा, वगैरे रणसाहित्याकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग आला नाहीं, आणि म्हणूनच या सैन्याचा तात्काल उपयोग होऊं शकला. अमेरिकेनें रणदीक्षा घेतल्यास आजमितीला वर्ष होऊन गेलें; तरी पण अद्यापि अमेरिकन सैनिकांची पूर्ण तयारी झाली नाहीं. आणि इकडे जर्मनांच्या उठावणीमुळें प्रसंग तर आणीबाणीचा येऊन ठेपला; तेव्हां आमचीं स्वतंत्र पलटणें सर्वथैव सज्ज नसलीं तरी आम्ही फ्रेंचांच्या व इंग्रजांच्या पथकांत शिरून लढतों असें म्हणण्याची अमेरिकन सरकारवर पाळी आली. अर्थातच अमेरिकन सरकार एक वर्षांत जी तयारी करूं शकलें नाहीं ती तयारी हिंदुस्थान सरकारनें तीन महिन्यांतच केली, हें खरोखरीच आश्चर्यजनक आहे आणि त्याबद्दल येथील नोकरशाही प्रशंसेस पात्र आहे हें कोणीहि प्रांजलपणें कबूल करील.

## गंजलेलें अचेतन यंत्र

वर दिग्दर्शित केलेल्या गुणाबद्दल नोकरशाहीच्या या सु-राज्यपद्धतीची प्रारंभीं प्रशंसा झाली खरी; परंतु अल्पावधींतच या पद्धतीचे दोष ढळढळीतपणें दिसूं लागले. सचेतन सृष्टि आणि अचेतन सृष्टि यांत जितकें अंतर असतें, तितकेंच अंतर स्वराज्यपद्धतींत व स्वराज्यरहित सुराज्यपद्धतींत असतें. सचेतन सृष्टींत तिच्याच पोटीं विकासाचें बीज असतें; पण अचेतन सृष्टींत त्याचा पूर्ण अभाव असतो. निसर्गानें उत्पन्न केलेलें डाळिंब गोकाकच्या रंगीत डाळिंबापेक्षां आकारानें कदाचित् बाह्यतः तितकें डौलदार दिसणार नाहीं व त्याचा रंगहि तितका तुकतुकीत असणार नाहीं; परंतु त्याच्या पोटांत तसलीं शेंकडों डाळिंबें उत्पन्न करण्याची निसर्गदत्त शक्ति असते. तें डाळिंब स्वतः नष्ट होईल, पण त्याबरोबरच शेंकडों डाळिंबांस जन्म देईल. परंतु कृत्रिम डाळिंब केवळ प्रदर्शनांत ठेवून दुरूनच पाहात बसावें. त्याच्या अंगांत कांहीं तसलेंच दुसरें एखादें फळ उत्पन्न करण्याची धमक नसते. मूळ कारागीर जिवंत असला व त्यास आवश्यक तितकीं साधनें व अवधि मिळाला तर तो एकाच्या जोडीला आणखी दहा उत्तमोत्तम कृत्रिम फळें तयार करून ठेवील. पण स्वतः त्या फळांत कांहीं अशा रीतीनें विकास पावण्याची शक्ति नसते. येथील नोकरशाहीच्या राज्यपद्धतींतहि तोच दोष आहे. या राज्यपद्धतीनें तीस कोटि सचेतन प्राण्यांस जवळ जवळ अचेतन बनविलें आहे. भारतमंत्री मॉंटेग्यू यांनीं जें या पद्धतीला जुनेंपुराणें व गंजलेलें अचेतन यंत्र म्हटलें आहे तें कांहीं उगीच नव्हे. नोकरशाहीच्या या राज्यपद्धतींत व स्वराज्य उपभोगणाऱ्या वसाहतींच्या राज्यपद्धतींत असलेलें हें महदंतर क्रमाक्रमानें कसें ढळढळीतपणें दिसूं लागलें तें पाहा.

एक इंग्लंडखेरीज करून ब्रिटिश साम्राज्याच्या इतर कोणत्याहि भागांतल्या-

पेक्षां हिंदुस्थानचें सैन्य प्रथम रणांगणांत दाखल झालें. प्रारंभीं तें ६०–७० हजार होतें व पुढें थोडक्याच महिन्यांत त्याची खानेसुमारी २–३ लाखांपर्यंत वाढली ! परंतु गिरणीच्या यंत्रांतून छाप मारून निघणारा माल किती निघावयाचा हें ज्या-प्रमाणें केवळ गिरणींतील यंत्रांच्या संख्येवर अवलंबून असतें, त्याप्रमाणें हिंदु-स्थानांतून किती वीर रणांगणावर जावयाचे तें या नोकरशाहीच्या लष्करी यंत्रा-च्या शक्तीवर व संख्येवर अवलंबून राहिल्यानें हिंदी वीरांची संख्या ठराविक मर्यादेच्या बाहेर जाऊं शकेना. प्रथमारंभीं हिंदी सैन्य संख्येनें अधिक होतें, परंतु तें स्वयंविकासी नसल्यानें त्याच्या वाढीची मर्यादा खुंटली. उलटपक्षीं फ्रेंच रण-भूमीवर अवतीर्ण झालेलें इंग्लंडचें सैन्य प्रारंभीं हिंदी सैन्यांइतकेंच होतें; पण तें सचेतन कोटींतलें असल्यानें वटवृक्षाचा कोंब जसा फोफावत जावा आणि काला-वधीनें त्याचा जसा सनाटा वृक्ष बनावा, त्याचप्रमाणें प्रारंभीं जें इंग्लिश सैन्य ६०–७० हजार होतें तें वाढतां वाढतां ४०–५० लाखांपर्यंत वाढलें ! वसाहतींच्या सैन्याचीहि अशीच वाढ झाली. या महायुद्धासाठीं ब्रिटिश साम्राज्यांतील कोणत्या भागांतून किती सैनिक लष्करांत दाखल झाले याचे आंकडे नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत, ते असे :— इंग्लंड ४५३००००, स्कॉटलंड ६२००००, वेल्स २०००००, आयर्लंड १७००००, वसाहती ९००००० आणि हिंदुस्थान व आफ्रिकेंतील ब्रिटिश मुलूख १००००००, हे आंकडे पाहून हिंदी लोकांस सखेदाश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. या आंकड्यांत हिंदुस्थानचे आंकडे वेगळे न देतां आफ्रिकन नीग्रोंचा व हिंदी लोकांचा मिळून एक गट केला आहे, ही पहिली उद्वेगजनक गोष्ट होय. पण तो मुद्दा तूर्त अप्रस्तुत आहे.

## परकीय राज्यपद्धतीचाच हा दोष

वरील आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं, इंग्लंडनें आपल्या लोकसंख्येंतून शेंकडा १३ शिपाई सैन्यांत धाडले; स्कॉटलंडचे शेंकडा १३ वीर युद्धार्थ सिद्ध झाले; वेल्समधून शेंकडा १० पट्टे शत्रूचा समाचार घेण्यास सज्ज झाले; आयर्लंड व वसा-हती यांनीं जरी त्या मानानें लष्करी भरती केली नाहीं तरी त्यांचें प्रमाण शेंकडा ४ तरी पडतें. परंतु हिंदुस्थानचें प्रमाण काय हें सांगण्याची देखील लाज वाटेल. पण ही लाज कोणास ? हिंदी लोकांस नव्हे, तर ज्या पद्धतीनें त्यांच्या अंगची नैसर्गिक विकासशक्ति नष्ट केली त्या पद्धतीसच दोष दिला पाहिजे. हिंदी लोक रणभीरू आहेत असा आरोप प्रत्यक्ष त्यांच्या शत्रूंनींहि कधीं त्यांच्यावर केलेला नाहीं. त्यांच्या अंगीं सेनानायकाचें कौशल्य नाहीं असेंहि म्हणण्यास तोंड नाहीं. कारण प्रस्तुतच्या महायुद्धांतच वरील गोरा अधिकारी पतन पावला असतां हिंदी वीरांनीं स्वतःच्याच हिकमतीनें शत्रूवर हल्ला चढविल्याचीं किंवा पलटणींचा बचाव केल्याचीं उदाहरणें अनेक घडून आलीं आहेत. सारांश, सैनिकांस आवश्यक अशा

कोणत्याहि गुणाचा अभाव हिंदी सैन्यांत दिसून येत नाहीं. उलट तें उपाशीपोटींहि लढूं शकतात हा एक त्यांच्यांत अजब गुण आहे! असें असतां ब्रिटिश सैन्यरूपी वटवृक्षाप्रमाणें हिंदी सैन्यरूपी वृक्ष वाढत कां नाहीं? याचें उत्तर एकच देणें भाग आहे तें हेंच कीं, हा वृक्ष खरा वृक्ष राहिला नसून तो कृत्रिम शोभेचा वृक्ष आहे. तो आपण होऊन वाढूं शकत नाहीं, कारागिरास फुरसत असली व त्यानें मेहनत करून या कृत्रिम वृक्षास दोन डहाळ्या जास्त जोडण्याचें मनांत आणलें किंवा पांच-चार फुलेंफळें अधिक लटकावून दिलीं तर तो अधिक प्रफुल्लित दिसूं लागतो. उलट-पक्षीं त्याच कारागिरानें त्याची छाटाछाट केली तर तो तसाच मुंडा होऊन राहतो!

## डॉक्टरांचा तुटवडा कां?

हें वर्णन केवळ अलंकारिक किंवा अतिशयोक्तीचें असें कोणास वाटेल; परंतु त्यांत काडीमात्र अतिशयोक्ति नाहीं, अथवा वस्तुस्थितिविपर्यासहि नाहीं. जो कोणी डोळे उघडून वस्तुस्थितीचें निरीक्षण करील त्यास ही गोष्ट सहज दिसून येईल. मेसापोटोमिया-प्रकरणांत या गोष्टीची शहानिशा झाली आणि कमिशनर्सनीं हाच अभिप्राय दिला. यावर कित्येकांचा असा आक्षेप येईल कीं, मेसापोटोमिया-प्रकरणांत ब्यूरॉक्रसीची जी एक घोडचूक झाली तेवढ्याचा फायदा घेऊन आम्ही या राज्ययंत्रास सरसकट निरुपयोगी ठरवितों; परंतु तसा प्रकार नाहीं. या राज्ययंत्राचें परीक्षण करण्याची पूर्वी कधीं संधि आली नव्हती ती या प्रकर-णानें आली एवढेंच खरें. परंतु परीक्षणाची कसोटी लावल्यानंतर त्यांत जे दोष दिसून आले ते मात्र आकस्मिक किंवा आगंतुक नसून कायमचे व राज्ययंत्राच्या रचनेंतच उद्भूत झालेले असे आहेत. नमुन्यादाखल या मेसापोटोमिया-प्रकरणांतलें एकच उदाहरण घेऊं. इस्पितळांचा व डॉक्टरांचा तुटवडा पडल्यानें तेथील सैनिकांचे जे हालहाल झाले ते कां? पाहिजे तर हिंदुस्थानांत लढवय्ये नसतील म्हणा, मुत्सद्दी नसतील म्हणा, आणखी काय वाटेल तो उणेपणा आमच्या पदरीं बांधा! पण निदान हिंदुस्थानांत डॉक्टरांची तर वाण खास नाहीं; मग मेसापोटोमियांत डॉक्टरांचा तरी तुटवडा कां पडावा? पण याचें कारण उघडच आहे. आय. एम्. एस्. ही चीज फक्त विलायतेंतील विशिष्ट कॉलेजांतच पैदा होते व तेथला शिक्का असल्याखेरीज कोणासहि हें काम द्यावयाचें नाहीं असा या ब्यूरॉक्रसीचा पूर्वीचा बाणा! बरें, यदाकदाचित् अडचणीची वेळ असल्यानें हिंदी डॉक्टरांस आय. एम्. एस्.चा हुद्दा दिला तरी त्यांस तो कायमचा थोडाच मिळणार आहे? बरें प्रसंगविशेषीं तीन-तीन वर्षें रखडल्यावर तोहि हुद्दा कायमचा मिळाला समजा; तरी पण तेवढ्यानें या यांत्रिक पद्धतींतला अंगभूत दोष नाहींसा होत नाहीं. हिंदी आय. एम्. एस्. यांस जेव्हां दुसऱ्यांस आय. एम्. एस्. करण्याची शक्ति येईल तेव्हांच त्यांची नैसर्गिक वाढ होऊं शकेल.

सैन्यांतील हुद्देदारासहि हाच दोष भोंवत आहे; हिंदी सैनिकांस सैन्यांतील वरिष्ठ अम्मलदारीच्या जागाच मिळत नव्हत्या; आतां कोठें सहापांच जागा देण्यास प्रारंभ झाला आहे. कित्येक राजेरजवाड्यांना बहुमानाकरितां, कॅप्टन, कर्नल जनरल, अशाहि पदव्या देण्यांत आल्या आहेत; पण असल्या वरोपचारानें मूळांतला राग नाहींसा कसा होणार ? ब्रिटिश सैन्यांत एखादा इसम कर्नल, जनरल, अशा पदवीस चढला म्हणजे त्याच्या अंगीं दुसऱ्याला आपल्या योग्यतेस चढविण्याची शक्ति येते. ते हुद्देदार लष्करी शिक्षणाच्या कॉलेजांत इतरांस शिक्षण देऊन त्यांस अंमलदार बनवूं शकतात. परंतु ज्या हिंदी राजेरजवाड्यांत ले. जनरल, मेजर-जनरल असल्या बड्या बड्या पदव्या देण्यांत आलेल्या आहेत त्यांना इतरांस तसें शिक्षण देऊन परीक्षा घेऊन कॅप्टन-कर्नल होण्याच्या पात्रतेचा दाखला देतां येतो काय ? अशी शक्ति जेथें नांदत नाहीं तेथें सैन्याची नैसर्गिक वाढ व्हावी कशी ? इंग्लिश लष्करांत शिरणाऱ्या सैनिकास आपण स्वतः सेनापति होऊं एवढेंच नव्हे तर इतरांस सेनापति करूं अशी धमक असते, म्हणूनच रक्तबीज राक्षसाचे रक्तबिंदु रणांगणावर पडले असतां त्यांतून जसे नवे नवे राक्षस उत्पन्न होत असत, त्याप्रमाणें फ्रेंच रणभूमीवर इंग्लिश शिपायांचा रक्ताचा सडा पडतांच रक्ताच्या बिंदुगणिक इंग्लंडांतून एक एक नवा रिक्रूट आत्मस्फूर्तीनें तयार होऊन पुढें येऊं लागला आणि अशा रीतीनें मूळच्या मूठभर सैन्याच्या जागीं आज एकट्या इंग्लंडांतून — साडेतीन कोटींच्या छोट्या बेटांतून — ४५ लक्ष मर्द लष्करांत दाखल झाले !

## छोट्या वसाहतींची मनधरणी

परंतु इंग्लंडांतील सैन्यभरती झाली तरी तिला देखील कांहीं मर्यादा असणारच. वटबीजाच्या मानानें पाहतां वटवृक्ष कितीहि अफाट विस्तार पावलेला दिसला तरी त्याची वाढ देखील कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंतच होणें शक्य असतें. इंग्लंडांतून आतांपर्यंत शेंकडा १३ वीर रणदीक्षा घेऊन रणभूमीवर दाखल झाले खरें. पण तेवढ्यानें कांहीं रणयज्ञाची परिसमाप्ति झाली नाहीं. हें रणकुंड विझण्याच्या ऐवजीं अधिकाधिक पेटतच चाललें आहे. आणि त्यांत नित्य सहस्त्रावधि वीरांच्या आहुति पडत आहेत. अशा परिस्थितींत ब्रिटिश मंत्र्यांना इंग्लंडांतील नागरिकांवर आणखी सक्ति करण्याची पाळी येण्याचें लक्षण दिसत आहे. लष्करांत दाखल होण्याची वयोमर्यादा ४० आहे ती पन्नास करावी, १९ वर्षांच्या आंतल्या तरुणांचाहि सैन्यांत प्रवेश व्हावा. ज्या युद्धोपयोगी कारखान्यांतील मजुरांना पूर्वी लष्करी भरतीच्या सक्तीची माफी होती त्यांची माफी रद्द करावी असे अनेक विचार चालू आहेत. अशा संकटप्रसंगीं ब्रिटिश प्रधानमंत्री मि. लॉईड जॉर्ज यांनीं ब्रिटिश वसाहतीच्या प्रधानाकडे लष्करभरतीची त्वरा करण्याविषयीं संदेश धाडला आहे. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण-आफ्रिका, न्यूझीलंड, न्यूफौंडलंड

असल्या चिमुकल्या वसाहतींकडेहि ही मागणी होत आहे. आणि त्या वसाहतींहि आपल्या सामर्थ्यानुरूप मायदेशास मदत करीत आहेत. परंतु या वसाहतींची लोकसंख्या किती आणि त्यांतून आतां आणखी भरती ती काय होणार ? सगळ्या वसाहती मिळून लोकसंख्या पाहिली तरी ती २ कोटींच्या वर नाहीं. पण एकट्या हिंदुस्थान देशांत त्यांच्या १५ पट लोकसंख्या आहे. अर्थातच जेथें मनुष्यबळाचा प्रश्न आहे तेथें हिंदुस्थान कोणासहि हार जाणार नाहीं. परंतु ब्रिटिश प्रधानास अद्यापि हिंदुस्थानांतील मनुष्यबळाचा योग्य रीतीनें उपयोग करून घ्यावा अशी वासना होत नाहीं. हिंदुस्थान सरकार रिक्रूटभरती करीत आहे, सैन्य जमत आहे, रणभूमीवर जात आहे, या सर्व गोष्टी खऱ्या; परंतु यांत अंतस्थ आत्मस्फूर्तीची जी ज्योत पाहिजे आहे, ती दिसून येत नाहीं. त्यामुळें सरकारी अधिकारी जितके लोक जमवूं शकतील, लष्करी अधिकारी जेवढ्यांना लष्करी शिक्षण देऊं शकतील, सरकारी जहाजें जेवढ्यांना रणभूमीकडे वाहून नेऊं शकतील, तेवढ्याच हिंदी मनुष्यबळाचा युद्धाला उपयोग होणार. बाकीचें सगळें अफाट मनुष्यबळ असून नसल्यासारखेंच आहे. त्यांना जर प्रेमानें हाक मारिली, त्यांना जर या कार्यांत आपलेपणा वाटूं दिला, त्यांच्या अंगच्या नैसर्गिक महत्त्वाकांक्षेस उद्दीपित करून ती पूर्ण करण्याचा मार्ग जर मोकळा केला. तर हिंदुस्थानांतून मनुष्यबळाची कधीं तरी वाण पडेल काय ? दूरदूरच्या वसाहतींना मि. लॉईड जॉर्ज असें सांगतात कीं, " बाबांनों, इतक्या दूर राहणाऱ्या माझ्या एकट्याच्यानें काय होणार असें म्हणूं नका ! युद्धसमाप्ति होण्यापूर्वी जो जो मनुष्य रणांगणावर दाखल होईल त्या प्रत्येकास महत्त्व आहे. कारण शेवटीं पारडें जें इकडचें तिकडे उलटतें तें शेवटच्या क्षुल्लक वजनानेंच उलटतें. "

## हिंदुस्थानची आठवण कां होत नाहीं ?

यावरून ग्रेट ब्रिटनला या वेळीं मनुष्यबळाची केवढी गरज भासत असली पाहिजे तें उघड होतें. परंतु ज्या वसाहतींची वस्ती १०–२० लाख देखील नाहीं तेथील मनुष्यबळ शक्य तितकें संपादन करण्याचा यत्न चालू असतां या संकटप्रसंगीं देखील ब्रिटिश प्रधानास हिंदुस्थानची आठवण होऊं नये काय ? कोणता उपाय योजला असतां हिंदुस्थानांतून जरुरीपेक्षांहि अधिक मनुष्यबळ प्राप्त होईल, याचा विचार मि. लॉईड जॉर्जसारख्या मुत्सद्द्यांच्या डोक्यांत आला नसेल काय ? असें होणें शक्य नाहीं. सक्तीचें बिल पार्लमेंटपुढें आणण्याचा प्रश्न निघाला असतां, आयर्लंडची वाट काय ? अशी एकानें पृच्छा केली, तेव्हां हेच प्रधानमंत्री असें म्हणाले कीं, आयरिश कन्व्हेन्शननें जी होमरूलची योजना तयार केली आहे, ती जाहीर झाल्यावर मग आयर्लंडवर सक्तीचा कायदा लावण्याचा विचार पाहूं. या उत्तरावरून ' होमरूल देणें ' व ' मनुष्यबळ मिळविणें ' या गोष्टी परस्परावलंबी आहेत.

हा विचार मि. लॉईड जॉर्ज यांच्या अंतःकरणांत जागृत असल्याचें उघड दिसतें. मग त्याच मात्रेचा हिंदुस्थानवरहि प्रयोग करण्यास ते माघार कां घेतात ! आयरिश कन्व्हेन्शनची योजना अद्यापि जाहीर व्हावयाची आहे. पण आमच्या राष्ट्रीय सभेनें 'स्वराज्याची' योजना कधींच जाहीर करून ठेविली आहे. परंतु पूर्वीचे प्रधान मि. ॲस्क्विथ काय अथवा हल्लींचे प्रधान मि. लॉईड जॉर्ज काय, हिंदुस्थानच्या प्रश्नासंबंधीं अद्यापि अखंड मौनव्रतच धारण करून आहेत, ही खरोखरीच सखेदाश्चर्याची गोष्ट होय. मनुष्यबळाची इतकी चणचण भासत असतां न्यूफौंडलंडसारख्या दीड लक्ष वस्तीच्या वसाहतीकडे ग्रेट ब्रिटननें सैन्याची मागणी करावी आणि असंख्य मनुष्यबळ प्रसवणाऱ्या हिंदरूपी घरच्या कामधेनूची मात्र त्यांस आठवण होऊं नये काय ! घरांत कामधेनू असतां ताक मागत जाण्याची ब्रिटिश मुत्सद्द्यांची ही वृत्ति जेव्हां बदलेल तोच सुदिन खरा ! आणि हें महायुद्ध संपण्यापूर्वी असा सुदिन उगवेल अशी आमची खात्री आहे.

---

## मोर्लेसाहेबांच्या आठवणी ५

[ लॉर्ड मोर्ले हे लिबरल प्रधानमंडळ अधिकारारूढ असतांना १९०५ पासून १९१० पर्यंत भारतमंत्री होते. त्यांच्याच त्या कारकीर्दीत मोर्ले-मिंटो सुधारणा जाहीर झाल्या. पण त्याच वेळीं दडपशाहीचे अनेक कायदेहि पसार करण्यांत आले. ग्लॅडस्टनसाहेबांचे अनुयायी आणि मनानें पक्के उदारमतवादी असें असतांना मोर्लेसाहेबांनीं दडपशाहीच्या कायद्यांना संमति कशी दिली, हें एक सर्वांना कोडेंच वाटत होतें. त्या कोड्याचा उलगडा स्वतः मोर्ले यांनींच '**माझ्या आठवणी**' हें पुस्तक लिहून त्या पुस्तकांत केला. तेव्हां त्या पुस्तकांतील निवडक उतारे एकत्र गुंफून मोर्लेसाहेबांना स्वतःच्या मताला बाजूला सारून दडपेगिरीला कसा पाठिंबा द्यावा लागला त्याचा खुलासा या लेखांत केला आहे.]

### दडपशाहीचा तिटकारा

'मोर्लेसाहेबांच्या आठवणी' या पुस्तकावरून लॉर्ड मोर्ले यांनीं आपल्या सुधारणांची योजना कशी अंमलांत आणली याचें दिग्दर्शन आम्हीं मागें एकदां केलेंच आहे. आतां सुधारणेच्या योजनेपेक्षां दडपशाहीच्या नव्या कायद्याचा प्रश्न

( केसरी, दि. ४ फेब्रुवारी १९१९ )

जारीनें पुढें आल्यामुळें दडपशाहीविषयीं मोर्लेसाहेबांना किती तिटकारा वाटत होता आणि राज्यकारभारांत दडपशाहीचें धोरण अखेरीस कसें निष्फळ ठरतें, याविषयीं त्यांनीं जें आपलें अनुभवसिद्ध मत दिलें आहे, त्याचा हल्लींच्या अधिकाऱ्यांनीं विचार करणें अगत्याचें असल्यानें ' मोर्लेसाहेबांच्या आठवणीं 'तून त्यासंबंधाचे त्यांचे उद्गार पुढें देत आहों :–

हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याच्या हेतूनें नवी योजना तयार करून खलिता रवाना करण्याकरितां लॉर्ड मोर्ले यांनीं लॉर्ड मिंटो यांस जेव्हां अगदीं निकड लाविली त्या वेळीं व्हाइरॉयकडून एकदांचा पहिला खलिता सादर झाला. त्यांत ब्युरॉक्रसीच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें हिंदुस्थानांत राजद्रोहाचा सुळसुळाट आहे, सबब सुधारणांचा प्रश्न तूर्त हातीं घेऊं नये अशा अर्थाचा एक प्यारा होताच. तो वाचून त्यावर मोर्ले लिहितात " हा प्यारा लिहिणारे लेखक मजसमोर असते तर त्यांस मी असा सवाल केला असता कीं, ' हिंदुस्थानांत राज्यद्रोह पसरविणारे लोक आहेत व हिंदी लोकांचीं मनें बिथरलीं आहेत हें जर खरें असेल तर सुधारणा लवकर अमलांत आणण्याची आवश्यकता जास्तच सिद्ध होते; हीं बिथरलेलीं मनें ताळ्यावर आणण्याला तुम्ही दुसरा कोणता मार्ग स्वीकारणार तें सांगण्याची आणि तो अधिक यशस्वी होईल हें सिद्ध करण्याची जबाबदारी तुम्हांवर आहे; ' यास्तव मला तुमचा दुसरा मार्ग काय तो सांगा. " या एका वाक्यांतच मोर्लेसाहेबांनीं राजद्रोहाचें बुजगावणें दाखवून राजकीय सुधारणा मागें खेचणारांस चोख उत्तर दिलें आहे. अर्थातच ब्युरॉक्रसीचा हा पहिला डाव सपशेल फसला.

### दडपशाहीनें अस्वस्थता फैलावते

त्यानंतर पंजाबांतील अस्वस्थतेची वार्ता विलायतेंत जाऊन धडकली; तेव्हां मोर्लेसाहेबांना क्षणभर विचार पडला. परंतु त्यांनीं ताबडतोब व्हाइसरॉयांना इषारा दिला तो असा – " एकंदरींत आपण सुधारणेची योजना ठरविली आहे ती अंमलांत आणणें कठिण जाणार असें दिसतें, पण हा अनुभव जुनापुराणाच आहे. राज्यकारभारांतील दोष व उणीव यामुळें अस्वस्थता माजते. अस्वस्थता माजतांच सुधारणा करूं इच्छिणारांच्या डोक्यावर तिचें खापर फुटतें. आणि सुधारणेची योजना मागें मागें पडते. अर्थातच दडपशाहीला स्फुरण चढतें आणि दडपशाहीमुळें अस्वस्थता कमी होण्याच्या ऐवजीं जास्तच फैलावते. असा हा चक्रनेमिक्रम आहे. तुम्हांला उपाय योजावयाची गरज पडेल तर त्यास मी पाठिंबा देईन; पण ज्याप्रमाणें राजद्रोही इसमाविरुद्ध कडक उपायांची जरूरी भासते त्याचप्रमाणें तुमच्या ' कडेकोट बंदोबस्ती ' अधिकाऱ्यांवरहि कडक नजर ठेवावी लागते. कारण क्रांतिकारकांच्या मूर्खपणाची जगाच्या इतिहासांत जितकीं उदाहरणें सांपडतील तितकीं तरी या बंदोबस्ताचें वेड लागलेल्या राजेश्रींच्या हातूनहि मूर्खपणा घडल्याचीं उदाहरणें

[library stamp]

सांपडतील. यास्तव कोणताहि कडक उपाय योजण्यापूर्वी साधकबाधक प्रमाणांचा विचार करा आणि जेथें शक्य असेल तेथें मला आगाऊ कळवा. विशेषेकरून वर्तमानपत्रासंबंधीं कांहीं मुस्कटदाबीचा विचार असेल तर तो मला जरूर अगोदर कळवा. इजिप्तमध्यें लॉर्ड क्रोमर यांनीं वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी केली नाहीं ही गोष्ट विशेष नांवाजली जात आहे. राजद्रोही वर्तमानपत्रें जर खरोखरीच सैन्यांत फितुरी करण्याचा यत्न करतील तर त्यांना खुशाल दडपून टाका. परंतु असल्या धांदलीच्या वेळीं नुसती शंका येणें म्हणजेच खात्री होणें आणि शक्यता म्हणजेच प्रत्यक्ष कृति असें वाटूं लागतें, यास्तव तेवढ्याला नीट जपा." या एका सूचनेंत साप साप म्हणून भूई धोपटण्याचा संभव कसा असतो तें मोर्लेसाहेबांनीं दिग्दर्शित केलें आहे. पण येथें काय पालथ्या घड्यावर पाणी ! १८१८ चा जुना रेग्युलेशन उकरून काढून लजपतराय यांस हद्दपार करण्यांत आलेंच. ही बातमी कळतांच मोर्लेसाहेब लिहितात, "आयर्लंडमध्यें दडपशाही केली नाहीं यावरून मी दडपशाहीचा कट्टा द्वेष्टा आहे अशी जर पार्लमेंटच्या सभासदांची खात्री नसती तर मला या कृत्याचें समर्थन करणें जड गेलें असतें. आणि बाल्फोरसाहेबांनी वुइल्यम ओब्रायन यांस अटकेंत ठेवल्याबद्दल त्यांच्यावर जो मी पूर्वीं तुटून पडलों होतों तोच मी आतां या कृत्याचें समर्थन करूं लागलों तर लोक मला काय म्हणतील ! आतां तुम्ही हें १८१८ सालचें जुनें हत्यार बाहेर काढलेंच आहे; तर मग त्याचा तुमच्याच दोघां कौन्सिलरांवर ( नांवें दिलेलीं नाहींत ) प्रयोग करून त्यांनाच हद्दपार कराना ! म्हणजे कटकट मिटली ! तसें कराल तर मात्र मी तुम्हांस मोठ्या उत्सुकतेनें दुजोरा देईन."

## अंगावर शहारे आले

लजपतराय यांच्या हद्दपारीला दोन महिने झाले नाहींत तोंच मोर्लेसाहेब लिहितात – "सुधारणेचा खलिता जेव्हां प्रसिद्ध करण्यांत येईल त्याच वेळीं लजपतरायांची हद्दपारी रद्द करावी हें योग्य दिसतें. आम्ही इंग्लिश लोक क्षमा करण्याला नेहमीं नाखुष असतो हा आमचा स्वभावच आहे. त्यांतून राजकीय कैद्यांवर तर ब्रिटिश अधिकाऱ्यांचा फारच डोळा असून त्यांना ते कडक व निर्दयपणें वागवितात हें अनुचित आहे." एका पत्रांत व्हाइसरॉयांनीं संशयित पत्रव्यवहार फोडून पाहण्याची पद्धति सुरू करण्याचा विचार कळविला; त्यावर मोर्लेनीं लिहिलें कीं, "याचा मला पुष्कळ अनुभव आहे आणि त्या अनुभवावरून माझें असें ठाम मत आहे कीं, हा उपद्व्याप बहुतांशीं निष्फळ ठरतो." त्यानंतर व्हाइसरॉयांनीं पहिली 'प्रेसलॉ'ची प्रत मोर्लेसाहेबांकडे पाठविली. त्यांत मोर्ले लिहितात –"असला कांहीं तरी कायदा करावा लागेल असें मलाहि वाटूं लागलें आहे; परंतु तुमच्या कायद्याचीं कलमें वाचून माझ्या अंगावर शहारेच आले !"

परंतु लॉर्ड मोर्ले यांच्या अंगावर कितीहि शहारे आले तरी ब्युरोक्रॅटिक अधिकाऱ्यांना त्यांची थोडीच दया येणार आहे. त्यांनीं आपल्या प्रेस-ॲक्टचीं कलमें त्यांस तारेनें कळविलीं. त्यास उत्तर देतांना मोर्ले लिहितात – "असल्या कलमांना जर मी संमति दिली तर पार्लमेंटच्या बैठकीस सुरुवात झाल्यानंतर मी तेथें एक तासभर तरी टिकूं शकेन काय ! स्वतंत्र देशांतल्या पार्लमेंटचे आपण नोकर आहों ही गोष्ट हे ब्युरोक्रॅट्स् अगदींच विसरतात !" एक कौन्सिलर लिहितात कीं, "या प्रेस-ॲक्टच्या कांटेरी लगामानें चळवळ्यांचीं तोंडें बंद झालीं म्हणजे हद्दपारीच्या उपायाचें अवलंबन करावयास नको. पण एखाद्या इसमानें जाणूनबुजून प्रत्यक्ष दंग्याधोप्याला उत्तेजन दिल्यामुळेंच दंगा झाला असा खात्रीलायक पुरावा येईपर्यंत हद्दपारीला मी कधींहि संमति देणार नाहीं, ही गोष्ट हें तुमचे कौंसिन्लर विसरून जातात. याच शहाण्यांनीं रावळपिंडी व लाहोर येथील, दंग्याची संधि साधून तुमच्या सुधारणांची योजना हाणून पाडिली आणि आतां पार्लमेंट आणि मंत्रिमंडळ बरखास्त झालें असतां, माझ्या कौन्सिलांतले अर्धे सभासद जाग्यावर नसतांना आणि सरकारी वकिलांचा सल्ला घ्यावा म्हटलें तर ते वकीलहि येथें नसतांना, ज्या बिलांत कायद्याचे व राजनीतीचे अनेक नाजूक भानगडीचे प्रश्न आहेत अशा बिलाला एक आठवड्याच्या आंत संमति देण्याविषयीं हे कौन्सिलर तांतडी करीत आहेत ! त्यांना तेथें कोणी विचारता ना पुसता; परंतु मला येथें पार्लमेंटांत जाब द्यावा लागतोना ! एका दृष्टीनें पाहतां स्ट्रॅफोर्ड यानें आयर्लंडमध्यें ज्या पद्धतीनें राज्यकारभार केला ती पद्धति १७ व्या शतकांत आयर्लंडला व २० व्या शतकांत हिंदुस्थानला उत्कृष्ट पद्धति खरी; पण तिच्यांत गोम एवढीच आहे कीं, स्ट्रॅफोर्डचा शिरच्छेद केला गेला आणि त्या वेळेपासून त्या पद्धतीविषयीं सर्वांच्या मनांत तिटकारा उत्पन्न झाला आहे. अर्थातच मी तुमच्या प्रेस-ॲक्टला तारेनें साफ नकार दिला आहे. जर एखाद्या वक्त्याच्या भाषणानें दंगा झाला तर त्या दंग्याबद्दल त्या वक्त्याला तुम्ही तुरुंग कां दाखवीत नाहीं ! कां तुमच्याजवळ पोलीस नाहींत ! पोलीस भरपूर नसले तर लष्कर तरी आहेना ! 'देशांत शांतता राखण्याकरितां असले कायदे आवश्यक आहेत' हें वाक्य दिसावयाला गोंडस दिसतें ! परंतु तें पार्लमेंटच्या सभासदांच्या गळीं उतरत नाहीं आणि त्यांच्या गळीं तें उतरविण्याचें हें पातक मी कांहीं करणार नाहीं. सर्वत्र लागू होईल असा प्रेस-ॲक्ट करून ठेवावा आणि त्याची बजावणी कोठें केव्हां करावयाची हें ठरविण्याचा अधिकार लष्करी अधिकाऱ्यांच्या हातीं द्यावा अशी पहिली सूचना होती ! असली भयंकर सूचना गेल्या शंभर वर्षांत ब्रिटिश पार्लमेंटांत कधीं कोणीं पुढें आणली नसेल. परंतु आतांच तुम्ही जो "सभाबंदीचा कायदा करीत आहां त्यांत खासगी सभेला एकदम जाहीर सभा ठरविण्याच्या कल्पनेनें त्या भयंकर सूचनेवरहि ताण केली आहे. एखाद्या प्रांताच्या अधिकाऱ्याला एखाद्या वक्त्याचे विचार आवडेनासे

नगर वाचनालय, सातारा.



झाले कीं, त्या वक्त्याला विवक्षित मर्यादेंत भाषण करण्याची बंदी करण्याचा अधिकार अधिकार-पदावरील अधिकाऱ्याला देणें म्हणजे तर दडपशाहीची कमाल झाली म्हणावयाची! त्यापेक्षां आम्हांस नावडत्या वक्त्यांना फांसावर चढवावयाचा अधिकार पाहिजे असेंच कां स्पष्ट म्हणाना!"

## जीव तळमळूं लागला

या पत्रव्यवहारानें प्रेस-ॲक्टची कल्पना त्या वेळेपुरती मागें पडली. पुढें लवकरच पहिल्या 'बॉंबगोळ्या'चा स्फोट झाला. ती बातमी ऐकल्या-बरोबर मोर्लेसाहेबांना फिरून दडपशाहीचा सुळसुळाट होण्याची धास्ती पडून ते लिहितात – "या वेळीं तुम्ही दडपशाहीचा अंगीकार कराल हें उघड आहे. परंतु तुमच्या दडपशाहीला शक्य तितकें मागें खेचणें हें माझें कर्तव्य आहे. या वेळीं आपण जोमानें व नेटानें वागलें पाहिजे हें खरें. परंतु जोम व नेट म्हणजे कत्तल नव्हे! एक राजद्रोहात्मक चोपडें लिहिल्याच्या किंवा प्रसिद्ध केल्याच्या घोर अपराधा-बद्दल सात वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा दिल्याचें ऐकून माझा जीव तळमळूं लागला आहे. तें चोपडें व त्या खटल्याची हकीकत तरी माझ्याकडे पाठवून द्या. कांहीं राजकीय अपराध्यांना फटके मारण्यांत आले असें कळतें! हें कृत्य बेकायदा आहे; निदान नवीन दुरुस्तीप्रमाणें तरी तें बेकायदा ठरेल. हिंदुस्थानांतल्या अम्मलबजा-वणीखात्याच्या अधिकाऱ्यांना कायदेपंडित पाहिला कीं, चीड येते, असें एक गृहस्थ मजजवळ म्हणाले. त्याबरोबर मी त्यांस उत्तर दिलें कीं, या अधिकाऱ्यांना कायदेपंडिताची चीड येत नाहीं तर त्यांना कायद्याची चीड येते! याकरितांच तर नव्या दडपशाहीच्या बिलांत वकिलांची भगभग ठेवण्यांत आलेली नाहीं हें उघड सिद्ध होत नाहीं काय!"

बॉंबचा स्फोट झाल्यावर व्हाइसरॉयांनीं आपल्या छोट्या प्रेस-ॲक्टचें घोडें पुढें दामटलें. या वेळीं लॉर्ड मोर्ले यांना व्हाइसरॉयांची ही मागणी अगदींच धुडकावून देतां येईना, तेव्हां त्यांनीं सर लॉरेन्स जेकिन्स् यांचें मत घेऊन त्यांत मुख्य फेरफार असा केला कीं, अधिकाऱ्यांच्या जप्तीच्या हुकुमावर त्यांनीं हाय-कोर्टाकडे अपील ठेविलें. या छोट्या प्रेस-ॲक्टांत खुनाला, स्फोटक द्रव्याचा उपयोग करण्याला किंवा दुसरें एखादें बेकायदा बळजोरीचें कृत्य करण्याला जर चिथावणी दिली जाईल तरच छापखान्याची जप्ती व्हावी असें कलम होतें. अधिकाऱ्यांच्या लहरीप्रमाणें वाटेल त्याकडून व वाटेल त्या सबबीवर जामीन घेण्याचें कलम यांत नव्हतें. या मर्यादेमुळें आणि बिकट परिस्थिति जाणून मोर्ले यांनीं या बिलाला संमति दिली. लॉर्ड रिपन हे वर्तमानपत्राच्या स्वातंत्र्याचे चहाते असल्यानें त्यांनी या बिलाला विरोध केला, पण त्या वेळीं ना. गोखले व रमेशचंद्र दत्त हे उभयतांहि विलायतेंत असून त्यांनीं त्या बिलाला संमति दिली! अशा रीतीनें इतकीं वर्षें पाळ-

लेल्या आपल्या व्रताचा हळुहळू भंग होत चालला असेंच मोर्लेसाहेबांना वाटून ते लिहितात, "हिंदुस्थानच्या बाबतींत मी जो व्रतभंग केला याबद्दल मला परलोकांत काय शिक्षा भोगावी लागेल ती लागो. परंतु निदान या बिलाच्या बाबतींत तरी गोखले व दत्त यांची अनुमति मिळाल्याकारणानें मला तेवढ्यापुरती स्वर्गांत जागा मिळाली पाहिजे !" मोर्ले यांच्या अनुमतीनें हा छोटा प्रेस-ॲक्ट १९०८ च्या जून महिन्यांत जुन्या कायदेकौन्सिलांत पसार झाला.

## अस्वस्थतेला हेच घमेंडखोर कारण आहेत

एवढ्यानें हिंदुस्थानांतल्या ब्युरॉक्रसीचें समाधान झालें नाहीं; आणि लॉर्ड मिंटो यांनीं तर एकदां आपल्या पत्रांत असे उद्गार काढले कीं, "हिंदुस्थानवर आमची सत्ता अबाधित चालण्याच्या मार्गांत हल्लींचें हाऊस ऑफ कॉमन्स हा मोठा धोका आहे." त्या वेळीं लॉर्ड मोर्ले यांना सात्विक संताप येऊन ते उलट प्रश्न करितात कीं, "हाऊस ऑफ कॉमन्सनें तुमचें काय घोडें मारलें आहे ? बॉंबचा स्फोट होतांच तुमच्या 'एक्सप्लोझिव्ह ॲक्टा 'ला संमति दिली. हिंदुस्थान सरकारला आपल्या इच्छेनुरूप कोणताहि उपाय योजून अंमल करण्याला पूर्ण मुभा जर न मिळेल तर केव्हां कसा प्रसंग ओढवेल नेम नाहीं असें तुम्ही लिहितां. फुल्लरसाहेबांचें तरी हेंच मागणें होतें; मग त्यांचा तुम्ही राजिनामा कां स्वीकारला ! असली 'पूर्ण मुभा' देणें हें कायद्याच्या व राज्यपद्धतीच्या तत्त्वाला व नियमालाहि विरुद्ध आहे. तुम्ही म्हणतां कीं, हिंदुस्थानांस कसें वागलें पाहिजे याची आम्हांस जास्ती माहिती आहे. यावरून तुमच्या दीडशहाण्या कौन्सिलरांपेक्षां ॲस्क्विथ, ग्रे, लोरबर्न व मोर्ले यांना अक्कल कमी आहे असेंच मानावयाचें ना ! आणि तेथल्या ब्युरॉक्रसीचे शब्द म्हणजे वेदवाक्य असें मानावयाला त्या शहाण्यांना तरी हिंदी लोकांची राहणी व स्वभाव यांचें ज्ञान कितपत झालें आहे ! हल्लीं त्या देशांत जी अस्वस्थता माजली आहे तिला हिंदुस्थानवर पन्नास वर्षें अंमल चालविणारे हेच घमेंडखोर कारणीभूत नाहींत काय ? त्यांच्या कर्तव्यनिष्ठेची मी तारीफ करितों. परंतु ब्रिटिश मंत्रिमंडळ म्हणजे मूर्खांचा बाजार आहे असें जें या ब्युरॉक्रसीला वाटतें तें मी कधींहि सहन करणार नाहीं."

वरील पत्रांत मोर्लेसाहेबांनीं ब्युरॉक्रसीच्या अंगच्या दोषाचें स्पष्ट विवरण करून त्यांच्या चुकांच्या धोरणामुळेंच अशांतता पसरली असें आपलें मत दिलें. त्यानंतर दि. २४ जूनच्या पत्रांत त्यांनीं इशारा दिला कीं, "अमेरिकेंत जे ब्रिटिश अधिकारी होते त्यांनीं वसाहतवाल्यांना चिडविलें आणि तेथली खरी स्थिति न कळवितां मंत्रिमंडळाचा गैरसमज केला, यामुळें अमेरिकन वसाहती हातच्या गेल्या."

## रिकामा ढोल कशाला ?

लो. टिळकांच्या खटल्यानंतर मुंबईस जो दंगा झाला त्यांत नुसत्या दगड फेकल्याच्या आरोपावरून १२ महिन्यांची शिक्षा झालेली ऐकून व त्याच वेळीं तिने-

वेल्ली व तुतिकोरिन येथील खटल्यांत जन्मठेप काळे पाणी व १० वर्षे काळे पाणी अशा शिक्षा झालेल्या ऐकून मोर्लेनीं लिहिलें कीं, "असल्या शिक्षा कमी झाल्याच पाहिजेत; असल्या अमानुष प्रकाराचें मी बिलकूल समर्थन करणार नाहीं. देशांत शांतता राखली पाहिजे खरी; परंतु कडकपणाची कमाल करणें हा शांतता स्थापित करण्याचा मार्ग नसून उलट त्या योगानें बॉंबच्या अत्याचाराचा मार्ग खुला होतो." एवढ्या इषारतीनें न उमजून लॉर्ड मिंटो यांनीं परत लिहिलें कीं, "कडक शिक्षा दिल्याबद्दल नापसंती दर्शविल्यानें वाईट परिणाम होईल; येथल्या परिस्थितीला अशाच शिक्षा पाहिजेत." त्यावर संतापून जाऊन मोर्ले लिहितात कीं, "ज्या एका कार्पोरलनें संतापाच्या भरांत एका नेटिव्हाचा खून केला त्याला कोणती कडक शिक्षा केली हें तुम्ही लिहून कळवाल कां ? त्या कार्पोरलवर खटला तरी झाला काय व त्याला त्या खुनाबद्दल फांसावर चढविला काय ? लॉर्ड कर्झन यांनीं ९ व्या लान्सर पलटणीला शिक्षा केली तीबद्दल मला कर्झनविषयीं खरोखरीच आदर वाटतो. असल्या खुनांना जर आम्ही आळा घालूं शकलों नाहीं, तर ब्रिटिशांच्या कडक न्यायपद्धतीचा रिकामा डौल मिरविणें मूर्खपणाच होय. असले सोल्जर आणि असले मळेवाले यांच्या कृत्यांवरून आमचें राज्यधोरण ठरावयाचें काय ? हिंदी लोकांना कडक शिक्षा दिल्याबद्दल तुम्ही असें म्हणाल कीं, या शिक्षा न्यायकोर्टाच्या तराजूनें न तोलतां लष्करी कोर्टाच्या ताजव्यानें जोखल्या पाहिजेत; आणि बंडखोरांना तोफेच्या तोंडीं देण्याऐवजीं तुरुंगांत टाकणें ही शिक्षा सौम्यच होय ! असें जर तुमचें खरोखरीच मत असेल तर नवीन स्फूर्तीचा प्रसार आणि उदार राजकीय धोरण व सुधारणा यांचें नांव तरी कशाला काढतां ? सुधारणेची योजना रद्दींत फेकून देऊं काय ?"

### हिडिस रशियन पद्धति

मोर्ले यांच्या या लिहिण्याचा कांहींच उपयोग न होतां उलट व्हाइसरॉयांनीं आणखी दोनतीन इसमांस हद्दपार करण्याची परवानगी मागितली. त्यांस मोर्ले उत्तर देतात कीं, "असला कोरा चेक मी तुम्हांस कधींच देणार नाहीं. प्रत्येक हद्दपारीच्या हुकूमाच्या पूर्वी मला सर्व हकीकत कळली पाहिजे. गव्हाच्या शेतांतील तण काढून टाकण्याच्या प्रयत्नांत तुम्ही अर्धामुर्धा गहूं देखील उपटून टाकणार असें दिसतें." लष्करी कायदा सुरू करण्याविषयीं सूचना आली असतां ते म्हणतात, "लष्करी कायदा म्हणजे कायदा गुंडाळून ठेवणें असाच मी त्याचा अर्थ करितों. पण ह्या लष्करी कायद्यानें इटाली, रशिया व आयर्लंड या देशांतील खुनांच्या कटांचा बीमोड झाला नाहीं आणि हिंदुस्थानांतहि त्यांचा बीमोड होणार नाहीं." ता. १८ डिसेंबरच्या पत्रांत मोर्ले यांनीं लिहिलें कीं, "आरोपीच्या गैरहजेरींत त्याची चौकशी करण्याचें एकहि उदाहरण घडणार नाहीं अशी खबरदारी घ्या. त्या योगानें मोठा अन्याय होईलच असें नाहीं. पण त्या प्रकारावर

ऑस्ट्रियाचा किंवा रशियाचा छाप पडला असल्या कारणानें ती पद्धति हिडिस वाटते. " मोर्लेसाहेबांनीं दिलेला हा मंत्र कितपत पाळला गेला आहे हें बंगाल्यांतील अटकबंदांच्या यादीवरून आणि विशेषतः नवीन होणाऱ्या दडपशाहीच्या बिलावरून दिसून येतच आहे ! ज्या पद्धतींना मोर्ले रशियन व हिडिस अशीं नांवें ठेवतात तीच पद्धति आतां ब्युरॉक्रसीची आवडती बनली आहे.

नुसत्या संशयावरून शिक्षा करण्याच्या पद्धतीविषयीं मोर्लेना किती तिटकारा होता तो ता. १३ जानेवारीच्या त्यांच्या पत्रावरून स्पष्ट होतो. तें पत्र असें – " परवांच एका गृहस्थाचें एकाला पत्र आलें होतें त्यांत असा मजकूर आहे कीं, त्या व्यक्तीची ( नांव गाळलें आहे ) संघटनाशक्ति व लोकांवर वजन फार आहे आणि अत्याचाराच्या कृत्याविषयींहि त्या व्यक्तीची सहानुभूति आहे याविषयीं मला बिलकुल संशय नाहीं. असल्या या स्वतःच्या खात्रीवरून एखाद्या इसमाला चौकशी न करतां अटकेंत ठेवण्याचा सल्ला या गृहस्थानें द्यावा हें खरोखरीच भयंकर आहे. संशयाचा फायदा आरोपीस दिला पाहिजे हेंच तत्त्व योग्य असून तेंच आम्ही पाळलें पाहिजे. " मोर्लेसाहेबांनीं अधिकारन्यास केल्यापासून हें तत्त्व कितपत पाळण्यांत आलें आहे हें सांगितल्याशिवायहि कळण्याजोगें आहे. नव्या बिलांत तर या तत्त्वाची उलटापालट झाली असून संशयाचा फायदा आरोपीस मिळण्याऐवजीं संशयाचा फायदा सरकारच घेऊं पाहात आहे !

## गुप्त चौकशी व गुप्त फांशी

ता. ५ मेच्या पत्रांत मोर्ले लिहितात, " पार्लमेंटचे १५० सभासद हद्दपारीच्या पद्धतीविरुद्ध तक्रार करण्याकरितां ॲस्क्विथसाहेबांची मुलाखत घेणार आहेत. तेव्हां यापुढें तुम्हांस हद्दपारीचें शस्त्र सोडून द्यावें लागेल हें लक्षांत ठेवा. " परंतु प्रत्यक्ष अनुभव मात्र मोर्ले यांच्या अनुमानाच्या उलटच येत आहे. वरील पत्रानंतर पार्लमेंटांत प्रश्नोत्तरें झालीं; त्यांत अपराध्याला आरोप कळविल्याशिवाय अटकेंत ठेवणें आणि आपल्यावरील संशय दूर करण्याची त्यास संधि न मिळणें या दोषावर ताशेरा झाडण्यांत आला; आणि ब्रिटिशांची न्यायपद्धति व हक्क याविषयीं जी कल्पना आहे त्या कल्पनेमुळें चौकशीशिवाय शिक्षा करणें ही गोष्ट ब्रिटिशांना कधींहि रुचणार नाहीं असें सांगण्यांत आलें. या ब्रिटिश टीकाकारांनीं हल्लींचीं नवीं बिलें वाचलीं तर त्यावर त्यांचा अभिप्राय काय पडेल बरें ? गुप्त चौकशी करून शिक्षा करण्याची कल्पना देखील मोर्लेसाहेबांना असह्य वाटत होती. कर्झन-वायलीच्या खुनानंतर मदनलाल धिंग्राची चौकशी गुप्तपणें करावी अशी कोणी सूचना करतांच ते टोंचून लिहितात, " वा, गुप्त चौकशी करून फक्त फांसावर चढवावयाचें ही फारच नामी कल्पना ! " परंतु या नव्या दडपशाहीच्या दुसऱ्या बिलांत अथपासून इतिपर्यंत सगळा गुप्त कारभार आहे त्याला मोर्लेसाहेब कोणतें नांव ठेवणार !

## आयर्लंडचा व रशियाचा अनुभव

तरी पण दडपशाहीचे कायदे करण्याला परवानगी देण्याविषयीं ब्युरॉक्रसीचें टुमणें मागें लागलेंच होतें. त्यास त्रासून ता. २६ ऑगस्टच्या पत्रांत मोर्ले लिहितात, "उठल्याबसल्या हद्दपारीचा उपयोग करूं म्हणाल तर तें चालावयाचें नाहीं. आयर्लंडमध्यें १८८७ सालीं फॉर्स्टरनें जो 'क्राइम्स ॲक्ट' केला तसला ॲक्ट तुम्हांस पाहिजे. पण त्या ॲक्टानें आयर्लंडांतले गुन्हे नाहींसे झाले नाहींत आणि मी स्वतः स्टेट सेक्रेटरी असतांना 'चौकशीशिवाय अटकबंदी' करण्याच्या कायद्याला संमति मिळेल ही कल्पनाच अशक्य व असह्य आहे. १८१८ चे रेग्युलेशन्सच पचनीं पडणें कठिण जात आहे आणि तुम्ही तर त्या रेग्युलेशन्सच्या नमुन्यावर कायमचा कायदा करूं इच्छितां यास काय म्हणावें ! दडपशाहीचें हें नवें यंत्र निर्माण करण्याची कल्पना सोडून देण्यास सांगा." होय ! जोंपर्यंत मोर्ले सेक्रेटरी होते तोंपर्यंत ब्युरॉक्रसीनें ही कल्पना बाजूस ठेविली; पण आतां तिला 'निर्वीर्यमुर्वीतलम्' झाल्यानें तीच कल्पना नव्या बिलाच्या रूपानें पुढें येत आहे !

नवीन सुधारणेची योजना जाहीर करण्याच्या वेळीं बंगाल्यांतील हद्दपारी झालेल्यांना मुक्त करावें अशी मोर्लेनीं शिफारस केली ती लॉर्ड मिंटो यांना मान्य झाली नाहीं. त्यावर मोर्ले लिहितात, "तुम्ही आपल्या कृतीचें उत्तम समर्थन करतां; परंतु नेदर्लंडांतील स्पॅनिश व्हाइसरॉय, वेनिस येथील ऑस्ट्रियन व्हाइसरॉय, सिसिली बेटांतील बुर्बान अधिकारी व अमेरिकन वसाहतींतले ब्रिटिश अधिकारी यांचीहि हीच विचारसरणी होती; पण या तुलनेबद्दल राग मानूं नका." नंतर ता. २९ जानेवारीच्या पत्रांत ते आणखी लिहितात, "केवळ 'हम करेसो कायदा' या तत्त्वानें कोणासहि उचलून अटकेंत ठेवण्याचा कायमचा अधिकार आम्हांस पाहिजे असें म्हणाल तर मी त्यास जोरानें प्रतिकार करीन. नऊ बंगाली गृहस्थांना अटकेंत ठेवण्यानें इतरांना दहशत बसते असें तुम्ही म्हणतां. रशियन ब्युरॉक्रसीचीहि अशीच कल्पना होती कीं, संशयित इसमांच्या गाड्याच्या गाड्या भरून सायबेरियाला रवाना केल्या म्हणजे अत्याचारी लोकांना दहशत बसेल. परंतु ती युक्ति रशियांत सुपरिणामी झाली नाहीं व तिच्या योगानें ट्रेपॉफसारख्यांचे जीवहि बचावले नाहींत आणि ट्रेपॉफसारख्यांना जी ड्यूमा सभा डोळ्यासमोर देखील नको होती ती ड्यूमा स्थापन झाल्याखेरीज राहिली नाहीं !"

## पालथ्या घागरीवर पाणी

मोर्लेसाहेबांचा हा आजीबाईसारखा उपदेश सुरूच होता आणि इकडे ब्युरॉक्रसीची दडपशाही चढत्या प्रमाणावर होती. अखेरीस मिंटोसाहेबांनीं आपला नवा बडा प्रेस-ॲक्ट संमतीकरितां पाठविला. त्या वेळीं सर लॉरेन्स् जेन्किन्स् तेथें नव्हते आणि मोर्लेसाहेबांना कायद्याचे छक्केपंजे अवगत नसल्यानें 'हायकोर्टाकडे अपील

करण्याचा अधिकार ठेविला आहे’ एवढ्या समजुतीवरच त्यांनीं त्यासहि आपली संमति देऊन टाकिली !

यानंतर बादशहा सातवे एडवर्ड परलोकवासी होऊन पंचम जॉर्ज राज्यारूढ झाले. या समारंभाच्या वेळीं राजकीय कैद्यांना बंधमुक्त करावें अशी मोर्ले यांनीं शिफारस केली; परंतु मिंटोंनीं तीहि अंमलांत आणली नाहीं.

‘मोर्लेसाहेबांच्या आठवणीं’तला दडपशाहीसंबंधीं अभिप्राय व असल्या पद्धतीविषयींचा त्यांचा तिटकारा यांस अनुसरून असलेले उल्लेख वर दिलेच आहेत. यावरून त्याचा हल्लींच्या नव्या दडपशाहीविषयीं काय अभिप्राय पडेल हें उघड दिसतच आहे. परंतु मोर्लेसाहेब स्वतः स्टेट सेक्रेटरी असतां त्यांना धाब्यावर बसवून ज्या ब्युरॉक्रसीनें आपली दडपशाही चालूच ठेविली ती ब्युरॉक्रसी मोर्ले यांच्या ‘आठवणी’ला कितपत मान देणार ? तरी पण यावरून उदारमतवादी ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या मतानें देखील ब्युरॉक्रसीचीं कृत्यें किती तिरस्कारार्ह आहेत तें दिसून येतें. मग हिंदी लोकांना ही दडपशाही त्याज्य व निषेधार्ह वाटल्यास त्यांत नवल तें काय ?

---

## प्रायश्चित्ताच्या वेळींच नवें पाप ६

[ हिंदी जनतेचें सांत्वन करण्याकरितां ड्यूक ऑफ कनॉट यांना बादशाहांनीं शिष्टाईसाठीं पाठविलें व त्यांनीं दिल्लीच्या दरबारांत ‘ झालें गेलें तें विसरा, नव्या मनूंत आतां असली दडपेगिरी घडणार नाहीं ’ असें म्हणून नोकरशाहीच्या हातून मागें घडलेल्या अत्याचाराच्या पापाबद्दल शाब्दिक पश्चात्तापाचें प्रायश्चित्त घेतलें. पण ही शिष्टाई तिकडे चालू असतांनाच, ड्यूकसाहेब परत बोटीवर चढेपर्यंतहि धीर न धरतां मद्रास सरकारनें याकूब हुसेन व गोपाळ मेनन या दोघां पुढाऱ्यांवर भाषणबंदीचा हुकूम फर्मावून व जामीन मागून खटला भरला आणि त्यांना सहा महिने कारावासाची सजा दिली. या दडपशाहीचा या लेखांत तीव्र निषेध असून नोकरशाहीचा नैसर्गिक उद्दामपणा समूळ निपटून काढण्याला स्वराज्याचे खरे हक्क संपादन करणें व त्यासाठीं निकराची चळवळ स्वार्थत्यागपूर्वक व धिटाईनें चालविणें किती आवश्यक आहे याचा ऊहापोह या लेखांत आहे. ]

( केसरी, दि. २२ फेब्रुवारी १९२१ )

"*Even in penance planning sins anew*"
– Oliver Goldsmith

## राष्ट्रीय चळवळीचीं अवस्थांतरें

कोणत्याहि देशांतल्या कसल्याहि चळवळीचा इतिहास पाहण्यांत त्या चळवळीचीं चार अवस्थांतरें आढळून येतात. प्रथम तिरस्कारपूर्वक दुर्लक्ष, पुढें प्रत्यक्ष विरोध, त्यानंतर तडजोड आणि अखेरीस यशःप्राप्ति असें हें अवस्थाचतुष्टय असतें. कोणत्याहि नव्या चळवळीचा उदय झाला कीं, उगाच चार उपद्यापी मंडळींनीं ही टुरटूर लावली आहे असा शिक्का तिच्या कपाळावर प्रतिपक्षाकडून आरंभीं मारण्यांत येतो. या तिरस्कारावस्थेंतून ती टिकली आणि दिवसेंदिवस तिचें बाळसें वाढत चाललें म्हणजे प्रतिपक्षांकडून प्रत्यक्ष विरोध होऊन झटापटीस प्रारंभ होतो. या विरोधकालांतच त्या चळवळीला खरी कसोटी लावली जाते आणि 'हेम्नः संलक्ष्यतेह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापिवा ' या न्यायानें कलहाग्नींत जें टिकेल तें खरें सोनें, नाहीं तर तें सोनापितळ असा निर्णय होतो. प्रतिपक्षाला चारीमुंडे चीत करण्याची आशा नष्ट झाली आणि उलटपक्षीं तोच आपल्या छातीवर बसेल कीं काय अशी धाकधूक वाटूं लागली म्हणजे तिसरा तडजोडीचा अवस्थाकाल आला असें समजावें. यावेळीं चळवळवाले जर अल्पसंतुष्ट असतील अथवा त्यांच्या अंगीं आत्मप्रत्ययाचा अभाव असेल तर ते 'त्वयार्धं मयार्धं' या तडजोडीला कबूल होतात. परंतु आणखी थोडी कळ सोसल्यास सगळेंच फळ आपल्या पदरांत पडेल आणि तितकी कळ सोसण्याचें बळ आपल्या अंगीं आहे असा ज्यांस दृढ विश्वास असतो ते या 'त्वयार्धं मयार्धं 'ला न जुमानतां ती चळवळ तशीच पुढें चालवून शेवटची यशःप्राप्तीची पायरी गांठतात. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेची चळवळ पहिल्या तीन अवस्थांतरांतून निभावून चवथ्या प्रदेशांत आली आहे; आणि या शेवटच्या झटापटींत तिच्या पोटांतून असहकारिकतेची उपचळवळ प्रगट झाली आहे.

या असहकारितेच्या चळवळीनें तर सहा महिन्यांच्या आंतच पहिला पल्ला आक्रमून दुसऱ्या प्रदेशांत प्रवेश केला आहे. या चळवळीचा जन्म होऊन तिचें नामकरण होतें न होतें तोंच गोकुळांत वाढूं लागलेल्या गोपाळकृष्णाची जन्मपत्रिका वर्तविण्याच्या मिषानें जसा महाबळभट्ट पुढें आला आणि "हें मूल तुझ्या मूळावर जन्मलें आहे, तें तुझ्या कुलाचा घात करील यास्तव त्याला यमुनेंत जलसमाधि दे," असा नंदाला मानभावी उपदेश करूं लागला, तसाच उपदेश करण्यास दिल्लीचे बडे ज्योतिषी पुढें आले आणि त्यांनीं या बालकाला मूर्खांचा राजा ठरवून तें अल्पायुषी होईल असेंहि भाकीत केलें ! पण चार पांच महिन्यांतच हें बालक चांगलें बाळसेंदार होऊन रांगूंहि लागलें आणि अल्पावधींतच त्याच्या रांगण्याला हिंदु-

स्थानचें आंगणहि पुरेनासें झालें. अर्थातच नोकरशाहीस कळून चुकलें कीं, ही चळवळ उपेक्षावस्थेच्या पुढें गेली असून तिला प्रत्यक्ष विरोधच केला पाहिजे.

### दडपशाहीचें हत्यार बाहेर निघालें

प्रत्यक्ष विरोध करून ही चळवळ चिरडून टाकावयाचा मनांतून निश्चय झाला तरी नोकरशाहीला कात्रींत सांपडल्याप्रमाणें झालें. हिंदुस्थानांतील बहुमत-दर्शक राष्ट्रीय सभा नवीन सुधारणा स्वीकारण्यास तयार नाहीं, कारण ती सुधारणा अगदींच कवडीमोल नसली तरी दमडीमोल आहे व तिच्या योगानें पंजाबच्या व खिलाफतीच्या जखमा बऱ्या होऊं शकत नाहींत, हें जगजाहीर झालें असतां या नोकरशाहीनें स्वतःचे डोळे मिटून इंग्लंडला आंधळें बनविण्याचें पाप केलें आणि हिंदुस्थानांतील जनता नव्या कायदेकौन्सिलांवर सर्वत्र बहिष्कार घालीत असतां हीं कौन्सिलें उघडण्याच्या समारंभाचें नाटक करण्याचें ठरवून कनॉटच्या ड्यूकसाहेबांना सूत्रधार होण्याला पाचारण केलें. हेतु हा कीं, एवढें मोहरे इरेस घातले असतां आपल्या पाठीमागचा शह चुकेल. पण नोकरशाहीचा हा डाव तिलाच बाधक झाला. हिंदुस्थानांतील सर्व जनता नवीन सुधारणा स्वीकारण्यास उत्सुक असून आपल्या आगमनाची चातकाप्रमाणें मार्गप्रतीक्षा करीत आहे, अशी बतावणी करून ड्यूकसाहेबांना इकडे आणविलें असल्यामुळें आतां त्यांच्या डोळ्यादेखतच धरपकड कशी सुरू करावी असें तिला कोडें पडलें, आणि एकदाचें हें नाटक संपून मुंबईच्या बंदरावर भरतवाक्य म्हणेपर्यंत दडपशाहीचें हत्यार म्यानांतून बाहेर काढावयाचें नाहीं असा नोकरशाहीनें आपला कार्यक्रम ठरविला होता. पण अंगांत कायमचा मुरलेला दडपशाही उद्दामपणा नाटकाची बतावणी संपेपर्यंत आवरून धरण्या-इतकेंहि आत्मसंयमन नोकरशाहीला नसल्यामुळें तो मधून मधून चोरून-मारून प्रगट होतच होता, आणि पडद्याबाहेर शांतिपाठाचा घोष चालू असतांहि पडद्याच्या आंतून शस्त्रांचा खणखणाट कानावर आल्याविना राहात नव्हता. कोठें शेतकऱ्यांच्या जमावावर गोळीबार कर, कोठें विद्यार्थ्यांना छड्या मार, कोठें सभाबंदीचा हुकूम सोड, तर कोठें अटक नदी ओलांडण्यास अटक कर असली भावी झगड्याची रंगीत तालीम पडद्याआड चालूच होती. ड्यूकसाहेब मुंबईच्या बंदरांतून बोटींत पाय ठेवून केव्हां एकदां या देशाला रामराम ठोकतील आणि केव्हां एकदां आपण हें अंगीकारलेलें सोंग पुरें करून मनसोक्त धिंगाणा घालण्यास मोकळें होऊं असें नोकरशाहीला झालें होतें. यामुळेंच काकासाहेबांचा कार्यक्रम शक्य तितका आटप-शीर आंखलेला असावा. तरी पण एवढे आठ-दहा दिवसहि नोकरशाहीस धीर धरवेना आणि नाटकाचा दिल्ली-नगरप्रवेशाचा मुख्य अंक संपतांच आटलें काम झालें असें म्हणून नोकरशाहीनें आवेशयुक्त उतावीळपणानें आपलें दडपशाहीचें खरें नैसर्गिक उग्र:स्वरूप पुनः प्रकट केलें.

मद्रासच्या ब्यूरोक्रॅटांना आपलें नारसिंहरूप दाखविण्याची कितीहि आतुरता वाटत असली तरी त्यांनीं दिल्लीस चाललेल्या शांतरसप्रधान नाटकाचा असा एका झटक्यासरशीं रसभंग करावयाचा नव्हता! दिल्ली नगरांत शांतिपाठाचे किती गोडवे गाइले जात होते, ड्यूकसाहेब काकुळतीनें सांगत होतें कीं, बाबांनों, उगीच मागल्या आठवणी काढून मनःसंताप कां करून घेतां? आतां हा नवा मनु सुरू झाला, यांतील शांतिसुखाची गोडी चाखा. व्हाइसरॉयहि आग्रहतेनें बजावीत होते कीं, एकतंत्री सत्तेला कायमची मूठमाती दिली, आतां यापुढें सर्व कारभार लोकप्रतिनिधींच्या तंत्रानें चालावयाचा! आणि या मोहक अभिवचनावर जनतेचा विश्वास बसावा म्हणून ना. शास्त्री व खासदार जमनादास यांच्या ठरावांना पहिल्याच बैठकींत अग्रपूजेचा मान देण्यांत आला. पण मद्रास इलाख्यांतील नोकरशाहीनें आपल्या कृतीनें दिल्लीच्या दरबारी भाषेंत खरें तथ्य कितीसें असतें याचें गौप्यस्फोटन करून त्या सर्वांस तोंडघशीं पाडलें!

## याकूब हुसेन व गोपाळ मेनन यांना शिक्षा

मद्रास इलाख्यांतील सुप्रसिद्ध मुसलमान पुढारी आणि खिलाफत सेंट्रल कमिटीचे सन्मान्य चिटणीस याकूब हुसेन हे गोपाळ मेनन प्रभृति तिघां अनुयायांसह मलबार जिल्ह्यांत कालिकत शहरीं व्याख्यानाकरितां दौऱ्यावर गेले होते. त्या जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. थॉमस् यांनीं तत्पूर्वीच तेथें कांहीं दडपादडपी सुरू केली असल्याचीं गाऱ्हाणीं याकूब हुसेन प्रभृतींच्या कानावर आलीं होतीं व त्या गाऱ्हाण्यांचा विचार करून दाद लावून घेणें हा त्यांचा तेथें जाण्यांत हेतु होता. अनियंत्रित सत्तेस चटावलेल्या नोकरशाहीला एवढीहि धिटाई खपेना व डि. मॅजिस्ट्रेटनें एकदम सभाबंदीचा हुकूम दिला. याकूब हुसेनसारखे पुढारी व्याख्यानाकरितां इतक्या दुरून आल्याची वार्ता ऐकून हजारों श्रोते त्यांच्या तोंडचे चार उपदेशपर शब्द श्रवण करण्यास अत्यंत उत्कंठित झाले होते. अशा वेळीं त्यांच्या आशेचा भंग झाल्यास शांततेचाहि भंग होईल अशी याकूब हुसेन यांस धास्ती वाटून त्यांनीं कांहीं तरी सांत्वनपर चार गोष्टी सांगून त्यांची समजूत पाडण्याचा विचार ठरविला. परंतु डि. मॅजिस्ट्रेट निमित्तालाच टपलेले; त्यांनीं लगेच दुसरा हुकूम काढून चौघांहि पुढाऱ्यांना गिरफदार करून आपल्यासमोर आणविलें आणि बदमाष उडाणटप्पूंच्या बंदोबस्ताकरितां जें कलम क्रि. प्रो. कोडमध्यें घातलेलें आहे त्याचा नेहमींप्रमाणेंच दुरुपयोग करून सहा महिने शांतताभंग न करण्याविषयीं दोन-दोन हजारांचा जामीन देण्याला फर्माविलें. असला हा अन्यायाचा, बळजबरीचा आणि उपमर्दकारक प्रकार पाहून याकूब हुसेन प्रभृति चौघांहि पुढाऱ्यांनीं जामिनकी देण्याचें साफ नाकारलें आणि मॅजिस्ट्रेटनें त्यांस सहा महिन्यांची सजा देऊन सरकारच्या पाहुणचाराकरितां कानानोरला त्यांची पाठवणी केली!

याकूब हुसेन प्रभृति मद्रासी पुढाऱ्यांनीं या प्रसंगीं दाखविलेलें धैर्य अत्यंत अभिनंदनीय आहे व त्याबद्दल सर्वत्र त्यांचें अभिनंदन करण्यांत येत आहे. विशेषतः ते अलिगड युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी असल्यानें त्यांच्या विद्यार्थी बंधूंकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रकार्य करीत असतां आपल्याकडून अणुमात्रहि अन्यायाची आगळिक झाली नसून नोकरशाही जर न्यायबुद्धि गुंडाळून ठेवून भलभलतें भकूं लागेल तर तिच्या कृतीचा सत्याग्रहानें प्रतिकार करणें हाच खरा मार्ग होय व त्या मार्गांतील संकटास न जुमानतां जो बेगुमानपणें तोंड देतो तोच खरा राष्ट्रवीर होय. याकूब हुसेन यांस शिक्षा सांगतांना मॅजिस्ट्रेटनें त्यास असा इशारा दिला कीं, कारागृहांतील सासुरवास तुम्हांस सोसवणार नाहीं याचा विचार करा. त्यावर याकूब हुसेन यांनीं ताडकन् उत्तर दिलें कीं, असल्या धमकीनें नमण्याइतका मी कच्च्या दिलाचा अदमी नाहीं; तुम्हांला काय शिक्षा करावयाची असेल ती खुशाल करा! अशा रीतीनें ही मद्रासी पुढाऱ्यांची चौकडी कानानोरच्या कारागृहाला पुनीत करण्याकरितां मोठ्या आनंदानें तिकडे गेली.

याकूब हुसेन व त्यांचे जोडीदार यांचें हें मनोधैर्य आणि नोकरशाहीचा आततायीपणा यांचा जनतेच्या मनावर योग्य तोच परिणाम होत आहे. ठिकठिकाणीं अभिनंदनपर सभा भरून त्यांच्याकडे संदेश रवाना होत आहेत. मलबार जिल्ह्यांत जागजागीं हरताळ घालण्यांत येऊन नोकरशाहीचा निषेध करण्यांत येत आहे; वकील आपली वकिली तहकूब करीत आहेत; विद्यार्थी शाळांवर बहिष्कार घालीत आहेत. मद्रासेहून राजगोपाळाचार्य प्रभृति पुढारी कालिकत येथील परिस्थिति पाहण्याकरितां तेथें समक्ष गेले आहेत. याकूब हुसेन यांस अटक झाल्याचें वृत्त वाचतांच मद्रास कौन्सिलांतील एका सभासदानें कौन्सिलचें काम तहकूब ठेवण्याची सूचना पुढें आणली आणि तिला दहांहून अधिक सभासदांनीं अनुमति दर्शविल्यामुळें अध्यक्षास त्या सूचनेवर चर्चा करण्याची परवानगी द्यावी लागली, आणि त्या कौन्सिलांत नोकरशाहीच्या या अत्याचारावर खरमरीत टीका करण्यांत आली.

### दडपशाहीच्या कायद्याची बजावणी तहकूब नाहीं

याकूब हुसेन वगैरेंना तुरुंगवासांत सहा महिने काढावे न लागतां तत्पूर्वी लवकरच वरिष्ठ सरकारच्या हुकुमानें त्यांची मुक्तता होईल आणि मद्रास इलाख्याच्या एका कोपऱ्यांतील एखाद्या मॅजिस्ट्रेटनें चुकून कांहीं आगळीक केली तर तेवढ्यावरून सगळीच नोकरशाही पूर्वीच्या वळणावर गेली असें म्हणतां येणार नाहीं अशी जी कित्येकांची विचारसरणी आहे तींत बिलकूल अर्थ नाहीं. या अन्यायाचा फारच बभ्रा झाला, सगळीकडूनच निषेध होऊं लागला आणि विशेषतः ड्यूकसाहेबांची स्वारी हिंदुस्थानचा किनारा सोडून जाण्यापूर्वीच असला उतावळेपणा करणें हें आपल्या कारस्थानास शोभत नाहीं म्हणून कदाचित् डि. मॅजिस्ट्रेट

... वाचनालय. ...



थॉमस् यांचा कान पिरगाळण्यांत येईल आणि आमचे हे देशभक्त मद्रबंधु बंध-मुक्तहि होतील. पण तेवढ्यावरून ही दडपशाहीची झडप वैयक्तिक आहे, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या धोरणाविरुद्ध आहे असें मानण्याचें कारण नाहीं. मद्रासचे हल्लींचे गव्हर्नर लॉर्ड वुइलिंग्डन् हे मुंबई इलाख्यांतील जनतेच्या पूर्ण परिचयाचे असून लो. टिळक व बेझंटबाई यांच्या भाषणबंदीचे हुकूम त्यांच्याच हुकमतीनें निघाले होते. यावरून आणि हल्लींच्या नव्या मन्वंतरांतहि मद्रास कौन्सिलांत त्यांचें जें धोरण दिसून आलें आहे त्यावरून त्यांना या अन्यायाची चीड येईल व त्याबद्दल ते डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटास जाब विचारतील असें वाटत नाहीं आणि हें दडपशाहीचें वारें नुसत्या मद्रास इलाख्यांतील कालिकतच्याच मॅजिस्ट्रेटच्या कानांत भरलें नसून पंजाबांत, सरहद्दीवर, बहारच्या बाजूस व मध्यप्रांताच्या मध्यभागींहि तें वारें वाहत असून त्याची झुळूक हळुंहळू एकेकास बाधूं लागली आहे. नोकरशाहीच्या अधिपतीकडे पहावें आणि त्यांची उक्ति सोडून कृतीचें निरिक्षण करावें म्हणजे तिच्यांत नवीन मन्वंतराचें प्रतिबिंब क्वचितच आढळून येईल. फार कशाला, ना. शास्त्री यांच्या ठराबावर बोलतांना सर वुइल्यम् व्हिन्सेंट् यांनीं साफ सांगितलें कीं, दडपशाहीचे कायदे दुरूस्त करण्याचा विचार करण्याकरितां कमिटी नेमली तरी कमिटीचें काम चालू असेपर्यंत सदर कायद्यांची बजावणी तहकूब ठेवण्याला आम्ही तयार नाहीं ! त्याचप्रमाणें जमनादास यांच्या ठरावावर भाषण करतांना सर मायकेल ओडवायर यांच्या दडपशाहीचा धिक्कार न करतां उलट तिचा पुरस्कारच करण्यांत आला ! यावरूनहि हेंच अनुमान निघतें आणि तेंच बरोबर आहे. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं म्हणतात त्याप्रमाणें नोकरशाहीची ही सोटेशाही तिच्या हातांतील सोटा काढून घेईपर्यंत जाणार नाहीं. दडपशाहीच्या कामीं ही नोकरशाही इतकी निर्ढावलेली आहे कीं, गोल्डस्मिथनें इटालियन लोकासंबंधीं उद्गार काढल्याप्रमाणें पहिल्या पापाचें प्रायश्चित्तोदक पितां पितां पुढल्या पापाचा विचार तिच्या मनांत घोळत असतो. ड्यूकसाहेबांच्या समजुतीकरितां बडे लाट आणि जनतेच्या सांत्वनाकरितां स्वतः ड्यूकसाहेब नव्या मन्वंतराचे कितीहि गोडवे गावोत आणि गतगोष्टी विसरून जाण्याविषयीं कितीहि काकुळतीनें गळ घालोत, जोंपर्यंत नोकरशाहीचा दृष्टिकोन बदलल्याचा स्पष्ट पुरावा दृष्टिपथावर येत नाहीं आणि उलटपक्षीं जुन्या दडपशाहीवर नव्या जुलमाचीं पुटें चढत आहेत तोंपर्यंत कलियुग जाऊन सत्ययुग आलें असें मानण्याइतकें राष्ट्रीय पुढारी दुधखुळे नाहींत.

### असहकारितेचा रामबाण उपाय

असो. नोकरशाही आपल्या वळणावर जावयाची ती गेलीच, पण जनतेनें मात्र या वेळीं आपलें कर्तव्य करण्यास कचरतां कामा नये. तुरुंगवासाच्या बागुल-

बुवास आतां स्त्रियाहि भीत नाहींत हें सुचिन्ह आहे. याकूब हुसेन व गोपाळ मेनन यांच्या पत्नी धैर्यानें मद्रासेंत स्त्री-वर्गांत असहकारितेच्या तत्त्वाचा प्रसार करणार आहेत. त्याचप्रमाणें पुरुष वर्गानेंहि या उदाहरणावरून योग्य धडा घेऊन आपली चळवळ जास्त नेटानें चालविली पाहिजे. नव्या मनूंत जुने जुलमी प्रकार होणार नाहींत अशा अर्धवट समजुतीनें जे कौन्सिलर्स सहकारितेला अनुकूल झाले आहेत त्यांनीं हा ताजा अनुभव पाहून तरी सावध व्हावें. अस्सल मवाळाविषयीं तर बोलावयासच नको. कारण त्यांचा नोकरशाहीवर इतका अढळ विश्वास आहे कीं, तिनें प्रत्यक्ष मान कापली तरी ती आपल्या हिताकरितांच कापली जात आहे असें ते म्हणतील व उलट त्यांच्या कौशल्याची तारीफच करीत बसतील. पण जे सहकारितावादी इतके श्रद्धान्ध झाले नसतील त्यांनीं तरी या मदान्ध ब्युरॉक्रसीचे हे चाळे पाहावे आणि असले प्रकार स्वराज्याचे पूर्ण हक्क प्राप्त झाल्याशिवाय बंद पडणार नाहींत हें पक्कें जाणून स्वराज्यप्राप्तीच्या असहकारितेच्या रामबाण उपायाचें आतां तरी अवलंबन करावें. ड्यूकसाहेबांच्या हातून प्रायश्चित्तविधि होत असतांनाच जी नोकरशाही नवें पाप करण्यास प्रवृत्त होते तिच्या शब्दावर अतःपर विश्वास ठेवणें म्हणजे स्वतः देशद्रोहाचें पाप करण्यासारखेंच आहे.

---

## संजय-शिष्टाई ७

[ हिंदुस्थानांत जालियनवाला बाग प्रकरण झाल्यानंतर असहकारितेचा उदय झाला आणि हिंदी जनतेंतील असंतोष असहकाराच्या रूपानें प्रकट होऊं लागला. त्या वेळीं बादशहांनीं आपले काका ड्यूक ऑफ कनॉट यांना हिंदी लोकांची समजूत घालण्याकरितां पाठविलें. पांडवांचा अज्ञातवास संपवून ते आपलें राज्य परत मागूं लागले असतां धृतराष्ट्रानें पांडवाकडे शिष्टाई करण्याकरितां संजयाला पाठविलें. त्या वेळची संजयाची शिष्टाई व या वेळची ड्यूकसाहेबांची शिष्टाई यांत किती साम्य आहे हें दर्शवून असल्या शिष्टाईनें राष्ट्राची दिशाभूल होऊं नये असा इशारा देण्याकरितां हा लेख लिहिला आहे. ]

### या शिष्टाईचें स्वरूप

शिष्टाई शब्द कानीं पडतांच स्वाभाविकपणें श्रीकृष्णशिष्टाईची आठवण होते; कारण चंद्राच्या स्वच्छ चांदण्यांत जसा लहानसहान चांदण्यांचा लोप होतो

( केसरी, दि. १ मार्च १९२१ )

तसा कृष्णशिष्टाईच्या तेजापुढें इतरांच्या शिष्टाईचा स्मृतिलोप झालेला असतो. त्यांतूनहि डोकें खाजवून आठवण केलीच तर अंगदशिष्टाई डोळ्यापुढें उभी राहते. आज आपणांस कृष्णशिष्टाईचा किंवा अंगदशिष्टाईचा विचार कर्तव्य नसून संजयशिष्टाईचीच चर्चा करावयाची आहे. चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, कनॉटचे ड्यूकसाहेब जे हिंदुस्थानांत आले होते ते हिंदी जनतेस कांहीं विशिष्ट संदेश सांगण्याकरितां, अर्थातच एक प्रकारची शिष्टाई करण्याकरितां, आलें होतें. आमचे हक्क किंवा अधिकार आम्हांस परत द्या अशी मागणी करण्याकरितां श्रीकृष्णानें आणि अंगदानेंहि शिष्टाई केली. ड्यूकसाहेब कांहीं असली शिष्टाई करण्याकरितां आले नव्हते, कारण हिंदी जनतेनें दुसऱ्या कोणाचें कांहीं लुबाडलेलें नाहीं तर तिच्याकडे मागणी करावयास तरी कोण कसा येणार ! तथापि ड्यूकसाहेबांना हिंदी जनतेजवळ एक मागणी करावयाची होती व ती त्यांनीं दिल्ली शहरीं केली. ती मागणी 'झालें गेलें तें विसरा आणि क्षमा करा' (Forget and Forgive) ही होय. महाभारतांतील जी संजयशिष्टाई तीहि असल्याच स्वरूपाची होती. ड्यूकसाहेबांच्या या शिष्टाईत व संजयशिष्टाईत पदोपदीं विलक्षण साम्य आढळून येतें. परंतु प्रत्येक पदागणिक त्याचें दिग्दर्शन करण्याचें कारण नाहीं; महाभारताच्या वाचकांस त्याचें मर्म लक्षांत येईलच.

पंजाबांत आपल्या लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांकडून जे अत्याचार घडले आणि खिलाफतीच्या प्रकरणांत हिंदी मुसलमानांचीं जीं मनें दुखावलीं गेलीं त्याच्या प्रतिकारार्थ कांहीं तरी उपाययोजना केल्यावांचून हिंदी जनतेची प्रक्षुब्ध मनोवृत्ति शांत होणार नाहीं हें ब्रिटिश मंत्रिमंडळास कळून चुकलें. पण अधिकारी वर्गास शासन करण्याचा हिंय्या करवत नाहीं. आणि आपल्या चिकट मुठींतून अधिकारदानाचें उदकहि सोडवत नाहीं. अशा अडचणींत केवळ शाब्दिक आश्वासनानें हिंदी जनतेचें सांत्वन करण्याचा डाव टाकून पाहण्याचें मंत्रिमंडळानें ठरविलें आणि त्या कामगिरीवर हिंदी जनतेच्या पूर्वपरिचयाचें, लष्करी बाण्याचें, उमद्या मनाचे जे ड्यूकसाहेब त्यांची योजना करण्यांत आली. ब्रिटिश मंत्रिमंडळाचें हें धाष्टर्य खरोखरीच अपूर्व होय. महात्मा गांधी हे अलीकडे नोकरशाहीला रावणशाहीची उपमा देत असतात. पण तिला रावणशाहीपेक्षां धृतराष्ट्रशाहीचीच उपमा अधिक समर्पक ठरेल. कारण रावणानें सीतादेवीला परत न पाठविण्याचा हट्ट चालविला तरी निदान उलट रामाकडे 'झालें गेलें तें विसरा' असला धट्टपणाचा निरोप तरी पाठविला नव्हता. ब्युरॉक्रसीला मात्र हिंदी जनतेच्या सात्त्विक वृत्तीमुळें आणि स्वतःच्या कर्तबगारीच्या घमेंडीमुळें तितका विवेक राहिला नाहीं. आणि तिनें पंजाब व खिलाफत-प्रकरण विसरून जा असें सांगण्याच्या अवघड कामगिरीवर ड्यूकसाहेबांची नेमणूक करून त्यांना विनाकारण संकटांत पाडलें.

विलायतेंतून इकडे येण्याला निघेपर्यंत किंबहुना मद्रासच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवीपर्यंत, ड्यूकसाहेबांना आपण अंगीकारलेल्या शिष्टाईचा फोलपणा लक्षांत आला नसेल. हिंदुस्थानांत जेव्हां आकाशपाताळ एक करून सोडणारी चळवळ व्हावी तेव्हां कोठें विलायतेंत तिचा अतिसूक्ष्म प्रतिध्वनि ऐकूं येतो. अशा रीतीनें तिकडील जनतेला अज्ञान स्थितींत ठेवण्यांत येतें. यामुळेंच ड्यूकसाहेबांची प्रथम दिशाभूल झाली असेल. त्यांना वाटलें असेल कीं, हिंदी जनतेला स्वराज्याचा कांहीं वांटा पाहिजे आहे, व तो देण्याचा महत्त्वाचा समारंभ आपल्या हातून होणार. हा स्वराज्याचा वांटा हिंदी जनतेच्या मागणीहून थोडासा कमी असेल व तेवढ्यामुळें कांहीं मूठभर अधाशी लोक असंतुष्ट राहिले असतील; पण सामान्य जनता हें अधिकारदान घेण्यास अत्यंत उत्सुक असेल आणि एवढा अधिकाराचा अंश दिला म्हणजे मागील सर्व दोषांचें परिमार्जन होईल. त्यांतून पंजाबांत कत्तल होऊन जो कांहीं प्राणघात झाला त्याच्याबद्दल होमाच्या शेवटीं ज्याप्रमाणें 'माक्षिकाकेशकीट-पतंगाद्युपघातादि दोषपरिहारार्थ' दोन आहुत्या टाकतात त्याप्रमाणें आपल्या मिठ्या भाषणाला गोड शब्दांचे दोन वळसे अधिक दिले म्हणजे काम भागेल. परंतु ता. १० जानेवारी रोजीं मद्रासच्या बंदरावर उतरल्यापासून तों तहतकाल मुंबईच्या धक्क्यावरून आगबोटींत चढेपर्यंत येथें त्यांनीं जे कांहीं पाहिलें, ऐकलें व मनन केलें असेल त्यावरून त्यांच्या लक्षांत आलें असेल कीं, या शिष्टाईची इमारत भलत्याच पायावर रचण्याचा प्रयत्न झाल्यामुळें आपले परिश्रम निष्फळ झाले.

### सर्वत्र अमृतसरची छाया

मद्रास शहरीं त्यांच्या स्वागताचा जो फार्स झाला आणि त्याची सुधारून वाढविलेली आवृत्ति कलकत्ता शहरीं निघाली. त्यावरून ड्यूकसाहेबांनीं ताडलें कीं, हिंदी जनतेच्या काळजाला झालेली जखम बरीच खोल असून ती चिघळूं लागली आहे. नुसत्या शाब्दिक सहानुभूतीच्या फुंकरानें ती जखम भरून येण्यासारखी नाहीं. दिल्ली शहरांत पोंचल्यावर तेथील बहुजनसमाजाची मनःस्थिति व वर्तणूक पाहून तर त्यांची पुरतीच खात्री पटली असेल. पण त्यांच्याजवळ सहानुभूतीच्या फुंकराशिवाय आणि 'माफ करा व विसरा' या कोरड्या निरोपाशिवाय जर दुसरीं कांहीं जडीबुट्टी दिलेलीच नव्हती तर ते तरी बिचारे काय करणार! शाब्दिक मंत्रप्रयोग करावयाचा तो त्यांनीं मनःपूर्वक करून पाहिला; परंतु त्या प्रयोगानें पंजाबच्या अत्याचाराची छाया कांहीं दूर होईना. मित्रसहराजाला ज्याप्रमाणें जेथें तेथें ब्रह्महत्त्या पाठीशीं उभी असल्याचा भास होई, किंवा संजयाला ज्याप्रमाणें पांडवाच्या प्रत्येक शब्दांत पांचाळीच्या मोकळ्या केशकलापाची जाणीव दृग्गोचर होई, तशी ड्यूकसाहेबांना सर्व हिंदुस्थानभर अमृतसरची छाया पडलेली दिसूं लागली आणि दिल्लीहून मुंबई इलाख्यांत आल्यानंतर तर त्यांच्या मनावर

या मनःस्थितीचा पगडा अधिकाधिकच बसला असावा. काकासाहेब हिंदुस्थानांत येतांना किती उमेदीनें व उत्साहानें आले असतील आणि परत जातांना त्यांचा केवढा मनोभंग झाला असेल याचें चित्र मनश्चक्षूसमोर उभें राहिलें म्हणजे कींव येते. ड्यूकसाहेबांसारखा राजघराण्यांतला बडा प्रतिष्ठित पाहुणा घरीं चालून आला असतां त्यांना अशा विमनस्क स्थितींत परत जावें लागावें ही गोष्ट 'अतिथिदेवो भव' हा उपदेश अहर्निश अक्षरशः पाळणाऱ्या आर्यांच्या मनास असह्य वाटते. पण त्यास हिंदी लोकांचा निरुपाय आहे. ड्यूकसाहेब येतांनाच जर रिकामे हात हलवीत आले. तर जातांनाहि त्यांना रिक्तहस्तेंच जावें लागल्यास तो दोष कोणाचा? पाहुणा घरीं आला म्हणजे त्यानें इतर कांहीं न दिलें तरी पोरांच्या हातांवर पांच बोरें तरी ठेवावीं असा शिष्टसंप्रदाय आहे? पण येथें पाहावें तो ड्यूकसाहेबांच्या फराळाच्या डब्यांत सगळाच खडखडाट; मग परत जातांना तो डबा लाडूकरंज्यांनीं भरला जावा अशी अपेक्षा त्यांनीं तरी कां करावी! त्यांतूनहि हिंदी लोक कांहीं पाश्चात्यासारखें कवडीचुंबक व कांटेकोर हिशेब करणारे नाहींत; तेव्हां त्यांनीं ड्यूकसाहेबांची पाठवणी त्यांच्या योग्यतेस साजेल अशी निरपेक्षपणें केली असती. परंतु सुतकीं घरांत दुखवट्याचा निरोप घेऊन आलेला गृहस्थ जर यजमानाचें सुतक फिटेपर्यंत वाट न पाहतां परत चालला तर त्यास यजमानाचा इलाज काय?

## ड्यूकसाहेबांनीं तथ्य हेरलें असेल

एवंच आपली ही संजयशिष्टाई निष्फळ झाली हें ड्यूकसाहेबांच्या लक्षांत आलें आहे. आणि अतःपर आपण असल्या शिष्टाईच्या भानगडींत पडणार नाहीं असेंहि त्यांनीं जाहीर केलें आहे. यांच्या वयोमानावरून व प्रस्तुतच्या त्यांच्या अनुभवावरून त्यांचा हा निश्चय स्वाभाविकच आहे. तथापि तूर्त त्यांनीं जी शिष्टाई पत्करली होती तिची यथासांग पूर्तता करून नंतरच ते आपला बेत अमलांत आणतील असें मानण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत ज्या कार्योद्देशानें ते आले होते तो हेतु जरी त्यांच्या किंवा नोकरशाहीच्या दृष्टीनें सफळ झाला नसला तरी हिंदी जनतेच्या दृष्टीनें तो सफळ झाला आहे. स्वराज्याचा जो लहानसा तुकडा हिंदी लोकांस देण्यांत आला आहे तेवढ्यानें आमचें समाधान झालेलें नाहीं; पंजाबांत लष्करी सोटेशाहीनें जो धिंगाणा घातला त्याबद्दल त्या दंगेखोरांस पूर्ण प्रायश्चित्त मिळून असला प्रकार पुनः न घडेल असा योग्य बंदोबस्त झाला पाहिजे; तुर्की तहाची फेरचौकशी होऊन मुसलमानांची किमान मागणी त्यांच्या पदरांत पडली पाहिजे आणि हिंदी राष्ट्राच्या हृदयास डाचणारी गुलामगिरीची स्थिति जाऊन त्यास स्वयंशासित राष्ट्राप्रमाणें स्वराज्याचे संपूर्ण अधिकार मिळाले पाहिजेत; तरच हिंदी जनता नोकरशाहीशीं एकदिलानें

सहकारिता करील, नाहीं तर तिची असहकारितेची तपश्चर्या अशीच चालू राहील, ही गोष्ट ब्रिटिश प्रधानमंडळाच्या कानावर यथातथ्य जाण्याला ड्यूकसाहेबांची 'चक्षुर्वैसत्यं' अशी साक्ष उपयोगी पडेल. आजपर्यंत आपण आपली ही मागणी राष्ट्रीय सभेच्या व इतर मार्गांनीं जाहीर करीतच आहों; परंतु विलायती पत्रांतून आणि नोकरशाहीच्या रिपोर्टांतून तिचें यथार्थ स्वरूप तिकडे न दर्शवितां विकृत स्वरूपच दर्शविलें जात आहे. पण आतां प्रत्यक्ष बादशाहांचे काकाच येथें येऊन सर्व गोष्टी समक्ष पाहून गेले आहेत. तेव्हां आतां इकडील जनतेचें खरें हृद्गत कळवून मदांध मंत्रिमंडळाच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. येथील नोकरशाहीनें ड्यूकसाहेबांना फारसें कोणास भेटूं दिलें नाहीं, स्वतंत्रपणें कोणाची मुलाखत घेऊं दिली नाहीं, फार तर काय पण दिल्ली राजधानीच्या चांदणी चौकांतून, किंवा मुंबापुरीच्या मोतीबाजारांतूनहि त्यांस फेरफटका करूं दिला नाहीं. यामुळें अवश्य प्रेक्षणीय अशा अनेक गोष्टी त्यांच्या पाहण्यांतच आल्या नसल्यानें ते बहुजनमनोगताविषयीं काय सांगूं शकतील अशी कित्येकास शंका येईल, परंतु ब्रह्माचा उपदेश करीत असतां 'गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु च्छिन्नसंशयाः' हा न्याय जसा लागू पडतो तसाच प्रकार येथें असून जनतेच्या केंद्रस्थानाचें अदर्शन हेंच प्रत्यक्ष दर्शनापेक्षां शतपटीनें ड्यूकसाहेबांच्या मनावर अधिक परिणामकारक झालें असलें पाहिजे.

## अहिंसा तत्त्वांतलें अद्भुत सामर्थ्य

अशा प्रकारें हिंदुस्थानांतील या दौऱ्याचा आपल्या मनावर जो परिणाम झाला असेल त्याचें यथातथ्य चित्र रेखाटणें हें ड्यूकसाहेबांचें कर्तव्यच आहे व तें ते निर्भीडपणें व निःपक्षपातपणें पार पाडतील तर हिंदी जनतेचा बराच कार्यभाग होईल. धृतराष्ट्रानें ज्याप्रमाणें संजयाला खोदखोदून प्रश्न विचारून समग्र माहिती मिळविली त्याप्रमाणें ब्रिटिश मंत्रिमंडळ जर ड्यूकसाहेबांचें अंतःकरण खुलें करून त्याचा ठाव घेईल तर त्यास काय दिसेल बरें ? पंजाबच्या बाबतींत जी भयंकर प्रमाद घडला त्याचें परिमार्जन किती केलें तरी तें थोडेंच आहे असेंच त्यांस आढळून येईल. लेडी मॅकबेथला आपल्या हातावर असलेला रक्ताचा डाग किती धुतला तरी जात नाहीं असा भ्रम झाला होता. नोकरशाहीच्या हातावरील रक्ताचा डाग तसा भ्रममूलक नसून तो खराखुराच आहे आणि त्याचा दुसरा विशेष हा कीं, तो डाग केवळ वरवरचा नसून ब्रिटिश राज्यपद्धतीमुळें तो नोकरशाहीच्या अंगीं खिळलेला आहे. हा डाग दूर व्हावा आणि पुनः त्याचा उद्भव अन्य ठिकाणीं वा अन्य स्वरूपानें होऊं नये याकरितां हिंदी जनतेला स्वराज्याचा दिखाऊ नव्हे तर भरीव हक्क दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं असेंच ड्यूकसाहेबांचें मत पडेल. त्याचप्रमाणें असहकारितेची चळवळ ही विशिष्ट वर्गाची व वरकरणी नसून

तिची व्याप्ति सर्व देशभर आणि सर्व वर्गांत आहे आणि त्या असहकारितेकारितां हजारों लोक आपल्या स्वार्थावर लाथ मारीत असल्यामुळें तें कांहीं तरी थोतांड नसून हिंदी जनतेच्या अंतःकरणास खराच पीळ पडला आहे असेंहि ड्यूकसाहेबांस कबूल करावें लागेल. मनुष्य स्वभावतःच उत्सवप्रिय असतो, असें असूनहि ज्या अर्थी ड्यूकसाहेबांच्या स्वागत-समारंभांत जनतेनें काडीमात्र भाग घेतला नाहीं व तीन-तीन दिवसांची हजारों रुपयांची प्राप्ति बुडवून हरताळ पाळला त्या अर्थी तो केवळ आपलें नाक खाजवून दुसऱ्यास खिजविण्याकारितां नसला पाहिजे हें हिंदी जनतेची तीस वर्षांपूर्वीची प्रवृत्ति पाहिलेल्या काकासाहेबांना कळल्याखेरीज कसें राहील? त्याचप्रमाणें ही असहकारितेची मोहीम किती शांतपणें आणि अत्याचारविरहित चालविली जात आहे व या अहिंसा तत्त्वांतच कसें अद्‌भुत सामर्थ्य सांठविलेलें असतें, हेंहि ड्यूकसाहेबांसारख्या अनुभविक मुत्सद्द्यांस सांगावयास नको. हा अनुभव कांहीं नवा नसून जगाच्या प्रारंभापासूनचाच आहे. संजयानें पांडवाकडची हकीकत सांगितल्यावर धृतराष्ट्राच्या तोंडूनहि असेच उद्गार निघाले कीं, मी 'शमप्रधान' धर्माला जितका भितो तितका आततायी भीमालाहि भीत नाहीं. अर्थातच हिंदी जनतेची असहकारितेची चळवळ अत्याचाररहित असल्यानें तिचा मोठासा गाजावाजा होत नसला तरी जगाला थक्क करून सोडण्यासारखें आत्मबल त्या चळवळींत आहे. आणि हें आत्मिक सामर्थ्य पाशवीबलानें हाणून पाडणें कठीण आहे. याच्यापुढें आपल्या तोफा रद्द आहेत, विमानांची गति कुंठित होणार आहे, बाँबचा स्फोट निष्फळ होणार आहे; बंदुकांचा नेमहि त्यावर चालणार नाहीं. हें रणगाजी ड्यूकसाहेबांच्या लक्षांत आलें नसेल काय? सारांश, हिंदी राष्ट्राचें गाऱ्हाणें काय आहे त्यांची चळवळ कोणत्या भक्कम पायावर उभारलेली आहे, तिची व्याप्ति किती विस्तृत आहे, तिच्याकारितां स्वार्थावर पाणी सोडण्यांत किती तत्परता दिसून येत आहे आणि या सर्वांवर- स्वराज्याचें संपूर्ण हक्क देणें एवढेंच एक औषध कसें रामबाण लागू पडेल याचा यथार्थ पाढा ड्यूकसाहेबांनीं ब्रिटिश अधिकारी मंडळापुढें वाचला तरच त्यांनीं हें शिष्टाईचें कार्य मनःपूर्वक कळकळीनें केलें असें सिद्ध होईल; आणि हिंदी जनतेकारितां त्यांनीं आपला हा खरा अभिप्राय मंत्रिमंडळापुढें मांडणें हेंच त्यांच्या उमद्या शीलास शोभणारें असल्यामुळें ड्यूकसाहेब कर्तव्यविन्मुख होणार नाहींत असें आम्हांस वांटतें.

# मुंबईच्या दंग्यापासून बोध घ्या ८

[ इ. स. १९२१ च्या नोव्हेंबरच्या १७ तारखेस त्यावेळचे युवराज विलायतेहून मुंबईस येऊन बंदरावर उतरले. त्यांच्या स्वागतावर बहिष्कार घालण्याचा आदेश कॉंग्रेसनें दिला होता. त्या आदेशास अनुसरून मुंबईत सर्वत्र हरताळ पाळण्यांत आला. त्या हरताळाच्या देखाव्यानें चिडून जाऊन कांहीं सरकारच्या बगलबच्यांनीं गांधी-टोपीवाल्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली. बहिष्कार टाकण्यांत हिंदु व मुसलमान या उभय समाजांचें एक मत असल्यानें मुंबईतला हा दंगा नेहमींप्रमाणें हिंदु व मुसलमान यांच्यामधला नसून एका बाजूस सरकारचे मिंधे युरेशिअन्स, ज्यू, पारशी इत्यादि लोक व दुसरीकडे कॉंग्रेसनिष्ठ हिंदु व मुसलमान असा हा दंगा होता. कॉंग्रेसचे अनुयायी असहकारितावादी असल्यानें पोलिसांनीं कॉंग्रेसवाल्यांना या दंग्यांत संरक्षण दिलें नाहीं, एवढेंच नव्हे तर उलट पक्षपात करून दंगेखोरांनाच मदत केली. कॉंग्रेसवाल्यांनीं अनत्याचाराच्या भ्रामक कल्पनेनें आत्मसंरक्षणार्थहि प्रतिकार केला नाहीं. यामुळें अनेकांना निष्कारण पीडा झाली, स्त्रियांची बेइज्जत करण्यांत आली आणि मालाचीहि नासधूस झाली. तरी अशा परिस्थितींत अनत्याचाराची व प्रतीकाराची योग्य मर्यादा कोणती तें ठरवून अनत्याचारवाद्यांनीं त्याप्रमाणें वागावें आणि असहकारितावाद्यांना पोलीस संरक्षण देऊं इच्छीत नाहीं तेव्हां असहकारितावाद्यांना आत्मसंरक्षणाची स्वावलंबी योजना केली पाहिजे, असा बोध मुंबईच्या या दंग्यापासून घेण्याविषयीं या लेखांत सुचविलें आहे.]

**खलेन धनमत्तेन नीचेन प्रभविष्णुना ।**
**पिशुनेन पदस्थेन हा प्रजे क्व गमिष्यसि ॥**

लक्ष्मीदास तेरसी यांनीं संदेश धाडला होता

हिंदुस्थानांतील शेंकडा ९० लोक नको नको म्हणत असतांना त्यांच्या निषेधाकडे दुर्लक्ष करून नोकरशाहीनें आपल्या हट्टानें युवराजांस इकडे आणविलें आणि आतां त्याचा दुष्परिणाम प्रगट होण्यास प्रारंभ झाला आहे. हिंदुस्थानाकडे

( केसरी, दि. २२ नोव्हेंबर १९२१ )

येण्याकरितां विलायतेंतून निघण्यापूर्वीच आपल्या आगमनावर बहुजनसमाजाकडून बहिष्कार घालण्यांत येणार आहे ही वार्ता युवराजांच्या कानावर गेली होती का नाहीं, न कळे. परंतु युरोप व आफ्रिका या खंडाची सरहद्द ओलांडून मुंबई इलाख्याच्या पहिल्या नाक्यावर येऊन पोंचतांच आपल्या स्वागताच्या संबंधांत केवढें रण माजून राहिलें आहे, याची निदान अंधूक तरी कल्पना राजपुत्रास आली असेलच. कारण इंडियन मर्चंट्स् चेंबर व ब्यूरो या संस्थेंत मानपत्रासंबंधानें दोन तट पडून मानपत्र देण्याचा ठराव बहुमतानें नापसंत ठरविला ही बातमी लक्ष्मीदास तेरसी यांनीं तारेनें एडनलाच युवराजांना कळेल अशी तजवीज केली होती. त्यांतूनहि त्यांस तेथें ती नच कळाली तरी मुंबई बंदरावर पाऊल ठेवण्यापूर्वी तरी ती त्यांच्या कानावर जावी या हेतूनें लक्ष्मीदास तेरसी यांनीं बिनतारी विद्युत्-संदेशाचाहि उपयोग केला होता. एवंच मुंबापुरींतील इस्लामी समाज, मुंबईंतील बडे हिंदी व्यापारी, मुंबईच्या विश्वविद्यालयाचे विद्यार्थी आणि मुंबई शहरांतील सामान्य जनता या सर्व वर्गांत युवराजांच्या स्वागतावर बहिष्कार घालण्याची तीव्र अहमहमिका चालू असतां मुंबई सरकारनें या वस्तुस्थितीकडे पूर्ण दुर्लक्ष करून युवराजांना एडन बंदरांत पाऊल ठेवतांना संदेश धाडला कीं, मुंबई इलाख्यांतील प्रजाजन आपलें फार मोठ्या प्रेमानें व उत्साहानें स्वागत करीत आहेत.

### नोकरशाहीला धाकधूक वाटूं लागली

वस्तुस्थितीचा सर्वस्वी विपर्यास करणारा असा हा संदेश युवराजांकडे धाडतांना मुंबई सरकारास अशी घमेंड वाटत असली पाहिजे कीं, स्वागतावर बहिष्कार घालण्याची जी चळवळ चालली आहे ती आपण सहज चिरडून टाकूं, निदान त्या निषेधाचा आवाज युवराजांच्या कानावर तरी खास जाऊं देणार नाहीं. यज्ञांत बळी दिल्या जाणाऱ्या बोकडाचा अपशकुनी आवाज यजमानाच्या कानीं पडूं नये म्हणून तो बळी ठार करतांना ज्याप्रमाणें मुद्दाम वेदघोष व वाद्यघोष करण्यांत येतो, त्याप्रमाणें नोकरशाहीच्या हस्तकांच्या कृत्रिम स्वागताच्या दणदणाटांत लोकशाहीचा विरोधक आवाज लुप्त होऊन जाईल अशा भ्रमांत सरकारनें स्वागताच्या नाटकाची तयारी चालविली होती. पण नाटकाचा पडदा वर उचलून नांदी म्हणण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसी नोकरशाहीचीहि भ्रांति दूर होऊन तिला मनांतून धाकधूक वाटूं लागली कीं, आतां आपला दंभपरिस्फोट होऊन सगळ्या रंगाचा बेरंग होणार. ही भीति खरी होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागतांच नोकरशाहीचा नूर बदलला व तिनें निराळाच डाव टाकण्यास सुरुवात केली.

कार्यक्रमांत ठरल्या वेळीं युवराजांची स्वारी बंदरांत येऊन दाखल झाली. बडे व छोटे लाट स्वारीच्या स्वागतार्थ सामोरे गेले आणि थोड्याच वेळांत युव-

राजांनीं मुंबापुरीच्या धक्क्यावर पाऊल ठेविलें. सरकारी सलामीच्या तोफांचा दणदणाट, मूठभर निमंत्रित दरबारी मंडळींच्या टाळ्यांचा कडकडाट वगैरे औपचारिक विधि होऊन म्युनिसिपालिटीचें मानपत्र देण्यांत आलें आणि त्या मानपत्रास ठराविक उत्तर देऊन युवराजांची स्वारी दरबारी थाटानें सरकारवाड्याकडे मिरवत चालली. परंतु स्वागताच्या मिरवणुकीवर जनतेनें इतका कडक बहिष्कार घातला होता कीं, रस्त्यांतला तो शुकशुकाट पाहून नोकरशाहीच्या हस्तकांच्या मनांत जळफळाट झाल्याशिवाय राहिला नाहीं. अशा प्रकारचें हें स्वागताचें नाटक एकीकडे चालू असतां दुसरीकडे महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरुन तीन लक्ष श्रोतृसमूह त्यांचे उपदेशपर शब्द अत्यंत औत्सुक्यानें ऐकण्यांत आणि आपल्या गुलामगिरीचे निदर्शक असे जे परदेशी कपडे त्यांची होळी करण्यांत दंग झाला होता.

## हांजीखोर लोकांचा पाजीपणा

नोकरशाहीनें आपली सगळी पुण्याई खर्च करून हा स्वागतसमारंभ अपूर्व थाटाचा करण्याचें योजिलें होतें; पण त्याचा अशा रीतीनें नक्षा उतरलेला पाहून नोकरशाहीच्या पुढ्यांतल्या आणि नोकरशाहीची हांजी-हांजी करण्यांत निढावलेल्या अशा हांजीखोर लोकांची अत्यंत निराशा झाली; आणि त्या निराशेनें चिडून जाऊन त्या हांजीखोर लोकांनीं पाजीपणा करण्यास प्रारंभ केला. या कामांत प्रथमतः युरेशिअन्स, ज्यू, नेटिव्ह ख्रिश्चन वगैरे लोक होते, आणि लवकरच त्यांत कांहीं पारशांची भर पडून ही चौकडी पूर्ण झाली. युवराजांच्या स्वागतावर बहिष्कार घालण्यांत महात्मा गांधींचे अनुयायीच प्रमुख असून त्यांना ओळखून काढण्याचें चिन्ह म्हणजे गांधी-टोपी व खादीचा कोट होय. अर्थातच नोकरशाहीच्या हस्तकांना गांधी-टोपी व खादीचा कोट यांचें दर्शन असह्य झालें आणि त्यांनीं त्याविरुद्ध आपली मोहीम सुरू केली. गेले पांच दिवस मुंबईत जो दंगा माजून राहिला होता व ज्या दंग्यानें 'मुंबापुरीला यमपुरी' बनविलें त्या दंग्याचें बीज यांत आहे. दंग्यास एकदां प्रारंभ झाल्यावर 'क्रियेसारखी प्रतिक्रिया' या निसर्गसिद्ध नियमानें दुसऱ्या पक्षाकडूनहि कांहीं आगळीक झाली नाहीं असें नाहीं. परंतु असहकारितापक्षाचे जे खरे अनुयायी आहेत त्यांनीं इतक्या भयंकर अत्याचारांत देखील आपला अनत्याचारीपणा कायम राखण्याची शिकस्त केली; पण त्याचा परिणाम मात्र विपरीत झाला.

## प्रतिकाराची उपाययोजना हवी

या दंग्यांत कोणतीं कोणतीं पाजीपणाचीं कृत्यें झालीं त्यांची त्रोटक हकीगत दुसरीकडे दिलीच आहे. तिची पुनरावृत्ति करून लेखणी विटाळणेंहि अनुचित होय. परंतु या अत्याचारी प्रकारांपासून आपण बोध काय घ्यावा याचा विचार

अवश्य कर्तव्य आहे. या दंग्यांत असहकारितापक्षाचा कांहीं अजाण अनुयायांच्या हातून कित्येक अत्याचार घडले आहेत हें नाकबूल करतां येत नाहीं. ट्रामगाड्या जाळल्या, मोटारी मोडल्या, गुत्त्यांची होळी केली, पोलीसचौकीवर हल्ला चढविला वगैरे अनिष्ट वर्तन त्यांच्या हातून घडलें हें अनुचित होय; पण त्या पापाचें प्रायश्चित्त देण्यास सरकार समर्थ आहे व तें त्या कामीं काडीइतकीहि कसूर करणार नाहीं. तेव्हां त्याविषयीं आपण काळजी करण्याचें बिलकूल कारण नाहीं. परंतु अनत्याचारी असहकारितावाद्यांवर जे भयंकर प्रसंग गुदरले त्याची वाट काय? अनत्याचारी म्हणून 'ठोशास ठोसा' परत करावयाचा नाहीं आणि असहकारितावादी म्हणून सरकारी पोलिसांचें किंवा कोर्टाचें साहाय्य घ्यावयाचें नाहीं व घेण्याची बुद्धि झाली तरी तें मिळावयाचें नाहीं, अशा पेंचांतून निसटण्याचा मार्ग कोणता? डोक्यावरची गांधीटोपी जबरीनें काढून घेऊन जाळली, खादीचा कोट ओढला किंवा फाडला, असल्या किरकोळ मर्कट चेष्टांचा प्रकार सोडून द्या. बॅरिस्टर जयकर, बॅ. जम्नादास अशांसारख्या पुढाऱ्यांस तडजोडीच्या मिषानें फूस लावून नेऊन त्यांची जी भलतीच संभावना करण्यांत आली तोहि निंद्य प्रकार आपण घटकाभर विसरून जाऊं. परंतु मशिदींत शिरून मशीद भ्रष्टविण्याचा किंवा जाळण्याचा जो प्रयत्न झाला आणि विशेषतः भररस्त्यांत, किंबहुना मुद्दाम चाळींतील घरांत शिरून स्त्रियांची जी विटंबना करण्यांत तिच्या प्रतिकाराची उपाययोजना करावयास नको काय?

## संरक्षणाची सरकारी जबाबदारी

असले आसुरी अत्याचार घडत असतां मुंबईतील पोलिसांनीं जें पक्षपाताचें व अन्यायाचें वर्तन केलें तें सरकारच्या बदललेल्या दृष्टिकोनानें पाहतां त्यांच्या धोरणास तें सुसंगतच असलें तरी अत्यंत गर्हणीय आहे. आपण मात्र आतांपर्यंत भलतीच समजूत करून घेऊन फसत आलों. सरकारशीं असहकारिता करणाऱ्यांशीं आपण तरी सहकारिता कां करावी व त्यांचें संरक्षण कां करावें असा प्रश्न नोकरशाहीच्या मनांत उद्भवूं लागला आहे. त्या प्रश्नाचें नोकरशाहीनें जें उत्तर आपल्या मनांत ठरवून ठेवलेलें दिसतें तें अर्थातच कायद्याच्या व राजनीतीच्या दृष्टीनें साफ चुकीचें आहे. असहकारितेच्या कार्यक्रमापैकीं शेवटची म्हणजे कर न देण्याची पायरी चढण्यापर्यंत ज्यांची मजल गेली नाहीं त्यांच्या संरक्षणाची सरकारी अधिकाऱ्यांच्या शिरावरची जबाबदारी नष्ट होत नाहीं. एखाद्या नामदारानें कौन्सिलवर बहिष्कार घातला, वकिलानें वकिली सोडली, विद्यार्थ्यानें गुलाम बनविण्याच्या कारखान्याला रामराम ठोकला, रावबहादुरानें आपल्या पदवीचा त्याग केला, किंवा सरकारी नोकरानें रौप्यशृंखला झुगारून दिली, तरी तेवढ्यानें त्याचा नागरिकत्वाचा सगळाच हक्क नष्ट होत नसून पूर्वीप्रमाणेंच त्याच्या शरीराचें, वित्ताचें व अब्रूचें संरक्षण करणें सरकारास प्राप्त आहे. एवढेंच तर काय पण जे दुष्कर्म सरकारचा कायदा

मोडून खून, दरवडे, जबरीसंभोग इत्यादि घोर अपराध करून तुरुंगांत सजा भोगीत असतात त्यांच्यावरहि त्या ठिकाणीं कोणी अत्याचार करूं लागल्यास सरकारी संरक्षकांस त्यांचें संरक्षण करण्याची जबाबदारी जर टाळतां येत नाहीं तर केवळ कोणी शाळा सोडली अगर गांधी-टोपी घातली एवढ्यानें ती जबाबदारी नाहींशी कशी होईल ? पण हा सगळा तात्त्विक व सात्त्विक विचार झाला. ज्याला जाणूनबुजून असहकारितावाद्यांची टवाळी करावयाची असेल त्याला हें ब्रह्मज्ञान सांगून काय उपयोग ? आणि मुंबईंतील पोलिसांनीं अशाच प्रकारें जाणूनबुजून असहकारितावाद्यांवर होणाऱ्या अन्यायाकडे, जुलुमाकडे व अत्याचाराकडे डोळे-झांक केली असें दिसतें. पोलिसांच्या डोळ्यादेखत डॉ. साठे यांजवर बदमाशांच्या टोळीनें हल्ला केला, पण पोलिसांनी तिकडे दृष्टिक्षेपहि केला नाहीं. आणि डॉ. साठे यांनीं त्या बदमाषांचीं नांवें टिपून घेण्यास सांगितलें असतां तिकडे लक्षच दिलें नाहीं. डॉ. आघारकर यांचीहि अशीच तक्रार आहे. परंतु पोलिसांच्या कारवाईची कथा एवढ्यावरच संपली नाहीं. दंगेखोरांपासून निरपराधी इसमांचें रक्षण करणें तर दूरच राहिलें; उलट जे पाजी लोक असहकारीपक्षाच्या अनुयायांवर हल्ला करीत होते त्यांस पोलिसांनीं अनेक मार्गांनीं मदत केल्याचाहि बोभाटा आहे व तो बराच साधार आहे. या बदमाषांना विशेषतः पारशी दंगेखोरांना, मोटारी, काठ्या, लाठ्या आणि पिस्तुलेंहि मिळत आणि त्यांच्या साहाय्यानें ते पोलिसांच्या देखत देखत महात्माजींच्या अनुयायांवर हल्ले चढवीत. पारशी तरुणांना सात-आठशेंपर्यंत पिस्तुलें देण्यांत आलीं आहेत अशी बाजारबातमी आहे; तींत तथ्य कितपत असेल तें असो. परंतु अत्याचारांत पारशांनीं पिस्तुलांचा उपयोग केला ही गोष्ट निर्विवाद आहे आणि ते सर्व नेहमींचे परवानेवाले असतील असें म्हणवत नाहीं.

### नोकरशाहीचें धोरण व्यक्त झालें

एतावता गांधी-पक्षानें युवराजांच्या स्वागतावर कडकडीत बहिष्कार घालून नोकरशाहीचा जो नक्षा उतरविला त्याचा अशा रीतीनें सूड उगविण्यांत आला. आतां हा दंगा शांत होत आला आहे. तथापि या दंग्यांत घडलेल्या प्रकारां-पासून आपण योग्य तो बोध घ्यावयास नको काय ? सातारा जिल्ह्यांत सत्य-शोधकांच्या अत्याचारांस वाव देऊन नोकरशाहीनें जी आपल्या आसुरी वृत्तीची चुणूक दाखविली तिचाच मलबारांत मोठ्या प्रमाणावर प्रयोग चालू आहे, आणि आतां तर मुंबापुरींत खुद्द गव्हर्नरसाहेबांच्या बंगल्याच्या नजरेच्या टापूंत आणि स्वतः युवराजांचा व व्हाइसरॉयांचा मुक्काम त्या शहरांत असतांना या गोष्टी घडल्या आहेत, यावरून नोकरशाहीचें धोरण काय आहे तें व्यक्त होत आहे. अशा परिस्थितींत असहकारितावाद्यांचें कर्तव्य आणि त्यांनीं आत्मसंरक्षणाची तजवीज कशी करावयाची याचा विचार ठरविला पाहिजे.

पहिल्या प्रश्नासंबंधानें कित्येकांचा थोडासा गैरसमज झाल्याप्रमाणें दिसतो. असहकारी इसमानें स्वतः कोणत्याहि प्रकारें अत्याचार करावयाचा नाहीं. हें खरें; पण त्यामुळें त्याचा पीनल-कोडानें दिलेला आत्मसंरक्षणाचा हक्क नष्ट होतो असें नाहीं. मुंबईस किंवा इतरत्र देवळांत शिरून किंवा स्त्रियांची बेइज्जत करून जे अत्याचार करण्यांत आले त्यांचा प्रतिकार करण्याला त्या जागेवर हजर असून व अंगीं सामर्थ्य असून जर कोणी केवळ अनत्याचाराच्या भलत्याच कल्पनेनें आत्मसंरक्षणाचा हक्क बजावण्याला कसूर केली असेल तर त्यांच्या हातून तो एक महादोषच घडला असें मानलें पाहिजे व निदान त्याची पुनरावृत्ति तरी होणार नाहीं, अशी खबरदारी घेतली पाहिजे.

### आत्मसंरक्षणाची स्वावलंबी उपाययोजना

दुसरा प्रश्न वैयक्तिक नसून सामुदायिक व जास्त व्यापक आहे. एखादें गांव, शहर, तालुका अगर जिल्हा अशा विस्तृत क्षेत्रांत झालेला असहकारितेचा प्रसार हाणून पाडण्याकरितां नोकरशाहीनें जर तेथील नागरिकांच्या संरक्षणाचें काम आपल्या अंगाबाहेर टाकलें तर असहकारितावाद्यांनीं स्वसंरक्षणाची तजवीज कशी करावयाची ? नोकरशाही असा प्रसंग आणल्याशिवाय कधीं राहणार नाहीं, हें दोनतीन ठिकाणच्या अनुभवावरून स्पष्ट होत आहे. मलबारांत मोपले लोकांकडून हिंदु लोकांवर व त्यांच्या पवित्र देवालयांवर जे भ्रष्टाकाराचे अनन्वित प्रसंग येत आहेत ते बंद पाडण्याची सरकारच्या अंगीं शक्ति नाहीं असें बिलकूल नाहीं. खरी इच्छा असेल तर पांच दिवसांत हे अत्याचार अजीबात बंद पडूं शकतील पण हिंदु-मुसलमानांत फूट पाडण्याची आणि हिंदी लोकांना आपल्या पराधीनपणाची जाणीव करून देण्याची संधि नोकरशाही व्यर्थ कां दवडील ? मुंबई शहरांत देखील स्त्रियांची इज्जत घेण्यापर्यंत जी अत्याचाराची कमान वर चढली ती तर पोलिसांच्या डोळेझांकीनेंच होय, यांत तिळमात्र संदेह नाहीं. अशा परिस्थितींत दीर्घकालीन पारतंत्र्यामुळें अंगीं खिळलेल्या शांततेच्या व संरक्षणाच्या पराधीनपणाच्या कल्पना सोडून देऊन कांहीं तरी स्वावलंबी उपाययोजना केली पाहिजे. हा प्रश्न चटकन चुटकीसरशी सुटण्यासारखा सोपा नाहीं. किंबहुना आत्मसंरक्षणाची योजना व स्वराज्याची संपादणी हे दोनहि प्रश्न एकमेकांत इतके निगडित झाले आहेत कीं, एकाचा विचार करतांना दुसऱ्याचा विचार टाळतां येत नाहीं. तें कसेंहि असो; पण यापुढें असहकारितेचें जें पाऊल पुढें टाकावयाचें त्यांत इतर बाबींचा विचार करण्याच्या आधीं या प्रश्नांची भवति-न-भवति झाली पाहिजे. महात्मा गांधी हे ता. २३ पासून गुजराथेंत बारडोली व आनंद या तालुक्यांत कायदेभंगाची चळवळ सुरु करणार होते. मुंबईस घडलेल्या अत्यंत शोचनीय प्रकारामुळें त्यांनीं तो विचार तूर्त तहकूब केला आहे. आतां ही

चळवळ पुनश्च अंगीकारण्यापूर्वी असहकारितावादी आणि आत्मसंरक्षण या प्रश्नाचा विचार करून या दोहोंचा मेळ कसा घालवावयाचा तें त्यांनीं ठरवून टाकावें. या संबंधांत त्यांची विचारसरणी जनतेस पटेल व व्यवहार्य दिसेल तरच तिचा आतां यापुढें या तत्त्वावरचा विश्वास अढळ राहील. मुंबईंत गेल्या पांच दिवसांत जे घोर प्रकार घडले त्यावरून याउपर या प्रश्नाकडे डोळेझांक करून चालावयाचें नाहीं हें उघड दिसत आहे. नोकरशाहीच्या भलेपणावर अवलंबून राहिल्यानें केवढें अरिष्ट कोसळेल याची थोडीशी कल्पना सातारा जिल्ह्यांतील व मलबारांतील प्रकारावरून ध्यानीं आलीच होती. तथापि ही नोकरशाही मुंबापुरीसारख्या राजधानीला तरी यमपुरी बनविणार नाहीं असें वाटत होतें; पण तेंहि खोटें ठरल्यानें नोकरशाहीच्या नैतिक अधःपाताची कमाल मर्यादा कळून चुकली. शिरोभागीं दिलेल्या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें ज्या वेळीं दुष्ट, संपत्तीच्या मदानें धुंद, नीच आणि स्वार्थलंपट अशा वर्गाच्या हातांत अधिकारसूत्रें येतात त्या वेळीं 'हा प्रजे क्व गमिष्यसि' असा प्रश्न विचारण्याची पाळी येते. दुर्दैवानें मुंबई शहरांतच असा प्रश्न विचारण्याची पाळी आली आहे. त्या प्रश्नाला स्वावलंबनाच्या आणि स्वाभिमानाच्या तत्त्वास पटेल असें उत्तर देण्याची असहकारितावाद्यांनीं तयारी करावी एवढा बोध मुंबईंतील या दंग्यापासून आपण घेतला पाहिजे.

---

## शंखान् दध्मुः पृथक् पृथक् ९

[ मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड रिफॉर्म्सचा अनुभव पांच वर्षे घेतल्यानंतर हिंदी लोकांना स्वराज्याचा त्या पुढचा हप्ता देण्यापूर्वी चालू द्विदल पद्धतींतील गुणदोषांचा आढावा घेऊन नवीन सुधारणा सुचविण्यासाठीं सर ए. मुडिमन यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. तींत डॉ. सप्रु, सर शिवस्वामी अय्यर, डॉ. परांजपे व बॅ. जिना असे प्रमुख हिंदी पुढारीहि सभासद होते. मुडिमन व त्यांचे गोरे व गोराळलेले सहकारी यांनीं हिंदी पुढाऱ्यांच्या सूचना न स्वीकारतां बहुमताच्या जोरावर आपला रिपोर्ट लिहिला. तेव्हां डॉ. सप्रु प्रभृतींनींहि आपला अल्पमतवाल्यांचा रिपोर्ट वेगळा लिहिला. असे दोन पृथक् पृथक् रिपोर्ट मिळून हा कमिटीचा रिपोर्ट पुढें आला आणि त्या दोहोंतहि स्वराज्याच्या दृष्टीनें पुढें पाऊल पडण्यासारखा भाग कांहींच नाहीं हें पाहून त्या रिपोर्टाची संभावना या लेखांत वरील मथळ्यानें करण्यांत आली आहे. ]

( केसरी, दि. १० मार्च १९२५ )

## रॉयल कमिशनवर हवाला

शिमगी पौर्णिमेच्या सुमुहूर्तानें रिफॉर्म्स कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. कमिटींत एक मत न झाल्यानें बहुमतवाल्यांचा एक व अल्पमतवाल्यांचा एक असे दोन पृथक् पृथक् भाग मिळून हा रिपोर्ट बनला आहे. परंतु दोनहि भागांतील सार काढून पाहिल्यास आजामितीला उपयोगाच्या नांवानें त्यास शिरोलेखांतील अवतरणाहून अधिक महत्त्व नाहीं. कमिटीचे अध्यक्ष सर ए. मुडिमन आणि त्यांचे गोरे व गोराळलेले हिंदी सहकारी यांनीं बहुमतनिदर्शक रिपोर्ट लिहिला असून सर तेजबहादुर सप्रु, बॅ. जिना, डॉ. परांजपे आणि सर शिवस्वामी अय्यर यांनीं आपला भिन्नमतदर्शक रिपोर्ट त्यास जोडला आहे. मुडिमन कंपूच्या रिपोर्टांत सुधारणांचें पाऊल पुढें पडेल अशी सूचना क्वचितच आढळून येईल. उलटपक्षीं हल्लीं कायद्यानें जेथें जेथें नोकरशाहीची अडवणूक होऊं शकते तेथें तेथें ती अडचण टाळण्याची नवी शक्कल दुरुस्तीच्या रूपानें त्यांनीं सुचविली आहे. सप्रु प्रभृति अल्पमतवाल्यांनीं तरी एखादी नवीन योजना मांडली असेल म्हणावें तर त्यांनींहि ती जबाबदारी स्वतःवर न घेतां ' रॉयल कमिशन ' नेमून अगर अन्य कोणत्याहि मार्गानें सरकारनें हें कोडें सोडवावें असें म्हणून टोलवाटोलवी केली आहे. प्रस्तुतच्या कमिटीला नवा ॲक्ट बनवून देण्याला अधिकार दिलेला नव्हता, हें जरी खरें असलें तरी मुडिमन कंपूनें ज्याप्रमाणें हल्लींच्या कायद्याचें प्रत्येक कलम तपासून त्यांत आपल्याला नडतें कोठें तेवढेंच नेमकें काढून टाकण्यासारखी दुरुस्ती सुचविली आहे, त्याच पद्धतीनें सप्रु प्रभृतींनाहि आपला अभिप्राय कमिटीच्या अधिकारमर्यादेचें अतिक्रमण न करतां नमूद करतां आला असता; परंतु त्यांनीं तितकी तसदी न घेतां ' रॉयल कमिशन 'च्या मागणीचें ठराविक पालुपद जोडून आपल्या विधायक सूचनांची वावडी हवेंत अधांतरीं तरंगत सोडून दिली आहे.

सर ए. मुडिमन प्रभृति बहुमतवाल्यांचा रिपोर्ट निराशाजनक आहे असें म्हणणें हें देखील त्याचा निष्कारण गौरव करण्यासारखें आहे. एक तर, त्यांच्या अनुकूल अभिप्रायाची कोणी आशाच केली नसल्यामुळें तो निराशाजनक म्हणतां येत नाहीं! दुसरें असें कीं, त्यांतील कित्येक सूचना अमलांत आल्यास हल्लींच्या सुधारणा-कायद्यानें जें कांहीं आणा दीड आणा स्वराज्य प्राप्त झालें आहे तेंहि हातचें निसटण्याचा संभव आहे. अर्थातच असल्या त्यांच्या सूचना निराशाजनकच नसून आशेच्या परिमाणूंचाहि भंग करून त्यांचा नायनाट करणाऱ्या अशा आहेत. सांप्रतच्या सुधारणांची सगळी उभारणी द्विदल राज्यपद्धतीवर केलेली आहे, आणि ती पद्धतीच तर सगळ्या अरिष्टांचें मूळ आहे. याकरितां ही द्विदल पद्धति अशीच चालू ठेवावयाची का ती फेकून देऊन प्रांतिक स्वायत्तता द्यावयाची हाच काय तो मुख्य विचाराचा प्रश्न होता. कमिटींतील बहु-

मतवाल्यांनीं असलें दुधारी राज्ययंत्रच पुढें चालू ठेवावें असें म्हटलें असून दुपाती राज्यव्यवस्थेशिवाय हिंदी जनतेला जबाबदार राज्यपद्धतीचें शिक्षण देतां येणें शक्य नाहीं असाहि आपला अभिप्राय नमूद करून ठेवला आहे !

### द्विदल पद्धति अपेशी कां ठरली ?

अल्पसंख्याक सभासदांचें असें मत आहे कीं, हल्लींच्या कायद्यानें निर्माण केलेल्या दुचाकी राज्यशकटाचा बोजवारा उडाला असून हा गाडा सुरळीत चालू होण्याला त्याची रचनाच आमूलाग्र बदलली पाहिजे. सध्याचीं चाकें परस्परांना साहाय्यक होत नसून तीं एकमेकांवर घर्षण पावतात व त्यांतून प्रसंगवशात् ठिणगीहि पडते. शिवाय या राज्यशकटाचा इतका कर्णकटु आवाज निघतो कीं, त्याला नुसतें तेल माखून त्याचा हा कर्कश ध्वनी बंद होणार नाहीं. त्यांतील चाकें, कणा, जूं वगैरे सगळेंच साहित्य नवीन प्रकारचें बनविलें पाहिजे. डॉ. सप्रू प्रभृतींच्या मतें द्विदल राज्यपद्धति अपेशी ठरण्याचीं कारणें मुख्यतः पुढें नमूद केल्या प्रकारचीं आहेत. ( १ ) एका म्यानांत दोन सुऱ्या राहूं शकत नाहींत हा नैसर्गिक नियमच या अनुभवानें पुनः प्रस्थापित झाला आहे. ( २ ) दिवाण हे खरे जबाबदार मंत्री बनतील अशी संधीच त्यांस देण्यांत आली नाहीं. ( ३ ) कांहीं थोडे अपवाद वगळून बहुतेक प्रांतांतून मंत्रिमंडळांच्या संयुक्त बैठकी भरविण्याची टाळाटाळ करण्यांत आली. ( ४ ) सोपीव खात्यापुरतें तरी सर्व दिवाणांचें मिळून एक मंत्रिमंडळ आहे असें न मानतां गव्हर्नरसाहेब प्रसंगानुरोधानें एकेकट्या दिवाणाचाच सल्ला घेत. ( ५ ) सोपीव व राखीव अशी अलग वर्गवारी करणें जवळ जवळ अशक्य असल्यामुळें राखीव खात्यांतील कारभारामुळें उत्पन्न झालेल्या असंतोषाच्या ज्वाळा सोंपीव खात्यांच्या कारभाराला तापदायक झाल्या आणि त्यामुळें तत्त्वानुरोधानें पक्षभेदाची मांडणी होऊं शकली नाहीं. ( ६ ) मेस्टनसाहेबांच्या प्रांतिक खंडणीच्या व्यवस्थेमुळें दिवाणांना लोकहितकारक अशीं कामें हातीं घेण्यास पैशाची टंचाई भासूं लागून दिवाणांच्या हातून जनतेच्या डोळ्यांत भरेल अशी कामगिरी होऊं शकली नाहीं. ( ७ ) फडणविसी खात्याचा सासुरवासहि दिवाणांना फार भोंवला.

अशा रीतीनें तक्रारसतक लिहून माजी दिवाणांनीं आपल्या अयशस्वी कारकीर्दींच्या दोषारोपांतून स्वतःचा बचाव करण्याकरितां ही एक प्रकारें कैफीयतच दिली आहे. पण माजी दिवाणांची कारकीर्द यशस्वी कां झाली नाहीं याची चौकशी करण्याकरितां कांहीं हें कामिशन नेमलें नव्हतें. सुधारणा सुचविण्याकरितां तें नेमलेलें होतें; व त्या दृष्टीनें पाहतां अल्पमतवाल्या सभासदांनीं विधायक सूचना केल्या नाहींत. द्विदल राज्यपद्धति निष्फळ ठरली आणि यापुढेंहि तिच्यापासून कोणीहि सुफळ प्राप्त होण्याची अपेक्षा बाळगूं नये एवढें मत मात्र या

नगर वाचनालय, सातारा.



सभासदांनीं निश्चितपणें नमूद केलें आहे; आणि सध्यांच्या फाटक्या-तुटक्या अधिकारवस्त्रास जागजागीं ठिगळें जोडीत बसून तें सुधारणार नाहीं असेंहि सांगण्याचें त्यांनीं धाडस केलें आहे. तरी पण द्विदल राज्यपद्धति मोडून टाकावयाची असल्यास दुसरी कोणती पद्धति अमलांत आणावी तिची रूपरेषाहि त्यांनीं आखून दिली नाहीं.

### बहुमतवाल्यांच्या सूचना

बहुमतवाल्यांचा उद्देश नोकरशाहीच्या सत्तेचें दृढीकरण करण्याचा असल्यामुळें त्यांनीं मात्र आपलें काम त्या बुद्धीनें कसोशीनें केलें आहे. काळ्यागोऱ्यानोकरशाहीच्या अधिकारांत व वेतनांत हात घालण्यास कोणास सवड राहूं नये, या व अशाच अनेक हेतूंनीं प्रेरित होऊन सर ए. मुडिमन प्रभुतींनीं ज्या बहुविध सूचना केल्या आहेत त्यांत पुढील सूचनांचा प्रामुख्यानें निर्देश केला पाहिजे. (१) नोकरशाहीचे हक्क, अधिकार आणि तिचीं कामें यांच्यांत कोणीहि व्यत्यय न आणील अशी तजवीज करावी. (२) सोपीव: खात्यांतून वरिष्ठ कामगारांची भरती करण्याची कामगिरी पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमून त्याजकडे सोपवावी. (३) नवीन भरती करतांना कामाचा चोखपणा न बिघडतां कामगारांत सर्व जातींचा समावेश होऊं शकेल अशी तजवीज करावी. (४) दिवाणी कोर्टांना कायदेमंडळांत अध्यक्षाच्या कामांत हात घालतां येऊं नये असा बंदोबस्त करावा. (५) दिवाणांना कार्यकारी मंत्र्यांच्या पगाराहून अधिक अथवा त्याच्या पगाराच्या तीनपंचमांशाहून कमी पगार असूं नये. (६) सोपीव खातीं चालविण्याला दिवाण नसतील तर तीं खातीं गव्हर्नरनें राखीव खात्यांत सामील केलींच पाहिजेत असा निर्बंध असावा. (७) खासगी सभासदांस एखादें बिल सादर करण्यास दिलेली परवानगी व्यक्तिशः त्यानेंच अमलांत आणावी, तिचा उपयोग इतरांना करतां येऊं नये आणि ज्या बैठकीच्या वेळीं परवानगी दिली असेल ती बैठक संपून गेल्यास ती परवानगी रद्द व्हावी. (८) कायदेमंडळाचा उमेदवार ज्या गटातर्फे उभा असेल त्या गटांत ६ महिने राहणारा असावा हा निर्बंध युरोपिअनांना बंधनकारक असूं नये. युरोपिअन सभासद हिंदुस्थानांत कोठेंहि राहात असला व मध्यंतरीं विलायतेला गेल्यामुळें त्याच्या सहा महिन्यांच्या निवासांत खंड पडला असला तरी त्यास हरकत घेऊं नये! (९) इंडिया ॲक्टाच्या कलम २० मध्यें हिंदुस्थान सरकार याची जी व्याख्या केली आहे ती विस्तृत करून तिच्यांत खासगी उद्योगधंद्याचाहि समावेश होईल असें करावें, हें व अशाच मासल्याचे अनेक नियम या कमिटींतील बहुसंख्याकांनीं आपल्या जातभाईंच्या सोयीकरितां सुचविले आहेत. दिवाणांचा पगार अजीबात नामंजूर करणें किंवा तो एक रुपया मंजूर करून अप्रत्यक्षपणें त्यास अर्धचंद्र देणें असले प्रकार बंद करण्याचा आणि इतकेंहि करून सोपीव खात्यांचा कारभार खुंटून राहिलाच तर तीं खातीं खालसा करण्याचा अधिकार

गव्हर्नरसाहेबांना देऊन ठेवण्याची ही कारवाई पाहिली म्हणजे या कमिटीला 'सुधारणा' कमिटी म्हणण्यापेक्षां 'कुधारणा' कमिटी हें नांवच अधिक शोभेल !

## कांहीं स्वार्थी सूचना

आपल्या 'सुधारणा कमिटी'च्या नांवाला अगदींच बट्टा लागूं नये म्हणून या बहुसंख्याक कंपूनें कांहीं किरकोळ बाबतींत थोड्याशा सुधारणा सुचविल्या आहेत. उदाहरणार्थ, स्त्री आणि अस्पृश्यवर्ग यांना मतदानाचा आणि उमेदवारीचा हक्क मिळावा; मजूरवर्गातर्फे खास प्रतिनिधि निवडून देतां येईल अशी योजना करावी; उमेदवारीला नालायक ठरण्याला ६ महिन्यांच्या शिक्षेऐवजीं एक वर्षाच्या शिक्षेची मुदत असावी आणि ही नालायकी देखील केव्हांहि दूर करण्याची प्रांतिक सरकारास अखत्यारी असावी; धर्मविषयक बिलें त्या त्या धर्मांतील सर्व पक्षांच्या संयुक्त कमिटीपुढें प्रथम मांडण्यांत यावीं; राजीनामा देणाऱ्या दिवाणांना आपलीं कारणें कौन्सिलपुढें सांगण्याचा हक्क असावा; सेक्रेटरींनीं आपण कोणतीं प्रकरणें गव्हर्नरकडे घेऊन जाणार आहों तें दिवाणांना आगाऊ कळविलें पाहिजे; दिवाणावर विश्वास नसल्याची सूचना आणावयाची झाल्यास एक-तृतीयांश सभासदांचा पाठिंबा असावा व तसा तो असल्यास अध्यक्षांनीं १० दिवसांच्या आंत त्या सूचनेला संधि द्यावी; मेस्टनसाहेबांची प्रांतिक खंडण्यांची योजना दुरुस्त करावी अशा अनेक शिफारशी कमिटीनें केल्या आहेत. शिवाय ज्या प्रांतांतून मच्छीमारी, अबकारी, जंगल वगैरे खातीं सोपीव नसतील तेथें तीं सोपीव करणें आणि जमीनसंपादणी, लॉ-रिपोर्टस् प्रसिद्ध करणें, प्रांतिक सरकारचे छापखाने, स्टोअर्स खातें, बॉइलर्स वगैरेची तपासणी इत्यादि कामें सोपीव यादींत घालावयाचीं कीं काय याचा विचार प्रांतिक सरकारकडे सोपविणें वगैरेसंबंधीं कमिटीनें शिफारस केली आहे.

## प्रतिगामी धोरणाचा प्रत्यय

या सर्व सूचना स्वराज्याच्या हस्तेबंदीच्या दृष्टीनें इतक्या क्षुद्र आहेत कीं, तसल्या सूचना करण्याकरितां कमिटी कशाला हवी होती असेंच कोणीहि विचारील. नोकरशाहीच्या सत्तेला चुकून देखील धक्का न लावतां तिच्या बंदोबस्तांत जेथें कोठें उणीव आहेशी भासली ती नाहींशी करण्यांत कमिटीनें दाखविलेली दक्षता पाहिली म्हणजे हिंदुस्थानला जबाबदारीचें स्वराज्य देणें हेंच आमचें ध्येय आहे आणि एकदां दिलेलें वचन आम्ही केव्हांहि माघारें घेणार नाहीं अशी जी नोकरशाहीची वटवट चाललेली असते ती किती अर्थशून्य व दिखाऊ आहे याचें प्रत्यंतर या रिपोर्टानें कोणासहि स्पष्टपणें येईल. ले. असेंब्लींत बजेटावर वादविवाद चालू असतां ब्लॅकेटसाहेबांचें बजेट ज्या कागदावर छापलें आहे त्या कागदाच्या रद्दीइतक्याहि किंमतीचें तें नाहीं असें बॅ. अभ्यंकर यांनीं म्हटलें होतें.

तें वर्णन जर कशास अक्षरशः लागूं पडत असेल तर तें या रिपोर्टाला लागूं पडेल. लॉर्ड रेडिंग हे लवकरच विलायतेला जाणार असल्यानें त्यांच्या कामगिरीविषयीं तर्कवितर्क सुरू आहेत, आणि स्वराज्याचा नवा हप्ता देण्याची वाटाघाट करण्यासाठीं रिफॉर्म्स कमिटीचा रिपोर्ट काखोटीस मारून ते विलायतेस जात आहेत असा आशाळभूतपणाहि कित्येकांनीं प्रदर्शित केला आहे. परंतु या मुडिमन कमिटीचा असला दिव्य रिपोर्ट पाहिला म्हणजे स्वराज्याचा नवा हप्ता देण्याची चर्चा करण्यासाठीं नव्हे तर दिलेला हप्ता हिंदी लोकांच्या प्रकृतीला सोसत नाहीं, सबब तो कोणत्या सबबीवर परत घ्यावा आणि सुधारणेच्या नांवाखालीं आणखी कोणतीं नवीं बंधनें निर्माण करून हिंदी लोकांना जखडून टाकावें याचा खल करण्याकरितांच हे माजी सर-न्यायाधीश विलायतच्या यात्रेस निघाले असावे असा संशय येतो. रेडिंगसाहेबांच्या प्रतिगामी धोरणाचा या रिपोर्टानें चांगलाच प्रत्यय आणला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण तेवढ्यानें तरी आपापसांत झगडणाऱ्या हिंदु-मुसलमानांचे आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचे डोळे उघडतील काय ?

---

## अमृतसरच्या वाटेंतला टप्पा १०

[ स्वराज्यपक्षाची स्थापना होऊन त्या पक्षाचे यशस्वी उमेदवार कौन्सिलांत बसूं लागल्यावर स्वराज्यपक्षानें दिवाणगिऱ्या स्वीकारावयाच्या का नाहीं आणि सरकारच्या हातांतील कमिट्यांवरील नेमणुका पत्करावयाच्या का नाहीं, हा मोठा वादाचा प्रश्न होऊन बसला. त्यांतच मध्यंतरीं ना. तांबे यांनीं एकाएकीं एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलची जागा स्वीकारली व श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं त्यांना अभिनंदनपर तार पाठविली त्यामुळें मोठेंच वादळ निर्माण झालें. या मतभेदामुळें प्रतिसहकारपक्ष स्वराजिस्टांतून फुटून बाहेर पडला. अशी फुटाफूट स्वराज्याच्या चळवळीस विघातक आहे हें जाणून गांधीजी आणि मोतीलाल नेहरू यांनीं तडजोडीसाठीं साबरमतीस प्रतिसहकारपक्षाच्या पुढाऱ्यांस पाचारण केलें. तेथील तडजोडींत दिवाणांना रिफॉर्म्स ॲक्टाप्रमाणें खरी सत्ता मिळत असेल तर दिवाणगिऱ्या स्वीकाराव्या आणि हें ठरविण्याची स्वायत्तता प्रत्येक प्रांताला दिली जावी, असा ठराव झाला. या ठरावानें कडक असहकारिता जाऊन तिच्या जागीं प्रतिसहकारिता आली. म्हणूनच चळ-

( केसरी, दि. २७ एप्रिल १९२६ )

वळीच्या गाडीनें अमृतसरच्या वाटेंतला एक टप्पा गांठला, असें या लेखांत म्हटलें आहे. ]

## साबरमतीची तडजोड

सहा महिन्यांपूर्वी मध्यप्रांताच्या कार्यकारी मंडळांत ना. तांबे यांची नेमणूक झाल्या वेळेपासून राष्ट्रीय सभेच्या राजकीय वातावरणांत जें प्रचंड वादळ उठलें होतें तें आतां शांत होण्याच्या बेतांत आलेलें दिसत आहे. गेल्या आठवड्यांत साबरमतीस प्रतिसहकारपक्षाचे पुढारी आणि स्वराजिस्टांचे अग्रणी पंडित मोतीलाल नेहरू यांच्यामध्यें जो करारनामा झाला त्यावरून या वादळाचा जोर संपला असून हवा शांत होत चालल्याचें स्पष्ट लक्षण दिसतें. वादळ शांत झाल्यावर देखील त्या वादळानें उठविलेली धूळ जागच्याजागीं बसण्यास आणि आकाश स्वच्छ होण्यास कांहीं काळ जावा लागतो, त्याचप्रमाणें या राजकीय वादळांतीलहि शाब्दिक धूळ कांहीं दिवस उडत राहून जाणाऱ्यायेणाऱ्यांच्या नेत्रांना त्रास देत राहील व त्या धुळीनें भरलेले डोळे स्वच्छ होण्याला अवकाश न मिळाल्यानें कित्येकांना हें झालें काय याचाहि लवकर नीटसा बोध होणार नाहीं; परंतु हें वादळ पूर्ण शांत झाल्यावर त्यांना असेंच आढळून येईल कीं, राजकारणाची गाडी मध्यंतरींच्या अडथळ्यास न जुमानतां अमृतसरच्या वाटेंतला एक एक टप्पा गांठींत अमृतसरच्या जवळपास येऊन पोहोंचली आहे.

प्रतिसहकारपक्ष व स्वराजिस्ट यांच्यामध्यें ज्या अटींवर साबरमतीस तडजोड झाली त्याचें सूक्ष्मपणें निरीक्षण केल्यास आम्ही म्हणतों याचें प्रत्यंतर कोणासहि खात्रीनें पटेल. कायदेमंडळांत प्रवेश करण्यास राष्ट्रीय सभेची अनुज्ञा मिळाल्या वेळेपासून स्वराज्यपक्षानें कायदेमंडळांत आपलें धोरण कसें ठेवावें, हा वादाचा मुख्य प्रश्न होऊन बसला. कौन्सिलांत जाऊन देखील असहकारिताच करावयाची असा पहिला बाणा होता; पण त्यास "आम्ही येथें सहकारिता करण्यास आलों आहों" असें म्हणून पंडित मोतीलाल यांनींच पहिला हरताळ फासला. त्यानंतर स्वराज्यपक्षाच्या अनेक सभांतून जे ठराव होत गेले त्या योगानें पहिलें शुद्ध अडवणुकीचें तत्त्व सुटत जाऊन पंडितजींनीं स्कीन कमिटीवर स्वतः जागा पत्करण्यापर्यंत सहकारितेची मजल नेली; तथापि आपण असहकारितेच्या क्षेत्रांत आहों व तिची मर्यादा आपण उल्लंघिली नाहीं असा बहाणा चालूच होता. ना. तांबे यांच्या नेमणुकीनें जी खळबळ उडाली तिच्या योगानें निद्राभ्रमांत असलेले कित्येक स्वराजिस्ट पूर्ण जागे झाले आणि त्यांनीं हा नैसर्गिक ओघ थांबवून त्यास परत असहकारितेच्या गिरिशिखरावर चढविण्याचा प्रयत्न चालविला! या खटाटोपांत कोणासहि यश येणें शक्य नव्हतेंच; तथापि आपला हा अनैसर्गिक हेका सोडावयाचा नाहीं आणि त्याच्या अपयशाचें पाप स्वतःच्या दुराग्रहाच्या माथीं न

नगर वाचनालय सातारा
संग्रहालय



मारतां प्रतिसहकारपक्षाच्या धोरणावर त्याचें खापर फोडावयाचें आणि तेवढ्या-वरच आपल्या मनाचें कसेंबसें समाधान करून घ्यावयाचें, असा आत्मवंचनेचा कार्यक्रम कांहीं दिवस चालला. पण अशी आत्मवंचना सतत चालू राहणें शक्य नसल्यानें पंडित मोतीलाल हे तिच्यांतून सुटण्याचा मार्ग शोधूं लागले आणि साबरमतीची तडजोड हें त्या शोधाचेंच फळ होय.

### यांत हारजित कोणाची ?

प्रतिसहकारपक्षाचे जे पुढारी पंडितजींच्या व महात्माजींच्या निमंत्रणावरून साबरमतीस गेले ते कांहीं प्रतिपक्षावर मात करण्याच्या वैयक्तिक स्वार्थबुद्धीनें गेले नव्हते. राष्ट्रीय सभेंत देशांतील सर्व समंजस पक्षांची एकी व्हावी आणि राष्ट्रीय सभेचें सामर्थ्य बळावत जाऊन सुधारणेचा पुढला हप्ता शक्य तितका लवकर संपादितां यावा, अशी त्या पक्षाची महत्त्वाकांक्षा आहे व राष्ट्रीय सभेंत अशी जूट होण्यास मध्यंतरींचें अनैसर्गिक धोरण सोडून अमृतसरचें धोरण कॉंग्रेसनें स्वीकारावें असें प्रतिसहकारपक्षाचें मत आहे. अर्थातच या धोरणांत सुधारणांचा शक्य तितका उपयोग करून घेणें व त्याकरितां दिवाणगिऱ्या व तत्सम जागा स्वीकारणें, या गोष्टी अनुषंगानेंच येतात. हें त्याचें तत्त्व अढळ असल्यानें तडजोडींत आपल्या या धोरणाला बाधक अशी अट कांहीं झालें तरी पत्करावयाची नाहीं आणि शक्य झाल्यास प्रतिपक्षाला आपल्या मार्गांतील एक एक पायरी चढावयास लावावयाची असा विचार साबरमतीस जातांनाहि कायमच होता. यामुळें तडजोडीविषयीं जो वादविवाद झाला त्यांत स्वराजिस्ट प्रतिपक्षी किती पुढें येऊं शकतील येवढेंच त्यांस पाहावयाचें होतें. पंडित मोतीलाल यांनीं प्रतिसहकारपक्षाचें सर्वच धोरण मान्य करून दिवाणगिऱ्या स्वीकारावयास बिनशर्त संमति दिली असती तर ती प्रतिसहकारपक्षास नको होती असें नाहीं आणि तशी सोळा आणे कबुली पंडितजींकडून प्रतिसहकारयोग्यांना घेतां आली नाहीं; म्हणून साबरमतीस ठरलेल्या तडजोडींत प्रतिसहकारपक्षाचा जय झाला नाहीं असेंच जर कोणास म्हणावयाचें असेल तर त्याच्याहि इच्छेच्या आड आम्हीं येऊं इच्छित नाहीं. परंतु कानपूरच्या कॉंग्रेसच्या आधींपासून स्वराज्यपक्षानें ज्या वल्गना केल्या आणि स्वतःचा मिथ्याचार चालूच असतां आपलें धोरण निर्भेळ अडवणुकीचेंच आहे असा जो डंका वाजविला आणि त्यास अनुसरून कानपूर येथील राष्ट्रीय सभेच्या बैठकींत व दिल्लीच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत जे ठराव केले, त्यांच्या दृष्टीनें पाहतां साबरमतीच्या तडजोडींत स्वतःचें धोरण कोणीं राखलें, कोणीं सोडलें, कोणीं जिंकलें व कोण हरला याचा निर्णय वाचकांनाच आपल्या मनोमनीं करतां येईल व तसा त्यांनीं करावा.

### प्रतिसहकारपक्षाच्या धोरणाला वाट मिळाली

वास्तविक पाहतां व्यक्तिशः कोणाचा जय झाला व कोणास हार खावी लागली हें ठरविण्याच्या दृष्टीनें या प्रश्नाकडे पहाणेंच चुकीचें आहे. हा वैयक्तिक मानापमानाचा प्रश्न नसून राष्ट्राच्या अभ्युन्नतीचा मार्ग पूर्वीपेक्षां अधिक निष्कंटक झाला कीं नाहीं येवढेंच यांत पाहावयाचें आहे; आणि या तडजोडीनें कॉंग्रेसमधील दोन उपपक्षांची एकजूट होणार असल्यानें राष्ट्रीयदृष्टया आम्ही ही तडजोड अभिनंदनीय समजतों. साबरमतीस जी मंडळी हा ऊहापोह करण्याकरितां जमली होती त्या सर्वांचेंच ध्येय असें निःस्वार्थीपणाचें होतें. महात्मा गांधी यांना कौन्सिलप्रवेशाचें अगदींच वावडें असतांनाहि त्यांनीं आपलें स्वतःचें मत घटकाभर विसरून जाऊन या वादविवादांत पोक्तपणाचा व तारतम्यबुद्धीचा असाच सल्ला दिला. प्रतिसहकारपक्षाला तर जेवढें आपल्या मार्गा-वर अधिक पाऊल पडेल तेवढें इष्टच असल्यानें त्यांना एकेरीवर येण्याचें कारणच नव्हतें. पण ज्या पंडित नेहरूंना परवा-परवापर्यंत प्रतिसहकारपक्षाचें नांव काढलें कीं कपाळशूळ उठे त्याच पंडितजींची दृष्टि आतां निवळल्यामुळें त्यांनीं आपण होऊन ही बैठक घडवून आणली आणि तींत आपल्या मतानें कॉंग्रेसच्या ठरावाचा बोज शक्य तितका कायम राखून त्यांतून प्रतिसहकारपक्षाच्या धोरणाला वाट काढून दिली. या त्यांच्या उदारपणाबद्दल व मनोधैर्याबद्दल त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. उद्यां मी पृथ्वी तरी निष्पांडवीय करीन किंवा स्वतःचा देह तरी ठेवीन अशा भीष्मप्रतिज्ञेसारखीच कानपूर कॉंग्रेसमधली पंडितजींची प्रतिज्ञा त्यांना स्वतःलाच मोठी अडचणीची झाली होती आणि तींतून पंडितजींनींहि भीष्माप्रमाणेंच प्रतिसहकारपक्ष नामशेष करण्याचा अशक्य कोटींतील नाद सोडून देऊन स्वतःचा शुद्ध अडवणुकीच्या आणि दिवाणगिरीवर बहिष्कार घालण्याच्या तत्त्वाला शरपंजरीं निजविलें आणि आपली प्रतिज्ञा पार पाडली. आतां या शरपंजरी स्थितींत तें बहिष्कारतत्त्व आणखी कितीहि दिवस धुगधुगी राखून जिवन्त राहिलें तरी कौन्सिलांतील प्रत्यक्ष व्यवहाराला यापुढें त्याची बाधा होऊं शकणार नाहीं हें निश्चित आहे.

### कडकडीत बहिष्कार दूर झाला

साबरमतीच्या तडजोडीनें शुद्ध अडवणुकीचें धोरण एका बाजूस पडून त्याच्या जागीं प्रतिसहकारयोगाची प्राणप्रतिष्ठा झाली, हा केवळ अर्थवाद नसून तें अक्षरशः खरें आहे. कानपूरचे व दिल्लीचे ठराव आणि साबरमतीच्या ठरावानें त्यांवर केलेलें भाष्य या दोहोंची तुलना करून पाहिल्यास ही गोष्ट तेव्हांच स्पष्ट होईल. असेंम्ब्लीनें १९२४ च्या फेब्रुवारींत केलेल्या मागणीला समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत सरकारच्या हातची कोणतीहि जागा स्वीकारावयाची नाहीं अग

बजेटहि पास करावयाचें नाहीं असा कॉंग्रेसचा ठराव कडकडीत बहिष्कारवादी होता. साबरमतीच्या ठरावांत असेम्ब्लीच्या ठरावांत असेम्ब्लीच्या मागणीला सरकारकडून उत्तर मिळणें न मिळणें हा विचार गौण ठरून तो अजिबात सोडून देण्यांत आला आणि प्रांतिक सरकारांत दिवाणांच्या हातीं खरोखरीची सत्ता असते का केवळ नामधारी सत्ता असते या विचाराला प्राधान्य येऊन जेथें दिवाणांना भरपूर सत्ता गाजवितां येत असेल तेथें दिवाणगिऱ्या खुशाल स्वीकाराव्यात असें सांगण्यांत आलें. बरें, दिवाणांना भरपूर सत्ता मिळणें याचा अर्थ रिफॉर्म्स ॲक्टांत कांहीं दुरुस्ती करून दिवाणांना नवे अधिकार देणें असाहि नसून रिफॉर्म्स ॲक्टांतच जी सत्ता दिवाणांच्या हातीं असावी असें म्हटलें आहे, पण कित्येक अरेरावी गव्हर्नर जी सत्ता त्यांस उपभोगूं देत नाहींत, तेवढीच सत्ता पूर्णत्वानें गाजवितां येणें असा समजावयाचा आहे; आणि रिफॉर्म्स ॲक्टानें जेवढे अधिकार दिवाणांच्या हातीं दिले आहेत तेवढे त्यांस अविच्छिन्न वापरूं द्यालना असें विचारलें असतां कोणता सनदशीर गव्हर्नर निदान उघड रीतीनें तरी त्यास नकार देऊं शकेल ! अर्थातच या प्रश्नाला होकारार्थी उत्तर येतांच, कॉंग्रेसची अट पूर्ण झाली असें समजून दिवाणगिरी स्वीकारण्याचा मार्ग खुला झाला, असें मानून चालावें असें साबरमतीच्या करारांत ठरलें आहे व त्याची बजावणी होणें म्हणजेच प्रतिसहकारपक्षाचें धोरण स्वीकारणें नव्हे काय ! प्रतिसहकारवादी असें केव्हांच म्हणत नव्हते व म्हणणारहि नाहींत कीं, गव्हर्नरसाहेबांनीं दिवाणांच्या हातीं काडीइतकीहि सत्ता ठेवली नाहीं तरी लोचटपणानें नामधारी दिवाण होऊन राहावें. परंतु दिवाणांच्या हातीं खरी सत्ता असो वा नसो, दिवाणगिरीचा विचारच करावयाचा नाहीं असला जो कडकडीत बहिष्कार घालण्यांत आलेला होता, तो दूर होऊन त्याच्या जागीं सयुक्तिक व मर्यादित बहिष्कार जरी आला आणि व्यवहारतः दोहोंची फलनिष्पत्ति सारखीच झाली तरी या दोहोंत तत्त्वतः फारच मोठें अंतर आहे आणि याकरितांच निष्कारण बहिष्काराच्या जागीं सकारण बहिष्कार आला तरी तो मोठाच विजय मानला पाहिजे.

### प्रतिसहकार पक्षाचाच हा विजय आहे

मीमांसाशास्त्रांतलीं एकदोन उदाहरणें घेतल्यास हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. हिंदुधर्मशास्त्रकारांनीं सगोत्र विवाह निषिद्ध मानला आहे व त्यास कांहीं-एक कारण दिलें नाहीं. त्यामुळें या निषेधांतून बाहेर पडण्यास मार्गच नाहीं. पण त्याच शास्त्रकारांनीं एकुलता एक मुलगा दत्तक देऊं नये असें सांगून त्यापुढें 'तो स्वतःच्या वंशवृद्धीस पाहिजे' असें कारण नमूद केलें आहे; त्यामुळें हा निषेध मर्यादित होऊन आपल्या वंशवृद्धीची पर्वा न धरतां एखाद्यानें एकुलता एक मुलगा दत्तक दिल्यास तो दत्तक रद्द ठरेनासा

झाला. कानपूरचा ठराव व साबरमतीचा ठराव या दोहोंत अशाच प्रकारचा भेद आहे. कानपूरचा ठराव असें म्हणत होता कीं, रयतेचें कल्याण-अकल्याण कांहींहि होवो दिवाणगिरी स्वीकारावयाची नाहीं, साबरमतीचा ठराव असें बजावीत आहे कीं, रयतेचें कल्याण करण्याची खरी सत्ता दिवाणांच्या हातीं येत असेल तर दिवाणगिरीच्या फंदांत पडा नाहींतर त्या फंदांत पडूं नका. हा इशारा ठीक आहे; पण यावर " होय, दिवाणगिरी स्वीकारल्यानें रयतांचें किती तरी कल्याण करतां येतें " असा जबाब आल्यास दिवाणगिरीवरचा बहिष्कार अजिबात उठतो व तो तसा उठावा हाच तर या तडजोडीचा हेतु आहे. प्रतिसहकारपक्षाचा हा विजय पाहून ज्यांच्या मस्तकांत तिडीक उठली आहे असे कांहीं कट्टर शिरोमणी यावर अशी मल्लिनाथी करीत आहेत कीं, दिल्लीच्या मध्यवर्ति कारभारांतहि जबाबदारीच्या तत्त्वाचा रिघाव झाल्याशिवाय प्रांतिक दिवाणांच्या हातीं खरी सत्ता येतच नाहीं. याकरितां करारनाम्यांत तसे स्पष्ट शब्द नसले तरी त्याचा तसा अर्थ समजून दिवाणगिरीवरचा बहिष्कार कायमच आहे असें समजावें ! पण हा शुद्ध बाष्कळपणा होय. करारनाम्यांतला कोणता शब्द कोणत्या उद्देशानें घातला आणि जो शब्द त्यांत समाविष्ट केला नाहीं, तो कां केला नाहीं, याची माहिती साबरमतीस वादविवादाच्या वेळीं हजर असणाऱ्याला जशी असेल तशी चारशें मैलांवरून तर्कट रचणाऱ्यांस असूं शकणार नाहीं, हें लक्षांत ठेवून वाचकांनीं सरळ व स्पष्ट अशा करारनाम्यावर भलताच अर्थ लादण्याच्या या कपटजालांत न सांपडण्याची सावधगिरी ठेवावी. करारनाम्यांत अमुक एक अट नमूद करावी असें मनांत आलें असतें तर तडजोडीचा मसुदा तयार करणाऱ्यांना ते शब्द त्यांत दाखल करतां आले नसते असें नाहीं; पण ज्या अर्थी तसले कांहीं शब्द त्यांत घातले नाहींत त्या अर्थी ते आपल्या पदरचे घालून अर्थाची ओढाताण करण्याच्या भानगडींत पडूं नका असेंच असल्या अहंमन्यांस बजावून ठेवलें पाहिजे.

## प्रांतिक स्वायत्तता मिळाली

दिवाणगिरी स्वीकारण्यास परवानगी देण्यापूर्वी तिजवर फारच कडक बंधनें घातलीं गेलीं आहेत हें खरें. तथापि मुलानें ' मी मुलींच विवाह करून घेत नाहीं ' असें म्हणणें, आणि जरत्कारूसारख्या अशक्य कोटींतल्या वाटणाऱ्या अटी घालून का होईना, पण विवाहाला संमति देणें, या दोहोंत जितकें अंतर आहे तितकेंच कट्टरांचा बिनशर्त बहिष्कार आणि साबरमतीचा सशर्त बहिष्कार या दोहोंत अंतर आहे. जरत्कारूनें अशक्य मानलेल्या अटी पूर्ण करणारा वस्ताद जसा त्याला भेटला तसाच कोणी खंबीर दिवाण पंडितजींनाहि भेटणार नाहीं असें नाहीं. शिवाय कानपूरच्या व दिल्लीच्या ठरावांत दुसरा एक मोठा भेद आहे तो असा कीं, दिवाणगिऱ्या वा अन्य जागा स्वीकारणें अथवा न स्वीकारणें याचा

निर्णय करण्याचा अधिकार यापुढें त्या त्या प्रांतिक कौन्सिलांतील काँग्रेसच्या प्रतिनिधींच्या हातांतच राहणार आहे. पूर्वींच्या कारकीर्दींत मध्यवर्ति मंडळानें दिल्लींत बसावें आणि स्थानिक परिस्थितीचा विचार न करतां नागपूर, मद्रास, लाहोर वगैरे ठिकाणीं वाटेल तीं फर्मानें पाठवावींत, असा उंटावरून शेळ्या हांकण्याचा प्रकार घडत असे. याकरितां प्रांतिक स्वायत्तता घ्या, अशी प्रतिसहकारपक्षाची प्रथमपासून मागणी होती. ही मागणी साबरमतीच्या ठरावांत मान्य करण्यांत आली आहे. मध्यप्रांतांत दिवाणगिरी स्वीकारावयाची का नाहीं याचा निर्णय आतां मध्यप्रांतीय कौन्सिलर्सच बहुमतानें करतील; त्यांत मद्रासच्या अगर मुंबईच्या सभासदांनीं नसता लांडा कारभार करण्याचें कारण नाहीं. अर्थातच प्रत्येक गोष्टींत स्थानिक परिस्थिति ज्यांना पूर्णपणें अवगत आहे त्यांच्या शिरावरच निर्णय ठरविण्याची जबाबदारी पडल्यानें दुसऱ्याच्या नांवानें चरफडत बसण्याचे प्रसंगहि यापुढें येणार नाहींत. या दृष्टीनें पाहतां हे प्रांतिक स्वायत्ततेचें तत्त्व या कारखान्यांत स्पष्टपणें समाविष्ट झालें हाहि एक प्रतिसहकारपक्षाचा मोठाच विजय होय.

### रिफॉर्म्स ॲक्टचा शक्य तितका फायदा घ्या

थोडक्यांत सांगावयाचें म्हटल्यास साबरमतीच्या या तडजोडीनें रिफॉर्म्स ॲक्टाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. रिफॉर्म्स हें थोतांड आहे व कौन्सिलें हीं 'मायागृहें' आहेत ही वेदांती भाषा बंद पडून दिवाणगिरींत तथ्य किती आहे याचें निरीक्षण करण्याइतकी व्यवहारदक्षता दिसूं लागली. यापूर्वी जरी तोंडानें 'कौन्सिल मिथ्यात्वाचा' जप चालला असला तरी हातून घडणाऱ्या प्रत्येक कृतीवरून 'कौन्सिलसत्यत्व'च प्रस्थापित होत होतें. तथापि ही तडजोड मान्य झाल्यास असहकारितावाद्यांना यापुढें असला चोरटा व्यवहार ठेवण्याचें कारण राहणार नाहीं, हा कांहीं लहानसहान फायदा नव्हे. तोंडानें आजन्म ब्रह्मचर्याची महती गात असतां, पांचसात पोरांचें लेंढार मागें लागलेलें असावें, आणि धड संसारहि नाहीं व धड परमार्थहि नाहीं अशी 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशासारखी स्थिति व्हावी, त्यापेक्षां, होय, मी संसारी आहें अशी कबुली देऊन तो संसार तरी 'नेटका' करण्याच्या मार्गास कां लागूं नये! साबरमतीच्या तडजोडीनें द्विदल पद्धतीच्या नरडीला नख लावण्याची वृत्तीहि चुकीची ठरविली जात असून, या द्विदल पद्धतींत देखील जर स्वाभिमान कायम राखून जनतेचें हित साधतां येत असेल तर तें साधावें अशी अनुज्ञा दिली जात आहे. स्वराज्याच्या संपादनापेक्षांहि द्विदल पद्धतीचा नायनाट करणें हेंच जणुं काय आपलें मुख्य ध्येय आहे, अशी जी कित्येकांची भ्रामक समजूत झाली होती तिला या करारनाम्यामुळें चांगलाच अर्धचन्द्र मिळाला असून द्विदल पद्धतीचा उपयोग करून घेण्याची ज्याच्या

अंगांत धमक असेल त्यानें द्विदल पद्धतीच्या द्वारा देखील लोककल्याण साधण्यांत पाप नाहीं, असा शास्त्रार्थ या तडजोडींतून बाहेर पडला आहे. एतावता, रिफॉर्म्स ॲक्ट जो पदरांत पडला आहे त्याचा शक्य तितका फायदा घ्या आणि त्यांत नसलेले अधिकार मिळविण्याकडे त्या सत्तेचा उपयोग करा, हें जें तत्त्व **लोकमान्यांनीं अमृतसरला प्रस्थापित करून** घेतलें त्याच तत्त्वाला साबरमतीच्या करारानें दुजोरा मिळत आहे.

तथापि अमृतसर दूर आहे हें विसरून चालणार नाहीं. राजकारणाची गाडी प्रतिसहकारपक्षाच्या रुळावर आणणें आणि कॉंग्रेसमध्यें सर्व राजकीय पक्षांचा समावेश करणें असें जें आमचें दुहेरी ध्येय आहे, त्यांतल्या सर्व पक्षांची एकी घडवून आणण्याचा भाग अद्यापि चर्चेंतहि आला नाहीं. पंडित मालवीयजी यांनीं गांधींजींना जो कळकळीचा व बहुमोल संदेश पाठविला होता त्याची थोडीशी चर्चा होऊन मुंबईस नवीन स्थापन झालेल्या नॅशनॅलिस्ट पक्षासहि ऑ. इं. कॉं. कमिटीच्या वेळीं पाचरण करावें असें ठरून श्रीमती सरोजिनीबाईंनीं तसें निमंत्रण दिलें आहे आणि पंडित मोतीलाल यांची निवळलेली वृत्ति आणि महात्माजींची एकी घडवून आणण्याविषयींची कळकळ लक्षांत घेतां या नॅशनॅलिस्ट पक्षासहि कॉंग्रेसमध्यें येण्याला आडकाठी न राहील अशी तडजोड निघणारच नाहीं असें नाहीं.

### तडजोड फेटाळल्यास कॉंग्रेसचीच इभ्रत जाईल

तरी पण ऑ. इं. कॉं. कमिटीची बैठक ता. ५ व ६ रोजीं होणार आहे तींत कट्टर पक्षाचा वारा कोणीकडे वाहूं लागेल कोणी सांगावें! महात्मा गांधी, पंडित नेहरू व खुद्द कानपूर कॉंग्रेसच्या अध्यक्षीणबाई इतक्यांनीं जी तडजोड घडून यावी म्हणून बुद्धिपुरःसर प्रयत्न केले त्या तडजोडीवर बोळा फिरविणारे कांहीं कडक सोंवळे असहकारितावादी निघणार नाहींत असें नाहीं; परंतु साबरमतीस विचारपूर्वक ठरविलेली ही नवी योजना जरकरतां ऑ. इं. कॉं. कमिटींत फेटाळली गेली तर त्यांत कॉंग्रेसच्याच इभ्रतीला धक्का बसणार आहे. प्रतिसहकारपक्ष व नॅशनॅलिस्ट पक्ष हे आपआपल्या भूमिकेवर स्थिर आहेत. त्यांना हा करार ऑ. इं. कॉं. कमिटीनें मान्य केला वा न केला तरी स्वपक्षाच्या दृष्टीनें विशेष महत्त्व नाहीं. परंतु कॉंग्रेसचें वजन राखावयाचें असेल तर तिनें या उभय पक्षांना आपणांत समाविष्ट करून घेतलें पाहिजे. तसें न होईल तर राष्ट्रीय सभेचें राष्ट्रीयत्व केवळ नामधारी राहील याचा पोक्त विचार करून ऑ. इं. कॉं. कमिटींतील सभासद आपलें मत देतील असा आम्हांस भरंवसा वाटतो.

# बार्डोलीचा नमुनेदार सत्याग्रह ११

[ गुजराथेंतील बार्डोली तालुक्याची रिव्हिजन सेटलमेंट झाली व तींत नेहमींप्रमाणें ठराविक कारणांचा पाढा वाचून सेटलमेंट ऑफिसरांनीं बार्डोली तालुक्याच्या शेतसाऱ्यांत निष्कारण भरमसाट वाढ केली. इतकी वाढ विनाकारण झाली असून ती सारावाढीच्या नियमांना धरून नाहीं, सबब या वाढीची फेर-चौकशी करा आणि तशी फेर-चौकशी करण्याचें आश्वासन मिळेपर्यंत आम्हीं शेतसारा भरीत नाहीं, असें बार्डोलीच्या सत्याग्रही शेतकऱ्यांनीं जाहीर केलें. या कामीं सरदार वल्लभभाई पटेल यांनीं पुढाकार घेऊन आणि बार्डोली तालुक्यांतील रयतांची अभेद्य संघटना करून नोकरशाहीशीं लढा देण्याची तयारी केली. नोकरशाहीनें रयतांत फूट पाडण्याचा, रयतांची मालमत्ता जप्त करण्याचा आणि अखेरीस शेतसारा न भरणाऱ्या रयतांच्या जमिनी जप्त करून त्यांचा लिलांव करण्याचाहि धाक घालून पाहिला. पण कोणत्याहि प्रकारें सत्याग्रहाची लाट मागें हटत नाहीं, असें पाहिल्यावर सरकारनें तडजोडीची भाषा सुरू केली आणि अखेरीस सारावाढीची फेरचौकशी करण्याचें आश्वासन मिळून मध्यस्था-मार्फत हा तंटा मिटविण्यांत आला. हा सत्याग्रह यशस्वी होण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या हें या लेखांत नमूद केलें गेलें असून, त्यावरून कोण-ताहि सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी सत्याग्रही पक्षाची बाजू कशी बळकट असावी लागते हें पारखण्याची कसोटीच या लेखांत ठरविली गेली आहे व त्या दृष्टीनेंच या सत्याग्रहाला 'नमुनेदार' सत्याग्रह म्हटलें आहे. ]

### शिष्टाईचें लोण कडेला पोचलें

दुराग्रही सरकार आणि बार्डोलीचे सत्याग्रही पुढारी यांच्या दरम्यान मध्यस्थी करणाऱ्या समेटाग्रही पक्षाच्या प्रयत्नास अखेरीस यश येऊन बार्डोलीच्या तडजोडीच्या अटी उभयपक्षीं मान्य झाल्या, सत्याग्रह बंद केल्याचें जाहीर झालें आणि बंदिवासांत पडलेले सत्याग्रही वीर मुक्त होऊन आपल्या आश्रमांत परत आले हें ऐकून कोणाहि स्वराज्याभिमानी मनुष्यास हर्ष वाटल्यावांचून राहणार नाहीं. तीन आठवड्यांपूर्वी जेव्हां मुंबईच्या गव्हर्नरांनीं कायदेमंडळापुढें रावणशाही थाटाचें भाषण केलें तेव्हां ती दडपशाहीची प्रस्तावनाच आहे असें सर्वांस वाटलें.

(केसरी, दि. १४ ऑगस्ट १९२८)

पण तें भाषण जरी धमकीचें होतें तरी स्वतः गव्हर्नरसाहेबांस सोटेशाहीचें धोरण व्यक्तिशः नापसंत असल्यानें त्यांनीं या कोंडींतून निसटण्यास पळवाट म्हणून चौदा दिवसांची मुदत देऊन ठेवली होती; आणि त्यांच्या इच्छेस अनुसरून त्या चौदा दिवसांत शिष्टाईचें लोण एकसारखें इकडून तिकडे जातां येतां अखेरीस अशा एका मध्यबिंदूवर तें स्थिर झालें कीं, त्या मुद्द्यावर उभयतांची एकवाक्यता होऊन शिष्टाई सफल झाल्याच्या आनंदाचा देखावा सर्वांस पाहावयास मिळाला.

बार्डोलीच्या वादाचा आरंभापासूनच सरकारनें शांत चित्तानें विचार केला असता तर हें प्रकरण इतकें भडकलेंच नसतें. परंतु नोकरशाहीनें प्रारंभीं आपल्या नेहमींच्या उद्दाम वृत्तीनें फेर-चौकशीची साधी मागणी बेमुर्वतखोरपणानें झिटकारली आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून जेव्हां बार्डोलीच्या शेतकऱ्यांनीं सत्याग्रहाच्या पैजेचा विडा उचलला त्या वेळीं टाईम्सकारांनीं आगलावेपणा करून त्या सत्याग्रहाला बंडाचें स्वरूप देऊन ही आग भडकविली. पण त्यायोगानेंच भारतमंत्री व व्हाइसरॉय यांचें लक्ष तिकडे वेधलें आणि त्यामुळें सोक्षमोक्ष करून टाकणें भाग पडलें. नाहींतर हें प्रकरण असेंच धुमसत राहिलें असतें आणि एकदोन महिन्यांनीं एकदम स्फोट होऊन भयानक भडका उडाला असता. ही आपत्ति टाळावी म्हणून सर लेस्ली विल्सन यांनीं बाह्यतः जरी धमकीचा देखावा दर्शविला तरी वस्तुतः एकेक पाऊल माघार घेऊन समेटाचा रस्ता खुला करून ठेवला. एकदां सेटलमेंट जाहीर झाल्यानंतर फेर-चौकशीची मागणी करणें देखील पाप आहे असली गुर्मीची गर्जना बंद पडून, 'चौकशी करूं परंतु ती मुलकी कामगारांकडून करवूं' अशा आशयाची उतरत्या सुराची भाषा यापूर्वींच सुरू झाली होती. तथापि मुलकी कामगारांकडूनच चौकशी करविणें व चौकशीपूर्वी जुना-नवा सगळाच सारा भरणें या दोनहि अटी सत्याग्रह्यांना सर्वस्वी अमान्य असल्यानें सरकारचा हा उतरता सूर देखील बार्डोलीकरांच्या सुराशीं मिळणें अशक्य ठरलें.

## सिमल्याचा कानमंत्र

अशा परिस्थितींत गव्हर्नरसाहेब सिमल्याहून कानमंत्र घेऊन परत आले आणि त्यांनीं कायदेमंडळापुढें मोठा क्रोधाचा अविर्भाव आणून "बार्डोलीकरांनीं जर बादशहाविरुद्ध बंड आरंभिलें असेल तर यत्किंचितहि दयामाया न दाखवितां आम्ही तें बंड ताबडतोब चिरडून टाकूं; परंतु जर त्यांच्या मनांत तसला बंडाचा विचार नसेल तर मग आम्ही फेर-चौकशीचा विचार करूं आणि ती चौकशी पूर्ण, उघड व स्वतंत्र होईल याविषयीं काळजी घेऊं" असली जरतारी धमकी दिली! या भाषणानंतर सरकारी कचेरीच्या पडद्याआड जी वाटाघाट झाली आणि जिचें पर्यवसान उभय पक्षांस संमत अशा समेटांत झालें ती वाटाघाट लक्षांत घेतां गव्हर्नरांच्या भाषणांतील धमकी ही बर्कनहेडसारख्या सोटेशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या व

त्यांच्या आगलाव्या बगलबच्चांच्या समाधानाकरितां होती आणि चौकशीची हमी ही समेटवाल्या पक्षांकरितां होती असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. फेर-चौकशीची जी नवी हमी मिळाली तींत मुलकी कामगाराच्या जोडीस एक न्यायाधिकारी देऊं आणि त्यांच्यांत मतभेद होईल तेथें न्यायाधिकाऱ्याचें मतच ग्राह्य मानलें जाईल असेंहि अभिवचन देण्यांत आलें. त्याचबरोबर जुना व नवा सगळाच सारा आगाऊ भरला पाहिजे ही नडणारी अट बाजूस सारून नवा सारा कोणीहि तिऱ्हाइतानें भरला तरी चालेल अशीहि एक महत्त्वाची सवलत देण्यांत आली.

### बाह्यतः धमकी आंतून समेट

हा सगळाच प्रकार कपटपटु सरकारच्या नेहमींच्या स्वभावास सोडून झाला असें वाटतें. सरकारची नेहमींची वहिवाट म्हणजे वरून साखर पेरून आंतून कपटानें आपला कावा साधावयाचा. पण या समेटाच्या प्रकरणांत वरकरणी देखावा धमकीचा असून आंतून शक्य तितक्या सवलती देण्यांत आल्या. मतभेदाच्या बाबतींत रेव्हिन्यू अधिकाऱ्यानें न्यायाधिकाऱ्याचा सल्ला मानला पाहिजे, असें ठरल्यानें चौकशीचें स्वरूप बदललें व ती चौकशी सत्याग्रह्यांना मान्य झाली. वाढलेला सारा परभारें स्वीकारल्यानें सरकारनें सत्याग्रह्यांच्या शपथेला मान दिल्यासारखा झाला. सत्याग्रही कैदी बंधमुक्त करणें, जप्त केलेल्या जमिनी परत करणें आणि राजीनामा दिलेल्या पाटलांना व तलाठ्यांना परत कामावर घेणें इत्यादि प्रतिपक्षीयांच्या अटी मान्य करण्यांतहि सरकारनें न्यायबुद्धि दाखविली. पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, ज्या जमिनी लिलावानें विकून टाकल्यानें दुसऱ्याच्या मालकीच्या झाल्या आणि ज्या लिलावांच्या वेळीं कांहीं झालें तरी हे लिलाव रद्द केले जाणार नाहींत व जमिनी परत दिल्या जाणार नाहींत असे जाहिरनामे कलेक्टरच्या सहीनें गांवोगांव प्रसिद्ध करण्यांत आले होते, ते लिलाव रद्द करून त्या जमिनी मालकांना परत मिळाव्या म्हणून नव्या कलेक्टरसाहेबांनीं आपली भीड खर्चून मध्यस्थी केली व त्या मध्यस्थीकरितांच जुने कलेक्टर मि. हार्टशॉर्न यांची बदली करून वल्लभभाईच्या विशेष परिचयाचे व सहानुभूतीचे असे नवे कलेक्टर त्या जागीं नेमले गेले! वल्लभभाईनीं ज्या अटी पुढें मांडल्या त्यांतील एकच अट सरकारनें नाकारलेली दिसते. ती एक अट म्हणजे सत्याग्रही लोकांच्या नुकसानभरपाईची. पठाणांच्या अत्याचारामुळें किंवा जप्ती-कामगारांच्या जुलमामुळें ज्यांच्यावर घोर अन्याय झाला असेल त्यांचें नुकसान सरकारनें भरून द्यावें अशी सत्याग्रह-पक्षाची मागणी होती. परंतु असली अट मान्य करणें सरकारला अत्यंत अपमानास्पद असल्यानें तेवढ्या मुद्द्यावर सरकारनें आपला हट्ट कायम राखला आणि हत्ती मिळाल्यावर अंकुशाविषयीं वाद करणें अप्रशस्त होय असें ओळखून वल्लभभाईनींहि दुराग्रह न धरतां एवढी एक अट सोडून दिली आणि हळकुंडाकरितां लग्न मोडण्याचा वेडेपणा केला नाहीं हें त्यास अत्यंत भूषणास्पद आहे.

### समेटाग्रही पक्ष पुढें आला

मुंबई सरकार व सत्याग्रह-पक्ष यांच्या दरम्यान जो करार व्हावयाचा त्याच्या अटी वर दर्शविल्याप्रमाणें उभय पक्षांस मान्य झाल्या खऱ्या. तरीपण मानापमानाचा एक औपचारिक मुद्दा शिल्लक राहिलाच होता. समेटाच्या अटी मान्य झाल्या तरी शिष्टाई कोणीं कोणाकडे करावी ? सरकारचा वरपक्ष म्हणून त्यानें आधीं बोलावयाचें नाहीं आणि सत्याग्रही पक्षानें शपथ घेतली म्हणून त्यानें आपण होऊन कोणतीच याचना करावयाची नाहीं ! अशा परिस्थितींत उपाध्यायाप्रमाणें मध्यंतरीं लुडबुडणारा समेटाग्रही पक्ष नेहमींप्रमाणें उभयतांना उपयोगी पडला. गव्हर्नरांच्या भाषणांतील सर्व अटी पाळल्या जातील असें आश्वासन या समेटवाल्यांनीं सरकारास दिलें आणि तिकडे वल्लभभाईसहि आपल्या सर्व मागण्या पूर्ण केल्या जातील अशी हमी दिली. समेटवाल्यांचें पहिलें पत्र सरकारच्या हातीं पडतांच सरकारनें चौकशी-कमिटी नेमण्याचें जाहीर केलें. ही कमिटी जाहीर झाल्यानंतर मध्यस्थी करणाऱ्या उपाध्यायांनीं सत्याग्रही कैदी अटकेंतून सोडणें, तलाठी व पाटील यांना परत कामावर घेणें व जप्त जमिनी परत करणें या तीन गोष्टी करण्याविषयीं सरकारकडे विनंति केली. या सगळ्या वाटाघाटींत सरकारचा वरचष्मा जर कशांत शिल्लक राहिला असेल तर तो या औपचारिक भाषेंतच राहिला आहे. कारण ही मागणी हक्काच्या स्वरूपाची नसून ती याचनेच्या स्वरूपाची आहे आणि ती पूर्ण करतांना सरकारहि आपल्या दयाळुत्वाचा डांगोरा पिटून, मेहेरनजर म्हणून सत्याग्रही कैद्यांना बंधयुक्त करण्यांत येत आहे, जप्त केलेल्या जमिनी मालकांना दयाळूपणानें परत देण्यांत येत आहेत आणि पाटील व कुळकर्णी यांनीं आपआपले राजीनामे मंजूर न करतां आपणास पुनः कामावर परत येण्यास परवानगी द्यावी, अशी विनंति केल्यावरून दयावंत सरकार त्यांस क्षमा करून कामावर घेत आहे, असें जाहीर करीत आहे. पण भाषा कोणी कशीहि वापरली तरी 'अंदरकी बात' सर्वांस कळून चुकली आहे.

### नवीन पायंडा पाडण्यांत सत्याग्रहाचा विजय

अशा रीतीनें सत्याग्रहाचा येथपर्यंत विजय झाला असला तरी फेर-चौकशीकरितां नेमलेली कमिटी शेतसारा कमी करते का कायम करते हा महत्त्वाचा प्रश्न अनिश्चित असल्यानें मन साशंक राहतें. परंतु एरवींच्या सेटलमेंटमध्यें वकिलामार्फत साक्षीपुरावा देण्याला व चौकशीचे कागदपत्र पाहण्याला परवानगी नसते; तसली परवानगी या कमिटीच्या चौकशीसंबंधीं देण्यांत आली आहे. अर्थातच वकिलांच्या मार्फत साक्षीपुरावा देऊनच उलटतपासणी करून देखील जर शेतसारा वाढविला गेला तर तो न्यायानेंच वाढविला असें ठरेल आणि त्या योगानें सत्याग्रहाच्या विजयास उणेपणा येऊं शकणार नाहीं. सेटलमेंट कामगारांनीं केलेला चौकशी अपुरी, चुकीची व असमाधानकारक आहे, सबब संपूर्ण, उघड व स्वतंत्र चौकशी

करा एवढीच मागणी सत्याग्रह पक्षानें केली होती. ही मागणी दिसतांना साधी दिसली तरी आजपर्यंतच्या वहिवाटीच्या विरुद्ध असून नवीन पायंडा पाडणारी आहे आणि असा नवा पायंडा पाडण्याचें श्रेय बार्डोलीच्या सत्याग्रह्यांना लाभलें हा कांहीं लहानसहान विजय नव्हे. आणि एवढ्याकरितांच बार्डोलीच्या उदाहरणावरून फेर-चौकशीच्या वहिवाटीचा हक्क प्रस्थापित झाला असें कोणीहि मानूं नये, असें आगलावे टाईम्सकार कंठशोष करून सांगत आहेत ! परंतु आतां हा प्रश्न वहिवाटीचा राहिला नसून तो बलाबलाचा प्रश्न होऊन राहील. ज्या शेतकऱ्यांच्या अंगांत बार्डोलीप्रमाणें संघटना करून स्वार्थत्याग करावयाची धमक असेल त्यांच्या सेटलमेंटची अशीच फेर-चौकशी होईल हें कांहीं निराळें सांगावयास नको. बार्डोलीनें आपल्यापुरता तरी नवा पायंडा पाडून एक गोष्ट जगजाहीर केली कीं, सरकारनें वज्रलेप म्हणून जाहीर केलेली गोष्ट देखील चळवळीच्या बळावर बदलतां येते.

नोकरशाहीनें वज्रलेप मानलेली गोष्ट चिकाटीनें चळवळ केल्यास बदलूं शकते असा अनुभव प्रथम बंगालच्या फाळणीच्या वेळीं आला व आतां दुसऱ्यांदा बार्डोलीच्या यशस्वी सत्याग्रहांतहि तसाच अनुभव आला. पण बंगालची फाळणी रद्द करून घेण्यास सहा वर्षें चळवळ करावी लागली. बार्डोलीच्या लढ्यांत सत्याग्रहाला ताबडतोब यश मिळालें. यास्तव तो अधिक अभिनंदनीय आहे. आपल्या इभ्रतीच्या रक्षणासाठीं सरकार किती हट्टास पेटतें व कसकसे अनन्वित प्रकार करतें हें ज्यांना अवगत आहे त्यांना बार्डोलीच्या लढ्यांत सरकारनें निरुपायानें आपल्या इभ्रतीवर पाणी सोडून माघार घेतली याचा खरोखरच आचंबा वाटेल. परंतु बार्डोलीचा हा सत्याग्रहच इतका शास्त्रशुद्ध व सुव्यवस्थित पद्धतीनें चालविला गेला कीं, त्याला हटकून यश मिळणें प्राप्तच होतें. या सत्याग्रहाच्या झटापटींत सरकारच्या हातून घोडचुका झाल्या. उलटपक्षीं सरदार वल्लभभाई यांनीं मात्र आपलीं मोहरीं इतक्या कुशलतेनें चालविलीं कीं, त्यांनीं प्रतिपक्षावर प्यादेमात केली यांत कांहीं नवल नाहीं.

## सरतेशेवटीं बकासुरास भीम भेटला

बार्डोलीच्या रिव्हिजन सेटलमेंटचा जो रिपोर्ट तयार झाला तोच मुळीं चुकीच्या तत्त्वावर रचला गेला. त्या चुकीचा फायदा घेऊन बार्डोलीच्या शेतकऱ्यांनीं पुनश्च चौकशी व्हावी अशी मागणी केली. ही साधी मागणी आपण अमान्य केल्यास एवढा निकराचा लढा उपस्थित होईल अशी सरकारची कल्पनाच धांवली नाहीं. सरकारचा पहिला पाय घसरला तो येथेंच. पण तेवढ्यानें सावध होऊन आंग सावरून न घेतां नेहमींप्रमाणें इभ्रतीच्या नादीं लागून सरकारनें दुराग्रह चालविला आणि त्यामुळें अधिकाधिक तोल जाऊन अखेरीस सरकारला आपली बाजू सावरणें दुर्घट झालें. सरकारच्या पाठीराख्या टाईम्सकाराला देखील आतां अशी कबुली द्यावी लागत आहे कीं, फेर-चौकशीची मागणी सरकारनें अमान्य केल्यामुळेंच या वादाला असें

तोंड लागलें. या चौकशीच्या मागणीच्या पाठीशीं सत्याग्रहाचें बळ उभें आहे याचा प्रारंभीं सरकारला अंदाज करतां आला नाहीं; किंबहुना नेहमींप्रमाणें स्वतःच्या अचाट शक्तीच्या घमेंडींत सरकारनें सत्याग्रहाचें बल साहजिकपणें तुच्छ लेखिलें. कारण आजपर्यंत किती तरी ठिकाणीं शेतसाऱ्याची बेसुमार वाढ सरकारनें केली होती आणि कांहीं ठिकाणीं त्या वाढीविरुद्ध थोडीबहुत चळवळ उद्भवली तरी ती नोकरशाहीनें आपल्या पचनीं पाडली होती. अशा रीतीनें ही बकासुराची स्वारी आजपर्यंत एकेक बळी गट्ट करून पुष्ट होत आल्यानें केव्हां तरी आपल्यालाहि एखादा खळी भेटेल अशी त्यास कल्पनाच नव्हती. पण सरतेशेवटीं बकासुरास भीम भेटला आणि त्यापुढें त्यास नमतें घ्यावें लागलें.

बार्डोली तालुक्यांत वल्लभभाईनीं जो सत्याग्रह सुरू केला तो यशस्वी होण्याला परिस्थिति तशीच अनुकूल होती. कारण सत्याग्रह यशस्वी होण्याला ज्या ज्या गोष्टी लागतात त्या सर्व तेथें उपस्थित होत्या; सत्याग्रहाचें क्षेत्र मर्यादित होतें आणि ज्याकरितां सत्याग्रह करावयाचा तें गाऱ्हाणेंहि त्या क्षेत्रांतील बहुतेक सर्व रहिवाश्यांना सारखेंच लागू होतें. सत्याग्रहाची मागणी निश्चित स्वरूपाची होती व ती मान्य करण्यांत सरकारलाहि फारशी तोशीस लागण्यासारखी नव्हती. शिवाय सत्याग्रहाचें स्वरूप सनदशीर असून त्यांत इतर कोणत्याहि राजकीय अथवा सामाजिक भानगडींची भेसळ नव्हती. सारांश, सत्याग्रह कोणत्या परिस्थितींत करावा याविषयीं तात्त्विक दृष्ट्या जे कोणते नियम शास्त्रकारांकडून घालून दिले जातील ते सर्व या सत्याग्रहाच्या लढ्यांत पाळले गेले होते आणि म्हणूनच हा सत्याग्रह यशस्वी होणार अशीं चिन्हें प्रारंभापासूनच दिसत होतीं.

### सत्याग्रहाचें नमुनेदार उदाहरण

अशा रीतीनें या सत्याग्रहाला नैसर्गिक अनुकूलता असली तरी त्याच्या यशाचें खरें श्रेय सरदार वल्लभभाई यांच्या अघटित घटनाचातुर्याला, स्वयंसेवकांच्या शिस्तवार परिश्रमाला, आणि सत्याग्रही शेतकऱ्यांच्या निधड्या छातीच्या स्वार्थत्यागालाच दिलें पाहिजे. जो सेनापति युद्धाला प्रारंभ करण्यापूर्वी स्वपरबलाबलाचा अंदाज बिनचूक करतो तोच विजयी होतो. वल्लभभाईनीं बार्डोली तालुक्यांतील रयतांच्या निश्चयाची आणि सरकारी कामगारांच्या अदूरदृष्टीची जी अटकळ केली होती ती तंतोतंत खरी ठरली, म्हणूनच त्यास हें यश लाभलें. पण त्या सर्वांपेक्षां सत्याग्रही शेतकऱ्यांच्या दृढनिश्चयावर त्यांची जी भिस्त होती ती खरोखरीच यथायोग्य ठरली. समेटाच्या वाटाघाटींचा इकडे धूमधडाका चालला होता तरी बार्डोलीच्या शेतकऱ्यांनीं समेटाविषयीं यत्किंचितहि अधीरपणा दाखविला नाहीं. त्यांनीं अल्पांशानें देखील जर आतुरता दाखविली असती तर काकदृष्टीच्या सरकारनें लगेच त्यांच्या उतावळेपणाचा फायदा घेतला असता आणि आपल्या

अटी अधिक टणक केल्या असल्या. परंतु स्वतःच्या स्वार्थत्यागाच्या सामर्थ्यावर शेतकऱ्यांचा एवढा दृढ विश्वास होता कीं, वल्लभभाई हे समेटाची भाषा बोलण्याला पुण्यास जात आहेत असें कळतांच, त्यांनीं कोणत्याहि अपमानकारक अटी मान्य करून तडजोड करूं नये, अशाविषयीं रयतांनीं महात्माजींजवळ निर्भीडपणें सांगितलें कीं, "आम्ही आमची सगळी जिनगानी जरी वल्लभभाईंच्या स्वाधीन केली असली तरी आमची अब्रू कांहीं त्यांच्या हवालीं केली नाहीं!" अर्थातच अब्रूला धक्का लागण्याजोगी कोणतीहि अट मान्य करण्यास हे सत्याग्रही तयार नव्हते. सारांश, ही सत्याग्रहाची मोहीम हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या चळवळींत अत्यंत नमुनेदार अशीच मानली जाईल, आणि सत्याग्रह कोणीं, केव्हां, कोठें, कशाकरितां आणि कशाप्रकारें करावा असा जेव्हां जेव्हां प्रश्न निघेल तेव्हां तेव्हां इतिहासकार उत्तम सत्याग्रहाचें नमुनेदार उदाहरण म्हणून बार्डोलीकडेच बोट दाखवितील.

---

## एक बार्डोली मिटली, पण इतरांची वाट काय ? १२

[ बार्डोलीचा सत्याग्रह कसा यशस्वी झाला तें वरील लेखांत नमूद झालें आहे. त्या तडजोडींत ठरल्याप्रमाणें चौकशी कमिटी नेमून तिचा रिपोर्ट बाहेर पडला आणि २२ टक्के वाढ झाली होती तीपैकीं ६ टक्के वाढ कायम राहून बाकीची वाढ रद्द झाली. अशा रीतिनें बार्डोलीच्या सत्याग्रहानें रयतांचे दर-सालचे १ लक्ष ३८ हजार रुपये वांचले. त्यावरून या लेखांत असा प्रश्न केला गेला आहे कीं, रिव्हिजन सेटलमेंटमध्यें जर अशा भरमसाट चुका होतात, तर जेथें बार्डोलीप्रमाणें सत्याग्रह झाला नाहीं तेथील रयतांनीं अन्यायानें वाढलेला सारा भूर्दंड म्हणून भरीत राहावयाचें कीं काय ? कुलाबा जिल्हा, आंबेगांव पेटा, सांगोला तालुका इत्यादि ठिकाणीं सारावाढीविरुद्ध अशाच तक्रारी होत्या; पण तेथला सत्याग्रह, खंबीर पुढाऱ्यांच्या अभावीं, टिकला नाहीं; पण तेवढ्यावरून सारावाढ न्याय्य मानावयाची कीं काय ? तेव्हां सरकारानें प्रत्येक ठिकाणीं सत्याग्रहाचा कडेलोट होईपर्यंत ताणून न धरतां आपली रिव्हिजन सेटलमेंट पद्धतीच सुधारावी, नाहीं तर अनेक बार्डोल्या निर्माण होतील, असा इशारा या लेखांत दिला आहे. ]

(केसरी, दि. १४ मे १९२९)

## सरकारनें माघार कशी घेतली ?

सुरत जिल्ह्यांतील बार्डोली व चौराशी तालुक्यांतून रिव्हिजन सेटलमेंट जाहीर झाल्यापासून तेथें असंतोषाच्या तीव्र ज्वाला पसरूं लागल्या होत्या, आणि त्यांचें पर्यवसान सत्याग्रहांत होऊन अखेरीस मुंबई सरकारला फेर-चौकशी करण्याकरितां कमिटी नेमावी लागली. त्या कमिटीचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्याचें नुसतें वरवर अवलोकन केलें तरी देखील बार्डोली व चौराशी तालुक्यांतील रयतांनीं जी एवढी प्रचंड चळवळ केली ती किती सकारण होती याविषयीं खात्री पटते. या रिव्हिजन सेटलमेंटच्या बाबतींत अथपासून इतिपर्यंत घोडचुकांची पुनरावृत्ति होत आली आणि सरकाराला पावलागणिक माघार घ्यावी लागली. सेटलमेंट ऑफिसर मि. जयकर यांनीं शेंकडा २५ टक्के सारावाढ करावी असें सुचविलें. सरकारला भावी चळवळीचें अगाऊच स्वप्न पडल्यामुळें सरकारनें भीत भीत २२ टक्केच वाढ मुक्रर करून ती जाहीर केली आणि फेर-चौकशीची विनंति अमान्य केली. पण त्यानंतर जसजसे सत्याग्रहाचे चटके बसूं लागले तसतसें सरकार एकेक बाबतींत माघार घेऊं लागलें. सत्याग्रहाच्या चळवळीस न जुमानतां वाढता सारा सरसकट चोपून वसूल करावयाचा असा सरकारचा पहिला बेत; पण बार्डोलीच्या रयतांच्या अभेद्य जुटीमुळें तो फिसकटला. त्यानंतर पठाणांच्या टोळ्या बार्डोलीवर सोडून, म्हशी-रेडे जप्त करून आणि जमिनींचा लिलाव पुकारून रयतांना घाबरवून सोडण्याचा उपद्व्याप करण्यांत आला. त्यांत यश तर आलें नाहींच; पण उलट सरकारच्या पाषाणहृदयीपणाचा बोभाटा मात्र सर्वत्र झाल्यानें सरकारला थोडेसें नमतें घेऊन तडजोड घडवून आणण्याची जरूरी वाटूं लागली.

तरी पण चौकशीच्या पूर्वी नवीन वाढीसुद्धां सगळा सारा रयतांनीं भरावा, रेव्हेन्यू खात्यांतीलच अधिकाऱ्यामार्फत चौकशी केली जाईल, तडजोडीच्या पूर्वींच ज्यांची जमीन लिलावांत विकली गेली ती जमीन परत मिळणार नाहीं आणि ज्या तलाठ्यांना व पाटलांना कामावरून दूर केलें त्यांना परत कामावर घेतलें जाणार नाहीं, असल्या सुलतानशाही थाटाच्या अटी सरकारनें पुढें मांडल्या. परंतु सरदार वल्लभभाई, यांच्या शिस्तींत वागणारे स्वयंसेवक आणि कमालीचा स्वार्थत्याग करण्यास तयार झालेले रयत यांच्या अभेद्य तटास कोठेंच खिंडार पडण्याचें जेव्हां लक्षण दिसेना तेव्हां यांतली एकेक अट गळण्यास प्रारंभ झाला. वाढाव्यासुद्धां सगळा सारा भरावयाचा खरा, पण तो डिपॉझिट म्हणून भरावा आणि ती रक्कम रयतांच्या नांवानें कोणींहि भरली तरी चालेल, रेव्हेन्यू खात्यांतील चौकशी कामगाराच्या जोडीला न्यायखात्यांतील ऑफिसर नेमूं व त्या उभयतांचा मतभेद झाल्यास न्यायखात्यांतील अधिकाऱ्यांचेंच मत मानलें जाईल, राजीनामा दिलेले तलाठी व पाटील कामावर घेऊं आणि अगाऊ लिलाव झालेली

जमीन लिलांव बोलणारानें तुम्हांस परत दिली तर ती तुम्ही त्यांच्याकडून घ्या, त्यांत आमचा कांहीं संबंध नाहीं, असें जेव्हां सांगण्यांत आलें आणि मेणाहून मऊ झालेल्या या अटी देखील जाचक होऊं नयेत म्हणून जेव्हां लिलाव घेणाऱ्यानें आपली लिलावाची रक्कम घेऊन सदर जमिनी सोडून द्याव्या, याविषयीं सरकारी ऑफिसरच आपलें वजन खर्च करूं लागले त्या वेळीं सरदार वल्लभभाई यांनीं त्या अटी कबूल करून चौकशी कमिटीला मान्यता दिली आणि मि. ब्रूमफील्ड व मि. मॅक्सवेल यांची कमिटी नेमून फेर-चौकशीस प्रारंभ झाला.

### सत्याग्रहानें किती वाढ रद्द झाली ?

या दोघां कामगारांनीं जो सविस्तर रिपोर्ट सादर केला आहे त्यावरून बार्डोलीच्या रयतांच्या तक्रारी बव्हंशीं खऱ्या होत्या आणि रिव्हिजन सेटलमेंटमध्यें झालेली सारावाढ चुकीची व अन्यायाची होती हें सिद्ध झालें आहे. सत्याग्रहाच्या पूर्वीच्या सेटलमेंटमध्यें बार्डोली तालुक्याचा सारा १२०१८५ रुपयांनीं वाढविण्यांत आला होता. त्यांतली अवघी ६ टक्के म्हणजे ३०८०६ रुपये वाढ कायम ठेवून बाकीची ८९३७९ रुपयांची वाढ रद्द करण्यांत आली आहे. चौराशी तालुक्याचा सारा ६७३०७ रुपये वाढविण्यांत आला होता. त्यांतली अवघी १७८४२ रुपयांची वाढ कायम ठेवून बाकीची ४९४६५ रुपयांची वाढ रद्द करण्यांत आली आहे. एवंच, या चौकशी कमिटीमुळें दोनहि तालुके मिळून १३८८४४ रुपयांची वार्षिक सूट मिळाल्याप्रमाणें झाली. पूर्वींचा आकार कायम राहिला असतां तर पुढील तीस वर्षांत एकंदर ४० लक्ष रुपयांचा भरणा हल्लींच्यापेक्षां अधिक करावा लागला असता तो वांचला. अर्थातच बार्डोलीच्या सत्याग्रहानें बार्डोली व चौराशी या दोन तालुक्यांतील रयतांचे ४० लक्ष रुपये वांचविले हा प्रत्यक्ष नगदी फायदा झाला.

परंतु सत्याग्रहाची किंमत रुपयांच्या मापानें मोजतां येण्याजोगी नाहीं व ती तशी मोजणें म्हणजे आपलें अज्ञान प्रकट करण्यासारखें आहे. झारशाहीलाहि खालीं पाहावयास लावणारी येथील नोकरशाही जर कशानें नमणार असेल तर ती संघटित सत्याग्रहानेंच नमेल हें तत्त्व या बार्डोलीच्या विजयानें अखिल हिंदी प्रजेस जाहीर केलें आहे. वज्राहून कठोर असें नोकरशाहीचें हृदय जहालांच्या टीकेच्या भडिमारानें भंग पावत नाहीं, मवाळांच्या अर्जविनंत्यांनीं तें द्रवत नाहीं, आंकडेपंडितांनी आपलें कितीहि पांडित्य प्रकट करून सरकाराच्या चुकीचें पाप त्याच्या पदरांत घातलें तरी तें तिकडे ढुंकून देखील पाहात नाहीं, पण सत्याग्रहाची प्रखर आंच चोहोंकडून लागली तर मात्र तें मेणाहून मऊ होतें, हा अनुभव यापूर्वीं इतर कित्येक प्रसंगीं थोड्याफार प्रमाणांत आलाच आहे; तथापि बार्डोलीच्या चळवळीनें सत्याग्रहाच्या बलाची कसोटी पुरतेपणीं पाहण्यांत आली आणि भावी चळवळीचें तत्त्व म्हणून तें बिनदिक्कत स्वीकारण्याइतकें महत्त्व त्या सत्याग्रहाला प्राप्त झालें.

## शितावरून भाताची परीक्षा

चळवळीच्या मार्गाच्या दृष्टीनें बार्डोलीच्या लढ्यापासून जो हा निष्कर्ष निघाला तो स्वराज्याच्या भावी लढ्यांत उपयोगी पडेलच. पण इतकी व्यापक दृष्टि सोडून केवळ रिव्हिजन सेटलमेंटच्या पद्धतींतील दोषाचें व अन्यायाचें आविष्करण करण्याच्या मर्यादित क्षेत्रापुरतें पाहिलें तरी या सत्याग्रहानें मोठीच कामगिरी केली आहे. मेसर्स ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांनीं हा रिपोर्ट जरी बार्डोली व चौराशी या दोन तालुक्यांपुरताच लिहिला असला तरी त्यांत त्यांनीं सेटलमेंट ऑफिसरच्या कामाच्या पद्धतीचें आणि सारावाढीच्या तत्त्वांचें जें आविष्करण व विवेचन केलें आहे तें सरकारच्या आजपर्यंतच्या सर्वच रिव्हिजन सेटलमेंटला लागूं होण्याजोगें असल्यानें, आजपर्यंत या सेटलमेंट खात्यानें केवढा घोर अन्याय व झारशाही जुलूम चालविला होता याची स्पष्ट कल्पना प्रत्येक वाचकास येते. चौकशी कमिटीनें सेटलमेंट कामगार व कमिशनर यांच्या लीलांचें जें वर्णन या रिपोर्टांत केलें आहे तें वर्णन व्यक्तिशः मि. जयकर व मि. अंडरसन यांनाच व केवळ बार्डोली तालुक्यापुरतेंच लागू होण्याजोगें आहे असें मानण्याचें कारण नाहीं. शितावरून भाताची परीक्षा होते त्याप्रमाणें बार्डोलीच्या या एका प्रकरणा-वरून सगळ्या सेटलमेंट पद्धतीचेंच अंतरंग उघडकीस आलें आहे.

रिव्हिजन सेटलमेंटचा आंधळा कारभार या रिपोर्टानें जगासमोर मांडला आहे. त्यांत मि. जयकर यांच्या हातून घडलेल्या ज्या डझनवारी चुका चवाठ्यावर आल्या आहेत त्या अपवादात्मक आहेत असें मानण्याच कारण नाहीं. बार्डोलीच्या हवेंतच कांहीं असा वेगळा गुण नाहीं कीं, तेथील सेटलमेंट करतांना सेटलमेंट ऑफिसरचें डोकें ठिकाणावर नसावें. ज्या चुका बार्डोलीच्या तरमबंदीच्या कामांत जयकरांच्या हातून घडल्या तसल्याच चुका दुसऱ्या कामगारांकडून दुसऱ्या तालुक्यांतून घडत आल्या आहेत, हें आम्हीं केवळ अनुमानावरून म्हणतों असें नसून त्याला याच रिपोर्टांत भक्कम पुरावा आहे. तो पुरावा असा कीं, मि. जयकर यांनीं जीं कित्येक चुकीचीं विधानें केलीं आहेत त्यांतलीं बरीचशीं विधानें त्यांनीं पूर्वीच्या सेटलमेंट रिपोर्टांतून जशीचीं तशीं उतरून घेतलीं आहेत. याचा अर्थ असाच होतो कीं, रिव्हिजन सेटलमेंटच्या कामावर नेमणूक होतांच आपण काय काय करावयाचें याचें चित्र त्या ऑफिसरच्या डोळ्यासमोर तयारच असतें. साऱ्याची वाढ करावयाची हें ध्येय अगाऊच ठरलेलें आणि त्याच्या समर्थनार्थ जी कारणपरंपरा जोडून द्यावयाची तीहि ठरलेलीच! धार्मिक विधींत ज्याप्रमाणें मंत्र-तंत्र सगळें कांहीं ठरलेलें असतें, फक्त 'मम' म्हणणारा तेवढा बदलत असतो त्याचप्रमाणें सेटलमेंटच्या रिपोर्टांतील मंत्र व तंत्र सगळें ठरून गेलें असून फक्त तालुक्याचें नांव व खेड्यांची यादी तेवढी त्या सांच्यांत बसेलशी

केली कीं झाला सेटलमेंट रिपोर्ट तयार! रयतांनीं तक्रार केली तर त्यांस उत्तर काय द्यावयाचें तेंहि सरकारच्या दप्तरीं छापून तयार असावयाचें! असला हा आंधळा कारभार साठ वर्षें चालला आहे; पण आजवर कोठें दाद लागेल तर शपथ!

## निराधार विधानें व अनुमानें

परंतु अखेरीस सेटलमेंट खात्याच्या पापाचे शंभर घडे भरले आणि त्याच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालणारा प्रतिस्पर्धी त्यास भेटला. सरदार वल्लभभाईच्या नेतृत्वाखालीं सत्याग्रहाची मोहीम चालू होतांच सरकारच्या डोळ्यावरची धुंदी पार उतरली आणि सरकारनें डोळे उघडून पाहण्यास प्रथमच सुरुवात केली. अशी सुरुवात करतांच मेसर्स ब्रूमफील्ड व मॅक्सवेल या दोघां सरकारी डोळ्यांना काय दिसलें! मि. अंडरसन व मि. जयकर यांचे रिपोर्ट हातांत घेऊन हे दोन सरकारी डोळे जेव्हां बार्डोलीकडे पाहूं लागले तेव्हां बार्डोलींतील वस्तुस्थितीचा व त्या रिपोर्टांचा ताळ ना मेळ! बार्डोली व चौराशी या तालुक्यांतील अर्धी जमीन खंडानें दिली जाते असें अंडरसन लिहितात. उलट ब्रूमफील्ड व मॅक्सवेल म्हणतात कीं या तालुक्यांतल्या बहुतेक खेड्यांतून खंडानें लागवड करण्याचा व्यवहार क्वचितच होतो आणि ज्या खंडचिठया म्हणून टेनन्सी रजिस्टरांत नोंदविलेल्या आहेत त्या बिनामी खंडचिठया असून खरे व्यवहार निराळेच आहेत. एका खंडकऱ्यानें एक भिकार जमीन ५० रु. खंडानें घेतल्याची खंडचिठी अंडरसन यांस आढळली. तेवढ्यावरून साहेबानें सिद्धान्त ठोकून दिला कीं, या तालुक्यांत जमीनदारांना सरकारी साऱ्याच्या १४ पट खंड कुळाकडून मिळतो! पण जेव्हां ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांनीं या खंडचिठीचा छडा लावला तेव्हां त्यांस आढळून आलें कीं, त्या जमिनींत एक विहीर आहे व त्या विहिरीचें पाणी आपल्या कारखान्यांतल्या कामकऱ्यांना मिळावें म्हणून एका पारशी गृहस्थानें ती खंडचिठी लिहून दिली आहे.

बार्डोली व चौराशी या तालुक्यांतून रस्त्यांची दुरुस्ती झाली आहे, तेथून तांदूळ व गवत यांची निर्गत फार होते व त्यामुळें शेतकरी गबर झाले आहेत, शेतकऱ्यांच्याजवळ शेतीचीं व दुभतीं जनावरें वाढलीं आहेत, तालुक्यांतली लोकसंख्या वाढत आहे इत्यादि जीं कारणें सारावाढीला अनुकूल म्हणून मि. जयकर यांनीं नमूद केलीं होतीं तीं सगळीं वस्तुस्थितीस सोडून असल्याचें कमिटीला आढळून आलें. रस्त्यांची दुरुस्ती न होतां उलट रस्ते अधिक खराब झाले आहेत, मोटारींचा सुळसुळाट झाल्यानें गवताला भाव येईनासा झाला आहे, लोकसंख्येची वाढ जननसंख्येच्या मानानें कमीच झालेली आहे, कापसाचा भाव १९१६ ते १९२४ पर्यंत तेजीचा होता खरा, पण अलीकडे तो मंदीचा झाल्यानें रयतांचें उलट नुकसानच होत आहे. तांदुळाचा भाव वाढला आहे खरा, पण

तांदुळाची निर्गत अगदींच अल्प प्रमाणांत होत असल्यानें भाव वाढून न वाढून सारखाच. उलटपक्षीं धान्याचे भाव चढल्यामुळें मजुरी वाढली आणि शेतीचें प्रत्येक काम पूर्वींपेक्षां महाग पडूं लागलें. अशा रीतीनें मेसर्स जयकर व अंडरसन यांची नेहमींची ठराविक कारणपरंपरा येथें कशी गैरलागू आहे तें खुलासेवार उघडकीस आणून मेसर्स ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांनीं बहुतेक ठिकाणांची सारावाढ रद्द करून अगदीं थोडी म्हणजे ६ टक्के वाढ शिल्लक ठेविली आहे. खेड्यांची वर्गवारी ठरविण्यांत या सेटलमेंट बहादुरांनीं आंधळेपणानें कसा धुडगूस घातला आहे, त्याचेंहि असेंच चित्र या रिपोर्टांत रेखाटलें आहे.

सारांश, आजपर्यंतच्या आंधळ्या कारभाराला हरकत घेऊन बाप दाखीव नाहीं तर श्राद्ध कर, असें हात धरून खडसावून बजावणारा जेव्हां भेटला तेव्हां सरकारचे डोळे उघडले. आणि या रिपोर्टावर सरकारनें अशी मखलाशी केली कीं, सारावाढीच्या सर्वसामान्य तत्त्वासंबंधानें कोणतेंहि मत प्रदर्शित न करतां एवढेंच जाहीर करतों कीं, ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांनीं शिफारस केल्याप्रमाणें अनुक्रमें ६ टक्के व ५·२४ टक्के वाढ बार्डोली व चौराशी या तालुक्यांत कायम ठेवून त्याहून अधिक केलेली वाढ आम्ही रद्द करतों. त्याचप्रमाणें खेड्यांची जुनी प्रतवारी रहित करून या रिपोर्टांतली प्रतवारी अमलांत आणण्याची तजवीज करतों.

### इतर ठिकाणचा अन्याय कायम कां राहावा ?

पण यावर आमचा सरकारास असा सवाल आहे कीं, ज्या पद्धतीनें बार्डोली व चौराशी येथील रिव्हिजन सेटलमेंट झाली त्याच पद्धतीनें आजवर शेंकडों ठिकाणीं सेटलमेंट होऊन सारावाढ करण्यांत आली आहे व तेथल्या रयतांनीं अर्ज करून व अन्य मार्गांनीं त्या सारावाढीला हरकतहि प्रकट केली आहे. किंबहुना बार्डोलीच्या पूर्वींच जुन्नर तालुक्यांत आंबेगांव पेट्यांत व कुलाबा जिल्ह्यांत सत्याग्रह पुकारला गेला होता. परंतु त्या ठिकाणची परिस्थिति वेगळी असल्यानें सत्याग्रह इतका यशस्वी झाला नाहीं. पण तेवढ्यावरून तेथील सारावाढ न्याय्य व यथायोग्य ठरते काय ! ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांनीं बार्डोलीच्या जमिनीचें व हवापाण्याचें जें वर्णन केलें आहे तें वाचून पाहिल्यास महाराष्ट्रांतल्या कोणत्याहि तालुक्यास तें वर्णन लागूं होणार नाहीं. असें असतां बार्डोलीची २२ टक्के सारावाढ देखील जर चुकीची ठरते आणि केवळ ६ टक्के वाढ कायम केली जाते तर सांगोल्यासारख्या किंवा आंबेगांवासारख्या भिकार व दुष्काळपीडित तालुक्यांतून किंवा पेट्यांतून झालेली ५०–६० टक्के वाढ किती चुकीची व जुलमाची असली पाहिजे ! जेथें हिशेब विचारणारा ऑडिटर भेटला तेथें जशा इतक्या घोडचुका आढळल्या तशाच चुका इतर ठिकाणीं झाल्या नसतील असें मानणें स्वाभाविक आहे काय ! त्यांतून जो दोष व्यक्तीचा नसून पद्ध-

तीचा आहे तो दोष जसा एके ठिकाणीं उमटला तसाच तो अन्य ठिकाणीं उमटलाच असला पाहिजे.

अशा परिस्थितींत "जेवढी उघडकीस आली तेवढी चोरी आणि जेवढी पचली तेवढी सावकारी" असला आडमुठा न्यायचें सरकार पाळणार काय! सत्याग्रहाच्या जोरावर जो आपली दाद लावून घेईल त्याचा तेवढा न्याय करूं असें म्हटल्यानें 'बळी तो कानपिळी' या तत्त्वाला उत्तेजन दिल्यासारखें होत नाहीं काय! आणि जेथला सत्याग्रह अर्धवट स्थितींत बंद पडला आहे किंवा अद्यापि सुरू न झाल्यानें आंतल्या आंत धुमसत राहिला आहे तेथल्या सत्याग्रहास हें एक प्रकारचें आव्हानच नव्हे काय! अशा रीतीनें प्रत्येक ठिकाणीं सत्याग्रहाचा कडेलोट होई-पर्यंत ताणून धरल्यानें सर्वत्र बजबजपुरी माजणार नाहीं काय! याकरितां सरकारनें या बाबतींतली धरसोड आतां पुरे करावी आणि लँड रेव्हेन्यू कोडाची लोकमतानुसार दुरुस्ती करून बार्डोलीपर्यंतच्या जुन्या अन्यायाची परंपरा जेणेंकरून बंद पडेल आणि नवीन अन्याय घडण्याला वावच राहणार नाहीं अशी सक्त तजवीज करावी. तसें न घडेल तर ब्रूमफील्ड व मॅक्सवेल यांच्या या रिपोर्टामुळें एका बार्डोलीचा लढा मिटविला असला तरी दुसऱ्या अनेक बार्डोल्या निर्माण करणारें असंतोषाचें बीं पेरलें गेलें आहे हें सरकारनें ध्यानांत ठेवावें.

---

## सत्याग्रहाच्या युद्धाचा रणदुंदुभि वाजूं लागला १३

[ म. गांधी यांनीं मिठाचा सत्याग्रह करण्याचें जाहीर करून दि. १२ ला साबरमती आश्रमांतून दांडीकडे कूच करण्याचें योजिलें. अशा रीतीनें सुरू होणारा सत्याग्रह म्हणजे एक प्रकारें अखिल भारतीय लढाच आहे, तेव्हां भारतीय वीरांना या लढ्यांत भाग घेण्याला निमंत्रण करणारा हा रणदुंदुभीच वाजूं लागला आहे, तेव्हां त्या रणदुंदुभीच्या निमंत्रणाला भारतीयांनीं मान द्यावा व सत्याग्रहांत शक्य त्या या प्रकारानें भाग घ्यावा, असा या लेखाचा निष्कर्ष असून लेखाचा मथळा व तदनुरूप अवतरण हें 'वेणीसंहार' नाटकांतून घेतलेलें आहे. त्यावरून हा सत्याग्रहाचा लढा किती दूरगामी परिणामकारक होणारा आहे, याविषयींचें लेखकाचें मत या मथळ्यावरूनच व्यक्त होतें व त्याचें स्पष्टीकरण या लेखांत आहे. ]

( केसरी, दि. ११ मार्च १९३० )

राजन्योपनिमंत्रणाय रसति स्फीतं यशोदुंदुभिः – वेणीसंहार

म. गांधींनीं संकल्प करून व्हाइसरॉयास पूर्वसूचना दिल्याप्रमाणें सत्याग्रहाच्या युद्धास बुधवार ता. १२ रोजीं प्रारंभ व्हावयाचा आहे. परंतु सरकारासच आतां इतकी घाई झाली आहे कीं, गांधींजींनीं साबरमतीच्या आश्रमांतून बाहेर पडून कायदेभंगास सुरुवात करण्यापूर्वींच सरकारनें सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर झडप घालून त्यांच्यावर मॅजिस्ट्रेटचा हुकूम तोडल्याचा आरोप ठेवला आणि त्यांची खेडा येथें झटपट चौकशी करून त्यांस तीन महिने विश्रांति घेण्यास साबरमतीच्या तुरुंगांत पाठविलें ! वास्तविक पाहतां सरदार वल्लभभाई हे सत्याग्रहासाठीं म्हणून बाहेर पडले नव्हते. गांधींनीं या मोहिमेस प्रारंभ केल्यानंतर, त्या झटापटींत त्यांची कारागृहवासांत रवानगी झाल्यावर, त्यांची जागा वल्लभभाईंनीं स्वीकारावी आणि कायदेभंगाची मोहीम पुढें चालवावी असा संकेत ठरला होता. पण सरकारचा संकेत वेगळाच ठरलेला असल्यामुळें त्या संकेतानुरूप पहिली आहुति गांधीजींची न घेतां वल्लभभाईंची घेण्यांत आली. यांत सरकारनें वल्लभभाईंचा बहुमानच केला आहे, व त्या मानास ते पात्रच आहेत. वल्लभभाईंनीं आतांपर्यंत चार-पांच वेळां सत्याग्रहाची लढत लढविली आहे. आणि प्रत्येक मोहिमेंत विजयश्रीनें त्यांच्या गळ्यांत माळ घातली आहे. असा विजयी सरदार कायदेभंग करून सरकारच्या कायद्याच्या जाळ्यांत आपण होऊनच अडकून पडेपर्यंत धीर न धरतां नोकरशाहीनें आपल्या कायद्यांचें जाळें मुद्दाम त्यांजवर टाकून त्यांस पकडलें, यावरूनच म. गांधींपेक्षां सरकार सरदार वल्लभभाईंना अधिक भितें असें सिद्ध होत आहे. कारण सरकारला पक्कें ठाऊक आहे कीं, सुरत जिल्ह्यांतील ज्या भागांत गांधी हे सत्याग्रहाकरितां तळ देऊन राहणार त्या भागांतल्या सत्याग्रही स्वयंसेवकांची संघटना वल्लभभाई पटेल यांनींच चालविली असून त्यांनीं निर्माण केलेली संघशक्ति सरकारला अनावर होईल. यास्तव वल्लभभाईंनीं निर्माण केलेली शक्ति गांधीजींच्या हातून सरकारच्या छातीवर येऊन आदळण्यापूर्वींच तिला प्रतिबंध करावा या हेतूनें सरकारनें आपल्या मतें वल्लभभाईंचाच कांटा आधीं काढून टाकला !

अशा हातचलाखीनें आपण गांधींचा सगळा व्यूह ढांसळून टाकून तो निष्फळ करूं अशी सरकारची समजूत असल्यास ती सर्वथैव चुकीची आहे. कारण आतां सत्याग्रहाचें बीं सर्वत्र व इतकें खोल रुजलें आहे कीं, वल्लभभाई आधीं कारागृहांत गेले काय अथवा गांधीजी कारागृहांत गेले काय, त्या योगानें सत्याग्रहाची लढत चालविण्याच्या योजनेंत कांहींच तफावत पडणार नाहीं. जर कांहीं फरक झालाच तर वल्लभभाईंना अशा रीतीनें आगाऊ अचानक पकडल्यामुळें सत्याग्रहाची तीव्रता मात्र अधिक वाढेल. अर्थातच गांधींना देखील वल्लभभाईंच्या

तुरुंगवासाची ही बातमी कळतांच त्यांनीं आपलें प्रस्तान दोन दिवस आगाऊच ठेवण्याचा विचार चालविला होता. पंण अखेरीस पूर्वीचाच मुहूर्त कायम करण्यांत आला व त्यास अनुसरून उदयीक म्हणजे बुधवार ता. १२ रोजीं सकाळीं ६ वाजतां गांधीजी आपल्या ६०–७० अनुयायांसह सविनय कायदेभंगाच्या मोहिमेवर निघतील.

म. गांधींच्या खलित्याची वासलात कशी लागली ?

या मोहिमेवर निघण्याचें निश्चित करण्यापूर्वी म. गांधींनीं शेवटचा शिष्टाईचा प्रयत्न म्हणून जो व्हाइसरॉयकडे एक खलिता पाठविला त्याचा व्हाइसरॉयच्या मनावर लवलेशहि परिणाम झाला नाहीं असें दिसतें. कारण त्या खलित्याला त्यांनीं नुसतें चार ओळींचें औपचारिक उत्तर पाठविलें आणि त्यांत तरी काय लिहिलें तर "कायद्याचें उल्लंघन करणारा व सार्वजनिक शांतता बिघडविणारा मार्ग आक्रमण्याचें तुम्हीं योजिलें आहे याबद्दल व्हाइसरॉयांना वाईट वाटत आहे!" हें वाईट वाटणें केवळ इंग्रजी शिष्टाचाराचें नसून खरें अंतःकरणपूर्वक असतें तर व्हाइसरॉयांनीं ही अखेरची शिष्टाई अशी धुडकावून न लावतां गांधींना भेटीस बोलाविलें असतें आणि उभयतांच्या विचारें हा महाभारती लढा थोपविण्याजोगी कांहीं तरी तड-जोड काढली असती. परंतु साम्राज्यमदानें धुंद झालेल्यांच्या डोळ्यांना अखेरीस सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट गोष्टीहि दिसेनातशा होतात आणि कानांना घनगर्जनेसारखे कानठळ्या बसविणारे आवाजहि ऐकूं येतनासे होतात. अर्थातच, जणूं काय गांधींच्या खलित्यांत विचार करण्याजोगें कांहीं नाहींच अशा गुर्मीनें व्हाइसरॉयांनीं आपल्या मतानें त्याची वासलात लाविली आहे. पण गांधींच्या या अखेरच्या शिष्टाईत किती खोल अर्थ भरला आहे हें त्यांच्या प्रत्ययास आल्याशिवाय राहणार नाहीं.

गांधींचा हा खलिता म्हणजे सरकारला उघड व गर्भित असा दुहेरी इषारा आहे. हिंदुस्थान देशावर ब्रिटिशांनीं ही चालविलेली झारशाही या देशाला किती प्रकारांनीं घातक झाली आहे याचा जो पाढा गांधींनीं वाचला आहे, त्यांतल्या कांहीं तपशिलाबद्दल कदाचित् कोणी सरकारी आंकडेपंडित नाकें मुरडतील. तथापि धृतराष्ट्रासारख्या एखाद्या जन्मांधालाहि जी गोष्ट ढळढळीतपणें दिसेल अशी जी एक मुद्द्याची गोष्ट त्यांत नमूद आहे तेवढ्याचा तरी व्हाइसरॉयांनीं विचार करा-वयाचा होता आणि हें असें झालें कसें व तें कसें सुधारतां येईल, याची वाटाघाट करावयाची होती. हिंदुस्थानवर ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला ही एक 'ईश्वरी कृपा'च होय. हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं देवानें तो एक या देशाला वरच दिला आहे, अशी समजूत कांहीं कालापूर्वी बहुतेक सर्व अशिक्षितांची आणि बऱ्याचशा शिक्षितांचीहि होती! ती समजूत आतां पार लयाला जाऊन हिंदुस्थानवर ब्रिटिशांचा अम्मल बसला 'हा एक शापच' आपल्या माथ्यावर बसला अशी भावना अली-

कडे होऊं लागली आहे व गांधींनीं ती व्हाइसरॉयांना लिहिलेल्या पत्रांत नमूद केल्यामुळें तिच्यावर वज्रलेपाप्रमाणें शिक्कामोर्तब झालें आहे.

### माबाप सरकार दुस्मन वाटूं लागलें

पूर्वी जो वर मानला जात होता तो आज शाप मानला जाऊं लागला एवढा ब्रिटिश राज्यनीतीचा अधःपात कशामुळें झाला? व तो अधःपात थांबवून आपल्या राज्यधोरणाला लागलेला हा कलंक कसा धुवून काढावा याचा शांत डोक्यानें विचार करणें हें व्हाइसरॉयांचें कर्तव्य नाहीं काय? आणि हें कर्तव्य प्रामाणिकपणें बजावा असेंच महात्माजींचा खलिता व्हाइसरॉयांना उघड बजावीत नाहीं काय! पण या इशाऱ्याकडे त्यांचें लक्ष तरी गेलें काय? चुकीनें असो, भ्रांतीनें असो, कसेंहि असो, जे भोळेभाबडे भरतवासी लोक सरकारला 'माबाप' समजत होते तेच लोक आतां त्याच सरकारला दुस्मानासारखे लेखूं लागले आहेत. एवढी ही विचारक्रांति घडण्यासारखें पाप राज्यकर्त्यांच्या हातून कोणतें घडलें! आणि तें पाप यापुढें तरी कसें टाळावें आणि त्या पापक्षालनार्थ कोणतें प्रायश्चित्त घेऊन जनतेचीं मनें पुनः आकर्षून घ्यावींत याचा निदान स्वार्थैक दृष्टीनें तरी व्हाइसरॉयांनीं विचार करावयास नको होता काय? पण तसा जर विचार नोकरशाहीकडून होईल तर व्यास महर्षींनीं धृतराष्ट्र-दुर्योधनादिकांचें आणि वाल्मीकि महर्षींनीं, रावण-कुंभकर्णादिकांचें शब्दचित्र मनुष्यस्वभावाला अनुसरून रेखाटलें नसून केवळ स्वकपोलकल्पनेनें आणि अनैसर्गिक असेंच रेखाटलें आहे असा आक्षेप त्या महर्षींवर आला असता! पण व्यास-वाल्मीकादिकांची मनुष्यस्वभावाची पारख अगदीं बरोबर आहे हें ब्रिटिश नोकरशाही आपल्या चुकांचें परिमार्जन न करतां त्यांचें दृढीकरण करून आज सिद्ध करीत आहे.

### सरकार वठणीला केव्हां येईल?

गांधीजींच्या लेखांतला जो एक इशारा नोकरशाहीला अनुलक्षून आहे, त्याच्याकडे तिनें सर्वतोपरी दुर्लक्ष केलें आहे, हें व्हाइसरॉयांच्या धिक्कारगर्भ आणि अल्पाक्षर पण बव्हर्थसूचक अशा उत्तरावरून सिद्ध होतच आहे. परंतु गांधींच्या पत्रांतला जो दुसरा इशारा जनतेला अनुलक्षून आहे त्याच्याकडे जनताहि असेंच दुर्लक्ष करणार काय? अनत्याचाराचें बळ सर्वस्व आत्मिक सामर्थ्यावर अवलंबून असतें आणि तें आत्मिक सामर्थ्य प्रकट होण्याचा एक मार्ग म्हणजे तत्कार्यैकनिष्ठ अशा अनुयायांचा अखंड ओघ चालू राहणें हा होय. सत्याग्रहाचा विजय होण्याला सत्याग्रह पक्ष हाच बहुजनसंमत आणि बलिष्ठ व तद्विरोधक नोकरशाहीचा पक्ष अल्पसंख्य व कमकुवत आहे, असें स्पष्टपणें जगाच्या निदर्शनास आलें पाहिजे. गांधींनीं जो हा शेवटचा शिष्टाईचा खलिता व्हाइसरॉयांकडे रवाना केला तो याच कल्पनेनें केला असावा कीं, सविनय कायदेभंगाचें तत्त्व लक्षावधि कॉंग्रेसभक्तांना पटलें आहे

व ते आपल्या पाठोपाठ सत्याग्रहाला तयार होऊन सरकारला जिकीरीस आणून सोडतील. असल्या कायदेभंगाचा विजय हा संख्याबलावरच अवलंबून असल्यानें ज्या वेळीं कायदेभंग करणाऱ्यांना पकडण्यासाठीं पोलीस पुरे पडणार नाहींत, त्यांच्यावरचे खटले चालवितां चालवितां मॅजिस्ट्रेट मेटाकुटीस येतील आणि ज्या वेळीं एवढ्या प्रचंड सत्याग्रही सेनासागराला कोंडून ठेवण्याला देशांतले सगळे तुरुंगहि अपुरे ठरतील, त्या वेळींच सरकार वठणीला येईल.

पण न जाणो, यदाकदाचित्, अशा तत्त्वनिष्ठ अनत्याचारी अनुयायांची संख्या सरकार रडकुंडीस येईल एवढी असंख्य भरणार नाहीं अशी ओझरती शंका येऊनच कीं काय, गांधीजींनीं आपल्या त्या पत्रांत दुसरा एक गर्भित इशारा सरकारला देऊन ठेवला आहे. गांधीजी लिहितात कीं, "मी व माझे एकनिष्ठ अनुयायी हे तर प्राण गेला तरी छळ करणाऱ्याविरुद्ध हात उचलणार नाहींच हें निस्संशय खरें आहे. पण देशांतल्या ३२ कोटि लोकांची हमी कोण घेऊं शकेल ?" असली अमर्यादित जबाबदारी आपणावर पडूं नये म्हणूनच तर गांधींनीं या सत्याग्रहाचें सर्व नेतृत्व कॉंग्रेसकडून काढून स्वतःकडे घेतलें आहे आणि आपल्या हाताखालच्या खास तुकडींत ते आपल्या खात्रीच्या इसमाशिवाय इतर कोणाचाहि समावेश करून घेण्यास तयार नाहींत. कित्येकांनीं तशी तीव्र इच्छा प्रकट केली असतां व त्यांच्या लायकीविषयीं शंका घेण्यासहि जागा नसतां गांधींनीं त्यांस आपल्या तुकडींत दाखल होण्यास परवानगी दिली नाहीं, यावरून ते स्वतः आपलें अनत्याचाराचें तत्त्व अक्षरशः पाळलें जावें याविषयीं केवढी दक्षता बाळगीत आहेत तें दिसून येतें.

तरी पण केवळ कर्तव्य म्हणून नोकरशाहीला ते एक प्रकारें असा गर्भित इशारा देऊन ठेवीत आहेत कीं, या सविनय कायदेभंगाचें रूपांतर कालांतरानें अविनय कायदेभंगांत होणारच नाहीं, अशी हमी कोण घेऊं शकेल ? मी तुरुंगांत गेल्यानंतर तसला कांहीं प्रकार घडल्यास त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. तथापि तीहि शक्यता लक्षांत घेऊन सरकारनें या शिष्टाईचा विचार करावा. परंतु सरकार इतकें घमेंडखोर आहे कीं, गांधीजींचा हाहि इशारा त्यांस कस्पटासमान वाटत असावा आणि म्हणूनच त्यांच्या शिष्टाईस त्यांनीं अशा वाटाण्याच्या अक्षता लावल्या असाव्या. परंतु घमेंडखोरांची घमेंड उतरण्याचा अखेरीस केव्हांना केव्हां तरी आणि कोणत्याना कोणत्या तरी मार्गानें प्रसंग येतोच. रावणानें आपल्याला देव अगर दानव यांपासून मृत्यु येऊं नये अशी खबरदारी घेतली. तरी त्याचा नाश नर आणि वानर यांच्या हातून झाला; हिरण्यकश्यपूनें आपल्याला दिवसा अगर रात्रीं या दोहोंतून केव्हांहि मरण येऊं नये म्हणून वर संपादन केला, तरी त्याचा नाश संधिकालांत झालाच; तो कांहीं कायमचा टळला नाहीं.

### अनत्याचार बरा का अत्याचार बरा ?

म्हणूनच नोकरशाहीला गांधींचा असा गर्भित पण अर्थपूर्ण सवाल आहे कीं, तुम्ही अनत्याचारी सत्याग्रही लोकांशीं तडजोड करून स्वराज्य देणार कां, या चळवळीचें अत्याचारांत रूपांतर झाल्यावर मुठींत नाक धरून आयर्लंडांतल्या सिनफेनवाल्यांप्रमाणें अत्याचारी सत्याग्रह्यांशीं तडजोड करून त्यांना स्वराज्य देणार ! एवींतेवीं तुमच्या हातची सत्ता जावयाची कांहीं टळत नाहीं. मग जगाच्या इतिहासांत अनत्याचार यशस्वी होतो, असें नमूद होणें श्रेयस्कर का अत्याचारच यशस्वी होतो असें नमूद होणें श्रेयस्कर ! आयर्लंडानें अत्याचार केले तेव्हांच त्यास इंग्लंडनें स्वराज्य दिलें हा ऐतिहासिक दाखला संसर्गजन्य रोगासारखा आहे. पारतंत्र्यांत पिचणाऱ्या राष्ट्रांना पछाडणारें तें एक अनिष्ट उदाहरण होऊन बसलें आहे. आणि हिंदुस्थानांतहि अनत्याचारी सत्याग्रहाची तशीच अपेशी अखेर झाली तर जगांत अत्याचारी पाशवी शक्ति हीच स्वातंत्र्येच्छु राष्ट्राची अधिदेवता होऊन बसेल. तिकडे खुद्द इंग्लंडमध्येंच राष्ट्राराष्ट्रांत सलोखा घडवून, आरमारें कमी करून, रणदेवतेला आणि तिची उपासना करणाऱ्या उपासकांना कायमची रजा देण्याचा विचार चालला आहे. आणि इकडे जगाला अनत्याचाराचा धडा शिकविण्याकरितां आपलें बलिदान करण्यास तयार झालेल्या महात्माजींच्या, अंतःकरणाला पीळ पाडणाऱ्या पत्राची येथील नोकरशाहीकडून केवळ थट्टा केली जात आहे. म्हणूनच अशा नोकरशाहीच्या या उर्मटपणाबद्दल तिला जबाब विचारण्याकरितां म. गांधी हे उदयींक आपल्या मोहिमेवर निघणार आहेत. त्यांच्या या मोहिमेंत त्यांना यशःप्राप्ति व्हावी म्हणून आपल्या हातून ज्या ज्या मार्गानें त्या चळवळीस मदत होईल त्या त्या मार्गानें मदत करणें आणि अनत्याचारी सत्याग्रही लोकांशीं सरकारहि तशाच अनत्याचारी वृत्तीनें न वागेल तर त्याबद्दल सरकारला जाब विचारणें, हेंच या वेळीं प्रत्येक हिंदवासीयाचें कर्तव्य आहे.

---

## बेजबाबदार नोकरशाही व दुबळें लोकमत १४

[इ. स. १९३० च्या मार्च महिन्यांत हिंदुस्थानांत कायदेभंगाची लाट उसळली होती. त्या वेळीं कायदेभंग करण्याच्या अनेक प्रकारांत ताडीचीं झाडें तोडण्याचा सपाटा सुरू झाला होता. त्या वेळीं सोलापूर शहरांतून एक मोठा जमाव ताडी तोडण्याकरितां निघाला असतां त्यास तेथील अधिकारी व

(केसरी, दि. १३ जानेवारी १९३१)

पोलीस यांनीं हरकत केली. या अडवणुकीच्या प्रकारांतून दंगल सुरू झाली. आणि प्रक्षुब्ध जमावांतील कांहीं आडदांड दंगेखोरांनीं एका पोलीस चौकीवर हल्ला करून ती जाळली आणि त्या जाळपोळींत बिचाऱ्या दोन पोलिसांची आहुति पडली. या खुनांतील आरोपी म्हणून मल्लाप्पा धनशेटी, सारडा, शिंदे आणि कुरबान हुसेन अशा चौघांवर खटला होऊन सेशन कोर्टानें असेसरांच्या मताविरुद्ध चौघांनाहि फांशीची शिक्षा सुनावली. हायकोर्टांतील अपिलांत न्यायाधिशांत मतभेद झाला तरी बहुमताच्या जोरावर फांशीची शिक्षा कायम झाली. अखेरीस दया दाखविण्याविषयींचे सगळे प्रयत्न व्यर्थ जाऊन आणि ना. आगाखान, सप्रू, शास्त्री, जयकर इत्यादिकांची शिष्टाईहि झिडकारून मुंबई सरकारनें आपला हट्ट शेवटास नेला आणि त्या चौघांहि आरोपीस येरवड्याच्या तुरुंगांत फांसावर टांगलें. अशा रीतीनें नोकरशाहीनें बेगुमानपणें लोकमत पायाखालीं तुडविलें, यामुळें जनतेचीं मनें अत्यंत प्रक्षुब्ध झालीं. अशा प्रक्षुब्ध वातावरणांत बेजाबदार नोकरशाहीच्या पाषाणहृदयीपणाची जनतेला किती चीड आली होती याचें वर्णन या लेखांत अत्यंत कडक भाषेंत व्यक्त केलें गेलें असून, अखेरीस " लोकमताला आपल्या टापांखालीं बिनदिक्कत तुडवीत सैरावैरा धावणारें हें बिनलगामाचें तट्टू लोकमतरूपी लगामाच्या नियंत्रणाखालीं लवकर आणण्यासाठीं लोकमत अत्यंत प्रभावी करणें हें आपलें कर्तव्य आहे " असा बोध या दुःखपर्यवसायी घटनेपासून घ्यावा, असा निष्कर्ष लेखाच्या शेवटीं काढला आहे. ]

## सरकारनें आपला हट्ट तडीस नेला

सोलापूरच्या दंग्यांत झालेल्या पोलिसांच्या खुनाच्या खटल्यांतील दुर्दैवी आरोपी मल्लाप्पा धनशेटी, सारडा, शिंदे व कुरबान हुसेन यांना काल रोजीं सकाळीं येरवड्याच्या तुरुंगांतील आवारांत फांशी देण्यांत आलें हें वृत्त वाचून ज्याच्या अंगाचा संतापानें जळफळाट होणार नाहीं आणि ज्याचें अंतःकरण निराशेनें उद्विग्न होणार नाहीं असा वाचक विरळाच आढळेल. या आरोपींना फांशी न देतां त्यांना दया दाखवून त्यांची फांशीची शिक्षा सरकारनें रद्द करावी अशाविषयीं जितके म्हणून सनदशीर प्रयत्न करणें शक्य होतें तितक्या सर्व प्रयत्नांची शिकस्त करण्यांत आली. मुंबई इलाख्यांतच नव्हे तर हिंदुस्थानांतहि नांव घेण्याजोगें असें कोणतेंहि शहर नसेल कीं, जेथें सभा भरली नाहीं. आणि अशी एकहि प्रमुख संस्था नसेल कीं, त्या संस्थेनें दया दाखविण्याविषयीं अर्ज पाठविला नाहीं. मुंबईचे गव्हर्नर व दिल्लीचे गव्हर्नर जनरल यांच्याकडे गेलेल्या नुसत्या तारांचीच संख्या

७०० वर झाली असावी असा अंदाज आहे. आणि अर्जांना तर गणतीच नव्हती! असें असतां सगळ्या जनतेची मागणी कःपदार्थ मानून व ती बेगुमानपणें झिडकारून टाकून आपलाच हेका चालविण्यांत मुंबई सरकारला तरी काय मिळालें असेल? परंतु 'आपण करूं ती पूर्व दिशा' या घमेंडीनें नोकरशाहीनें सगळे अर्ज केराच्या टोपलींत भिरकावून देऊन आपलाच हट्ट चालविला आणि लिंगायत, मारवाडी, मराठे व मुसलमान या चारहि जातींच्या लोकांना दुखवून आणि बिचाऱ्या चौघां आरोपींना यमसदन दाखवून आपला पाषाणहृदयीपणा जनतेच्या स्पष्ट निदर्शनास आणला.

कायदेभंगाच्या चळवळीच्या दंगलींत सोलापूरच्या कांहीं आडदांड लोकांस तितका पोंच व विवेक न राहून त्यांनीं दंगाधोपा सुरू केला आणि कोर्टाची जाळपोळ करून व पोलीस चौकीवर हल्ला करून दोघां पोलिसांस ठार केलें हा प्रकार अत्यंत अनुचित झाला व त्यामुळें कॉंग्रेसच्या अनत्याचारी चळवळीला कालिमा लागला यांत शंका नाहीं. पण तो दंगा करणारे कोण, आणि तो दंगा आवरण्याला व त्या दंगलींतून कलेक्टर प्रभृति अधिकाऱ्यांचा बचाव करण्याला झटणारे कोण, दंग्याच्या जागीं हजर कोण व दंग्याच्या वेळीं त्या बाजूस न फिरकणारे कोण, याचा सारासार विचार व्हावा तसा न होतां दैववशात् जे जे आरोपी हातीं आले त्याजवर सरकारनें उट्टें काढण्याचा सपाटा चालविला, आणि लष्करी अमलाच्या भयंकर दराऱ्यामुळें साक्षीपुरावा देण्यास पुढें येण्याला देखील लोक धजावत नसतांना तसल्या क्षुब्ध वातावरणांत खटला चालवून या चौघां आरोपींना, असेसरांचें मत बाजूस सारून, फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. अशा रीतीनें आरोपींच्या बचावाची बाजू जरी योग्य रीतीनें पुढें येऊं शकली नाहीं तरी फिर्यादी पक्षाची बाजू इतकी कच्ची होती कीं, हायकोर्टांतील अपिलांत न्यायमूर्ति माडगांवकर यांनीं आपल्या मतें तिघें आरोपी तरी निर्दोषी ठरविलें. तथापि न्यायखात्यांत तीस वर्षें अनुभव घेऊन खऱ्या-खोट्या पुराव्याची पारख करण्यांत तज्ज्ञ बनलेल्या न्यायाधिशाच्या या मताला कांहींच किंमत न देतां केवळ बहुमताच्या जोरावर आरोपींचें अपील नामंजूर ठरून चौघांचीहि फांशीची शिक्षा कायम करण्यांत आली!

### दयेला पात्र कोण व अपात्र कोण?

ही सर्व पूर्वपीठिका, सोलापूरची त्या वेळची परिस्थिति, अखिल भारतीय अर्जद्वारें प्रकट झालेली मनीषा आणि आजामितीला विलायतेंतील गोलमेज परिषदेमुळें निर्माण होणारें नवें वातावरण या सर्व गोष्टींचा विचार करून गव्हर्नरसाहेबांनीं या आरोपींची फांशीची शिक्षा तहकूब करणेंच न्याय्य व उचित ठरलें

असतें. परंतु वर नमूद केलेल्या कोणत्याहि मुद्दयाकडे लक्ष न देतां गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांनीं दया दाखविण्याचें साफ नाकारलेलें पाहून कोणाचीहि मति गुंग होऊन जाईल आणि ही दया दाखविण्याला हरकत करण्यासाठीं जे जे कोणी जबर काळसर्प वाटेंत आडवे पडले असतील त्यांच्याविषयीं मनांत अत्यंत त्वेष आल्याविना राहणार नाहीं. दया दाखविण्याला जर कोणी आरोपी देशकाल व पात्रता या तिन्हीहि प्रकारांनीं सर्वथैव योग्य ठरणार असतील तर हेच आरोपी होते. आणि असल्या आरोपींना अशा वेळीं जर दया दाखवावयाची नाहीं तर 'दया' दाखविण्याचा अधिकार गव्हर्नरच्या हातीं ठेवावयाचा तरी कशाला ? सोलापूरच्या या खटल्यांत दुर्दैवानें सांपडलेल्या पण यापूर्वीं एरवीं सच्छील म्हणून प्रख्यात असलेल्या अशा सात्त्विक वृत्तीच्या इसमास जर ही दया दाखवावयाची नाहीं तर ती काय कसाबाप्रमाणें हमरस्त्यावर मानेवर सुरा चालविणाऱ्या मांगांना दाखवावयाची ? आजपर्यंत देहान्त शिक्षा झालेल्या ज्या ज्या इसमांस गव्हर्नर जनरल यांनीं दया दाखविली असेल त्यांपैकीं प्रत्येकाची पात्रता 'देशकाल परिस्थिती'च्या मानानें सोलापूरच्या या आरोपीं-पेक्षां निस्संशय अधिक होती, असें सरकार आपल्या रेकॉर्डवरून दाखवून देऊं शकेल काय ? आणि तसें जर दाखवितां येणार नाहीं तर याच आरोपींना दया दाखविण्याचें नाकारण्यांत केवळ मदांध नोकरशाहीच्या हट्टाखेरीज दुसरें कांहीं तरी कारण असूं शकेल काय ? केवळ हिंदी लोकमत दुबळें आहे म्हणूनच दयेच्या या याचनेला विरोध करणें ही अधमपणाची परमावधि होय.

ज्यांच्यावर दया दाखवावयाची त्यांच्या पात्रतेच्या दृष्टीनें हा विचार झाला. आतां ही दया दाखविली जावी अशासाठीं ज्यांनीं ज्यांनीं मध्यस्थी करून आपला शब्द खर्च केला त्यांच्या योग्यतेच्या व संख्येच्या दृष्टीनें विचार केला तर एवढ्या योग्यतेच्या इतक्या असंख्य मध्यस्थांची मध्यस्थी लाथाडली गेली असल्याच्या बेमुर्वतखोरपणाला तरी पूर्वींचा एखादा दाखला आढळेल काय ? फांशी देऊं घात-लेल्या एखाद्या बदमाष गुन्हेगाराच्या एखाद-दुसऱ्या फाटक्या-तुटक्या आप्तेष्टानें दयेचा अर्ज केला असतां दयेचा पाझर फुटून फांशी रद्द करण्याची शिफारस करणाऱ्यांना प्रस्तुत प्रकरणांतील असंख्य अर्जदारांचा व वजनदार मध्यस्थांचा शब्द इतका कवडीमोल वाटावा काय ? विलायतेंत गोलमेज परिषदेला गेलेले ना. आगा-खान, बिकानेरचे महाराज, डॉ. सप्रू, शास्त्री, जयकर, अशांसारख्या मध्यस्थांच्या शब्दाला या वेळीं देखील नोकरशाहीच्या हट्टापुढें कवडीचीहि किंमत दिली जाऊं नये हें कांहीं बरें लक्षण नव्हे. सरकारचा दृष्टीकोन बदलल्याचें तर हें खास चिन्ह नव्हे !

### बेगुमान अधिकाऱ्यांची खुनशी लहर

अशा रीतीनें सरकारनें बड्या बड्या मध्यस्थांच्या शब्दाचा उपमर्द केल्या-

मुळें अर्ज-विनंत्यादि सनदशीर मार्गावरचा आधींच उडत चाललेला जनतेचा विश्वास अधिकच उडत जाण्यास कारण घडत आहे. फांसावर टांगल्या जाणाऱ्या चौघां आरोपींचा जीव जगावा एवढ्या आशेनें देखील या नतद्रष्ट पाषाणहृदयी नोकरशाहीपुढें याचना करणें नको असें म्हणून कित्येकजण या दयेच्या याचनेच्या कार्यक्रमांत आधींच सामील झाले नव्हते. इतर कित्येकांनीं असा विचार केला कीं, या सनदशीर चळवळीनें जर चौघां मानवी प्राण्यांचे पंचप्राण वांचणार असतील तर व्यक्तिशः आपल्या व्रताचा भंग झाला तरी चालेल, पण हा शिष्टाईचा प्रयत्न करून पाहावा. पण आपली ही शिष्टाई इतक्या तुच्छतेनें फेटाळण्यांत आलेली पाहून त्यांच्याहि मनास केवढा जबरदस्त धक्का बसलेला असेल आणि नोकरशाहीच्या या उद्दाम प्रवृत्तीमुळें त्यांच्यांत केवढी प्रतिक्रिया सुरू होईल, याचा पोक्त विचार सरकारनें करावयास नको होता काय ? ज्या नोकरशाहीच्या राजवटींत एवढ्या बड्या बड्या शिष्टांनीं भारतमंत्र्यापाशीं खर्च केलेल्या शब्दाची देखील अशी शोभा होते, आणि सगळे सनदशीर उपाय निष्फळ ठरतात, त्या नोकरशाहीविषयीं आबालवृद्ध स्त्री-पुरुषांच्या मनांत पूर्वीच्या दसपटीनें चीड उत्पन्न झाल्यास त्यांचा तो दोष मानतां येईल काय ? आणि ज्या जुलमी व बेजबाबदार राज्यपद्धतींत एखाद्या बेगुमान अधिकाऱ्याची खुनशी लहर ही अखिल जनतेच्या एकमुखी मागणीपेक्षां अधिक प्रभावी ठरते, तसली बेजबाबदार राज्यपद्धति बदलून तिच्या जागीं जबाबदार राज्यपद्धति प्रस्थापित करण्याची आवश्यकता तीव्रतेनें जाणवूं लागल्यास त्यांत तरी आश्चर्य काय ?

### बिनलगामी बेफाम तट्टू

एवंच, हजारोंच नव्हे तर लाखो लोकांची रीतसर मागणी बिनदिक्कत धुडकावून लावून मुंबई सरकारनें अखेरीस आपलाच हट्ट खरा केला, ही गोष्ट हिंदी राष्ट्राच्या मनास कायमची शल्यासारखी डाचत राहणार यांत शंका नाहीं. 'म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं पण काळ सोकावतो' म्हणतात त्याप्रमाणें चार माणसें मृत्युमुखीं पडल्याचें दुःख तादृश नाहीं कारण एरवीं तरी लाठीनें, गोळीबारानें तुरुंगांतील अन्नत्यागानें किंवा पोटावरून मोटार गेल्यानें काळाच्या मुखांत हिंदी लोकांच्या आहुत्या पडतच आहेत; पण तेथें तो मृत्यु एक प्रकारें स्वतः आव्हान देऊन आपणावर ओढून घेतलेला असतो म्हणून त्याचें तितकेसें दुःख वाटत नाहीं. पण प्रस्तुतच्या प्रकरणांत या चौघां आरोपींना वाचविण्याचा शक्य तो सनदशीर प्रयत्न केला असतां, लोकमत अत्यंत दुर्बळ आहे आणि येथील नोकरशाही लोकमताला जबाबदार नाहीं, एवढ्याचमुळें हा सगळा प्रयत्न फुकट गेला ही गोष्ट मनाला डाचल्याशिवाय राहत नाहीं. आणि म्हणूनच अशा रीतीनें लोकमताला आपल्या टापांखालीं बिनदिक्कत तुडवीत सैरावैरा धावणारें हें बिन

नगर वाचनालय, सातारा.
नगर वाचनालय, सातारा



लगामाचें बेफाम तट्टू लोकमतरूपी लगामाच्या नियंत्रणाखालीं जितकें लवकर आणतां येईल तितकें लवकर आणणें हें आपलें कर्तव्य आहे आणि त्याकरितां लोकमत अत्यंत प्रभावी केलें पाहिजे, असाच बोध या दुःखपर्यवसायी प्रकरणापासून जनता घेईल, असा आम्हांस भरंवसा वाटतो.

---

## कराचीच्या गोळीबाराची मीमांसा १५

[ सिंध प्रांतांतील कोर्टांत नथुराम नांवाच्या एका हिंदु लेखकावर खटला चालला असतां त्यांतून तो निर्दोषी ठरून सुटला म्हणून चिडून जाऊन अबदुल कायूम नांवाच्या एका इसमानें भर कोर्टांतच त्याचा खून केला. या खुनाबद्दल अबदुल कायूमवर रीतसर काम चालून त्यास फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली आणि दि. १९ मार्च १९३५ या दिवशीं अबदूल कायूम यास कराचीच्या तुरुंगांत फांसावर टांगलें. त्यानंतर त्याच्या प्रेताचा दफनविधि शहराबाहेरील दफनभूमींत झाला. मागाहून त्या ठिकाणीं मुसलमानांचा प्रचंड जनसमूह जमून त्या जमावानें अबदुल कायूमचें पुरलेलें शव उकरून बाहेर काढलें आणि तें प्रेत मिरवत मिरवत कराची शहरांत आणण्याचा त्यांचा विचार होता. ही मिरवणूक कराची शहरांत शिरली असती तर कराची शहरांत दंगा-मारामारी, जाळपोळ व खून इत्यादि अत्याचार होण्याचा दाट संभव असल्यानें अधिकाऱ्यांनीं मिरवणुकीला बंदी केली आणि शहराची वाट अडविण्याकरितां पोलीस उभे केले. त्या पोलिसांस दाद न देतां दंगेखोर पुढें घुसूं लागलेले पाहतांच लष्कराची मदत मागविण्यांत आली. लष्करालाहि न जुमानतां हा जमाव लष्करी शिपायांच्या अंगावर चालून येऊं लागला, तेव्हां गोळीबाराचा हुकूम देण्यांत आला. त्या गोळीबारांत ४७ इसम मृत्युमुखीं पडले व १३४ जखमी झाले, तेव्हां जमाव पांगला आणि शांतता प्रस्थापित झाली. त्यानंतर मुसलमानांनीं या गोळीबाराविरुद्ध गवगवा करून त्याची चौकशी करण्याची मागणी केली. त्या मागणीला सरकारनें नकार देऊन गोळीबार कां करावा लागला याचा खुलासा करणारें पत्रक प्रसिद्ध केलें. त्या पत्रकाला अनुलक्षून प्रस्तुतचा लेख आहे. या लेखांत " आडदांड, माथेफिरू व

(केसरी, दि. १२ एप्रिल १९३५)

वाचनालय सातारा
गणकीकृत

कायदा न जुमानणाऱ्या जमावाच्या बेफामपणामुळेंच हा रक्तपात झाला " असें म्हटलें आहे. आणि हा गोळीबार " जालियनवाला बागेंतल्या अगर सोलापुरातल्या गोळीबारासारखा निरुपद्रवी समाजावर झालेला नसून कराचीचा खवळलेला पिसाट समाज निरुपद्रवी नव्हता म्हणून त्याजवरचा गोळीबार अपरिहार्य होता, असेंच कोणीहि न्यायप्रिय व समंजस मनुष्य कबूल करील " असा त्यांतून निष्कर्ष काढला आहे. ]

### या गोळीबाराचें इतरांशीं साम्य नाहीं

ता. १९ मार्च रोजीं खुनी अबदुल कायूम याला कराचीच्या तुरुंगांत फांसावर टांगल्यानंतर बाहेर जो गोळीबाराचा भयंकर प्रकार घडून आला त्यासंबंधानें मुंबई सरकारनें पत्रक प्रसिद्ध केलें आहे. त्या पत्रकाचा जो विस्तृत गोषवारा दुसरीकडे दिला आहे त्यावरून त्या दिवसाची साद्यन्त हकीगत वाचकांस कळून येईल. ही हकीगत वाचली असतां या गोळीबाराचें जालियनवाला बागेंतील कत्तलीशीं किंवा सोलापूरच्या गोळीबाराशीं बिलकूल सादृश्य नसून आजऱ्याच्या गोळीबाराशीं बरेंचसें सादृश्य असल्याचें आढळून येईल. जालियनवाला बागेंत जसा अज्ञानामुळें व फसगतीनें जमाव जमला होता तसा तेथें जमला नसून हा जमाव हेतुपुरस्सरच जमला होता आणि अबदुल कायूमचा दफनविधि होऊन गेला असतां हट्टानें त्याचें प्रेत थडग्यांतून बाहेर काढून शहरांत मिरवावयास निघाला होता. सोलापुरास जसें हत्यारबंद लोक मोटारींतून रस्तोरस्तीं हिंडले व जो दिसेल त्याजवर गोळी झाडत चालले तसा प्रकार येथें घडला नाहीं. अर्थातच जालियनवाला बागेंतील निरपराध्यांची कत्तल अथवा सोलापुरांतील बेछूट गोळीबार यांच्यांत आणि कराचीच्या गोळीबारांत कोणत्याच दृष्टीनें साम्य नाहीं. अबदुल कायूमचें प्रेत तुरुंगांत पुरलें असतें किंवा गुप्तपणें वायव्य सरहद्दीवरील हजारा प्रांतांत पाठविलें असतें तरी हा दंगा झालाच असता; मात्र दंग्याची व गोळीबाराची जागा बदलली असती.

### सोयीस्कर जागींच अडविलें

अबदुल कायूमचें प्रेत ज्या स्मशानभूमींत पुरलें तेथेंच गोळीबाराचा प्रसंग येऊं नये म्हणून अधिकाऱ्यांनीं तेथें लष्करी पाहरा न ठेवतां आडमुठ्या समाजाला तेथें यथेच्छ धुडगूस घालू दिला, हेंहि एका अर्थानें योग्यच झालें. कारण वाफेला वाट करून दिल्यानें तिचा जोर जसा कमी होतो तसाच आडदांड समाजाचाहि जोर मनसोक्त गोंधळ घालावयास भरपूर वाव दिल्यामुळें थंडावतो व तसा तो येथेंहि थंडावेल अशी अधिकाऱ्यांची अपेक्षा होती. हा त्यांचा अंदाज जरी अखे-

रीस निराधार ठरला तरी त्या अधिकाऱ्यांना त्याजबद्दल दोषी ठरवितां येत नाहीं. दंगेखोर व बेताल समाजाला अडवून धरावयाचें झालें तर कोठें अडवावें याचा विचार करूनच लष्करी दृष्टीनें अत्यंत सोयीस्कर अशा ठिकाणींच सोल्जरांना उभें करण्यांत अधिकाऱ्यांनीं चुकी केली असेंहि म्हणतां येत नाहीं.

दोनच गोष्टी अधिकाऱ्यांच्या अंगलट येऊं पाहतात; त्यांतली पहिली बाब अशी कीं, गोळीबार सुरू करण्यापूर्वी 'आता जमावाची जर पांगापाग न होईल तर गोळीबार सुरू केला जाईल' अशी इशारत देण्याची जी पद्धत आहे तशी इशारत येथें दिली गेली नाहीं. या आक्षेपाला सरकारी उत्तर असें आहे कीं, सशस्त्र सोल्जरांना सर्गांना खोवून दौडत आणून उभें केलें हीच खरी इशारत होय. जेथें कानठळ्या बसण्याएवढा गलगा चालू होता व सोल्जरांना सुद्धां वरिष्ठांचे हुकूम ऐकूं येण्याची मारामार होती तेथें मॅजिस्ट्रेटनें सूचना दिली असती तरी ती केवळ औपचारिक ठरली असती. परिणामाच्या दृष्टीनें बिलकूल फरक पडला नसता.

जखमी लोकांत एक बाई असून पांच मुलें प्राणाला मुकलीं व दोन मुलें अत्यवस्थ आहेत, असें या हकीकतींत म्हटलें आहे. इतक्या मुलांना गोळ्या लागल्या हीहि बाब सकृद्दर्शनीं संशयास्पद दिसते आणि जेथें गोळीबार झाला तेथल्या रस्त्याची व घरांची पाहणी केल्याखेरीज याचा उलगडा होऊं शकत नाहीं पण तेथल्याच रहिवाशांकडून याचा खुलासा होऊं शकेल. त्याला चौकशीच कशाला हवी ?

सारांश, या प्रकरणांत आडदांड, माथेफिरू व कायदा न जुमानणाऱ्या जमावाच्या बेफामपणामुळेंच हा रक्तपात झाला असेंच दिसून येत आहे व चौकशी केली असती तरी तेंच सिद्ध झाले असते. चौकशी सुरू केल्यानें जातीजातींतील धुसफूस वाढली असती असें जें निमित्त सरकारनें पुढें केलें आहे त्यांत मात्र कांहीं अर्थ नाहीं. अबदुल कायूम फांसावर टांगला गेला तेव्हांच या प्रश्नाचें ज्ञातिविशिष्ट स्वरूप संपलें.

### हा गोळीबार अपरिहार्य होता

आज मुसलमानांवर हा प्रसंग आला म्हणून हिंदु जर बेफिकीर राहतील तर उद्यां हिंदूंवरहि असाच प्रसंग आल्यावर कसें होइल, असला जो विक्षिप्त प्रश्न कित्येकांकडून विचारला जातो त्यांतला हेत्वाभास उघड आहे हिंदूंवर संकट ओढवलें असतां मुसलमान समाज सहानुभूति दाखविण्यात पुढें आल्याचें उदाहरण आजवर तर दुर्मिळच आहे आणि पुढेंहि कधीं तसें घडेल अशी आशा बाळगावयास नको. तेव्हां ही भीति निराधार आहे. शिवाय मुख्य प्रश्न गोळीबार हिंदूंवर झाला का मुसलमानांवर झाला हा नसून, न्यायानें वागणाऱ्यावर झाला का अन्यायानें वागणाऱ्यांवर झाला, हा आहे. जालियनवाला बागेतला व सोलापुरांतला गोळीबार

निष्कारण निरुपद्रवी लोकांवर झाला म्हणून त्याचा कोणीहि न्यायप्रिय मनुष्य तीव्र निषेधच करील. पण कराचीचा खवळलेला पिसाट समाज निरुपद्रवी नव्हता म्हणून त्याजवरचा गोळीबार अपरिहार्य होता असेंच कोणीहि न्यायप्रिय व समंजस मनुष्य कबूल करील.

---

## सव्याज वचपा काढून घेतला १६

[ निजामाच्या राज्यांतला वऱ्हाड प्रांत हिंदुस्थान सरकारच्या देखरेखीखालीं आल्यापासून तो प्रांत परत मिळविण्याचे निजमाचे प्रयत्न चालूंच होते. हा प्रश्न कायमचा मिटविण्यासाठीं लॉर्ड कर्झन यांनीं १९०२ सालीं एक करार करून घेतला. तो करार बदलून आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठीं हल्लींच्या निजामानें १९२६ सालीं खडा टाकून पाहिला. पण त्या प्रयत्नानें कार्यभाग न साधतां लॉर्ड रीडिंग यांनीं उलट निजामावरच कुरघोडी केली. परंतु नवा इंडिया अ‍ॅक्ट करण्याच्या वेळीं संस्थानिकांना चढवून ठेवण्याच्या ब्रिटिशांच्या धोरणामुळें निजामाला वऱ्हाडचा प्रश्न उकरून काढण्याची संधि मिळाली. त्या वेळीं मानासाठीं हपापलेला निजाम आणि धनासाठीं हपापलेले ब्रिटिश यांच्यांत तडजोड होऊन वऱ्हाडासंबंधाचा एक नवाच करार करण्यांत आला. त्या करारानें वऱ्हाडवरची निजामाची मालकी पक्की झाली व तद्दर्शक अनेक हक्क निजामाला मिळाले. हे नवे हक्क किती दूरगामी परिणाम करणारे आहेत, त्याचें या लेखांत वर्णन असून, असे हक्क मिळविल्यानें निजामानें लॉर्ड रीडिंग यांनीं केलेल्या अपमानाचा सव्याज वचपा काढून घेतला, असा निष्कर्ष काढला आहे. ]

विलायतेला जाण्यापूर्वीं ता. २७ मार्च १९२६ रोजीं त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनीं वऱ्हाडच्या प्रश्नासंबंधांत निजामसाहेबाला जो तुसडेपणानें व तुच्छतेनें ठणठणीत नकार दिला, तेवढ्यानें हा प्रश्न कायमचा निकालांत निघाला असें वाटत होतें; पण निजामानें आशा सोडली नव्हती आणि प्रयत्नहि सोडला नव्हता. अर्थातच 'प्रयत्नांतीं परमेश्वर' ही म्हण खरी ठरली. हिंदी फेडरेशनमुळें हा प्रश्न पुनरुज्जीवित झाला आणि त्या सुवर्णसंधीचा ब्रिटिशांनीं व निजामानें उभयतांनीहि आपआपल्या परीनें शक्य तितका फायदा करून घेऊन, आतां हा प्रश्न अगदीं निराळ्याच पद्धतीनें उभयतांनीं सोडविला आहे.

( केसरी, दि. २० नोव्हेंबर १९३६ )

### पूर्वेतिहासाचें स्वरूप

वऱ्हाडच्या प्रश्नाचा पूर्वेतिहास ब्रिटिशांना किंवा निजामाला कोणालाच अभिमानास्पद वाटण्याजोगा नाहीं. ऋषींचें कूळ आणि नदीचें मूळ शोधूं नये म्हणतात. तसेंच या वऱ्हाडच्या वादाचें मूळ शोधण्यांत अर्थ नाहीं. म्हणून १७६६, १७९८ व १८०० या सालांतले व्यवहार दृष्टीआड करून १८१७ नंतरचे व्यवहार पाहूं गेल्यास त्यांत दोषाचा कांटा कंपनी सरकारकडे अधिकाधिक झुकूं लागतो. ता. २१ मे १८५३ रोजीं डलहौसीच्या कारकीर्दींत जो करारनामा झाला व ज्या करारनाम्यामुळें वऱ्हाडचा मुलूख ब्रिटिशांच्या वहिवाटीखालीं पूर्णतः आला, तो करारनामा तर स्वारीचा धाक घालूनच करून घेण्यांत आला होता. या करारनाम्यांतला ढळढळीत अन्याय दूर करण्यासाठीं १८६० सालीं दुसरा करारनामा करण्यांत आला व त्यांत खर्च वजा जाऊन राहणारी शिल्लक निजामाला परत देण्याचा हक्क मान्य करण्यांत आला. त्यानंतर सर सालरजंग यांनीं वऱ्हाड प्रांत परत मिळविण्यासाठीं सनदशीर इलाज चालविला असतां प्रथम १८७५ सालीं आणि त्यानंतर दिल्ली दरबार होऊन गेल्यावर १८७८ सालीं स्पष्ट नकार मिळाला. एवढ्यानेंच ब्रिटिश सरकारचें समाधान झालें नाहीं. वऱ्हाड परत मागण्याचा प्रश्नच उपस्थित होऊं नये आणि जमाखर्चाच्या हिशेबाचीहि भानगड राहूं नये म्हणून लॉर्ड कर्झन यांनीं १९०२ सालीं ता. ५ नोव्हेंबरला एक नवाच करारनामा करून घेतला. त्यांत वऱ्हाडची वहिवाट ब्रिटिश सरकारकडे कायमची दिल्याचा स्पष्ट उल्लेख असून, निजामाला २५ लक्ष रुपये नक्त शिल्लक म्हणून दिले जाण्याचा ठराव झाला आणि ज्या हैद्राबाद कॉंटिंजंटच्या पोकळ पायावर हा सगळा पोकळ डोलारा उभा केला गेला होता तें हैद्राबाद कॉंटिंजंट रद्द करून ब्रिटिश सरकारनें आपल्या फौजेपैकीं पांच हजारांपर्यंत फौज हैद्राबाद संस्थानांत ठेवावी असें ठरविण्यांत आलें.

### निजामाला टोमणा लगावला

यानंतर हल्लींच्या निजामसाहेबांनीं लॉर्ड रीडिंगच्या कारकीर्दींत हा प्रश्न फिरून उपस्थित केला असतां लॉर्ड सॅलिसबरी व लॉर्ड कर्झन यांच्या उत्तराकडे बोट दाखवून 'निर्णीतनिर्णया'च्या सबबीवर आतां याचा विचार करणें देखील अशक्य आहे, असें व्हाइसरॉयांनीं खडसावून बजावलें. त्याबरोबरच निजामसाहेब हे ब्रिटिशांच्या अधिराज्याखालचे एक संस्थानिक असून त्यांनीं ब्रिटिश सरकारशीं आपला समान दर्जा असल्याचा टेंभा मिरवावा हें अत्यंत अनुचित होय असाहि टोमणा लगावण्याचें धाष्टर्य त्यांनीं केलें.

१९२६ च्या मार्चअखेर वऱ्हाडच्या प्रश्नासंबंधाची स्थिति अशी निराशाजनक होती. लॉर्ड रीडिंग यांच्या खडखडीत नकारानंतर हा प्रश्न पुनश्च डोकें वर

काढील असें कोणालाहि वाटलें नव्हतें आणि त्याच दृष्टीनें या विषयावर लिहिणाऱ्या बहुतेक सर्व लेखकांनीं त्याची अखेरची बोळवण केली होती. परंतु जगांत चालू असणाऱ्या चक्रनेमिक्रमानें कधीं नावेवर गाडा तर कधीं गाड्यावर नाव अशी उलटापालट होते. तसाच प्रकार याहि बाबतींत झाला. वऱ्हाडचा प्रश्न उकरून काढूं नका असें बजावणाऱ्या ब्रिटिश सरकारलाच वऱ्हाडासंबंधानें आतां काय तें बोला, असें म्हणून निजामाची आर्जवें करण्याची पाळी आली. फेडरेशनमध्यें संस्थानिकांना गोवून स्वतःचें आसन बळकट करण्याच्या नादीं नोकरशाही लागल्यानें असें हें गाडें उलटलें. संस्थानिकांच्या संमतीशिवाय त्यांना फेडरेशनमध्यें सामील करून घेतां येत नाहीं, यास्तव संस्थानिकांची मनधरणी अद्यापि चालूच आहे. पण वऱ्हाड हा प्रांत वहिवाटीपुरताच हिंदुस्थान सरकारकडे असल्यामुळें त्या प्रांताला नवी राज्यघटना लागू करण्यापूर्वी निजामसाहेबांची संमति घेतली पाहिजे असा शास्त्रार्थ निघाला आणि ही संमति मिळविण्याच्या वाटाघाटी सुरू होतांच मागील उखाळ्या-पाखाळ्या निघून आपल्या झालेल्या अपमानाचा सव्याज वचपा काढून घेण्याचें निजामसाहेबांनीं ठरविलें. वऱ्हाड प्रांत परत मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत सध्यांच्या निजामाची दृष्टि त्या प्रांताच्या वसुलावर खिळली नसून हा केवळ न्यायाचा व इज्जतीचा प्रश्न होऊन बसला होता. शभर वर्षापूर्वीची निजामाची सांपत्तिक स्थिति कशीहि असो, हल्लींच्या निजामसाहेबाजवळ इतकी अलोट संपत्ति सांचलेली आहे कीं, वऱ्हाड प्रांतासारखे पांच-पंचवीस प्रांत त्यांस सहज खरेदी करतां येतील. म्हणूनच वऱ्हाड परत मिळविण्याच्या कामीं कितीहि पैसा खर्च झाला तरी त्याची खिजगणती नसून, गेल्या दहा वर्षांत या कामीं अगणित पैसा बिनदिक्कत खर्च करण्यांत आला आहे. उलटपक्षीं वऱ्हाड हा खूप उत्पन्नाचा प्रांत असल्यामुळेंच हिंदुस्थान सरकारला तो आपल्या हातून जाऊं द्यावयाचा नाहीं. अर्थातच एका पक्षाची नजर धनावर तर दुसऱ्या पक्षाची मानावर असा योगायोग असल्यामुळें तडजोड घडून आली. ज्यांत पैशाची घस सोसावी लागेल अशी कोणतीहि अट मान्य करण्याला ब्रिटिश सरकार तयार होणार नाहीं हें ओळखूनच सर अकबर हैदरी यांनीं आपली वकिली मोठ्या चातुर्यानें चालविली आणि मानमरातबाच्या जितक्या गोष्टी साधतां येतील तितक्या साधल्या. मानापेक्षां धनालाच सारसर्वस्व मानणाऱ्या कित्येक टीकाकारांनीं निजामानें या कोरड्या मानमरातबानें काय मिळविलें, असली अप्रयोजक टीका या करारनाम्यावर केली आहे. पण १८१७ सालापासून १९२६ सालापर्यंत या प्रकरणांत निजामाला किती तुच्छतेनें वागविण्यांत आलें याचा साद्यंत इतिहास ज्याला अवगत आहे त्याला निजामानें आपल्या अपमानाचा सव्याज वचपा काढला असेंच कबूल करावें लागेल.

## निजामाला मिळालेले नवे हक्क

'नातवाच्या डोक्यावर छत्र पाहावें' असा वर मागण्यांत जसें सर्व कांहीं साधलें, तसेंच या करारनाम्यांत निजामानें सर्व कांहीं साधलें आहे. तावेदार संस्थानिक म्हणून लॉर्ड रीडिंग यांनीं ज्यांची हेटाळणी केली त्यांचें वऱ्हाडावरचें अधिराज्य बादशहांनीं निस्संदिग्धपणें मान्य केलें आणि मध्यप्रांताचा गव्हर्नर नेमतांना तुमचा सल्ला घेऊं असें वचन दिलें, यापेक्षां बहुमान तो कोणता? ब्रिटिश सरकारच्या यूनिअन जॅकबरोबर निजामाचें निशाण फडकणार, उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या परीक्षांना समान दर्जा मिळणार, निजामसाहेबांनीं दिलेल्या पदव्यांना बादशहांनीं दिलेल्या पदव्यांची सर येणार, निजामाचा एजंट मध्यप्रांताच्या राजधानींत तळ देऊन बसणार, निजामाच्या राज्यांत दरबार-समारंभ झाल्यास मध्यप्रांताच्या गव्हर्नरला त्या दरबारांत हजेरी द्यावी लागणार, स्वतः निजाम आपले दरबार वऱ्हाडांत थाटणार आणि निजामाच्या नांवानें खुतबा पढला जाणार. या सर्व गोष्टी पोकळ मानाच्या असल्या तरी त्यांचा प्रत्यक्षपणें किती दूरवर परिणाम होतो हें ज्याला न समजेल त्याच्या दूरदर्शीपणाची कींवच करावी.

निजामाचा एजंट अंतर्गत कारभारांत ढवळाढवळ करणार नाहीं हें खरें; पण मॅलेटसाहेब व एल्फिन्स्टनसाहेब पुण्यास बेटावर येऊन राहिले हेंच केवढें शल्य झालें, याचा इतिहास ज्यास माहीत आहे त्याला परकी सरकारचा एजंट आपल्या दरबारीं राहिल्यानें काय होतें त्याची कल्पना येईल. हा एजंट कांहीं अगदींच हात जोडून डोळे मिटून बसणार नाहीं. मध्यप्रांताच्या कारभारांतल्या कोणत्याहि एखाद्या घटनेमुळें हैद्राबाद संस्थानच्या हिताला बाध येतो असा संदेह त्याला येतांच तो त्या घटनेला हरकत घेऊं शकेल. अर्थातच त्याची समजूत काढल्याशिवाय मध्यप्रांताच्या सरकारला यापुढें पाऊल टाकतां येणार नाहीं.

## व्हाइसरॉयांच्या पत्राची मखलाशी

करारनाम्यातलें सतरावें कलम सर्वांत महत्त्वाचें आहे. हल्लींच्या १९३५ च्या इंडिया ॲक्टांत जर कांहीं दुरुस्त्या झाल्या किंवा कांहीं फेरबदल झाला व त्या फेरफाराचा संबंध हैद्राबाद संस्थानाशीं पोंचत असला तर तो फेरबदल मान्य करणें अगर न करणें सर्वस्वी निजामाच्या मर्जीवर अवलंबून आहे. आणि त्यास जर तो बदल मान्य न होईल तर सहा महिन्यांच्या आंत नोटीस देऊन हा करारनामा रद्द करतां येईल. प्रस्तुतच्या करारनाम्यानें १९०२ चा कर्झनशाहींतला करारनामा रद्द झालाच आहे. अशा स्थितींत निजामानें नोटीस देऊन नवा करार रद्द केला तरी निजामाची वऱ्हाडवरची मालकी शिल्लक राहणारच. त्या वेळीं वऱ्हाडच्या कारभाराची व्यवस्था कशी लावावयाची? ही मुख्य मुद्द्याची गोष्ट करारनाम्यांत लिहावयाची राहून गेली! मागाहून ब्रिटिश

मुत्सद्द्यांना ही चूक उमजून आली आणि आतां सारवासारवी करण्यासाठीं व्हाइसरॉयांनीं या करारनाम्याबरोबर निजामसाहेबास पाठविलेल्या पत्रांत असें बजाविलें आहे कीं, जर हा करारनामा रद्द झाला तर वऱ्हाडचा राज्यकारभार जसा या करारनाम्यानें चालेल तसाच पुढेंहि नवा करारनामा होई-पर्यंत तो चालेल! पण असेंब्लींतल्या भाषणानें जसा कायद्याच्या कलमांतील अर्थ बदलत नाहीं तसाच व्हाइसरॉयांच्या पत्राच्या पुस्तीनें करारनाम्यांतलें कलम १७ बदलूं शकत नाहीं. सारांश, हा करारनामा करून घेण्यांत निजाम-साहेबानें ब्रिटिश सरकारास चांगलेंच पेंचांत पकडलें आहे.

### वऱ्हाडमुळें मध्यप्रांतावर आपत्ति

ब्रिटिश सरकार आणि निजाम सरकार यांच्या परस्परांतील संबंधाविषयीं येथवर विचार झाला. त्याजबरोबर याचा वऱ्हाडच्या व मध्यप्रांताच्या जनतेवर काय परिणाम होईल याचाहि विचार करणें प्राप्त आहे. वऱ्हाडासंबंधाची ही सर्व घाटाघाट चालू असतां सरकारनें वऱ्हाडच्या लोकांना फुकटच्या एका शब्दानेंहि विचारलें नाहीं! एवढेंच नव्हे तर अखेरपर्यंत काय कारस्थान चाललें आहे याची दादहि लागूं दिली नाहीं. यावर सरकार कदाचित् असें म्हणेल कीं, वऱ्हाडच्या अंतर्गत कारभारांत या करारामुळें प्रत्यक्षतः फेरबदल कांहींच होणार नसल्यानें त्यांचें मत घेण्याची जरूरी भासली नाहीं; पण ही सबब लंगडी आहे. या करारानें टाकोटाक फरक होणारा नसला तरी अप्रत्यक्षपणें परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. वऱ्हाडच्या प्रतिनिधींना निजामाविषयीं राजनिष्ठा पाळण्याची वेगळी शपथ घ्यावी लागेल हें नव्या फेरबदलाचें सूचक आहे व त्यांतहि मोठा अर्थ भरला आहे. पण मध्यप्रांताच्या गव्हर्नरची नेमणूक करतांना निजामाचा सल्ला घेतला जाणार ही बाब कांहीं अगदींच क्षुल्लक नव्हे. निजामाच्या हितसंबंधाला विरोधी असा कोणीहि इसम यापुढें गव्हर्नर होऊं शकणार नाहीं. अर्थातच भावी गव्हर्नरानें निजामाची मर्जी अगोदरपासूनच संभाळली पाहिजे असाच याचा अर्थ होत नाहीं काय? आणि यापुढें सर अकबर हैदरी किंवा असेंच कोणी निजामाच्या मर्जीतले मुत्सद्दी यांचा डोळा मध्यप्रांताच्या गव्हर्नरच्या जागेवर राहील हें उघड नाहीं काय? सर्वांत खेदाची गोष्ट ही कीं, वऱ्हाड प्रांत निजामाच्या मालकीचा असला तरी मध्य-प्रांत हा कांहीं निजामाला आंदण दिलेला नाहीं! मग मध्यप्रांतावर निजामाच्या मर्जीतला गव्हर्नर लादला जावा हा जुलूमच नव्हे काय? वऱ्हाडसारख्या सुपीक प्रांतांतील वसूल आजपर्यंत मध्यप्रांताचा कारभार चालविण्याला उपयोगी पडला त्याचें हें प्रायश्चित्त कीं काय? धडक्या नावेला फुटकी नाव बांधली म्हणजे दोन्ही बुडतात, त्याचप्रमाणें वऱ्हाड मध्य-प्रांताच्या गळ्यांत बांधल्यामुळें मध्यप्रांतावर ही आपत्ति ओढवत आहे!

### निजामाचे नव्या हक्काचे परिणाम

यापुढें निजामसाहेबांचे दरबार वऱ्हाडांत भरूं लागतील आणि निजामाच्या जन्मदिवशीं अगर इतर प्रसंगींहि निजामाकडून पदव्यांची खैरात होईल. या सर्व मान-सन्मानांचा व पदव्यांचा लाभ मुख्यतः कोणाला होणार हें सांगावयास नकोच. नुसत्या पदव्या मिळावयाच्या असल्या तर ज्याला त्या मिळतील त्याला त्या लखलाभ होवोत असें आम्हींहि म्हटलें असतें. पण त्या पदव्यांबरोबरच मतदानाचा व कौन्सिलांत निवडून येण्याचाहि हक्क मिळणार. अशा पदवीवाल्यांची संख्या फुगूं लागली म्हणजे निवडणुकीवरहि त्यांचा परिणाम होणारच. याशिवाय निजामसाहेबांच्या जुलमा-विरुद्ध गाऱ्हाणें करावयाचें झाल्यास आजवर निजामाच्या हद्दींत उघडपणें बोल-ण्याला जी बंदी असे ती यापुढें वऱ्हाडांतच नव्हे तर मध्यप्रांतांतहि लागू होऊन अशा गाऱ्हाण्यांची वाच्यता होण्याला अडचण पडेल. कारण निजामसाहेबांचा एजंट आपले हितसंबंध पाहण्याला तेथें डोळ्यांत तेल घालून टपून बसलेला अस-णारच. असा एजंट नेमण्याच्या पूर्वी देखील जर निजामाच्या कारभारावर टीका केल्यामुळें 'महाराष्ट्र' पत्रावर घोरपड आली तर एजंटाच्या नेमणुकीनंतर काय प्रकार होईल याचा तर्कच करावा. हल्लीं निजामाच्या प्रजाजनांची संस्थानी परिषद निजामाच्या राज्यांत भरूं शकत नाहीं, म्हणून ती संस्थानाबाहेर भरविण्यांत येत असते. तशी परिषद वऱ्हाडांत तर यापुढें भरूं शकणार नाहींच, पण खुद्द नाग-पुरांत तरी ती भरूं शकेल कीं नाहीं याची वानवाच आहे.

### निजामानें प्यादे-मात केली

अशा रीतीनें निजामसाहेबाला नुसत्या वऱ्हाडचेंच नव्हे तर मध्यप्रांताचेंहि अधिराज्य दिल्यासारखें होत आहे आणि हा असला करार मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांतील जनतेची संमति न घेतां किंबहुना त्यांना या कारस्थानाचा सुगा-वाहि लागूं न देतां करण्यांत आला. तेंहि एक वेळ असो, पण ब्रिटिश पार्लमेंटला १९३५ सालच्या इंडिया ॲक्टांत दुरुस्ती करावयाची झाली तर त्याबद्दल देखील निजामसाहेबांच्या मर्जीचा ताळमेळ पाहावा लागेल आणि निजामसाहेबांनीं एखाद्या कलमाला हरकत घेतली तर तें कलम गाळावें लागेल. ज्याचा इतका दूर-वर परिणाम पोंचूं शकतो असला हा करार ज्यांनीं तयार केला त्यांच्या डोळ्यावर कसली धुंदी चढली होती कोणास ठाऊक ? हिंदूंचा नक्षा उतरविण्याकरितां मुसल-मानांना वाटेल त्या सवलती डोळे मिटून द्यावयाच्या या वृत्तीचाच हा परिणाम आहे का अंदरकी बात दुसरीच कांहीं आहे न कळे. निजामसाहेब व सर अकबर हैदरी यांनीं या कारस्थानांत ब्रिटिश मुत्सद्द्यांवर प्यादेमात केली यांत मात्र शंका नाहीं.

## रावविणार कीं राबविले जाणार ? १७

[ काँग्रेसवाल्यांचा कौन्सिलांवरील बहिष्कार कधींच विरघळून गेला. त्यानंतर मध्यवर्ति व प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकीला काँग्रेसचे उमेदवार उभे राहिले व कांहीं प्रांतांत ते बहुसंख्येनें निवडूनहि आले. तरी पण घटना राबविण्याकरितां आम्ही कौन्सिलांत जात नसून ती मोडण्याकरितां जात आहों, अशी त्यांची भाषा अद्यापहि कायम असल्यानें त्यांना उद्देशून हा लेख लिहिलेला आहे. काँग्रेसवाल्यांनीं मंत्रिमंडळें बनविलीं तर ते आपल्या इच्छे-प्रमाणें घटना राबवूं शकतील; उलटपक्षीं त्यांनीं मंत्रिमंडळें न बनविलीं तर इतरांच्या मंत्रिमंडळाकडून काँग्रेसवाले या घटनेच्या जोखडाखालीं राबविले जातील. म्हणून तुम्ही घटना 'राबविणार' का स्वतः 'राबविले जाणार' असा सूचक प्रश्न मतदारांनीं काँग्रेसच्या उमेदवारांना विचारावा असें या लेखांत प्रतिपादिलें आहे व त्याला अन्वर्थक असें भर्तृहरीचें वचन 'अवतरणा' दाखल दिलें असून, आजपर्यंतच्या कौन्सिल-बहिष्काराचा परिणाम स्वतः काँग्रेसवाल्यांना व जनतेला कसा बाधक झाला हें स्वकृत सुभाषितरूपानें या लेखाच्या शेवटीं वर्णिलें आहे.]

**भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः ।**
**तपो न तप्तं वयमेव तप्ताः ॥**

भारवी कवीचा 'सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदं' हा श्लोक एक लाख रुपये किंमतीचा आहे असें आख्यायिकेवरून मानलें जातें. भर्तृहरीच्या कोणत्याहि श्लोकासंबंधानें तसली आख्यायिका प्रसिद्ध नसली तरी त्याच्याहि नीति व वैराग्य शतकांतले कांहीं कांहीं मार्मिक श्लोक असेच लाख लाख रुपये किंमतीचे आहेत. वर उद्‌धृत केलेला श्लोक असाच बहुमोल आहे. त्यांत असंतुष्ट आणि अविवेकी अशा संसारी माणसाचें चित्र रेखाटलें आहे. अविवेकी व असंतुष्ट माणूस संसारांतील भोगहि भोगीत नाहीं आणि संसारावर लाथ मारून तपोवनाला जाण्याइतकें कडकडीत वैराग्यहि त्याच्या अंगीं नसल्यानें तपाचरणहि करूं शकत नाहीं; बिचारा व्यर्थ संसारांत कुढत रखडत असतो ?

**ना संसार ना तप**

नवी राज्यघटना न राबवितां ती मोडण्यातोडण्याची व्यर्थ वल्गना करणाऱ्या

(केसरी, दि. ५ फेब्रुवारी १९३७)

वाचनालय सातारा २०६ ४ १७ ४४

कौन्सिलवाल्या कॉंग्रेसवाल्यांची अशीच स्थिति होणार आहे. संसारांत तर राहावयाचें आणि संसारी माणसासारखें न वागतां संन्यासाची व तपश्चर्येची ऐट मिरवावयाची अशा माणसाची 'धड ना संसार नि धड ना तप' अशी जशी दुर्दशा होते, तशीच दुर्दशा या कौन्सिलवाल्या कॉंग्रेसवाल्यांची होणार आहे. हा त्यांच्या व्यक्तीपुरताच प्रश्न असतां तर आम्हांला त्या वादांत पडण्याचें कारणहि नव्हतें; परंतु हजारों मतदारांचे प्रतिनिधि म्हणून त्यांचा कारभार चालविण्यासाठीं हे कौन्सिलांत जाणार आणि तेथें गेल्यावर तो कारभार सुव्यवस्थित कसा चालेल याची चिंता न वाहतां घटना मोडण्याच्या भ्रान्तिष्ट कल्पनेच्या नादीं लागून लक्षावधि मतदारांच्या संसाराची दुर्दशा करण्याला कारणीभूत होणार; म्हणून मतदारांच्या हिताच्या दृष्टीनें त्यांना हा इशारा देणें हें प्राप्त कर्तव्य आहे.

नवी राज्यघटना आम्हीं राबविणार नाहीं ही त्यांची कल्पना वस्तुस्थितीला सोडून असून ती अव्यवहार्य व हानिकारक आहे. नदीच्या महापुरांत सांपडलेल्या व त्याबरोबर वाहवटीला लागलेल्या माणसानें मी प्रवाह मानीत नाहीं अशी ऐट मिरविण्याइतकेंच हें हास्यास्पद आहे. तुम्ही प्रवाह माना अथवा न माना, प्रवाह तुम्हांला ढकलीत नेत आहे हें निर्विवाद आहे. प्रत्यक्ष ग्रहण लागण्यापूर्वीच त्याचा वेध लागतो त्याप्रमाणें नवी राज्यघटना सुरू होण्यापूर्वीच तिचा वेध सुरू झाला आहे, व घटना मोडण्याची घमेंड बाळगणारेहि त्या वेधांत गुरफटलेले आहेत. घटना तुम्ही राबवा अथवा न राबवा, पण घटना तुम्हांला राबवूं लागली आहे हें खास. नव्या कौन्सिलांच्या मतदारांच्या याद्या तयार होऊं घातल्या व त्या वेळेपासून सर्वांसच वेध लागला आणि जेव्हांपासून हे घमेंडानंदन मतदारांच्या घरीं खेटे घालून 'तुम्ही आपलें नांव नोंदवून घ्या हो' अशीं आर्जवें करूं लागले तेव्हांपासून नवी घटना त्यांना राबवूं लागली हें स्पष्ट सिद्ध झालें. आणि आता तर काय प्रत्यक्ष राष्ट्रसभाध्यक्षापासून तों लुग्यासुग्या स्वयंसेवकापर्यंत सर्वच कॉंग्रेसवाले पायास भिंगरी बांधल्याप्रमाणें रात्रंदिवस गांवोगांव, घरोघर भ्रमंती करूं लागले आहेत; तरी पण घटना न मानण्याची भाषा चालूच आहे. अहोरात्रींतल्या चोवीस तासांत घटकाभरहि विश्रांति न घेतां संसारांत आकंठ बुडालेल्या माणसानें माझा या संसाराशीं काडीइतकाहि संबंध नाहीं, मी सर्वथैव अलिप्त आहे, असली वेदान्तांतील पोपटपंची तोंडानें चालूच ठेवावी तशांतलाच हा प्रकार आहे.

### महापुराला अडविण्याची भाषा फुकट

महापुरानें अकस्मात् एखाद्या गांवाला वेढा दिला म्हणजे अज्ञ व सुज्ञ, बाल व वृद्ध, अशक्त व सशक्त, आळशी व उद्योगी, वेदान्ती व संसारी सर्वच घेरले जातात, तेव्हां त्याबद्दल कोणास कोणीं हसूं नये अथवा हिणवूं नये हेंच उचित होय. म्हणून त्याबद्दल आम्ही कोणासहि दोष देत नाहीं. पण खरा वादाचा

नगर वाचनालय, सातारा.

प्रश्न हा आहे कीं, या महापुरानें सर्वांनाच गराडा दिला आहे ही वस्तुस्थिति ओळखून या पुराची बाधा न होतां त्यांतून आपण शिरसलामत कसें सुटूं याचा विचार करून तसा प्रयत्न बुद्धिपुरस्सर करणार का हा महापूर आम्ही जाणीत नाहीं, असल्या घमेंडींत राहून लाटांचे धक्के खात यदृच्छेनें जेथें फेकले जाऊं तेथें मृतवत् पडून राहणार, का महापुराला तुच्छ लेखून त्याच्या उलट पोहण्याची धड-पड करून गटांगळ्या खात बुडून जाणार !

पोहण्याच्या कलेंतले तज्ज्ञ असें सांगतात कीं, पुराचा वेग जबर असल्यास आणि आपली तितकी ताकद नसल्यास पुराच्या उलट दिशेला जाण्याचा प्रयत्न करणें हें आत्मघातकीपणाचेंच लक्षण आहे. तेव्हां तो प्रत्यक्ष विरोधाचा मार्ग विचाराच्या कक्षेंतून तूर्त सोडून देऊं. दुसरा मार्ग असहकारितेचा. हा महापूर आमच्या इच्छे-विरुद्ध आमच्यावर लोटला आहे, यांतलें पाणी गढूळ आहे, त्यांत कांटेकुटे, साप-विंचू वाहत येत आहेत. तेव्हां आम्हांस त्याच्याशीं बिलकूल कांहींएक कर्तव्य नाहीं, हा महापूर आम्ही अडवून टाकून बंद करूं, नंतर एकत्र जमून ऋग्वेदांतलें सूक्त म्हणून इच्छेनुसार पर्जन्य पाडून स्वच्छ पाण्याचा पूर आणवूं व त्याच्यावर शेती करून समृद्ध होऊं, असें शेखमहंमदी मनोराज्य करतां करतांच छोट्यामोठ्या लाटांच्या धक्क्यानें वाहवत जाण्यांतच या मार्गाचें पर्यवसान व्हावयाचें. तिसरा मार्ग प्रतियोगी सहकारितेचा असून हाच प्रस्तुतच्या परिस्थितींत कल्याणप्रद होणार आहे. यांत दूरदृष्टीनें विचार असा करावयाचा कीं, नव्या राज्यघटनेच्या रूपानें आपल्यावर लोटलेला हा महापूर आपल्या मागणीहून व कल्पनेहून वेगळ्या व भयानक स्वरूपाचा आहे खरा. पण तो इतक्या वेगानें येऊन थडकला आहे कीं, त्याला अडविण्याची भाषा बोलण्याची वेळहि निघून गेली; आतां याच्यांतून आत्म-संरक्षण कसें करावयाचें व तें साधल्यावर 'चोराच्या हातची लंगोटी' या न्यायानें त्यांतूनच शक्य तितका लाभ कसा साधावयाचा याचा विचार करणें प्राप्त आहे. या महापुराचें पाणी कल्पनातीत गढूळ आहे खरें, पण शुद्ध निर्मल पाण्याचा पूर आलेला कधीं कोणीं कोणत्या तरी देशांत पाहिला आहे काय ? त्यांतून ज्या प्रांतांत तांबडी, पिवळी, काळी अशी त्रिविध रंगांची माती आहे त्या प्रांतांतलें पाणी थोडेंबहुत गढूळ असणारच. कालान्तरानें तें निवळेल आणि तोंपर्यंत त्यांतली घाण पोटांत न जाईल अशी दक्षता घेतली पाहिजे. महापुराबरोबर कांटेकुटे वाहत येतात पण ते थोडक्याच श्रमानें ढकलून पुराबरोबर घालवून दिले जातात आणि पुरांतले साप-विंचू हे स्वतःच इतके गारठलेले असतात कीं, ते त्या स्थितींत दंश करूं शकत नाहींत.

तात्पर्य हें कीं, नवी घटना वाईट आहे याविषयीं दुमत नाहीं, पण ती वाईट आहे अशी रड गाइल्यानें व तिच्या नांवानें बोटें मोडल्यानें ती घटना कांहीं

मोडत नाहीं. मग बोटाला उगाच शीण कां ? खाणावळींतलें जेवण घरच्या 'स्वयंपाका'सारखें तुष्टिकर व पुष्टिकर नसणार हें निश्चित आहे; तथापि खाणावळींत जाण्याचा प्रसंग आल्यावर व तेथें पानावर बसल्यावर मग पान लाथाळण्यापासून व खानावळवाल्याला लाखोली मोजण्यापासून निष्पन्न काय होणार ? खाल्लें तर बाधतें, टाकलें तर शापतें, असा पेंच पडल्यावर शापापेक्षां बाधा बरी, कारण ती औषधानें दूर करतां येतें आणि शाप परतविण्याइतकें आत्मबल नाहीं हें असा प्रसंगच आला यावरूनच सिद्ध आहे. एतावता कसाहि विचार केला तरी घटना मोडण्याचा भ्रान्तिष्ट व शक्तिबाह्य उपद्व्यापापेक्षा ती घटना चालवून पाहून तिचे गुणदोष नक्की समजून घेण्यांतच कल्याण आहे.

## भुताला राबवून घेणेंच बरें

प्रांतिक राज्यव्यवस्थेपुरतीच दृष्टि मर्यादित करून प्रांतिक राज्यघटना यंत्राची घडवणूक तपासून पाहिल्यास असें आढळून येतें कीं, हें यंत्र 'तीन राक्षसांच्या गोष्टींत'ल्या राक्षसासारखें आहे. म्हणजे त्या यंत्रांतील सर्व खुब्या ओळखून तें कह्यांत वागविल्यास त्याच्यापासून काम घेतां येईल आणि जर कां आपल्या अज्ञानामुळें, अनवधानामुळें अथवा असहकारितेमुळें तें आपल्या हातून दुसऱ्याच्या हातीं गेलें, तर तेंहि आपल्याला घातक होईल. भूत स्वाधीन झालेल्या माणसानें त्या भुताला भरपूर काम दिलें तर ठीक, नाहीं तर तेंच भूत छातीवर बसून गळा दाबतें. तेव्हां भुताला काम सांगणें बरें का त्याच्याकडे दुर्लक्ष करून त्याच्याकडून गळचेपी करून घेणें बरें ?

या विवेचनांतील मर्म लक्षांत येण्याकरितां उलटसुलट दोन उदाहरणें घेऊं. ओरिसा व बंगाल या दोन प्रांतांतील निवडणुकी आतां पूर्ण झाल्या आहेत. ओरिसा प्रांतांत कॉंग्रेसवाले बहुसंख्य म्हणजे ६० ते ३७ इतके निवडून आले आहेत. बंगाल प्रांतांत ते २५० ते अवघे ५४ इतके अल्पसंख्य आहेत, तेव्हां बंगालमध्ये कॉंग्रेसवाल्यांनीं मंत्रिपद स्वीकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं व तेथें ते राज्ययंत्र मोडूंहि शकत नाहींत. बहुसंख्य पक्षांशीं वाटल्यास त्यांनीं सहकार्य करावें अथवा विरोध करावा किंवा तटस्थ वृत्ति स्वीकारावी; परंतु त्यांची तटस्थ वृत्ति त्यांनाच बाधक होणार. कारण एवढा मोठा अल्पसंख्य पक्ष तटस्थ राहिल्यास संयुक्त मुसलमान पक्षाचा बहुमताला जास्तीच जोर चढेल आणि तो नंगा नाच घालूं लागेल. त्यास असा बेताल वागूं देणें कॉंग्रेसवाल्यांना इष्ट वाटतें काय ? आणि ज्या मतदारांनीं कॉंग्रेसवाल्यांना मतें दिलीं त्यांना हा नंगा नाच चालूं देणें श्रेयस्कर वाटतें काय ? अर्थातच ज्यांनीं कॉंग्रेसवाल्यांना मतें दिलीं ते कॉंग्रेसच्या मोडतोडीच्या व असहकारितेच्या धोरणामुळें पश्चात्ताप पावणार हें उघड आहे.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

### मतदारांचें हित पाहाल ना ?

ओरिसांतला प्रश्न तर याच्याहिपेक्षां अधिक सोपा व स्पष्ट आहे. काँग्रेसला निर्धास्त असें बहुमत लाभलें आहे. आतां त्या बहुमताचा फायदा घेऊन काँग्रेसनें जर अधिकारस्वीकार केला तर प्रांतिक कारभारापुरतें काँग्रेसचेंच स्वराज्य तेथें स्थापित होत नाहीं काय ? काँग्रेसनें मनांत आणल्यास तेथला शेतसारा माफक करणें, जंगलच्या तक्रारी दूर करणें, साक्षरताप्रसार करणें, ग्रामोद्योगाला उत्तेजन देणें, दारूबाजी बंद करणें, बेकारीचें निवारण करणें इत्यादि अनेक लोकहिताचीं कार्यें काँग्रेस करूं शकणार नाहीं काय ? पण 'दैव देतें आणि कर्म नेतें' या म्हणीप्रमाणें काँग्रेसला अवदसा आठवली व तिनें घटना मोडण्याची शपथ घेतली. ही शपथ पाळावयाची म्हटल्यास ओरिसा प्रांतांत काँग्रेसवाल्यांना स्वतः अधिकारस्वीकार करतां येणार नाहीं आणि अल्पसंख्याकांना काँग्रेसच्या विरोधा-मुळें अधिकार चालविणें अशक्य होईल. अशा परिस्थितींत इंडिया अॅक्टाच्या ९३ व्या कलमाप्रमाणें ओरिसा प्रांताचा गव्हर्नर अधिकारसूत्रें आपल्या हातीं घेऊन आपल्या मर्जीतले दोनतीन मंत्री नेमून कारभार चालवील. यांत काँग्रेसनें स्वतःची इभ्रत काय राखली आणि मतदारांचें कोणतें हित साधलें ? याचसाठीं का मतदारांनीं काँग्रेसवाल्यांना मतें देऊन निवडून पाठवावयाचें ?

बंगाल प्रांतांत मुसलमानांचा कारभार त्रासदायक होऊं लागल्यास परि-णामकारक विरोध करावयाचें टाळून आणि ओरिसा प्रांतांत आपल्या हासचा लगाम व चाबूक गव्हर्नरच्या हातीं देऊन शेतकरी व कामकरी, धनिक व बेकार, सुशिक्षित व अशिक्षित सर्वांनाच त्राहि भगवन् म्हणावें लागण्याइतक्या असहाय स्थितींत लोटून देणें हा विश्वासघात नव्हे काय ? अशा स्थितींत जनतेवर जुलूम झाल्यास ती रुष्ट होऊन क्रांतीचा मार्ग सुलभ होईल अशी क्रांतिवाद्यांची समजूत असल्यास ती साफ चुकीची ठरेल. कारण या जुलमाबद्दल बंगाल्यांतले बहुसंख्य मुसलमान आणि ओरिसांतले गव्हर्नर हे जबाबदार नसून त्यांना निरंकुश करून ठेवणारी काँग्रेसच जबाबदार धरली पाहिजे, हें आतां लहान पोरालाहि कळूं लागलें आहे. त्यामुळें मंत्रिपद नाकारल्यानें क्रांतीचा काळ समीप येईल ही आशा व्यर्थ आहे.

### गुलामगिरी कशांत आहे ?

यावरून सर्व समंजस मतदारांच्या ध्यानीं येईल कीं, नवी घटना राबवून घेऊन बहुजनसमाजाचें कल्याण करण्याचा मोका आला असतां काँग्रेस जर राज्य-नौकेचें सुकाणू हातीं धरून तिला इष्ट वळण देण्याच्या ऐवजीं तें सुकाणू भलत्याच्या हातीं देईल, तर ती स्वतःचा घात करून हिंदी रयतेचाहि घात करील. सुकाणू हातीं घेऊन नौका चालविणें ही गुलामगिरी नसून सुकाणू दुसऱ्याच्या हातीं देणें हेंच गुलामगिरी ओढवून घेण्याचें दुर्लक्षण आहे. राज्ययंत्रावर नजर ठेवून तें

आपल्या हिताच्या धोरणानें चालविण्यांत धोका नसून तें यंत्र अलबत्या-गलबत्याच्या हातीं दिल्यानेंच अपघात होऊन आपण चिरडलें जाण्याचा संभव आहे. राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेण्यांत राष्ट्रहिताचा घात होणार नसून तीं सूत्रें हातचीं घालविण्यांतच मतदारांचा घात होणार आहे. तेव्हां अधिकारसूत्रें हातीं न घेण्याची प्रतिज्ञा करून राज्ययंत्र मोडण्यातोडण्याची वल्गना करणाऱ्या कॉंग्रेसवाल्या उमेदवारांना मतें देऊन मतदारांनीं आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊं नये. कॉंग्रेसवाले घटना न राबवितील तर ती घटनाच त्यांना गुलामासारखी राबवील. कॉंग्रेसवाले राज्ययंत्र मोडण्याच्या हेतूनें त्या यंत्रांत हात घालतील तर ते स्वतः त्या पोलादी चाकटीच्या भक्कम यंत्रांत रगडले जातील! कॉंग्रेसवाले तटस्थ राहूं म्हणतील तर द्रौपदीच्या अब्रूचे धिंडवडे न थांबविल्याचा दोष भीष्म-द्रोणादिकांवर आला तसा दोष त्यांच्या कपाळीं येऊन त्यांना उघड्या डोळ्यांनीं कॉंग्रेसच्या अब्रूचे धिंडवडे काढलेले निमूटपणें पाहावे लागतील! सारांश, जो जो पेंच कॉंग्रेस परकी सरकारवर टाकूं पाहात आहे तो तो पेंच तिच्यावरच उलटणार आहे. असा कटु अनुभव आला म्हणजे कॉंग्रेसवाल्या कौन्सिलरांना वर उद्धृत केलेल्या भर्तृहरीच्या वचनासारखेंच असें म्हणण्याचा प्रसंग येईल कीं,

पाशा न छिन्ना रिपवो न भग्ना ।
आपत्सु मग्नाः कृषिकास्तु खिन्नाः ॥

शीलं च भ्रष्टं कनकं च नष्टं ।
श्रेयो न दृष्टं ननु किं नु कष्टं ॥

आंग्ला न त्रस्ता वयमेव त्रस्ताः ।
सत्ता न ग्रस्ता वयमेव ग्रस्ताः ॥

दास्यं न ध्वस्तं वयमेव ध्वस्ताः ।
परा न भ्रान्ता वयमेव भ्रान्ताः ॥

**यास्तव मतदारांनीं कॉंग्रेसवाल्या उमेदवारांना निक्षून असा प्रश्न विचारावा कीं, नवी राज्यघटना ' राबविणार कीं तिच्याकडून राबविले जाणार ? ' ज्याच्या अंगीं ती राबविण्याची धमक असेल त्यालाच मत देण्यांत स्वार्थ व परमार्थहि आहे.**

# आर्थिक व्यवहार

## केली कोंडी पण झाला कोंडमारा १

[इ. स. १९०७ सालीं शेठ चुनीलाल सरैय्या या धाडसी व्यापाऱ्यानें पुढाकार घेऊन स्पीशी बँकेची मुंबईत स्थापना केली. त्या वेळीं विलायतेंत चांदी अति स्वस्त असल्यानें हिंदुस्थान सरकारला चांदी खरेदी करून रुपये पाडण्यांत मोठाच फायदा होत असे. तरी पण सरकार लंडनच्या उघड्या बाजारांत स्वस्तांत स्वस्त दरानें चांदी खरेदी न करतां, विशिष्ट कंपन्यांमार्फतच चढ्या भावानें चांदी खरेदी करीत असे व त्यामुळें त्या परदेशी कंपन्यांना सरकारला चांदी विकण्यांत मोठा नफा पदरांत पडत असे. हा नफा आपल्या पदरांत पाडून घेण्याकरितां विलायतेंत मोठ्या प्रमाणांत चांदी खरेदी करून चांदीची कोंडी करावी, आणि हिंदुस्थान सरकारला आपल्याकडूनच चांदी खरेदी करण्याला भाग पाडावें, असा शेठ चुनीलाल सरैय्या यांचा बेत होता. परंतु सरकारनें दोन वर्षें चांदी खरेदी करणेंच बंद ठेवलें आणि त्यानंतर चांदीवर १५ टक्के आयात-कर लादला आणि हा कर बसविण्यापूर्वीं विलायतेंतून मुंबईकडे येण्यास निघालेल्या पण मुंबई बंदरांत उतरून न घेतलेल्या चांदीवरहि तो कर वसूल करण्यात आला. आयात-करामुळें विलायतेंत खरेदी करून ठेवलेली

(केसरी, दि. १६ डिसेंबर १९१३)

नगर वाचनालय, सातारा.



चांदीहि तिकडच्या तिकडेच स्वस्त दरानें विकणें भाग पडलें. अशा अनेक कारणांमुळें चुनीलाल सरैय्या यांना मोठी नुकसानी सोसावी लागली. एवंच, चांदीची कोंडी करण्याच्या खटाटोपांत शेठजींचाच कोंडमारा होऊन स्पीशी बँकेला धक्का बसला व त्या धक्क्यानें स्वतः शेठजीहि प्राणास मुकले. चुनीलाल सरैय्या यांच्यावर हा प्रसंग कसा येऊन आदळला त्याची माहिती या लेखांत दिली आहे.]

### मेल्यानंतर शिव्यांची लाखोली

मेलेल्या माणसास नांवें ठेवण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं. 'Never speak ill of the dead' अशी इंग्रजींतहि म्हण आहे. परंतु हल्लींच्या काळांत कित्येकांचें वर्तन मात्र ह्याच्या अगदीं उलट होत असतें. त्यांच्या वागण्याचें धोरण 'मनुष्य जिवंत आहे तोंपर्यंत त्याच्या विरुद्ध ब्र काढूं नको आणि त्याच्या पश्चात् मात्र त्याला यथेच्छ लाखोली वहा' अशा प्रकारचें असतें. शेठ चुनीलाल सरैय्या हे जिवंत असून आपल्यावरील सर्व आरोपांस व आक्षेपांस उत्तर देण्यास खंबीर होते तोंपर्यंत ह्या 'नृपांगणगतखलां'चीं तोंडें शिवल्याप्रमाणें बंद होतीं; परंतु आतां त्यांनीं आपल्या जिभा मनमुराद मोकळ्या सोडून 'चुनीलाल वारले हें बरेंच झालें, एक पीडा कायमची गेली' अशाच जवळ जवळ अर्थाचे प्रलाप काढण्यास सुरुवात केली आहे. ॲडव्होकेट ऑफ इंडिया पत्राचे शब्द तर 'The man is better dead' असेच स्पष्ट आहेत! स्पीशी बँक बुडाली व त्यामुळें ज्यांचें नुकसान झालें त्यांना एखादे वेळीं सरैय्याबद्दल संताप येणें मनुष्यधर्मास अनुसरून आहे. परंतु स्पीशी बँकेशीं ज्यांचा संबंध विरोधाशिवाय दुसरा कोणताच नव्हता, आणि ती बँक बंद झाल्यानें ज्यांचें एका कार्डाइतकेंहि नुकसान झालें नाहीं — उलट फायदाच होण्याचा संभव आहे — अशांनीं चुनीलालचे पश्चात् त्यांस शिव्याशाप द्यावे हें खरोखरीच आश्चर्यकारक व त्वेषजनक आहे.

बरें; ह्या आक्षेपकांचा शेठ चुनीलाल यांच्याशीं इतका विरोध तरी कां असावा, आणि त्यांच्या पश्चात् त्यांना 'जुगारी' म्हणून नांवें ठेवण्यांत त्यांचा उद्देश तरी काय असावा ह्याची मीमांसा करूं जातां असें दिसतें कीं, चुनीलालचा व त्यांच्या आक्षेपकांचा खासगी द्वेष नव्हता, आणि नसला पाहिजे हें कोणासहि कबूलच आहे. मग शेटजींनीं ह्यांचें घोडें तरी काय मारलें असा प्रश्न पुढें येणें साहजिकच आहे, व ह्या प्रश्नाचें समर्पक उत्तर 'नृपांगणगतखल' ह्या भर्तृहरीच्या एका शब्दानें देतां येण्यासारखें आहे. ॲंग्लो-इंडियन पत्रें व त्यांचीच री ओढणारीं दुसरीं कांहीं नेटिव्हद्वेष्टीं पत्रें ह्यांचें एक तत्त्वच ठरून गेलेलें असतें कीं, स्वकीयांच्या हितसंबंधास जोंपर्यंत बाध येत नाहीं तोंपर्यंत, सरकारच्या प्रत्येक कृत्याची तरफदारीच करावयाची; ह्यामुळें ह्या तत्त्वाच्या विरुद्ध वागणाऱ्या गृहस्थांशीं

त्यांची दावेदारी स्वाभाविकपणेंच ठरते. अर्थात् चुनीलाल यांच्या नांवानें ह्या निंदकांनीं खडे फोडण्यास शेटजींची कर्तबगारी सरकारला कोठें नडं लागली होती हें पाहिलें पाहिजे.

## सरकारची चांदी-खरेदी व चढता भाव

इ. स. १९०७ सालीं स्पीशी बँकेची स्थापना झाल्यापासून चुनीलाल यांनीं चांदीच्या व्यापारांत मन घातलें. तोंपर्यंत हा व्यापार बहुतेक युरोपियन कंपन्यांच्याच मार्फत चाले, आणि टांकसाळीकरितां लागणारी चांदीहि सरकार ह्या कंपन्यांमार्फतच खरेदी करी. इ. स. १९०० ते १९०७ पर्यंतची सरकारची चांदी खरेदी आणि विलायतचा चांदीचा भाव ह्यांची तुलना करून पाहिली असतां स्पष्टपणें असें दिसून येतें कीं, ज्या ज्या प्रमाणानें सरकारनें अधिक नाणें पाडिलें त्या त्या प्रमाणानेंच चांदीचा भाव चढलेला आहे. १९०१ सालच्या प्रारंभीं हा भाव दर औंसास २७ पेन्स होता; परंतु सरकारनें सतरा कोटि रुपये नवे पाडण्याकरितां चांदी खरेदी केली, त्यामुळें हा भाव ३० पेन्सांवर गेला. पुढील दोन सालीं सरकारनें रुपये पाडणें कमी केलें त्या वेळीं तो भाव २२ पेन्सांपर्यंत उतरला. १९०६ व १९०७ सालीं सरकारनें वीस कोटींवर रुपये पाडले त्या वेळीं हा भाव ३२$\frac{1}{2}$ पेन्सपर्यंत चढला; व ही चांदीच्या आजपर्यंतच्या भावाची कमालमर्यादा होय.

शेठ चुनीलाल यांनीं चांदीच्या व्यापारांत मन घालण्याच्या वेळीं बाजाराची अशी स्थिति होती, आणि सरकार युरोपिअन कंपन्यांकडून ३२$\frac{1}{2}$ पेन्सच्या कमालीच्या दरानें चांदी खरेदी करीत होतें, आणि युरोपिअन व्यापाऱ्यांस अर्थात् अतोनात नफा होत होता. असला किफायतीचा व्यापार आपल्या लोकांच्या हातीं यावा अशी इच्छा कोणाहि देशी व्यापाऱ्याच्या मनांत येणें वावगें नाहीं. अर्थात् चुनीलाल यांनीं आपल्या जोडीला कांहीं व्यापारी घेऊन एक मंडळ स्थापन केलें, आणि चांदीची खरेदीविक्री सुरू केली. युरोपिअन व्यापाऱ्यांच्या हातचा व्यापार जाऊं लागला आणि सरकारलाहि शेठजी सांगतील ती किंमत देऊन चांदी खरेदी करावी लागते कीं काय अशी धास्ती पडली. ह्यानंतर सरकारनें १९०८ ते १९१० पावेतों नवें नाणें फारच थोडें पाडिलें. चांदीखरेदी तर अगदींच बंद ठेविली, आणि जुने रुपये आटवूनच काय ते थोडे रुपये पाडण्यांत आले. परंतु आज ना उद्यां नाणें पाडण्याला सरकारला चांदी लागेलच. तेव्हां आपण झालेलें नुकसान भरून काढूं ह्या आशेवर चुनीलालांनीं चांदीखरेदी चालूच ठेविली. ह्यावर सरकारनें चांदीवर शेंकडा पंधरा टक्के कर बसवून टाकल्यामुळें पूर्वी खरेदी केलेल्या चांदीवरहि कर भरावा लागला आणि पुढें ही चांदी हिंदुस्थानात आणून न ठेवितां तिचा सांठा लंडनांत करणें भाग पडलें. परंतु त्यामुळें शेठजींना

दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागलें आणि युरोपिअन कंपन्यांच्या हातून काढून घेतलेला व्यवहार आपले एजंट म्हणून लंडनांतल्या एका कंपनीकडेच द्यावा लागला. एवढ्यानेंहि भागलें नाहीं तेव्हां सरकारनें मॅंटेग कंपनीला गुप्तपणें आपल्याकरितां चांदी खरेदी करण्याचें कंत्राट दिलें; त्यांनीं दिलेला चढा भाव (२९ पेन्स) कबूल केला; आणि शिवाय ह्या व्यवहाराबद्दल कमिशन निराळेंच दिलें. ह्याखेरीज स्टेट सेक्रेटरीकडून थोड्या व्याजानें दीड कोटि कर्ज आणि चांदीच्या कंपन्यांच्या शेअर्समध्यें झालेला नफा हे फायदे वेगळेच.

## मॅंटेग कंपनीलाच चांदी विकावी लागली

आतां चुनीलाल यांजकडून चांदी खरेदी करण्यांत सरकारचें ह्याच्यापेक्षां अधिक नुकसान कोणतें झालें असतें? पण नाहीं. यामुळें चुनीलाल ह्यांनीं चांदीची कोंडी केली खरी, परंतु त्यांचाच उलट कोंडमारा झाला. प्रतिपक्षी मॅंटेग कंपनीला जितक्या सवलती अधिक तितक्याच चुनीलाल यांच्या मार्गांत अडचणी अधिक अशी स्थिति झाली, तरी ते डगले नाहींत; आणि इतक्या अडचणींतूनहि त्यांनीं सरकारला थोडीबहुत चांदी आपल्याचकडून खरेदी करावयास भाग पाडलें. आपण होऊन चक्रव्यूहांत शिरल्यावर प्रतिपक्षाविरुद्ध तक्रार करणें योग्य नव्हे, हें जाणूनच चुनीलाल वागत होते; परंतु मुंबईतल्या त्यांच्या कांहीं हितशत्रूंनीं स्वदेशी बँकांच्या धांदलीची संधि साधून जेव्हां स्पीशी बँकेवरच गदा आणली आणि एका महिन्यांत सवा कोटि रुपये परत करणें भाग पाडलें त्या वेळीं मात्र शेठजींचा पुरा कोंडमारा झाला. बँकेवरील आघात त्यांनीं शौर्यानें चुकविलाच; परंतु त्याबरोबरच 'धर्मयुद्ध नव्हे हें' अशी त्यांची खात्री होऊन हार पत्करून त्यांनीं लंडनमधील चांदी विकून टाकण्याचें ठरविलें असावें. त्यांचे प्रतिस्पर्धी ज्या संधीची चातकाप्रमाणें वाट पाहात होते तीच त्यांस मिळाली; आणि बेसुमार उतरविलेल्या भावानें (२६ पेन्स) साडेचार कोटींची चांदी मॅंटेग प्रभृति कंपन्यांनींच खरेदी केली!

ही खरेदी होण्याबरोबर आतां भाव २८ पेन्सपर्यंत पुनः चढले आहेत, आणि सरकारहि आतां चांदी खरेदी करणार असून मॅंटेग प्रभृति कंपन्यांना ह्या सट्टयांत चांगलाच नफा होण्याची आशा आहे, अशा तारा येऊं लागल्या आहेत; आणि ह्यांत आश्चर्य तें काय! सर्वतोपरी अनुकूल परिस्थिति आणि सरकारचें पाठबळ ह्यांच्या जोरावर लंडनमधील चांदीच्या व्यापाऱ्यांनीं सर्व प्रकारें कोंडींत सांपडलेल्या निःशस्त्र वीरावर जय मिळविला ह्यांत फुशारकी ती कोणती? परंतु दुःखाची गोष्ट हीच कीं, अभिमन्यु शरसंधान करीत असतां पलायन करणाऱ्या जयद्रथानें ज्याप्रमाणें तो निपचित पडल्यावर परत येऊन त्याच्यावर लत्ताप्रहार केला, त्याचप्रमाणें चुनीलालच्या पश्चात् त्यांच्यावर हल्ला करण्यास कांहीं जयद्रथी

वीर पुढें सरसावले आहेत ! उदाहरणार्थ, टाइम्सकार आतां मोठ्या पोक्तपणानें 'परोपदेशे पांडित्यं' करून मुंबईच्या व्यापाऱ्यांना सांगतात कीं, पाहा लंडनच्या व्यापाऱ्यांनीं ज्याप्रमाणें चुनीलालची चांदी खरेदी केली त्याप्रमाणें तुम्हीं आतां मोतीं खरेदी करा ! होय, लंडनच्या व्यापाऱ्यांप्रमाणें येथल्या व्यापाऱ्यांनाहि थोड्या व्याजानें कर्जाऊ रकमा, वाढती किंमत, सरकारसारखें खात्रीचें गिऱ्हाईक आणि वर भरपूर कमिशन इतकें मिळण्याची आशा असती तर त्यांनींहि ती खरेदी केली असती. परंतु त्यांतली प्रत्येक गोष्ट येथल्या व्यापाऱ्यांना प्रतिकूल आहे, हें टाइम्सकारांस ठाऊक नाहीं कीं काय ?

### यांत रयतेचें नुकसान कोणतें ?

बरें तें सर्व असो. चुनीलालनीं चांदीची कोंडी केल्यामुळें स्पीशी बँकेचें नुकसान झालें असेल आणि त्याबद्दल त्या बँकेच्या ठेवीदारांस व भागीदारांस प्रायश्चित्त भोगावें लागेल; पण ह्या चांदीच्या कोंडींत हिंदी रयतेचा जो ओढूनताणून संबंध टाइम्सनें आणला आहे तो कां? टाइम्सकार म्हणतात कीं, जर चुनीलालची कोंडी फुटली नसती तर चांदी महाग होऊन सरकारचें म्हणजे पर्यायानें रयतेचेंच नुकसान झालें असतें. पण हें कोडें आम्हांस तरी उमगत नाहीं. सरकार चांदी खरेदी करतें ती केवळ नाणें पाडण्याकरितां होय. ह्या व्यवहारांत हल्लींच्या रुपयाच्या कृत्रिम किंमतीनें सरकारला शेंकडा ३० ते ३५ टक्के नफा मिळतो व तो नफा गंगाजळी ठेव म्हणून वेगळा ठेवला जातो. आतां जर चुनीलाल यांच्या हातास यश आलें असतें व सरकारला महागाईची चांदी खरेदी करावी लागली असती तर सरकारचा टांकसाळीपासूनचा नफा शेंकडा ३० ते ३५ च्या ऐवजीं २० ते २५ झाला असता व गंगाजळी ठेवींत थोडी भर कमी पडली असती. परंतु ह्यामुळें प्रजेचें नुकसान तें काय होणार ? जोंपर्यंत रुपयाचा भाव पौंडास पंधरा असा ठरला आहे तोंपर्यंत सरकारनें चांदी कोणत्या भावानें खरेदी केली ह्याचा विचार करण्याचें प्रजेला कारणच नाहीं. बरें, खासगी व्यापारी कांहीं चांदी खरेदी करतात, त्यांचें नुकसान झालें असतें म्हणावें तर तेंहि बरोबर नाहीं. कारण एखाद्या वर्षी नवी चांदी जर थोडीशीं महाग झाल्यामुळें नुकसान झालें तर पूर्वीच्या शिल्लक असलेल्या चांदीच्या भावाच्या वाढीनें त्याच्या शतपट नफाहि होतो; आणि जोंपर्यंत दागिन्यांच्या किंवा गटांच्या रूपानें शिल्लक असलेल्या चांदीपेक्षां नवीन खरेदी अधिक नसते तोंपर्यंत चांदीचा भाव वाढल्यानें रयतेचें नुकसान होण्याचें बिलकूल कारण नाहीं.

### विस्कटलेली घडी बसणें कठीण

तेंहि असो. परंतु रयतेच्या नफानुकसानीची खोटीच सबब पुढें आणून हल्लीं नक्राश्रु ढाळणाऱ्या टाइम्सला इतर कोणत्याहि खऱ्या जरुरीच्या प्रसंगीं रयतेची

आठवण होत नाहीं हें नवल नव्हे काय ! परंतु आतां ह्या सर्व वादापासून फलनिष्पत्ति कांहींच नाहीं हें उघड आहे. शेठ चुनीलाल, चांदीची कोंडी, आणि त्या कोंडीचें साधन स्पीशी बँक, ह्या तीन गोष्टींचें साहचर्य शेठजींच्या हितशत्रूंस नकोसें झालें होतें. ह्या तीनहिपैकीं कोणतीहि एक गोष्ट नाहींशी झाल्यानें त्यांचा जीव थंड झाला असता; परंतु आतां तर त्यांच्या सुदैवानें ह्या त्रयीपैकीं शेटजी व चांदी हीं दोन नाहींशीं झालीं. तेव्हां राहतां राहिली बिचारी बँक ! ती आतां चालल्यापासून ह्या हितशत्रूंचें विशेष कांहीं नुकसान नाहीं. तेव्हां आतां ती 'नांगी मोडलेली' स्पीशी बँक पुनः चालावी, निदान भागीदारांचें व ठेवीदारांचें नुकसान तरी होऊं नये म्हणून टाइम्ससारखीं पत्रेंच उपदेश करूं लागलीं आहेत, आणि चुनीलालचा बळी घेतल्यानंतर मुंबादेवीहि शांत होऊन आतां तेथील सांपत्तिक वातावरणहि बदलूं लागलें आहे. स्पीशी बँकेच्या वेळीं एकट्या एक अर्जदाराच्या हेकेखोरपणामुळें एवढ्या बँकेवर गदा आणली गेली ही स्थिति चांगली नव्हे, सबब निदान अर्धे भांडवलवाले तरी एकमताचे झाल्यावांचून बँकेविरुद्ध लिक्विडेशनचें काम चालूं नये, असें मि. ग्रॅहॅमसारखे युरोपिअन व्यापारीच म्हणूं लागले आहेत; आणि मर्चंट्स् बँकेच्या विरुद्ध खोटा अर्ज करणारांवरच काम चालावें असा आतां न्या. दावर ह्यांनीं आपला अभिप्राय दर्शविल्यावरून तर भावी अर्जदारांस भीतीच बसून ह्यापुढें ही दिवाळ्यांची सांथ मंदावेल, किंबहुना अजीबात बंद होईल, अशीं पूर्वचिन्हेंहि दिसूं लागलीं आहेत. स्पीशी बँकेचें कोट्यवधि रुपयांचें नुकसान झालें म्हणून सुरू झालेली ओरड मंदावत जाऊन आतां ठेवीदारांचें तर नुकसान होणार नाहीं, भागीदारांचें झाल्यास थोडेसें होईल असे अभिप्राय बाहेर पडूं लागले आहेत. ह्या सर्व बदललेल्या परिस्थितीचा परिणाम चांगलाच होईल. मुंबईच्या व्यापारास दिवाळ्यांच्या सांथीमुळें बसलेला धक्का नाहींसा होऊन सर्व व्यवहार पुनः पूर्ववत् चालू लागतील; आणि स्पीशी बँकेविरुद्ध ज्यांनीं ज्यांनीं हत्यार उचललें होतें त्यांचीं हत्यारें अल्पावधीनेंच बोथट होऊन जातील. पण त्या हत्यारांच्या माऱ्यामुळें गतप्राण होऊन गेलेल्या चुनीलाल शेठजींचा देह कांहीं आतां पुनः परत येत नाहीं. तथापि आपण चालविलेली बँक आपल्या पश्चात् बंद न पडतां, कमजोर होऊन का होईना, पण चालू आहे एवढें जरी त्यांस दिसून येईल तरी देखील त्यांच्या आत्म्याची तळमळ अल्पांशानें तरी शांत होईल यांत संशय नाहीं. पण वाईट करणें सोपें असतें, तितकें चांगलें करणें सोपें नसतें, यामुळें स्पीशी बँकेची विसकटलेली घडी फिरून बसावी अशी आमची कितीहि इच्छा असली तरी ती तशी बसण्याचें काम फार मुष्किलीचें होऊन बसलें आहे, मग स्वदेशीच्या नशिबानें काय होतें पाहावें ?

---

# कालवे का रेल्वे ? २

[ हिंदुस्थानांतील सुबत्ता वाढविण्याकरितां कालवे काढण्याची अत्यंत जरूरी असतां हिंदुस्थान सरकार नवें कर्ज काढून रेलवेचा प्रसार करतें, पण कालव्यांचा प्रसार करतांना हात आंखडतें. याचें कारण काय याची चिकित्सा या लेखांत केली असून असें दर्शविलें आहे कीं, रेल्वेचा प्रसार होण्यांत विलायती मांडवलवाले व व्यापारी यांचा जसा फायदा होतो तसा कालव्यांच्या प्रसारानें त्यांचा फायदा होत नसल्यानें, सरकार कालव्यांच्या ऐवजीं रेल्वेच्या प्रसाराकडेच अधिक लक्ष देतें. ]

### रयतेस पाण्याची जरूरी

कांहीं दिवसांपूर्वीं विलायतेंत 'नॅशनल लिबरल क्लबां'त भाषण करतांना मि. ब्राइस् ह्यांनीं, वसाहतींत वर्णद्वेषांचें पीक फार माजलें असल्यामुळें हिंदी लोकांनीं आपला देश सोडून दुसरीकडे जाऊं नये असें प्रतिपादन केल्याचें वाचकांस विदित आहेच. ब्राइससाहेबांचा हा अनाहूत उपदेश येथें तर कोणास पटावयाचा नाहींच, पण विलायतेंतील हिंदी लोकांचे हितकर्ते सर वुइल्यम् वेडरबर्न ह्यांना देखील तो पटला नाहीं. ह्यासंबंधीं त्यांनीं 'डेली न्यूज अँड लीडर'मध्यें एक पत्र लिहिलें असून त्यांत ते म्हणतात कीं, – "हिंदी शेतकऱ्याला गांवानजीकच विहीर किंवा कालवा असलेली थोडी जरी जमीन असली तरी तो मातृभूमीचा त्याग करणार नाहीं. हिंदी रयतेस जर कशाची जरूरी असेल तर ती पाण्याचीच होय. परंतु कालवे काढावयाचे सोडून रेल्वेकडेच अतिशय भांडवल खर्च होत आहे, अशी हिंदी लोकांची नेहमींच तक्रार आहे. मोठमोठ्या जमिनी जलाभावामुळें पड पडल्या आहेत. त्या जमिनींना कालव्यांचें पाणी मिळेल तर एकहि हिंदी मजूर, ज्या देशांत आपली किंमत राहत नाहीं, अशा परदेशांत जाणार नाहीं." सर वुइल्यम् वेडरबर्न ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें हिंदी पुढाऱ्यांची ही तक्रार आज तसिचाळीस वर्षें चालू आहे. परंतु सरकारचा आगगाडीकडे ओढा अद्यापि कमी होत नाहीं, येवढेंच नव्हे तर तो दिवसेंदिवस वाढतच चालला आहे.

### रेल्वेकडील खर्चाची वाढ

गेल्या आठवड्यांत वरिष्ठ कायदेकौन्सिलांत १९१४–१५ सालचें जें अंदाजपत्रक मांडण्यांत आलें त्यावरून देखील हीच गोष्ट स्पष्ट होते. विलायतेंतील भांड-

(केसरी, दि. १० मार्च १९१४)

चलवाले स्टेट सेक्रेटरीला गळ घालतात आणि त्यांच्याकडून रेल्वेकडे खर्च व्हावयाची रक्कम अगाऊच ठरवून घेतात; आणि मग येथल्या फडणिसांना तो संकल्प पुरा पाडण्याकरितां विश्वप्रयत्न करावा लागतो. इ. स. १९०७–८ सालीं मॅके-कमिटीनें रेल्वेकडे सालीना १८ कोटि रुपये खर्च व्हावे असा अभिप्राय देऊन ठेवला तरी प्रत्यक्ष तितकी रक्कम आजपर्यंत खर्च झाली नव्हती. परंतु १९१३–१४ सालीं १८ कोटींच्या मंजुरीवरहि चढ होऊन मंजुरीविना २५ लाख रुपये अधिक खर्च झाले आहेत. गेल्या पांच वर्षांत रेल्वेच्या खर्चाची वाढ कशी झपाट्यानें होत आहे आणि त्या मानानें कालव्यांकडे कसें दुर्लक्ष होत आहे तें बजेटाच्या तपशिलांत दिलेल्या आंकड्यांवरून स्पष्टपणें नजरेस येत आहे.

पांच वर्षांच्या अवधींत रेल्वेकडे खर्च दीडपटीनें वाढला, परंतु कालव्यांकडील रक्कम मात्र लंबकासारखे हेलकावे खाऊन पांच वर्षांपूर्वी होती त्यापेक्षांहि मागेंच चालली आहे. कोणत्याहि देशांत रेल्वेपेक्षां कालव्यांकडे खर्च कमीच होतो व तो तसा असणें हें स्वाभाविक आहे. तथापि एका कामाकडे पैशाच्या थैलीचें तोंड मनमुराद मोकळें सोडावयाचें आणि दुसरीकडे असलेलें तोंड देखील गळचेपी होईपर्यंत आवळावयाचें ह्याचा अर्थ काय? चालू सालच्या अंदाजपत्रकावर कडाक्याचा वादविवाद झाला व आणखी व्हावयाचा आहे. त्या वादांत ह्या पक्षपाताबद्दल खरपूस टीका झाली व होत आहे; पण त्या टीकेचा प्रत्यक्ष उपयोग होऊन रेल्वेकडचे दोनतीन कोटि रुपये उचलून कालव्यांकडे अथवा शिक्षणाकडे घालण्याची अद्भुत शक्ति सर गाय फ्लीटवुड् ह्यांनीं म्हटलेल्या 'बज्या जादुगारा'च्या अंगींहि नाहीं हें अगदीं निर्विवाद आहे.

### स्टेट सेक्रेटरीच्या पाठीमागें लकडा

'इंग्लंड हें मारवाडी राष्ट्र आहे; हिंदुस्थान सरकारहि बजेटांतील प्रत्येक पैन्-पैचा मोबदला कोणत्या रूपानें किती मिळतो हें डोळ्यांत तेल घालून पाहत असतें,' असें गृहीत धरिलें तरी ह्या कोड्याचा उलगडा होत नाहीं; कारण आजवर रेल्वेकडे जे पांच अब्जांहून अधिक रुपये खर्च झाले आहेत त्यांवर निवळ व्याज शेंकडा दीड टक्काहि सुटत नाहीं आणि कालव्यांकडे जें चौपन्न कोटि रुपये भांडवल गुतलें आहे त्याच्यावर पांच टक्के व्याज सहज सुटतें, असें सरकारच सांगतें. अर्थात् हा आवडीनावडीचा प्रकार व्याजाच्या जास्तकमी दरावर अवलंबून नाहीं, तर मग ह्याचें बीज आहे तरी कशांत? तर विलायतेंतील भांडवलवाले व व्यापारी ह्यांचा स्टेट सेक्रेटरीच्या पाठीमागें जो लकडा लागतो त्यांतच ह्याचें बीज आहे. हिंदुस्थानांतून कापूस, गहूं, गळिताचीं धान्यें वगैरे जिन्नस मुख्यत्वेंकरून निर्गत होतात. ह्यांची जी हल्लीं पैदास होत आहे तेवढीचाच उठाव रेल्वेकडून वेळेवर होत नाहीं. मग आणखी कालवे काढून धान्य अधिक पिकवून करावयाचें आहे काय?

एका युरोपियन महापंडितानें तर अशी भीति एकदां प्रदर्शित केली होती कीं, सरकार जर विनाकारण अधिक कालवे करण्याच्या भानगडींत पडेल तर पुरेशा रेल्वेच्या अभावीं कालव्यानें होणारें पीक शेतांतल्या शेतांतच कुजून जाईल !

### कोड्याचा थोडासा उलगडा

युरोपिअन व्यापाऱ्यांचा कालव्यांपेक्षां रेल्वेकडे ओढा अधिक असण्याला उपरिनिर्दिष्ट कारण तर आहेच, पण त्यापेक्षांहि प्रबल असें दुसरेंहि एक कारण आहे. रेल्वे किंवा कालवे ह्यांकडे सालोसाल खर्च होणाऱ्या रकमांचा हिशेब तपासून पाहिल्यास असें दिसून येईल कीं, त्यांतला कांहीं खर्च विलायतेंत होतो व कांहीं येथें होतो. ह्या खर्चांतहि दोन प्रकार आहेत. पहिला नवीन भांडवल जमवून नव्या कामावर होणारा खर्च; आणि दुसरा चालू जमाखर्चांतून चालू कामावर होणारा खर्च. ह्या उभयविध खर्चांचे दोन्ही देशांतील आंकडे ताडून पाहिल्यास प्रारंभींच्या कोड्याचा थोडासा उलगडा होईल. गेल्या दहा वर्षांत नवीन भांडवलातून रेल्वेकडे झालेल्या खर्चांतला शेंकडा २८ टक्के खर्च विलायतेंत होऊन शेंकडा ६२ टक्के खर्च येथें झाला. कालव्यांकडील खर्चांत हेंच प्रमाण ५ आणि ९५ आहे. अर्थात् युरोपिअन व्यापाऱ्यांचा रेल्वेविषयीं आग्रह कां आणि कालव्यांकडे त्या मानानें बेफिकिरी कां तें यावरून स्पष्ट होतें. परंतु तेंच स्पष्टतर होण्याला विलायतेंत हा खर्च कां होतो व दोहोंमध्यें इतकें अंतर कां ह्याचें विवेचन करणें जरूर आहे.

### विलायती कारखानदारांचा फायदा

पुढील सालाकरितां रेल्वेकडे अठरा कोटींची रक्कम मंजूर झाली आहे. तिचाच विनियोग वरील प्रमाणाच्या अनुरोधानें कसा होईल तें सांगितल्यास हें विवेचन विशदतर होईल. रेल्वेकडे जें नवें भांडवल दरसाल घालावयाचें त्यांतला बराच भाग चालू रस्त्यांवर सुधारणा करण्यांत खर्च होतो; आणि त्यांत मालाच्या डब्यांची वाढ करणें ही बाब मुख्य असते. मालाचे डबे, उतारूंचे डबे, एंजिनें, रूळ, रुळाखालील पोलादी पाट वगैरे सर्व माल विलायतेंतील कंपन्यांकडे खरेदी होऊन इकडे येतो. ह्या खरेदीकडेच मंजूर झालेल्या १८ कोटि रकमेंतून शेंकडा २८ प्रमाणें पांच कोटि रुपये खर्च होतात. बाकीचे तेरा कोटि रुपये रस्त्यांची, स्टेशनांची, डब्यांची दुरुस्ती करणें वगैरे कामाकडे ह्याच देशांत खर्च होतात. हे इतकेच रुपये कालव्यांकडे मंजूर झाले असते तर त्यांतून अवघे एक कोटि देखील विलायतेंत खर्च न होतां सतरा कोटींहून अधिकच रुपये येथल्या येथें खर्च झाले असते; कारण कालव्यांकरितां कांहीं लोखंडी किंवा पोलादी सामान ( टिकाव-फावड्यांखेरीज ) अथवा मोठ्या किमतीचीं यंत्रें विलायतेंतून सालोसाल खरेदी करून आणावीं लागत नाहींत. सारांश, रेल्वेपेक्षां कालव्यांत विलायती कारखानदारांचें मालाच्या खपाच्या दृष्टीनें शेंकडा २३ टक्के नुकसान आहे; आणि म्हणूनच ह्या

व्यापाऱ्यांची कालव्यांच्या कामाकरितां कधींहि ओरड ऐकूं येत नाहीं, परंतु रेल्वे-साठीं मात्र सारखी धडपड चालू असते.

### व्याजाचा भरणा विलायतेंत करावा लागतो

ह्या सर्व विचार नव्या कामाचा व नव्या भांडवलाचा झाला. एकदां एखाद्या रेल्वेचा रस्ता चालू झाला म्हणजे त्यावरील किरकोळ दुरुस्तीचा खर्च, क्षुल्लक फेरफार करण्याचा खर्च, भांडवलावरील व्याज एवढ्या रकमा दरसालच्या सामान्य वसुलांतून खर्ची पडतात. ह्या खर्चांतहि विलायतेंत होणारा आणि हिंदुस्थानांत होणारा असे पोटभेद आहेत. ह्या बाबतींत तर रेल्वेवरील विलायतेंतील खर्चाचें प्रमाण शेंकडा ७० असून अवघा ३० टक्के खर्च काय तो हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत होतो. परंतु कालव्याकडील खर्चांत मात्र शेंकडा १८ टक्केच विलायतेंत खर्च होऊन बाकीचा ८२ टक्के खर्च ह्या देशांतच होतो. हा खर्च दरसालच्या सामान्य वसुलांतूनं होत असून त्यांत त्या त्या खात्याकडे खर्च करण्याकरितां काढलेल्या कर्जावरील व्याजाची रक्कमच मुख्य असते. रेल्वेकरितां काढलेलें कर्ज बहुतेक युरोपिअन कंपन्यांचेंच असल्यामुळें त्यावरील व्याजाची फेड करण्याकरितां बरीच मोठी रक्कम दरसाल विलायतेंत हिंदुस्थानच्या नांवानें खर्च पडून युरोपिअन सावकारांच्या हातीं पडते. आतां पूर्वी एकवार घेतलेला अठरा कोटींचाच हिशेब पुढें चालू ठेविल्यास ह्या जमाखर्चाचा नीट खुलासा होईल. अठरा कोटि नव्या भांडवलापैकीं पांच कोटींचा माल प्रारंभींच विलायतेंत खरेदी होऊन ते रुपये तेथल्या कारखानदारांना मिळाले व त्यांतला बराच भाग पुनः भांडवलाचें रूप धारण करून दुसऱ्या वर्षी काढावयाच्या कर्जाची वाट पाहत राहिला. तेरा कोटि रुपये खर्च झाले, त्यांतले हिंदी मजूर व कारखानदार ह्यांच्या वांट्यास किती आले, त्याचा हिशेब पुढें द्यावयाचा असल्यामुळें तूर्त सोडून देऊं. दोन्ही देशांत मिळून करेबसे १८ कोटि रुपये खर्च झाल्यावर दुसऱ्या वर्षापासून त्याच्यावरील व्याजादाखल सुमारें पाऊण कोटि रुपये विलायतेंत भरणा करावे लागतात. व्याजाच्या दरांत रेल्वेवरील व कालव्यावरील भांडवलांत कांहीं फरक नसल्यामुळें त्याबद्दल कांहीं तक्रार करतां येत नाहीं. तथापि रेल्वेकडील अठरा कोटि भांडवलापैकीं तेरा कोटीच ह्या देशांत खर्च झाले असून, अठरा कोटींवर व्याज भरावें लागतें; कालव्यावरील खर्चांतील बहुतेक भाग येथेंच खर्च झाल्यामुळें त्यांत हा फरक इतका ठळक दिसण्याजोगा नसतो.

### युरोपिअन पगारदार आणि पेन्शनर्स

आतां रेल्वे तयार होत असतांना व ती तयार झाल्यावर तीवर जो खर्च होतो त्यांतील कितवा भाग युरोपिअन व युरेजिअनांच्या पदरांत पडतो व हिंदी लोकांच्या वांटणीस किती येतो तें पाहूं. पब्लिक सर्व्हिस

कमिशनमध्यें ज्या साक्षी होत आहेत त्यावरून रेल्वे एंजिनिअर्समध्यें हिंदी लोकांचा भरणा बहुतेक नाहींच व तो होऊं नये असेंच धोरण आहे, हें दिसून आलेंच आहे. एंजिनिअर्सपेक्षां कमी दर्जाच्या परंतु निवळ कारकुनी किंवा मजुरीपेक्षां वरिष्ठ प्रतीच्या जागांवर युरेजिअन ऊर्फ अँग्लो-इंडियनांचाच भरणा विशेष आहे. इ. स. १९१२ सालीं एकंदर रेल्वेवर ७८५० युरोपिअन, १००६६ युरेजिअन आणि ५८९४२२ हिंदी लोक कामावर होते. ह्यांत युरोपिअन व युरेजिअन ह्या उभयतांची संख्या १८ हजारांजवळ आहे. परंतु त्यांच्या पगाराचें प्रमाण हिंदी नोकरांच्या अनेक-पटीनें असल्यामुळें रेल्वे-वरील चालू खर्चापैकीं बराच मोठा भाग त्यांच्या हिश्यास जात असला पाहिजे. कालव्यावर देखरेख करण्यास आधीं नोकर थोडेच लागतात, आणि त्यांतून ह्या खात्यांत सुपरिंटेंडिंग एंजिनिअरिंगपर्यंतच्याहि जागा (ॲक्टिंगच कां होईनात) क्वचित् प्रसंगीं तरी हिंदी लोकांना मिळण्याचा संभव असतो. तात्पर्य, कालव्यावरील चालू खर्चांतहि युरोपिअनांना रेल्वेपेक्षां फायदा फारच कमी असतो.

## ही गोष्ट सरकारास पटेल तेव्हां खरी

एतावता रेल्वे व कालवे ह्या दोन कामांकडील खर्चाची तुलना केली असतां विलायती सावकार, भांडवलवाले कारखानदार, एंजिनिअर्स व वरिष्ठ दर्जाचे नोकर, ह्या सर्वांच्याच दृष्टीनें रेल्वेची वाढ झाल्यानें त्यांस जितका फायदा झाला आहे तितका फायदा कालव्यांची वाढ झाल्यापासून नाहीं; आणि त्यांचा फायदा नसल्यानें सरकारच्या पाठीमागें त्यांचा तगादाहि नाहीं. अर्थात् नुसत्या हिंदी लोकांच्या ओरडीला तितकें पाठबळ न मिळाल्यानें तिचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. सर वुइल्यम् वेडरबर्नसारखे हिंदी लोकांचे हितकर्ते एखादे वेळीं हा प्रश्न पुढें आणतात, परंतु तो तेवढ्यावरच राहून जातो; आणि पुनः रेल्वेच्या धडाक्यापुढें कालव्याच्या मागणीचा मंद आवाज ऐकूं आला न आला असेंच होऊन तिकडे जावें तितकें लक्ष जात नाहीं, ह्यास कांहीं इलाज नाहीं. हिंदुस्थान हा देश मुख्यत्वेंकरून शेतकीचा आहे, आणि एक-दोन वर्षांआड एका ना एका प्रांतांत दुष्काळ ठेवलेलाच आहे. दुष्काळ पडल्या-नंतर तगाई तहकुबी, सूट, बैरणीची ने-आण करण्याला सवलत, दुष्काळीं कामें अशा अनेक रूपानें सरकार खर्च करतें, तरी पण माणसांचे हाल आणि गुरांची उपासमार चुकत नाहीं. संयुक्त प्रांतांतील यंदाच्या प्रखर दुष्काळांत शेंकडा २० जनावरें बचावतील कीं नाहीं, अशी भीति पडली आहे! ह्यांतलें बरेचसें अरिष्ट रेल्वेच्या ऐवजीं कालवे वाढविल्यानें टळणार नाहीं काय? पण ही गोष्ट सरकारास पटेल तेव्हां खरी!

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


# करांचा पूर्वेतिहास ३

[ पहिलें महायुद्ध सुरू झालें होतें व हिंदुस्थानचा खर्च वाढत चालला होता, तरी त्या वर्षी फडणीस सर वुइल्यम् मेयर यांनीं करवाढ न करतां अंदाजपत्रकाची कशीबशी तोंडमिळवणी केली. त्या वेळीं असेंब्लींत त्या संबंधानें बरीच चर्चा झाली. अशा वेळीं हिंदी जनतेवर कोणते कर, केव्हां, कशासाठीं लादले व त्यांत वेळोवेळीं कशी वाढ अथवा घट करण्यांत आली याचा इतिहास उद्बोधक होईल हें जाणून १८५७ पासूनचा हिंदी करांचा जुना इतिहास या लेखांत ग्रथित केला आहे. त्यांत कोणत्या प्रसंगीं कोणता कर वाढवावा अथवा कमी करावा या संबंधाचें तात्त्विक विवेचनहि असून कोणत्या व्हाइसरॉयांनीं न्याय दिला आणि कोणीं अन्याय केला याची चिकित्साहि या लेखांत सविस्तर केली आहे. ]

### कांहीं करांची कुळकथा

नुकत्याच झालेल्या वरिष्ठ कौन्सिलच्या बैठकींत फडणीस सर वुइल्यम् मेयर यांनीं पुढील सालच्या अंदाजपत्रकांत नवीन कर न बसवितां जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याचें जें योग्य धोरण स्वीकारलें, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करतांना आम्हीं असें विधान केलें होतें कीं, करांच्या बाबतींत ह्यापूर्वी असलें योग्य धोरण बऱ्याच वेळां संभाळण्यांत आलें नाहीं. त्या विधानाची प्रचीति पटविण्याकरितां आजपर्यंतच्या जमाखर्चाचें सिंहावलोकन करून हल्लीं हयात असलेल्या व सध्यां नामशेष झालेल्या कांहीं करांची कुळकथा पाहणें अवश्य आहे.

कर बसविणें, वाढविणें, कमी करणें किंवा पूर्ण माफ करणें या चारहि प्रकारांत प्रसंगविशेषीं भलतेंच धोरण स्वीकारल्यानें अन्याय होऊं शकतो. जरूरी नसतां अगर जरूरीपेक्षां अधिक कर बसविणें अथवा वाढविणें, जरूरी नाहींशी झाली असून देखील नवीन बसविलेला अथवा वाढविलेला कर कमी न करणें, अवश्य प्रसंगीं ज्या प्रकारचा कर बसविणें योग्य होईल तो बसवावयाचा सोडून भलताच कर बसविणें, आणि शिल्लक अधिक राहिल्यानें कर कमी करावयाची पाळी आली असतांना खरा जाचक कर माफ न करतां दुसराच एखादा कर कमी करणें अगर पूर्ण माफ करणें, असें ह्या प्रकारांचें विविध स्वरूप असूं शकतें. यांतील एकेक प्रकार घेऊन तसलें उदाहरण आढळून येतें कीं नाहीं, हें पाहण्या-

( केसरी, दि. २३ मार्च १९१५ )

पेक्षां इ. स. १८५९ पासून १९१५ पर्यंतच्या जमाखर्चांत कोणकोणत्या करांत कसकसा फेरबदल करण्यांत आला, तें कालानुक्रमानेंच सांगणें विशेष प्रशस्त असल्यानें पुढील विवेचनांत ही कालानुक्रमपद्धतीच स्वीकारली आहे.

इ. स. १८५७ सालीं शिपायांच्या बंडाचा वणवा पेटून शांत झाल्यानंतर हिंदुस्थानचा राज्यकारभार खुद्द राणीसरकारकडे येऊन तो ब्रिटिश पार्लमेंटाच्या मार्फत चालू झाला. ह्या अधिकारपरिवर्तनाच्या पूर्वी हिंदुस्थानचें उत्पन्न अवघें ३१ कोटि रुपये असून खर्चहि बेतानें होता, व त्या वेळीं कंपनीसरकारला कर्ज सुमारें ६० कोटि रुपये होतें; परंतु बंडाच्या सालीं व पुढें स्थिरस्थावर होईपर्यंत एक-दोन वर्षांत हा कर्जाचा बोजा १०० कोटींपर्यंत वाढला. त्यामुळें जरी वार्षिक उत्पन्नहि ४० कोटींपर्यंत वाढलें होतें तरी, कर्जावरील व्याजाचा बोजा वाढल्यानें व इतर कारणांनीं खर्चाची मजल ५० कोटींपर्यंत गेली. अर्थात जमाखर्चांत तूट येऊं लागली. त्या वेळीं जमेच्या मुख्य बाबी म्हणजे जमीनमहसूल, मिठावरील कर, अफूचें उत्पन्न व आयात-निर्गत मालावरील जकात एवढ्याच होत्या.

### आयात जकात वाढविली

हिंदुस्थानचा कारभार हातीं येतांच 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' म्हणतात त्याप्रमाणें सरकारला वाढता खर्च भागविण्याकरितां आयात मालावरील जकात वाढवावी लागली. त्यापूर्वी विलायती सुतावर ३½ टक्के, विलायती मालावर व कापडावर ५ टक्के आणि इतर देशांच्या मालावर १० टक्के असा जकातीचा निरख होता; पण आतां तो बदलून चैनीच्या पदार्थांवर २० टक्के व इतर सर्व मालांवर १० टक्के आणि सुतावर ५ टक्के जकात ठरविण्यांत आली. ह्या योगानें उत्पन्न तीन कोटींनीं वाढलें; त्याच वेळीं खर्चांतहि दोन कोटींची काटकसर करण्यांत आली; तथापि जमाखर्चाची तोंडमिळवणी होईना. तेव्हां १८६० सालीं आयात मालावरील जकात सरसकट १० टक्के करण्यांत आली, प्राप्तीवर कर बसविण्यांत आला, मिठावरील कर आठ आणे वाढविला आणि पावत्या व हुंड्या यांना एक आण्याचीं तिकिटें लावण्याचा कायदा करण्यांत आला. अशा रीतीनें जमाखर्चाची तोंडमिळवणी झाली एवढेंच नव्हे तर, १८६१–६२ सालअखेर खजिन्यांत एक कोटीची शिल्लकहि राहिली. विलायती सुतावर व कापडावर १० टक्के जकात असल्यानें मुंबईच्या व्यापाऱ्यांस सुताच्या व कापडाच्या गिरण्या काढण्यासहि प्रोत्साहन मिळालें, आणि त्या योगें मुंबई इलाख्यांतील गिरण्यांच्या धंद्यास प्रारंभ झाला. पण लँकेशायरच्या कारखानदारांस त्याचें वैषम्य वाटूं लागलें आणि लगेच १८६२ सालीं सुतावरील जकात फिरून ३½ टक्के व कापडावरील जकात ५ टक्के करण्यांत आली; आणि पुढील सालीं इतर मालावरची जकात देखील १० होती ती ७½ पर्यंत उतरविण्यांत आली. वास्तविक

पाहतां ह्या वेळीं ही जकात कमी करावयास नको होती. कारण प्राप्तीवरील कर पांच वर्षांच्या मुदतीनें बसविला होता व त्याची मुदत आतां भरत आली होती, व त्या वेळीं हा प्राप्तिकर सर्वच प्रकारच्या उत्पन्नावर आकारला जात असून त्याला उत्पन्नाची किमान मर्यादा २०० रुपयांची ठरलेली होती, सबब तो फारच जाचक वाटत असल्यामुळें तो रद्द करणें भाग होतें; त्याप्रमाणें त्याची मुदत भरतांच १८६५ सालीं तो रद्द झालाच, परंतु इकडे आयात जकातीहि कमी झाल्यानें जमाखर्चांत तूट येऊं लागली; आणि ती भरून काढण्याकरितां सर्व प्रकारच्या धंद्यांवर 'लायसेन्स-टॅक्स' बसविण्याची नवी टूम काढण्यांत आली. प्राप्तिकर रद्द केला व लायसेन्स-टॅक्स (धंदेवाल्यांच्या परवान्यावरील कर) बसविला. पूर्वीचा प्राप्तिकर शेतकी उत्पन्नावर देखील असल्यानें या स्थित्यंतरांत शेतकऱ्यांचा फायदा झाला, एवढी एक गोष्ट इष्ट झाली, हें मान्य केलें पाहिजे.

### लॉर्ड मेयो यांचें उदार धोरण

पण इकडे खर्चाचें तोंड कांहीं आवरलें नव्हतें. उलट तें अधिकाधिक पसरूं लागलें होतें; त्यामुळें ह्या लायसेन्स-टॅक्सनें काम भागेना. तेव्हां कोर्टफीच्या स्टँपाचा दर वाढविण्यांत आला तरी तूट भरून येईना. मग लायसेन्स-टॅक्स सोडून पुनश्च प्राप्तीवरील कर बसविण्यांत आला; तो प्रारंभीं शेंकडा १ टक्का, मग २ टक्के आणि अखेरीस सन १८७० सालीं ३$\frac{1}{8}$ टक्केपर्यंत वाढविण्यांत आला. याच वेळीं मिठावरील करांतहि थोडासा फेरफार करण्यांत आला. ह्या वेळपावेतों सर्व हिंदुस्थानांत मिठावरील कर सारखा नसून बंगाल्यांत तो मणीं सव्वातीन रुपये असून मुंबई व मद्रास ह्या इलाख्यांत दीड रुपया होता. तेव्हां १८७० सालीं ह्या दोन इलाख्यांतील कर पांच आण्यांनीं वाढवून रु. १८।३ ठरविण्यांत आला. अशा रीतीनें परदेशी मालावरील आयात जकात उतरविल्यानें झालेलें नुकसान प्राप्तिकर, मिठावरील जकात व कोर्ट-फी वाढवून भरून काढण्यांत आलें! त्यानंतर लॉर्ड मेयो ह्यांची कारकीर्द सुरू होऊन खर्चांत काटकसरीचें धोरण सुरू झालें. इकडे जमीन-महसूल आणि अफू व मीठ ह्यांवरील जकात ह्यांचें उत्पन्नहि आस्ते आस्ते वाढत वाढत चाललेंच होतें. या सर्व कारणसमुच्चयानें १८७० ते ७२ या दोन वर्षांत जमाखर्चांत तूट आली नाहीं, व त्यामुळें कांहीं तरी कर माफ करण्यास हरकत नाहीं असें दिसून येतांच लॉर्ड मेयो ह्यांनीं प्राप्तिकर दर रुपयास सहा पै होता तो दोन पै करून टाकला, आणि कर देण्याला किमान प्राप्तिमर्यादा ५०० होती ती प्रथम ७५० व नंतर १००० केली. लॉर्ड मेयोच्या पश्चात् लॉर्ड नॉर्थब्रुक हे व्हाइसरॉय होऊन आले व त्यांनींहि मेयोसाहेबांचेंच उदार धोरण चालू ठेविलें. ह्यांनीं प्राप्तीवरील कर अजीबात काढून टाकला, परदेशी दारूवरील कर दर गॅलनास ३ रुपये होता तो ४ रुपये केला आणि आयात मालावरील जकात ७$\frac{1}{2}$ टक्के होती ती ५ टक्के केला.

वाचनालय सातारा
गणकीकृत

## लॉर्ड नॉर्थब्रुक यांचें न्याय्य धोरण

पण तिकडे लँकेशायरची पोटदुखी वाढूं लागली होती. अप्रतिबंध व्यापाराच्या तात्त्विक व बाह्यतः सात्त्विक सदिच्छेनें परंतु वस्तुतः मुंबईंतील वाढत्या गिरण्यांच्या मत्सरानें त्यांनीं स्टेट सेक्रेटरीकडे विलायती सुतावरील व कापडावरील जकात पूर्ण माफ करण्याविषयीं टुमणें लाविलें. मँचेस्टरच्या व्यापार-मंडळानें स्टेट सेक्रेटरी लॉर्ड सॅलिसबरी ह्यांजकडे प्रस्तुत प्रकरणांत जो विनंति-अर्ज पाठविला त्यांत "संरक्षित व्यापारपद्धतीनें हिंदुस्थानांत सुताच्या व कापडाच्या गिरण्या वाढत आहेत हें ग्रेट ब्रिटनच्या व हिंदुस्थानांच्याहि हिताला विघातक आहे! आणि आयात जकातीनें गरीब हिंदी प्रजेस विलायती कापड महाग पडल्यानें त्यांच्या सुखाला, सोयीला व आरोग्यालाहि बाध येत आहे!" असें प्रतिपादन केलें होतें. मिठासारख्या आरोग्याला आवश्यक अशा पदार्थावर दरमणीं दोन-तीन रुपये कर असल्यानें हिंदी प्रजेची प्रकृति बिघडत नाहीं, परंतु विलायती कापडावर शेंकडा पांच टके जकात बसल्यानें प्रजेच्या आरोग्यास धोका येतो, हा शोध मँचेस्टरवाल्यांस कोणत्या प्रयोगशाळेंत लागला असेल तो असो! ह्या वेळीं लॉर्ड नॉर्थब्रुकसारखा खंबीर व्हाइसरॉय होता म्हणून मँचेस्टरचें कांहीं चाललें नाहीं. "मला प्रथमतः हिंदुस्थानचें हित पाहिलें पाहिजे; व त्या दृष्टीनें पाहतां ८० लक्ष रुपये उत्पन्न देणारी जकात माफ करणें मला प्रशस्त वाटत नाहीं; व ही जकात सोडून दुसरा कर बसविल्यास येथें जबर असंतोष माजेल," असा उलट जबाब व्हाइसरॉयांकडून स्टेट सेक्रेटरीकडे गेला. मात्र इजिप्तमधून येणाऱ्या कापसापासून मँचेस्टरच्या तोडीचें तलम कापड निघूं शकतें म्हणून इजिप्तच्या कापसावर तेवढी पांच टके जकात बसविण्यांत आली.

## लिटनशाहींतील पक्षपाती गोंधळ

सॅलिसबरीसाहेबांना व्हाइसरॉयांचें हें धोरण बिलकूल मान्य झालें नाहीं व 'आमच्या परवानगीशिवाय तुम्ही जकातीच्या बाबतींत ढवळाढवळ करूं नये' असें त्यांनीं व्हाइसरॉयांस कळविलें. स्टेट सेक्रेटरींचें हें धोरण व अफगाण सरहद्दीवरीलहि धोरण नॉर्थब्रुक ह्यांस पसंत न पडून ते राजीनामा देऊन चालते झाले. त्यांच्या पाठीमागून लिटनशाही सुरू झाली; व तीबरोबर खर्चहि वाढत चालला; तेव्हां अफूवरील जकात वाढविली आणि मिठावरील कर मुंबई-मद्रासकडे १ रु. १३ आणे, आणि बंगाल्यांत सव्वातीन रुपये होता तो सर्वत्र एकसारखा २ रुपये करण्यांत आला. इकडे लँकेशायरवाल्यांनीं १८७७ सालीं पार्लमेंटांत असा ठराव पास करून घेतला कीं, 'हिंदी तिजोरीची स्थिति सुधारून सवड होतांच आयात मालावरील जकाती उठविण्यांत याव्या.' हा ठराव लॉर्ड सॅलिसबरींनीं गव्हर्नर जनरलकडे बजावणीकरितां पाठविला व त्याबरोबरच आणखी पांच नवीन

गिरण्या हिंदुस्थानांत सुरू होत आहेत म्हणें, असे भयसूचक उद्गारहि नमूद केले! वरील ठरावांतील तिजोरीच्या सुस्थितीची अट वरकरणीच होती; कारण ती अक्षरशः पाळली गेली असती तर आयात मालावरील जकात त्या वेळीं उठलीच नसती. स्टेट सेक्रेटरीचें हें नवें धोरण त्यांच्या कौन्सिलरांस देखील मान्य नव्हतें. परंतु आपल्या कौन्सिलचा विरोध बाजूस ठेवून स्टेट सेक्रेटरीनें पाठविलेला हा हुकूम लिटनसाहेबांनींहि आपल्या कौन्सिलांतील बहुमत बाजूस सारून क्रमाक्रमानें अमलांत आणला; आणि प्रथम सुतावरील व तीस नंबरी सुताच्या कापडावरील जकात माफ केली. पण खजिन्यांत तूट येऊं लागली तेव्हां लायसेन्स-टॅक्स पुनः बसविण्यांत आला. अफूवरील जकात दरपेटीस ७०० रुपये केली; मिठावरील व प्रांतिक कर वाढविले आणि दुष्काळ फंडाकरितां जी रक्कम ठेव म्हणून ठेवावयाची तीहि इतर कामाकडे खर्च होऊं लागली; तरी देखील लिटनशाहीच्या अखेरपर्यंत जमाखर्चाची तोंडमिळवणी झाली नाहीं. लॉर्ड लिटनच्या कारकीर्दीच्या अखेरच्या सालीं वसूल जमा ७४ कोटि असून खर्च ७८ कोटींपर्यंत वाढलां होता.

### आयात जकातीच्या चढउताराचा गोंधळ

त्यानंतर रिपनसाहेबांची उदार कारकीर्द सुरू होऊन त्यांनीं खर्चाचें मान सत्तर कोटींच्या आंत आणलें. तेणेंकरून खजिन्यांत शिल्लक पडतांच मिठावरील कर आठ आणे कमी करण्यांत आला आणि सर्वच आयात जकात माफ झाली; अफूवरील दस्तुरीहि ६५० रुपये करण्यांत आली. परंतु हिंदी लोकांच्या कमनशिबानें डफरिनसाहेबांच्या कारकीर्दींत ब्रह्मदेशाची स्वारी झाली आणि लष्करी खर्च कायमचाच वाढला. त्याच वेळेपासून चांदीचा भाव उतरून हुंडणावळींतहि विशेष नुकसान होऊं लागलें. तेव्हां खर्चाची तरतूद करण्यासाठीं आयात मालावर जकात न बसवितां लायसेन्स-टॅक्सऐवजीं प्राप्तीवरील कर बसविण्यांत आला आणि रॉकेल तेल व मीठ यांसारख्या गरिबांनाहि अत्यंत आवश्यक अशा जिनसांवरील कर वाढविण्यांत आला? परंतु तेवढ्यानेंहि हुंडणावळीचें व इतर खर्चाचें तोंड आवरेना, तेव्हां मग १८९४ सालीं आयात मालावर पांच टक्के जकात बसविण्याचें ठरलें. पण त्यांत मौज ही कीं, सर्व आयात मालांत जवळ जवळ निम्म्या किंमतीचा माल जो विलायती कपडा त्यावरच तेवढी जकात माफ! तरी देखील खर्च भागेना. तेव्हां मग कापडावर व सुतावर देखील पांच टक्के जकात बसली. त्याबरोबर लँकेशायरमध्यें खळबळ उडून जाऊन सुताला माफी मिळाली व कापडावरील जकात ३॥ टक्के करण्यांत आली; आणि या जकातीमुळें येथील गिरण्यांस सवलत मिळाल्याप्रमाणें होईल म्हणून येथें तयार होणाऱ्या कापडावरहि ३॥ टक्के कर बसविण्यांत आला. आयात कापड बहुतेक तीस नंबरावरील असतें व येथें तयार होणारें कापड त्या नंबराच्या आंतलें असतें; तेव्हां या दोहोंत चढाओढ होण्याचा

बिलकुल संभव नसतां हिंदी गिरण्यांतील कापडावर हा कर विनाकारण लादण्यांत आला आहे; आणि ह्याबद्दल सतत ओरड चालली असून व अलीकडे तिजोरीची सुस्थिति असूनहि अद्यापि हा कर माफ झालेला नाहीं.

## रुपयाची कृत्रिम किंमत

ह्याप्रमाणें सन १८६० पासून सन १८९६ पर्यंतच्या करांची कुळकथा आहे. ह्या मुदतींत लॉर्ड मेयो, नॉर्थब्रुक व रिपन ह्या त्रयींखेरीज इतर सर्वांच्या कारकीर्दींत गोरगरिबांना जाचणारे मिठावरील कर, लायसेन्स-टॅक्स व प्रांतावरील कर हे कायम होते किंवा वाढतच चालले होते; आणि खर्चाचें तोंड दिवसेंदिवस वाढतच चालल्यानें कर कमी होण्याची आशा दिसत नव्हती. परंतु १८९४ सालीं जेव्हां चांदीचा भाव फारच खालावला आणि नुसत्या हुंडणावळींतच ७–८ कोटि रुपये गडप होऊं लागले, तेव्हां सररहा चांदी घेऊन रुपये पाडून देण्याचें बंद करण्यांत आलें आणि अशा रीतीनें रुपयाला कृत्रिमपणा देऊन त्याची किंमत १६ पेन्स ठरविण्यांत आली. ह्या अद्भुत जादुगिरीनें कोणताहि नवीन कर प्रत्यक्ष न बसवितां सरकारी शिक्क्यांच्या नाण्यानें सरकार देणें देणाऱ्यांवर अप्रत्यक्ष रीतीनें शेंकडा तीस ते पसतीस टक्के कर बसविल्याप्रमाणें झाला. अर्थात् ह्या नवीन कलमीपासून भरदुष्काळांत देखील खजिन्यांत शिल्लक राहूं लागली, दुष्काळी कामाकडे खर्च करण्यास सवड होऊन शिवाय कोटि दोन कोटि रुपये शेतसाऱ्याची सूट देतां आली; वाढत्या लष्करी खर्चाची बिनबोभाट तरतूद झाली आणि इतकें करूनहि तिजोरी भरलेलीच ! तेव्हां मग कर्झनसाहेबांनीं मिठाचा कर दोन वेळा आठ आठ आण्यांनीं कमी केला. प्राप्तीवरील कराला प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाची मर्यादा ५०० होती ती हजार केली, अनेक किरकोळ स्थानिक कर माफ केले, आणि मिंटोसाहेबांच्या कारकीर्दीतहि मिठाचा कर तिसऱ्यांदा आठ आणे माफ करण्यांत येऊन दरमणी एक रुपयावर येऊन ठेपला.

## न्याय्य धोरणाला गालबोट

ह्याप्रमाणें कर्झन-मिंटो-कारकीर्दींत मात्र खजिन्यांत शिल्लक पडली असतां भलताच कर उठविण्याची चुकी न करतां जरूर तेच कर कमी करण्यांत आले. तरी पण लॉर्ड मिंटो ह्यांच्या कारकीर्दींत ह्या योग्य धोरणाला एक गालबोट लागलेंच. १८९८ सालापासून दरसाल खजिन्यांत दोन-तीन कोटि रुपये शिल्लक पडत होते. तथापि १९०८–९ सालीं दुष्काळामुळें आणि अमेरिका व युरोपमधील व्यापारांतील कांहीं धांदलीमुळें येथचा व्यापार कमी होऊन चार कोटींची तूट आली, अर्थात् ही तूट आकस्मिक होय कायमची नव्हे; व तत्पूर्वीच्या दहा वर्षांच्या शिलकेच्या मानानें ती खिसगणतींतहि घेण्यालायक नव्हती; असें असून देखील ही तूट पडतांच चांदी, तंबाखू व राकेल ह्यांवरील

आयात जकात वाढविण्यांत आली. ह्या तीनहि जिनसा गोरगरिबांसहि आवश्यक असल्यानें हा कर योग्य म्हणतां येत नाहीं; आणि तो बसविल्यानंतर दुसऱ्याच वर्षापासून तिजोरीची स्थिति सुधारली असूनहि तो अद्यापि कमी करण्यांत आलेला नाहीं, हेंहि अर्थशास्त्राच्या तत्त्वाला विरोधक होय. कारण विशेष जरुरीच्या प्रसंगीं बसविलेला कर ती जरुरी नाहींशी होतांच रद्द केला पाहिजे. परंतु हे कर त्या वेळेपासून अद्यापपावेतों कायमच राहिले आहेत. ही सर्व पूर्वपरंपरा व परिस्थिति लक्षांत घेतां चालू सालीं नवीन कर बसविण्यांत आला नाहीं, ह्याबद्दल सरकारचे आभार मानणें जरूर आहे.

## कर वाढवावयाचेच तर हे वाढवा ४

[ जर्मन महायुद्ध सुरू झाल्यावेळेपासून हिंदुस्थानचा खर्च वाढत चालला आणि आयात जकात घटत चालली. त्यामुळें अंदाजपत्रकांत तूट येऊन कर्जाचा बोजा वाढत चालला. तेव्हां जमाखर्चांतली तूट भरून काढण्यासाठीं येत्या बजेटांत करवाढ होणार असा अंदाज दिसूं लागला. अशा वेळीं मागील दोन वर्षांच्या अंदाजपत्रकांची तुलना करून नव्या अंदाजपत्रकांत कोणत्या खर्चांत काटकसर करतां येईल, कोणतें उत्पन्न वाढू शकेल, कर न वाढवितां कर्ज काढून तोंडमिळवणी केल्यास त्याचा परिणाम काय होईल इत्यादि सर्व पर्यायांचा विचार करून अखेरीस कर वाढविणें अपरिहार्य असल्यानें निर्गत मालांतील हाडें, कातडीं, चहा, तागाचें कापड यांवरील निर्गत जकात आणि आयात मालापैकीं परदेशी साखर, मोटारी, सायकली, पेटंट औषधें, रंग यांच्यावरील आयात जकात वाढवावी, पण गरिबांच्या मिठावरील कर वाढवूं नये असा इशारा या लेखांत दिला आहे. ]

### करवाढीसंबंधीं विचित्र सूचना

इ. स. १९१४ च्या ऑगस्टांत युरोपांतील महायुद्धास प्रारंभ होऊन सर्व सुरळीत चाललेले व्यवहार एकदम विस्कळित झाले. त्या वेळेपासून १९१५ च्या मार्च महिन्यांत वरिष्ठ कौन्सिलांत जमाखर्चाचें अंदाजपत्रक सादर केलें जाईपर्यंत देशाच्या जमाखर्चाचा विचार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनांत यंदा खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां सरकार कर्ज काढील का कर वाढवील हा प्रश्न घोळत

( केसरी, दि. २९ फेब्रुवारी १९१६ )

सातारा

होता. परंतु त्या वेळीं अनेक कारणसमुच्चयाचा परिणाम होऊन सरकारी फडणविसांनीं कर न वाढवितां कर्ज काढूनच एकसाल गुजराण करण्याचें ठरविलें, आणि त्यांचा तो विचार योग्य होता हें आम्ही त्या वेळीं ' कर का कर्ज ' या अग्रलेखांत दर्शविलेंच होतें. तेव्हांपासून आतांपर्यंत पृथ्वीचा सूर्याभोंवतीं आणखी एक फेरा झाला. फिरून मार्च महिना आला, आणि पुनश्च जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याची वेळ येऊन ठेपली. तेव्हां तेच फडणवीस यंदा काय बोलतात तें ऐकण्यासाठीं हिंदुस्थानांतले सर्व लोक सारखे कान टवकारून बसले आहेत. आणि ज्याच्या त्याच्या बुद्धिप्रमाणें व माहितीप्रमाणें जो तो तर्क लढविण्यांत चूर झाला आहे. एक म्हणतो मिठावर कर वाढणार, दुसरा सांगतो प्राप्तीवरचा कर अधिक करून माफीची मर्यादा संकुचित करणार, तिसरा प्रतिपादन करतो कीं, आयात मालावर व विशेषतः साखरेच्या व चैनीच्या पदार्थांवर संरक्षक जकात बसणार, कोणाचा तर्क असा धावतो कीं, ताग, चहा, हाडें, कातडीं वगैरेसारख्या निर्गत मालावरः जकात ठेवणार; असे एक ना दोन हजारों तर्कवितर्क चालू आहेत. त्यांतच कित्येक जे दीर्घशहाणे आहेत ते नुसते तर्क करण्यावरच समाधान न पावतां फडणविसांना कांहीं क्लृप्त्याहि सुचवीत आहेत. दरसाल ज्या जी. सी. आय. ई., के. सी. आय. ई., रावबहादुर, खानबहादुर, दिवाणबहादुर इत्यादि शेंकडों पदव्या अर्पण करण्यांत येतात त्यांच्यावर जरी भला मोठा कर ठेवला तरी मानास हपापलेले हे लोक कर भरून पदव्या घेतील; तर ही एक उत्पन्नाची बाब कां सोडतां, असें सुचविणारेहि कांहीं लब्धप्रतिष्ठित लोक आहेत! हिंदी लोक लग्नकार्यांत खर्च फार करतात. तेव्हां त्या खर्चाच्या मानानें त्यांच्यावर 'लगीनपट्टी' बसवावी असें सुचविणारेहि कांहीं शिष्ट निघाले आहेत! मोटारी, सायकली, टेलिफोन, विजेच्या व ग्यासच्या बत्त्या असले जिन्नस वापरण्याबद्दल कर बसविण्याची सूचना करण्याइतकी कित्येकांची नजर सूक्ष्म झाली आहे. मग त्यांच्या दृष्टीच्या तावडींतून कोर्टफी, स्टँप-फी, लायसेन्स-फी, पोस्टाचीं तिकिटें, रेल्वेचीं तिकिटें इत्यादिकांचे दर वाढविण्याची कल्पना कशी सुटणार!

परंतु हे सर्व तर्क पायाशुद्ध आहेत का? कोणता तरी का होईना; पण कर बसविल्यावांचून अथवा वाढविल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी खरोखरीच परिस्थिति आहे कां? याचा विचार केला पाहिजे. युद्धास प्रारंभ होऊन जेव्हां नुकते कोठें सात महिने झाले होते, तेव्हांच जर जमाखर्चांत येणारी तूट भरून काढण्याकरितां ' कर का कर्ज ' असा प्रश्न फडणविसांच्या मनांत घोळूं लागला, तर आतां १९ महिने युद्ध चालल्यावर आणि आणखी निदान पांचसात महिने तरी तें चालण्याची खात्री वाटत असल्यावर कोणता हिशेबी मनुष्य आपल्या आयव्ययाची दुःस्थिति लक्षांत घेऊन ती दूर करण्याची उपाययोजना करणार नाहीं? पण हें झालें तरी केवळ अनुमानच झालें. याला खरोखरी ' हा सूर्य आणि हा जयद्रथ '

असाच पुरावा पाहिजे; तो कितपत अनुकूल आहे तें पाहूं. गेल्या सालच्या अंदाजपत्रकांत जमेच्या बाजूस जे आंकडे धरले आहेत ते ठोकळ मानानें पुढीलप्रमाणें आहेत :– शेतसारा ३३ कोटि, अफू २.७ कोटि, मीठ ५ कोटि, स्टँप ७॥ कोटि, अबकारी १३ कोटि, जकात ९ कोटि. हीं जमेचीं मुख्य खातीं झालीं. यांखेरीज रेल्वे २२॥, कालवे ७, पोस्ट व तार ५ आणि इतर किरकोळ १५ कोटि असे सर्व मिळून १२० कोटींचा जमेचा अंदाज होता. या अंदाजाप्रमाणें जर सरसालांत वसूल झाला नसेल तर पूर्वीच्या कल्पनेपेक्षां तूट अधिक येईल व ती भरून काढण्यास जादा कर बसविल्याखेरीज अन्य मार्ग नाहीं हें उघड होईल. पण तशी वस्तुस्थिति असण्याचा संभव कितपत आहे ?

## चालू जमाखर्चाची तोंडमिळवणी

जमेच्या मुख्य खात्यांत शेतसारा आणि मीठ यांत तूट आलेली असण्याचा संभवच नाहीं. स्टँप व अबकारी या दोन खात्यांत २ कोटींची आणि जकातींत पाऊण कोटीची तूट येण्याचा संभव आहे. तथापि हीं सर्व खातीं मिळून ३ कोटींपेक्षां अधिक तूट मुळींच येणार नाहीं. उलटपक्षीं इतर खात्यांपैकीं रेल्वेचा जो अंदाज २२ कोटींचा धरलेला होता, त्यांत निदान १ कोटीची वाढच होण्याचा संभव दिसतो. तथापि पोस्ट व तार, व्याज इत्यादि जीं किरकोळ खातीं आहेत त्यांत वाढ होणार नाहीं; पण कदाचित् एक कोटीपर्यंत तूटच येईल. एवंच १२० कोटींच्या अंदाजपत्रकांत पूर्वी गृहीत धरलेल्यापेक्षां जमेचा आंकडा फार तर ३ कोटींनीं कमी होईल. परंतु खर्चाच्या खात्यांचा विचार केला असतां बजेटांत मंजूर झालेल्या सर्वच रकमा एरवीं देखील खर्च पडत नाहींत, मग काटकसरीच्या चालू सालांत तर काय पुसावयासच नको ! एकंदर खर्चाचा जो अंदाज आहे त्यांत लष्करखातें, बँक आणि पोस्ट व तार या खात्यांचा खर्च पूर्वी ठरलेल्या मर्यादेपेक्षां कमी होणार नाहीं. तथापि तो मंजुरीपेक्षां जास्त तर होत नाहीं हें खास; बाकीच्या खात्यांत बचत राहण्याचाच संभव आहे. सारांश, जमेच्या बाजूस जर ३ कोटींची तूट येईल तर खर्चाच्या बाजूसहि हात आंखडता धरल्यास तितकीच बचत राहून तोंडमिळवणी होण्यास हरकत नाहीं, व त्यासाठीं कर्ज काढण्याचें किंवा कर वाढविण्याचें प्रयोजन नाहीं हें उघडच आहे.

हा सर्व चालू ठराविक उत्पन्नाच्या जमाखर्चाचा विचार झाला. याखेरीज नवीन कर्ज काढून जीं कामें व्हावयाचीं असतात त्यांची गेल्या सालांत काय स्थिति झाली तें पाहूं. गेल्या बजेटाच्या वेळीं रेल्वे, कालवे व दिल्ली-नगर-रचना या कार्यत्रयीकरितां १४ कोटि, युद्ध सुरू झाल्यानें १९१४–१५ सालच्या जमेंत आलेली तूट व झालेलें कर्ज आणि १९१५–१६ सालच्या अंदाजपत्रकांत जमाखर्चातील अंतरामुळें पडणारी तूट, या सर्वांची बेरीज मिळून ४२ कोटि रुपयांची तरतूद

करणें भाग होतें. त्यांतून गतसालीं काढलेल्या २१ कोटि रुपये कर्जाची रक्कम तशीच पुढें ओढावयाची ठरल्यानें ती सोडून देऊं. बाकी २१ कोटींच्या भरपाई-करितां चालू शिलकेंतून ७ कोटि घ्यावयाचे आणि हिंदुस्थानांत ४½ कोटि नवें कर्ज काढावयाचें असें ठरलें व त्याची बजावणीहि झाली. इंग्लंडांत काढावयाच्या ९½ कोटि रुपये कर्जाची उभारणी मात्र तेथें झाली नाहीं; पण त्याच्या ऐवजीं चेंबर्लेन-कमिशनच्या शिफारसींचा फायदा घेऊन सहा कोटि रुपयांचें कर्ज येथेंच चलणी नाण्याच्या शिलकेंतून काढण्यांत आलें आहे. असो. कोठून का होईना जुनें कर्ज २१ कोटि कायम ठेवून नवें १०½ कोटि रुपये कर्ज हिंदुस्थानांतच काढून आणि बाकींतून सुमारें सात कोटि घेऊन ही गरज भागविण्यांत आली आहे. म्हणजे १९१५ च्या मार्च महिन्यांत बजेट ठरवितांना जी जमाखर्चाची रूपरेषा रेखाटली होती तिच्यांत विशेष महत्त्वाचा फरक पडलेला नाहीं एवढेंच नव्हे, तर युद्धास प्रारंभ होतांच सेव्हिंग-बँकेंतून भराभर रकमा काढून घेतल्या जाऊं लागल्यामुळें गतसालीं जी तूट आली ती यंदा सर्व स्थिरस्थावर झाल्यानें भरून निघाली असून शिवाय वर त्या शिलकेंत ३ कोटींची भरच पडली असावी; परंतु ती वरील हिशेबांत धरलेली नाहीं. सारांश, १९१४–१५ व १९१५–१६ या दोन सालांचा आढावा काढतां हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जांत ३०।३२ कोटींची भर पडली; पण त्याहून कांहीं अधिक ओढाताण झालेली नाहीं.

आतां १९१६–१९ सालच्या जमाखर्चाच्या तोंडमिळवणीचा विचार करूं. या भावी सालांतहि शेतसारा, मीठ, अफू, स्टँप, जकात किंवा रेल्वे, कालवे, पोस्ट इत्यादि खात्यांत जमेची रक्कम १९१५–१६ सालापेक्षां कमी येण्याचा संभव नाहीं. उलट गेलीं दोन वर्षे रेल्वेचें जें उत्पन्न कमी झालें होतें तें परत पूर्वस्थितीवर येण्याचा संभव अधिक आहे. यावरून जमेचें पारडें पुढील सालांत १२० कोटींहून हलकें भरेल असें मानण्याला बिलकूल आधार नाहीं. चालू खर्चाच्या बाजूचा विचार केला तरी हल्लीं जें काटकसर करण्याचें धोरण व्यक्त होऊं लागलें आहे त्यावरून पाहतां इतर कोणत्याहि खात्याच्या खर्चाची रक्कम गतसालापेक्षां अधिक फुगण्याचें तर कारणच नाहीं. याला कदाचित् लष्करी खातें मात्र अपवाद होऊं शकेल, परंतु वास्तविक न्यायानें पाहतां तें तरी अपवादात्मक होईल असें कां मानावें? युद्धाकरितां सैन्य रवाना करण्यांत व त्यास लागणाऱ्या सर्व रसदीचा पुरवठा करण्यांत अवाढव्य खर्चानें सरकार अगदीं हातटेकीस येत आहे हें कबूल आहे. तथापि हिंदुस्थानच्या हद्दीच्या बाहेर युद्धार्थ सैन्य पाठविल्यास त्याच्या खर्चाविषयीं जो निर्बंध कायद्यानें घालून दिला आहे त्याचा आणि या संबंधांत दिल्ली येथील कौन्सिलांत पास झालेल्या ना. चिटणिसांच्या ठरावाचा विचार करतां हा खर्च सालोसालच्या लष्करी खर्चाच्या सीमेबाहेर जाण्याला मार्गच नाहीं. अर्थात् नवीन बजेटांतील

चालू खर्चाचें पारडेंहि मागील एक-दोन सालांपेक्षां अधिक जड होण्याचें कारण नाहीं. झाल्यास तें थोडेसें हलकेंच होईल.

## सालोसालची कर्जाची वाढ

इतकें निश्चित झाल्यानंतर तीन प्रश्नांचा विचार शिल्लक राहतो. जमेचें च खर्चाचें पारडें तंतोतंत गेल्या वर्षाप्रमाणेंच राखावयाचें म्हटलें तरी गेल्या दोन बजेटांत जमाखर्चीं ५॥ कोटींची तूट आली होती तशीच तूट यंदाहि येऊं द्यावयाची कीं काय? कर्जातून करावयाचीं रेल्वे, कालवे वगैरेसारखीं जीं कामें असतात त्यांच्याकरितां नवें कर्ज काढून किती रकमेची मंजुरी द्यावयाची, आणि मागील दोन बजेटांत मिळून जें ३१ कोटि रुपये कर्ज काढलें आहे तें तसेंच राहूं द्यावयाचें कां त्यातली कांहीं परतफेड करण्याची तरतूद करावयाची? हे ते तीन प्रश्न होत. या प्रश्नांचा विचार आपण उलट क्रमानें करूं. प्रथमतः तिसरा प्रश्न विचारांत घेतां साहजिकच असें मत पडेल कीं, निदान तूर्त तरी ही कर्जाची रक्कम आहे तशीच राहूं द्यावी. राष्ट्रीय कर्जाची रक्कम आजपर्यंत ज्या पद्धतीनें, ज्या वेगानें आणि ज्या कारणाकरितां वाढत गेली आहे, त्याशीं तुलना करून पाहतां महायुद्धासारख्या आकस्मिक आपत्तींत दोन वर्षांत ३१ कोटींची कर्जाची भर म्हणजे कांहींच नव्हे. नमुन्याकरितां आपण मागील कांहीं सालांचे हिशेब पाहूं. १८८८–८९ सालीं या कर्जात १९ कोटींची भर पडली. १८९२–९३ सालीं १३$\frac{3}{4}$ कोटींची भर पडली. १८९७–९८ सालीं १५ कोटींनीं कर्जाची वाढ झाली. १९००–१९०१ सालीं ही कर्जाची रक्कम १६$\frac{1}{2}$ कोटींनीं फुगली. १९०५–०६ सालीं तर कमालच झाली म्हणावयाची! कारण या सालांत आमचें कर्ज २३ कोटींनीं वाढलें! ज्या वर्षांचे हे आंकडे दिले आहेत त्या वर्षांत युद्धाचा कांहीं संबंध नव्हता. मात्र त्यांतलीं दोन सालें काय तीं दुष्काळाचीं होतीं. तें कसेंहि असो. एरवींच्या वर्षांत देखील जर सुखासुखी दहा-वीस कोटि कर्ज वाढूं शकतें व त्याची फेड करण्याकरितां किंवा तें वाढविण्याची गरजच पडणार नाहीं असें करण्याकरितां जर आजपर्यंत कोणताहि कर लादण्यांत आलेला नाहीं तर भावी सालच्या बजेटांत तरी ह्या कर्जाच्या वाढीला भिऊन कर बसविण्याचें कारण काय?

## विलायतेंत कर्ज मिळणें शक्य नाहीं

यापुढें दुसरा प्रश्न रेल्वे, कालवे व दिल्ली-नगर-रचना यांच्या खर्चाचा. हीं कामें अशींच आहेत कीं, यांच्याकडे खर्चावयाच्या रकमांचा प्रसंगानुरूप संकोच-विकास होऊं शकतो. दिल्लीच्या भव्य इमारती यंदाच बांधल्या पाहिजेत असा कांहीं त्यांत जरूरीचा भाग आहे असें नाहीं. कालव्याकडे खर्च होणारी रक्कम कोटि सव्वा कोटीच्या आंतबाहेर असते तेव्हां त्या रकमेचाहि विचार गौणच

ठरतो. सगळी जी कांहीं अडचण येते ती रेल्वेच्या खर्चाची. या खात्याकडे दर-साल १८ कोटि रुपये खर्च करूं, असें स्टेट सेक्रेटरींनीं युद्धापूर्वीं एकदां वचन दिलेलें आहे; परंतु आपद्धर्म म्हणून तें वचन बाजूस ठेवून गतसालीं त्यांनीं १२ कोटींचीच मंजुरी दिली. पुढील सालीं देखील ही मंजुरी याच सीमेच्या आंत राहील अशी आशा आहे. ती यापेक्षां देखील कमी झाली तर आम्हांस पाहिजेच आहे; परंतु आज आपण केवळ इष्ट गोष्ट कोणती याचा विचार करीत नसून शक्य काय याचा तर्क करीत आहों. आणि शक्यतेच्या दृष्टीनें रेल्वे-बोर्डाच्या तोंडावर किमानपक्ष १२ कोटींचा तरी तुकडा टाकल्याखेरीज त्याचें समाधान होणार नाहीं; पण सध्या परिस्थिति अशी आहे कीं, नुसती कागदी मंजुरी दिली तरी तिचा उपयोग काय ? सगळी सोंगें आणतां येतात, पण पैशाचें सोंग आणतां येत नाहीं. गतवर्षीच्या अनुभवावरून सध्याच्या प्रसंगीं विलायतेंत कर्ज मिळणें शक्य नाहीं हें सिद्ध आहे, आणि हिंदुस्थानांत एका वर्षांत पांच कोटींपेक्षां अधिक कर्जाची उभारणी होणें या देशाच्या सांपत्तिक शक्तीच्या बाहेरचें आहे. कराचीच्या व्यापारी-संघाचे अध्यक्ष मि. वेब यांनीं या कामीं चंग बांधून वॉरलीग काढून २० कोटि रुपये तरी कर्ज उभारण्याचा प्रयत्न चालविला आहे. परंतु त्यांत यश कितपत येईल हें त्यांसच माहीत. यांत कांहीं कोणाचा दोष किंवा कुचराई आहे असें मुळींच नाहीं. याचें कारण आमची सांपत्तिक हीन स्थितीच होय; आजच्या अंकांतच दुसरीकडे या देशाच्या १९१५ सालच्या व्यापाराचे आंकडे दिले आहेत. त्यावरून ३१ कोटि लोकसंख्येच्या देशाचा वार्षिक व्यापार किती अल्प आहे तें तर दिसून येतेंच, पण त्यांतल्या त्यांत येथून बिनमोबदल्यानें सालोसाल किती माल बाहेर जातो हेंहि व्यक्त होतें. बरें, निर्गत व आयात यांची वजाबाकी करून राहिलेल्या रकमेंतून स्टेट सेक्रेटरीच्या खर्चाची भरपाई होऊन जी शिल्लक उरली तेवढी तरी सर्व रक्कम गेल्या सालीं आमच्या पदरीं पडली आहे काय ? या प्रश्नासहि नकारार्थीच उत्तर द्यावें लागतें. आयातीपेक्षां निर्गत माल ५७ कोटींचा अधिक पाठविला. त्यांतून स्टेटसेक्रेटरीच्या खर्चाकरितां ३० कोटि रुपये दिले गेले, तरी बाकी २७ कोटि रोकड परत मिळावयास पाहिजे होती; पण अवघी दहा कोटीच मिळाली. तेव्हां वर्षाच्या व्यापारी घडामोडीची प्राप्ति १० कोटि रुपये आणि त्यांतून रेल्वेकरितां कर्ज उभारणार १२ कोटि रुपये हें होणार कसें? अर्थातच यंदाच्या बजेटांत रेल्वेची रक्कमहि गतवर्षापेक्षां कमी मंजूर झाली पाहिजे. ती रक्कम कितीहि मंजूर होवो, या देशांत कर्जाची उभारणी पांच कोटींपेक्षां जास्त होणार नाहीं. अधिक रक्कम मंजूर करावयाचीच असल्यास विलायतेंत कर्ज काढावें लागेल; पण तें मिळणें शक्य नाहीं हें वर सांगितलेंच आहे.

### काटकसर होणार कशी

आतां शेवटचा तिसरा अत्यंत घोटाळ्याचा प्रश्न शिल्लक राहिला. रेल्वे-

सारख्या अवांतर कामाची तरतूद कर्जातून: करावयाची हें तत्त्व मान्य आहे; परंतु चालू खर्चालाच तूट पडूं लागल्यास मग तरी कर वाढविणें जरूर आहे कीं नाहीं? याला उत्तर एवढेंच कीं, चालू खर्च जर सर्वच अपरिहार्य असेल तर त्याची तोंडमिळवणी कर वाढवूनच केली पाहिजे. हा खर्च अपरिहार्य नाहीं, याकरितां एखादें कमिशन बसवून खर्चाच्या वाढीची चौकशी करा, असा कै. ना. गोखले यांनीं किती तरी वेळां आग्रह धरला होता, तथापि तो सफळ झाला नाहीं. आतां खर्चाची अडचणच पडली तेव्हां स्वतः फडणवीसच काटकसर करण्याची खटपट करीत आहेत; परंतु जोंपर्यंत लष्कर, सिव्हिल सर्व्हिस, पोलीस व स्टेट सेक्रेटरीचें ऑफिस या चार जांवईखात्यांना हात लावावयाचा नाहीं तोंपर्यंत काटकसर होणार कशी? बड्या बड्या पगारांच्या युरोपिअनांच्या जागा एकट्या लॉर्ड कर्झन यांनींच जेवढ्या वाढविल्या तेवढ्या जरी कमी केल्या तरी तूट येण्याच्याऐवजीं किती तरी शिल्लक उरेल; पण तें व्हावें कसें? असो. तितका खर्च जरी कमी झाला नाहीं तरी १९१३–१४ सालीं जितका नक्की खर्च झाला तितकीच मर्यादा कायम राहिली, तरी चालू साल संपल्यानंतर जी कांहीं थोडकीशी व्यापाराची वाढ होऊं लागेल, तिच्या योगानें रेल्वेचें व जकातीचें उत्पन्न आणखी वाढून ही तूट भरून येईल. तात्पर्य, काटकसरीचें धोरण आणि सर वुइल्यम् मेयर यांचा जमेच्या वाढीविषयींचा आशावादीपणा, या दोन गोष्टी लक्षांत घेतां चालू जमाखर्चांत गतसालाइतकी म्हणजे पांच कोटींची तूट न येतां ती फार तर ३ कोटींची येईल.

### जकातवाढीच्या सूचना

तेवढी तरी का होईना पण तूट आलीच तर ती भरून काढण्याकरितां कर वाढविलाच पाहिजेना? असा सवाल पुढें येणारच. अर्थात् दुसरा कांहीं काटकसरीचा मार्ग स्वीकारावयाचा नसेल तर कर वाढविणें प्राप्त आहे; पण तो वाढवावयाचाच असेल तर भलताच तरी वाढवूं नका, ज्याला सर्व हिंदी लोकांची संमति मिळेल तोच वाढवा, एवढेंच आमचें सांगणें आहे. असे कर वाढविण्याला जागा कोणती आहे व त्यांतून तीन कोटींची तूट कशी भरून निघेल तें पाहूं. युद्धाच्या वेळीं देखील ज्या जिनसांची निर्गत वाढली ते जिन्नस परराष्ट्रांना अत्यंत आवश्यक व बऱ्याच प्रमाणानें केवळ हिंदुस्थानांतूनच पुरविले जातात हें स्पष्ट आहे. असे जिन्नस म्हणजे तागाचें कापड, चहा, हाडें, कातडीं हे होत. युद्धामुळें इतर सर्व जिनसांची निर्गत बसली पण यांची निर्गत वाढली. तस्मात् या पदार्थांच्या निर्गतीवर पांच टक्के जकात बसविल्यास तागाच्या कापडावरील जकातीचें उत्पन्नच दीड कोटि, चहाच्या जकातीचें उत्पन्न पाऊण कोटि आणि हातकातड्यावरील जकात अर्धा कोटि मिळून तीन कोटि रुपयांची तूट भरून निघेल. यानंतर आयात मालावरील जकातींत साखरेवर जकात हल्लीं पांच टक्के आहे ती वाढवून दहा टक्के केल्यास निदान अर्ध्या

कोटीचें अधिक उत्पन्न अविच्छिन्न येईल; म्हणजे तीन कोटींची फडणारी तूट भरून निघून थोडीशी बचतच राहील. याखेरीज वाढत्या कर्जाचें वाढतें व्याज भागविण्या-करितां मोटारी, सायकली वगैरे चैनीचे जिन्नस आणि रंग, रासायनिक द्रव्यें, पेटंट औषधें वगैरेवरील करहि जरूर तर पांच टक्यानें वाढवावा. अशा रीतीनें खर्चांत काटकसर करून योग्य मालावर वाढता कर बसविल्यास गोरगरिबांच्या मिठावर कर लादावयास नको, आणि हलक्यासलक्या उत्पन्नावरील प्रांतीच्या कराचा बोजाहि वाढवावयास नको. यापेक्षां अधिक उत्पन्नाची जरुरी वाटल्यास प्रांतीच्या करांत सालीना ६ हजारांहून ज्यांचें उत्पन्न अधिक आहे त्यांच्यावर हल्लीं दररुपयामागें ५ पै कर आहे तो ६ पै करण्यांत यावा, म्हणजे जमाखर्चांत तूट न येतां उलट थोडीशीं शिल्लकच राहील. एतावता कर वाढवावयाचेच असतील तर हे कर वाढवा. हे न वाढवितां भलतेच दुसरे कर वाढविणें हें अत्यंत गैर-मुत्सद्देगिरीचें होईल. याउपर फडणवीस सर बुइल्यम् हे काय करतात तें पाहूं.

---

# नोटांचा सुकाळ आणि महर्घता ५

[ या लेखांतल्या विषयाची कल्पना मथळ्यावरूनच येण्यासारखी आहे. पहिल्या महायुद्धाच्या काळांत चलनी नोटांची वाढ बेसुमार झाली. त्या वेळीं नोटा बदलून चांदीचे रुपये मिळणें दुर्लभ झालें व त्याचा परिणाम बाजारावर होऊन महर्घता वाढत चालली. महायुद्धामुळें महर्घता वाढली हें सरकारचें मत कांहीं अंशानें खरें असलें तरी महायुद्ध संपल्यानंतरहि नोटांची भरच पडत चालल्यामुळें विनाकारण महागाई वाढत आहे, यास्तव सरकारनें नोटांची नवी भर घालणें थांबवावें असें या लेखांत प्रतिपादिलें असून, नोटांची वाढ व महर्घतेची वाढ यांचा परस्परसंबंध १८९२ सालापासूनचे आंकडे घेऊन सिद्ध केला आहे.]

### नोटा मोडविणें दुरापास्त झालें

अलीकडे बाजारांत नोटांचा सुळसुळाट झाला असून त्यांच्या मोबदला रोकड नाणें मिळत नाहीं; किंवा नाणें मिळण्याकरितां बराच बट्टा द्यावा लागतो व त्यामुळें गिऱ्हाइकांचें नुकसान होतें अशी ओरड सुरू झाली आहे. कांहीं दिवसां-पूर्वी ही तक्रार मध्यप्रांतांत विशेष होती; परंतु तेथें रोकड मिळण्याची सरकारनें तजवीज केल्यानें ती तक्रार कमी झाली. आतां ही आपत्ति मुंबई इलाख्यावर

( केसरी, दि. १४ जानेवारी १९१९ )

आली असून खुद्द मुंबई शहरांतहि करन्सी ऑफिसांतून नोटांचा मोबदला रुपये मिळण्याची पंचाईत पडूं लागली आहे; आणि नोटांचीं पुडकीं घेऊन नाणें मागणाऱ्यांची करन्सी ऑफिसांत इतकी गर्दी होत आहे कीं, तेथें बंदोबस्ताकरितां स्पेशल पोलीस पार्टी ठेवावी लागत आहे. मुंबई शहरांतच अशी स्थिति झाल्यावर इतरत्र कथा काय सांगावयास नकोच. सरकारी ट्रेझरींतून, पोस्टांतून, बँकेच्या शाखांतून जेथें सरकारला बटवडा करण्याचें कारण पडतें तेथें तेथें नोटांच्या बंडलाचाच भरणा दिसतो. नाणें मागितलें तरी मिळेनासें झालें आहे. ज्या वेळीं प्रथम अडीच रुपये व एक रुपया किंमतीच्या नोटा सुरू करण्यांत आल्या त्या वेळीं सदर नोटांच्या मोबदला रोकड नाणें कोणत्याहि ट्रेझरींतून मिळेल आणि पोस्ट-ऑफिसांतूनहि एका इसमास एका दिवशीं पांच रुपयांपर्यंत रोकड मिळण्याची तजवीज करण्यांत येईल असें सरकारनें जाहीर केलें, आणि त्या आश्वासनावरून त्या वेळीं नोटांचा प्रसार बिनहरकत सुरू झाला. परंतु आतां तें वचन बाजूसच राहून मुंबईच्या करन्सी ऑफिसखेरीज इतरत्र बहुतेक कोठेंहि नोटा देऊन हक्कानें नाणें मागतां येईनासें झालें आहे; आणि त्यामुळें लहान लहान पगारवाल्यांना व पेन्शनरांना नोटा मोडविण्याकरतां भूर्दंड भरावा लागत आहे. अशा रीतीनें अनेकांचें विनाकारण नुकसान होत असून शिवाय सरकारनें अशा जबरीनें नोटांचा प्रसार वाढविण्याचा यत्न केल्यानें महर्घतेंतहि भर पडत आहे. म्हणजे सरकार नोटांचा जसजसा प्रसार जारीनें करूं लागेल तसतसें लोकांचें बट्ट्याच्या पायीं आणि वाढल्या महागाईमुळें असें दुहेरी नुकसान होत आहे. नोटांची वाढ बेसुमार होऊन रोकड नाण्याची टंचाई भासूं लागल्यास नोटा मोडविण्याकरितां बट्टा द्यावा लागल्यानें, ज्यांना आपला सगळाच पगार नोटांच्या रूपानेंच मिळतो, रोकड मुळींच मिळत नाहीं, त्यांचें नुकसान होतें ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे. परंतु त्याबरोबरच इकडे महागाई कशी वाढते तें तितक्या सुलभपणें समजण्यासारखें नसल्यानें त्याचा थोडासा खुलासा करण्याचें योजिलें आहे.

### कृत्रिम नाणें फुगलें कीं महर्घता वाढते

हिंदुस्थानांत महागाई कां वाढूं लागली याची मीमांसा करण्याकरितां सात वर्षांपूर्वी सरकारनें एक बंगाली अधिकारी नेमले होते. त्यांनीं आंकड्यांचें पुष्कळसें गौडबंगाल करून नाण्यांची व नोटांची वाढ यांचा वाढल्या महागाईशीं संबंध नाहीं असें सिद्ध करण्यासाठीं पुष्कळ धडपड केली. परंतु हा संबंध इतका उघड उघड व नैसर्गिक आहे कीं, तो असले दहा रिपोर्ट लिहिले तरी नाहींसा होणें शक्य नाहीं. महायुद्धास सुरुवात झाल्यानंतर प्रथम दोन वर्षेपावेतों महागाई कांहीं विशेष वाढली नाहीं; परंतु त्यानंतर महागाईची कमान जी चढूं लागली ती कांहीं विलक्षणच. आणि अद्यापिहि सरकार जर नोटांचा जादा प्रसार करूं लागेल तर ती महागाई

अशीच वाढत जाईल. केवळ महायुद्धामुळें महर्घता वाढली नसून ती वाढण्याला कारण नोटांचा सुळसुळाट होय हा सिद्धान्त कराचीचे मि. मॅकनेनी यांनीं आपल्या 'High Prices' या पुस्तकांत सप्रमाण गणितशास्त्रोक्त पद्धतीनें सिद्ध केला आहे. देवघेवीचा व्यवहार वाढला तर वाढल्या नोटा किंवा नाणें यांची गरज भासूं लागते व तेवढ्या प्रमाणांत सालोसाल नोटांत किंवा नाण्यांत भर पडत गेली तरी तिचा बाजारभावावर परिणाम होण्याचें कारण नसतें. परंतु देवघेव किंवा व्यवहार पूर्वीं-इतकाच राहून बाजारांत नाण्यांचा किंवा नोटांचा सुळसुळाट झाला आणि तें नाणें किंवा नोटा कमी करण्याला कायदेशीर मार्ग नसला म्हणजे महागाई आपोआप वाढलीच पाहिजे. १८९३ सालापर्यंत टांकसाळींतून केव्हांहि चांदीचे रुपये पाडून घेतां येत असल्यामुळें आणि घरीं रुपये आटवून चांदी करतां येत असल्यामुळें नाण्यांची वाढ बेसुमार होऊं शकतच नव्हती. कारण तशी वाढ झाली कीं, लोकांनीं रुपये आटवून नाणें कमी केलेंच. परंतु ज्या दिवसापासून रुपयाची नैसर्गिक किंमत नाहींशी होऊन त्याला कृत्रिम किंमत आली त्या दिवसापासून हा स्वाभाविक मार्ग नाहींसा झाला आणि कृत्रिम रुपयांची भर पडतां पडतां बाजारांतलें नाणें इतकें फुगत चाललें कीं महागाई असह्य वाढूं लागली, आणि नवीन नाणें पाडणें बंद ठेवावें लागलें. नोटांच्या बाबतींत महायुद्धापूर्वीपर्यंत एक उत्तम निर्बंध अमलांत होता. तो असा कीं, चलनी नोटांची संख्या कितीहि वाढो त्यांतून १४ कोटींच्या नोटांखेरीज इतर नोटांच्या मोबदला रोकड शिल्लक खजिन्यांत पडून राहत असे. अर्थातच नोटांची वाढ कितीहि कोटींची झाली तरी त्यांच्याऐवजीं तितकें नाणें किंवा चांदी परत खजिन्यांत जाई व त्यामुळें बाजारांतील एकंदर चलन वाढत नसे व त्यामुळें महागाईंत भर पडत नसे. परंतु महायुद्धाच्या निमित्तानें सरकारनें तोहि निर्बंध काढून टाकला आणि बाजारांतील चलनांवर नोटांचा आणि नाण्यांचा असा दुहेरी मारा सुरू झाला; तेव्हां इतर सर्वच पदार्थांच्या किंमती वाढूं लागल्या यांत आश्चर्य तें काय?

१८९३ सालापासून नोटांच्या व कृत्रिम रुपयांच्या वाढीमुळें बाजारांतील चलन केव्हां, किती, कसें वाढलें व त्याचा बाजारभावावर परिणाम होऊन महर्गता कशी वाढली हें समजण्याकरितां पुढील कोष्टक पाहा :-

आंकडे लक्ष रुपयांचे आहेत

| सन | चांदीचें चलन | बिनमोबदला नोटा | महागाईची शेंकडेवारी |
|---|---|---|---|
| १८९२ | १२००० | ८०० | १०० |
| १८९३ | ११४०० | ८०० | ९६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८९४ | १०७०० | ८०० | ८५ |
| १८९५ | ११००० | ८०० | ८९ |
| १८९६ | १०६०० | १००० | ९९ |
| १८९७ | १०५०० | १००० | १२० |
| १८९८ | १०००० | १३०० | १०८ |
| १८९९ | १०७०० | २४०० | १०७ |
| १९०० | ११९०० | २१७० | १२६ |
| १९०१ | १२६०० | २१०० | १२० |
| १९०२ | ११६०० | २५०० | ११५ |
| १९०३ | ११७०० | २६०० | १११ |
| १९०४ | १२१०० | २८०० | ११० |
| १९०५ | १२८०० | ३१०० | १२० |
| १९०६ | १४६०० | ३३०० | १३४ |
| १९०७ | १५५०० | २२०० | १३८ |
| १९०८ | १४५०० | १४०० | १४७ |
| १९०९ | १५७०० | २५०० | १३८ |
| १९१० | १५७०० | २९०० | १३५ |
| १९११ | १६२०० | ४६०० | १४९ |
| १९१२ | १६३०० | ५३०० | १४७ |
| १९१३ | १७९०० | ५१६२ | |
| १९१४ | १८३०० | ५१५५ | |
| १९१५ | १८४५० | ५००४ | |
| १९१६ | २०५०० | ४८४९ | |
| १९१७ | २३१५० | ६१४८ | |
| १९१८ | २४००० | ९२५० | |

### चलन न वाढण्याला काय करावें

वरील कोष्टकावरून चांदीचें चलन व नोटा यांची ज्या वर्षी वाढ झाली त्या वेळीं किंवा त्याच्या पुढल्या सालीं महागाई कशी वाढली हें दिसून येईल. १८९७ आणि १९०० सालची महागाई केवळ दुष्काळामुळेंच होती. सबब तीं वर्षे सोडून दिल्यास १८९२ पासून १८९९ पर्यंत चलनांत वाढ झाली नाहीं व महागाईहि वाढली नाहीं. १९०५ सालापासून १९०८ सालापर्यंत ही वाढ विशेष होऊन महागाईहि शिगेस पोंचली. तेव्हां तीन वर्षेपर्यंत सरकारनें हात आंखडता घेतला आणि वाढत्या महागाईस आळा बसला. १९१३ पासून टांकसाळींतून फिरून वाढत्या प्रमाणावर रुपये निघूं लागल्यामुळें महागाई वाढूं लागली. नंतर युद्धारंभा पासून दोन वर्षेपर्यंत नाण्याची वाढ विशेष झाली नाहीं. पण गेल्या दोन वर्षांत नाणे व नोटा या जोडगोळीचा बाजारांत भरणा होऊं लागला, आणि महागाई बेसुमार

वाढूं लागली. १९१३ पासूनच्या महागाईची शेंकडेवारी सरकारी पत्रकांत दिली नसल्यानें वरील कोष्टकांत नमूद केली नाहीं; परंतु ही किती वाढली आहे याची प्रत्येकास जाणीव आहेच.

ही महागाई कमी होण्याकरितां सरकारनें परदेशांतून येणाऱ्या सोन्या-चांदीच्या आयातीवरील निर्बंध काढून टाकला पाहिजे. टांकसाळींतून खासगी व्यक्तीसहि सोनें किंवा चांदी दिल्यास सोन्याचांदीचें नाणें मिळण्याची सोय केली पाहिजे. स्वतः सरकारनें सोनेंचांदी खरेदी करून नाणें तूर्त पाडूं नये; आणि मुख्यतः नोटांचा प्रसार कमी होण्याकरितां नव्या नोटा काढण्याचें बंद ठेवून कोणत्याहि ट्रेझरीमधून नोटांच्या मोबदला चांदीचें किंवा सोन्याचें नाणें देण्याची बिनहरकत तजवीज करावी, त्याचप्रमाणें चांदीचें किंवा सोन्याचें नाणें आटविणें हा गुन्हा मानूं नये. अशी तजवीज न होईल तर ही महागाई अशीच वाढत जाईल आणि त्या योगानें ठराविक पगारवाल्या लोकांचें व मजुरांचें नुकसान होऊन पगार वाढविण्याकरितां हल्लीं मुंबईच्या गिरण्यांतून जसे संप चालू आहेत तसे संप ठिकठिकाणीं होतील.

---

## महाराष्ट्रीय व्यापारी परिषद ६

[ मुंबईंत डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशनमार्फत पहिली महाराष्ट्रीय व्यापारी परिषद श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि, संस्थान औंध, यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्याचें ठरलें. ती परिषद भरण्यापूर्वीच हा लेख लिहिलेला असून, महाराष्ट्रीयांचें पाऊल व्यापारांत पुढें पडण्याला आणि तेथें तें स्थिर होण्याला काय काय योजना केल्या जाव्या याविषयीं अनेक उपयुक्त व विधायक सूचना या लेखांत केल्या आहेत. ]

**अर्थैरर्थाः प्रबध्यन्ते गजाः प्रतिगजैरिव ।**

**– कौटिलीय अर्थशास्त्र**

**डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशनची कामगिरी**

आठ वर्षांपूर्वी मुंबईस स्थापन झालेल्या ' डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशन ' मार्फत येत्या नोव्हेंबरच्या ११ ते १३ तारखांस मुंबापुरींत ' महाराष्ट्रीय व्यापारी परिषद '

( केसरी, दि. १७ ऑक्टोबर १९२२ )

भरविण्याचें ठरलें असून, त्या कार्याकरितां कार्यकारी मंडळहि निवडलें गेलें आहे. मुंबईचा व्यापार कितीहि मोठा असला तरी त्यांत महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांचा भाग अत्यल्प आहे आणि महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची संख्याहि तितकीच छोटी आहे. ज्या डेक्कन मर्चंट्स् असोशिएशनच्या विद्यमानें ही परिषद भरविली जाणार आहे त्या संस्थेच्या सभासदांची संख्या अवघी १२५ आहे! तथापि कांहीं वर्षांपूर्वी जेथें हाताच्या बोटावर मोजण्याइतकीहि दक्षिणी व्यापारी मंडळी नव्हती तेथें एवढी संख्या देखील निराशाजनक मानण्याचें कारण नाहीं आणि ही संख्या दिवसेंदिवस वाढत जाणार अशीं सुचिन्हें दिसत आहेत. येत्या नोव्हेंबरांत जी 'महाराष्ट्रीय व्यापारी परिषद' भरविण्यांत येणार आहे तिचीहि या सुचिन्हांतच गणना केली पाहिजे.

मुंबईतील दक्षिणी समाजांतील व्यापारविषयक प्रवृत्ति वाढवून त्या समाजाच्या बुद्धिमत्तेचा ओघ उद्योगधंद्याकडे वळविण्याच्या हेतूनें तेथें १९१४ सालीं जी 'डेक्कन मर्चंट्स् असोशिएशन' स्थापन झाली तिनें गेल्या आठ वर्षांत बरीच कामगिरी केली आहे. उद्योगधंद्यांची माहिती सुलभपणें होण्याकरितां १९१६ सालीं औद्योगिक वाचनालय उघडण्यांत आलें, आणि कै. लोकमान्यांच्या निधनानंतर त्यांचें स्मारक म्हणून त्या वाचनालयाला 'लो. टिळक टेक्निकल लायब्ररी'ची जोड देण्यांत आली. त्याचप्रमाणें या संस्थेनें सुप्रसिद्ध तज्ज्ञांकडून व्यापारासंबंधीं व्यावहारिक विषयांवर व्याख्यानें करवून नवीन पिढींत व्यापाराची अभिरुचि उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय २५ हजार रुपयांचे शेअर्स काढून 'डेक्कन मर्चंट्स् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी'हि स्थापिली, आणि आतां तिचें भांडवल एक लक्षापर्यंत वाढवून तिला लवकरच बँकेचें स्वरूप देण्यांत येणार आहे.

संस्थेनें आतांपर्यंत जें कार्य केलें त्या योगानें संस्थेस स्थैर्य व धैर्य येऊन यापुढें महाराष्ट्रांत उद्योगधंद्यांची प्रगति करणें, उत्पादक धंदे हातीं घेण्यांत येणाऱ्या अडचणींचा परिहार करण्याचीं साधनें निर्माण करणें, जिल्हानिहाय व्यापारी संघ स्थापून व्यापारविषयक माहिती एकत्र करणें, कारखानदार व व्यापारी यांची जंत्री तयार करणें, व्यापारी वाङ्मय निर्माण करणें, होतकरू कारखानदाराला धंदेविषयक सल्ला देणें, दक्षिणी व्यापाऱ्यांतील वादग्रस्त प्रश्नांचा पंचामार्फत निकाल लावण्याची सोय निर्माण करणें इत्यादि अनेक महत्त्वाचीं कामें अंगावर घ्यावयाचीं आहेत; व तत्पूर्वी विचारविनिमय व्हावा या हेतूनेंच ही व्यापारी परिषद भरविण्यांत येत आहे असें दिसतें.

### विचारविनिमय करणें आवश्यक

या परिषदेच्या अध्यक्षस्थानीं श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांची योजना करण्याचें जें कार्यकारी मंडळानें ठरविलें आहे तें अगदीं योग्य आहे.

आमच्या संस्थानिकांत उद्योगधंद्याकडे लक्ष देणारे व त्यांच्या अभिवृद्धीसाठीं सतत झटणारे संस्थानिक क्वचितच आढळतात. पण श्रीमंत बाबासाहेब मिरजकरांप्रमाणें श्रीमंत औंधकरांचेंहि या कार्याकडे पूर्वीपासूनच लक्ष आहे. त्यांनीं आजपर्यंत अनेक कारखानदारांना आपल्या संस्थानांत आश्रय दिला असून, शिवाय खुद्द औंध येथें एक रासायनिक प्रयोगशाळा स्थापून तींत औद्योगिक व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे शोध लावण्याची सोय करून ठेविली आहे आणि तिचा त्या संस्थानच्या प्रजाजनांना मोठा उपयोगहि होत आहे. अशा रीतीनें श्रीमंत पंतप्रतिनिधींच्या ठायीं संपत्ति, सत्ता व सक्रिय सहानुभूति यांचा त्रिवेणीसंगम झाला असल्यानें त्यांच्या अध्यक्षत्वाखालीं ही परिषद यशस्वी रीतीनें पार पडेल यांत संशय नाहीं. तथापि ज्या महाराष्ट्रीय व्यापारी वर्गाच्या हिताकरितां हा सारा खटाटोप करण्यांत येत आहे त्या व्यापारी वर्गाच्या दूरदर्शी प्रतिनिधींनीं यांत उत्सुकतेनें भाग घेतला तरच हा कार्यक्रम खरा कार्यकारी होऊं शकेल. दक्षिणी समाजांत आधीं सर्वच बाबतींत औदासीन्य दिसून येतें. त्यांतहि त्यांच्यांतून वाणिज्यवृत्तीचा लोप होऊन कित्येक शतकें लोटलीं आहेत, व आजमितीला महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व व्यापार महाराष्ट्रेतर वैश्य वर्गानें आटोपला आहे. यामुळें दक्षिणी व्यापारी मंडळींतील महत्त्वाकांक्षाच नष्टप्राय झाली असून, महाराष्ट्रेतर व्यापारी वर्गाकडून जो कांहीं थोडाबहुत व्यापाराचा वांटा आपल्या हातीं दिला जाईल तेवढ्यावरच संतुष्ट राहण्याइतकी त्यांची वृत्ति परावलंबी बनली आहे. कोणत्याहि व्यापाराच्या, कारखान्याच्या किंवा उद्योगधंद्याच्या मुळाशीं हात घालण्याचें धाडसच त्यांस करवत नाहीं. असली पंगूपणाची व परोपजीवी वृत्ति बदलून योग्य महत्त्वाकांक्षेचें वारें अंगांत खेळूं लागण्यास आमच्या या व्यापारी बंधूंनीं व्यापारी उलाढालीच्या उगमस्थानांत, म्हणजे मुंबापुरींत, एकत्र जमून विचारविनिमय करणें आवश्यक आहे.

महाराष्ट्रीय लोकांतून वैश्य वृत्तीची परंपरा कित्येक शतकांपासून लुप्त झाल्याकारणानें आजमितीला दक्षिणी व्यापाऱ्यांस डोकें वर काढणें कठीण झालें आहे. इतर अनेक अडचणी आहेतच, पण त्यांत भांडवलाची अडचण ही मुख्य होय. नवीन हत्ती धरण्याला ज्याप्रमाणें शिकविलेले पाळीव हत्ती जवळ असावे लागतात, त्याप्रमाणें नवी संपत्ति मिळविण्याला प्रथम थोडें तरी घरचें भांडवल लागतें, या अर्थाचें जें आर्य चाणक्याचें वचन शिरोभागीं दिलें आहे तें अक्षरशः खरें आहे. पारसी, गुजराथी, वाणी, मारवाडी, बोहरी, कच्छी वगैरे जातींतील तरुण व होतकरू व्यापाऱ्यांना स्वतःच्या घरचें भांडवल असतें; वडिलांनीं कमविलेला नांवलौकिक आणि जोडलेले स्नेहसंबंध त्यांच्या उपयोगी पडतात; घरच्या पेढीवर किंवा दुकानावर आणि ममताळू आप्तांच्या नजरेखालीं प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण लाभलेलें असतें; आणि जेथें घरचें भांडवल नसेल तेथें त्याला मुंबईतील स्वजातीय बड्या व्यापाऱ्यांकडून बरीच सवलत मिळते. यामुळें त्या जातींतील

होतकरू व्यापाऱ्यांचा मार्ग सुगम होतो. दक्षिणी व्यापाऱ्यांस सर्वच गोष्टी प्रतिकूल. 'ना भांडवल, ना पत, ना अनुभव, ना ओळख; सगळाच नन्नाचा पाढा!' ही स्थिति सुधारून होतकरू दक्षिणी व्यापाऱ्यांचा व्यापारांत शिरकाव कसा होईल, याचा विचार महाराष्ट्रीय परिषदेनें मुख्यतः केला पाहिजे.

## भांडवल कसें मिळेल?

महाराष्ट्रीय व्यापारी परिषद भरविण्यांत जे अनेक उद्देश आहेत त्यांत उत्पादक धंद्यांना खेळतें भांडवल पुरविण्याकरितां सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक स्थापणें हाहि एक उद्देश नमूद आहे. नवीन होतकरू कारखानदाराच्या तात्पुरत्या गरजा भागविण्यापुरतें भांडवल त्यांस मिळण्याची सोय झाली तर मोठेंच कार्य झाल्याप्रमाणें होईल. परंतु हें साध्य होण्याला बँकेचें भांडवल मोठें पाहिजे, आणि त्या बँकेंत दीर्घकालीन मुदतीच्या ठेवीहि मोठ्या प्रमाणांत आल्या पाहिजेत. एवढी उभारणी होईपर्यंत तूर्त डेक्कन मर्चंट्स् असोसिएशनच्या क्रेडिट सोसायटीचें भांडवल वाढून यांतून त्या संस्थेच्या सभासदांस मदत करण्यांत यावी. मोठ्या प्रमाणांत भांडवल जमविण्याकरितां टाटा इंडस्ट्रिअल बँकेप्रमाणें बँक स्थापन करण्याचें ध्येय डोळ्यापुढें ठेवावें, पण तें जर लवकर अमलांत न येईल तर लाइफ इन्शुअरन्स करणाऱ्या कंपनीची स्थापना करून त्यांतून नवीन कायद्यान्वयें जेवढें भांडवल इकडे उपयोगांत आणतां येईल तेवढें आणावें. हल्लीं मुंबई इलाख्यांत दक्षिणी लोकांनीं चालविलेली साताराची 'वेस्टर्न इंडिया लाइफ अॅशुअरन्स' एवढीच काय ती आयुष्याचा विमा उतरणारी कंपनी आहे. अशा कंपन्यांच्या अभावीं महाराष्ट्रीयांना परप्रांतीय कंपन्यांचाच आश्रय घ्यावा लागतो. तेव्हां तशी एखादी मोठ्या प्रमाणावर विमा कंपनी स्थापन केल्यास महाराष्ट्रीयांची अडचण दूर होईल आणि व्याऱ्यांसहि तिजपासून भांडवलाचें साहाय्य मिळूं शकेल.

## यंत्रांच्या प्रदर्शनापासून प्रारंभ

भांडवलाच्या अभावाखेरीज इतर ज्या कांहीं उणीवा आहेत त्या दक्षिणी व्यापाऱ्यांस इतरांपेक्षां लवकर आणि थोड्या परिश्रमानें दूर करतां येतील. महाराष्ट्रीय व्यापारी वर्ग इतरांच्या मानानें अधिक सुशिक्षित असल्याकारणानें त्याला परराष्ट्रांतून ज्ञानविज्ञान संपादन करणें, रोजच्या रोज नवीन लागणाऱ्या शोधाचा फायदा घेणें, नवीन तऱ्हेची व किफायतशीर अशीं यंत्रें जेथें मिळतील तेथून आणविणें वगैरे गोष्टींचा फायदा इतर व्यापाऱ्यांपेक्षां कमी श्रमानें घेतां येईल. त्याचप्रमाणें या देशांतील व परदेशांतील व्यापार व उद्योगधंदे यासंबंधीं चालू वाङ्मय वाचून आणि ठिकठिकाणचीं प्रदर्शनें पाहून, परिषदांना हजर राहून, त्यांना आपल्या ज्ञानांत वारंवार भर टाकून तें ताजें राखतां येईल. परंतु या गोष्टीहि एकट्यानें स्वतःच्या ऐपतीप्रमाणें करीत राहण्यापेक्षां संघामार्फत झाल्यास यांत वेळेचा अपव्यय कमी

होऊन खर्चाचीहि काटकसर करतां येईल. याकरितां महाराष्ट्रीय व्यापारी परिषदेनें दक्षिणी व्यापाऱ्यांच्या सोयीकरितां संघशक्तीनें असल्या सर्व प्रकारच्या साधनांची तरतूद करावी. लो. टिळक टेक्निकल लायब्ररीला जोडूनच स्वदेशांतील व परदेशांतील विविध कारागिरीच्या यंत्रांचे छोटे नमुने जर ठेवून दिले तर नवीन कारखाने काढूं इच्छिणाऱ्यांना यंत्राची माहिती होईल, आणि ज्याला साधन असेल तो तसलीं यंत्रें आणवून कारखाना उभारूं शकेल. परदेशांतून येणाऱ्या प्रत्येक वस्तूसंबधानें ती कोणत्या देशांत होते, तिला कच्चा माल कोणता लागतो व तो कोठें पैदा होतो, तिला पक्क्या मालाचें रूप देण्याला यंत्रसामुग्री किती लागते, तीं यंत्रें कोणत्या देशांत तयार होतात, त्यांना किंमत काय पडते आणि या यंत्रावर रोजचा माल किती तयार होतो इतकी सविस्तर माहिती डेक्कन मर्चंट्स् असोसिएशनच्या सभासदांस केव्हांहि उपलब्ध असली पाहिजे. बँक काढणें व भांडवल पुरविणें हीं कार्यें जोखमीचीं व कालांतरानें होणारीं असलीं तरी ' टेक्निकल लायब्ररी ' वाढविणें आणि मशिनरी-मॉडेल्स् म्यूझिअम स्थापन करणें व्यवहार्य आहे; आणि महाराष्ट्रीय व्यापारी परिषदेनें पहिल्याप्रथम हेंच कार्य आपल्या शिरावर घ्यावें.

नवे कारखाने उभारणें आणि परदेशी मालाच्या तोडीचा व किंमतींत स्वस्त असा माल तयार करणें हें भांडवलाच्या अभावीं दिनावधीवर पडलें तरी, विद्यमान देशी कारखान्यांतील मालाचा खप देशांत जारीनें सुरू करण्याकरितां विशिष्ट मालाची सोल एजन्सी घेणें आणि आपल्या सभासदांमार्फत प्रांताप्रांतांतून पोट एजन्सीज स्थापन करणें हें कार्य डेक्कन मर्चंट्स् असोसिएशनला अल्पावधींत साध्य होईल. या एजन्सीच्या व पोट-एजन्सीच्या जोरावरच या असोसिएशनला महाराष्ट्रांत आपलें जाळें पसरून कार्याचा पसारा वाढवितां येईल आणि सभासदांची संख्या वाढवून द्रव्यबलहि संपादन करतां येईल.

## परदेशांत एजन्सीज स्थापणें

परदेशांत शिक्षण संपादण्याकरितां शिष्यवृत्त्या देण्यासाठीं फंड जमवावा असाहि परिषदेचा उद्देश असल्याचें तिच्या प्रसिद्ध झालेल्या कार्यक्रमावरून दिसून येतें. परंतु हें कार्य अत्यंत खर्चाचें असून शिवाय व्यापारी संस्थेनें तें अंगावर घेण्याच्या लायकीचें नाहीं. असली कामगिरी या संस्थेनें स्वतःकडे न घेतां ' हिंदु एज्युकेशन ' फंडासारख्या संस्थेकडेच ती सोंपवून द्यावी; मात्र त्या फंडाला या संस्थेनें द्रव्यद्वारा साहाय्य केल्यास त्याच्या मोबदला आपले विद्यार्थी निवडून पाठविण्याचा अधिकार तिनें स्वतःकडे घेऊन ठेवावा; म्हणजे विशिष्ट विषयांतील तज्ज्ञ या देशांत दुष्प्राप्य असल्यास ते तयार करून आणण्याचें साधन संस्थेच्या हातीं राहील. विद्यासंपादन करण्याकरितां परदेशीं विद्यार्थी रवाना करण्यापेक्षां या संस्थेनें आपले लायक व्यापारी एजंट परदेशांत जाऊन स्थायिक राहण्याकरितां

पाठवावे; आणि त्यांच्या मार्फत आपल्या व्यापाराचा परदेशांत प्रसार करावा. ज्याप्रमाणें मुंबईतील व्यापारांत पारसी, गुजराथी, कच्छी, मेनन, बोहरी वगैरे व्यापाऱ्यांनीं बराच मोठा भाग व्यापला आहे त्याप्रमाणें आफ्रिका, इराण, मेसोपोटेमिया, चीन, सयाम, सिलोन वगैरे देशांशीं होणाऱ्या हिंदी व्यापाराच्या एजन्सीचाहि बराच मोठा भाग त्यांनीं आपल्या एजंटांमार्फत हस्तगत केला आहे. या किफायतीच्या जिवंत झऱ्यांतलें थोडेंबहुत जीवन आपल्या हातीं मिळवून घेऊन स्वतःची व्यापारी तृष्णा शांत करण्याकरितां डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशननेंहि स्वतःचे कावडीवाले ठिकठिकाणीं विखुरले पाहिजेत. आजमितीला परदेशांत जाण्याला उत्सुक असलेल्या बुद्धिवान् व धाडसी तरुणांची उणीव भासणार नाहीं. मात्र त्यांना तिकडे रवाना करण्यापूर्वी त्यांस व्यापारी शिस्तीचें वळण लावून दिलें पाहिजे.

अशा रीतीनें महाराष्ट्रीय व्यापारी परिषदेनें हातीं घेण्याजोगीं अनेक कार्यें असून त्यासंबंधानें परिषदेंत चर्चा झाल्यावर डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशननें वर्षभर पुढें चालविण्यासारखीं कामेंहि अनेक आहेत. त्यांतून परिषदेंत जीं जीं कामें तूर्त हातीं घेण्याचा विचार बहुमतानें ठरेल तीं तीं कामें पुढें वर्षभर डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशन चालू ठेवील यांत शंका नाहीं. तथापि त्या संस्थेला तें कार्य करण्यास उत्तेजन येण्याला व्यापारी परिषदेस मुंबई शहरांतील आणि सर्व महाराष्ट्रांतील दक्षिणी व्यापाऱ्यांची शक्य तितकी सक्रिय सहानुभूति मिळाली पाहिजे. यास्तव परिषदेचें महत्त्व जाणून ठिकठिकाणच्या दक्षिणी व्यापारी मंडळींनीं आपले प्रतिनिधि पाठवून आणि निबंधद्वारा आपले विचार कळवून परिषदेच्या कार्यास साहाय्य करावें. परिषदेला श्रीमंत पंतप्रतिनिधींसारखे आपल्या संस्थानच्या उद्यमाभिवृद्ध्यर्थ अहर्निश झटणारे अध्यक्ष सुदैवेंकरून लाभले आहेत. त्यांचा व त्यांच्या संस्थानांतील तज्ज्ञांचा पोक्त सल्ला या कामीं मिळेलच. त्याचा योग्य निष्कर्ष काढून महाराष्ट्रीय व्यापारी मंडळींनीं आणि डेक्कन मर्चंट्स् ॲसोसिएशननें त्यास अनुसरून आपलें धोरण आंखावें. म्हणजे आज जो दक्षिणी गृहस्थांचा व्यापाराच्या टापूंत अत्यल्प क्षेत्रांत कसाबसा प्रवेश होत आहे तो यापुढें सर्वत्र सुलभ प्रवेश होईल; आणि दक्षिणी व्यापारी इतर व्यापाऱ्यांच्या जोडीनें मुंबई इलाख्यांतील व्यापाराची, विशेषतः देशी कारखान्यांतील मालाची, उलाढाल करूं लागतील.

## हेले गेले पण घाण गेली नाहीं ७

[ महायुद्धाच्या समाप्तीनंतर कांहीं वर्षे युक्तप्रांताचे भाजी गव्हर्नर लॉर्ड हेले हे हिंदुस्थान सरकारचे फडणीस म्हणून काम करीत होते. त्यांच्या कारकीर्दीत खर्चाची वाढ बेसुमार होऊन अंदाजपत्रकांत तूट येऊं लागली व कर्जाचा बोजा वाढूं लागला. त्यानंतर ही परिस्थिति सुधारण्याकरितां विलायतेहून सर बेसिल ब्लॅकेट हे हिशेबी कामाचे तज्ज्ञ, फडणिसीच्या कामावर आले. इकडे येतांच त्यांनीं आपलें नवें अंदाजपत्रक तयार केलें; पण एवढ्या थोड्या अवधींत आर्थिक परिस्थिति सुधारणें शक्य नसल्यानें त्यांनींहि आपल्या अंदाजपत्रकांत पोस्टाचे, रेल्वेचे व जकातीचे दर वाढलेले कायम ठेवलेच; पण त्याशिवाय मिठाचा कर वाढविण्याचाहि आग्रह धरला. या योजनेला उद्देशून 'हेले गेले, पण घाण गेली नाहीं' हें या अग्रलेखांत दाखविलें आहे. ]

### दुर्वार्ता खऱ्या ठरल्या

सुवार्ता नेहमीं खरी होतेच असें नाहीं, पण दुर्वार्ता सहसा खोटी ठरत नाहीं; सुस्वप्नाचा प्रत्यय येवो वा न येवो, दुःस्वप्नाचा ठोकताळा मात्र हटकून येतोच; हा जो रोजच्या व्यवहारांतला अनुभव त्याचेंच प्रत्यंतर यंदाच्या बजेटांतहि चांगलें येत आहे. ता. ६ फेब्रुवारीच्या 'केसरीं'त 'चालू बजेट व भावी बजेट' या मथळ्याखालीं आम्हीं या विषयाचा ऊहापोह करून चालू बजेटांत मोठी तूट येणार असें भाकित केलें होतें आणि त्यापुढें असें म्हटलें होतें कीं, "नवे फडणवीस शहाणे असतील तर ते मिठावरील कर वाढविण्याचें धाडस करणार नाहींत; यदाकदाचित् त्यांच्या हातून तशी चूक झाली तर मवाळांतले मवाळ लोकनियुक्त प्रतिनिधीहि हा कर वाढविण्याला विरोध करून ती सूचना नामंजूर करतील." या अंदाजाप्रमाणें तूट तर आली, आणि नव्या फडणविसांनीं करूं नये ती चूक करून मिठाचा करहि एकदम दुप्पट करण्याचें जाहीर केलें. एतावता या दोन दुर्वार्ता खऱ्या ठरल्या; आतां लोकप्रतिनिधि या करवाढीला विरोध करून ती सूचना नामंजूर करतात कीं नाहीं, याचा अनुभव लवकरच येईल.

### उतरत्या पैदासीचा सिद्धान्त

गतसालच्या हेलेसाहेबांच्या कच्च्या अंदाजांत आणि आतांच्या दुरुस्त अंदाजांत इतका फरक कां पडला हें समजणें कांहीं फारसें कठीण नाहीं. इंग्लंडसारख्या

(केसरी, दि. ६ मार्च १९२३)

संपन्न राष्ट्रांत कोणताहि कर वाढविला कीं, उत्पन्नाहि तितक्याच प्रमाणांत वाढतें. पण दरिद्री हिंदुस्थानांत कराच्या आकारणीची कमाल मर्यादा उल्लंघून गेल्यामुळें त्या मर्यादेच्या पलीकडे कर वाढवितांच अर्थशास्त्रांतील 'उतरत्या पैदासीच्या' सिद्धान्तान्वयें उत्पन्न सम प्रमाणांत न वाढतां त्याचें प्रमाण कमी कमी होऊं लागतें. याच कारणामुळें रेल्वेचे, पोस्टाचे, तारेचे व जकातीचे दर वाढविले तरी त्या त्या प्रमाणांत उत्पन्न वाढलें नाहीं. उलटपक्षीं वाढत्या उत्पन्नाच्या अंदाजाबरहुकूम वाढविलेला खर्च मात्र डोक्यावर बसला, आणि बजेटाला दिवाळखोरीपणाचें स्वरूप आलें. गेलीं पांच वर्षें ही दिवाळखोरी अशीच सुरू असून तेवढ्या अल्पावधींत उत्पन्नापेक्षां खर्चाचा आंकडा १०० कोटींनीं वाढला! सर बेसिल ब्लॅकेट आपल्या बजेटांत म्हणतात, "महायुद्धापूर्वीं असल्या दिवाळखोरीनें कोणाहि फडणविसाचें धाबें दणाणलें असतें आणि हा डोईजड होत जाणारा कर्जबाजारीपणा टाळण्यासाठीं फडणविसांनीं धडपड केली असती. परंतु महायुद्धापासून प्रत्येक राष्ट्राच्या जमाखर्चाची अशीच स्थिति झाली असल्यामुळें 'अतिपरिचयादवज्ञा' या म्हणीस अनुसरून कोणासहि कर्जाची लाज वाटेनाशी झाली आहे! पण असा बेफिकिरीपणा वाढणें हें सुचिन्ह नसून त्याचा परिणाम अखेरीस सावकारांना भोगावा लागेल. पण सरकारचे सावकार म्हणजे प्रजाजनच असल्यानें सरकार आपली दिवाळखोरी झाकण्याकरितां आपल्या या सावकारांवरच नवे नवे कर लादून आणि कृत्रिम किंमतीचें नाणें आणि कागदी चलनी नोटा यांचा सुकाळ करून दुहेरी नुकसान करतें."

गेल्या पांचसात वर्षांत हिंदुस्थान सरकारचें कर्ज किती वाढलें आणि कर किती चढले तें पाहिलें म्हणजे सर बेसिल ब्लॅकेट यांच्या म्हणण्याचा प्रत्यय येतो. महायुद्धापूर्वीं हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्ज ४०० कोटि रुपये होतें आणि तें बहुतेक सर्व कर्ज रेल्वे व कालवे यांसारख्या उत्पादक कार्याकडेच खर्च झालेलें असून त्यांवरील व्याजाचा दरहि ३½ टक्केच असल्यानें तो बोजा अगदींच हलका वाटत होता. आजमितीला हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्ज ८२४ कोटि असून त्यांतलें ५५७ कोटि उत्पादक कामाकडे व बाकीचें २६७ कोटि रुपये कर्ज अनुत्पादक कामाकरितां असून कांहीं रकमांवरील व्याजाचा दर ७ टक्क्यांपर्यंत चढलेला आहे. यामुळें हिंदुस्थानास केवळ व्याजाच्या पायींच ३९ कोटि रुपये भरणा करावा लागतो. यामुळें ऑजियस राजाच्या गोठ्यांतील घाण काढून टाकण्याची कामगिरी हरक्युलिसला जितकी अवघड गेली, तितकीच हेलेशाहींतील घाण धुवून काढण्याचीहि कामगिरी सर बेसिल ब्लॅकेट यांस कठीण जात आहे. त्यामुळें हेलेशाही गेली तरी नवें बजेट त्या घाणीनें दूषित झालेलें आहेच; आणि पूर्वी होऊन गेलेल्या चुकांचा पाढा वाचणें सोपें असतें, पण स्वतः त्या चुका टाळणें तितकें स्वाधीन नसतें, याचाहि ब्लॅकेटसाहेबांस अनुभव येऊं लागला आहे.

### काटकसर करण्यांत अडचण

जुन्या चुकांची पुनरावृत्ति करावयाची नाहीं, अर्थातच खर्चापेक्षां जमा अधिक आलीच पाहिजे, असा संकल्प सोडून नवे फडणवीस कामाला लागले. त्यांनीं आपल्या मदतीकरितां इंचकेपसाहेबांस पाचारण केलें आणि लॉर्ड इंचकेप यांनींहि दोन महिन्यांत मोठ्या तडफीनें काम करून लष्करी खर्चांत १० कोटि आणि मुलकी खात्यांत ८½ कोटि मिळून १८½ कोटींची काटकसर सुचविली. गतवर्षीच्या बजेटांत सराबरीनें तितकीच तूट येत असल्यानें इंचकेप-कमिटीची शिफारस मान्य करून खर्चाची छाटाछाट केली असती तर जमाखर्चाची तोंड-मिळवणी होऊन नवीन कराचा बोजा लादण्याचें कारण पडलें नसतें. पण हेलेसाहे-बांनीं करून ठेवलेली घाण इतकी सहजासहजीं दूर करतां येणें शक्य झालें नसावें; शिवाय पिढ्यानुपिढ्या जांवईपणा भोगलेले सिव्हिल व मिलिटरी कामगार ब्लॅकेट-साहेबांस इतक्या साळसूदपणानें थोडीच दाद देणार आहेत! त्यांनीं सतरा बयादी व अठरा वायदे सांगून खर्चाची कात्री अडवून धरली असेल. त्यामुळें ब्लॅकेट-साहेबांस लष्करी खर्च ५¾ कोटि आणि मुलकी खर्च ६¼ कोटि मिळून १२ कोटि खर्च कमी करून तेवढ्यावरच समाधान मानून घ्यावें लागलें. इंचकेप-कमिटीनें शिफारस केल्याप्रमाणें लष्करी खर्चांत १० कोटींची आणि इतर खात्यांत ८॥ कोटींची संपूर्ण काटकसर यंदा तर नाहींच, पण पुढील सालच्या बजेटांत तरी अंमलांत आणूं एवढेंहि आश्वासन नवे फडणवीस देऊं शकत नाहींत! उलटपक्षीं एकदां वाढलेला खर्च तोडण्याला कालावधि लागणार आणि लष्करी खर्चाच्या संबंधांत तर ब्रिटिश सरकारशीं पत्रव्यवहार करून त्यांची संमति घेतली पाहिजे असें सांगून दिल्ली सरकारचा परावलंबीपणा ते चव्हाट्यावर मांडीत आहेत!

परस्वाधीनतेचा भाग वगळला आणि सर बेसिल यांच्या स्वाधीन असलेल्या गोष्टींपुरतांच विचार केला तरी सर बेसिल यांनीं आपली कामगिरी यथातथाच केली असें म्हणणें प्राप्त आहे. त्यांनीं 'दिवाळखोर' बजेटाविषयीं आपली पूर्ण नापसंती प्रदर्शित करून 'आपलें अंथरूण पाहून पाय पसरावे' असा पोक्त नियम सांगितला खरा; पण इंचकेप-कमिटीचा त्यांना भरपूर पाठिंबा नसता तर ब्लॅकेटसाहेबांच्या शहाणपणाची मजल कोरड्या उपदेशांपलीकडे फारशी जाऊं शकली नसती.

### रेल्वे व सरहद्द यांतील खर्चांत काट नाहीं

ब्लॅकेटसाहेबांच्या बजेटांतील मुख्य दोष १९२३-२४ सालच्या अंदाज-पत्रकांतहि ढळढळीतपणें व्यक्त होत आहे. सालअखेर अंदाजाहून प्रत्यक्ष जमा कमी येऊं नये या उद्देशानें त्यांनीं हात फारच आंखडता धरला आहे. रेल्वे, कस्टम्स् व पोस्ट यांचे दर एकदम वाढल्यामुळें चालू सालीं जरी अंदाजाइतकी जमा झाली नाहीं तरी पुढील सालीं ती जमा चढत जाईल त्याकरितांच नवीन कर बसविण्याचें

कारण नाहीं असें आम्ही ता. ६ फेब्रुवारीच्या अंकांत प्रतिपादन केलें होतें व ब्लॅकेटसाहेबांसहि तो अनुभव येईलच. खर्चाच्या बाजूसहि त्यांनीं बराच ढिलेपणा दाखवून नोकरशाहीस आपला उधळेपणा चालू ठेवण्यास जागजागीं सवड दिली आहे. इंचकेप कमिटीनें केलेल्या शिफारसी एकदम अमलांत आणून त्यांनीं एकोणीस कोटींची बचत केली नाहीं. कदाचित् इतक्या अल्पावधींत त्यांना प्रत्येक खात्यांतील बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष पुरविण्यास फुरसत झाली नसेल; परंतु निदान ढोबळ दोष तरी त्यांनीं दूर करावयाचे होते. रेल्वेकरितां सालीना ३० कोटींचा स्वतंत्र तनखा त्या खात्यानें तोडून घेतला आहे. तथापि एका वर्षांत इतकी रक्कम खर्च होत नाहीं. चालू सालीं तर संकल्पापेक्षां ८ कोटि खर्च कमी झाला. असें असतां पुढील सालाकरितां यंदाच्या इतकाच म्हणजे २२ कोटि खर्च मंजूर करण्याच्या ऐवजीं त्यांनीं ३८ कोटि खर्च करण्याला मुभा दिली; आणि इंचकेप-कमिटीनें यासंबंधांत जो नियम घालून दिला आहे तो पाळला नाहीं. लष्करी खर्चांत तर वझिरिस्थानच्या मोहिमेकरितां ४॥ कोटि रुपये त्यांनीं बिनहरकत मान्य केले आहेत. आधींच लष्करी खर्चाविरुद्ध सर्वत्र ओरड चालू आहे. त्यांतून वझिरिस्थानच्या मोहिमेचा हा खर्च म्हणजे तर निवळ समुद्रांत पैसा ओतल्यासारखा आहे. गेल्या चार वर्षांच्या अनुभवानें 'लंडन टाइम्स'-सारख्या साम्राज्यवादी पत्रांनींहि आतां वझिरिस्थानांतून आपलें चंबूगवाळें आटोपावें असा पोक्त सल्ला दिला आहे. इंचकेप-कमिटीनेंहि तशीच शिफारस केली आहे. असें असून नव्या फडणविसांनीं काटकसरीची कात्री वझिरिस्थानच्या बजेटावर चालविली नाहीं! कायदेकौन्सिलास लष्करी बजेटावर मत देण्याचा अधिकार असता तर फडणविसांच्या या हयगयीचें आम्हांस महत्त्व वाटलें नसतें. परंतु कायदेकौन्सिलचा हात तेथपर्यंत पोंचूं शकत नसल्यानें ही कामगिरी सर बेसिल यांनींच करावयास हवी होती.

नवीन कर टाळण्याला मोकळे असलेले दोन मार्ग हातचे घालविल्यावर जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं नवीन कर शोधल्याविना त्यांस गत्यंतरच राहिलें नाहीं. आणि उत्पन्नाची खात्रीची बाब म्हणून त्यांची मिठाच्या करावर दृष्टि गेली, आणि ४॥ कोटींची तूट भरून काढण्याला आवश्यक तेवढा, म्हणजे भरपूर २॥ रुपयांचा, कर लादण्याचा त्यांनीं संकल्प ठरविला. हा केवळ नागपुरी आंकडा असून त्यांत बरीच रक्कम बाद नसल्यास सर बेसिल हे या कामीं अगदींच घसरले असें म्हणणें प्राप्त आहे. सरसाहेब नुकतेच जानेवारींत इकडे आले आणि इकडे येण्यापूर्वी त्यांना हिंदुस्थानच्या जमाखर्चाची बिलकूल माहिती नव्हती हें त्यांच्या भाषणावरूनच सिद्ध होत आहे. येथें आल्यानंतरचे दीड-दोन महिने त्यांनीं जमाखर्चाच्या आंकड्यांची उलथापालथ करण्यांतच घालविले असले पाहिजेत. अर्थातच त्यांना हिंदुस्थानांतील मिठाच्या कराच्या चढ-उताराच

वाचनालय सातारा
गणकीकृत

इतिहास अवगत करून घेण्यास फुरसतच झालेली दिसत नाहीं. त्यामुळें त्यांनीं मिठाचा कर दुप्पट करण्याचें धाडस केलें असावें; पण यांत त्यांचा अंदाज साफ चुकला, कारण कायदेकौन्सिलांतील बहुमत त्यांना अनुकूल होणार नाहीं.

### वाममार्ग पत्करला

मिठासारख्या आवश्यक व गोरगरिबांच्या आरोग्याला साधनीभूत होणाऱ्या वस्तूवर कर लादणें ही अन्यायाची व निर्घृणतेची परमावधि होय. मिठाचा कर हा डोईपट्टीच्याच स्वरूपाचा आहे असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. डोईपट्टी ही जशी श्रीमंतास क्षुल्लक पण कुटुंबवत्सल दरिद्र्यास घातक होते, तसाच मिठाच्या कराचाहि प्रकार आहे. प्रजेचें मीठ तोडणें हें आरोग्यविघातक असल्यानें हा कर कमी करण्याविषयीं कॉंग्रेसनें आपल्या पहिल्या बैठकीपासून आग्रह धरला होता व मिंटोसाहेबांच्या कारकीर्दींत बहुतांशानें तो सिद्धीस गेला. त्यानंतर महायुद्धाच्या घनघोर प्रसंगांत देखील मिठावरील कर चार आण्यांहून अधिक वाढविण्यांत आला नाहीं; आणि आतां युद्ध संपून पांच वर्षें झाल्यावर आणि लष्करी खर्च कमी करण्याचें धोरण सगळ्या जगांत स्वीकारलें जात असतां, हिंदुस्थानांत मिठावर पुनः धाड यावी हें दुर्भाग्य होय. या कृत्यानें जनतेला फिरून लिटनशाहीची आठवण ताजी करून दिली जात आहे. लिटनसाहेबांना लँकेशायरच्या कापडावरील आयात जकात उठवावयाची होती व त्याकरितां मिठाचा कर वाढविण्यांत आला. प्रस्तुत प्रसंगींहि तसाच प्रकार पण निराळ्या पद्धतीनें घडून आलेला दिसतो. हिंदुस्थान सरकार आणि विलायत सरकार यांच्या दरम्यान कर कोणता वाढवावा याविषयीं कुरबूर चालू होती, असें रॉयटरच्या तारेवरून अनुमान निघतें. आणि बजेट प्रसिद्ध होतांच लँकेशायरचे व जपानचे व्यापारी आपल्यावरचें एखादें अरिष्ट टळल्याप्रमाणें आनंदातिरेकानें डोलूं लागले, यावरून प्रारंभीं वाटत असलेली धास्ती दूर झाली असावी असें सहजच अनुमान निघतें. यावरून प्रारंभीं तरी ब्लॅकेटसाहेबांची दृष्टि मिठाकडे न जातां आयात जकातीकडेच वळली असावी असें अनुमान करण्यास हरकत नाहीं, पण विलायती व्यापाऱ्यांचे कैवारी स्टेट सेक्रेटरी आणि येथील नोकरशाही या उभयतांच्या कानमंत्रावरून त्यांनीं हा वाममार्ग पत्करला असावा; पण या आडमार्गांत त्यांना ठोकर बसल्याखेरीज राहणार नाहीं.

### कौन्सिलनें संमति देऊं नये

सर बेसिल ब्लॅकेट हे बदसल्लागारांच्या नादीं लागून मिठाचा कर दुप्पट करण्याच्या आडमार्गांत शिरले खरे; पण त्यांना खरा सल्ला देऊन ताळ्यावर आणणें हें आमचें, नामदार व खासदार यांचें कर्तव्य आहे. आणि अखिल भारतवासियांचें लक्ष सध्या त्यांच्याकडे वेधलें आहे. मिठाचा कर वाढविण्याची सूचना गतवर्षीं कौन्सिलपुढें आली असतां कौन्सिलरांनीं ती फेटाळून लाविली, आणि

यंदाहि तसाच नेट धरून मिठाच्या कराची गरिबांच्या उरावरची धोंड दूर करण्याची कामगिरी त्यांनीं पार पाडलीच पाहिजे; तसें ते न करतील तर त्यांच्यावर कर्तव्यभ्रष्ट झाल्याचा उघड उघड दोष जनतेकडून येईल. गतवर्षीच्या बजेटांत तोंडमिळवणी करणें अशक्य असून देखील लोकप्रातिनिधींनीं मिठाचा कर वाढू दिला नाहीं. चालू बजेटाची स्थिति तितकी अडचणीची नसून जमाखर्चाचीं पारडीं समतोल राखण्याला दुसरे अनेक मार्ग आहेत. वझिरिस्थानच्या मोहिमेचा जादा खर्च कमी करावयास भाग पाडल्यास मिठाचा कर वाढविण्याची मुळींच गरज राहत नाहीं. इंचकेप-कमिटीनें सुचविलेली १९ कोटींची काटकसर यंदाच अमलांत आणावयाची असा निश्चय केल्यास जमाखर्चांत तूट पडत नाहीं. शिवाय नव्या फडणविसांनीं रेल्वे, पोस्ट व जकात या तीन खात्यांचें उत्पन्न जितकें अंदाजलें आहे त्याहून तें अधिक येण्याचा खास संभव आहे. दुधानें तोंड भाजलें म्हणून ताक फुंकून पिण्यासारखा प्रकार ब्लॅकेटसाहेबांनीं केला आहे. परंतु जमेचा अंदाज इतका कमी धरण्याचें कारण नाहीं, आणि इतकेंहि करून खर्चाचें तोंड उघडेंच राहत असल्यास आयात मालावरील जकात वाढविण्याचा उपाय करून पाहावा; पण मिठावरील कर वाढविण्याला साफ संमति देऊं नये.

### यांत कपटनीति आहे

लेजिस्लेटिव्ह असेंब्लींतील सभासद रयतेचें मीठ तोडण्याचें पाप करण्यास धजावणार नाहींतच; तथापि मतदारांनींहि या वेळीं त्यांना आपला निश्चय कळवून पाठिंबा देणें जरूर आहे. यास्तव मतदारांनीं ठिकठिकाणीं जाहीर सभा भरवून 'मिठाचा कर वाढविण्याला संमति देऊं नका' असें त्यांस बजावलें पाहिजे. हा कर एकदम दुप्पट करण्याचा डाव टाकण्यांत नोकरशाहीची कुटिल नीति व्यक्त होत आहे हें आम्ही जाणून आहों. हें बुजगावणें पुढें करून नोकरशाही दुहेरी हेतु साधणार आहे. कौन्सिलरांना असें सांगण्यांत येईल कीं, तुमच्या आग्रहावरून आम्ही हा कर इतका न वाढवितां बराचसा समी करतों व त्यामुळें तुम्हांस आपापल्या मतदार-संघांना असें सांगतां येईल कीं, आम्हीं विरोध केला म्हणून हा कर कमी झाला; तेव्हां तुम्ही जर खरे कृतज्ञ असाल तर पुनः आम्हांसच निवडून द्या; अशा रीतीनें तुमचा मार्ग आम्ही निष्कंटक करून देतों; पण याचा मोबदला म्हणून तुम्ही सिव्हिल सर्व्हंटांच्या पगारवाढीच्या रॉयल कमिशनास विरोध करूं नका. सारांश, मतदार संघांना उपकारबद्ध करण्याचा आव घालून कौन्सिलरांना वचनांत गुंतवून घेण्याची कणिकनीति उघड दिसत आहे. कौन्सिलर लोक या जाळ्यांत कितपत सांपडतील तें पाहण्याचें आम्हांस प्रयोजन नाहीं. परंतु मतदार-संघांनीं मात्र हें जरूर लक्षांत ठेवावें कीं, मिठाच्या करवाढीला विरोध करणें हें त्यांचें व त्यांच्या प्रतिनिधींचें कर्तव्य आहे व तें त्यांनीं योग्य

रीतीनें बजाविलें पाहिजे. तथापि त्यांच्या विरोधास अनुसरून कर मुळींच वाढला नाहीं किंवा फार तर चार-आठ आणे वाढला तरी त्यांत नोकरशाहीचा किंवा कौन्सिलरांचा मोठासा उपकार होतो असें नाहीं. एखाद्यांला अन्यायानें ५० फटके मारण्याचें प्रथम ठरवून पुढें मोठ्या दयार्द्रतेनें 'जा, तुला दहाच फटक्यांवर सोडून देतों' असें म्हणण्यांत जशी खरी दया नसून अन्यायच आहे, तसाच प्रकार मिठाच्या कराच्या संबंधांत आहे. मिठासारख्या अवश्य पदार्थावर कर ठेवणें हेंच मूळ पाप आहे. तेव्हां वस्तुतः आहे हाच कर अजीबात उठविला पाहिजे, पण तें आज साधत नसलें तरी निदान तो आहे तितकाच राहावा. तो एकदम सव्वा रुपयानें वाढविण्याचा धाक घालून मग चार-आठ आणे कर वाढविण्याचें कबूल करून, त्यांत स्वतःच्या सदयतेची प्रौढी मिरविणें हा शुद्ध भोंदूपणा होय. असल्या 'तीन धूर्तांच्या' कावेबाजपणाला बळी न पडतां मतदार-संघांनीं ठिकठिकाणीं प्रचंड जाहीर सभा भरवून कौन्सिलरांना असें स्वच्छ सांगावें कीं, "मिठाचा कर एका पैनें देखील वाढविण्यांत येऊं नये आणि हें जर तुमच्या हातून न होईल तर पुढला उपाय काय करावयाचा तो आम्ही पाहून घेऊं."

---

# गोऱ्यांचे लाड; सव्वा कोटीची धाड ८

[ मॉंटेग्यु-चेम्सफर्ड रिफॉर्म्स अमलांत आल्यावर कित्येक इंग्रज अधिकारी हिंदी मंत्र्यांच्या हाताखालीं राहण्याला नाखूष होते, कित्येकांना शक्य तितक्या लवकर सेवानिवृत्त होण्याची घाई लागली होती, तर इतर कित्येकांना आपलें इतर कोणत्या तरी प्रकारानें नुकसान झालें असें वाटत होतें, अशा सर्वांची समजूत घालण्याकरितां व त्यांच्या मताप्रमाणें होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याचा उपाय सुचविण्याकरितां 'ली' कमिशन नेमण्यांत आलें. त्या कमिशनच्या शिफारसीमुळें हिंदी खाजन्यावरील बोजा कसा वाढला त्याचें विवेचन या लेखांत आहे. ]

### नवा वाक्प्रचार रूढ होईल

'बाजार भरण्यापूर्वीच उचल्यांनीं कंबरा बांधल्या' अशी एक मराठींत म्हण आहे; तिचा अर्थ कांहीं फारसा गूढ नाहीं. स्वार्थी लोक स्वार्थ साधण्याची संधि येण्यापूर्वीच कंबर बांधून सज्ज असतात आणि पुढें येणारी संधि केव्हांहि

(केसरी, दि. ३ जून १९२४)

वाया दवडीत नाहींत, एवढाच तींत अर्थ आहे. आणि हिंदुस्थानांतील गोऱ्या नोकरशाहीच्या आजपर्यंतच्या वर्तनाला तो नियम तंतोतंत लागू पडतो हें वाचकांस विदितच आहे. तथापि 'बाजार उठण्यापूर्वींच उचल्यांनीं कंबरा बांधल्या' अशी म्हण कांहीं मराठी भाषेंत नाहीं. परंतु गोऱ्या नोकरशाहीचें अलीकडचें वर्तन पाहतां हा नवा वाक्प्रचारहि रूढ होईल असें वाटतें; कारण तिचें वर्तन या नव्या वाक्प्रचारास अनुरूप असेंच होऊं लागलें आहे.

## ली कमिशनचा नवा बोजा

१७५७ सालीं प्लासीच्या विजयानें हिंदुस्थानचा बाजार ब्रिटिशांस खुला झाला. तत्पूर्वींपासूनच गोऱ्या लोकांना या देशांतली संपत्ति लुटून नेण्याची तयारी चालविली होती; आणि लॉर्ड क्लाइव्हच्या विजयापासून तर त्यांनीं या कामीं बिलकूल कसूर केली नाहीं. आणि आतां हा बाजार बंद होण्याची वेळ आल्याचीं चिन्हें दिसूं लागतांच जुन्या उचल्यांच्या नव्या वंशजांनीं आपला हात जितका उगवून घेतां येईल तितका घेण्याकरितां पुनः ताज्या दमानें कंबर कसली आहे! रिफॉर्म ॲक्टानें आपल्या हातांतली सत्ता तोळामासा तरी कमी होणार हें दिसूं लागतांच या आडिलतट्टूंनीं रुसवाफुगवा करून आपापले पगार वाढवून घेतले व हिंदुस्थानच्या तिजोरीवर सहासात कोटींचा बोजा लादला. पण तेवढ्यानें तृप्त न होतां या नोकरशाहीनें पुनः कांगावा सुरू केला आणि तिचे कोड पुरविण्याला लॉइड जॉर्ज व बाल्डविन यांसारखे अधिकारी भेटल्यामुळें 'ली' कमिशनची नेमणूक होऊन त्या कमिशननें या गोऱ्या बाळांचे लाड पुरविण्याकरितां हिंदी खजिन्यावर सव्वा कोटीची नवी धाड घालण्याची शिफारस केली आहे!

## एकमतानें केलेल्या शिफारसी

या कमिशनची नेमणूक करण्याची प्रस्तावना म्हणून लॉइड जॉर्ज यांचें जें भाषण पार्लमेंटांत झालें त्यांत त्यांनीं इंडियन सिव्हिल सर्व्हंट्स् हे 'पोलादी चौकटी'सारखे असून ब्रिटिश राजसत्तेस त्यांचाच भरभक्कम आधार आहे व तो आधार काढून टाकल्यास ती सगळी इमारत कोसळेल असें विधान केलें होतें. त्यांच्या त्या भाषणावरून सिव्हिल सर्व्हंट्सचा नुसता पगार वाढविण्याचाच रोख नसून दहा वर्षांत स्वराज्याचे हक्क मिळण्याच्या अंधुक आशेलाहि धक्का पोंचत होता. याच कारणामुळें त्या भाषणाचाहि हिंदुस्थानांत सर्वत्र निषेध झाला, पण दुबळ्यांच्या निषेधानें प्रबळांना आपला हट्ट पुरा करण्याचें स्फुरण अधिकच चढत असल्यानें ब्रिटिश सरकारनें लीसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं कमिशन नेमून टाकलें. आणि जणुं काय मवाळांच्या शाब्दिक निषेधाची कसोटी पाहण्याकरितां त्या कमिशनमध्यें भूपेंद्रनाथ बसू व ना. म. समर्थ यांची नेमणूक केली आणि आपल्याच भाईबंदांच्या निषेधपर ठरावाची क्षिति न बाळगतां त्यांनीं ती जागा पत्करली! यावर कदाचित् कोणी

अशीहि कोटी करील कीं, त्या कमिशनच्या शिफारसीला आंतून विरोध करण्या-करितां ते कमिशनमध्यें शिरले असतील! असा प्रकार खरोखरच झाला असता तर निदान आम्ही तरी त्यांचें कौतुकच केलें असतें आणि कमिशनपुढील गोऱ्या साक्षीदारांची उलटतपासणी करतांना ना. बसू यांनीं त्यांना बरेच छेडले यांत शंका नाहीं. परंतु कमिशनच्या रिपोर्टावरून पाहतां या मवाळाग्रणींचा विरोध मधल्या-मधेंच अंतर्धान पावलेला दिसतो. कारण रिपोर्टातील सगळ्या शिफारसी एक-मतानें मान्य झाल्या आहेत! नाहीं म्हणावयास सिव्हिलियन गव्हर्नर्स व सिव्हि-लियन कौन्सिलर्स यांच्या पेन्शनींत जादा वाढ करूं नये अशा आशयाची टीचभर विरोधपत्रिका जोडून ना. बसू यांनीं आपलें स्वतंत्र अस्तित्व प्रकट केलें आहे. अर्थातच ना. बसू यांच्या या वर्तनामुळें त्यांचे मवाळ भाईबंद देखील त्यांजवर रुष्ट झाले आहेत.

असो. कमिशनच्या नेमणुकीची उपरनिर्दिष्ट परंपरा लक्षांत घेतां तिच्या रिपोर्टाची छाननी दोन दृष्टींनीं करावयास पाहिजे. या कमिशननें गोऱ्या सिव्हि-लियनांच्या भत्त्यांत व पेन्शनींत वाढ करून खर्चाचा नवा बोजा किती लादला ही पहिली दृष्टि असून ती सापेक्षतः गौण आहे आणि या कमिशनच्या रिपोर्टांतील एकंदर नोकझोकावरून स्वराज्याचे हक्क हिंदी जनतेच्या पदरांत टाकण्याचा मुहूर्त लांबतो का जवळ येतो ही दुसरी दृष्टि असून तिचेंच खरें महत्त्व आहे. दोनहि दृष्टींनीं रिपोर्ट निराशाजनकच आहे हें पुढील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईलच.

### नव्या जळवांचें रक्तशोषण

वाढत्या बोजाचा विचार न करतां या कमिशननें पगार, भत्ता, जादा भत्ता, पेन्शन, बोटभाडें, प्रॉव्हिडंट फंड वगैरे विविध नांवांखालीं किती तरी वाढ केली आहे! पण ती वाढ अशा खुबीनें केली आहे कीं, कोणत्याहि एका ठिकाणीं मोठा आंकडा दिसूं नये. त्यांतल्या त्यांत हुंडणावळीच्या बुरख्याखालीं तर त्यानें अजब हातचलाखी केली आहे. 'ओव्हरसी अलावन्स'ची रक्कम १५० रु. होती ती ३०० पर्यंत वाढविली आहे; म्हणजे ही वाढ दुप्पट झाली. पण ही रक्कम विलायतेस सॉव्हरिन नाण्यांत देतांना ३०० रुपयांचे पौंड ३० द्यावे असें ठरविलें आहे! आजच्या हुंडणावळीच्या भावानें ३० पौंडांना सुमारें ४५० रुपये पडतात हें वाचकांस माहीत आहेच! अर्थातच ओव्हरसी अलावन्स नांवापुरता ३०० पण प्रत्यक्ष टक्के मोजतांना हल्लींच्या भावानें ४५० रुपये पडणार! या युक्तीनें १५० चे ४५० झाले! असा हा एक प्रकार झाला. याला दुसरी जोड बोटभाड्याची. नोकरीच्या तीस वर्षांच्या मुदतींत चार वेळा विलायतेला जातां-येतांचें पहिल्या वर्गाचें भाडें द्यावयाचें आणि हें अम्मलदार विवाहित असल्यास त्यांच्या कुटुंबालाहि तीच सवलत मिळावयाची; पुढें मुलें होतांच प्रत्येक मुलाला

एकवार भाडें मिळावयाचें ! पेन्शनीच्या संबंधांत कार्यकारी कौन्सिलर्स व सिव्हिलियन गव्हर्नर्स यांना अनुक्रमें ५० पौंड व १०० पौंड जादा खैरात वाटण्यांत आली आहे. शिवाय बिनसनदी गोऱ्या नोकरांच्या पेन्शनची कालमर्यादा ५ हजार होती ती सहा हजारांपासून ९॥ हजारांपर्यंत वाढविण्यांत आली आहे; आणि ही सर्व रक्कम दर रुपयास २१ पेन्स या भावानें भरणा करावयाची; मग इकडे तुमचा हुंडणावळीचा भाव कांहींहि असो. याखेरीज प्रॉव्हिडंट फंड आहे, फॅमिली पेन्शन फंड आहे, नोकरींत असतांना दगावल्यास नुकसानभरपाई फंड आहे, बंगलाभाडें आहे, आजारीपणांत डॉक्टराकडे जाण्याचा वाटखर्च आहे ! अशा ठिकठिकाणीं अनेक जळवा लावून हल्लींच्यापेक्षां सव्वा-दीड कोटींचें अधिक रक्तशोषण करण्याची या कमिशननें सोय करून दिली आहे.

## सोंपीव खात्याचें हिंदीकरण

हा केवळ खर्चाच्या वाढीच्या दृष्टीनें विचार झाला. आतां स्वराज्याचा अधिकार हिंदी लोकांच्या स्वाधीन करण्याच्या कालावधीच्या दृष्टीनें रिपोर्टाचा विचार केल्यास तिकडूनहि निराशाच होते. हिंदी पुढारी आजच सगळा मुलकी कारभार आमच्या हवालीं करा अशी जी मागणी करीत आहेत ती तूर्त सोडून देऊं. पण स्वतः सरकारनें दुसऱ्या हप्त्याला जी दशवार्षिक मुदत नमूद केली आहे तिला तरी पोषक असा भाग या रिपोर्टांत कितीसा आहे ? प्रांतिक सरकारांच्या ताब्यांतलीं जीं खातीं दिवाणांकडे सोंपवून दिलीं आहेत त्या खात्यांत यापुढें भारतमंत्र्यांनीं नवीन नेमणुका करूं नयेत, अशी कमिटीची शिफारस आहे व तेवढी एकच सूचना काय ती आक्षेप न घेण्याजोगी आहे. पण ही सूचना अमलांत येण्यापूर्वी पब्लिक सर्व्हिसेस कमिशनर्सची नेमणूक आणि त्यांच्यासंबंधीं कायदेकानू वगैरे विधि झाला पाहिजे. तो होतां होतां सहज पांचसात वर्षें निघून जावयाचीं ! पण आधीं कमिशनची ही सूचना भारतमंत्री मान्य करतील का नाहीं याचीच वानवा आहे आणि निरुपाय म्हणून त्यांनीं एकदांची ती कबूल केली तरी त्या वेळेपर्यंत जे सिव्हिलियन्स् त्या खात्यांत नेमले गेले असतील त्यांना हे नवे कायदेकानू लागू नाहींतच ! अर्थातच सोंपीव खात्यांतून 'नाकापेक्षां मोतीं जड' असल्या स्वरूपाचे हे वरचढ कामगार अगदीं नाहींसे होण्याला किमानपक्ष तीस वर्षें लागणार !

## राखीव खात्यांत निम्मे हिंदी

सोंपीव खात्यांची ही रड झाली; हिच्यावरून राखीव खात्यांच्या हिंदीकरणाची कल्पना येईलच. कमिशननें असा साफ शेरा मारला आहे कीं, सिव्हिल सर्व्हिस, इं. पोलीस सर्व्हिस, पाटबंधाऱ्याच्या कामावरील इंजिनिअरिंग सर्व्हिस मुंबई व ब्रह्मदेश वगळून फॉरेस्ट सर्व्हिस, त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या ताब्यां-

तलें पोलिटिकल खातें, कस्टम खातें आणि ख्रिस्ती धर्म खातें इतक्या सगळ्या खात्यांतील नेमणुका यापुढेंहि स्टेट सेक्रेटरीनेंच कराव्यात. रिफॉर्म ॲक्टांतील कलम ९६ ब-प्रमाणें भारतमंत्र्याला हा अधिकार व्हाइसरॉयांकडे देतां येत असला तरी त्यानें तो अधिकार हिंदुस्थान सरकारकडे सुपूर्त करूं नये ! अशा रीतीनें कमिशननें जेथें व्हायसरॉयांच्याहि तोंडाला पानें पुसलीं तेथें हिंदी दिवाणांच्या हातीं हा अधिकार येण्याला कालावधि किती लागेल व याविषयींची कमिशनर्सची कल्पना काय असेल याचा तर्कच करावा. या अस्सल राखीव खात्यांत हिंदी कामगारांचा भरणा करण्यासंबंधीं कमिशननें जो उदारपणा दाखविला आहे तोहि याच मासल्याचा आहे! इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें १५ वर्षांत काळ्या-गोऱ्यांचें निमेनिम प्रमाण पडावें असें कमिशनचें मत आहे. पोलीस खात्यांत अर्धे युरोपिअन व अर्धे हिंदी अधिकारी होण्याला कमींत कमी २५ वर्षें लागतील असें कमिशननें म्हटलें आहे, व त्याच मुदतीच्या मानानें हिंदी उमेदवारांचें प्रमाण ठरविलें आहे. गोऱ्या कामगारांच्या सोयीकरितां दर इलाख्यांत अमुक इतके सिव्हिल सर्जन्स् विलायती असले पाहिजेत असा निर्बंध घालावा असें कमिशननें नमूद केलें असून, हें प्रमाण ठरविण्याची व त्याची बजावणी करण्याची जबाबदारी स्टेट सेक्रेटरीकडे सोपवून दिली आहे. एतावता पचवीस-तीस वर्षांच्या मुदतीच्या आंत या वरिष्ठ खात्यांतून हिंदी अधिकाऱ्यांचें प्रमाण केव्हांहि अर्ध्याहून अधिक होऊं नये असा पक्का बंदोबस्त व्हावा, अशा प्रकारचें कमिशनच्या शिफारसींचें स्वरूप आहे.

### हें मनोराज्य ढासळणार नाहीं काय ?

पण नोकरशाहीच्या या कैवाऱ्यांची दक्षता व दूरदृष्टि इतकी आहे कीं, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें त्यांनी त्यांच्या हक्कांचा सर्व बाजूंनीं पूर्ण बंदोबस्त केला असून न जाणो चुकून एखाद्या वेळीं आपल्या हातांतलीं अधिकारसूत्रें हिंदी जनतेच्या हातीं गेलींच तर 'पश्चात्ताप करण्याची पाळी येऊं नये म्हणून, केव्हांहि कोणत्याहि राखीव खात्याचें सोंपीव खात्यांत रूपांतर झाल्यास एका वर्षाच्या आंत त्या खात्यांतील नोकरशाहीला यथाप्रमाण पेन्शन घेऊन घरीं निघून जातां यावें, अशी या रिपोर्टांत सोय करून ठेवली आहे. यापुढें जुने कदारमदार बदलून नवे करार अमलांत यावयाचे आहेत आणि त्यांत कमिशननें शिफारस केल्याप्रमाणें पगार, भत्ता, भाडें, पेन्शन वगैरे सर्व बाबी कोर्टामार्फत तजवीज करतां येईल अशीं कलमें नमूद व्हावयाचीं आहेत ! एवंच, या कमिशनरबहादुरांनीं एका बाजूनें नोकरशाहीचा हिंदुस्थानरूपी कुरणांतून निघून जाण्याचा दरवाजा उघडून मोकळा करून ठेवला आहे; पण त्याचबरोबर ते नोकरशाहीला असेंहि आश्वासन देत आहेत कीं, वेळ कांहीं सांगून येत नाहीं, म्हणून तुमची घरची वाट आम्हीं खुली करून ठेवली तरी

तुम्ही खुशाल यथेष्ट चरत राहा, पंचवीस-तीस वर्षे तरी तुम्हांस येथून कोणीहि हकलून देऊं शकणार नाहीं, इतकी तरतूद आम्हीं केली आहे ! पण कमिशनचें हें सगळें मनोराज्य कालाच्या तडाख्यांत शेखमहंमदाच्या हाऱ्यांतील कांचसामानाप्रमाणें ढासळणार नाहीं कशावरून !

दा नं ........ स नं ........

# संरक्षण द्या पण हमी घ्या

[ मॉटेग्यू-चेल्म्सफर्ड सुधारणा अंमलांत आल्यानंतर हिंदी उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन त्यांचा उत्कर्ष करण्याचा प्रश्न पुढें आला. त्या वेळीं टॅरिफ बोर्डाची नेमणूक होऊन कोणत्या धंद्यांना संरक्षण देण्याची जरूरी आहे, याची चौकशी झाली. टॅरिफ बोर्डानें कांहीं अटी घालून त्या अटी जेथें लागू पडतील त्या धंद्यांना संरक्षण द्यावें असा अभिप्राय दिला. अर्थातच त्या अटींना अनुसरून कापडाच्या गिरण्यांना संरक्षण देणें योग्य होईल का नाहीं हा प्रश्न उद्भवला. त्या वेळीं गिरणीवाल्यांनीं २५ टक्के संरक्षक जकात बसवावी अशी मागणी केली; परंतु आपल्या धंद्यांत सुधारणा करून आपण स्वस्त व भरपूर माल पुरवूं असें आश्वासनहि दिलें नाहीं. अशा परिस्थितींत हिंदी गिरण्यांना संरक्षण द्या पण त्याजकडून हमी घ्या असें केसरीनें या लेखांत सुचविलें आहे. ]

### संरक्षणाच्या मागणीची छाननी झाली पाहिजे

हिंदी गिरण्यांच्या बुडत्या धंद्याला आधार कसा द्यावा याचा विचार टॅरिफ बोर्डापुढें चालू असून मुंबईंतील गिरण्यांच्या कामांतील तज्ज्ञांच्या साक्षी संपूर्ण झाल्या. आतां हें बोर्ड अहमदाबादेला गेलें असून तेथून तें कानपूर, कलकत्ता वगैरे ठिकाणीं फिरून आणखी एक महिन्यानें मुंबईस परत येऊन रिपोर्ट लिहूं लागेल. अहमदाबाद, कानपूर व कलकत्ता येथील साक्षी अद्यापि प्रसिद्ध व्हावयाच्या असल्या तरी आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या साक्षींवरून सामान्यतः असें अनुमान काढतां येतें कीं, हिंदी गिरण्यांची स्थिति आजमितीला असावी तशी नाहीं. हुंडणावळीचा भाव हा या दुःस्थितीला बऱ्याच अंशीं कारणीभूत आहे आणि आयात जकात वाढविली तरच या गिरण्यांचा परदेशी चढाओढींत टिकाव लागू शकेल; बहुतेक साक्षीदारांच्या साक्षींचा निष्कर्ष वरील तीन विधानांतच समाविष्ट

( केसरी, दि. १४ सप्टेंबर १९२६ )

होऊं शकेल; आणि यापुढें आणखी कितीहि साक्षी झाल्या तरी त्यांच्यांतून वरील विधानांना पुष्टीच मिळेल;विरोध होणार नाहीं.

तथापि हा प्रश्न ३२ कोटि लोकांच्या हिताहिताचा असल्यानें त्याच्या मुळाशीं जाऊन त्याचे सर्व धागेदोरे उकलले पाहिजेत आणि या संरक्षणाच्या मागणीची कसून छाननी केली पाहिजे! नाहीं तर गिरणीवाल्यांचें संरक्षण करण्याच्या नादांत गिऱ्हाइकांच्या हिताचा बळी दिला जाण्याचा संभव आहे. संस्थानिकांच्या हितासाठीं सरकारनें 'प्रिन्सेस प्रोटेक्शन बिल' पास केलें आणि संस्थानिक टीकेच्या माऱ्यांतून निर्भय झाले; पण प्रजेवर होणाऱ्या वाढत्या जुलमाची वाट काय, याचा विचार मुळींच न झाल्यानें संस्थानिकांना प्रजेची मुस्कटदाबी करून तिला छळण्याला एक मुभा मिळाली. हिंदी गिरणीवाले हेहि एकप्रकारचे संस्थानिकच आहेत व त्यांचें गिऱ्हाईक ही त्यांची प्रजा आहे. प्रजेकडून संस्थानिकांवर केव्हांहि जुलूम होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें गिऱ्हाइकांकडून गिरणीवाल्यांवर जुलूम होऊं शकत नाहीं. परंतु संरक्षक जकातीच्या वाढीचें शस्त्र या व्यापारी नबाबांच्या हातीं दिल्यास ते त्याचा प्रयोग गिऱ्हाइकांवर करून त्यांस 'दे माय धरणी ठाय' करून सोडतील अशी धास्ती वाटते. म्हणून असें संरक्षणशस्त्र गिरणीवाल्यांच्या हातीं देण्यापूर्वी कोणकोणत्या गोष्टींची हमी त्यांच्याकडून मिळाली पाहिजे तें पाहूं.

हिंदी गिरण्यांचा धंदा सांप्रतकाळीं ऊर्जितावस्थेंत नसून त्याचा पाय दिवसेंदिवस घसरत जात आहे यांविषयीं वाद नाहीं; पण त्याला जबाबदार कोण! आणि या दुःस्थितींतून हिंदी गिरण्यांना तारण्याला कोणते उपाय योजावेत? टॅरिफ बोर्डापुढील पोपटपंची वर्गांतले साक्षीदार सांगतात कीं, हुंडणावळीचा चढता भाव गिरण्यांच्या अधोगतीला जबाबदार आहे आणि संरक्षक जकात दुप्पट करणें हीच त्यावर तोड आहे. पण हुंडणावळीचा हा भाव गेल्या दोन वर्षांतच इतका वाढला, असें असतांना चीनशीं असलेला व्यापार त्यापूर्वीच कां बुडाला असें विचारल्यास जे कोणी गिरणीवाल्यांचे वाली असतील त्यांना देखील उत्तर देतां येत नाहीं. त्याचप्रमाणें हल्लींच महर्घतेमुळें कापडाचा खप मंदावला असतांना आयात जकात दुप्पट केल्यास कापडाच्या महर्गतेंत आणखी भर पडून कापडाचें गिऱ्हाईक आजच्यापेक्षां कमीच होईल, मग त्यांत हिंदी गिरण्यांना लाभ कोणता? असा सवाल विचारला असतां त्यालाहि समर्पक उत्तर मिळत नाहीं. यावरून हा प्रश्न इतका सहज सुटण्यासारखा नसून गुंतागुंतीचा आहे व त्याचा विस्तार सूक्ष्मपणेंच केला पाहिजे हें सर्वांच्या निदर्शनास येईल.

## सर्व सत्ताधारी मॅनेजिंग एजंट्स्

हिंदुस्थानांत पहिल्या गिरणीची चिमणी उभारल्यास सुमारें ७० वर्षें झालीं.

जपानांत तर ३० वर्षांपूर्वी एकहि गिरणी नव्हती. मग हिंदी गिरण्यांना इतका दीर्घकालीन अनुभव असून हिंदुस्थाननें काबीज केलेली बाजारपेठ जपानच्या हातांत कशी गेली? केवळ हुंडणावळीचा हा परिणाम नव्हे आणि हातची गेलेली बाजारपेठ केवळ जकात वाढविल्यानें फिरून हस्तगतहि व्हावयाची नाहीं. पुनश्च ती हस्तगत करण्याला हिंदी गिरण्यांतील कामाची पद्धतिचे आमूलाग्र सुधारली पाहिजे. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व गिरण्यांची व्यवस्था 'मॅनेजिंग एजन्ट्स्'कडे असते. ही मॅनेजिंग एजंट्स्‌ची पद्धति जगाच्या पाठीवर इतरत्र कोठेंहि नाहीं, कारण ही पद्धति कोणत्याहि धंद्याच्या अपकर्षालाच कारणीभूत होते असा तज्ज्ञांचा अनुभव आहे. मॅनेजिंग एजंट्स् हे वस्तुतः डायरेक्टरांचे नोकर असून इकडे तेच इतके शिरजोर बनलेले असतात कीं, डायरेक्टर्स मॅनेजिंग एजंटाला काढून टाकूं शकत नाहींत. उलटपक्षीं मॅनेजिंग एजंट्स्‌च डॉयरेक्टरां-वर वरचष्मा चालवीत असतात. अशा रीतीनें मॅनेजिंग एजंट्स् हे सर्व सत्ताधारी बनतात आणि त्यांच्या अनियंत्रित कारभारामध्यें हात घालण्यास कोणीहि धजावत नाहींत. मॅनेजिंग एजंटांची ही अनियंत्रित सत्ता आणि गिरणीचें दिवाळें निघ-ण्याची वेळ येऊन ठेपली तरी एजंटांच्या कमिशनमध्यें खंड न पडणें इत्यादि कारणांमुळें या जगाच्या चढाओढींत आपला टिकाव लागेल अशा प्रकारची या धंद्यांत सुधारणा करण्याची त्यांना गरजच भासली नाहीं. पण आतां जपानसारखें ताज्या दमाचें आणि हरहिकमतीचें नवें राष्ट्र प्रतिपक्षी म्हणून दंड ठोकून उभें राहिल्यापासून हे गिरण्यांचे चालक जागे झाले आहेत आणि हल्लीं जो संरक्षक जकातीची लाट चोहोंकडे पसरत आहे त्या वाहत्या गंगेंत हात धुवून घेऊन पुनः निर्धास्त व्हावें असा त्यांचा मनोदय आहे.

## आतां सरकारी आधार कशासाठीं ?

कोणत्याहि धंद्याला संरक्षण देण्याचा विचार ठरविण्यापूर्वी त्या धंदेवाल्यांनीं आपल्या परिश्रमानें तो धंदा चालविण्याची पराकाष्ठा केली आहे आणि स्वाव-लंबनानें योजावयाचा कोणताहि उपाय करून पाहण्यांत हयगय झालेली नाहीं, अशी बोर्डाची खात्री पटली तरच बोर्डाकडून संरक्षणाच्या उपायांची शिफारस केली जाते व इतकी दक्षता आवश्यकच आहे. टाटा कंपनीच्या पोलादाच्या कारखान्याला सरकारी आश्रय देण्यापूर्वी त्या कंपनीचा कारभार काटकसरीनें चालला आहे का नाहीं याविषयीं शंका उपस्थित झाली होती. तिचें पूर्णपणें निर-सन होण्यापूर्वीच त्या कंपनीला संरक्षणाचा फायदा मिळाला. याचें कारण पोला-दाचा हा कारखाना नवाच असून सर्व हिंदुस्थानांत तो एकच एक असल्यानें इतकी सूक्ष्म चिकित्सा करणें त्या वेळीं इष्ट वाटलें नाहीं; परंतु कापडाच्या हिंदी गिरण्यांची तशी स्थिति नाहीं. यांतील जुन्यांत जुन्या गिरण्यांचा अनुभव कमींत

कमी ६०-७० वर्षांचा तरी आहे. एवढ्या कालावधींत या गिरण्यांनीं निरनिराळया परिस्थितीशीं टक्कर मारून आपला बचाव केला आहे. असें असतां त्यांस आतांच सरकारी आधाराची गरज कां भासावी !

## अनागोंदी कारखानदार टेकीस येतात

मुंबई शहरांत गिरण्यांची झपाट्यानें वाढ होऊं लागतांच लँकेशायरचें धाबें दणाणून गेलें आणि लिटनशहांनीं आपल्या शिक्केबाजीच्या अधिकारांत परदेशी कापडावरील जकात अजिबात काढून टाकली. पण तेवढ्यानें कांहीं हिंदी गिरण्या डबघाईस आल्या नाहींत. १८७८ पासून १८९६ सालापर्यंत परदेशी कापडावर बिलकूल जकात नसतां आणि पुढें परदेशी कापडावर आयात जकात बसली तेव्हां देशी कापडावरहि एक्साईज ड्यूटी लादल्यानें पुनः संरक्षण नाहीं तें नाहींच, अशी परिस्थिति झाली असतां ज्या हिंदी गिरण्यांनीं चढाओढींत कच खाल्ली नाहीं, त्याच हिंदी गिरण्यांना आजमितीला ११½ टक्के जकातीच्या ढालीचा आसरा असतां त्यांची केविलवाणी स्थिति व्हावी आणि ही जकात आणखी १३½ टक्के वाढवा अशी त्यांनीं याचना करावी याचें आश्चर्य वाटतें; पण या कोड्याचा उलगडा थोड्याशा विचारानें होण्यासारखा आहे. १८७८ सालापासून १९१४ सालापर्यंत हिंदी गिरण्यांचे प्रतिस्पर्धी लँकेशायरवालेच होते, आणि त्यांचाहि कारभार नबाबी थाटाचाच असून, त्यांच्या मालाच्या मूळ किंमतींत व विक्रीच्या किंमतींत इतकी कूस असे कीं, हिंदी गिरणीवाल्यांना त्यांतल्या त्यांत कांटेकोरपणा करून स्वतःचें बस्तान बसवितां आलें; परंतु आतां जो नवा प्रतिस्पर्धी भेटला आहे त्याचा कारभार इतका कांटेतोल आहे कीं, त्याच्याशीं चढाओढ करतांना अनागोंदी कारभारवाले हिंदी कारखानदार टेकीस येत आहेत. पूर्वी लँकेशायरवाले व मुंबईवाले दोघेंहि सारखेंच गाफील असल्यामुळें मुंबईवाल्यांचा निभाव लागला; परंतु जपानी व्यापारी पैन्‌पैची कांटकसर करण्याची दक्षता घेत असल्यानें या नव्या चढाओढींत हिंदी गिरणीवाले नामोहरम व्हावेत हें साहजिकच आहे.

## सट्टेवाले मॅनेजिंग एजंट्स्

परंतु एवढ्यानें त्यांस २५ टक्के संरक्षक जकातीची मागणी करण्याचा हक्क पोंचतो कीं काय, आणि तितकी जकातीची वाढ करणें गिऱ्हाइकांच्या दृष्टीनें न्याय्य ठरेल कीं काय याची वानवाच आहे. बहुतेक साक्षीदार स्वतः गिरणीवाले किंवा त्यांचे हस्तक असल्यानें त्यांनीं टॅरिफ बोर्डापुढें आपल्या तक्रारींचा ठराविक पाढा वाचला; परंतु स्वतःच्या दक्षतेनें किती सुधारणा करतां येण्याजोगी आहे याविषयीं अवाक्षरहि काढलें नाहीं. तरी पण कांहीं सडेतोड साक्षीदार भेटले आणि त्यांनीं गिरण्यांतील कारभारांतला बोंगळपणा बोर्डाच्या नजरेस आणला. आधींच

मॅनेजिंग एजन्सीची पद्धति अनिष्ट आहे, पण अलीकडे हे मॅनेजिंग एजन्ट्स् आपल्या एजन्सीला लिमिटेड कंपनीचें स्वरूप देऊन आपल्यांवरील जबाबदारी आणखी संकुचित करून भागीदारांचें नुकसान हमखास व्हावें अशी योजना अमलांत आणीत आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत बारीक धाग्याच्या कापसाची निपज करण्याविषयीं गेल्या ५० वर्षांत गिरणीवाल्यांनीं कांहींच तजवीज केली नाहीं. कापूस-खरेदींतहि चांगल्या व वाईट मालाची भेसळ होऊं देऊं नये आणि कापसाचा भाव मंदीचा असेल त्या वेळीं अगाऊ करार करून थेट शेतकऱ्यांकडूनच माल खरेदी करावा अशी जी जपानी एजंटांची वहिवाट आहे तिचें देखील येथील गिरणीवाल्यांकडून अनुकरण होत नाहीं. एवढेंच नव्हे तर कित्येक गिरण्यांचे मॅनेजिंग एजन्ट्स् हे स्वतः कापसाचे सट्टे करणारे असल्यानें स्वस्त मिळालेला माल त्यांच्या स्वतःच्या सट्टेबाजीकडे जातो आणि महाग पडलेला माल गिरण्यांच्या गळ्यांत बांधण्यांत येतो असें म्हणतात! टॅरिफ बोर्डानें अशा एजंटांची माहिती विचारली व ती त्याला खासगी यादीच्या रूपानें देण्यांत आली असें कळतें. असले एजंट भागीदारांचें व कारखान्याचें हित पाहणार आणि आपल्या कारखान्यांत बूड येतें म्हणून आयात जकात दुप्पट करा अशी मागणी करणार! अर्थातच असली मागणी मान्य करण्यापूर्वीं असल्या सर्व प्रकारांची शहानिशा झाली पाहिजे.

## कोणतीहि सुधारणा केली नाहीं

अल्प श्रमानें मोठा फायदा मिळूं लागला म्हणजे कोणीहि कारखानदार ऐदी व खुशालचेंडू बनतो आणि मग परिस्थिति पालटून संकटांची आंच लागूं लागतांच त्या चटक्यानें घाबरा होऊन धांवा करूं लागतो, तशीच स्थिति या गिरणीवाल्यांची झाली आहे. कापसाच्या लागवडीची सुधारणा करण्याकडे त्यांनीं लक्ष पुरविलें नाहीं. ज्या वेळीं बेसुमार नफा मिळाला त्या वेळीं रिझर्व्ह फंड न वाढवितां इमारतींची व यंत्रांची वाढ करण्यांत पैसे गुंतवून बसले, हिंदी तज्ज्ञ तयार करवून आणून त्यांना आपल्या गिरण्यांत नेमण्याची तजवीज झाली नाहीं, गिरण्यांच्या यंत्रांना लागणाऱ्या शेंकडों किरकोळ वस्तु देशांतल्या देशांत तयार करविण्याची यत्किंचितहि खटपट करण्यांत आली नाहीं, मजुरांची कार्यक्षमता वाढविण्याविषयीं प्रयत्न झाला नाहीं, मॅनेजिंग एजंटांच्या कमिशनची पद्धति भागीदारांना व कारखान्याला किफायतशीर होईल अशा रीतीनें सुधारण्यांत आली नाहीं. असेच प्रकार आणखी किती तरी सांगतां येतील, पण सामान्य वाचकांना साधारणतः कल्पना येण्यास एवढी यादी पुरे आहे. जपानांतील गिरणीवाले आपला सर्व व्यवहार अत्यंत दक्षतेनें, काटकसरीनें व सचोटीनें करीत असल्यानें त्यांना येथून कापूस खरेदी करून नेऊन येथल्यापेक्षां स्वस्त माल देणें परवडतें. हिंदी गिरणीवाल्यांनीं

वाचनालय सातारा
गणकीकृत

आपला अनागोंदी कारभार टाकून टापटीप व हिशेबीपणा उपयोगांत आणला तर त्यांना जपानी मालापुढें हात टेकण्याची पाळी खास येणार नाहीं. हुंडणावळी-मुळें हिंदी गिरण्यांना जो चट्टा बसतो तो विलायतेच्या चढाओढींत, जपानच्या चढाओढींत नव्हे. कारण हुंडणावळीचा भाव हिंदी व जपानी लोकांना सारखाच भोंवतो. असें असून हिंदी गिरणीवाल्यांची मागणी मुख्यतः जपानी मालावर संरक्षक जकात लादण्याविषयीं आहे! अशी जकात लादल्यास गिऱ्हाइकांच्यावर तो एक अप्रत्यक्ष करच बसणार. पण तसा कर बसविण्यापूर्वी हिंदी गिरणीवाले आपले कारखाने सुधारण्याची शक्य तितकी तजवीज करतील अशी हमी सरकारनें त्यांज-कडून घ्यावयास नको काय? गिरणीवाल्यांना प्रथम स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करूं द्या. तो सफल होतच नाहीं असें ठरल्यास एवढा मोठा देशी धंदा बुडूं नये म्हणून त्यांचें संरक्षण करणें सरकारचें कर्तव्यच आहे, पण तत्पूर्वी संरक्षणछत्रामुळें गिरणीवाले अधिक ऐदी बनणार नाहींत एवढी तरी खात्री त्यांज-कडून करून घेण्यांत यावी.

संरक्षण देणें जरूरच आहे असें ठरल्यास तें आयात जकातवाढीच्या रूपानें द्यावें का बौंटीच्या मार्गानें द्यावें, का परदेशीं जाणाऱ्या कापसावर निर्गत जकात लादून त्या प्रकारानें द्यावें, याविषयींहि साक्षीदारांत एकवाक्यता नाहीं. या तीन उपायांतला कोणता उपाय हितकारक आहे याची चर्चा करणें अगत्याचें आहे; पण तो विचार स्वतंत्र लेखांतच करणें बरें.

## हिंदी चलनाचा सोन्याशीं घटस्फोट १०

### ( पूर्वार्ध )

[ जागतिक मंदीच्या वेळीं इंग्लंडमधील सुवर्णचलन गडगडलें आणि त्याचा परिणाम हिंदुस्थानासहि भोगावा लागला. त्या वेळीं हिंदी इंपीरिअल बँकेला व हिंदुस्थान सरकारला आपलें चलनविषयक धोरण ठरविण्याला अवधि न देतां भारतमंत्री सर सॅम्युएल होअर यांनीं हिंदी चलनाचें सोन्याशीं ठरलेलें प्रमाण रद्द केल्याचें जाहीर केलें. या संबंधांत या लेखांत ऊहापोह केला असून, त्याच्या पुढच्या लेखांत याच विषयाच्या आनुषंगानें रुपयाचें मूल्य परराष्ट्रांतील चलनाशीं केव्हां किती ठरवावें म्हणजे तें स्थिर राहील याची चर्चा केली आहे. ]

( केसरी, दि. २९ सप्टेंबर १९३१ )

नगर वाचनालय, सातारा.



### गरजवंता 'न्यायनीति' नाहीं

'गरजवंता अक्कल नाहीं' अशी म्हण आपल्या भाषेंत रूढ आहे. ही म्हण तितकीशी वस्तुस्थितिदर्शक नाहीं. गरजवंतांना अक्कल नसते किंवा असलेली जाते हें खरें नसून उलट 'गरज ही तर अकलेची खाण आहे' अशी जी इंग्रजींत म्हण आहे ( Necessity is the mother of invention ) तीच अधिक समर्पक आहे. अर्थातच गरजू माणूस अक्कल चालवून कांहीं तरी शक्कल शोधून काढतो; पण त्यांत न्यायनीति मात्र पाहात नाहीं. तेव्हां 'गरजवंता अक्कल नाहीं' असें म्हणण्यापेक्षां 'गरजवंता न्यायनीति नाहीं' असें म्हणणें अधिक यथार्थ ठरेल.

इंग्लिश मुत्सद्द्यांची सध्यां अशीच स्थिति झाली आहे. इंग्लंडांतील सोन्याचा ओघ परराष्ट्राकडे जोराने वाहूं लागून देशांतील गंगाजळी कोरडी होते असें वाटूं लागतांच गरजू माणसाप्रमाणें इंग्लंडची स्वार्थी दृष्टि हिंदुस्थानच्या गंगाजळीकडे वळली. हिंदुस्थानच्या मालकीचें सोनें आपल्याला कसें राजरोस वापरतां येईल याविषयीं डोकें खाजवून भारतमंत्र्यांनीं अजब युक्ति शोधून काढली आणि हिंदी चलनाचा सोन्याशीं घटस्फोट करून इंग्लंडांतील पौंडाशीं त्याचा पाट लावून दिल्याचें जाहीर केलें ! इंग्लंडांतील कागदी चलनाच्या मोबदला सोनें देण्याचा कायदा तूर्त रद्द केल्याचें तेथें जाहीर होतांच हिंदी फडणविसांनीं येथेंहि सोनें देण्याची आपली जबाबदारी तहकूब केल्याचें जाहीर केलें होतें. परंतु मागाहून भारत-मंत्र्यांच्या हुकुमावरून सोन्याच्या विक्रीवर नियंत्रण ठेवणारा नवा वटहुकूम प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत सरकारी खजिन्यांतलें सोनें इंपीरियल बँकेमार्फतच मिळेल, तें २५ हजार पौंडांहून अधिक मागितलें तरच मिळेल आणि तेंहि ठराविक बँकांना ठराविक कामासाठींच मिळेल अशा अनेक अडचणींच्या अटी लादल्या. त्यांचा इत्यर्थ हाच कीं, इंग्लंडशीं व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांची तेवढी सोय होईल; पण इतरांच्या व्यवहाराच्या आड इतक्या अडचणी येतील कीं, नको तो त्रास असें वाटून त्यांस तो व्यवहार सोडावा लागेल.

अशा रीतीनें हिंदी गंगाजळींतील सोन्याचा ओघ दुसरीकडे वाहूं नये व त्याचा उपयोग इंग्लंडला मात्र आपल्या इच्छेप्रमाणें करतां यावा, या हेतूनें हें जें नवें फर्मान निघालें आहे, त्यांत हिंदी चलनाचा सोन्याशीं संबंध तोडला व यापुढें त्याचा पौंडाशीं संबंध जोडला असली भाषा स्पष्ट वापरलेली नाहीं. पण भारतमंत्री मात्र तिकडे विलायतेंत या घटस्फोटाचा व नव्या पाटाचा डांगोरा पिटीत आहेत; आणि येथील फडणीस सर जॉर्ज शूस्टर हे ह्याचा इनकार करीत नाहींत. यावरून त्यांची या जबरदस्तीच्या अत्याचाराला स्पष्ट संमति नसली तरी ते विरोध करूं इच्छीत नाहींत आणि प्रत्यक्ष कृतीनें ते हा अत्याचार चालूं देणार असें दिसतें. अशा रीतीनें हिंदुस्थानांतील चलनाचा सोन्याशीं असलेला संबंध तोडून तो इंग्लं-

डांतील पौंडाच्या कागदी चलनाशीं जोडण्यानें हिंदुस्थानवर मोठीच आपत्ति येणार आहे.

### पौंडाचा भाव नुकताच ढासळला

हल्लींल्या युगांत राष्ट्राराष्ट्रांचे आर्थिक संबंध एकमेकांशीं इतके निगडित झालेले असतात कीं, कोणत्याहि एका राष्ट्राला इतर राष्ट्रांतून जें कोणतें नाणें वापरलें जात असेल त्याची आपल्या नाण्यांत किंमत आजमितीला किती आहे याची नित्य चौकशी केल्याविना गत्यंतर नाहींसें झालें आहे. एका देशांतील नाण्यांत ठरणारा जो भाव तोच एक्स्चेंजचा (हुंडणावळीचा) भाव. हा भाव अनेक कारणांनीं वारंवार बदलत असतो. दोनहि देशांत सोन्याचेंच चलन असलें तरी त्या त्या देशांतील सोन्याच्या संग्रहाच्या कमजास्तपणामुळें तो भाव कमजास्त होतो. मग जेथें एका देशांतलें नाणें सोन्याचें व दुसऱ्या देशांतलें चांदीचें असा फरक असेल तेथें ही चलबिचल किती होत असेल याची कल्पनाच करावी! तथापि अशी चलबिचल रोजच्या रोज होत गेल्यास परस्परांमधील देवघेवीस, व्यापारास व दीर्घकालीन करारास मोठीच अडचण पडते. याकरितां प्रत्येक देशाचें सरकार आपल्या नाण्याचा भाव इतर राष्ट्रांत स्थिर राहील अशी कांहीं तरी योजना कायद्यानें वा अन्य मार्गानें करून ठेवतें. उदाहरणार्थ, इंग्लंडचें जें पौंडाचें नाणें आहे त्यांत ११३ ग्रेन शुद्ध सोनें असावें असा निर्बंध आहे. त्याचप्रमाणें अमेरिकेंतला जो सोन्याचा डॉलर आहे त्यांत २३.३२ ग्रेन शुद्ध सोनें असतें. हीं दोनहि नाणीं सोन्याचींच असून त्यांतील सोन्याचें प्रमाणहि स्थिर असल्यानें एका पौंडाला ४.८४ अमेरिकन डॉलर्स मिळावे हा नैसर्गिक भाव ठरतो. पण प्रत्यक्ष व्यवहारांत सोन्याचीं नाणीं वापरण्यांत येत नसून कागदी चलनावरच व्यवहार भागविण्यांत येतो. अशा वेळीं कागदी चलनाचा मोबदला देण्याइतकें सोनें कोणत्याहि एका देशांत नसलें व तसा बोभाटा बाहेर झाला कीं त्या देशाच्या नाण्याचा परदेशांतला हुंडणावळीचा भाव उतरतो व त्या मानानें दुसऱ्या नाण्याचा त्या देशांत भाव चढतो. महायुद्धापूर्वी इंग्लिश पौंड व अमेरिकन डॉलर यांचा भाव १ = ४.८४ हा स्थिर होता. महायुद्धांत इंग्लंडचें सोनें कमी झालें, देणें वाढलें आणि इंग्लंडची पत कमी झाली, त्यामुळें इंग्लंडच्या पौंडाला अमेरिकेंत ४.८४ डॉलर्स भाव येईनासा झाला. पण युद्ध संपवून पांच-सहा वर्षें होतात न होतात तोंच इंग्लंडनें आपली घडी कशीबशी बसवून आपल्या पौंडाची पत वाढविली आणि न्यूयॉर्कच्या सराफकट्टयावरचा इंग्लिश पौंडाचा भाव ४.८४ डॉलर्स स्थिर केला. हा भाव गेल्या दोन महिन्यांपूर्वींपर्यंत तसाच स्थिर राहिला होता. पण इंग्लंडच्या बजेटाची दिवाळखोरी चव्हाट्यावर आली व मंत्रिमंडळांतहि घालमेल झाली, त्याबरोबर हा भाव ढांसळला आणि आजमितीला न्यूयॉर्कच्या सराफकट्टयावर इंग्लिश पौंडाची किंमत ३.६० डॉलर्स म्हणजे पूर्वींच्या पाऊणपट झाली आहे. ही किंमत

आणखी अधिक उतरूं नये व शक्य तर परत ४·८४ डॉलर्सपर्यंत चढावी अशी इंग्लंडची धडपड चालू आहे, व त्याचकरितां इंग्लंडला हिंदी गंगाजळींतलें सोनें मिळाल्यास हवें आहे.

## रुपयाचा भाव स्थिर करण्याचा यत्न

कंपनी सरकारचें राज्य हिंदुस्थानांत स्थिर झाल्यावर कंपनीनें १८५२ सालीं हिंदुस्थानांतलें सोन्याचें नाणें बंद करून चांदीचें नाणेंच येथें कायदेशीर चलन ठरविलें. हिंदुस्थानांतलें नाणें चांदीचें व व्यवहार तर मुख्यतः इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान इत्यादि सोन्याचें नाणें वापरणाऱ्या देशांशीं ! अशा स्थितींत सोन्या-चांदीच्या भावांत बदल झाल्यानें हिंदुस्थानांतील रुपयांचा भाव इतर देशांत वारंवार बदलणें स्वाभाविक आहे, आणि अशा फेरबदलांमुळें व्यापारास तर मोठा धोका येतो. म्हणून हिंदुस्थान सरकारनें १८९३ सालापासून येथील रुपयाचा हुंडणावळीचा भाव कायद्यानें ठरवून टाकण्याचा क्रम सुरू केला. पांच वर्षें टिपणें पाहतां पाहतां अखेरीस सरकारनें १८९८ सालीं हिंदुस्थानांतील रुपयाचें पौंडाशीं लग्न लावून टाकलें ! हिंदी रुपया म्हणजे १/१५ पौंड. अर्थातच एका पौंडाबरोबर १५ रुपये म्हणजेच एका रुपायास १६ पेन्स असें हें प्रमाण कायद्यानें निश्चित केलें. इंग्लिश पौंड = ४·८४ डॉलर्स हा भाव नैसर्गिक आहे, कारण दोन्ही नाणीं सोन्याचींच आहेत; परंतु इंग्लिश पौंड = हिंदी १५ रुपये हा भाव कृत्रिम आहे. सोन्याचा भाव दर तोळ्यास २४ रुपये असा राहिला तर मात्र एका पौंडास १५ रुपये हा भाव नैसर्गिक ठरतो; पण सोन्याची किंमत २४ हून अधिक झाली किंवा उतरली तर तो भाव कृत्रिम ठरतो. १८९८ सालापासून १९१७ सालापर्यंत सोन्याचा भाव २४ रुपये तोळा असाच स्थिर राहिल्यामुळें एका रुपयास १६ पेन्स हा कायद्यानें जोडलेला संबंध कृत्रिम असून देखील नैसर्गिकच भासूं लागला. पण महायुद्धाच्या वावटळींत चांदी महाग झाल्यामुळें हा भाव टिकेना. तेव्हां १९२० सालीं सरकारनें कायदा बदलून रुपयास २४ पेन्स म्हणजे एका पौंडास २० रुपये असा संबंध नव्या कायद्यानें ठरविला. पण चांदीच्या भावानें पुनः उलट खाल्ली ! सोनें पुनः महाग होऊं लागलें. तेव्हां तो भाव टिकविण्याच्या नांवाखालीं, पण वस्तुतः इंग्लिश धनिकांची धन करण्यासाठीं, हिंदुस्थानांतल्या ठेवींतले ४०–५० कोटि रुपये व्यर्थ नासल्यावर सरकारनें हिंदी रुपया व ब्रिटिश पौंड यांचा घटस्फोट केला ! तथापि या दोनहि नाण्यांचा नित्य येणारा संबंध टाळणें अशक्य असल्यामुळें त्या संबंधाला कायदेशीरपणा कसा आणावा याचा विचार करण्यासाठीं १९२५ सालीं हिल्टन यंग कमिशन नेमण्यांत आलें. त्या कमिशननें हिंदी रुपयाचा संबंध पूर्वींसारखा इंग्लिश पौंडाशीं न जोडतां सोन्याशीं तो संबंध जोडून दिला म्हणजे हिंदी

रुपया हा पौंडाचा $\frac{3}{40}$ वा हिस्सा आहे असें न म्हणतां एका रुपयाबरोबर ८·४७ ग्रेन सोनें असें कोष्टक ठरवून टाकलें.

## हिंदी शेतकऱ्यांचें नुकसान

१८९८ च्या कायद्यानें रुपयाची किंमत $\frac{1}{15}$ पौंड म्हणजे ७·५३ ग्रेन ठरविली होती ती १९२७ च्या कायद्यानें ८·४७ ग्रेन म्हणजे $\frac{3}{40}$ पौंड ठरविली. याचाच अर्थ पूर्वी एक हजार पौंडांचा माल विलायतेस पाठविला असतां जे १५०० रुपये शेतकऱ्यांस मिळत असत ते या नव्या भावानें १३३३$\frac{1}{3}$ मिळूं लागले! अशा रीतीनें हिंदुस्थानचे शेतकरी व कारखानदार यांचें नुकसान होऊं लागलें. उलटपक्षीं विलायतेहून येणारा माल इकडे स्वस्त पडूं लागला खरा, परंतु हिंदुस्थानचा निर्यात व्यापार केव्हांहि आयात व्यापारापेक्षां अधिक असल्यानें दोहोंची वजावाट होऊन बाकी जे रुपये हिंदुस्थानास मिळावयाचे ते कमी मिळूं लागले. हें एक नुकसान झालेंच, पण शिवाय सरकारचा शेतसारा व इतर कर हे पूर्वीच्या भावानें ठरलेले असून नव्या भावानें ते भरणें जड जाऊं लागलें; तरी देखील ते कमी न केल्यामुळें तिकडूनहि अन्याय झाला व नुकसान होत आहे. उलटपक्षीं विलायतेला पैसे पाठविणाऱ्या नोकरशाहीची मात्र चंगळ झाली आहे!

अशा रीतीनें १९२७ सालच्या करन्सी ॲक्टानें या देशाचें दुहेरी नुकसान केलें असलें तरी या कायद्यानें रुपयाचा संबंध पौंडाशीं न जोडतां सोन्याशीं जोडला या योगानें त्यांतला अर्धा-अधिक कृत्रिमपणा कमी झाला. सोनें-चांदी यांच्या भावांत चलबिचल झाल्यानें काय नुकसान व्हावयाचें तें झालें खरें; पण पौंडाशीं संबंध जोडल्यानें पौंडाचा भाव उतरला कीं रुपयाचा भाव उतरला, पौंड बुडाला कीं त्याबरोबर रुपायालाहि जलसमाधि मिळाली, अशी निष्कारण परावलंबी आपत्ति यावयाची ती तरी आतांपर्यंत टळली होती; परंतु आमच्या नव्या साम्राज्यवादी भारतमंत्र्यांना तेंहि पाहवेना. त्यांनीं बेजबाबदारपणें व अनाधिकारानें असें जाहीर टाकलें कीं, १९२७ च्या कायद्यानें जो रुपयाचा संबंध सोन्याशीं जोडला होता तो तोडून यापुढें त्याचा संबंध पौंडाशीं जोडण्यांत आला आहे व हा संबंध कायम करण्याकरितां सरकार शक्य ते प्रयत्न करील!

## नव्या फर्मानानें ओढवणारी आपत्ति

या नव्या महंमद तघलघी फर्मानानें कोणकोणती आपत्ति ओढवणार तें पाहा. पूर्वीच्या करन्सी ॲक्टानें एक रुपया म्हणजे ८·४७ ग्रेन सोनें असा भाव ठरलेला असल्यानें इंग्लंडचा पौंड तरला किंवा बुडाला तरी अमेरिका, जपान, फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे देशांतल्या सराफ-कट्टयावरचा हिंदी रुपयाचा भाव कायमच राहत असे. म्हणजे इंग्लंडच्या एका पौंडाला न्यूयॉर्कमध्यें ४·८४ डॉलर मिळोत किंवा त्याच्या पाऊणपट ३·६३ डॉलर मिळोत, हिंदुस्थानांतून २७० रुपये

पाठविले असतां अमेरिकेंतून १०० डॉलर किंवा तितका माल मिळत असे, किंवा जपानांत १३० रुपये पाठविले असतां तेथले १०० येन किंवा तितक्या किंमतीचा माल मिळे. आतां रुपया हा जर पौंडाचा $\frac{३}{४०}$ वा हिस्सा मानला जाऊं लागला आणि पौंडाची किंमत उतरून जर पाऊणपट झाली तर त्या पौंडाचा संसर्ग रुपयालाहि बाधून अमेरिकेंत किंवा जपानांतहि रुपयाची किंमत पाऊणपटच मानण्यांत येणार! आणि पौंडाचीहि किंमत याच्याहि खालीं उतरून निम्मीच झाली तर रुपयाचीहि किंमत निम्मीच होणार! ही आपत्ति आतांच जाणवूं लागली आहे. मुंबई-हून न्यूयॉर्कचे १०० डॉलर घेण्यास पूर्वीच्या २७० च्या ऐवजीं आतां ३७६ रुपये आणि जपानचे १०० येन घेण्यास पूर्वीच्या १३० च्या ऐवजीं आतां १८६ रुपये पडूं लागले आहेत! आठ दिवसांपूर्वी आमच्या रुपयांत जितकी चांदी होती तितकीच आजहि असून ज्या डॉलरांना पूर्वी २७० रुपये द्यावे लागत असत, त्यांनाच पूर्वी-च्याच आकाराचे व वजनाचे ३७६ रुपये द्यावे लागावे हा परिणाम कशाचा? तर सर सॅम्युअल होअर यांच्या अत्याचाराचा! हिल्टन यंग कमिटीनें रुपयाचा संबंध पौंडाशीं जोडणें श्रेयस्कर नव्हे असा स्पष्ट अभिप्राय दिला होता, आणि रुपयाची सोन्यांत किंमत ठरवून त्याला थोडीशी तरी स्वतंत्रता दिली होती. अशा रीतीनें १९२७ च्या करन्सी ॲक्टानें रुपयांचा ठरविलेला कायदेशीर भाव स्टेट सेक्रेटरी हे असेंब्लीला न विचारतां आपल्याच शब्दानें कसे बदलूं शकतात? अर्थातच स्टेट सेक्रेटरींनीं हा बेकायदेशीर अत्याचारच केला व इंग्लंडच्या बुडणाऱ्या पौंडाशीं हिंदी चलनाची सांगड जोडून त्यालाहि जलसमाधि देण्याला ते तयार झाले! हा अत्या-चार थांबवून रुपयाची सांगड पुनः सोन्याशीं कशी घालावी आणि सध्यांच्या सोन्याचांदीच्या परिस्थितींत रुपयाचा भाव ७·५३ ग्रेन ठरवावा का ८·४७ ग्रेन ठरवावा का याहून निराळाच कांहीं ठरवावा, याचा विचार पुढील लेखांत करूं.

## ( उत्तरार्ध )

### फौलर कमिटीचा निर्णय

राष्ट्राराष्ट्रांमधील देवघेवीचे व्यवहार निर्धोकपणें चालण्यास आणि दीर्घ-कालीन करार निश्चितपणें करतां येण्यास प्रत्येक देशांतील चलनाचा भाव काय-द्यानें कोणत्या तरी एका स्वरूपांत निश्चित केला पाहिजे हें तत्त्व सर्वांसच मान्य आहे. आजच्या हिंदी चलनाचा भाव असा निश्चित न करतां तो वाऱ्यावर हेल-कावे खात सोडल्यास आणखी किती खालीं घसरत जाईल याची इतरांस तादृश कल्पना नसल्यास निदान तज्ज्ञांस तरी त्याची कल्पना चांगली आहे.

(केसरी, दि. ३ आक्टोबर १९३१)

१८९३ सालापूर्वी हिंदुस्थानांतील रुपयाची किंमत कोणत्याहि परराष्ट्रीय नाण्याशीं कायद्यानें निगडित केली गेली नव्हती. अर्थातच सोन्याचांदीच्या किंमतीच्या फेर-बदलाबरोबर रुपयाहि मागेंपुढें हेलकावे खात होता. अशी अनिश्चित स्थिति श्रेयस्कर नव्हे असा त्या वेळीं अनुभव आल्यावरूनच फौलर कमिटीनें रुपयाचा भाव १६ पेन्स ठरवावा असा निर्णय दिला, आणि त्याप्रमाणें कायद्यानें तो अमलांत आणिला.

रुपयाचा भाव त्यांतील शुद्ध चांदीच्या भावावर अवलंबून न ठेवतां कायद्यानें तो १६, १८ अगर २४ पेन्स ठरविणें म्हणजे आपल्या नाण्यावर मुद्दाम कृत्रिमतेचा शिक्का मारण्यासारखेंच आहे. परंतु जोंपर्यंत आपल्या देशांतलें नाणें इतर देशांतील नाण्यांहून भिन्न धातूचें आहे, म्हणजे जगांतील बहुतेक सर्व प्रमुख राष्ट्रांतल्याप्रमाणें जोंपर्यंत आपण आपल्या देशांत सोन्याचें नाणें कायदेशीर चलन म्हणून सुरू करूं शकत नाहीं, तोंपर्यंत परराष्ट्रांशीं व्यवहार करण्यासाठीं आपल्या चांदीच्या रुपयावर कोणत्या तरी सोन्याच्या नाण्याचा अदृश्य शिक्का मारून ठेवणें प्राप्तच आहे. फार तर काय, परंतु ज्या दोन राष्ट्रांमध्यें सोन्याचेंच पण भिन्न वजनामापाचें नाणें प्रचलित असतें, अशा राष्ट्रांस देखील आपापल्या नाण्याच्या भावांत, परराष्ट्रांशीं व्यवहार सुकर होण्यासाठीं, थोडीशीं कृत्रिमता पत्करावी लागते; मग जेथें चांदीचें नाणें वापरणाऱ्या देशाचा सगळा व्यवहार सोन्याचें नाणें वापरणाऱ्या देशांशीं चालावयाचा तेथें कायद्यानें कृत्रिम किंमत ठरवावी लागल्यास नवल काय?

## चांदीचा चढता भाव

वरील विचारसरणीवरून आपल्या देशांतील नाण्याची किंमत परराष्ट्रांतील नाण्यांत ठरवून ठेवण्याची आवश्यकता सिद्ध झाली तरी ती कृत्रिम किंमत नैसर्गिक किंमतीहून फारशी भिन्न असतां कामा नये हें उघड आहे. चलनी रुपयांतल्या चांदीची किंमत १२ पेन्स देखील नसतां त्याची पौंडाशीं सांगड जोडतांना जर आपण १८ पेन्स किंवा २४ पेन्स किंमत कायद्यानें ठरवून ठेवली तर ती स्थिर राहूं शकत नाहीं, व सगळे व्यवहार अतिकृत्रिम, घोटाळ्याचे व नुकसानीचे होतात. फौलर कमिटीनें रुपयाचा भाव १६ पेन्स ठरवावा असा अभिप्राय दिला त्या वेळीं रुपयांतील चांदीची किंमत १६ पेन्सांहून बरीच कमी होती खरी; पण ती १६ पेन्सांच्या थोडी जवळ येण्याचा संभव होता, आणि तशी ती कालांतरानें आली म्हणूनच १८९८ पासून १९१७ पर्यंत वीस वर्षे आपल्या देशांत हल्लींसारखा हुंडणावळीचा घोटाळा उपस्थित झाला नाहीं. महायुद्धाच्या कालांत चांदी अतोनात महाग झाली; त्यामुळें १६ पेन्सांचा भाव टिकणें अशक्य झालें. चांदीचा दर औंसाचा भाव ४४ पेन्सांच्या आंत होता तोंपर्यंत चांदीचें नाणें पाडण्यांत व दर पौंडास १५ रुपयेप्रमाणें मोबदला देण्यांत सरकारला नफा होत

होता. पण १९१७ सालीं चांदीचा भाव दर औंसास ४४ पेन्सांच्या वर गेला. १९१९ सालीं तर तो ६६ पेन्सांच्याहि वर गेला. १९२० च्या फेब्रुवारींत तो ९० पेन्सांच्या जवळजवळ जाऊन चांदीच्या महर्घतेची परमावधि झाली, आणि सरकारास चांदीचें नाणें पाडणें अशक्य झालें.

### दोन्ही कमिट्यांचीं चुकीचीं अनुमानें

चांदीचा भाव दर औंसास ४४ पेन्सांपर्यंत असेल तर रुपयाचा भाव १६ पेन्स हा परवडतो; आणि तोच भाव ६६ पेन्सांपर्यंत चढल्यास रुपयाचा भाव २४ पेन्स ठेवला तर रुपये पाडणें सरकारला परवडतें. १९२० सालीं तर चांदीची दर औंसाची किंमत ९० पेन्सांपर्यंत चढली. इतक्या महागाईची चांदी खरेदी करून रुपये पाडणें सरकारला परवडेना म्हणून सरकारनें सल्ला देण्यासाठीं तज्ज्ञांची कमिटी नेमली. त्या कमिटीला असें वाटलें कीं, ही चांदीची महर्घता थोडीबहुत कमी झाली तरी चांदीचा भाव यापुढें ५० ते ६० पेन्सांपर्यंत राहील; म्हणून बॅबिंग्टन स्मिथ कमिटीनें रुपयाच्या हुंडणावळीचा भाव २४ पेन्स ठरवावा असा सल्ला दिला, आणि हिंदुस्थान सरकारनें दूरवर विचार न करतां, आणि त्याच कमिटींतील हिंदी तज्ज्ञ दादीबा दलाल यांचा इशारा न मानतां, रुपयाचा हुंडणावळीचा भाव २४ पेन्स ठरवून टाकला. पण बॅबिंग्टन स्मिथ कमिटीचा अंदाज सपशेल चुकीचा ठरून चांदीची किंमक ९० पेन्सांवरून घसरत घसरत खालीं आली, आणि १९२७ सालीं ती ३० पेन्साला येऊन पोंचली. अशा वेळीं ही किंमत पुनः जास्तींत जास्त चढली तरी ४४ पेन्सांच्यावर जाणार नाहीं अशी खात्री बाळगून रुपयाचा भाव १६ पेन्स ठरविणें श्रेयस्कर ठरलें असतें आणि सर पुरुषोत्तमदास यांनीं तसा अभिप्राय दिलाहि होता. परंतु हिल्टन यंग कमिशनांतील बहुमत त्यांच्या विरुद्ध पडून १९२७ सालीं रुपयाचा भाव १८ पेन्स ठराविण्यांत आला; म्हणजे चांदीची किंमत पुनः चढून दर औंसास ४०–४५ पेन्सपर्यंत गेली तरी रुपये पाडण्यांत सरकारचें नुकसान होऊं नये असा यांतला हेतु स्पष्ट दिसला. परंतु बॅबिंग्टन स्मिथ कमिटीचें १९२० सालचें अनुमान जसें चुकीचें ठरलें तसेंच हिल्टन यंग कमिटीचें अनुमानाहि चुकीचें ठरलें, आणि चांदीचा भाव ३० पेन्सांहून अधिक चढण्याच्या ऐवजीं तो उतरतच चालला आणि आजमितीला तर तो १६–१७ पेन्सांच्या दरम्यान आहे. या भावानें रुपयाची वास्तविक किंमत पाहिल्यास ती अवघी सहा पेन्स ठरेल, आणि हुंडणावळीची किंमत तर १८ पेन्स म्हणजे खऱ्या किंमतीच्या तिप्पट आहे !

### रुपयाचा संबंध पौंडाशीं जोडणें अनुचित

सोन्याचांदीच्या सापेक्ष भावांत अशा प्रकारें हेलकावे बसत असल्यानें वास्तविक किंमत आणि कायद्यानें ठराविलेली किंमत यांच्यांत तंतोतंत मेळ बसणें किती

अशक्य आहे हें यावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. त्याचप्रमाणें रुपयाचा भाव कांहीं तरी निश्चित न करतां तो कायमचाच अनिश्चित ठेवणें, म्हणजे सुवर्ण-चलनाचा संबंधच तोडून कायमचें रौप्यचलन स्वीकारणें, हें आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें किती गैरसोयीचें आहे तेंहि सहज कळण्याजोगें आहे. अशा स्थितींत रुपयाचा भाव कायद्यानें सोन्याशीं किंवा सोन्याच्या एखाद्या नाण्याशीं जोडून देणेंच सोयीचें व हितपरिणामीं ठरतें. पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं, महायुद्धासारखें अकल्पित संकट ओढवलें किंवा सध्यांच्या जागतिक आर्थिक संकटासारखा प्रसंग आला तरी त्या वेळीं देखील आपण पूर्वी ठरविलेल्या भावाला चिकटूनच बसावें व नुकसान सोसावें किंवा बॅबिंग्टन स्मिथ कमिटीप्रमाणें घिसाडघाई करून कांहीं तरी भलताच भाव ठरवावा व तो पांचसात महिने देखील टिकूं नये! पाण्यांतील नांव कांठावरच्या झाडाला बांधून ठेवणें युक्त खरें, पण जेव्हां वावटळीनें तीरावरचीं झाडेंच मुळासकट उपटलीं जातात कीं काय अशी स्थिति वाटत असेल तेव्हां ती वावटळ शांत होईपर्यंत किंवा निदान तीरावरच्या अनेक झाडांतून कोणतें झाड तग धरूं शकेल तें निश्चित कळेपर्यंत तरी थांबणेंच श्रेयस्कर होईल. १९२१ पासून १९२७ सालापर्यंत हिंदी चलन असेंच सुटें होतें; पण त्यामुळें व्यवहार कांहीं बंद पडला नाहीं. सध्यां हिंदी चलनाची इंग्लंडांतील पौंडाशीं सांगड घालण्यांत आली आहे; पण जेथें स्वतः पौंडच जागेवर स्थिर नाहीं तेथें हिंदी चलन पौंडाशीं बांधलें गेल्यानें स्थिर राहील असें मानणें वेडेपणाचें नव्हे काय! असल्या परावलंबी अस्थिरतेपेक्षां स्वावलंबी अस्थिरता अधिक हानिकारक असूं शकत नाहीं.

### इंग्लंडचें तट्टू पुढें दामटलें

रुपयाची आंतरराष्ट्रीय किंमत स्थिर करण्याच्या दृष्टीनें त्याचा पौंडाशीं संबंध जोडणें कसें निरुपयोगी आहे तें वरील विवेचनावरून व्यक्त झालेंच आहे. अर्थातच रुपयाचा भाव सोन्याशींच निगडित करावा, हें ओघानेंच प्राप्त होतें. पौंडाचा भाव जसा चंचल आहे तसा सोन्याचाहि भाव तूर्त चंचलच आहे. तेव्हां हिंदी चलनाची नांव सोन्याच्या खुंटाला बांधली काय अथवा पौंडाच्या झाडाला बांधली काय दोन्ही सारखेंच, असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. परंतु सोन्याची किंमत जितकी लवकर स्थिर होईल तितकी पौंडाची किंमत लवकर स्थिर होणार नाहीं. शिवाय पौंडाशीं संबंध जोडल्यानें नुसत्या इंग्लंडच्या व्यवहारापुरती स्थिरता येणार; परंतु अमेरिकेशीं, जपानशीं, जर्मनीशीं व्यवहार करावयाचा झाल्यास त्यांत अनिश्चितता निश्चित आहे! मग यांत सरकारनें साधलें काय, तर इतर राष्ट्रांना अन्यायानें बाजूस सारून इंग्लंडचें तट्टू पुढें दामटलें! ही कारवाई इंग्लंडच्या हिताची असेल; पण इंग्लंडला असा व्यापाराचा जणुं काय मक्ता देण्यांत हिंदुस्थानचें नुकसानच आहे. उलटपक्षीं रुपयाचा भाव सोन्यांत ठरविल्यानंतर पुनः

नगर वाचनालय सातारा
संग्रहालय...


सोन्याच्याच किंमतींत चढउतार झाल्यास आजची अडचण पुढेंहि कायमच राहील खरी, पण ती अस्थिरता जशी हिंदुस्थानला तशीच अमेरिकेला, जपानला व जर्मनीलाहि लागू आहे. तेव्हां ती अस्थिरता एकट्या हिंदुस्थानला बाधक होऊं शकणार नाहीं.

### रुपयाचा भाव सोन्यांत ठरवावा

रुपयाचा भाव सोन्यांत ठरविणें योग्य व आवश्यक असलें तरी तो किती ठरवावा हें आतां पाहूं. १८९७ पासून १९२० पर्यंत तो भाव ७·५३ ग्रेन (१६ पेन्स) होता; पुढें १९२० सालीं तो ११·३ ग्रेन (२४ पेन्स) करण्यांत आला; पण तो एक महिना देखील टिकला नाहीं. पुढें १९२१ पासून १९२७ पर्यंत कागदोपत्रीं भाव ११·३ ग्रेनच कायम असला तरी व्यवहारांत तो भाव ११.३ वरून उतरत उतरत ७·५३ ग्रेन (१६ पेन्स) जवळजवळ येऊं लागला होता. पण तितक्यांत इंग्लंडची स्वार्थबुद्धि अनावर होऊन इंग्लंडच्या सांगण्यावरून हिंदुस्थान सरकारनें चलन आंखडण्यास सुरुवात केली आणि हिल्टन यंग कमिशनपुढें रुपयाचा भाव ८·४७ ग्रेन (१८ पेन्स) च्या आसपास घुटमळत आहे असा भास उत्पन्न केला आणि त्या कमिशननेंहि सिद्ध-साधकपणा करून तोच भाव (१८ पेन्स) ठेवावा असा निर्णय दिला. महायुद्धानंतर २० राष्ट्रांनीं आपल्या नाण्याचा भाव पूर्वीपेक्षां कमी केला; ९ राष्ट्रांनीं तो पूर्वीइतकाच ठेवला आणि एकट्या हिंदुस्थानवर मात्र तो पूर्वीपेक्षां १२½ टक्के वाढवून लादला गेला! यावरून ही गोष्ट किती अन्यायाची, जुलमाची व नुकसानीची झाली असेल तें वाचकांच्या लक्षांत येईल. असो. १९२७ पासून आजतागायत रुपयाचा हा १८ पेन्स भाव आपल्या पायावर केव्हांहि उभा राहूं शकला नाहीं. नवें नाणें पाडणें बंद करणें, असलेलें नाणें आंखडणें, परत हुंड्या विकणें इत्यादि कृत्रिम उपायांच्या कुबड्या देऊन सरकारनें हें सोंग गेलीं दोन-तीन वर्षें कसेंबसें उभें करून ठेवलें होतें. पण त्याला सध्यांच्या जागतिक आर्थिक वावटळींत थोडीशीं झुळूक लागतांच तें सोंग कोलमडून खालीं पडलें! आपल्या आवडत्या १८ पेन्सांच्या (८·४७ ग्रेन) सोन्याच्या भावाची अशी फटफजिती झालेली पाहतांच भारतमंत्री त्याच्या साहाय्यास धावून आले; आणि १८ पेन्सांच्या सोन्याच्या भावाचें सोंग परत उभें करणें अशक्य आहे असें पाहून त्यांनीं त्याच्या जागीं १८ पेन्सांच्या इंग्लिश नाण्याच्या किंमतीचा तोतया उभा केला! भारतमंत्र्यांनींच ही धूळफेंक केली म्हणून ते कायद्याच्या कचाटींत येऊं शकत नाहींत; एरवीं कोणी खाजगी व्यवहारांत असा करारभंग केला असता तर त्याला त्याबद्दल प्रायश्चित्त मिळालेंच असतें.

असो; हुंडणावळीच्या भावाचा १८९३ पासूनचा इतिहास पाहतां एक गोष्ट निश्चित आहे कीं, रुपयाचा १६ पेन्सांहून अधिक भाव केव्हांहि आपल्या

पायावर उभा राहूं शकला नाहीं. २४ पेन्सांचा भाव तर कृत्रिम उपायानें देखील टिकूं शकला नाहीं. १८ पेन्सांचा भाव सरकारच्या कृत्रिम कारवाईनें परवांपर्यंत उभा होता. पण त्याला तसा उभा राखण्यांत या देशाचें दरसाल कोट्यवधि रुपयांचें नुकसान होऊन येथील व्यापार व उद्योगधंदे बसले आणि बेकारी वाढली. नाण्यांचा भाव वास्तविक भावाहून चढता ठेवण्यांत आल्यास निर्गत व्यापार बसतो, आयात व्यापार वाढतो आणि देशांत बेकारी वाढूं लागते असा कटु अनुभव आल्यानें २०-२५ देशांनीं तो नाद सोडून देऊन आपला हुंडणावळीचा भाव आखडता घेतला. हिंदुस्थानला मात्र तसें आर्थिक स्वातंत्र्य नसल्यानें त्यास हा कटु अनुभव अद्यापि भोंवत आहे. तथापि सध्यांची योजना तात्पुरतीच असल्यानें ती बदलून नवा करन्सी ॲक्ट करून हा प्रश्न तडीस लावतां येईल. सध्यांची वावटळ एक-दोन महिन्यांत शांत होईल आणि त्यानंतर नवा कायदा करण्याची संधि मिळेल; मात्र तोंपर्यंत सरकारनें १८ पेन्सांचा भाव टिकविण्याच्या निमित्तानें येथला अगर विलायतेंतला सुवर्णनिधि फस्त करून टाकूं नये एवढी दक्षता घेणें जरूर आहे.

### एक रुपया = ७·५३ ग्रेन सोनें

नवा कायदा करतांना रुपयाचा भाव पौंड-शिलिंग-पेन्सांत निश्चित न करतां पूर्वीच्या कायद्याप्रमाणेंच तो सोन्यांत निश्चित करावा. मात्र तो भाव ठरवितांना ११·३ ग्रेन व ८·४७ ग्रेन हे दोन्ही भाव टिकूं शकले नाहींत आणि ७·५३ ग्रेन हा भाव बरींच वर्षें टिकून राहिला ही गोष्ट दृष्टीआड करूं नये. ज्या वेळीं चांदीचा भाव दर औंसास २५ पेन्सांपासून ४० पेन्सांच्या दरम्यान होता त्या वेळीं १६ पेन्सांचा भाव बिनहरकत टिकूं शकला. १८ पेन्सांचा भाव स्वाभाविकपणें टिकण्याला चांदीची किंमत दर औंसाला ४० पेन्सांच्या खालीं असतां कामा नये. चांदीची इतकी महर्घता १९१७ पासून १९२४ पर्यंतच काय ती होती. त्यानंतर चांदी उतरूं लागली आणि हल्लीं तर ती १६-१७ पेन्सांपर्यंत खालीं आली आहे. १९२० सालीं चढलेली ९० पेन्स ही किंमत जशी नैसर्गिक नव्हे तशी हल्लीं उतरलेली १६ पेन्सांची किंमतहि नैसर्गिक नव्हे. तेव्हां हे अपवाद सोडून दिल्यास यापुढें चांदीची किंमत २० ते २५ पेन्सांच्या दरम्यान राहील असें वाटतें. त्या दृष्टीनें पाहिल्यास रुपयाचा भाव १६ पेन्सांहूनहि (७·५३ ग्रेनहून) कमी धरावा लागेल. परंतु हिंदुस्थान सरकार जर हा भाव १६ पेन्स निश्चित करील, चांदी विक्रीला काढण्याच्या ऐवजीं चांदी खरेदी करून नवें चलन पाडूं लागेल आणि सध्यांची नाण्याची टंचाई दूर करील तर व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ होऊं लागून चांदीचा हल्लींचा पडता भाव बराच सावरूं लागेल; तथापि तो ४० पेन्सांच्या वर जाण्याची संभवनीयता नसल्यामुळें रुपयाचा भाव १८

पेन्सांला केव्हांहि येऊं शकणार नाहीं. याकरितां रुपयाचा कृत्रिम भाव नैसर्गिक भावाच्या लंबकाच्या हेलकाव्याच्या निदान आटोक्यांत तरी आणावयाचा झाल्यास तो १६ पेन्सांहून अधिक ठेवतां कामा नये. अर्थातच एक रुपया म्हणजे ७·५३ ग्रेन सोनें हा भाव भावी कायद्यानें निश्चित करावा.

पण जगांतील सोन्या-चांदीच्या सापेक्ष किंमतींत अनेक कारणांनीं फेर-बदल होणें साहजिक असल्यामुळें एकदां ठरविलेला भाव यावच्चंद्रदिवाकरौ कायम राहील अशी कोणीही समजूत करून घेऊं नये. त्याकरितां जरूर तर त्या कायद्यांतच असें कलम घालून ठेवावें कीं, चांदीची किंमत दर औंसास २० ते ३० च्या दरम्यान असेपर्यंत हा भाव कायम राखण्यांत येईल व जर कांहीं आकस्मिक कारणांमुळें तो भाव २० पेन्सांच्या खालीं अथवा ३० पेन्सांच्या वर गेला तर या कायद्याचा फेरविचार करण्यांत येईल. सारांश, सध्यां रुपयाचा भाव पौंडाशीं जोडून तो राखण्याकरितां हिंदी गंगाजळी रिती करण्याचें आत्मघातकी धोरण बंद करावें; आणि चांदीचा भाव थोडासा स्थिर होतो आहे असें दिसतांच चालू कायदा बदलून रुपयाचा संबंध पुनः सोन्याशीं जोडावा; मात्र तो भाव १६ पेन्सांहून (७·५३ ग्रेनहून) कमी असला तरी चालेल, पण त्याहून अधिक मात्र असूंच नये.

# संपादकीय धोरण

## केसरी पत्राचें ध्येय, धोरण व ब्रीद १

केसरी वर्तमानपत्र प्रसिद्ध करण्याचें ठरलें त्या वेळीं पहिलें प्रसिद्धिपत्रक छापलें गेलें त्यांत पुढील वाक्य आहे, तें असें – "वरील वर्तमानपत्रांत विवेचन जें करावयाचें तें निःपक्षपातबुद्धीनें व आम्हांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें असा आमचा कृतसंकल्प आहे; सदर पत्रांतील लेख त्यास ठेवलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें." या वाक्यावरून केसरीचें धोरण सामान्यतः कोणतें राहणार त्याची दिशा ठरली. "जें सत्य असेल तेंच सांगावयाचें, त्यांत पक्षपातबुद्धि धरावयाची नाहीं आणि सांगावयाचें तें निर्भयपणानें व सडेतोडपणानें सांगावयाचें" हें त्याचें ब्रीद. यांत जो सत्य शब्द वापरला आहे तो "यल्लोकहित-मत्यन्तं तत्सत्यमिति धारणा" या वचनांतील व्याख्येला अनुसरूनच वापरलेला आहे. जी जी गोष्ट जनतेच्या कल्याणाची असेल तीच सत्य आणि तिचाच पुरस्कार करावयाचा, लोकहितापुढें व्यक्तीच्या मताचें महत्त्व मानावयाचें नाहीं. कोणाहि व्यक्तीचा अभिमान न धरतां तत्त्वाचा अभिमान धरावयाचा आणि तें तत्त्व ठरवितांना आपल्या देशांतील जनतेच्या कल्याणाची कसोटी त्याला लावावयाची. ज्यापासून लोककल्याण साधेल तेंच सत्य आणि जें जें लोककल्याणाला बाधक असेल तें तें असत्य, अतएव त्याज्य होय. या धोरणानेंच आजपर्यंत केसरींतील लेख प्रसिद्ध केले गेले आहेत; व्यक्ति किंवा संस्था कितीहि मोठी असो, तिचें मत किंवा आचरण समाजाला अकल्याणाच्या मार्गाला नेत असेल तर त्याविरुद्ध झोड

(केसरी, हीरकमहोत्सव अंक, दि. ३ जानेवारी १९४१)

उठवावयाची आणि जी जी गोष्ट समाजाच्या कल्याणाला उपकारक असेल तिचा पुरस्कार करावयाचा व ती प्रचलित करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करावयाचा हेंच केसरीचें ब्रीद आहे.

समाजाला अशा प्रकारचें शिक्षण देणें आणि समाजाला तसें वळण लावणें हें धोरण केसरीनें अखंड चालू ठेवलें आहे व त्यापासून तो कधींहि ढळला नाहीं.

राष्ट्राच्या हिताला विघातक अशी कृति ज्याच्या ज्याच्या हातून घडेल त्याला त्याला विरोध करून त्याच्या अहितकारक कृतींना प्रतिबंध करावयाचा व अशी कृति करणारे ते आपले प्रतिपक्षी मानून त्यांच्या तसल्या कृतीला आळा घालण्यासाठीं चोहोंकडून चळवळीची उठावणी करावयाची, हेंच केसरीचें ब्रीद आहे व त्या ब्रीदापासून तो आजवर कधींहि रेसमात्रहि ढळला नाहीं.

कित्येकांना वरील विधान अतिशयोक्तीचें, आत्मश्लाघेचें आणि धाडसाचें वाटेल. या आक्षेपांपैकीं आत्मश्लाघेचा आरोप केवळ मानण्यावर व भिन्न दृष्टिकोनावर अवलंबून असल्यानें त्याच्याविरुद्ध आम्ही फारशी तक्रार करीत नाहीं. इतरांना आत्मश्लाघा वाटली तर वाटो, आम्हांला जें सत्य वाटतें तेंच सांगावयाचें असल्यानें आम्ही वस्तुस्थिति म्हणूनच हें विधान केलें आहे.

### मुख्य प्रश्न तपशिलाचा नसून तत्त्वाचा आहे

हें सत्य आहे असें म्हटल्यानंतर त्यांत अतिशयोक्तीचा प्रश्नच उद्भवत नाहीं; परंतु धाडसाचा आरोप कांहींसा विचार करण्यासारखा असल्यानें त्याचा खुलासा करणें आवश्यक आहे. साठ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दींत वरील ब्रीदाला बाधक असा लेख चुकूनहि एखाद्या वेळीं आला नसेल अशी हमी देणें धाडसाचेंच आहे, असें वाटण्याचा संभव आहे; आणि मनुष्यप्राणी हा चुकीला पात्र असल्यामुळें आजवर केसरीच्या चालकांकडून कधीं चूक झालीच नसेल असें आम्हीहि म्हणूं शकत नाहीं. चुका अनेक वेळा झाल्या असतील, पण त्या गैरसमजुतीनें किंवा अपुऱ्या माहितीनें झाल्या असतील व त्या तशा झाल्या असल्यास त्यांची दुरुस्तीहि त्या त्या वेळीं केली गेली आहे; पण अशा चुका या तपशिलाच्या किरकोळ बाबतींत संभवतात; पण येथें मुख्य प्रश्न तपशिलाचा नसून तत्त्वाचा आहे आणि तत्त्व हें विचारपूर्वकच ठरविलें जात असल्यानें तेथें चुकी संभवत नाहीं. अर्थातच ज्या ज्या गोष्टी राष्ट्रहिताच्या म्हणून केसरीनें विचारपूर्वक ठरविल्या त्या तत्त्वाच्या प्रसारार्थ झटण्यांत केसरीनें कधींहि कसूर केली नाहीं आणि त्या तत्त्वाशीं तो कधींहि बेइमान झाला नाहीं.

उदाहरणार्थ, स्वातंत्र्यप्राप्ति हें एकदां ध्येय ठरविल्यावर जी जी संस्था, जी जी व्यक्ति आणि जी जी कृति स्वातंत्र्याच्या ध्येयाला बाधक असेल तिचा पाडाव करण्याला केसरीनें कधींहि आळस केला नाहीं; आणि त्या बाबतींत खुद्द सरकारचा

किंवा इतर कोणत्याहि मोठ्या संस्थेचा किंवा व्यक्तीचा मुलाहिजा केसरीनें राखला नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीला पोषक व अनुकूल असलेल्या संस्थेचा व व्यक्तीचा पुरस्कार करणें क्रमप्राप्तच कर्तव्य ठरतें. पण तीच संस्था व तीच व्यक्ति स्वतः त्या ध्येयापासून च्युत झाल्यास केसरीलाहि आपलें तोंड वळवून जिचे पूर्वी लाड केले तिचेच वाभाडे काढावे लागले. यांत बाह्यतः विसंगति दिसत असली तरी मूळ तत्त्वाच्या व ब्रीदाच्या दृष्टीनें पाहिल्यास त्यांत विसंगति मुळींच नसून अढळ अशा ध्येयाशीं तें सुसंगतच आहे.

## वाघाला घराचे रक्षक मानलें नाहीं

स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाला पहिली आडकाठी परकीय सरकारची; त्यामुळें परकीय सरकारशीं झगडणें हें क्रमप्राप्तच कर्तव्य ठरलें व तें कर्तव्य केसरी गेलीं साठ वर्षें अखंड बजावीत आला आहे. त्याच्या या दृष्टिकोनांत कधींहि बदल झाला नाहीं व आपलें ध्येय केसरीनें आपल्या दृष्टीपुढून कधींहि ढळूं दिलें नाहीं, असें आम्ही आव्हानपूर्वक ठामपणें सांगूं शकतों. साठ वर्षांत केसरीचे संपादक अनेक वेळा बदलले. त्यांत एकाची बुद्धिमत्ता व लेखनशैली दुसऱ्यास जशीच्या तशीच साधत नसल्यामुळें विचारप्रदर्शनाच्या पद्धतींतहि फरक पडला असेल. कोणीं वाघाला वाघ म्हटलें असेल तर कोणीं वाघ्या म्हटलें असेल, अथवा कदाचित् वाघोबाहि म्हटलें असेल. पण वाघाला आपल्या घरचा रक्षक असा इमानी कुत्रा मानण्याची चूक व त्याचे लाड करण्याचें अराष्ट्रीय धोरण कोणींहि कधींच स्वीकारलें नाहीं. ज्या दिवशीं आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य गेल्याची जाणीव जागृत होऊन स्वातंत्र्यप्राप्तीची तळमळ लागून राहिली व त्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं जनतेंत जागृति करून जनतेची पात्रता वाढविण्यासाठीं केसरीचा अवतार झाला त्या दिवसापासून परकी सरकार हाच मुख्य प्रतिपक्षी ठरला व त्याच्याशीं प्रतिपक्षी म्हणूनच आपली वागणूक केसरीनें सतत चालविली आहे, यांत केव्हांहि तिळमात्र खंड पडलेला नाहीं.

## डावपेंच बदलतात

पण कित्येक वेळा असें होतें कीं, प्रतिपक्षी म्हटला तरी त्याच्याशीं लढावयाचे प्रकार व त्याचीं साधनें नेहमींच सारखीं राहत नाहींत. ध्येय तेंच, त्याच्या आड येणारा प्रतिपक्षी तोच असें असूनहि प्रतिपक्षाचे पेंच बदलले कीं आपलेहि पेंच बदलावे लागतात. त्यावरून कित्येक वेळां अज्ञ जनांची अशी समजूत होते कीं, यांची कुस्ती थांबली आणि हे शत्रूंत मिसळून दोस्त झाले ! पण वास्तविक प्रकार तसा नसतो. किल्ला सर करावयाचा असतांना प्रथम ३० मैलांवरून मारा करतांना ज्या तोफा व जीं इतर साधनें उपयोगीं पडतात, तींच साधनें कांहीं तटाशीं जाऊन भिडल्यावर उपयोगीं पडत नाहींत. तेथें तोफांच्यापेक्षां दोरीच्या

बखर वाचनालय, सातारा.



शिड्याच अधिक उपयोगी पडतील आणि त्या शिड्यांवरून तटावर चढून गेल्यावर घरांत घुसणें व संगिनीचा मारा करणें हेंच साधन योग्य ठरेल. अशीं साधनें बदललीं म्हणून किल्ला घ्यावयास निघालेल्या सेनानीनें आपला बेत बदलला, किल्ला घेण्याचें ध्येय टाकलें, तो शत्रूशीं लगट करूं लागला, त्याच्या आंगचें पूर्वीचें धाडस गेलें वगैरे सर्व कल्पना चुकीच्या व बाष्कळ होत. केसरीविरुद्ध कित्येकांचे कित्येक वेळा जे आक्षेप ऐकूं येतात, तेहि याच कोटींतील होत. आम्हांला स्वराज्य नको, आम्ही स्वराज्यप्राप्तीचा उद्योग सोडून दिला, अथवा स्वराज्यासाठीं आम्ही यापुढें कोणताहि त्याग करणार नाहीं असें धोरण ज्या वेळेला केसरी जाहीर करील, त्या वेळींच आक्षेपकांनीं शिव्या देण्याला तोंड उघडावें. तत्पूर्वीची त्यांची सगळी बडबड त्यांच्याच अज्ञानाची दर्शक होय.

### प्रतिपक्षी एकच पण सहायक वेगळे म्हणून लढ्याचें स्वरूप वेगळें

हिंदी स्वातंत्र्याकरितां झगडावयाचें तें ब्रिटिश सरकारशींच, हें निश्चित असल्यानें प्रतिपक्षी एकच ठरला. पण तो प्रतिपक्षी असा वस्ताद आहे कीं, तो नेहमीं कोणा तरी सहायकाला हातीं धरतो आणि त्याला लढावयाला लावून आपण नामानिराळा राहतो. त्यामुळें स्वातंत्र्याच्या लढ्याचें स्वरूप नेहमीं बदलत असतें. हें मर्म ज्याला कळत नाहीं त्याचा गैरसमज होतो. हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत ब्रिटिश सरकारनें काय काय हिकमती केल्या पाहा. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची भाषा सुरू होतांच व त्याकरितां कॉंग्रेससारखी राजकीय संस्था स्थापन होतांच हिंदी लोकांत धर्मभोळेपणा आहे, त्यांच्या चालीरीति रानटी आहेत, ते स्त्रियांना क्रूरपणानें वागवितात, त्यांच्या सामाजिक चालीरीति आचरटपणाच्या आहेत, त्यांच्यांत शिक्षणप्रसार अत्यल्प आहे इत्यादि अनेक बयादि सांगून तुम्ही या सगळ्या गोष्टींत सुधारणा कराल तरच तुम्हांस स्वराज्य मिळेल आणि या सुधारणा केल्याशिवाय तुमच्या अंगीं स्वराज्य चालविण्याची पात्रता येणार नाहीं, असें प्रतिपादन करण्यास सुरुवात करून बुद्धिभेद करण्याला प्रारंभ केला. त्याबरोबर आमच्यांतल्याच चांगल्या शाहाण्यासुरत्या लोकांवरहि ती मात्रा लागू पडली आणि ते लागले सामाजिक सुधारणेच्या नादीं ! आणि इंग्लिश सरकार निश्चित म्हणूं लागलें कीं, आतां पन्नास वर्षें तरी कटकट मिटली. पण लोकमान्य टिळकांनीं तो डाव ओळखला आणि या हुलकावणीनें फसून न जातां राजकीय हक्कांची मागणी आधीं निग्रहानें करा असा आग्रह त्यांनीं चालविला.

आधीं सामाजिक का आधीं राजकीय या वादाचें बीज वर दिग्दर्शित केलेल्या बुद्धिभ्रंशांतच आहे. टिळकांना प्रगति व योग्य सुधारणा नको होत्या असें नाहीं; पण अमुक इतकी सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय स्वराज्याची

पात्रता अंगीं येत नाहीं, ही कल्पनाच आपल्या स्वराज्याच्या चळवळीला बाधक आहे, हें त्यांनीं ओळखलें आणि सामाजिक सुधारणा झाल्याखेरीज राजकीय चळवळीकडे पाहणें योग्य ठरणार नाहीं असें म्हणून भांडणाऱ्या प्रतिष्ठ लोकांशीं त्यांना झगडा करावा लागला. हा झगडा न करावा तर स्वराज्याची चळवळ दुरावते आणि झगडा करावा तर आपल्याविषयीं सुशिक्षितांत गैरसमज पसरतो असा पेंच पडला असतां टिळकांनीं स्वतःवर येणाऱ्या आक्षेपांची पर्वा न करतां राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत खंड पडूं दिला नाहीं.

## सरकारच्या शहाला काटशह

सामाजिक सुधारणेची मात्रा चालत नाहीं, असें पाहून अधिकाऱ्यांनीं मुसलमानांना हातीं धरलें आणि त्यांना चिथावून देऊन हिंदु-मुसलमानांचा वाद उत्पन्न केला. याहि वादाला टिळकांनीं भीक घातली नाहीं आणि आपली चळवळ भलत्या रुळावर जाऊं दिली नाहीं. हें पाहतांच ब्रिटिश पाताळयंत्री अधिकाऱ्यांनीं मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ व जादा जागा मागण्याची चिथावणी दिली. ब्रिटिश अधिकाऱ्यांची ही कारवाई ओळखून टिळकांनीं मुसलमानांशीं करार घडवून आणून त्यांच्याशीं एकप्रकारची एकी केली आणि सरकारचा सगळा डाव उधळून टाकला. त्यानंतर ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाचा प्रचार सुरू झाला. त्या वेळीं टिळकांना ब्राह्मणेतरांची समजूत काढावी लागली. अशा रीतीनें ब्रिटिश सरकार जो जो शह देईल त्याला काटशह देऊन टिळकांना आपलें ध्येय गांठावयाचें होतें. त्यामुळें कधीं ते सुधारकांशीं झगडतांना दिसत, तर कधीं मुसलमानांची समजूत काढण्यांत किंवा त्यांची कारवाई हाणून पाडण्यांत गढलेले दिसत. ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद विकोपाला जाऊं न देण्यासाठींहि त्यांना झटावें लागलें. ही सर्व कामगिरी करीत असतांना स्वराज्यावरची त्यांची दृष्टि ढळली नव्हती. तथापि वरवर पाहणाऱ्यांना त्यांच्याविषयींहि गैरसमज उत्पन्न होई. पण इतक्याहि प्रतिकूल परिस्थितीला टक्कर देऊन जेव्हां त्यांनीं सरकारला अगदीं कोंडींत गांठलें, आणि महायुद्धाच्या अडचणींनीं नाक दाबलें, त्या वेळीं कोठें सरकारनें तोंड उघडून जबाबदार राज्यपद्धतीचें ध्येय मान्य केलें, आणि सुधारणांचें बाहुलें पुढें केलें. अर्थातच त्यानंतरच्या लढ्याची दिशा थोडीशी बदलली. सुधारणांचा आराखडाच दृष्टीसमोर नव्हता त्या वेळचें लढ्याचें स्वरूप जाऊन सुधारणायुगांत लढ्याला निराळें स्वरूप प्राप्त झालें. इंग्लंडांत १८३२ त रिफॉर्म अ‍ॅक्ट पास झाल्यानंतर मतदारांना सुशिक्षित करून, त्यांच्या साहाय्यानें निवडणुकी यशस्वी करून, सरकारच्या राज्यकारभारांत अडवणूक करून आपले हक्क वाढवून घ्यावयाचे ही जशी प्रथा सुरू झाली, तशी प्रथा हिंदुस्थानांतहि १९२१ सालापासून सुरू होईल व त्या मार्गानेंच यापुढें स्वराज्याचा लढा चालेल अशी टिळकांची अपेक्षा होती.

आणि त्यांनीं १९२० सालीं आपल्या मृत्यूपूर्वीं डेमॉक्रॅटिक स्वराज्यपार्टीचा जो जाहिरनामा तयार केला, तो याच धोरणानें लिहिला होता.

### नवे अंतःस्थ कलह व ते मिटविण्याचे मार्ग

वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, स्वराज्यसंपादनासाठीं ब्रिटिश सरकारशीं टिळकांची झुंज सतत चालू होती. तरी पण ब्रिटिश सरकार आपल्या वतीनें लढण्याकरितां जेव्हां सुधारक, मुसलमान, ब्राह्मणेतर अशा वर्गाला पुढें करीत असे त्या त्या वेळीं टिळकांना त्या वर्गाशीं झगडावें लागलें. पण त्यांत स्वातंत्र्यप्राप्तीचा मूळ उद्देश सुटला असें मुळींच नाहीं. १९२० नंतर सरकारनें आणखी इतर अंतःस्थ कलह पेटवून दिले. भांडवलवाले व मजूर, जमीनदार व शेतकरी, धनको व ऋणको, नागरिक व खेडूत, स्पृश्य व अस्पृश्य असे अनेक पोटभेद मानून कधीं एका वर्गाला तर कधीं दुसऱ्या वर्गाला चिथावणी देऊन राष्ट्राची शक्ति आपआपसांतील यादवींतच क्षीण व्हावी आणि आपल्यावरील हल्ल्याचा जोर कमी व्हावा अशी कुटिल नीति सरकारनें अवलंबिली. त्यामुळें केसरीलाहि त्या त्या वर्गाचें योग्य समाधान करण्यासाठीं त्या त्या प्रतिपक्षाशीं वाद करावा लागला. आणि या वादांत केवळ एकाचीच बाजू सर्वथैव न्यायाची आणि दुसऱ्याची बाजू निवळ जुलमाची असलें अतिरेकी, व समाजव्यवस्थेला एकंदरीनें बाधक, असलें मत केसरीचें नसल्यानें केसरीला कधीं एकाच्या वतीनें तर कधीं त्याच्याच विरुद्ध लिहावें लागलें. भांडवलवाले मजुरांना पिळून काढतात असें दिसलें तेथें मजुरांच्या न्याय्य हक्कांसाठीं केसरी मजुरांच्या बाजूनें झगडला. अविचारी व अदूरदर्शी पुढाऱ्यांच्या नादीं लागून जेव्हां मजूरवर्ग उठल्या-सुटल्या संप करून राष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या उत्कर्षाच्या मुळावरच घाव घालतो असें दिसलें त्या वेळीं केसरीनें मजूरवर्गाची कानउघाडणी केली. शेतकरी वर्ग, कर्जबाजारीपणानें अत्यंत दीन अवस्थेस पोंचला असल्यामुळें त्याच्या सोडवणुकीचे योग्य उपाय केसरीनें सुचविले. पण सावकार तेवढा सर्वथैव लबाड, त्याची संपत्ति ही लुटारूपणाची कमाई असल्यामुळें ती त्याच्याकडून बिनमोबदला एकदम जप्त करावी आणि सावकार व जमीनदार वर्ग सर्वथैव बुडवावा असलें अतिरेकी व समाजविघातक मत केसरीला मान्य नसल्यामुळें असल्या घातक चळवळीला केसरीनें विरोध केला. अस्पृश्यांची मानीव अस्पृश्यता जाऊन त्यांना मानवी समाजाचे सर्वसामान्य नैसर्गिक हक्क मिळावे याकरितां केसरी सनातन्यांशीं झग-डला. पण अस्पृश्यांचे कांहीं बेफाम पुढारी हिंदुधर्मच बुडविला पाहिजे, ब्राह्मणं-वर्गाला अरबी समुद्रांत बुडवून टाकलें पाहिजे, मनुस्मृति जाळली पाहिजे आणि देवालयें जमीनदोस्त करून टाकलीं पाहिजेत असला आत्मघातक प्रचार करूं लागले, तेव्हां त्यांच्या त्या बेफाम प्रचाराला आळा घालणें केसरीला जरूरीचें वाटलें.

## शरीरावर वार करण्यापूर्वी ढालीवर वार

या सर्व अंतःस्थ कलहापेक्षां हिंदु-मुसलमानांतला झगडा गेल्या दहा वर्षांत अत्यंत विकोपाला गेला. स्वातंत्र्योत्सुक वीरांचे वार चुकविण्याला मुसलमानांची ढाल अधिक उपयोगी पडणारी आहे, असें वाटल्यावरून सरकारनें ती ढाल पुढें करून स्वराज्य देण्याची टाळाटाळी चालविली आहे. आणि या झगड्यांत सरकारला चीत करावयाचें झाल्यास आधीं त्यांच्या हातची ढाल दूर केली पाहिजे. हें क्रमप्राप्तच असल्यानें केसरीला हिंदुसभेचा पुरस्कार करून मुसलमानांचीं राष्ट्रविघातक कारस्थानें चव्हाट्यावर मांडावीं लागलीं आणि अत्यंत खेदाची गोष्ट अशी कीं, कॉंग्रेसपक्षच अदूरदर्शीपणानें मुसलमानांचा कैवारी बनल्यानें कॉंग्रेसवरहि या बाबतींत तेवढ्यापुरता हल्ला चढवावा लागला. यामुळें इतका खोल विचार न करणाऱ्या माणसास कित्येक प्रसंगीं असा देखावा बाह्यतः दिसूं लागला कीं, केसरीकार स्वातंत्र्यसंपादनासाठीं सरकारशीं झगडावयाचें सोडून आपली शक्ति कॉंग्रेसशीं, मुसलमानांशीं, सुधारकांशीं, अस्पृश्यांशीं, मजूरवर्गाशीं, शेतकऱ्यांशीं लढण्यांत व्यर्थ व्यतीत करीत आहेत. पण वास्तविक प्रकार असा आहे कीं, सरकारशीं चाललेल्या अखंड झगड्यांतलेंच हें एक विशिष्ट व प्रसंगप्राप्त अंगच आहे.

प्रतिपक्षांशीं द्वंदयुद्ध खेळत असतांना तो प्रतिपक्षी आपल्याच आप्तांपैकीं कोणाला तरी वश करून घेऊन त्याला पुढें करून त्याच्या आड लपूं लागला, तर प्रतिपक्षाचा समाचार घेण्यासाठींच त्या आप्ताचा समाचार घ्यावा लागतो किंवा अनेक शस्त्रास्त्रांनीं सजलेल्या योद्ध्याशीं लढावयाचें झाल्यास तो जें जें शस्त्र पुढें करील त्याचा प्रतिकार करण्याला उपयोगी पडेल असेंच शस्त्र आपणांस हातीं घ्यावें लागतें आणि प्रतिपक्षी आपल्या बचावाची जी ढाल पुढें करील अथवा जें कवच व शिरस्त्राण अंगावर घालील त्याच्यावरच आधीं मारा करावा लागतो. अशा वेळीं युद्धकलेचा अनभिज्ञ टीकाकार जर असें म्हणूं लागला कीं, तुम्ही शत्रूच्या छातीवर वार करण्याऐवजीं त्यांच्या ढालीवर कसले वार करीत बसला आहां, तर असल्या बाष्कळ टीकेनें वीराला आपलें योग्य धोरण बदलण्याचें कारण नाहीं. शरीरावर वार करण्यापूर्वी ढालीवर वार करावा लागतो, एवढेंच नव्हे तर एक ढाल तुटली असतां दुसरा मनुष्य जर दुसरी ढाल त्याच्या हातीं देण्यासाठीं येत असेल तर त्या दुसऱ्या मनुष्यासहि अडविणें हें डावपेंचाच्या दृष्टीनें अगदीं आवश्यकच आणि परिणामकारकहि असतें. सरकारविरुद्ध चालविलेल्या झगड्यांत मुसलमानांच्यावर आणि त्या मुसलमानांना डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या कॉंग्रेसवाल्यांवर केसरीकारांचा इतका निकराचा हल्ला कां, याचा उलगडा वरील दाखल्यावरून सुज्ञ वाचकांस होईल. परकी सरकार हा आमचा मुख्य प्रतिस्पर्धी हें निःसंशय खरें आहे; आणि भरतखंडाला स्वातंत्र्य

कारभार्याचें असल्यास त्या सरकारला जेरीस आणावयाचे सर्व उपाय जारीनें अमलांत आणले पाहिजेत हेंहि शतशः खरें आहे, पण तूर्त तरी परकी सरकारला मुसलमानांची मोठी ढाल हातीं सांपडली असून कॉंग्रेसवाले त्या मुसलमानांना डोक्यावर बसवून घेऊन प्रोत्साहनच देत आहेत. याकरितां केसरीकारांना सरकारच्या हातची ही ढाल हिराऊन घेण्यासाठीं हिंदुसमाजांत जागृति उत्पन्न करून तो समाज बलसंपन्न करण्याचें कार्य हातीं घ्यावें लागलें आहे. बलसंपन्न अशा हिंदु-समाजाच्या तीक्ष्ण धारेपुढें आपल्या हातची मुसलमानांची ढाल निरुपयोगी ठरते असें सरकारला कळून आलें म्हणजे सरकार वठणावर येईल आणि मग अखंड भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग खुला होईल. तसा तो मार्ग खुला व्हावा यासाठींच केसरीचा अखंड प्रयत्न चालू आहे.

## टिळकांच्या धोरणाची यथार्थ कल्पना

परिस्थिति बदलली तर धोरणाहि बदलावें लागतें याची ज्यांना कल्पना नाहीं त्यांना टिळकांच्या राजकारणाची यथार्थ कल्पना येणार नाहीं आणि मग अर्थातच टिळकांच्या पश्चात् गेल्या २० वर्षांत टिळकांचेंच धोरण केसरीनें पुढें चालविलें आहे ही कल्पनाहि त्यास पटणार नाहीं. पण अशा दुरा-राग्यांच्या नादीं लागण्यांत कांहीं हंशील नाहीं. कित्येकांची चळवळीविषयींची कल्पना इतकी विपरीत असते कीं, त्यांना टिळकांचें सुद्धां धोरण पटत नाहीं. १९०८ सालचे टिळक तेवढे आम्हांला मान्य, पण १९१४ सालानंतरचे टिळक अमान्य असेंहि म्हणणारे कांहीं हरीचे लाल आढळतात ! ज्यांना टिळकांच्याच जुन्या व नव्या धोरणांतली सुसंगता कळत नाहीं, त्यांना १९२० नंतर केसरी-कारांनीं टिळकांचेंच धोरण पुढें चालविलें ही गोष्ट कशी पटणार ? अशा सारा-सार विचारहीन लोकांची राजकारणाची कल्पना किती अव्यवहार्य व अदूरदर्शी असते तें सिद्ध करणें हा प्रस्तुतचा विषय नसल्यानें तो सोडून देऊं. त्यांना एवढेंच मोघम उत्तर देऊन ठेवूं कीं, शिकारीवर झडप घालणारा सिंह देखील आपले डाव-पेंच प्रसंगानुरूप बदलतो मग सनदशीर झगडा करणाऱ्याची तर काय कथा ? असो.

## एकसूत्रीपणाची कोणतीहि कसोटी लावा

पण ज्यांना टिळकांचें धोरण अखेरपर्यंत मान्य होतें आणि ज्यांना टिळकांचें मृत्युपत्र असें मानलेला डेमॉक्रॅटिक स्वराज्य पार्टीच्या निवडणुकीचा जाहीर-नामाहि मान्य आहे, अशांना टिळकांच्या मृत्यूनंतर केसरीचें धोरण पूर्वीचें राहिलें नाहीं, असें म्हणावें याचें आश्चर्य वाटतें. टिळकांनीं आपलें धोरण डेमॉक्रॅटिक पार्टीच्या जाहीरनाम्यांत लिहून ठेवलें आणि आपल्या अखेरच्या मृत्युपत्रांतहि " केसरीची एडिटोरियल पॉलिसी हल्लीं आहे ती बदलूं नये ", हल्लीं आहे तशीच चालवावी, असें मुद्दाम नमूद केलें आणि टिळकांनींच श्री. तात्यासाहेब केळकर

३६, ... पेठ

यांनींच केसरीचे संपादक आणि संस्थेचे ट्रस्टी म्हणून राहावें अशी इच्छाहि व्यक्त केली. टिळकांचेंच धोरण तात्यासाहेब केळकर हे चालवतील अशी तत्पूर्वीच्या २४ वर्षांच्या अनुभवावरून व त्यांतल्या त्यांत १९१४ पासून १९२० पर्यंत म्हणजे टिळकांच्या गैरहजेरींत नव्हे तर सान्निध्यांत व त्यांच्या डोळ्यासमोर, टिळकांची खात्री पटली नसती, तर टिळकांनींच एक तर हल्लीचेंच संपादकीय धोरण चालू ठेवा असें मृत्युपत्रांत लिहिलें नसतें, किंवा तात्यासाहेब केळकरांना संपादक व ट्रस्टी न नेमतां दुसरीच कांहीं व्यवस्था केली असती. ती तशी केली नाहीं यावरून तात्यासाहेब केळकरांनीं टिळकांचेंच धोरण चालविलें होतें हें सिद्ध आहे.

टिळक हयात होते तोंपर्यंत केळकरांनीं टिळकांच्या मताप्रमाणें लिहिलें असेल, पण मागाहून त्यांनीं पगडी फिरविली असेल असें म्हणावें तर तसा प्रकार कोठेंहि दिसून येत नाहीं. एकदां रुळाला लागलेली आगगाडी जशी ठरलेल्या मार्गानेंच पुढें जाते त्याप्रमाणेंच टिळकांच्या मृत्यूनंतरहि पूर्वीच्याच रुळावरून केसरीची गाडी चालत राहिली. याचा प्रत्यंतर पुरावा हाच कीं, केसरींतल्या १९२० च्या ऑगस्टपासून कोणताहि अग्रलेख घ्यावा आणि त्याला टिळक-सूक्ति-संग्रहांतून एखादा योग्य मथळा देतां येतो काय हें पाहावें, म्हणजे सूक्तिसंग्रहांतील टिळकांच्या तोंडचें किंवा हातचें वचन अलीकडील लेखांच्या शिरोभागीं समुचितच दिसेल व त्यावरून एकसूत्रीपणाची खात्री पटेल.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, केसरीवर आक्षेप घेणारांनाच टिळकांचें खरें धोरण काय होतें, याची यथार्थ कल्पना आलेली नसते. मनुष्याच्या तोंडचें कुठल्या तरी वेळचें एखादें वाक्य घेऊन त्यावरून जन्माचें शील ठरविणें हें जसें चुकीचें होईल, तसेंच एखाद्या राजकारणी पुरुषाच्या कुठल्या तरी भाषणांतलें अथवा लेखांतलें एखादें वचन ऐकून किंवा वाचून त्या राजकारणी पुरुषाचें धोरण ठरविणें हें हास्यास्पद होय. वक्ता वेळप्रसंग बघून बोलत असतो व लेखकहि देशकालमर्यादा जाणून लिहीत असतो. अशा स्थितींत त्याचें कोठलें तरी संदर्भरहित एखादें वचन त्याच्या सगळ्या धोरणावर प्रकाश कसा पाडणार ? मनुष्याचें शील ठरविण्याला त्याचें समग्र चरित्र पाहिलेलें असलें पाहिजे, त्याप्रमाणेंच राजकारणी पुरुषाच्या अनेक हालचाली सूक्ष्मतेनें निरीक्षिल्या तरच त्याच्या धोरणाविषयीं बरोबर कल्पना येईल. टिळकांचें समग्र चरित्र इतक्या सूक्ष्मपणें पाहणें हें आक्षेपकांना शक्य होतें, का केळकर प्रभृति केसरीच्या संपादकवर्गास तें अधिक शक्य होतें, याचा विचार वाचक सहज करूं शकतील. कोणतेंहि धोरण ठरविण्या-पूर्वी टिळक स्वपक्षांतील पुढाऱ्यांशीं साधकबाधक सर्व प्रकारची चर्चा करीत आणि आपलें मत ठरवीत; यामुळें केळकर प्रभृति जवळच्या मंडळींना टिळकांनीं काय केलें एवढेंच माहीत नसून तें कां केलें, कसें केलें, हेंहि माहीत असे. आक्षेपकांना टिळ-

कांची उघड कृति तेवढी दिसे; पण तिच्या पाठीमागील कारणें व डावपेंच त्यांना माहीत असणें शक्य नव्हतें. त्यामुळें जेव्हां जेव्हां टिळक आज असते तर त्यांनीं काय केलें असतें असा प्रश्न निघतो, त्या वेळीं त्यांच्या पूर्वीच्या एखाद्या कृतीवरून तिऱ्हाइतानें काढलेलें अनुमान खरें असण्यापेक्षां टिळकांच्या धोरणाशीं समरसता पावलेल्या अनुयायांनाच टिळकांनीं काय केलें असतें हें नक्की सांगतां येतें.

### टिळकांचीं सर्व बाबतींतलीं मतें सर्वतोपरी मान्य

टिळकांच्या मतांशीं समरस होण्याचा प्रश्न निघाला म्हणून ओघानेंच व थोडासा आत्मश्लाघेचा दोष पत्करून प्रस्तुतच्या संपादकाला एवढें नमूद करून ठेवावेंसें वाटतें कीं, प्रस्तुतच्या लेखकाचें टिळकांच्या मताशीं अधिकांत अधिक तादात्म्य प्रतीतीस येईल. १८९२ सालचा टिळकांचा 'ओरायन' हा पहिला ग्रंथ आणि १९२० च्या एप्रिल महिन्यांतील सांगलीची पंचांग-परिषद येथपर्यंतच्या २८ वर्षांच्या कारकीर्दींत टिळकांनीं जे जे ग्रंथ लिहिले, जीं जीं भाषणें केलीं, जें जें इतर लिखाण लिहिलें त्यांतलें मर्म प्रस्तुत संपादकाला सर्वतोपरी पटलें आहे. महाभारत ग्रंथाविषयींची आवड असो, गीतारहस्यांतलें कर्मयोगाचें प्रतिपादन असो, शिवाजी, रामदास प्रभृति ऐतिहासिक विभूतींच्या कामगिरीचा प्रश्न असो, ईश्वराचें अस्तित्व, आत्म्याचें अविनाशित्व, पुनर्जन्म इत्यादि वेदान्तविषय असोत, अथवा स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे हक्क, अस्पृश्यतानिवारण, मद्यपानबंदी इत्यादि सामाजिक चळवळी असोत, कीर्तनसंमेलन असो अथवा ऐतिहासिक संशोधन असो, प्रत्येक बाबतींत प्रस्तुत संपादकाला टिळकांचीं मतें अवगत झालीं असून तीं पूर्णतः पटलीं आहेत. इतर अनेक अनुयायांचा कोठल्या ना कोठल्या तरी मुद्द्यांवर टिळकांशीं थोडा तरी मतभेद असेल, पण प्रस्तुत लेखकाला टिळकांचीं राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शिक्षणविषयक सर्वच्या सर्व मतें संपूर्णपणें निरपवाद मान्य आहेत. असें असतां टिळकांचीं कोठलीं तरी दोनचार व्याख्यानें ऐकलेले व त्यांच्या लेखांतील कांहीं थोडा भाग केव्हां तरी वाचलेले असे आक्षेपक ज्या वेळीं टिळकांचें अमक्या विषयावर मत असेंच होतें आणि त्यांनीं असेंच केलें असतें आणि टिळकांच्या अनुयायांपैकीं कोणालाहि टिळकांचें खरें मत कळलेलेंच नाहीं असें म्हणूं लागतात तेव्हां त्यांचें धाडस पाहून हंसूं येतें.

सांगण्याचा मतलब येवढाच कीं, जुन्या तशाच नव्या केसरीकारांना टिळकांचें समग्र चरित्र आणि त्यांचीं जाहीर व खासगीं सर्व मतें अवगत असल्यानें टिळकांनीं केव्हां काय केलें आणि केव्हां कोणती गोष्ट टाळली हें ध्यानांत आणून, त्या धोरणानें प्रस्तुतच्या परिस्थितींत टिळकांनीं काय केलें असतें तें तर्कानें जाणून त्यांच्याशीं सुसंगत असेंच धोरण राखतां येतें; आणि म्हणूनच केसरीच्या धोरणांत अखंड एकसूत्रता टिकलेली आहे.

अखंड भारतीय मराठी पत्रकार परिषद, पुणें

# अक्षय्य टिकणाऱ्या कलाकुसरीचे कारागीर बना २

(स्वागताध्यक्ष केसरीकार श्री. ज. स. करंदीकर यांचा पत्रकारांना सल्ला)

" वीस-पंचवीस वर्षांनंतर आपल्या वृत्तपत्रांच्या व नियतकालिकांच्या जुन्या फायली चाळल्यावर त्या वेळीं पुनःश्च वाचण्यासारखें व संग्रहीं ठेवण्यासारखें जें लिखाण असेल तीच आपली वाचकांना व समाजाला खरी देणगी होईल. बाकीचें लिखाण ही शोभेची दारू. ती पेटत असेल तोंपर्यंत पाहण्यांत मौज, पण एकदां ती विझून गेली कीं, मागें काय कोळसे व खापऱ्या! समारंभाच्या शोभेकरितां अशा दारूचीहि गरज असतेच व त्यांत ती तयार करणाऱ्याच्या कौशल्याची तारीफ होत नाहीं असें नाहीं. पण वृत्तपत्रकारांनीं आपण केवळ शोभेची दारू तयार करणाऱ्या कारखानदारासारखे घटकाभर शोभेचें लिखाण लिहिणारे न बनतां पिढ्यानुपिढ्या अक्षय्य टिकणाऱ्या कलाकुसरीचें काम करणारे कारागीर व्हावें अशी ईर्षा बाळगून चालावें. निदान आपल्या लिखाणाला जास्तींत जास्त दिवस आयुष्य लाभेल असें ज्ञान त्यांत ओतण्याची महत्त्वाकांक्षा धरून ती सफल होण्यासाठीं जरूर ते कष्ट सोसण्याची तयारी दर्शविली पाहिजे," असा स्फूर्तिप्रद संदेश स्वागताध्यक्ष श्री. ज. स. करंदीकर यांनीं आपल्या भाषणांत मराठी पत्रकारांना दिला.

पत्रकार-प्रतिनिधि बंधूंनो,

## पत्रकारांच्या स्थानिक संघटना

यंदाचें हें संमेलन भरविण्याचें कार्य येथील पत्रकार संघाच्या विद्यमानें होत आहे, हें आवर्जून सांगण्यांतला हेतु असा कीं, पत्रकारांचा संघ निर्माण व्हावा, असा जो ठराव पूर्वीच्या संमेलनांत झालेला होता त्याची पुणें शहरांत बजावणी होऊन राहिली आहे, हें आपल्या निदर्शनास यावें. अखिल महाराष्ट्रांतील पत्रकारांचा एक मध्यवर्ति संघ असावा, ही गोष्ट इष्ट आहे व ती आम्हांसहि मान्य आहे. पण असा मध्यवर्ति संघ निर्माण करण्यापूर्वी ठिकठिकाणीं असेच स्थानिक संघ निघून त्यांचें कार्य जोमानें व निर्वेधपणें चालू लागल्यास मध्यवर्ति

(केसरी, दि. २० मे १९४१)

संघाच्या स्थापनेला त्याचा मोठा उपयोग होईल. आधीं सुटे मणी आणि नंतर त्याचा एकत्रित हार हा क्रम अधिक स्वाभाविक व व्यावहारिक आहे. त्या दृष्टीनें पुण्यास पत्रकारांचा संघ स्थापन होऊन गेले कित्येक महिने त्याचें काम सुरळीतपणें चालू आहे. आणि असा संघ स्थापन झाल्यामुळेंच आजच्या या संमेलनाचें कार्य शिरावर घेणें आम्हांस सुकर झालें. या अनुभवाचा फायदा घेऊन, ज्या ज्या ठिकाणीं पत्रकारांची संख्या हाताच्या बोटांहून अधिक असेल तेथें तेथें प्रथम असे स्थानिक संघ निर्माण व्हावेत आणि नंतर अशा संघांच्या विचारानें मध्यवर्ति संघाची स्थापना व्हावी, हें युक्त होय. म्हणूनच जेथें जेथें असे संघ स्थापन झाले असतील त्यांचें मी हार्दिक अभिनंदन करतों. असा संघ स्थापन झाल्याचें अगदीं ताजें उदाहरण अकोल्याचें आहे. वऱ्हाडांत आणखीहि इतरत्र असे संघ स्थापन होत आहेत हें सुचिन्ह होय.

### 'पत्रकार' शब्दाची व्यापक व्याख्या

पत्रकार संघाच्या संबंधानें अद्यापि एकच एक कल्पना निश्चित झाली नसून या संबंधांत पूर्वीपासूनच थोडासा मतभेद असलेला दिसतो. पुण्याच्या संमेलनांत जेव्हां हा प्रश्न चर्चेला निघाला त्या वेळीं 'पत्रकार' या शब्दाची व्याख्या संकुचित करण्यांत आली; त्यामुळें त्या व्याख्येंत बसूं न शकणाऱ्या वार्ताहरांनीं व इतर लेखकांनीं आपापले वेगळे संघ स्थापण्याचा विचार योजिला. पण त्यामुळें कोणताहि एक संघ सुसंघटित व कार्यक्षम होऊं शकत नाहीं असा अनुभव आलेला पाहून, पुण्यांत पत्रकारांचा हा संघ स्थापन करतांना पत्रकार शब्दाची व्याख्या विस्तृत करण्यांत आली. या व्याख्येमुळें ज्याचा ज्याचा कोणत्याहि नियतकालिकाशीं लेखक या नात्यानें संबंध येतो त्याला त्याला या संघाचे सभासद होतां येतें. मागील संमेलनाचे अध्यक्ष श्रीयुत काकासाहेब लिमये यांनीं आपल्या भाषणांत अशीच व्यापक संघटना करण्याचा सल्ला दिला होता हें आपणांस विदित असेलच. पुण्यांतील संघाची स्थापना अशा विस्तृत पायावर झाली असून हें धोरण श्रेयस्कर आहे असें या संघास वाटतें व इतरांनाहि तसाच अनुभव येईल अशी अपेक्षा आहे. मराठी भाषेंतल्या लेखकांची संख्या आधींच मर्यादित. त्यांत स्वतंत्र ग्रंथकारांची आणि नियतकालिकांतील लेखकांची संख्या अधिकच मर्यादित असणार. तेव्हां एवढ्या अल्पसंख्य वर्गानें तरी आपल्यांत पोटभेद निर्माण न करतां सर्वांनीं एका समान भूमिकेवर राहून साहित्यसेवा करावी, व अशा अल्पसंख्य वर्गाच्या हिताची काळजी एकाच मध्यवर्ति संघाकडून घेतली जावी म्हणजे पोटसंघाच्या परस्पर विरुद्ध धोरणामुळें कार्यहानि होणार नाहीं व संघटना अधिक दृढ व प्रबळ होईल अशी अपेक्षा आहे.

## वृत्तसल्लागार समित्यांचा उपक्रम

मुंबईचें संमेलन होऊन दीड वर्ष होत आहे. मध्यंतरींच्या काळांत वृत्तपत्रकारांवरील सरकारी नियंत्रण सैलावत न जातां अधिक आंवळत चाललें. तथापि एक गोष्ट मात्र सरकारनें सकृद्दर्शनीं बरी दिसण्यासारखी केली. मध्यवर्ति 'प्रेस ॲडव्हायसरी' कमिटी नेमण्यांत आली असून तिच्या प्रांतवार शाखा स्थापण्यांत आल्या आहेत. या योगानें पत्रकारांना आपलीं गाऱ्हाणीं सरकारी अधिकाऱ्यांच्या कानावर घालण्याला एक प्रतिनिधिभूत संस्था मिळाली व अधिकाऱ्यांशीं प्रत्यक्ष संबंध आला. या प्रेस ॲडव्हायसरी कमिटीचा सल्ला कितपत विचारला जातो, आणि दिलेला सल्ला कितपत मानला जातो हा एक प्रश्नच आहे. त्याचा ऊहापोह परिषदेंत होईलच. येथें त्याचा उल्लेख करण्यांतला हेतु एवढाच कीं, मागील संमेलनानंतर पत्रकारांना सरकारदरबारांत पर्यायानें तरी प्रवेश मिळाला. त्याचा अधिकांत अधिक उपयोग करून घेणें व तेथें छाप पाडणें हें प्रेस ॲडव्हायसरी कमिटीच्या कार्यकौशल्यावर अवलंबून राहील.

## नवीन विधायक कार्याचा विचार

आपल्या मार्गांतील अडचणी, आपणांवर ओढवणारीं संकटें आणि सोसावी लागणारी दडपशाही यांचाच आपण नेहमीं अधिक विचार करतों आणि आपल्या ठरावांचाहि मुख्य भर निषेधावरच असतो. मला असें वाटतें कीं, 'न जानपदिकं दुःखं एकः शोचितुमर्हति।' या भारतकारांच्या वचनानुरोधानें सार्वजनिक संकटाचा सार्वजनिक रीतीनें ऊहापोह करण्याकरितां आपण जमत असल्यानें आपल्या गाऱ्हाण्यास येथें वाचा फुटावी व तद्दर्शक अनेक ठराव व्हावेत हें स्वाभाविक आहे. तथापि ही दुःखनिवारक विचारसरणीची बाजू बाजूस सारून आपण कांहीं थोडा वेळ तरी नवीन प्रवृत्तिपर विचारांना वेळ द्यावा. त्यांत कोणाचा निषेध करावयाचा नसल्यानें आणि परभारें परोपदेश न करतां 'सांगावें तें आपणाला आपणू करितां बरें' असें त्याचें स्वरूप असल्यामुळें ठरावांच्या भाषेत ते विचार न बसवितां त्यांस केवळ विचारविनिमयाचें स्वरूप द्यावें. आपल्या व्यवसायाची वाढ कशी होईल, त्याला सुस्थिति कशी प्राप्त होइल, अनेकांगानीं या व्यवसायांत भर कशी पडेल, आपलें लिखाण अधिकाधिक विचारप्रवर्तक कसें होईल, नवीन मार्ग दर्शविण्याला त्याचा अधिकाधिक उपयोग कसा होईल, या व्यवसायांत एकांगीपणा न येतां अव्यभिचारिणी भक्तीनें एकेका अंगाची जोपासना कशी होईल, आपलीं नियतकालिकें समाजांतील ज्या कानाकोपऱ्यांत आज प्रवेश करींत नसतील त्या कानाकोपऱ्यांतहि त्यांची गरज कशी उत्पन्न करतां येईल? आधींच पोटभर जेवणारांना अधिकाधिक आग्रह करून त्यांना अजीर्णमूलक व्याधि जडविण्याचें पातक करण्यापेक्षां ज्या क्षुधातुरांना कोणतेंच वाङ्मयभोजन मिळत नाहीं त्यांना पथ्यकर,

पुष्टिकर व कार्यप्रवणकर असें ज्ञानभोजन कसें देतां येईल, याचा शांत चित्तानें व खोल विचार केला जावा. निषेधपर ठरावांची संख्या जितकी कमी आणि नवीन शाखापल्लवोत्पत्तिदर्शक विचारविनिमय जितका अधिक तितका त्या परिषदेचा यशस्वीपणा अधिक अशी आपल्या परिषदेच्या यशापयशाची कसोटी आपण आपल्या दृष्टीसमोर ठेवून आपल्या कार्याला लागाल अशी मी अपेक्षा करतों.

## विशिष्ट विषयांचीं वृत्तपत्रें

विशिष्ट विषयाला वाहून घेतलेलीं वृत्तपत्रें आपणांत अगदींच नाहींत असें म्हटलें तरी चालेल; अशा प्रकारचीं नियतकालिकें कांहीं आहेत, परंतु साप्ताहिकें अगदींच थोडीं. त्यांची संख्या वाढावी आणि अशा पत्रांचें वाचकांकडून चीजहि केलें गेलें पाहिजे, नाहीं तर असलीं पत्रें स्वतंत्रपणें चालू शकणार नाहींत. अर्थातच मर्यादित कार्यक्षेत्र आणि वाचकप्रियता या दोहोंचा मेळ कसा घालावयाचा हा प्रश्न महत्त्वाचा आहे आणि त्याकडे आपणांस आपला विचारौघ वळवावा लागेल. ग्रामसंस्था, ग्रामपंचायती, लोकलबोर्डें, सॅनिटरी कमिट्या, म्युनिसिपालिट्या इत्यादि विषयांचा समाचार घेणारें पत्र लोकशाहीच्या नवीन राज्यव्यवस्थेंत चालण्याला हरकत पडूं नये. अशा विषयाला वाहिलेलें ग्रामणी पत्र बंद झालें ही खेदाची गोष्ट आहे. यावरून अद्यापि आपल्या समाजाची दृष्टि दिखाऊ राजकारणाकडून टिकाऊ लोकसंग्राहक कार्याकडे वेधली जात नाहीं असें दिसतें. ही परिस्थिति सुधारून आपलें लक्ष असल्या भरीव सुधारणांच्या विषयांकडे खेचलें गेल्यास आपल्या पत्रकारांच्या उपयुक्त कामगिरींत भर पडून आपली वजनदारी वाढेल.

## पत्रकारांचें वर्गीकरण करा

याकरितां माझी अशी सूचना आहे कीं, उपस्थित किंवा अनुपस्थित अशा सर्व पत्रकारांची यादी करून परिषदेच्या चिटणीसांनीं सर्व पत्रकारांचें विषयवारीनें वर्गीकरण करावें. अशी वर्गवारी दृष्टीसमोर असली म्हणजे आपण सगळे राजकारणाकडे द्रव्य, वेळ व बुद्धिमत्ता किती खर्च करतों आणि सामाजिक, औद्योगिक आर्थिक, ग्रामीण, कृषिविषयक व आरोग्यविषयक ज्ञानाचा प्रसार करण्याच्या कामाकडे किती दुर्लक्ष करतों याचा आढावा आपल्या डोळ्यापुढें राहील आणि त्यावरून कोणाला नाहीं तर कोणाला तरी क्षुण्णमार्ग सोडून अक्षुण्ण अथवा अत्यल्पक्षुण्ण मार्गाला लागण्याची प्रेरणा होईल.

## उदाहरणासाठीं एक सूचना

नवीन विषय या दृष्टीनें मला 'प्रवास' हा एक विषय सुचवावासा वाटतो. प्रवासाच्या सोयी, प्रवासाचीं साधनें, प्रवासांत घ्यावी लागणारी दक्षता, प्रवास अल्प खर्चांत व दगदगीशिवाय कसा होईल यासंबंधीं सूचना व योजना, प्रवाशांचे

कायदेशीर हक्क, त्या हक्कांचें उल्लंघन झाल्यास दाद लावून देणारी संस्था, स्त्री, बाल, रुग्ण, वृद्ध इत्यादिकांना ईप्सित स्थळीं पोंचविण्याचें काम करणारी एजन्सी इत्यादि गोष्टींचा ऊहापोह करणारें एखादें वृत्तपत्र सुरू केलें व त्याबरोबरच वर दिग्दर्शित केलेल्या कामांपैकीं एकेक काम क्रमाक्रमानें अंगीकृत करणारी एजन्सी निघाली, तर त्या दोहोंच्या सहकार्यानें समाजाची एक मोठी गैरसोय दूर होईल. मासल्या-दाखल एकदोन उदाहरणें सांगतों. सोलापुरास नुकत्याच झालेल्या चित्पावन परिषदेला पुण्याहून अनेक गृहस्थ गेले. पण त्यांतल्या कित्येकांना पुण्याहून सोलापूरचें बारा दिवसांच्या मुदतीनें रिटर्न तिकीट सवलतीनें मिळतें हें माहीत नसल्यानें जातां येतांचें वेगवेगळें तिकीट घेतलें जाऊन नुकसान झालें. प्रवासी वृत्तपत्र असलें व त्याच्या कचेरींत कोठल्याहि प्रवासाची माहिती मिळते असें कळलें तर उभयतांनाहि त्यांत फायदा होईल. दर महिन्याला रेल्वेचीं वेळापत्रकें खरेदी करण्यांत अनेकांचे पैसे खर्च होतात. 'प्रवासी' वृत्तपत्रानें सगळीं वेळापत्रकें मिळण्याची किंवा माहिती देण्याची सोय केली तर प्रवासी लोक त्याचा फायदा घेतील. मात्र दुसऱ्याला त्रास देऊन त्याच्याकडून फुकट माहिती मिळविण्याची आपल्या लोकांतली संवय नाहींशी झाली पाहिजे.

## पत्रकारांचें द्विविध कार्य

पत्रकारांनीं आपलें सर्व लक्ष केवळ चालू घालमेली आणि त्यासंबंधाचें अल्पकाल टिकणारें विधिनिषेधात्मक लिखाण याच्याकडेच गुंतवूं न देतां अधिक टिकाऊ व विद्वत्तापूर्ण अशा लिखाणाकडे आपली नजर सतत ठेवावी. हें सांगतांना मला आतां लवकरच सुरू होणाऱ्या पावसाळ्याची आठवण झाली आणि त्यावरून अशी कल्पना सुचली कीं, वृत्तपत्रकारांस जर कोणत्या सृष्टिचमत्काराची उपमा शोभत असेल तर ती पावसाळ्याची होय. पावसाचें कार्य जसें दुहेरी असतें तसेंच आपणां वृत्तपत्रकारांचें कार्यहि दुहेरी आहे. पावसाचें सद्यःफल उन्हामुळें होणारा ताप शांत करणें, रस्त्यावरील, घरावरील, झाडांझुडपांवरून धुरोळा पार घालवून टाकून त्यांना स्वच्छ व टवटवीत करणें आणि आरोग्याला बाधक अशी सगळी घाण वाहून नेऊन पार नाहींशी करणें, हें कार्य तर पावसानें केलें पाहिजेच; परंतु एवढेंच कार्य करून तो राहील तर ती वरकरणी तकलुपी साफसफाई होईल. पावसाचें खरें चिरफलदायी कार्य म्हणजे भूमीच्या पोटांत पाणी मुरवून त्याचा वर्षभर सर्व जनतेला उपयोग होईल असें करणें हें होय. वृत्तपत्रकारांनाहि अशी कामगिरी करावयाची असते. जेथें कोठें तत्कालीन जुलम, दडपशाही, अन्याय यांचा धुरोळा किंवा चिखल सांचला असेल तो आपल्या टीकाप्रवाहानें साफ धुवून नामशेष करावयाचा आणि दुःखितांचीं अंतःकरणें पुनःश्च टवटवीत करावयाचीं, हें नित्याचें कार्य चुकतां कामा नये. पण त्याबरोबरच पावसाचें पाणी जसें जमिनींत मुरलें

पाहिजे, वर्षभर तें पुरलें पाहिजे, त्याचप्रमाणें वृत्तपत्रकारांचें कांहीं लिखाण तरी वाचकांच्या मनांत खोल मुरलें पाहिजे आणि ती शिदोरी त्या वाचकांस पुढें जेव्हां केव्हां प्रसंग येईल त्या वेळीं उपयोगी पडली पाहिजे. अशी शिदोरी पुरविण्यासाठीं आपल्याला एकेक विषयाचा सखोल व मूलग्राही अभ्यास केला पाहिजे.

## शोभेच्या दारूचे दुकानदार

हल्लींच्या अभ्यासांत व लिखाणांत उथळपणा फार दिसतो. सध्याची वेळ भागली, चालू फड येन केन प्रकारेण जिंकला, वाचकाला आतांपुरतें रिझविलें व त्याच्या मनावरचें चिंतेचें पटल क्षणमात्र दूर केलें कीं आपलें काम भागलें, असें आपण मानतां कामा नये. वीस-पंचवीस वर्षांनंतर आपल्या वृत्तपत्रांच्या, नियतकालिकांच्या, जुन्या फायली चाळल्या तर त्या वेळीं पुनःश्च वाचण्यासारखें व संग्रहीं ठेवण्यासारखें जें लिखाण असेल तीच आपली वाचकांना व समाजाला खरी देणगी होईल. बाकीचें लिखाण ही शोभेची दारू. ती पेटत असेल तोंपर्यंत पाहण्यांत मौज, पण एकदां ती विझून गेली कीं मागें काय कोळसे व खापऱ्या ! समारंभाच्या शोभेकरितां अशा दारूचीहि गरज असतेच, व त्यांत ती तयार करणाऱ्याच्या कौशल्याची तारीफहि होत नाहीं असें नाहीं, पण वृत्तपत्रकारांनीं आपण केवळ शोभेची दारू तयार करणाऱ्या कारखानदारासारखे घटकाभर शोभेचें लिखाण लिहिणारे न बनतां पिढ्यानुपिढ्या अक्षय्य टिकणारें कलाकुसरीचें काम करणारे कारागीर व्हावें अशी ईर्षा बाळगून चालावें. निदान आपल्या लिखाणाला जास्तींत जास्त दिवस आयुष्य लाभेल असें ज्ञान त्यांत ओतण्याची महत्त्वाकांक्षा धरून ती सफल होण्यासाठीं जरूर ते कष्ट सोसण्याची सिद्धता आपण दर्शविली पाहिजे.

## परिषदेच्या कार्यासंबंधीं अपेक्षा

आपल्या रोजच्या व्यवसायासंबंधाची जी ही दृष्टि तीच आपण या परिषदेच्या कार्यासंबंधांतहि ठेवावी; आणि वरकरणी तात्पुरते भपकेबाज असे दिसणारे ठराव करण्यांत समाधान न मानतां आपल्या परिषदेचे ठराव निदान दहा वर्षांनंतर कोणी वाचून पाहील तर त्यास त्या वेळींहि ते विचार करावयास लावतील इतके भारदस्त व मूलग्राही असावेत अशी माझी अपेक्षा आहे.

# अ. भा. मराठी पत्रकार परिषद, मुंबई ३

## ( श्री. ज. स. करंदीकर, संपादक केसरी, यांचें अध्यक्षीय भाषण )

प्रिय प्रतिनिधि-बन्धूंनो,

### वकिलींतील तन्मयता

आपण पत्रकार आपापल्या पक्षाची, मतप्रणालीची, ध्येयाची वकिलीच करीत असतों. परंतु अशीलांचीं उसनीं भांडणें कोर्टांत भांडणाऱ्या वकिलांच्या-सारखी आमची वकिली अगदींच तकलुपी व वरकरणी नसते. आपण आपल्या अंगीकृत कार्याशीं इतकें समरस व एकजीव होऊन जातों कीं, वकिलांना जसा कोर्टांतला गाऊन कोर्टांतच काढून ठेवून मोकळे होतां येतें, त्याप्रमाणें संपादकांना संपादकाच्या खोलींतलीं मतें खोलींतच ठेवून बाहेर वेगळेपणानें वावरतां येत नाहीं. आपण आपल्या मताशीं प्रतारणा करीत नाहीं हा आपला दोष नसून तो गुणच आहे असें मी मानतों; आणि ज्यांच्यांत इतकी तन्मयता बाणली नसेल त्यांनीं ती आपल्या अंगीं बाणून घ्यावी असेंच मी म्हणेन.

तथापि या गुणांतूनच एका अवगुणाचा उगम होतो व तेवढ्याकरितांच या विषयाचा मी ऊहापोह करीत आहें. आपल्या तत्त्वाशीं, मताशीं व पक्षाशीं एकनिष्ठ राहणें याचाच अर्थ इतरांशीं वितुष्ट येणें असा होऊं लागतो व त्या दोषाचें कोणीहि समंजस माणूस समर्थन करूं शकणार नाहीं. भक्तानें आपल्या आराध्यदेवतेविषयीं कितीहि पूज्यभाव ठेवला, तरी इतरांच्या देवतांची टवाळी केल्याशिवाय तो खरा एकनिष्ठ भक्त नव्हे, असें मानणें असमंजसपणाचेंच ठरणार आहे. परंतु कोणाहि पत्रकाराच्या मताविषयीं तत्पक्षीयाकडून भलेबुरें मत प्रकट करतांना, विरुद्ध पक्षा-विषयीं त्याच्या हातून किती असहिष्णुता प्रकट केली जाते याचीच कसोटी सर्वांच्या आधीं लावली जाते, हें बरें नव्हे, एवढेंच सुचविण्याचा माझा उद्देश आहे.

पत्रकार हेहि एक प्रकारें वकीलच आहेत आणि त्यांना जन्मभर जनतेची वकिली करावयाची असते. ही वकिली चोख करावयाची झाल्यास जनतेच्या सुख-दुःखांशीं आणि आकांक्षांशीं पत्रकारांनीं तन्मय झालेंच पाहिजे, त्याशिवाय त्यांना आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें पार पाडतां येणार नाहीं. परंतु जनतेच्या सुख-दुःखांशीं व आकांक्षांशीं तन्मय होणें म्हणजे जनतेंतल्या कोठल्याहि विशिष्ट वर्गाशीं, पंथाशीं अथवा मताशीं एकरूप होणें नव्हे. जनतेचीं सुखदुःखें जाणतां यावींत आणि तिच्या आकांक्षांशींहि पत्रकारांनीं आत्मीयतेनें एकरूप व्हावें,

( दि. ३० मे १९४२ )

तथापि तेवढ्यानें विशिष्ट पक्षाचीं सर्वच मतें जशींच्या तशीं मान्य केलीं पाहिजेत असें नव्हे. ध्येय मान्य असलें, तरी साधनाविषयीं मतभेद असूं शकतो आणि पत्रकारांनीं साधनांची योग्यायोग्यता परिस्थितीप्रमाणें ठरवावी लागते. याकरितां माझें तर मत असें आहे कीं, पत्रकाराला आपल्या मतस्वातंत्र्याची आणि कर्तृत्वाची चाड असेल, तर त्यानें कोठल्याहि एका विशिष्ट पक्षाला आपल्याला कायमचें बांधून घेऊं नये; ज्या कोणत्या पक्षाचीं मतें आपल्याला पटतील, त्याची वकिली त्यानें एकनिष्ठेनें करावी. तथापि आपली भूमिका केवळ वकिलाची न मानतां न्यायाधिशाची भूमिका घेण्याची भावना जागृत ठेवावी.

## पक्षाचा मिंधेपणा नसावा

विशिष्ट पक्षाची अथवा पंथाची संघटना होत असते तोंपर्यंत त्या पक्षाला आपल्या बाजूचें समर्थन करणाऱ्या पत्राची गरज भासत असते आणि तें कार्य साधण्याकरितां ते पत्रकाराशीं मिळतें घेतात. एवढेंच नव्हे, तर त्यांचे आर्जवहि करतात; परंतु एकदां पक्ष स्थिर झाला व बळावला म्हणजे त्या पक्षांतील नवे चालक जुन्या प्रारंभींच्या अडचणी विसरून जातात आणि मग आपल्यातर्फे वकिली करणाऱ्या पत्रकारावरच कुरघोडी करूं पाहतात. पत्रकार जर त्या पक्षाचा मिंधा बनला असेल, तर त्याला अशा परिस्थितींत आपलें स्वातंत्र्य गमावून आणि सदसद्विवेकबुद्धि बाजूस सारून, पक्षाच्या मनोदयानुरूप त्याची तरफदारी करावी लागते. विलायतेंत भांडवलशाहीच्या जोरावर प्रत्रकारांना अशा रीतीनें खाकोटीस मारतां येतें. इकडे भांडवलशाहीचा तितका वरचष्मा अद्यापि झाला नसला, तरी पक्षाच्या वाढत्या बळावर असला जुलूम चालू होतो. यास्तव ज्याला मिंधेपणा पत्करावयाचा नसेल, त्यानें आधींपासूनच कोणत्याहि पक्षाच्या आधीन न होतां आपला स्वतंत्र बाणा राखण्याची दक्षता घेतली पाहिजे.

पत्रकाराचा कोणत्याहि पक्षाशीं साक्षात् संबंध नसला, तरी त्याचीं मतें कोणत्याना कोणत्या तरी पक्षाशीं मिळतीं असणारच, आणि तेवढ्या दृष्टीनें तो अमुक पक्षाचा असा गणला जाईल; तथापि घुणाक्षर न्यायानें असें मतैक्य दिसणें वेगळें आणि मतैक्याविषयीं वचनबद्ध असणें वेगळें. अगाऊ वचनबद्ध होऊन आपलें मतस्वातंत्र्य आपल्याच हातानें घालवूं नये, एवढाच त्यांतला मुख्य मुद्दा आहे. अशा रीतीनें आपलें स्वातंत्र्य अबाधित राखण्याकरितां पत्रकारानें आपल्या पत्रांत शक्य तितकें विषयवैचित्र्य साधलें पाहिजे. म्हणजे पत्राचें वैशिष्ट्य राहतें, वाचकांवर त्याची छाप पडते आणि कोणत्याहि पक्षाच्या दडपशाहीस बळी पडण्याचा प्रसंग येत नाहीं.

## ध्येयवादित्व व आत्मविश्वास

पत्रकार स्वतः ध्येयवादी असून त्याच्या नसानसांतून त्याची कार्यनिष्ठा व

कळकळ ओतप्रोत भरलेली दिसली पाहिजे. ‘आत्मस्तुति परनिंदा मिथ्या भाषण कधीं न यो वदना’ हें साधुवचन यथोचित व मान्यच आहे. त्यांस अनुसरून पत्रकाराच्या लेखणींतून कधींहि ‘आत्मस्तुति’ व ‘परनिंदा’ लिहिली जाऊं नये हेंहि त्रिवार सत्य होय. पण आत्मस्तुति कागदावर लिहिली न गेली, तरी मनांतहि ती वागत असूं नये असें कांहीं शास्त्रकार सांगत नाहींत. किंबहुना आत्मप्रत्यया-विना कोणतेंहि महत्कार्य होत नाहीं हें सर्वश्रुतच आहे आणि असा आत्मप्रत्यय वाटण्यांत आत्मस्तुतीचें बीज असणें आवश्यकच आहे. इतरांहूनहि आपण कांहीं तरी वेगळें सांगूं शकतों आणि वेगळें सांगण्याचा संभव नसेल तेव्हां इतर जें सांगतात तेंच सांगावयाचें झालें, तरी तें आपण इतरांहून अधिक चांगल्या रीतीनें, अधिक प्रभावी भाषेनें, अधिक परिणामकारक रीतीनें सांगूं शकतों, असा ज्याला आत्मविश्वास वाटत नसेल त्यानें लोकशिक्षणाच्या या कंटकाव्रत मार्गांत पाऊल तरी कशाला ठेवावें ? वीराला ‘ मीच कुस्ती जिंकणार ’ असा अहंकार वाटणें हें जसें क्षम्य, तसेंच पत्रकाराला ‘ मीच फड जिंकणार ’ असा अहंकार मनांतून वाटणें हेंहि क्षम्यच आहे. पण तो अहंकार स्वतःच्या शब्दानें व्यक्त न होतां तो वाच-कांच्या तोंडून पर्यायानें व्यक्त होईल अशा कृतीनें तो बाहेर उमटला पाहिजे. इंग्लंडचा सुप्रसिद्ध पुढारी थोरला पिट म्हणत असे कीं, ‘ मीच एकटा इंग्लंडला वाचवूं शकेन; इतर कोणाची तें कार्य करण्याची शामत नाहीं. ’ ही त्याची अहं-काराची वृत्ति त्याच्या प्रत्यक्ष कृतीनंतर त्याला शोभूं लागली. वृत्तपत्रकारानेंहि ‘ मीच काय तो देशाचा उद्धार करूं शकेन ’ अशी ईर्षा मनांत बाळगावी, परंतु ती ईर्षा साधार का निराधार हें इतरांनीं अनुभवांतीं ठरवावयाचें असतें, स्वतः पत्रकारानें बोलावयाचें नसतें.

### ध्येयसिद्धीचे मार्ग वेगवेगळे

स्वतंत्र देशांत तर ‘सुधारणा’ हेंच ध्येय साहित्यिकांच्या डोळ्यापुढें असणार. समाज सुधारावा म्हणूनच कोणाचेहि कोणतेहि प्रयत्न चालू असणार. समाज बिघ-डावा, अधोगतीला जावा, म्हणून मी अमुक एक गोष्ट करीत आहें, असें कोणता शहाणा मनुष्य म्हणेल ? अर्थातच कोणी झाला तरी आपला हेतु चांगलाच आहे, वाईट अथवा दुष्ट नाहीं असेंच सांगणार. तथापि हेतु चांगला असला, तरी त्याच्या सिद्धीचा मार्ग नेहमीं बरोबरच असतो असें नाहीं. पुण्याहून मुंबईला जाण्यासाठीं निघालेला एखादा अडाणी मनुष्य चुकून साताऱ्याच्या गाडींत बसत नाहीं असें नाहीं. त्याला विचारलें असतां तोहि मी मुंबईला निघालों आहे असेंच म्हणेल; पण ज्या गाडीनें तो जात आहे ती गाडी मुंबईला जात नाहीं याचें ज्ञान त्यास नसेल. तें ज्ञान करून दिल्यास तो ती गाडी सोडून मुंबईला जाणाऱ्या गाडींत येऊन बसेल. तो कांहीं हट्टानें मी याच गाडींत बसेन असा आग्रह धरणार नाहीं. परंतु

नगर वाचनालय, सातारा.



समाजाच्या उत्कर्षाचे किंवा अपकर्षाचे मार्ग मुंबई-साताऱ्याच्या मार्गाइतके उघड उघड परस्पर विरुद्ध दिसणारे व हट्टी माणसाचीहि खात्री करून देणारे असे नसतात. समाजसुधारणेचे मार्ग इतके अनिश्चित व गुंतागुंतीचे असतात कीं, त्यांना मुंबई-साताऱ्याच्या आगगाडीच्या मार्गाची उपमा लागू पडण्यासारखी नसून, चक्रव्यूहांतील मार्गाचीच उपमा लागू पडेल. चक्रव्यूहांत सांपडलेला मनुष्य जसा भांबावून जातो आणि त्याला आपण चाललों आहों त्या मार्गानें गेल्यास आपण बाहेर पडूं, का घाण्याच्या बैलाप्रमाणें पुनश्च निघालेल्या जागीं येऊं याची खात्री नसते; त्याप्रमाणेंच बहुतेक सर्व सुधारणावादी लोकांची स्थिति असते. हेतूबद्दल वाद नसतोच; हेतु सर्वांचा एकच व तोहि चांगला प्रशंसनीयच असतो. मात्र वाटा वेगवेगळ्या आणि परस्परविरुद्ध दिशेनें जात असलेल्या दिसतात. अशा परिस्थितींत जो अगदींच अज्ञ असतो तो दुसऱ्याला विचारून जपून जपून पाऊल टाकीत असतो आणि जगांतल्या बहुतेक लोकांचा भरणा याच वर्गांत होतो. जो खरा तज्ज्ञ असतो त्याला शंकेचें कारणच नसतें, पण असे तज्ज्ञ समाजांत क्वचितच आढळतात. खरी अडचण येऊन पडते 'ज्ञानलवदुर्विदग्धांची'. स्वतःला तर मार्ग निश्चितपणें ठाऊक नसतो, पण स्वतःच्या ज्ञानाची घमेंड वाटत असल्यामुळें दुसऱ्यांचा सल्ला ऐकावयाचा नाहीं आणि रुळलेल्या मार्गानें जावयाचें नाहीं, असाच त्यांचा खाक्या असतो आणि अशा माणसांतच पुरोगामी का प्रतिगामी असला वाद उद्भवून जो तो स्वतः आपण खऱ्या मार्गावर आहोंत असें मानून, दुसऱ्या मार्गानें जाणाऱ्याला प्रतिगामी समजून, त्याची हेटाळणी करीत असतो. वास्तविक पाहतां समाजाची सुधारणा करून उन्नतीचा बिंदु गांठावयाची महत्त्वाकांक्षा सर्वांच्याच मनांत असते आणि सर्वच त्या उन्नतीच्या बिंदूकडे म्हणून चालले असल्यामुळें सर्वच आपल्या दृष्टीनें 'पुरोगामी' होत. तथापि आंकड्यांचें कोडें सोडविण्याचे मार्ग जसे अनेक असतात, जसे चक्रव्यूहांतून बाहेर पडण्याचे मार्गहि अनेक असूं शकतात; तसेच समाजोन्नतीचा बिंदु गांठण्याचेहि मार्ग अनेक असूं शकतील; या बुद्धीनें आणि रुळलेल्या मार्गानें जाण्यास कंटाळल्यानें अथवा त्यांत स्वतःच्या बुद्धीला कमीपणा आहे असें वाटल्यानें कांहीं धाडसी माणसें दुसऱ्या मार्गानें जाऊन सुधारणेचें शिखर गांठूं इच्छितात. इतरांना हा खटाटोप व्यर्थ कष्टप्रद वाटतो, कारण त्यांच्या मनाची अशी खात्री असते कीं, पूर्वी अनेकांनीं अनेक मार्गांचें निरीक्षण करून त्या सर्वांत जो सुखकर व सुलभ वाटला तो मार्ग सांगून ठेवला; आणि आतां पुनश्च प्रयोग करून तरी तोच निष्कर्ष निघणार ना? मग हें व्यर्थ जलताडण कशास करीत बसा. रुळलेल्या मार्गानें गेलेलें काय वाईट!

## प्रयोगोत्सुक का प्रयोगानुत्सुक

समाजाच्या नेत्यांत वर दर्शविल्याप्रमाणें दोन वर्ग असतात. त्यांतला

पहिला नवप्रयोगोत्सुक असतो. दुसरा जुन्या प्रयोगांवर श्रद्धा ठेवणारा असतो. हल्लीं जे पुरोगामी व प्रतिगामी असे शब्द वारंवार ऐकूं येतात त्या शब्दांतला गर्भितार्थ वर दर्शविल्याप्रमाणें आहे. अर्थातच शब्दानें मनांतला अभिप्राय यथार्थतेनें व्यक्त करावयाचा असल्यास, पुरोगामीच्या ऐवजीं **'नवप्रयोगोत्सुक'** आणि प्रतिगामीच्या ऐवजीं 'नवप्रयोगानुत्सुक' असे शब्द वापरावयास हवेत. पण ज्यांना केवळ शाब्दिक मोठेपणाच घ्यावयाचा आहे, ते जसे स्वतःस प्रतापराव, अच्युतराव इत्यादि वाटेल तीं भपकेदार नांवें घेतात आणि मग पर्यायानें इतरांच्या-कडे, त्यांच्या गौणत्वदर्शक नांवावरून, सापेक्षतेनें आपोआपच लघुत्व येतें, तसाच प्रकार या नांवासंबंधानेंहि झाला आहे. कांहीं साहित्तिकांना आपण कांहीं तरी अद्‌भुत व लोकविलक्षण कर्तबगारी करतों आहों असा अहंकार वाटूं लागून, त्यांनीं स्वतःला पुरोगामी हें नांव घेतलें आणि जे कोणी आपल्या पंथांतले नव्हेत असें त्यांना वाटलें त्यांना त्यांनीं स्वमतानें प्रतिगामी ठरविलें !

असो. या सर्व चिकित्सेचा निष्कर्ष हाच कीं, समाजांतले कांहीं पुढारी समाजाची सुधारणा करण्यासाठीं कांहीं नवे नवे प्रयोग करून पाहावे अशाविषयीं उत्सुक असतात, तर दुसऱ्या कित्येकांच्या अंगीं पूर्वेतिहास वाचून व पूर्वानुभव लक्षांत घेऊन, ही उत्सुकता राहिलेली नसते.

### नव्या कल्पना हितकारक ठरल्या पाहिजेतना ?

प्रज्ञा शब्दाचें लक्षणच नवीन नवीन कल्पना सुचणें हें असल्यानें प्रज्ञा-वंताला नव्या कल्पना सुचाव्या व त्याचा त्यानें उपयोग करावा हें स्वाभाविकच आहे आणि अशा प्रज्ञेच्या तरतमभावावरूनच समाजांत श्रेष्ठ-कनिष्ठपणा ठरत असतो. परंतु अशा कल्पनातरंगांचा उपयोग काव्यसृष्टींत कितीहि होत असला तरी प्रत्यक्ष सृष्टींतील गूढ प्रश्न उकलण्यास तिचा उपयोग थोडाच होऊं शकतो ? हीं गूढें उकलण्याचा प्रयत्न अनेक शास्त्रज्ञांनीं पूर्वी केला आहे. त्यांच्या प्रयोगांनीं सिद्ध झालेलीं प्रमेयें गृहीत धरूनच आपण सर्व व्यवहार करतों. तोच न्याय समाजविषयक प्रयोगांनाहि लागू आहे. समाज सुखी कसा होईल, समाजांत शांतता कशी नांदेल, समाजाची उन्नति कशानें होईल, या संबंधांत दूरदृष्टीच्या अनेक तज्ज्ञांनीं अनेक प्रयोग करून व अनुभव घेऊन नियम घालून दिले आहेत. ते नियम झिडकारून नवीन प्रयोगांनीं नवीन नियम शोधून काढ-ण्याची आणि ते नवे नियम समाजाला अधिक कल्याणकारक होतील असें पटवून देण्याची महत्त्वाकांक्षा बाळगण्याची कल्पना कितीहि आकर्षक असली तरी ती यशस्वी ठरणें तितकेंसें सुलभ नाहीं. यास्तव सामान्य जनांनीं उगाच गूढ गोष्टींत नवे नवे प्रयोग करून पाहण्यांत आणि ते प्रयोग अयशस्वी झाल्यास समाजाची तितकी हानि करण्यांत हंशील नाहीं. यास्तव सामान्यतः समाजांतील

पुढाऱ्यांचा कल नवप्रयोगविन्मुख असतो. नवप्रयोगोत्सुक लोक आपल्याला पुरोगामी म्हणवितात व तो शब्द कानाला गोड लागतो खरा. परंतु नवीन प्रयोगानें समाजाची खरीच प्रगति झाली आहे असें निश्चित दाखवून देण्यासारखा अनुभव क्वचितच येतो. यास्तव असा निश्चित अनुभव येईपर्यंत आपण नव्या प्रयोगांविषयीं साशंकच राहिलें पाहिजे. मग त्यामुळें आपण 'प्रतिगामी' मानले गेलों तरी हरकत नाहीं. प्रतिगामीचा पुरोगामी होण्याला वेळ लागत नाहीं. पुरोगामी होऊन त्या प्रयोगांत अपयश आल्यास पश्चात्ताप पावून पुनश्च पूर्वस्थळावर येण्यांत मात्र आपत्ति व अडचणी विशेष असतात.

### वर्तमानपत्रावर नैतिक व राष्ट्रीय बंधन

'कलेसाठीं कला' कीं 'जीवनासाठीं कला' असा एक वाद निघाला आहे. कलेसाठीं कला, शास्त्रासाठीं शास्त्र असें म्हणणारा इसम देखील 'वर्तमानपत्रासाठीं वर्तमानपत्र', असें म्हणण्याचें धाडस जोंपर्यंत करीत नाहीं, तोंपर्यंत वर्तमानपत्रें हीं समाजकार्यासाठीं, राष्ट्रकार्यासाठीं आहेत असेंच तत्त्व सर्वमान्य आहे, असें मी समजून चालतों. अर्थातच वर्तमानपत्रें हीं राष्ट्राच्या व समाजाच्या उत्कर्षासाठीं आहेत, असें मान्य केल्यावर वर्तमानपत्रांवर नैतिक व राष्ट्रीय बंधन आलेंच. जेणेंकरून नीतीला धक्का बसेल, अनीतीला प्रोत्साहन मिळेल, राष्ट्रीयत्वाचा लोप होऊं लागेल अशी शिकवण वर्तमानपत्रानें देऊं नये हें ओघानेंच प्राप्त झालें.

### नुसत्या भाषेचें कौतुक कसलें ?

'वर्तमानपत्रांसाठीं वर्तमानपत्र' असें आपण म्हणूं शकत नाहीं; आणि वर्तमानपत्र चांगलें चालविणें ही एक कलाच आहे; तेव्हां यांत 'कलेसाठीं कला' हें म्हणणें कोठें शिल्लक राहिलें? आणि मग वर्तमानपत्र चालविण्याच्या कलेला जर बंधन आलें तर इतर कला तरी बंधनाच्या पलीकडे कशा राहूं शकतील? चोरानें भिंतीला भोक पाडून घरांतलें गांठोडें लांबविलें हें दिसत असतां गांठोडें गेलें याची दखलगिरी न घेतां भिंतीला पाडलेल्या भोकाच्या सुबकतेची तारीफ करणारा एखादा 'चारुदत्त' असूं शकेल, पण इतर कोणीहि व्यवहारज्ञ ज्या भोकांतून घरांतलें सर्वस्व बाहेर गेलें त्या भोकाची केवळ कलेच्या नांवानें प्रशंसा करीत बसणार नाहीं.

वर्तमानपत्राचे कित्येक वाचक चारुदत्ताच्या वर्गांतले असतात. म्हणून हा इशारा देण्याची जरूरी भासत आहे. वर्तमानपत्रांत काय लिहिलें आहे याच्याकडे लक्ष न देतां केवळ कसें लिहिलें आहे याचीच वाखाणणी करणारे कांहीं हरीचे लाल असतात. तुम्हांला यांत लिहिलेलीं मतें आणि केलेलीं विधानें संमत आहेत काय? असें विचारलें असतां ते सरळ सांगतील कीं, त्यांतलीं मतें आम्हांला साफ नापसंत आहेत, पण लिहिण्याच्या शैलीचें आम्ही कौतुक करतों! याचा अर्थ हाच

कीं, वाढायला आणलेला जिन्नस कळकला असला तरी केवळ ज्या भांड्यांतून तो वाढायला आणला त्या भांड्याच्या घाटाचें कौतुक करण्याइतकें महत्त्व त्या घाटाला असतें! भाषा ही नुसती अर्थाची वाहक आहे. तो अर्थच जर अनर्थकारक असेल तर नुसत्या भाषेचें कौतुक कसलें? पण तसा फरक करून लेखांतली विधानें मान्य नसतां, नुसत्या भाषाशैलीचें कौतुक करून मिटक्या मारणारे कांहीं आंबटशोकी असतात व त्यामुळें वाचकवर्गाला अनिष्ट वळण लागतें, म्हणून हा इशारा देणें आवश्यक वाटलें. 'कलेसाठीं कला' हें तत्त्व मान्य केलें कीं, वर दर्शविलेली विसंगतता गळ्यांत पडते; यास्तव मुळांतच तें तत्त्व खोडून टाकलें पाहिजे.

### अंतिम मूल्याला तेवढें बंधन नसतें

'कलेसाठीं कला' या कल्पनेंतील हेत्वाभास दुसऱ्याहि एका रीतीनें व्यक्त करतां येतो. जेथें कार्यकारणभावाची परंपरा खुंटते तेथें आपण अडल्यामुळें पुढील प्रश्न थांबविण्यासाठीं असलें उत्तर देतों. घर कोणीं केलें, मनुष्यानें; मनुष्य कोणीं निर्माण केला, सृष्टीनें; सृष्टी कोणीं केली, ईश्वरानें; ईश्वर कोणीं केला, परमेश्वरानें; परमेश्वर कोणीं केला, परमेश्वरानें! कारण तेथें मति खुंटली. याच न्यायानें ब्रह्मानंद कशासाठीं, ब्रह्मानंदासाठीं; मोक्ष कशासाठीं तर मोक्षासाठीं इत्यादि अनन्वयी उत्तरें देण्यांत येतात, कारण त्याच्या पलीकडे मतीची गति जाऊं शकत नाहीं. यावरून हें लक्षांत येईल कीं, कलेसाठीं कला, शास्त्रासाठीं शास्त्र, सुधारणेसाठीं सुधारणा असलीं उत्तरें खरीं ठरण्याला कला, शास्त्र, सुधारणा या कल्पना मोक्ष, ब्रह्मानंद किंवा परमेश्वर यांच्यासारख्या अंतिम मूल्याच्या योग्यतेच्या असल्या पाहिजेत, पण त्या तशा नाहींत हें आपण व्यवहारावरून जाणतों. कला, शास्त्र, सुधारणा यांच्यापलीकडे मनुष्यबुद्धीला गम्य अशीं अंतिम मूल्यें असतात आणि आहेत म्हणूनच 'कलेसाठीं कला' हें उत्तर जाणूनबुजून आडरानांत शिरण्यासारखें आडमुठेपणाचें वाटतें. कलेपेक्षां नीतीचें अंतिम मूल्य अधिक म्हणून कलेला नीतीचें बंधन अवश्य पाळावें लागतें आणि नीतीला देखील जगत्कल्याणाचें बंधन पाळावें लागतें. अर्थातच अंतिम मूल्याच्या दृष्टीनें ज्याची पायरी जितकी खालची तितकीं त्याला बंधनें अधिक असणारच. यास्तव पत्रकारांनीं आपली पायरी आणि आपलें अंतिम साध्य ओळखून स्वतःवरचीं नैतिक बंधनें पाळलीं पाहिजेत.

### मनांत दृढनिश्चय करा

याचा आपण सर्व सुज्ञ पत्रकारबंधूंनीं विचार करून आपलीं सर्व साधनें समाजाच्या व राष्ट्राच्या उत्कर्षासाठींच मी उपयोगांत आणीन, वैयक्तिक भांडणांत आणि उखाळ्यापाखाळ्या काढण्यांत माझ्या बुद्धीचा अपव्यय करून मी राष्ट्राची साधनसंपत्ति व्यर्थ नष्ट करण्याचें पाप करणार नाहीं, बोलेन तर राष्ट्राच्या अभ्युदयाचा मार्ग सांगणारें वाक्यच बोलेन, नाहीं तर माझ्या

जिभेला खीळ घालून ठेवीन; लिहीन तर 'एकमेका साहाय्य करूं, अवघे धरूं सुपंथ' अशा दृष्टीनेंच लिखाण लिहीन, नाहीं तर माझी लेखणी मोडून टाकीन, पण तिच्या द्वारें समाजघातक थिल्लर विचार कागदावर रेखाटणार नाहीं, असा आपल्या मनाशींच दृढनिश्चय करावयास नको काय? राष्ट्रावरील संकटाची जाणीव होतांच 'अयं व्यायामकालः न तु उत्सवकालः' असें म्हणून आर्य चाणक्यानें कौमुदीमहोत्सव देखील मना केला आणि आपण त्याच्याहिपेक्षां हीन दशेला नेणारा 'फाल्गुनी उत्सव' देखील एवढ्या घोर संकटाच्या वेळींहि बंद करीत नाहीं, असें दृश्य दिसून आल्यास भावी पिढी आपणास काय म्हणेल, याचा विचार आपल्या मनांत यावयास नको काय? असा विचार सर्व सुज्ञ प्रतिनिधींच्या मनांत अवश्य वागत असेलच; मात्र त्यावर माझी एवढीच सूचना कीं, हा विचार सतत वर्षभर जागृत ठेवावा आणि प्रत्येक लेख लिहितांना व भाषण करतांना आपण जणुं काय परिषदेपुढेंच ठराव मांडीत आहों व त्यावर परिषदेंतच साधक-बाधक भाषण करीत आहों अशी भावना जागृत ठेवावी.

---

# केसरी पत्राचें धोरण ४

## ( मानपत्राला उत्तर )

लोकमान्य टिळकांनीं संस्थेंत काम करण्याची संधि मला दिली व तिचा मीं शक्य तितका फायदा घेतला. १९१४ ते १९२० पर्यंत लोकमान्यांचें मार्गदर्शन प्रत्यक्षपणें लाभलें. त्या काळांत लोकमान्यांनीं होमरूल चळवळ सुरू करून राजकीय आंदोलन जोरांत चालू केलें. लोकमान्यांच्या कार्याची सर कोणासच येते नाहीं हें खरें, तथापि त्यांच्या कारावासाच्या काळांत त्यांनीं लावलेल्या चळवळीच्या बीजाची आम्हीं यथाशक्ति जोपासना महाराष्ट्रांत केली. पुढें ते परत आल्यावर त्या बीजांचे अंकुर जोमानें फोफावले व त्यांचा राष्ट्रीय जीवनावर कसा परिणाम झाला हें सांगण्याची विशेष गरज नाहीं.

### अन्यायाचा प्रतिकार हेंच केसरीचें ब्रीद

लोकमान्यांनीं त्या वेळीं घालून दिलेला धडा पुढें चालविण्याची जबाबदारी आम्हांवर पडली व त्यांच्या तत्त्वानुरूपच आम्ही यथाशक्ति चळवळी करीत आलों. राजकीय क्षेत्रांत जें मिळेल तेवढें हस्तगत करून घेऊन त्याच्याच जोरावर जास्त मिळविण्यासाठीं झगडा चालू ठेवावयाचा हें त्यांच्या कार्याचें सूत्र होतें.

* श्री. ज. स. करंदीकर यांच्या सन्मानार्थ झालेल्या मानपत्र-समर्पण-समारंभ-प्रसंगीं त्यांनीं उत्तरादाखल केलेल्या भाषणाचा सारांश. केसरी, दि. २ ऑगस्ट १९५६.

नगर वाचनालय, सातारा.



'असंतोषः श्रियो मूलं' असें राजनीतीचें तत्त्व असल्यानें मिळालेले हक्क समाधानकारक आहेत असें कधींच म्हणावयाचें नाहीं; पण ते टाकून द्यावयाचे असा मात्र त्याचा अर्थ नव्हे. मँटेग्यू सुधारणांचा खर्डा पुढे आला तेव्हा त्यासंबंधीं त्यांनीं केलेलें मार्गदर्शनच अचूक होतें. मिळालेलें घालवून टाकणें यांत शहाणपण नाहीं, तर तें पचवून पाऊल पुढें टाकणें हाच राजकारण यशस्वी करण्याचा मार्ग होय. ज्या ज्या ठिकाणीं अन्याय दिसेल त्या त्या ठिकाणीं त्याचा प्रतिकार करणें हें केसरीचें ब्रीद आहे व त्या बाबतींत घस सोसण्यास केसरी तयार आहे. कांहीं लोक तत्त्वच्युतीचा आमच्यावर आरोप करतात आणि हिंदुसभेचें हें पत्र झालें असें म्हणतात, पण तें बरोबर नाहीं. कोणत्याहि एका पक्षाचें हें मुखपत्र नाहीं. ज्यांच्यावर संकटें कोसळतात त्यांची बाजू जोरदारपणें पुढें मांडणें हेंच केसरीचें ध्येय होय. या कामीं जात व पक्षभेद केसरी मानीत नाहीं हें सर्वांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. आज हिंदु समाजावर संकट कोसळल्यानें केसरींतून हिंदूंची बाजू मांडण्यांत येते तेव्हां यांत तत्त्वच्युति नाहीं.

लोकपक्षाची बाजू सरकारपुढें निर्भयपणें पुढें मांडीत असतां केसरीवर अनेक वेळा संकटें ओढवलीं. सिडनहॅमच्या कारकीर्दींत निष्कारण पांच हजारांचा जामीन मागण्यांत आला. त्यानंतरहि अनेक वेळां सरकारशीं खटके उडाले, पण त्या सर्वांतून केसरी यशस्वीपणें बाहेर पडला. हायकोर्टाच्या अब्रूनुकसानीचा खटला तेवढा आंगलट आला; पण त्या खटल्यामुळेंच कोर्टाच्या बेअदबीच्या कलमांत फरक करावा लागला, ही इष्टापत्तीच होय. सोलापूरच्या मार्शल लॉच्या प्रसंगानेंहि अनेक भानगडी उद्भवल्या, पण केसरी केव्हांहि आपलें कर्तव्य करण्यास डगमगला नाहीं.

### राष्ट्रोत्कर्षाला उपयुक्त अशा विधायक कार्यांस प्रोत्साहन

पुण्याच्या गोळीबाराचें प्रकरण अगदीं ताजेंच आहे. ती हकीकत प्रसिद्ध करूं नये व चौकशी-समिति नेमूं नये असा प्रतिबंध असतां आम्हीं चौकशी करून जी बाजू मांडली त्यामुळें गोळीबारांत जे बळी पडले त्यांच्या कुटुंबियांस सरकारकडून नुकसानभरपाई मिळाली. याशिवाय राष्ट्राच्या उत्कर्षाला कारणीभूत अशा नवीन नवीन विधायक कार्यांचा पुरस्कार करणें हें ध्येयहि केसरी कधीं विसरला नाहीं. असो; या संस्थेंत मला काम करण्याची संधि श्री. केळकर यांनीं दिली व त्यांच्याहि मार्गदर्शनाचा लोकमान्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें फायदा मिळाल्यामुळें मला थोडेंबहुत जें कार्य करतां आलें तें आपण सर्वांनीं गोड मानून घेतलें याबद्दल मला कृतज्ञता वाटते. आपण बहुसंख्येनें उपस्थित राहून माझा जो गौरव केला याबद्दल सर्वांचें मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

— समाप्त —

